प्रार्थना प्रवचन भाग २

महात्मा गांधी

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

थोडेसे प्रास्ताविक

गांधीजींची ही प्रार्थना प्रवचने जणू काय स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारताचा एक प्रकारे सामाजिक आणि राजकीय इतिहासच आहे. या प्रवचनांमधून गांधीजी कधी आईप्रमाणे तर कधी वडिलांप्रमाणे आणि कधी शिक्षकाप्रमाणे आपली समजूत घालताना, कधी समजावत असताना आढळतात. स्वातंत्र्य येत असताना आणि स्वातंत्र्य आल्यानंतर नवीन राष्ट्राची घडण आवश्यक होती. हे स्वातंत्र्य काही मोजक्या लोकांकरिता वा समाजाकरिता नसावे तर समाजातील सर्वात गरीब माणसालाही या स्वातंत्र्याचा प्रकाश दिसावा अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्यासमोर भारतातील केवळ मोजकी शहरे नव्हती तर सात लाख खेडी होती. त्या खेड्यांपर्यंत स्वातंत्र्य जोपर्यंत पोहोचत नाही तोपर्यं हे स्वातंत्र्य अपुरे आहे असे त्यांना वाटत होते.

स्वातंत्र्याची चाहूल चागल्याबरोबर भारतात हिंदू मुसलमानांच्या दंगलींना सुरुवात झाली होती. गांधीजींना द्विराष्ट्र सिद्धांत कधीही मान्य नव्हता. परंतु काँग्रेस श्रेष्ठी आणि जनताही या दंगलींना कंटाळली होती आणि याहून फाळणी बरी या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचली होती. अखेर गांधींजींना त्यांच्या निर्णयाला मान्यता द्यावी लागली.

सत्य आणि अहिंसेच्या ज्या आयुधांनी काँग्रेसने व पर्यायाने भारताने स्वातंत्र्याकरिता लढा दिला होता त्या तत्त्वांचे मोल आता काँग्रेसच्या पुढाऱ्यांना आणि जनतेलाही वाटेनासे होऊ लागले होते. सांप्रदायिक ऐक्य, खादी, ग्रामोद्योग, उर्दू आणि नागरी लिपीतील हिंदुस्तानी, भारतीय भाषांची पुनःस्थापना या सर्व विषयांवरील देशातील बोलक्या समाजाची भूमिका वेगळी होती. गांधी त्यांना अडगळीसारखे होऊ लागले होते.

रक्ताचा थेंबही न सांडता स्वांतत्र्य मिळवल्यानंतर देशातील धुरीण सैन्याची शक्ती वाढवू लागले होते. देशाचे रक्षण करण्याकरिता त्यांना शस्त्रसामर्थ्य आवश्यक आहे असे वाटू लागले होते. याचे कारण स्पष्ट आहे. शस्त्र धारण करणारांना नैतिक असण्याची आवश्यकता नसते, तो त्यांचा केवळ दर्शनी चेहरा असतो. परंतु अहिंसक राहायचे असेल तर विश्वबंधुत्वाची भावना अंतःकरणात मनापासून रुजवावी लागते. वाचा, विचार आणि वर्तनातून ती अभिव्यक्त झाली पाहिजे. असा समाज निर्माण करण्याकरिता गांधीजी प्रार्थना प्रवचनांचा उपयोग करताना आपल्याला आढळून येतात.

या सर्व समस्यांशी झगडण्याकरिता गांधीजींना नव्याने परत एकदा लढा उभारावा लागला असता. काँग्रेसचा जन्म झाला होता तो स्वातंत्र्यप्राप्तीच्या संघर्षाकरिता. ते स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसची उपयोगिता संपली होती. त्यामुळे गांधीजींनी काँग्रेसच्या विसर्जनाचाही विचार केला होता.

परंतु त्या लढ्याची फळे चाखण्याकरिता काँग्रेसचे लोक उत्सुक होते. साधनशुचिता हा शब्द कालबाह्य होऊ लागला होता.

यातून गांधीजींमध्ये एकटेपणाची भावना निर्माण होऊ लागली होती. त्यांना जणू मरणवेध लागले होते. हे सर्व बदलण्याची शक्ती द्यावी अथवा मला घेऊन जावे अशी ते ईश्वराजवळ सतत करुणा भाकत असल्याचे या काळात आपल्याला आढळेल.

या प्रार्थना प्रवचनांमध्ये गांधीजींनी आपले हृदय देशातील जनतेसमोर उघड केले आहे. या प्रार्थना प्रवचनांचा अनुवाद आज सादर करताना आनंद होतो. कोणा श्रेष्ठ सारस्वताने हा अनुवाद केला असता तर तो अजून चांगला झाला असता याची मला जाणीव आहे. परंतु अजूनही ते काम न झाल्यामुळे मी हे साहस केले आहे.

या प्रवचनांमध्ये टीपा तळटीपांच्या रूपात न देता लहान अक्षरात जिथल्या तिथे दिल्या आहेत.

ब्रिजमोहन.

१. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २७, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे लिहिलेले व्याख्यान वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,
ऑक्टोबर २७, १९४७

संघराज्यातील मुसलमानांना आपले वडिलोपार्जित घर सोडण्याकरिता आणि पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता बाध्य केले जात असल्याच्या तक्रारी माझ्याजवळ सतत येत आहेत. असे म्हणतात की त्यांना विविध प्रकारे त्रास देऊन आपले घर सोडून छावणीत जाऊन राहण्याकरिता बळजबरीने पाठवण्यात येत आहे. तेथून त्यांना रेल्वेने वा पायी पाठवले जाते. माझ्या मते मंत्रिमंडळाचे हे धोरण नाही. परंतु मी तक्रार करणारांना जेव्हा असे सांगतो तेव्हा ते हसतात आणि म्हणतात की एक तर तुमची माहिती चुकीची असावी वा नोकरवर्ग त्या धोरणानुसार चालत नसेल. मला माहीत आहे की माझी माहिती बरोबर आहे. मग काय कर्मचारी वर्ग अप्रामाणिक आहे? तसे नसेल अशी मला आशा आहे. परंतु चोहोकडून अशा तक्रारी येत आहेत. या अप्रामाणिकतेकरिता अनेक कारणे सांगितली जातात. सैन्य आणि पोलीस यांची सांप्रादियकतेच्या आधारवर वाटणी झाली असावी व त्यांचे सदस्य सध्याच्या पूर्वग्रहाच्या वातावरणात वाहून जात असावे हे याचे प्रमुख कारण असू शकते.

मी माझे मत सांगितले आहे की जर हे कर्मचारी, ज्यांच्यावर कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याची जबाबदारी आहे, सांप्रदायिक लोकांच्या प्रभावाखाली आले तर सुसंघटित शासनाच्या ठिकाणी बेशिस्त येणे अपरिहार्य असते आणि हे जर कायम राहिले तर समाजाचा विनाश होईल. सांप्रदायिकतेच्या वर उठणे व याच निरोगी भावनेने कनिष्ठ कर्मचाऱ्यांना प्रेरित करणे हे उच्च पदावरील कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे.

लोकांचे ठामपणे म्हणणे आहे की देशात जनतेतर्फे जे सरकार स्थापन करण्यात आले आहे त्याचा तसा प्रभाव नाही जसा प्रभाव विदेशी नोकरशाही तलवारीच्या बळावर आपल्या कर्मचाऱ्यांना धाकदपटशा दाखवून निर्माण करत होती. हे काही प्रमाणात खरेही आहे. पण जनतेच्या सरकारच्या हातात एक नैतिक शक्ती असते व ती विदेशी सत्तेच्या भौतिक शक्तीपेक्षा, जिचा ती आपल्या स्वतःच्या मदतीकरिता उपयोग करू शकते, निश्चितपणे उच्च असते. या नैतिक शक्तीकरिता जनमत सत्तेसोबत आहे असे आधीपासून मानले जात असते. आज याची उणीव असू शकते. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याशिवाय जनमत मंत्रिमंडळाबरोबर आहे की नाही हे कळण्याचा कोणताही मार्ग नाही.

केंद्र सरकारची काय स्थिती आहे हे आजच्या या सायंकाळी आपण तपासण्याचा प्रयत्न करत आहो. केंद्र सरकारने कधीही दुर्बल होऊ नये आणि ते दुर्बल आहे असे कधीही वाटायला नको. त्याला तर आपल्या शक्तीची जाणीव असली पाहिजे. यामुळे केंद्रीय कर्मचारी आदेशांचे पूर्णपणे पालन करत नाहीत यात जर काही सत्य असेल तर आदेशाचे पालन न करणारे कर्मचारी गेले पाहिजे अथवा मंत्रिमंडळाने वा संबंधित मंत्र्याने राजीनामा द्यावा व जी व्यक्ती यशस्वीपणे शासकीय बेशिस्तीला आवर घालू शकेल अशा व्यक्तीला जागा करून द्यावी.

माझ्याकडे येणाऱ्या तक्रारी जेव्हा मी तुम्हाला निःसंकोचपणे सांगतो तेव्हा मला आशा असते की या तक्रारींमध्ये कोणतेही तथ्य नाही आणि जर काही तथ्य असेलही तर उच्च अधिकारी प्रयत्नपूर्वक यशस्वीपणे त्या ठीक करतील.

संघराज्यातील जे नागरीक या अराजकाच्या प्रभावात येतात त्यांचे काय कर्तव्य आहे? कोणत्याही नागरिकाला आपले राहते घर सोडण्याकरिता भाग पाडता येईल असा कोणताही कायदा नाही हे स्पष्ट आहे. एखाद्याला आपले घर सोडण्याचा आदेश देण्याकरिता अधिकाऱ्यांना विशेष अधिकार मिळवावे लागतील. जोपर्यंत माझी माहिती आहे असा लेखी हुकूम कोणालाही देण्यात आलेला नाही. असे म्हणतात की या बाबतीत हजारो लोकांना तोंडी आदेश देण्यात आलेला आहे. घाबरून कोणत्याही ऐऱ्यागैऱ्याच्या हुकुमासमोर मान झुकवणाऱ्या लोकांना मदत करण्याचा कोणताही उपाय नाही. अशा सर्व लोकांना मी ठामपणे सल्ला देतो की त्यांनी अशा लेखी आदेशाची मागणी करावी की ज्याचा संशय आल्यानंतर त्याची वैधता आणि खरेपणा न्यायालयात तपासता येईल.

या प्रकरणी बहुसंख्याक समुदायाच्या लोकांना माझे सांगणे आहे त्यांनी आपल्या हातात कायदा घेण्याच्या प्रवृत्तीला कठोरपणे आळा घालावा. जर ते असे करणार नाहीत तर ज्या फांदीवर ते बसलेले आहेत तिलाच ते तोडतील. असे करून ते आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतील. हा असा अधःपात असेल की ज्यातून सावरणे कठीण होईल. वेळ असतानाच त्यांना सद्बुद्धी मिळो. घृणित कृत्यांचे वृत्त खरे जरी असले तरी त्यांनी त्यात वाहून जाऊ नये. आपले प्रतिनिधित्व करणारे मंत्री न्यायाकरिता जे काही आवश्यक असेल ते सर्व करतील यावर त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे.

द हिंदुस्तान टाईम्स, ऑक्टोबर २८, १९४७ आणि हरिजन नोव्हेंबर ९, १९४७

२. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २८, १९४७

नवी दिल्ली,
ऑक्टोबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दिल्लीचे एक गृहस्थ लिहितात : "निर्वासितांकरिता मी काही तंबू आणि कनात एका मुसलमान बंधूकडून घेतले होते. ते तर येथून निघून गेले. आता हे कुठे ठेवावे?'' ते सद्गृहस्थ आहेत आणि यामुळे या वस्तू कुठे ठेवाव्या असे ते विचारत आहेत. आणि त्यांचे म्हणणेही योग्य आहे. ते जर येथून निघून गेले तर आम्ही काय त्यांच्या वस्तू पचवून टाकायच्या? परंतु या वस्तू ठेवण्याची माझ्याजवळ कोणतीही व्यवस्था नाही. ही गोष्ट गृहविभागाशी संबंधित आहे. सरदारांचा सल्ला घेतला पाहिजे. वा जो कोणी अशी प्रकरणे हाताळतो त्याला यासंबंधी विचारले पाहिजे. किवा अशा प्रकारच्या कामाकरिता ज्यांची नियुक्ती झाली आहे त्या नियोगी साहेबांना (के. सी. नियोगी, निर्वासित आणि पुनर्वास मंत्री) विचारले पाहिजे. त्यांना जर त्या मुसलमान सदगृहस्थांचा ठावठिकाणा सापडू शकत असेल तर या वस्तू अथवा त्यांची किंमत होईल इतका पैसा त्यांना पाठवला पाहिजे.

अलिगढमध्ये जे विद्यापीठ आहे तेथील एक मुलगा मला भेटायला आला होता. तिथे पश्चिम पंजाब आणि सरहद्द प्रांतातील काही मुलेही शिकतात. ते तिथून परत पोहोचू शकले नाही आणि जे इथे आहेत ते परतू शकत नाहीत. त्यांनी तिथे का जाऊयेऊ नये? अखरीस जो पाकिस्तान व्हायचा होता तो तर झालेला आहे. मग हे आपापसात भांडण कशाला? इथल्या इतक्या सगळ्या मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये का जावे आणि तेथील हिंदू आणि शिखांनी इथे का यावे? छावण्यांमध्ये राहून त्रास सहन करत असलेल्या हिंदूंना आणि शिखांना मुसलमानांकडून कांबळी वगैरे गोळा करून ती वाटावी अशी या विद्यार्थ्यांची इच्छा आहे. चांगले आहे. त्यांचा हेतू चांगला आहे आणि निर्वासितांना या गोष्टींची गरज पण आहे. आणि निर्वासितांना या गोष्टी मिळल्या तर त्यातून मुसलमानांचे निर्वासितांबद्दलचे प्रेमसुद्धा प्रगट होईल. परंतु खरे सांगायचे तर त्यांनी पाकिस्तानमध्ये जायला पाहिजे आणि पाकिस्तानमधील हिंदू आणि शिखांनी आपली घरेदारे सोडून भारतात का जायला पाहिजे असे तेथील मुसलमानांना विचारले पाहिजे. माझ्याजवळ तक्रारींनी भरलेला कागदाचा गठ्ठा आहे. त्या तक्रारी निराधार नाहीत. अर्थातच त्यात काही अतिशयोक्ती असू शकते. परंतु त्यात जरी अतिशयोक्ती असेल तरी या तक्रारींकरिता भरपूर कारणे आहेत. हिंदूंनी आपल्या ठिकाणावरून का पळावे? त्यांना परत बोलावा. परत येऊन त्यांनी आपल्या स्वतःच्या घरी का राहू नये? विद्यार्थी जर हे करू शकतील तर आम्ही कधीही आपसात भांडत नव्हतो हे आपण जगाला दाखवून देऊ शकतो. तसे झाले तर

आपल्या प्रतिष्ठेला जो डाग लागला होता तो पुसला जाईल. मी आज त्या मुलांना हेच सांगितले. मी जे म्हणालो त्याच्याशी ते सहमत झाले. यानंतर ते काय करतील हे ईश्वरालाच माहीत.

परंतु आज मी तुम्हाला सांगणार आहे ती फार मोठी गोष्ट आहे. मला वाटते की बिहारमध्ये मी जेव्हा ठाण मांडून बसलो होतो तेव्हा ,आता तर स्वराज्य मिळाले आहे, रेल्वेत बसण्याकरिता तिकिट काढण्याची काय गरज असे लोकांनी ठरवून टाकले आहे असे वाटत होते. इतकेच नाही तर ते अतिरेक आणि बळजबरीही करतात. त्या दिवसात लोक आपसात भांडत नव्हते. परंतु आता त्यांना वाटते की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्याला अजून काहीही नको. मी या विषयावर बरेच लिहिलेले आहे व त्याचा काही परिणाम झाला व नंतर तिथे हे बंदही झाले. परंतु आता तर असे झाले आहे की संपूर्ण हिंदुस्तानात वा असे म्हणा की संघराज्यात लोक तिकिट न काढता रेल्वेतून प्रवास करतात. मोठमोठ्या लोकांनाही असे वाटते की चला आता रेल्वे तर आपली झाली आहे. होय रल्वे आपली झाली आहे यात काही शंका नाही परंतु आपण असे वागत असल्याच्या परिणामी आपले आठ कोटी रुपये वाया गेले आहेत. आठ करोड कशाला म्हणतात? एक करोड कशाला म्हणतात? जेव्हा काँग्रेसला एक कोटी रुपये गोळा करायचे होते तेव्हा किती त्रास झाला होता आणि किती लोकांना त्या कामाकरिता निघावे लागले होते? मीसुद्धा घरोघरी जाऊन पैसे गोळा करत असे आणि बरोबर लोकांनाही नेत असे. तेव्हा कुठे मोठ्या मुश्किलीने ती रक्कम गोळा झाली. या देशात आपण असे गरीब लोक आहो. आज तर आपण एक कोटी रुपये खर्च करून टाकतो आणि ते केव्हा खर्च झाले हे तर कळतसुद्धा नाही. अजूनही आपल्याला पैसे कसे खर्च करावे हे कळत नाही. आपण खर्च करतो कारण आपल्याला त्या कामाची जबाबदारी देण्यात आली आहे. लोक जर रेल्वेतून फुकट प्रवास करू लागले वा कामाकरिता जाताना जर ते तिकीट घेणार नसतील तर ती एक प्रकारची हिंसा आहे. माझ्या दृष्टिकोनातून असे करणे स्पष्टपणे दरोडा घालणे आहे. असे केले तर भारताचे दिवाळे निघेल आणि ना आमच्याजवळ रेल्वेगाड्या राहतील वा ना अजून काही राहील. मग आपण रडू की आता कुठे कसे जायचे. आठ कोटी रुपये काही कमी रक्कम होत नाही. आधी रेल्वेकडून आपल्याला जे मिळायचे त्यातून रेल्वे कंपनीचे व्याजही निघायचे. करोडो लोक रेल्वेने प्रवास करत असतात. सर्व पैसा देतील तर चांगले उत्पन्न होऊ शकते. त्या काळातही लोक तिकिटाशिवाय जायचे परंतु आजप्रमाणे हजारोंच्या संख्येत जात नव्हते. गाडीत निरीक्षक (इन्सपेक्टर) असायचे व नीट हिशेब ठेवायचे. आज तर असे झाले आहे की गार्ड आला तर त्याला मारा, ड्रायव्हर आला तर त्याला मारा. दिवसेंदिवस खर्च वाढतच चालला आहे. कोणतीही रेल्वे फुकट चालत नसते. प्रवासी विनातिकिट प्रवास करतात तर पैसे घ्यायचे नाही असे त्यात जे नोकर काम करता ते थोडेच म्हणणार आहेत. त्यांना जर पगार मिळाला नाही तर काय खातील? अशा प्रकारे रेल्वेचा करोडो रुपयात खर्च आहे आणि ती करोडो रुपये मिळवत असते. पुर्वी रेल्वेला कधीच तोटा येत नसे.

तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांकडून भरपूर पैसा मिळायचा व त्यांच्यावर किमान खर्च होत असे. यामुळे काही पैसे शिल्लक राहायचे. परंतु काल मी जेव्हा आठ कोटी रुपये घाटा ऐकला तेव्हा मला फार वेदना झाल्या. अशा प्रकारे चोहोकडे लूटच लूट राहिली तर आमचे भले होऊ शकणार नाही. याशिवाय आपण आपापसात भांडू, एकमेकांची कत्तल करू व लूट करू तर यातही काही फायदा होत नाही उलट खर्चच होतो. लोकांना जेव्हा त्यांचे घर सोडून पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता सांगण्यात येते तेव्हा ते काही फुकट थोडेच जात असतात. त्याना खायला प्यायला आणि अंगावर घालायला कपडे द्यावे लागत असतात. तो सर्व खर्च आपल्याला विनाकारण करावा लागतो. भारत काही श्रीमंतांचा देश तर नाही की काहीही केले तरी निभून जाईल. हे तर होऊ शकत नाही. यामुळे एक माणूस जरी रेल्वेने प्रवास करत असेल तर त्याने पैसे दिल्याशिवाय प्रवास करू नये. त्याने पैसे दिलेच पाहिजे. जेव्हा इंग्रजांची सत्ता होती तेव्हा पोलीस आणि इतर अधिकारी पुष्कळ पैसे खायचे. मी तिसऱ्या वर्गातून प्रवास करत असल्यामुळे मला या गोष्टी तर कळायच्याच. हरिद्वार कुंभमेळ्याच्या (एप्रिल १९१५मध्ये हृदयनाथ कुंझरू यांनी संघटित केलेल्या स्वयंसेवकाच्या कामाकरिता) वेळी जेव्हा मी गेलो होतो तेव्हा त्या काळातील त्या स्टेशनमास्तरला वरून पैसे दिल्याशिवाय वर जाऊ देत नसत. नंतर त्यांची बदली होत असे. अशा प्रकारे हजारो रुपये लाचलुचपतीत निघून जायचे. परंतु आता आपण सर्व सज्जन झालो आहो असे मला वाटते. स्टेशन मास्तर, सिग्नल देणारा, निरीक्षक वा गार्ड असे लोक आहेत त्या सर्वांना आपल्या हक्काचा जो पैसा मिळतो तोच खाऊन आपली आजिविका चालवली पाहिजे. लोकांचा पैसा त्यांनी हिरावून घेऊ नये. जे प्रवासी आहेत त्यांनी रेल्वे आपली आहे असे समजून तिचा उपयोग केला पाहिजे. त्यांनी रेल्वेत घाण करू नये, थुंकू नये, बिडी पिऊ नये, कारण नसताना साखळी ओढू नये आणि तिकिट काढल्याशिवाय एकाही प्रवाशाने प्रवास करू नये. असे झाले तर मी म्हणू शकेन की आम्हाला स्वातंत्र्य मिळाले. माझे म्हणणे ऐकायला इथे काही हजारो लोक तर नाहीत. आणि रेल्वेत जे लाखो लोक प्रवास करतात त्यांना माझे म्हणणे कोण सांगेल? मी जर रेल्वेचा मंत्री असतो वा प्रबंधक असतो तर माझ्याखाली काम करणारे जितके लोक असतील त्यांना मी हुकूम दिला असता की जितके लोक रेल्वेतून प्रवास करतात त्यांना सांगा की हे पाहा, आम्ही मारपीट करणार नाही, रेल्वे तुमची आहे, आम्ही तुमचे नोकर आहो, परंतु पैसे दिल्याशिवाय आम्ही तुम्हाला नेऊ शकत नाही. रेल्वे जर जंगलातून जात असेल तर तिथेच ती थांबवावी. तरीही ते ऐकत नसतील तर एंजिन ड्रायव्हरने गाडीपासून एंजिन वेगळे करून ते घेऊन जावे. मग ना कोणाला शिव्या द्यायच्या आहेत ना कोणावर बळजबरी करायची आहे. केवळ गाडी तिथेच उभी राहू द्यायची. जोपर्यंत लोक फुकट प्रवास करतील तोपर्यंत असेच केले पाहिजे. अखेरीस हा चांगुलपणा नाही. तुम्ही फुकट गाडीत बसाल, मारपीट कराल आणि मनात येईल तिथे गाडी थांबवाल. ही तर मी तुम्हाला येथील गोष्ट सांगितली. परंतु मी ऐकले आहे की

पाकिस्तानमध्येही लोक असेच रेल्वेत फुकटात फिरत असतात. तिथेही लोकांनी फुकट का फिरू नये? अखेरीस आपण एकाच हवेत जन्मलो आहो, एकच मीठ खातो मग जे इथे होते ते तिथे का होऊ नये? असेच जर सुरू राहिले तर दोघांचेही दिवाळे निघेल.अशा प्रकारे भाडे न देता रेल्वेतून प्रवास करणे, जिथे लाच घ्यायची असेल तिथे लाच घ्यायची, ज्याला मारायचे असेल त्याला मारायचे तर मग आपण लुटारू होऊन जाऊ. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपली जी किंमत वाढली होती ती परत घसरेल. यामुळे जितके लोक ऐकू शकत असतील त्यांनी ऐकावे, मंत्र्यानेही ऐकावे. एक माहितगार माणूस म्हणून मी सांगतो की जर हे सर्व थांबले नाही तर गाड्या बंद कराव्या लागतील. गाड्या चालणार नाहीत आणि ज्या चालतील त्यात कोणी फुकट प्रवास करू शकणार नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ७-११

३. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २९, १९४७

नवी दिल्ली,
ऑक्टोबर २९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज तुम्ही एक फार गोड भजन ऐकले. हे सुंदर भजन जी व्यक्ती म्हणाली ती कोण हे तुम्हा सर्वांना माहीत नसेल. त्यांचे नाव दिलिप कुमार राय आहे. त्यांनी अनेक ठिकाणांना भेटी दिलेल्या आहेत. त्यांच्याइतका गोड आवाज भारतात फार कमी लोकांचा असेल. मी तर असेही म्हणेन की त्यांच्यासारखा आवाज जगातसुद्धा फार कमी लोकांचा असेल. ते माझ्याकडे दुपारी आले होते. त्या वेळी मी फार वेळ देऊ शकलो नाही. मी केवळ १० मिनिट देऊ शकलो. त्या वेळी ते 'वंदेमातरम' म्हणाले. त्यांनी ते गोड आवाजात बसवले होते. त्यांना हे गाणे माहीत असले पाहिजे कारण ते बंगाली आहेत. मी त्यांचे ऐकले कारण त्यांना माझ्याकरिता ते म्हणायची इच्छा होती. परंतु मी काही संगीतशास्त्री तर नाही. एकमेकांमध्ये निर्माण होत असते तसे त्यांना माझ्याबद्दल प्रेम वाटते. यानंतर त्यांनी इकबालचे 'सारे जहॉ से अच्छा' हे भजन ऐकवले. तेसुद्धा त्यांनी एका नवीन सुरात बसवले आहे. मला हे फार आवडले. ते ऋषी अरविंदाच्या आश्रमात, जे पांडेचरीत आहे, अनेक वर्षांपासून राहतात. तिथे त्यांनी कोणते प्रशिक्षण तर घेतले नाही. ते तिथे गेले तेव्हा ते संगीतकार होते. नंतर त्यांनी ही कला विकसित केली.

कबीर म्हणतात की तुमच्याजवळ हे हत्ती, घोडे आणि करोडोची संपत्ती पडलेली आहे परंतु माझ्याजवळ तर केवळ मुरारीचेच नाव आहे. मी त्यानेच श्रीमंत झालो आहे आणि तुमच्याजवळ जी करोडोची संपत्ती पडली आहे ती व्यर्थ आहे. ती आज आहे आणि उद्या निघून जाईल, परंतु माझ्याजवळ जी संपत्ती आहे ती कधीही निघून जाऊ शकत नाही. हे या भजनाचे रहस्य आहे. रामनामाची काय महिमा आहे ते यात सांगितले आहे. आणि भजनात ज्या गोष्टी आहेत त्या तर तुम्ही ऐकल्याच आहेत परंतु अरविंद आश्रम काय गोष्ट आहे हेही तर तुम्हाला माहीत असले पहिजे. असा तर तिथे लोकांचा सतत प्रवाह सुरू असतो. लोक तिथे नेहमीच जात असतात. त्यांचे अनेक भक्त आहेत, हिंदू काय, मुसलमान काय, कोणाचीही तिथे घृणा नाही. सर अकबर हैदरी, आता तर ते वारले, दरवर्षी तिथे जायचे. याचा मी साक्षीदार आहे. श्री अरविंद तर नम्र भक्त आहेत. ते कोणालाही भेटत नाहीत. वरून त्यांचे दर्शन झाले तर झाले, नाही तर नाही. परंतु तरीही लोक जातात. त्यांच्या मनात कोणबद्दलही घृणा नसते. आपल्या मनात कोणाबद्दलही द्वेषभाव नसावा निदान इतके तरी आपण त्यांच्यापासून शिकू या.

परंतु काश्मीरमध्ये जे सुरू आहे त्यासंबंधी आज मी तुमच्याशी बोलू इच्छितो, आणि बोलायलाही पाहिजे. वर्तमानपत्रांमध्ये तर तुम्ही पाहतच आहा. ती तर एक विचित्र गोष्ट आहे. तीन दिवसांची गोष्ट आहे, कोणाला माहीत नव्हते. मलाही माहीत नव्हते की काय होणार आहे. परंतु एखादा म्हणू शकतो की जे घडून गेले ते गेले. आता तर असे म्हणतात की आफ्रीदी आणि इतर लोक बंदुका घेऊन घुसले आणि काही तर असेही म्हणतात की हे पाकिस्तानचे कारस्थान आहे. ते असेल, त्याच्याशी मला काहीही कर्तव्य नाही. मी तर तिथे जे होत आहे ते पाहतो आहे. एकीकडे ते पुंछपर्यंत पोहोचले आणि दुसरीकडून ते श्रीनगरपासून २२ मैल अंतरावर पोहोचले. तेथून तर सरळ सडक पडली आहे. कोणताही अडथळा नाही.

काश्मीरच्या महाराजांनी जेव्हा हे पाहिले तेव्हा ते म्हणाले की भारतीय संघराज्यात येतो. महाराजांनी लॉर्ड माऊंटबॅटन यांनी पत्र लिहिले आणि त्यांनी उत्तरात कळवले की तुम्ही येऊ शकता.(महाराजा हरिसिंह यांनी जम्मू आणि काश्मीरच्या सामिलीकरणावर ऑक्टोबर २७ला सही केली होती.) आता त्यांनी आश्रय घेतला आहे तर त्यांचे संरक्षण करावे लागेल. परंतु रक्षण करावे कसे आणि कोठून? रस्त्याने तर जाता येत नाही. विमानानेच जाणे भाग होते. परंतु विमानाने किती लष्कर जाणार? काही मोजकेच सैनिक जाऊ शकणार होते. त्यांना आपले शस्त्र न्यायचे होते, खाद्यसामुग्री न्यायची होती, जाडजूड कपडेही न्यायचे होते. एक अंस वजन वाढले तर वजन वाढले. वर पक्षाप्रमाणे उडायचे असेल तर किती माणसे उडू शकतील? बहुधा आजही काही गेले आहेत. बहुधा हजार गेले असतील. जास्तीत जास्त १५०० गेले असतील. आणि दुसरीकडे टोळीवाल्यांच्या भागातून खूप लोक आले आहेत. तेही तर लढणारे आहेत. लढत आहेत. यात तुम्ही काय विचार करणार आणि मी काय विचार करणार? अखेर माझे जीवन तर अशाच कामात गेले आहे. मी तर शस्त्रसंघर्ष मान्य करत नाही. परंतु मी हेही तर समजून घ्यायला पाहिजे की हे काय सुरू आहे. एकीकडे ते १५०० लोक आहेत आणि दुसरीकडे इतके सगळे आफ्रीदी आणि इतर लोक. आणि तिथे शेख अब्दुल्ला साहेब आहेत. त्यांना शेरे काश्मीर म्हणतात. म्हणजे ते वाघ आहे, सिंह आहेत, फार ताकदवान आहेत. तुम्ही त्यांचा फोटो तर पाहिलाच असेल. मी तर त्यांना ओळखतोसुद्धा. बेगम तर इथे आहेत. एका माणसाकडून जितके होऊ शकते तितके ते करत आहेत. ते काही लढणारे नाहीत. तिकडे काश्मीरमध्ये तगडे मुसलमान आहेत, तगडे हिंदू आहेत, राजपूत आहेत, शीख आहेत. त्यांनी ठरवले आहे की जे होईल ते करीन. ते तर मुसलमान आहेत. काश्मीरमध्ये मोठ्या संख्येत मुसलमान राहतात. येथून तर पूर्णपणे शस्त्रसज्ज होऊन सैनिक गेले आहेत, परंतु स्थानिक मुसलमानांनी काय करावे? मान्य की आपण सर्व रानटी झालो आहो - इथे काय, पाकिस्तानमध्ये काय. वेडेपणाचे कोणतेही कृत्य करायचे आपण सोडलेले नाही. काश्मीरच्या लोकांनीही रानटी व्हायला पाहिजे काय आणि मुलाबाळांची अमानूष कत्तल करायला

त्यांनी सुरुवात केली पाहिजे काय? काश्मीरही अशा भयानक अवस्थेत पोहोचले पाहिजे काय? पंडित नेहरू आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की काही तरी केले पाहिजे आणि ते सैनिक पाठवण्यात आले. त्यांनी काय करावे? त्यांनी अखेरपर्यंत लढायला पाहिजे आणि लढताना मरण आले तरी ते पत्करले पाहिजे. सशस्त्र सैनिकाचे काम आक्रमण करणाऱ्या शत्रूचा पाडाव करणे असते. ते लढत असताना मरण पत्करतात पण माघार घेत नाहीत. याचा परिणाम काय होईल हे ईश्वरालाच माहीत. भजनात सांगितल्याप्रमाणे आपले एकमेव धन मुरारी आहे. आपल्याजवळ करोडोच्या संख्येत गोळा केलेले पैसे नाहीत. इतकेच नाही तर शस्त्रसुद्धा आपली संपत्ती नाही. जे काही घडते ते केवळ ईश्वरच घडवतो. परंतु प्रयत्न करणे आपले काम आहे. आणि ते आपण केले पाहिजे. यामुळे या १५०० सैनिकांनी प्रयत्न केला आहे. परंतु श्रीनगरला वाचवण्यात ते १५०० लोकही जेव्हा मरण पत्करतील तेव्हाच त्यांचे कर्तव्य पूर्ण होईल. आणि श्रीनंगरबरोबरच संपूर्ण काश्मीरही वाचवला जाईल. त्यानंतर काय होईल?

असेच होईल की अखेरीस काश्मीर काश्मिरींचा होईल. काश्मीर काश्मिरी लोकांचा आहे आणि महाराजांचा नाही या शेख अब्दुल्लांच्या म्हणण्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. परंतु महाराजांनी शेख अब्दुल्लांना सर्वाधिकार दिले आहेत आणि काश्मीर वाचवण्याकरिता तुम्हाला जे काही करता येईल ते तुम्ही करा व काश्मीर वाचवा असे त्यांना सांगितले आहे. अखेरीस काश्मीरला महाराज वाचवू शकत नाहीत. काश्मीरला जर कोणी वाचवू शकत असेल तर ते मुसलमान, काश्मिरी पंडित, राजपूत, आणि शीखच वाचवू शकतात. शेख अब्दुल्ला यांचे या सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. हे शक्य आहे की काश्मीरला वाचवत असताना शेख अब्दुल्लांना प्राणत्यागही करावा लागेल. त्यांच्या बेगमला आणि मुलीला मरावे लागेल आणि काश्मीरमधील सर्व स्त्रियांनाही मरावे लागेल. आणि जर असे घडले तर माझ्या डोळ्यातून एक टिपूसही निघणार नाही. आपल्या नशिबात जर युद्ध लिहिलेले असेल तर युद्ध होईल. हे युद्ध या दोघांमध्येच होईल की इतरही त्यात गुंततील हे केवळ ईश्वरालाच माहीत आहे. आक्रमकांना पाकिस्तानचा कोणताही पाठिंबा वा प्रोत्साहन मिळाले नाही तर ते कसे तग धरू शकतील हे मला कळत नाही. शक्य आहे की पाकिस्तान उत्तेजन देत नसेल. नसेलही देत. काश्मीरचे सर्व लोक जेव्हा लढता लढता मरून जातील तेव्हा काश्मीरमध्ये कोण राहील? शेख अब्दुल्लाही गेले, कारण त्यांचे सिंहपण, त्यांचे वाघपण लढतालढता मरण्यातच आहे आणि मरेपर्यंत काश्मीरला वाचवण्यात, तेथील मुसलमानांना वाचवण्यात, तेथील हिंदू आणि शिखांना वाचवण्यातच आहे. ते कट्टर मुसलमान आहेत. त्यांची बायकोही नमाझ पढते. तिने मला गोड आवाजात औझोबिलाही म्हणून दाखवले होते. मी त्यांच्या घरी गेलेलो आहे. ते हिंदू आणि शिखांना मुसलमानांच्या आधी मरू देणार नाहीत. हिंदू आणि शीख तिथे अल्पसंख्य आहेत म्हणून काय झाले? शेखची जर ही वृत्ती असेल व जर त्यांचा

मुसलमानांवर प्रभाव असेल तर आम्ही सर्व ठीक आहो. आपल्यामध्ये जे विष पसरले आहे ते अजून जास्त पसरायला नको. काश्मीरमुळे आपल्यामधीलही ते विष कदाचित निघून जाऊ शकेल. ते विष निघून जावे म्हणून काश्मीरमध्ये ते जर असे बलिदान करतील तर आपले डोळेसुद्धा उघडतील. टोळीवाल्यांना केवळ मारण्यात रस आहे. यामुळे ते काश्मीरमध्ये घुसले आणि आपली ताकदसुद्धा दाखवली. त्यांच्याबरोबर कोणकोण आहेत हे सर्व मला माहीत आहे. परंतु काश्मीरमधील सर्व हिंदू मुसलमानांनी जर आपल्या जीवाचे बलिदान दिले तर आपले डोळे उघडल्याशिवाय राहणार नाहीत. मग आपल्याला कळेल की सर्व मुसलमान विश्वासघातकी आणि वाईट नाहीत, त्यांच्यातसुद्धा काही चांगले लोक आहेत. त्याचप्रमाणे सर्व हिंदू आणि शीख चांगले साधूपुरुष आहेत वा वाया गेलेले व काफीर आहेत हे विधानही बरोबर नाही. माझा विश्वास आहे की हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांमध्ये चांगले लोक असतात आणि या चांगल्या लोकांमुळेच हे जग चालत असते - शस्त्र घेऊन फिरणाऱ्या लोकांमुळे नाही.

आज आपण जे भजन ऐकले त्याचा सार हा आहे. काश्मीरच्या भूमीचे रक्षण करण्याकरिता तेथील प्रत्येक माणूस मरण पावला तर मी आनंदाने नाचेन. माझ्या अंतःकरणात किंचितही दुःख नसेल. जग नेहमीप्रमाणे चालणार आहे. हा सर्व ईश्वराचा खेळ आहे. परंतु आपल्याला नेहमी प्रयत्नशील राहावे लागते आणि योग्य गोष्ट करण्याकरिता मरण्याची तयारी ठेवावी लागत असते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १२-१६

४. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ३०, १९४७

नवी दिल्ली,
ऑक्टोबर ३०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

इथे काय सुरू होते ते मला कळत होते. त्याचे मला दुख होत होते. आज मी तुम्हाला सांगतो की हे एका खाजगी माणसाचे घर (बिर्लाभवन) आहे. इथे काहीही गोंधळ व्हायला नको. जे लोक इथे येऊ इच्छितात त्यांचे स्वागत आहे. परंतु इथे आल्यानंतर काही तक्रार करणे योग्य नाही. आज एक सद्गृहस्थ म्हणाले की मी इथे प्रार्थना होऊ देणार नाही. अशा परिस्थितीत प्रार्थना घ्यावी की नाही हा प्रश्न मला पडतो. आक्षेप घेणारा माणूस गेला कारण तुम्ही त्याला जाण्याकरिता सांगितले. तो परतला आणि परत गेला. माझ्याकरिता ही चांगली गोष्ट नाही. याचा अर्थ तो मनातून दुखावला आहे. मला असे वाटते की अशाच प्रकारे तुमच्यापैकीही अनेकजण दुखावले असतील कारण प्रार्थनेत कुराणमधील काही भागाचा समावेश करण्यात आला आहे. परंतु मी असहाय आहे कारण तो प्रार्थनेचा अविभाज्य घटक आहे. इथे प्रार्थना झाली नाही तर मी प्रार्थना करू नये असे तुम्हाला वाटते काय? मी इथे प्रार्थना घेतली नाही तर मी प्रार्थना करणार नाही असे नाही. जगात एकही माणूस माझ्या बाजूने उभा राहिला नाही तरी मी प्रार्थना करीन. माणूस मनातल्या मनातसुद्धा प्रार्थना करू शकतो. इथे मला अहिंसेच्या दृष्टीतून विचार करायचा आहे. माझे कर्तव्य काय हे त्या दृष्टीनेच मी ठरवले पाहिजे. मी प्रार्थना करीन म्हणून एखाद्या माणसाने निघून जावे अशी माझी इच्छा नाही. आज प्रार्थना करायची माझी इच्छा नाही आणि मला वादातही पडायचे नाही. परंतु तरीही मी प्रार्थना करीन कारण आपण कठीण काळातून जात आहो आणि लोकांना गांधी काय म्हणतो हे ऐकण्याची इच्छा आहे. मी बोलणारच आहे कारण मला काय म्हणायचे ते निदान लोकांना कळेल. परंतु आज मी वादात पडणार नाही कारण मी असहाय आहे.

प्रार्थना बंद करून व केवळ चर्चा सुरू ठेवावी काय याबद्दलही मी निर्णय घेतला पाहिजे. हा मोठा प्रश्न आहे. मला याबदद्ल विचार करावा लागेल. आज याबद्दल माझी काही बोलण्याची वा वाद करण्याची इच्छा नाही. मी जर चर्चा सुरू ठेवली तर मला प्रार्थना राहू द्यावी लागेल. याबद्दल मी वृत्तपत्रांतून वक्तव्य देईन.

तुम्ही लोक आलेले आहा हे जेव्हा मी पाहिले तेव्हा मी इथे आलो. माझी संस्कृती आणि अहिंसा मला सांगते की मी माझे अंतःकरण तुमच्यासमोर उघड करून ठेवावे आणि मी कोण आहे ते दाखवावे. माझ्याकरिता जगात सत्य आणि अहिंसेशिवाय काहीही नाही. तुम्हाला जर सत्य आणि अहिंसेचा अर्थ कळला तर या जगात तुम्ही महान गोष्टी करू शकता. मला काही मोठमोठ्या गप्पा

हाणायच्या नाहीत. जगात मोठमोठ्या गोष्टी होत असतात परंतु ईश्वराचा जो नियम आहे तो कोणीही बदलवू शकत नाही आणि ईश्वरही या जगाचे नियम बदलवू शकत नाही. मला असे वाटते की आमच्यात अहंकार भरलेला आहे, अज्ञान भरलेले आहे. यामुळे सत्यासारखी मोठी गोष्ट व्यापारात कशी चालू शकेल, व्यवहारात कसे चालू शकेल असे आपल्याला वाटत असते. अहिंसा कशी काम करू शकेल असे आपल्याला वाटत असते. लोक जेव्हा मला शिव्या देतात तेव्हा लोक म्हणतात की ते तुम्हाला इतक्या शिव्या देतात तर तुम्ही एक तरी शिवी द्या. लोक शिव्या देतात तर एक थापड का मारत नाही. यामुळे होते काय की आम्ही पुढे जाऊ शकत नाही. परंतु आम्हाला तर पुढे जायचेच आहे आणि माझ्या मते जन्म घेण्याचे सार्थकत्व यातच आहे. मी एका स्थितीत राहू शकत नाही. ईश्वर स्थिर आहे. परंतु उपनिषदात सांगितले आहे की तो स्थिरही आहे आणि गतिमानही आहे. तो नेहमी गतीमान असतो - जो असा गतीमान असतो तो स्थिर आहे असे वाटत असते. आपल्याला कुठे माहीत असते की सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी अस्थिर. परंतु जेव्हा आपण शिकतो की जी गोष्ट गतिमान असल्यासारखी वाटते ती स्थिर आहे. ईश्वरी माया अशी आहे की जो स्थिर आहे आणि अस्थिरही आहे तो ईश्वर आहे. आपल्यामध्ये स्थैर्यासारखी कोणतीही गोष्ट नाही. गती आहे, गती आहे तर आम्हाला पुढे जावेच लागेल. आपण आईच्या पोटातून निघालो आणि पुढे निघालो. पुढे जाता जाता म्हातारपण येते. जगात असेच चालत असते. जो जन्मतो त्याला पुढे जावे लागते, त्याला पुढे जावे लागतच असते. काही लोक म्हातारपणाला घसरण म्हणतात. मी तसे समजत नाही. वार्धक्य पिकलेले फळ आहे. शरीर सुटते, आत्मा थोडाच सुटतो. तो ना तर मरतो ना पडतो. आत्म्याची गती अविरत सुरू असते आणि जगात सत्य आणि अहिंसेशिवाय काम चालू शकत नाही. माझा दावा आहे की लहान मुलांनीसुद्धा सत्य आणि अहिंसा शिकायला पाहिजे. आई जर हे शिकेल तर ती मुलालाही शिकवेल. आजच्या आज तर आई शिकू शकत नाही. परंतु असे म्हणतात की माणूस आदिकाळापासून, करोडो वर्षापासून आहे. तर आपण तो विकास पाहिला पाहिजे. याकरिता आपल्यामध्ये धैर्य तर असायलाच पाहिजे. माझी याबद्दल अधिक सांगण्याची तर इच्छा नाही, परंतु सत्य आणि अहिंसा यांच्याशिवाय काहीही होऊ शकत नाही. आम्ही विकास करू शकत नाही.

मला आज वाद तर करायचा नाही. तुम्ही उद्या याल. जर उद्यासुद्धा कोणी कुराणमधील आयत वाचण्यावर आक्षेप घेतला तर त्यावर वाद करायचा की नाही याचा मी त्या वेळी विचार करेन. जर कोणाची तक्रार असेल तर तो म्हणेल की माझी तक्रार आहे. नाही तर म्हणेल की आम्हाला प्रार्थनाही ऐकायची आहे आणि चर्चाही. परंतु आपण संतापायचे नाही हे लोकांना कळले पाहिजे. हं, पण नंतर कोणी आरडाओरड करू लागला आणि लोकांना ऐकू द्यायचे नाही असे त्याने ठरवले तर शक्य आहे की तुमच्या हिंसेला हुसकावले जाईल आणि माझ्या अहिंसेची परीक्षा होईल. हेही कळेल की तुम्ही

माझ्यासोबत कुठवर जाऊ शकता. तुम्ही जर माझ्याबरोबर राहाल आणि अहिंसेची साथ द्याल तर अहिंसेसमोर हिंसा टिकू शकत नाही असा माझा दावा आहे. परंतु मी म्हणेन त्याप्रमाणे तुम्ही वागला पाहिजे ही त्याकरिता अट आहे. तुम्ही संयमाने वागाल आणि रागाच्या भरात काहीही करणार नाही असे तुम्ही मला आश्वासन दिले पाहिजे. कुराणातील पाठ म्हणण्याला विरोध करणारे सज्जन गृहस्थ अडाणी आहेत. कुराण ए शरीफने काय नुकसान केले आहे? मुसलमान जर मार्गावरून भरकटले असतील तर तो कुराणचा दोष असू शकत नाही. अरबी भाषेत लिहिलेले कुराण तर उदात्त आहे, सनातन आहे. जो त्याची घृणा करतो त्याच्यापेक्षा जास्त अडाणी कोणी आहे असे मी समजत नाही. अशाच प्रकारे तक्रार करणाराला आपण समजावून सांगितले पाहिजे. हं, जर कोणी म्हणेल की मला प्रार्थनाच ऐकायचीच नाही तरी मी प्रार्थनाही करीन आणि चर्चाही करीन. परंतु मी प्रार्थना बंद केली म्हणून तुम्ही कोणाला मारले तर मी ते सहन करू शकणार नाही. जर मी एकटा असलो आणि पाच माणसे मला मारायला आली तर मी म्हणेन की हे माझे शीर तुमच्यासमोर आहे. मी म्हणेन पाचांनी मारायची काय आवश्यकता, एकच माणूस गळा कापण्याकरिता पुरे आहे. आणि तरीही मी प्रार्थना करेन. तुमचे अंतःकरण जेव्हा असे होईल तेव्हा ना तुम्ही कोणाला माराल ना कोणावर संतापाल. तक्रार करणारा ओरडून ओरडून जरी तक्रार करू लागला तरी आपण प्रार्थना करू. उद्या प्रार्थनाही होईल आणि चर्चाही. जर उद्या कोणाला तक्रार करायची असेल तर त्याने तक्रार करून निघून जावे. त्याच्याकरिता मी स्वतःचा विनाश करून घेऊ शकत नाही. मी क्रोधाला नियंत्रणात ठेवीन, धैर्य ठेवीन तेव्हाच माझी गाडी पुढे जाऊ शकते. मला इतकेच सांगायचे होते. आता तुम्ही शांतपणे घरी जा आणि वाद करू नका. घरी गेल्यानंतर यावर विचार करा.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १६-२०

५. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ३१, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ३१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझ्या मते दोन वा तीन माणसांकरिता उरलेल्या ३०० लोकांना निराश करणे हीसुद्धा एक प्रकारची हिंसाच आहे. या माणसांना विरोध करण्याचा तर हक्क आहे परंतु सौजन्य आणि शिष्टाचार सांगतात की त्यांनी आपल्या या हक्काचा उपयोग बिर्लाजींच्या या खाजगी जागेत करायला नको. परंतु ते करतील तर त्यांना कोण अडवू शकतो? असे असेल तर सभेतील इतर लोकांनी त्यांना सहन केले पाहिजे. त्यांनी आपल्या मनात विरोधकांबद्दल राग धरू नये आणि इथे अथवा बाहेरही त्यांना काही म्हणू नये. तुम्हाला जर हे मान्य असेल तर मी प्रार्थना करेन आणि तिच्यात कुराणामधील आयतही असेल. तुम्ही लोक, जे बहुमतात आहा, असा विचार करू नका की आम्ही इतके जास्त लोक असल्यामुळे विरोध करणाराची काहीच किंमत नाही. तुम्ही जर असा विचार कराल तर ती हिंसा होईल. जे अल्पमतात आहेत त्यांची आपण जास्त काळजी घेतली पाहिजे हीच शिकवण मी आतापर्यंत देत आलो आहे. आणि अहिंसा कशा प्रकारे काम करते याचीच शिकवण मी यापुढेही देत राहणार आहे.

सत्य आणि अहिंसेचे जे मूलभूत सिद्धांत आहेत ते समजून घेणे फारसे कठीण नसते. ते सिद्धांत समजून घेण्याकरिता कोणत्याही विशेष पदवीची आवश्यकता नसते. इंग्रजी तर सोडाच, तिच्याकरिता मातृभाषा शिकण्याचीही गरज नसते. त्याकरिता जे काही आवश्यक असते ते आपण आपल्या आईवडिलांकडून लहानपणीच शिकतो. त्या सिद्धांतांचे अनुसरण करणे तर त्याहूनही सोपे असते. यामुळे तुम्ही तो विरोध सहन करू शकलात तर त्या विरोधानंतरही मी प्रार्थना करेन. सौजन्याची मागणी असते की कुराणातील पाठ म्हणण्याला एखाद्याचा विरोध असेल तर त्याने आपला दृष्टिकोन मांडावा व निघून जावे. त्यानंतर मी हिंदू धर्माची कशा प्रकारे हानी करतो आहे हे ती व्यक्ती मला समजावून सांगू शकते. मी समजून घेऊ शकणारा माणूस आहे. यामुळे ते मला समजून सांगू शकतील तर मी त्यांचे म्हणणे ऐकेन. मला तर वाटते की यामुळे मी हिंदू धर्माचा फायदाच केला आहे. हे काम मी आजच थोडा करतो आहे, वर्षांपासून मी हे काम करत आलो आहे आणि यामुळे हिंदू धर्म मुळीच कलंकित झालेला नाही. असे करून माझे जे मुसलमान मित्र आहेत त्यांच्याशी मी अधिक जवळीक निर्माण करू शकतो. हे तर मी काही वाईट केलेले नाही. अशाच प्रकारे सर्व जग जर मी आपलेसे करू शकलो तर कोणीही माझा शत्रू वा विरोधक राहणार नाही. असे झाले तर किती चांगले होईल. परंतु मी कुठे असा परिपूर्ण माणूस आहे की माझा कोणीही विरोधक राहणार नाही! हे कसे शक्य आहे? यामुळे जे विरोध

करत आहेत त्यांना सहन करणे तर मी शिकलो पाहिजे? तुम्हीसुद्धा त्यांना सहन करणे शिकाल तर त्यांना वाटेल की अरे हे तर सर्व सज्जन लोक आहेत, आम्हाला कोणी काही म्हणतच नाही, सर्व सद्भावपूर्वक आमच्याशी वागतात. जर आपण असे वागू तर भारताचा चेहरामोहरा बदलून जाईल याबद्दल मला मुळीच शंका नाही. तुम्ही हे सर्व सहन कराल काय असे यामुळेच मी तुम्हाला विचारतो आहे. पोलिसांनीसुद्धा त्यांना काहीही म्हणू नये. (श्रोत्यांनी हे मान्य केले आणि नंतर प्रार्थना सुरू झाली. प्रार्थनेनंतर आक्षेपक शांत राहिल्याबद्दल गांधीजींनी आक्षेपकाचे तसेच उर्वरित श्रोतृसमुदायाने दाखवलेल्या सहनशीलतेबद्दल श्रोतृसमुदायाचे आभार मानले.)

जर असेच सुरू राहिले तर त्याचा परिणाम चांगला होणे अपरिहार्य आहे. आजच्या प्रार्थनेत श्री दिलिप कुमार रायनी "मन मंदिरमें प्रीत बसाले" (तुझ्या मनोमंदिरात प्रेम वसू दे) हे गाणे म्हटले होते. त्यांच्या गोड आवाजाने आणि गाण्याच्या शैलीने मी आनंदित झालो. यात व्यक्त करण्यात आलेली भावना काही आगळीवेगळी नव्हती परंतु ती ज्या पद्धतीने सादर करण्यात आली तिलाच कला म्हणतात. भजनात सांगितले आहे की आपण आपले हृदय मंदिरासारखे करावे आणि त्यात प्रेमाची स्थापना करावी. तर यातूनसुद्धा आपल्याला अहिंसा शिकवण्यात आली आहे. हे भजन लिहिणारा कवी माणसाला म्हणतो की तू मूर्ख आणि अडाणी माणसासारखा का वागतोस. तू जर केवळ तुझ्या मनोमंदिरात दीप पेटवशील तर सर्व काही चांगले होईल. यानंतर तर सर्व जगात त्या ज्योतीचा प्रकाश दिसेल, कुठेही काळोख असणार नाही. अशाच प्रकारचा चमत्कार सत्य आणि अहिंसेतही भरलेला आहे. ही सरळसाधी गोष्ट आहे, परंतु इतकीशी गोष्ट आपण शिकलो तर जगातील आपले सगळे काम सोपे होऊन जाईल.

नोआखालीत मी पाहिले की तेथील श्रीमंत लोक गरिबांना तिथेच सोडून पळून गेले होते. तेथील खेड्यापाड्यांमध्ये ते लोक, ज्यांना आपण आपल्या मूर्खपणामुळे अस्पृश्य म्हणतो, भरलेले आहेत. मी तिथे फिरलेलो असल्यामुळे मला माहीत आहे की त्या लोकांना फार त्रास आहे. तेथील स्त्रिया बांगड्या घालणे आणि डोक्याला कुंकू लावणेसुद्धा (सौभाग्याची चिन्हे) विसरल्या होत्या. पंजाब वा इतर ठिकाणाहूनही जे लोक येत आहेत त्यांच्यातही मी पाहतो की श्रीमंत लोक तर काही ना काही आपले कामकाज करतातच. त्यांच्याजवळ पैसा असतो आणि ते मित्रही मिळवतात. परंतु गरीब बिचारे काय करू शकतात? ते कुठे जातील? नोआखालीत तर मी पाहिले होते की केवळ हिंदूच दुःखी होते परंतु बिहारमध्ये मुसलमानही दुःखी होते. मी त्यांना सांगितले की तुमच्यातील जे मेले ते मेले, आणि तुमच्यात जे श्रीमंत आहेत त्यांना बाहेर जाण्याची इच्छा असेल तर ते जाऊ शकतात. परंतु गरिबांचा केवळ ईश्वरच वाली आहे. परंतु ईश्वर आपल्या हाताने वा तोंडाने काम करत नसतो. तो लोकांना प्रेरीत

करतो आणि त्यांच्याकडून काम करवून घेतो. परंतु ईश्वराला पूर्णपणे विसरून सैतानाला आपला देव मानण्याइतके श्रीमंतांनी कठोर आणि जडवादी व्हायला पाहिजे काय? श्रीमंत लोक तिथून पळून गेले आहेत आणि तिथे राहिलेले गरीब आमच्याकरिता काही तरी करा असे मला लिहीत आहेत. ते माझ्याकडे पाहतात कारण त्यांच्याकरिता मी अनेक वर्षे काम केले आहे. परंतु मी काय करू शकतो? माझ्यात ना तर शक्ती आहे ना माझ्याजवळ सत्ता. परंतु ते मला सतत कळवत असल्यामुळे मला त्यांची परिस्थिती माहीत आहे.

दिल्लीच्या निर्वासित छावणीत फार मोठ्या संख्येत गरीब लोक आहेत. त्यांच्यात काही श्रीमंत लोकही आहेत आणि त्यांच्यातील काही इतके चांगले लोक आहेत की इतरांना खाऊ घातल्यानंतरच ते जेवतात. यामुळेच मी म्हणत असतो की इथे येत असलेल्या लोकांमध्ये आपण गरीब आणि श्रीमंत असा भेद करू नये. असे झाले तर आपणच एकोप्याने शांततापूर्वक आणि स्वस्थ चित्ताने राहू शकू.

इतक्यातच एका युरोपीय जोडप्याने आपल्या छावण्यांना भेट दिली होती. त्या छावण्या पाहून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले की जरी तिथे गरीब-श्रीमंतामध्ये भेद होता तरी लोक एकमेकांबरोबर गुण्यागोविदाप्रमाणे राहत होते. ते जोडपे केवळ सेवा करण्याच्या उद्देशाने आले होते. जर आपण सर्व ओठांवर ईश्वराचे नाव घेऊन काम करू तर दुधात साखर मिसळावी त्याप्रमाणे पंजाबचे निर्वासित दिल्लीच्या लोकांमध्ये मिसळून जातील.

दिल्लीत अजूनही मोठ्या संख्येत मुसलमान आहेत. आज मी अशी यादी पाहिली की, त्या यादीत अतिशयोक्ती नसेल अशी आशा आहे, जिच्यात धाक दाखवून हिंदू वा शीख धर्मांत धर्मांतर करायला लावण्यात आलेल्या शेकडो मुसलमानांची नावे आहेत. अशा प्रकारे ज्या लोकांना धर्मांतर करायला लावण्यात आले आहे त्या लोकांना मी सांगू इच्छितो की तुमच्या अंतःकरणात जर खरोखर ईश्वराचा वास असेल तर तुम्हाला ना तर दाढी वाढवण्याची गरज आहे ना शेंडी ठेवण्याची. ज्या प्रकारे मी कुराण वाचतो आणि माझा आत्मा खुष होतो त्याप्रकारे ज्यांना स्वतःहोऊन गीता वाचायची असेल तर ते तसे निश्चितच करू शकतात. परंतु कोणी जर कुराण वाचण्याकरिता माझ्यावर सक्ती करत असेल आणि मी त्याचे ऐकले नाही तर जिवे मारण्याची धमकी देत असेल तर मी म्हणेन की कुराणमध्ये हिरेरत्न जरी असले तरी मला ते नको. यामुळेच जे मुसलमान हिंदू वा शीख झाले आहेत त्यांनी आपल्या धर्माला चिकटून राहावे असे मी म्हणेन. आपण जर त्यांना आपल्या धर्माचे अनुसरण करण्याची सक्ती केली तर आपण हिंदू धर्माचा विनाश करू. अशी गोष्ट भारतात कधीही होऊ शकत नाही, आणि जर असे झाले तर ती आपला विनाश करील व आपण आपले स्वातंत्र्य गमावू. यामुळे येथील मुसलमानांना मी सांगत असतो की तुम्ही इथे निर्भय होऊन राहा. ज्यांनी आपला धर्म बदलला आहे त्यांनी सांगावे की आम्ही

त्या वेळी भयभीत झालेलो होतो, परंतु आता आम्हाला कळले आहे की ज्या लोकांची ईश्वरावर श्रद्धा असते ते कधीही भीत नाहीत व जर ते कधी घाबरतच असतील तर ते केवळ ईश्वराला घाबरत असतात. ईश्वराला घाबरणे चांगली गोष्ट आहे कारण तो प्रेमाचा सागर आहे, दयासागर आहे. त्याला भिण्याने तर आपण कृतार्थ होतो. परंतु माणसाने माणसाला कधीही घाबरू नये. यामुळे त्यांनी म्हणावे की धर्मपरिवर्तनापेक्षा आम्ही मरणे पसंत करू. वाटल्यास आम्हाला पाकिस्तानमध्ये पाठवून द्या. परंतु पाकिस्तानमध्ये पाठवण्याचीही कोणी सक्ती करू शकत नाही.

लियाकत अली साहेब आणि आमचे प्रधानमंत्री यांच्यात करार झाला आहे की ज्यांना पाकिस्तानात जायचे असेल ते जाऊ शकतात. परंतु पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता लियाकत अली साहेब, सरदार अथवा जवाहरलालसुद्धा कोणावरही बळजबरी करू शकत नाहीत. असा कोणताही कायदा नाही. यामुळे ज्या मुसलमानांना इथे राहायचे असेल त्यांना आपण प्रेमाने ठेवले पाहिजे. मी जर जिवंत असेन तर याशिवाय दुसरे कोणतेही दृश्य पाहण्याची माझी इच्छा नाही. आधी मी १२५ वर्ष जगण्याचा विचार करत होतो परंतु आता मी ती गोष्ट विसरलो आहे. भारताचे नशीब जर वाईट असेल तर देवाने मला घेऊन जावे. आणि जर त्याचे नशीब बलवत्तर असेल आणि त्यात बदल होणार असेल तर, आणि व्हायलाही पाहिजे, तू मुसलमानाच्या अंतःकरणात बदल घडवून आण व त्यांचे अंतःकरण तुझ्या अस्तित्वाने भरून टाक. ते खुदाचे नाव घेतात परंतु खुदाचे काम करत नाहीत. याचप्रमाणे हिंदू जर कृष्णाचे आणि रामाचे नाव घेत असतील आणि त्याचबरोबर लोकांचे शिरकाण करत असतील, परस्परांना कापत असतील तर ते रामाचे नाव रामाचे राहत नाही, त्या नावाला काहीही अर्थ राहत नाही.

काही लोक म्हणतात की युद्ध तर सुरू झाले आहे, काश्मीरचे काय होईल? माझे म्हणणे आहे की काहीही होणार नाही. काश्मीरचे लोक शूर आहेत. तिथे हिंदू, मुसलमान, शीख सर्व मिळूनमिसळून राहतात. जे हल्ला करण्याकरिता गेले आहेत त्यांना त्यांनी परत जाण्याकरिता सागावे, म्हणावे की हल्ला केला तर तुम्हाला आमच्या शवावरून जावे लागेल. श्रीनगर तुम्हाला तसेच मिळू शकत नाही. मग आपल्या सैनिकांना कोणी स्पर्शसुद्धा करणार नाही. ते जर तिथे मेले तर अमर होतील. तसे झाले तर आपण आनंदाने नाचू आणि गाऊ. तिथे जर अशी परिस्थिती निर्माण झाली तर मी श्री दिलिप कुमार राय यांना असे भजन म्हणायला सांगेन. ते ऐकून लोक आनंदाने नाचू लागतील. तिथे जे मरतील ते अमर होतील आणि जे जगतील ते मृतासारखे असतील. इथल्या लोकांचे जर भान सुटले आणि पाकिस्तानही वेड लागल्याप्रमाणे वागू लागला तर अर्थातच मला वेदना होतील. आफ्रीदी लोक आपल्या भावासारखे आहेत आणि वायव्य सरहद्द प्रांत आपलाच प्रांत आहे. असे असताना त्यांनी अशा गोष्टीत का सहभागी व्हावे? त्यांना कोण मदत करते आहे हे आपल्याला कळले पाहिजे. मी

केवळ इतकीच प्रार्थना करीन की त्यांच्या अंतःकरणात ईश्वर वास करो आणि त्यांचे हृदयमंदिर प्रेमाच्या प्रकाशाने प्रज्ज्वलित होवो. असे झाले तर आपल्या भोवतीचा काळोख नाहीसा होईल व आपल्याला चोहोकडे प्रकाश दिसेल. ही माझी प्रार्थना आहे. असा प्रकाश भारत आणि पाकिस्तानमध्ये पसरो आणि लोकांची अंतःकरणे परस्परांच्या प्रेमाने भरो या माझ्या प्रार्थनेत तुम्ही सर्वांनी सहभागी व्हावे. असे झाले तर आपण आपले लक्ष देशातील अन्न आणि वस्त्र यांच्या समस्येवर केंद्रित करू शकतो. आपल्यामध्ये काही वैर होते हे आपण विसरू या आणि आपण मित्र होऊ या. आपण सर्वांनी या कामाला लागावे इतकीच माझी इच्छा आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ २०-६

६. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर १, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

ब्रजकिशन मला सांगत आहेत की काल ज्या सज्जन गृहस्थांनी विरोध केला होता ते आजही विरोध करत आहेत. मला त्यांचा विरोध आवडतोही आणि त्याचबरोबर आवडत नाहीसुद्धा. तो मला आवडतो कारण तो शांततापूर्वक आणि शालीनतापूर्वक करण्यात येत आहे. त्यांना जर एखादी गोष्ट पटत नसेल तर त्यांनी ते मत अभिव्यक्त का करू नये? आणि तुम्हीसुद्धा इथे आणि बाहेर शांतता पाळली व त्यांच्याशी वाद घातला नाही. तर या दृष्टिकोनातून मला त्यांचा विरोध आवडला. परंतु त्यांना काल मी इतक्या सौजन्यपूर्वक आणि ठामपणे समजून सांगितले तरीही त्यांना पटले नाही याचे मला दुःख होते. ती गोष्ट इतकी काही गंभीर तर नव्हती. साधारणबुद्धीनेही ती समजून घेता आली असती. परंतु माणसाच्या मनाचा संताप झालेला असतानाही तो जेव्हा शांतपणे क्रोध व्यक्त करतो तेव्हा मला तो आवडतो. यामुळे मला दुःखही होते आणि सुखही होते. ज्याप्रमाणे काल तुम्ही लोकांनी कोणताही राग व्यक्त न करता उत्साहाने प्रार्थना ऐकली होती तसेच आजही कराल अशी आशा आहे. असे असेल तरच मी प्रार्थना सुरू करीन. अशाच सौजन्याने ते विरोध करतील तर त्यात काही हानी आहे असे मी समजणार नाही. यामुळे तर आपल्याला शांततेचाच पाठ मिळेल आणि अहिंसेचा भव्य सिद्धांत कसा काम करतो तेही तुम्हाला कळेल. तुम्ही जर असेच वागणे सुरू ठेवले तर अहिंसेच्या जादुई सिद्धांताची आश्चर्यजनक शक्ती तुम्हाला कळेल. (यानंतर शांत वातावरणात प्रार्थना झाली. दिलिप कुमार राय भजन म्हणाले - "हम ऐसे देशके वासी है जहा शोक नही और आह नही.)

आजही तुम्ही त्याच गोड गळ्यातून भजन ऐकले. त्यात तर असे म्हटलेले आहे की "आम्ही अशा देशात राहतो की जिथे शोक नाही आणि उसासे नाहीत?" यानंतर या भजनात असेही म्हटलेले आहे की "तिथे मोह नाही आणि लोभ नाही". आणि इतरही जे आपले रिपू आहेत ते इथे नाहीत. परंतु असा देश कुठे असू शकतो? आधी सुचेताजींनी (सुचेता कृपलानी, अ. भा. कॉ. कमेटीच्या विदेश विभागाच्या प्रभारी, सहसचिव कस्तुरबा गांधी विश्वस्त संस्था, सदस्य घटनासमिती, अध्यक्ष दिल्ली केंद्रीय निर्वासित समिती, उत्तर प्रदेशात श्रम मंत्री १९६२, मुख्यमंत्री उत्तर प्रदेश १९६३) जेव्हा हे भजन ऐकवले होते तेव्हा त्या प्रार्थनासभेत मी याचे दोन अर्थ समजावून सांगितले होते. (पाहा खंड ८४, पृष्ठ १६१ आणि १८९-९०) एक तर मी असा अर्थ सांगितला की कवीच्या मनातील देश म्हणजे भारत देश होता. आपला देश असा असावा अशी त्याची इच्छा होती, असे स्वप्न होते. परंतु आज तर तसे नाही.

हे भजन तर १५ ऑगस्टआधी लिहिलेले आहे. परंतु त्या वेळीसुद्धा देश असा नव्हता. तिथे क्रोध, लोभ, मोह, राग, मद, मत्सर हे जे आपले सहा रिपू आहेत असे समजले जाते ते सर्व इथे होते. या सहामध्ये इतरही सर्व शत्रूंचा समावेश होतो. तेव्हा तर इथे भूकही होती, भीकही होती, कपडेही नव्हते - या सर्व संकटांनी देश भरलेला होता, परंतु कवीला मात्र आशा होती की आपला देश असा होईल. कसा होईल याचा दुसरा अर्थही होतो. हा तोच देश नाही काय की ज्याचे गीतेत वर्णन कुरुक्षेत्र (शब्दशः अर्थ कुरूचे क्षेत्र, कौरव आणि पांडवांच्या युद्धाचे ठिकाण, याचा प्रतिकात्मक अर्थ होतो रणक्षेत्र) तसेच धर्मक्षेत्र (कर्तव्याचे क्षेत्र) म्हणून केले आहे. मनात जर ईश्वराचे मंदिर असेल तर ते धर्मक्षेत्र झाले आणि मन जर स्वेच्छाचारी असेल तर ते कुरुक्षेत्र झाले. कौरवरूपी शत्रू तर किती तरी आहेत. त्यांचे वडील आंधळे आहेत. परंतु धर्मक्षेत्र तर युधिष्ठिराच्याच रूपात आहे म्हणूनच त्याचे नाव धर्मराज झाले. असाच जो आपला देश आहे त्यात ना शोक आहे आणि ना उसासे आहेत. आपण सर्व असे होऊ शकतो. परंतु त्याकरिता ज्या अटी सांगितल्या आहेत त्यांचा उल्लेख मी केलेला नाही. असे झाले तर आपली भूमी ईश्वराचा वास असलेली भूमी होईल. नंतर कवी त्याला स्वदेशही म्हणतात आणि स्वराजही म्हणतात. आणि कवीचे बरोबर असते. स्वातंत्र्यानंतर भारत असा देश होईल की ज्यात दुःख आणि शोक नसेल. परंतु आज देशात जितके दारिद्र्य आहे तितके दारिद्र्य असल्याचे मी कधीही पाहिले नव्हते. लहानपणापासून मी इतिहास शिकलो त्यातही आज जसा देश आहे तसा असल्याचे मी कधीही वाचले नाही. ती गोष्ट नाहीशी करण्याकरिताच हे भजन आहे. त्यात सांगितले आहे की आपण जर आपल्या मनाला मंदिर बनवले आणि त्यात ईश्वराची स्थापना केली तर सर्व काही ठीक होईल.

आज एकीकडे तर लोक उपाशी मरत आहेत आणि ते उघडेनागडे आहेत. इथे तर आपण सर्व कपडे घालून बसलो आहो. थंडी वाजू नये म्हणून मीसुद्धा चादर गुंडाळली आहे. आज माझ्याकडे बिचारी एक डॉक्टरीण आली. ती आज कुरुक्षेत्राहून (कुरुक्षेत्र येथील निर्वासित शिबिरात २५ ते ३० हजार निर्वासित होते.) आली होती. ती पंजाबमध्ये मोठे काम करत होती. तिथे ती हिंदू, मुसलमान, शीख सर्वांची सुश्रुषा करत होती. तिथून तिला पळावे लागले. तिथून ती निर्वासित होऊन आली होती. सुशिलाजींनी त्यांना सांगितले होते की जर काही काम नसेल तर कुरुक्षेत्रात काम करा. त्यांना ती आपल्याबरोबर घेऊन आली. तेथील थोडी परिस्थिती सांगण्याकरिता त्या इथे आल्या होत्या. आज आमचे मुन्शीजीही इथे हजर आहेत. त्यांची मुलगीसुद्धा डॉक्टर झाली आहे. ती म्हणते की मी काही तरी करते. विनाकारण तसेच बसून राहण्यात काय अर्थ आहे? तीसुद्धा तिथे निघून गेली. तिने मला सांगितले की तिथे लोकांची शुश्रुषा होते खरी परंतु डॉक्टर फार कमी आहेत. इतके रोग आहेत, इतक्या व्याधी आहेत आणि इतके लोक आहेत की २-३ महिला डॉक्टरांनी काम भागू शकत नाही. तिथे डॉक्टरांची फार गरज आहे. जर तिथे डॉक्टर जातील तर ते सेवा करू शकतील. ते काही माझ्यासारखे

नीमहकीम नाहीत. ते विलायती डॉक्टर आहेत म्हणून त्यांच्याजवळ विलायती औषध असले पाहिजे. त्यांच्याजवळ सगळी औषधे नसतील परंतु ती त्यांना मिळाली पाहिजे. इथे स्त्रिया आहेत, मुले आहेत. ते काही आधीपासून भिकारी तर नव्हते. तिथे अशा स्त्रियाही आहेत की ज्यांच्या गर्भात एक मूल आहे दुसरे मांडीवर. सध्या आपली परिस्थिती ही अशी आहे.

याकरिता आपण कोणाला काय दोष द्यावा? कोणी म्हणेल की शासन कुचकामी आहे. परंतु हे असे होणार आहे हे काय शासनाला माहीत होते? आपण तर कधी शासन चालवले नव्हते. शासनाला सुरुवात करून आता दोनच महिने झाले आहेत. जर असे संकट आले तर आपण अशा संकटाला एकाएकी कसे तोंड देऊ शकतो? हे तर सहन करावेच लागेल. परंतु सहन करत असताना आपल्याला वेड लागले, आपला राग नियंत्रणात राहिला नाही आणि आपण म्हणू लागलो की तिथे त्यांनी आम्हाला दोन ठोसे मारले तर इथे आम्ही चार ठोसे मारू, त्यांनी चार मारले तर आम्ही आठ मारू, तर हा क्रम कधी संपणारच नाही. असे झाले तर हे भजन म्हणण्याचा आपल्याला अधिकार राहणार नाही. जर ते म्हणायचे असेल तर ते अंतःकरणापासून म्हटले पाहिजे. आपला गळा जर गोड असेल तर तो केवळ गोड गाण्याकरिता नसला पाहिजे. त्याचा उपयोग ईश्वराच्या भक्तीकरिता केला पाहिजे. त्या गोडव्यामुळे जर कोणाच्या अंतःकरणात ईश्वराची स्थापना होत असेल, ईश्वरी भाव नर्माण होत असतील तर ती चांगलीच गोष्ट आहे.

एकीकडे आपली अशी परिस्थिती आहे आणि दुसरीकडे काश्मीरचे प्रकरण आहे. इथून जितकी काही विमाने जात आहेत त्यात मला वाटते सैनिकांना नेणे सुरू आहे. (काश्मीरमध्ये सैनिक आणि दारूगोळा पोहोचवण्याकरिता सरकार वायुसेनेच्या मालवाहू विमानांचा तसेच असैनिक विमानांचाही उपयोग करत होते.) तिथून काही भित्रे लोक पळून येत आहेत. त्यांनी कशाला पळायला पाहिजे होते? आणि पळून ते कुठे जाणार आहेत? तिथेच ते शुराप्रमाणे मरत का नाहीत? अशा प्रकारे संपूर्ण काश्मीरची राखरांगोळी झाली तरी मला त्याचे काही वाटणार नाही. मी तर हसत हसत तुम्हाला म्हणेन की तुम्ही आनंदाने नाचा. परंतु अट ही आहे की तिथे सर्वांनी शूरपणाने मरण पत्करले पाहिजे - म्हाताऱ्याकोताऱ्यांनी आणि मुलाबाळांनीही. जर कोणी म्हणेल की मुलांनी का? तर मी म्हणेन की मुले कुठे जातील? अखेर ते आपल्या आईवडिलांबरोबर राहतात. ते सर्व तिथेच आहेत परंतु इतक्या सगळ्या लोकांना शस्त्र कुठून द्यायचे? माझ्यासारख्या माणसाला शस्त्राची गरज नसते. अखरीस आपण जिवंत आहो तर आपल्याला प्राणत्यागाची तयारी ठेवता आली पाहिजे. असे झाले तरच आपण आत्मा अमर आहे असे म्हणू शकतो. आपण जर असे करणार नाही तर त्याचा अर्थ आपण आपला आत्मा आणि आपले शरीर यांचा गोंधळ करतो व देहाची पूजा करतो. परंतु एक दिवस देह जाणारच आहे.

आई वारते तेव्हा तिच्या मांडीवर जर मूल असेल तर ते मूलसुद्धा मरते. आणि माणूस जर मरणारच असेल तर त्याने स्वतःहोऊन का मरू नये. आफ्रिदी जर आमचा नाश करण्याकरिता आले असतील तर आम्ही स्वतःहोऊनच मरण पत्करू. इतकेच नाही तर तिथे ते गेलेले असतील तर सैनिकही नाचतनाचत आनंदाने मरण पत्करतील. ते तिथे मरण्याकरिताच गेलेले आहेत. जिवंत केव्हा राहतील? जेव्हा सर्व काही सुरक्षित आहे हे त्यांना कळेल आणि काश्मीरवर कोणीही आक्रमण केलेले नसेल व पूर्णपणे शांतता प्रस्थापित झालेली असेल तेव्हाच. आता तर काश्मीर शेख अब्दुल्ला यांच्या हातात आहे. ते तर हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांना सारखे समजतात. ते तर सर्वांना बोलावतात, म्हणतात येथील सौंदर्य पाहा, येथील फळे खा. तेथील कारागिरी तर फारच सुंदर आहे. लोक हाताने कापडावर खूप सुंदर विणकाम करतात आणि त्याचे मनात येईल तितके पैसे घेतात. आणि का घेणार नाहीत? काश्मीर तर त्यांच्या याच हस्तकौशल्यावर जिवंत आहे. आता शेख अब्दुल्ला काश्मीरचे मालक झाले आहेत. महाराज आहेत परंतु त्यांच्या नावावरच ते मालक झाले आहेत. महाराजच त्यांना म्हणाले की काही करायचे असेल तर करा, काश्मीर राहायचे असेल तर राहील, नाही तर जाईल.

एकीकडे कुरुक्षेत्रात आणि दुसरीकडे काश्मीरमध्ये काय सुरू आहे आणि तिसरीकडे पाहिले तर आपल्याला किती तरी अडचणी सहन कराव्या लागत आहेत. किती तरी मुसलमान पाकिस्तानमध्ये पळून गेले आहेत. जे कोणत्याही कारणाशिवाय पळून जात आहेत ते जाऊ शकतात. त्यांना कोण थांबवू शकतो? परंतु त्यांच्यातील काही लोक आपल्याला घाबरत असल्यामुळे पळून जात आहेत. जेव्हा एखादा मुसलमान मित्र येतो आणि सांगतो की आता मी माझ्या ठिकाणावर कायम राहू शकत नाही कारण आम्ही केव्हा मारले जाऊ हे माहीत नाही तेव्हा मला लाज वाटते. त्यांच्या अंतःकरणात भीतीने इतके खोलवर घर केलेले पाहून मला दुःख होते. अशाच प्रकारे एक स्त्री आली आणि म्हणाली की पठाण माझ्या मागे लागला आहे. हे ऐकून माझे अंतःकरण रडू लागते. तरीही मी विचारतो की जर ईश्वर आपला पाठीराखा असेल तर पठाण म्हणा वा अजून कोणी आपल्या मागे लागला असला तरी आपण घाबरण्याचे कारण काय? परंतु असे तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपल्याबरोबर ईश्वर आहे हे माणसाला माहीत असते. जर कोणी बदमाश येतो, मग तो पठाण असो, हिंदू असो वा शीख असो, कारण गुंडगिरी केवळ पठाणाचेच क्षेत्र आहे असे काही नाही, गुंड तर सर्व ठिकाणी पडलेले आहेत आहेत आणि तेही बदमाश व व्यभिचारी असू शकतात व स्त्रिया त्यांना पाहूनच घाबरू शकतात. परंतु त्यांनी का घाबरावे? तुम्ही विश्वास ठेवा की सीता कधीही घाबरली नव्हती. रावण तिला खांद्यावर बसवून घेऊन चालला होता तेव्हाही ती घाबरली नव्हती. तिचा एकच जप सुरू होता की माझा पती राम आहे आणि तो माझ्या पाठीशी आहे. आणि राम ईश्वराचा अवतार असल्यामुळे ती रावणाला सतत सांगत होती की तू मला स्पर्श जरी केला तरी तुझी राखरांगोळी होईल.ती लहानशी स्त्री होती, परंतु ती

पवित्र होती आणि पवित्र असल्यामुळे ती कोणालाही घाबरत नव्हती. पावित्र्य हे सर्वात मोठे शस्त्र आहे. आपणा सर्वांना या दुर्दैवापासून सुटका करून घ्यायची असेल तर आपण या भजनात सांगितले आहे तसे केले पाहिजे. प्रार्थनेत येणारे सर्व स्त्री-पुरुष जर याचे अनुसरण करतील तर हे परिवर्तन एखाद्या गुलाबाच्या सुगंधाप्रमाणे संपूर्ण देशात पसरेल. जर हे पावित्र्य आपल्यामध्ये निर्माण झाले तर आज जे आपणा सर्वांचे भान सुटले आहे आणि जे संकट आपल्यासमोर उभे राहिले आहे ते एखाद्या कचऱ्याप्रमाणे उडून जाईल. मी ईश्वराला केवळ इतकीच प्रार्थना करीन की आम्ही सर्वांनी चांगले व्हावे व काश्मीरची सध्याच्या संकटातून सुटका व्हावी व इथे जे निर्वासित म्हणून आले आहेत त्यांचेही कल्याण व्हावे.

त्या स्त्री डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे काही बदमाशही कुरुक्षेत्राच्या छावणीत शिरले आहेत. एका माणसाला कांबळे मिळाले की तो माणूस दुसऱ्या प्रकारे कांबळे घेण्याकरिता येतो. ते इतकाही विचार करत नाहीत की सर्वांना पांघरण्याकरिता आणि अंगात घालण्याकरिता कपडे मिळालेलेच नाही. अनेक स्त्रिया अशा आहेत की त्या तिथून जे कपडे घालून आल्या होत्या तेच कपडे अजूनही त्यांच्या अंगावर आहेत. मला तर हे ऐकूनही सहन होत नाही - पाहायला गेलो तर काय होईल माहीत नाही. तर ती डॉक्टर म्हणते की, अतिशयोक्ती तर ती करूच शकत नाही, हे सर्व अशाच प्रकारे सुरू असल्याचे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. हे सर्व तिने मला सांगितले.

मला तुम्हाला इतकेच सांगायचे आहे की आपला अधर्म आपल्याला कुठे नेतो आहे हे आपण समजून घ्यावे. आपण कुठे तरी स्थिरावतो की नाही आणि मग जिथे शोक नाही आणि उसासे नाहीत अशा भूमीत आपण राहतो की नाही याचा विचार करावा.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २६-३२

७. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कुराण शरीफवर भाष्य करणाऱ्या काही लोकांनी कुराणचा जो अर्थ लावला आहे तो बरोबर नाही. (कुराणमधील पाठ वाचण्याला काही लोकांनी परत विरोध केला होता.) कुराण वाचून माझे तरी हिंदूधर्मापासून स्खलन न होता उन्नयनच होते. माझा दावा आहे की भारतातच नाही तर सर्व जगात जो चांगला हिंदू आहे त्याच्यापेक्षा मी मुळीच कमी चांगला हिंदू नाही, कारण मी वेद मानतो, गीता वाचतो व तिच्यात जे लिहिले आहे त्यानुसार आचरण करतो. जगात अशी एकही जागा नाही की जिथे ईश्वर नाही. असे तर मला लहानपणापासूनच शिकवण्यात आले होते.

ब्रजकिशनजींनी मला सांगितले की विरोधकांची संख्या आज काहीशी मोठी आहे. त्यांचे म्हणणे आहे की आमचा विरोध तर आहे परंतु आम्हाला ऐकायचे असल्यामुळे आम्ही सहन करतो. माझे म्हणणे आहे की यात सहन काय करायचे? यामुळे ना तर माझा फायदा होईल ना त्यांचा. त्यांना जर माझ्याबरोबर बसून प्रार्थना करायची असेल तर ते सहन करणे योग्य. मी महात्मा आहे वा मी हिंदुस्तानची सेवा केली आहे म्हणून तुम्ही सहन करू नका. तुम्हाला माझे दर्शन घ्यायचे आहे म्हणूनही सहन करू नका. तुम्हाला अंतःकरणपूर्वक प्रार्थना करायची आहे काय असे यामुळेच मी तुम्हाला विचारतो. (प्रार्थनेनंतर सर्वांच्या संमतीने गांधीजींनी आपले भाषण सुरू ठेवले.)

तुम्ही वृत्तपत्रांमध्ये तर पाहतच असाल पण काश्मीरमध्ये काय सुरू आहे ते मलाही कळून जाते. आता तिथे सर्व काही ठीक आहे असे म्हणता येईल. ठीकचा अर्थ काश्मीरमध्ये श्रीनगर अजून सुरक्षित आहे. (श्रीनगरकडे कूच करणाऱ्या टोळीवाल्यांना भारतीय सैन्याने मागे ढकलले होते.) लुटारूंना अजून त्याच्यावर ताबा मिळवता आलेला नाही आणि यानंतर तर त्याचा ताबा घेणे त्यांच्याकरिता अजूनच कठीण होत जाणार आहे. जे लुटारू असतात ते लढवैय्ये तर नसतात. तिथे काही हक्क आहे म्हणून तर ते तिथे गेलेले नाहीत. यामुळे जगात त्यांची निंदाच होणार आहे. जसजसे दिवस जात आहेत तसतसा त्यांचा दबदबा कमी होत चालला आहे. तिथे गेलेल्या सैन्याला परिस्थिती अनुकुल आहे आणि त्यांना वेळ मिळत आहे. विमानाने जास्त सैन्य तर जाऊ शकत नाही, फार त्रास होतो परंतु सरकार सर्व मदत करत आहे असे मी ऐकतो. ते सर्व मदत करत आहेत म्हणून आरामात विमाने जाऊ शकतात. विमाने

सरकारची तर नाहीत. ती सर्व खाजगी कंपन्यांची आहेत आणि चांगले काम समजून सरकारला ते दिली जात आहेत.

अजून एक गोष्ट आहे - ती ही की आझाद हिंद सेना सुभाष बाबूंनी बनवली होती आणि त्याकरिता आपण सर्व सुभाष बाबूंच्या बहादुरीकरता, हुशारीकरिता तारीफ करतो आणि ही तारीफ करण्यासारखीच गोष्ट आहे. कारण ते जेव्हा भारताबाहेर होते तेव्हा त्यांनी विचार केला की थोडे सैनिकी कामही करून टाकू. ते काही सैनिक तर नव्हते. इतर वकील बॅरिस्टरसारखे ते एक साधे भारतीय होते. त्यांना सैन्याचे प्रशिक्षण नव्हते. नागरी सेवेतील लोकांना शिकावे लागते तसे घोडस्वारीचे प्रशिक्षण त्यांना मिळाले असावे. परंतु त्यांनी नंतर सैनिकीशास्त्राचा अभ्यास निश्चितच केला असेल. अशा प्रकारे त्यांच्या नेतृत्वाखाली जे सैन्य तयार झाले होते त्यातील दोन सैनिकी अधिकाऱ्यांनी (काश्मीरमधील डेली एक्सप्रेसच्या वार्ताहरानुसार त्यातील एक मेजर खुर्शिद अहमद होते.), ज्यांना मी तुरुंगात आणि बाहेरही भेटलो आहे, काश्मीरवर हल्ला करणारांशी हातमिळवणी केली आहे. यामुळे मला फार दुःख झाले. ते सुभाषबाबूंच्या अंतर्गत विशेष काम करणारे होते व नेहमी त्यांच्याबरोबर असायचे. सुभाष बाबू लष्करापासून काही लपवून तर ठेवत नव्हते. त्यांना त्यांच्याकडून काम घ्यावे लागत असे. आज ते लुटारूंचे सरदार म्हणून जातात तर मला त्या गोष्टीची वेदना होते. त्यांना जर वर्तमानपत्र मिळत असतील वा मी जे म्हणतो ते ते ऐकू शकत असतील तर मी माझा हा क्षीण आवाज त्यांच्यापर्यंत पोहोचवू इच्छितो आणि सागू इच्छितो की तुम्ही या भानगडीत का पडता आणि सुभाष बाबूंचे नाव का मलीन करता? त्यांनी हिंदू वा मुसलमानांची बाजू का घ्यावी? त्यांनी सांप्रदायिक भानगडीत पडू नये. सुभाष बाबू तर असे नव्हते. त्यांच्याबरोबर हिंदू, मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन, हरिजन इत्यादी सर्व राहत असत. त्यांच्याजवळ ना हरिजनविषयक भेदभाव होता ना इतर लोकांचा. तिथे तर भारतीयांमध्ये कोणताही जातिभेद नव्हता. असे तर सर्व आपल्या धर्मावर कायम आहेत. धर्म तर कोणी सोडला नव्हता. परंतु सुभाष बाबूंनी सर्वांना मोहून टाकले होते. त्यांच्या मनाचे हरण केले होते. शरीराचे हरण नव्हते केले. असे तर होऊ शकत नव्हते की आझाद हिंद सेनेत सामील होत नाही तर कापा. अशा प्रकारे कापून ते भारताला मुक्त करणार नव्हते. अशा प्रकारे ते मोठे झाले आणि त्यांनी मोठेपण मिळवले. असे असल्यामुळे तुम्ही लहान का होता आणि अशा क्षुद्र कामात का पडता? जर काही करायचेच असेल तर संपूर्ण हिंदुस्तानकरिता करा. तिथे जे मुसलमान आहेत, आफ्रिदी आहेत त्यांना सांगा की अत्याचार, लूटपाट का करता आणि गावांची जाळपोळ का करता? चला आपण महाराजांना भेटू, शेख अब्दुल्ला यांना भेटू, त्यांना पत्र लिहू की आम्हाला तुम्हाला भेटायचे आहे. इथे आम्ही लूट करण्याकरिता तर आलेलो नाही. तुम्ही इस्लामला दाबता हे सांगण्याकरिता आम्ही इथे आलो आहो. असे केले तर ते सुभाष बाबूंचे नाव उज्ज्वल करतील व आफ्रिदी लोकांचे खरे शिक्षक होतील. आफ्रिदी

लोक कसे राहतात, त्यांच्यात लुटारू आहेत की नाही हे मला माहीत नाही. परंतु माझ्या दृष्टीतून तेही माणूस आहेत, त्यांच्याही अंतःकरणात ईश्वराचा वास आहे. यामुळे ते सर्व माझी भावंडे आहेत. मी जर त्यांच्यामध्ये राहत असतो तर मी त्यांना म्हणालो असतो की लूट काय करायची, एकमेकांवर राग काय काढायचा? मी असे तर म्हणत नाही की तुमच्याजवळ ज्या बंदुका आहेत, तलवारी आहेत त्या सोडून द्या. त्या ठेवा. परंतु जे लोक भयभीत आहेत, संकटात आहेत, स्त्रिया आहेत, मुले आहेत या सर्वांना वाचवण्याकरिता ठेवा. त्यात काय आहे, ते मुसलमान असो की हिंदू. यामुळे मी म्हणेन की हे जे दोन अधिकारी आहेत, ज्यांचे नाव मी ऐकलेले आहे, त्यांनी सुभाष बाबूंचे नाव आठवावे. ते मारले गेले, परंतु त्यांचे नाव तर मेले नाही, काम तर मेले नाही.

आता माझे मन कायदे आझम जिनांकडे वळते आहे. मी त्यांना ओळखतो. मी त्यांच्या घरी जात होतो आणि एकदा तर मी त्यांच्या घरी १८ वेळा गेलो होतो (सप्टेंबर १९४४मध्ये, पाहा खंड ७८). मी तिला तपश्चर्या मानतो. यानंतरसुद्धा आम्ही संयुक्त पत्रकावर सह्या केल्या होत्या. (एप्रिल १९४७मध्ये. पाहा संयुक्त आवाहन, एप्रिल १२, १९४७) व त्याकरिता जबाबदार झालो होतो. तेव्हाही बोलणे सौजन्यपूर्वक होत असे. यामुळे मी तर त्यांना, लियाकत अली साहेबांना आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला म्हणेन की तुम्ही जवाहरलाल सारख्या माणसाला धोकेबाजी करता असे म्हणता ही काय गोष्ट आहे.(काश्मीरचे भारतातील विलिनीकरण फेटाळत पाकिस्तान सरकारने ३० ऑक्टोबरच्या एका प्रेस विज्ञप्तीत काश्मीरचे भारतातील विलिनीकरण धोकेबाजी आणि हिंसा यांच्यावर आधारित आहे असा आरोप केला होता व त्यामुळे त्याला मान्यता देण्याला नकार दिला होता.) जवाहरलाल आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला यात कोणती धोकेबाजी करायची होती? मी तर म्हणेन की जवाहरलाल कोणाशीही धोका करणारा माणूस नाही. जसे त्याचे नाव आहे तसेच त्याचे गुण आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात सरदार आणि जे इतर लोक आहेत त्यांनाही मी ओळखतो. तेही धोकेबाज नाहीत. ते काश्मीरशी सल्लामसलत करत असतील तर त्याचा अर्थ असा नाही की ते काश्मीरला फूस देत आहेत. जवाहरलाल तर आधीही त्यांच्याशी चर्चा करत होता आणि शेख अब्दुल्लांकरिता एकटा भांडत होता. (भारत सरकारने काश्मीर सरकारच्या अधिकाऱ्यांसमोर शेख अब्दुल्ला यांच्या कारावासाचा मुद्दा उपस्थित केला होता. काश्मीरमध्ये जबाबदार सरकार स्थापन करण्यात यावे या मागणीकरिता शेख अब्दुल्लांना तीन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. नंतर त्यांना सप्टेंबर १९४७मध्ये सोडण्यात आले होते.) मग त्याने फसवणूक करण्याचे कारण काय? भारत वा इतर कोणताही देश फसवणुकीच्या आधारावर स्वतःला वाचवू शकतो काय? मग ते अशा गोष्टी का करतात? काश्मीरमध्ये घूसखोरी करणाऱ्या आफ्रिडींना त्यांच्या या घूसखोरीच्या कामाकरिता पाकिस्तानकडून काही प्रोत्साहन मिळत असलेच पाहिजे. तसे नसते तर ते असे कसे करू शकले असते? मी जर पाकिस्तानमध्ये असतो तर

असे काही करण्यापासून मी त्यांना परावृत्त केले असते. पाकिस्तानला जर यात काही रस नसता तर ते या भानगडीतच पडले नसते. परंतु इथे पाकिस्तान उदासीन तर नाहीच उलट अतिशय गुंतलेला आहे.

माझ्याकडे दोन हिंदू - एक कराचीहून आणि एक लाहोरहून - आले आहेत. कराचीहून आलेले गृहस्थ मला सांगतात की कराचीतील परिस्थिती वाईट आहे परंतु आता दिवसेंदिवस चांगली होत आहे. तर तेथील लोकांना तुम्ही घाबरण्याचे काय कारण असे सांगाल काय? तेथील सिंधी मुसलमान हिंदूबरोबर मिळूनमिसळून राहत आहेत. अनेकदा त्यांच्यात भांडण झाले आहे, परंतु आता ते परत मित्र झाले आहेत. याचा मी साक्षी आहे. इथे सर्व काही ठीक झाले आहे अशी गोष्ट नाही. परंतु मंत्रिमंडळाची अशी इच्छा आहे. दुसरे गृहस्थ सांगतात की लाहोरमध्ये जितक्या मोठमोठ्या हवेल्या होत्या त्या सर्व बेकार झाल्या आहेत. तिथे हिंदू तर जास्त नाहीत, केवळ मूठभर राहिले आहेत. परंतु जे मंत्रिमंडळ आहे त्याला वाटते की हिंदू, शीख सर्व राहिले पाहिजे. शिखांच्या राहण्यावर अर्थातच काही लोकांचा आक्षेप आहे. तरीही ते तिथे बऱ्याच संख्येत आहेत. लाहोरबद्दल मी विशेष गोष्ट अशी ऐकली की तिथे एका मुसलमानाने, ते सज्जन गृहस्थ आहेत, कोणत्या तरी शिखाला आपल्या घरी ठेवले आहे. लाहोरहून आलेल्या गृहस्थांनी सांगितले की मी माझ्या डोळ्यांनी पाहिले की त्या मुसलमाननाने आपल्या घरात एक खोली ठेवली आहे आणि तिथे गुरुग्रंथसाहेब उघडून ठेवला आहे व ते ग्रंथसाहेबला अतिशय आदराने ठेवत होते. त्यांनी शिखाला वाचवले कारण तो शीख त्यांचा मित्र होता. यामुळे मला फार आनंद झाला. अखेरीस ते शीख सद्गृहस्थ माझ्याकडे आले आणि म्हणाले की मुसलमान मित्रांनी शिखांना आश्रय दिल्याच्या अशा घटना अनेक ठिकाणी घडल्या आहेत. दोन्ही ठिकाणाहून मला अशा बातम्या मिळाल्या आहेत. मग आता असे काय घडले की इतक्या सगळ्या मुसलमानांना आपण पाकिस्तानमध्ये पळवून लावू पाहतो? काय कारण आहे की हिंदू आणि शीख तिथून पळून येत आहेत? याचा काय परिणाम होणार आहे? आपला सर्वांचा विनाश होणे हाच परिणाम होणार आहे. लोक जेव्हा आपले घरदार सोडून जातात तेव्हा ते सुखासमाधानात तर राहू शकत नाहीत. माणूस आपल्या घरातच सुखासमाधानात राहू शकतो. घर सोडल्यानंतर ना तर चांगले खायला मिळते ना कपडे मिळतात. आता शिबिरात असलेले लोक जेव्हा थंडीने कुडकुडतात तेव्हा ते म्हणतात आम्हाला अशी वागणूक का मिळते? आमच्या सरकारने हे काय केले? असा कोणता अपराध आम्ही केला की आम्हाला या सर्व अडचणी सोसाव्या लागत आहेत. तिथे त्यांना वाटते की आपल्या आजूबाजूला मुसलमान भरलेले आहेत आणि इथे मुलमानांना वाटते की आपल्या आजूबाजूला हिंदू भरलेले आहेत. असे किती दिवस चालणार आहे आणि त्याचे काय परिणाम होणार आहेत? परिणाम ईश्वरालाच माहीत. परंतु या गोष्टीचे मला अतिशय वाईट वाटते हे मात्र खरे.

पाकिस्तानचे कायदे आझम असे का म्हणतात की हिंदू आणि शीख मुसलमानांचे शत्रू आहेत? वाईट माणसे तर हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांमध्येच आहेत. परंतु सर्व जातीलाच शत्रू म्हणणे वाईट गोष्ट आहे. मी तर संपूर्ण मंत्रिमंडळाला सांगेन की तुम्हाला जर भारताचा विनाश नको असेल व तो दुसऱ्याच्या हातात जाऊ नये असे वाटत असेल तर तुम्हाला चांगले व्हावे लागेल.

ज्या लोकांनी कुराण शरीफमधील पाठ वाचण्याला अतिशय सौजन्यपूर्ण विरोध केला त्यांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच ठरतील. यामुळे तेसुद्धा अहिंसक पद्धतीने आपले काम करणे शिकतील. आम्हाला कुराण शरीफच्या आयती पसंत नाहीत असे ते म्हणाले ते योग्यच आहे. परंतु त्यांनी प्रार्थना निर्विरोध चालू दिली हे मला आवडले. अशा प्रकारे आपण भारताकरिता दैवी शक्ती निर्माण करत आहो. ती हळूहळू होते आहे. जादूने तर काही निर्माण होणार नाही. ईश्वराजवळ मी प्रार्थना करतो की आझाद हिंद सेनेच्या त्या दोन अधिकाऱ्यांना सद्बुद्धी दे आणि भारताचे जहाज आज जे वादळी समुद्रातून हेलकावे खात चालले आहे त्याला शांत पाण्यात पोहोचू दे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन २, पृष्ठ ३२-३७

८. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ३, १९४७

(हा दिवस मौनवार असल्यामुळे गांधीजींचे लिखित भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

नोव्हेंबर ३, १९४७

एका विषात दुसरे विष टाकण्यात आले तर आधी कोणते टाकले याचा कोण कसा निर्णय घेऊ शकेल आणि याचा निर्णय जरी घेतला गेला तरी त्याचा लाभ काय? आपल्याला हे माहीत आहे आणि तरीही हे विषाणू संपूर्ण पश्चिम पाकिस्तानमध्ये पसरले आहे आणि तेथील सत्ताधाऱ्यांना हे विषाणू पसरले असल्याची अजून माहितीच नाही. जोपर्यंत संघराज्याचा संबंध आहे हे विषाणू त्याच्या लहानशा भागापर्यंत सीमीत आहेत. हे विषाणू एकाच भागात नियंत्रणात राहावे अशी ईश्वराला प्रार्थना आहे. असे झाले तर लवकरच हे विष दोन्ही भागातून पूर्णपणे काढून टाकता येईल अशी आशा करण्याकरिता जागा आहे.

डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी प्रांतांच्या मुख्यमंत्र्याची वा त्याच्या प्रतिनिधींची आणि इतरांची अन्नधन्याच्या नियंत्रणाच्या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता सभा बोलावली आहे ही गोष्ट लक्षात घेता आज मी याच महत्त्वाच्या विषयावर बोलायला पाहिजे असे मला वाटते.

आजकाल या विषयावर मी जे ऐकतो त्याचा माझ्या मनावर किंचितही प्रभाव पडलेला नाही आणि अन्नधान्यावरील नियंत्रण शक्य तो काढून टाकले पाहिजे आणि ते नियंत्रण राहिलेच तरी सहा महिन्यांपेक्षा जास्त राहायला नको ही माझी सुरुवातीपासून भूमिका राहिली आहे. असा एकही दिवस जात नाही की मला अन्नधान्यावरील नियंत्रण काढले जावे हे सांगणारी पत्रे आणि तारा येत नाहीत आणि त्यात काही महत्त्वाच्या व्यक्तींच्याही तारा वा पत्रे असतातच. सध्या मी कापडावरील नियंत्रण उठवण्याबद्दलचा विचार स्थगित केला आहे.

नियंत्रणामुळे भ्रष्टाचार वाढतो, सत्य लपवले जाते, काळा बाजार वाढतो आणि बाजारात कृत्रिम टंचाई कायम राहते. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे यामुळे लोकांच्या पौरुषाला धक्का लागतो, ते निरुत्साही होतात, आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे जे शिक्षण एक वर्षांपासून त्यांना मिळत होते ते ते विसरून जातात आणि सदैव इतरांच्या चेहऱ्याकडे पाहत राहतात. या दुर्घटनेपेक्षा जर कोणती मोठी दुर्घटना असू शकेल तर ती मोठ्या प्रमाणात सुरू असलेली भावाभावांची कत्तल, आणि वेड्याप्रमाणे सुरू असलेली लोकसंख्येची अदलाबदल आणि परिणामी होणारे अनावश्यक मृत्यू, उपासमार आणि येऊ घातलेल्या कडाक्याच्या थंडीत घर आणि कपड्याची सोय नसणे ही आहे. कदाचित ही आपदा

नियंत्रणाच्या आपदेच्या बरोबरीचीही असू शकेल. पहिली आपदा डोळ्यात भरणारी नाही म्हणून ती विसरण्याचे साहस आपण करू शकत नाही.

अन्नधान्यावरील नियंत्रण हा दुसऱ्या महायुद्धातून आपल्याला मिळालेला वारसा आहे. त्या काळात फार मोठ्या प्रमाणात विदेशात अन्नधान्याची निर्यात करण्यात येत असल्यामुळे कदाचित अन्नधान्यावरील नियंत्रण आवश्यकही असेल. अनैसर्गिक निर्यातीमुळे मानवीनिर्मित तुटवडा निर्माण होणे अपरिहार्य होते आणि त्यामुळे नियंत्रणात अनेक दोष असूनही नियंत्रण आणावे लागले. आता आपली इच्छा असेल तर आपण निर्यात थांबवू शकतो. बाहेरच्या जगाकडून आपण अन्नधान्याच्या स्वरूपातील मदतीची अपेक्षा करणार नसू तर जगातील उपासमार होत असलेल्या भागांना आम्ही मदत करू शकतो. असे केल्याने आपण जितके धान्य आयात केले असते तितके धान्य त्यांच्याकरिता वाचते. मी माझ्या जीवनात, ज्यात दोन पिढ्या गेल्या, किती तरी नैसर्गिक दुष्काळ पाहिले आहेत. परंतु नियंत्रणाचा कधी विचारही करण्यात आल्याचे मला आठवत नाही.

आज पाऊस वेळेवर आला याकरिता ईश्वराचे आभार. यामुळे अन्नधान्याची खरी टंचाई नाही. भारतातील ग्रामीण भागात भरपूर धान्य, डाळी आणि तेलबिया आहेत. आज किंमतीवर जे कृत्रिम नियंत्रण आहे ते धान्य निर्माण करणारांना कळत नाही. यामुळे खुल्या बाजारात जास्त किंमत मिळत असल्यामुळे ते ते कमी किंमतीत आपले धान्य विकायला तयार नसतात. ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. टंचाई आहे ही गोष्ट सिद्ध करण्याकरिता संख्याशास्त्रज्ञाचीही गरज नसते, ना लालफितीत गुंतलेल्या कारकुनांची गरज असते ना मोठ्यामोठ्या लेखांची वा आहवालांची गरज असते. इतकी आशा आहे की लोकसंख्येच्या वाढीचे भूत दाखवून आम्हाला कोणी घाबरवणार नाही.

आपले मंत्री लोकांमधून आलेले आहेत आणि ते लोकांकरिता काम करत आहेत. आपल्या मंत्र्यांनी असा अभिमान त्यांनी बाळगू नये की आपले ज्ञान त्या अनुभवी लोकांपेक्षा जास्त आहे जे सत्तेच्या गादीवर बसलेले नाहीत आणि नियत्रण जितक्या लवकर उठवता येईल तितके बरे असा ज्यांचा दृढविश्वास आहे. एका वैद्याचे म्हणणे आहे की अन्नधान्याच्या कंट्रोलमुळे जे लोक रेशनच्या दुकानातील धान्यावर राहतात त्यांना खाण्यालायक धान्य मिळणे कठीण झाले आहे आणि यामुळे सडके धान्य खाल्ल्यामुळे जे आजार होतात त्यांना हे लोक बळी पडत आहेत.

नियंत्रित दराच्या दुकानातून धान्य विकण्याऐवजी सरकारने चांगले धान्य विकण्याकरिता दुकाने उघडावी आणि त्याकरिता खुल्या बाजारातून धान्य विकत घ्यावे. यामुळे आपोआपच किंमतीवर नियंत्रण येईल व जे धान्य, डाळी आणि तेलबिया लपवण्यात आलेले आहे ते बाहेर येईल. धान्योत्पादन करणारांवर व ते विकणारांवर सरकार विश्वास ठेवणार नाही काय? लोकशाहीला जर हुकुमशाहीच्या

दोरीने बांधून ठेवण्यात आले तर लोकशाहीच तुटून जाईल. ती केवळ विश्वासावर अस्तित्वात राहू शकते. लोक जर काम न करण्यामुळे वा एकमेकांची फसवणूक केल्यामुळे मरत असतील तर अशा लोकांच्या मरण्याचे स्वागत केले पाहिजे. असे झाले तर बाकीचे लोक आळशीपणा वा क्रूरपणाची कृत्ये करताना करताना कचरतील.

हरिजन, नोव्हेंबर १६, १९४७

९. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ४, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज तर केवळ आपल्या जुन्या सभ्य मित्रानेच कुरणामधील आयत म्हणण्यावर आक्षेप घेतला आहे. यामुळे एका पंजाबी हिंदू निर्वासिताने पाठवलेल्या दुःखद पत्रावर आपण चर्चा करू. त्यांना पंजाबमध्ये बरेच काही सहन करावे लागले आणि त्यांनी कुराणमधील पाठ म्हणण्यावर आक्षेप घेतला आहे. ते गृहस्थ इथे हजर आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. ते इथे असो वा नसो मी त्यांच्या पत्राची उपेक्षा करू शकत नाही. अतिशय वेदनांनी भरलेले ते पत्र आहे. त्यात बराच चांगला युक्तिवाद करण्यात आला आहे. परंतु ते अज्ञानाने भरलेले आहे आणि त्या अज्ञानाचा जन्म क्रोधातून झालेला आहे. आजकाल जवळपास माझा सर्व वेळ हिंदू अथवा शीख निर्वासितांच्या वा दिल्लीतील दुःखी मुसलमानांच्या शोकपूर्ण कथा ऐकण्यातच जात असतो. माझ्या अंतःकरणालाही तितक्याच वेदना होतात, परंतु मी रडू लागलो व उदास होऊन बसलो तर मला वेळच मिळणार नाही. मी तर लहानपणापासूनच अहिंसक आहे. त्यामुळे दुःखाचा सामना करता यावा म्हणून दुःख ऐकून वा पाहून रडण्याची नाही तर हृदय कठोर करण्याची मी सवय लावली आहे. प्राचीन ऋषीमुनींनी आपल्याला सांगितलेले नाही काय की जो अहिंसेचा पुजारी असतो त्याचे मन फुलापेक्षाही नाजुक आणि दगडापेक्षाही कठोर असले पाहिजे. मी याप्रमाणे जगण्याची सवय लावली आहे आणि यामुळेच भेटायला आलेल्या लोकांच्या दुःखद आणि संतापाने भरलेल्या हकिगती मी जेव्हा ऐकतो तेव्हा मी माझे हृदय पोलादाप्रमाणे कठोर करून टाकतो. असे करूनच सध्याच्या प्रश्नांना मी तोंड देऊ शकतो. ते पत्र उर्दूत लिहिलेले आहे यामुळे ब्रिकिशनजींना त्यातील महत्त्वाचे मुद्दे लिहून द्यायला मी सांगितले.

मी वचन मोडले असा माझ्यावर पहिला आरोप करण्यात आला आहे. त्या पत्रात लिहिले आहे : "तुमच्या प्रार्थनासभेत एक जरी माणूस कुराणमधील आयत पढण्यावर आक्षेप घेईल तर तुम्ही त्याचा मान ठेवाल आणि त्या दिवशी प्रार्थना करणार नाही असे तुम्ही म्हणाला नव्हता काय?" हे अर्धसत्य आहे आणि पूर्ण असत्यापेक्षा हे अधिक घातक आहे. जेव्हा अगदी सुरुवातीला आक्षेप घेण्यात आल्यामुळे मी प्रार्थना बंद केली होती (पाहा एप्रिल २, १९४७चे प्रार्थना प्रवचन.) तेव्हा मी असे जाहीर केले होते की सभेतील इतक्या मोठ्या संख्येतील लोक विरोध करणाराशी मारपीट करू शकतात या भीतीने मी प्रार्थना थांबवतो आहे. ही किती तरी महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे. तेव्हापासून लोक आपला संताप नियंत्रणात ठेवण्याची कला शिकले आहेत. आणि जेव्हा लोकांनी मला आश्वासन दिले की

विरोध करणारांचा ना तर ते राग करतील ना कोणत्याही प्रकारचे वैर मनात धरतील तेव्हा मी जाहीर प्रार्थना करण्याची त्यांची गोष्ट मान्य केली आणि मला माहीत असल्याप्रमाणे याचे परिणाम चांगलेच झाले आहेत. विरोध करणाराचे वर्तन अगदी सभ्यपणाचे असते आणि विरोध नोंदवल्यानंतर ते प्रार्थनेत कोणत्याही प्रकारे अडथळा आणत नाहीत. यामुळे पत्र लिहिणाऱ्या गृहस्थांच्या लक्षात येईल की मी वचनभंग केलेला नाही आणि विरोधानंतरही प्रार्थना चालू ठेवण्याचे परिणाम आतापर्यंत तरी चांगलेच राहिले आहेत. मी तुम्हाला आश्वस्त करू इच्छितो की जोपर्यंत मला माझ्याबद्दल माहिती आहे जनसेवक म्हणून माझ्या आयुष्याच्या या दीर्घकाळात मी कधीही दिलेल्या आश्वासनाचा भंग करण्याचा अपराध केलेला नाही.

तुम्ही एकीकडे कुराणमधील पाठ म्हणता आणि सर्व धर्मांना तुम्ही समान लेखता असा जर तुमचा दावा आहे तर मग तुम्ही जपजी (गुरुग्रंथसाहेबमधील सुरुवातीचा भाग) आणि बायबलमधून का वाचत नाही असा पत्र लिहिणाऱ्या बंधूंचा माझ्यावर दुसरा आरोप आहे. या गोष्टीतून लिहिणाराच्या केवळ अज्ञानाचेच दर्शन होते. संपूर्ण भजनावली कशी तयार झाली होती यासंबंधी मी दिलेले वक्तव्य त्यांना माहीत नाही. (पाहा भर घालण्याचे कारण ऑगस्ट ५, १९४७, प्रार्थना प्रवचन ऑक्टोबर १९, १९४७ आणि आश्रम भजनावली फेब्रुवारी २, १९४२) आश्रम भजनावलीत बायबल आणि ग्रंथसाहेबमधील बरेच भजन आहेत.

त्यांचा तिसरा आक्षेप हा आहे की तुमचे मोठेमोठे काँग्रेस पुढारी पश्चिम पंजाब आणि पाकिस्तानच्या इतर भागांमधून निघून आलेले आहेत परंतु संघराज्यात आल्यानंतर ते इतर निर्वासितांच्या सुखदुःखात सहभागी होत नाहीत, त्यांचे हालहवाल विचारत नाहीत. या पुढाऱ्यांची पाकिस्तानमध्ये जी घरे होती त्यापेक्षाही मोठ्या हवेल्या त्यांनी इथे घेतल्या आहेत आणि त्यात ते मजेत राहतात. काँग्रेसचे हे पुढारी त्या निर्वासितांपासून अगदी वेगळे राहतात ज्यांच्याजवळ ना तर राहण्याकरिता घर आहे ना थंडीपासून रक्षण होईल असे गरम कपडे. गरम कपडे तर सोडाच अनेकांजवळ तर बदलण्याकरितासुद्धा दुसरे कपडे नाहीत, आणि त्यांना नीट खाण्याकरिताही मिळू शकत नाही. ही तक्रार जर खरी असेल तर ही अवस्था अतिशय लाजिरवाणी आहे. गरीब निर्वासितांना या संकटात साथ देण्याऐवजी मजा करत असलेल्या श्रीमंत निर्वासितांची मी तर माझ्या प्रार्थनाप्रवचनात स्पष्ट शब्दांत निंदाच केली आहे. हा धर्म नसून अधर्म आहे. आपल्या गरीब बांधवांच्या सुखदुःखात श्रीमंतांनी साथ दिली पाहिजे.

यानंतर हा मित्र टोमणा मारत म्हणतो की तुम्ही जरी पाकिस्तानमध्ये जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे तरी तुम्ही अजून पाकिस्तानमध्ये का गेला नाही? मी अजून दिल्लीतच का आहे असे हा

मित्र विचारतो. इथे दिल्लीत तुमचे काय काम आहे असे तो विचारतो. दुःखी हिंदू आणि शिखांना मदत करण्याऐवजी मुसलमान मित्रांना मदत करणे तुम्हाला जास्त का आवडते असाही या मित्राचा प्रश्न आहे. परंतु तक्रार करणारे मित्र विसरतात की दिल्लीतील माझे कर्तव्य सोडून पाकिस्तानमधील हिंदूंना आणि शिखांना मदत करण्याकरिता मी पाकिस्तानमध्ये जाऊ शकत नाही. मला मान्य आहे की मी मुसलमानांचाही तितकाच मित्र आहे जितका दुःखीकष्टी हिंदू आणि शिखांचा. मी जेव्हा एखाद्याची सेवा करतो तेव्हा तो भारताचा वा एखाद्या धर्माचा भाग आहे म्हणून करत नसतो तर संपूर्ण मानवतेचा तो भाग आहे म्हणून करत असतो. येथील हिंदू आणि शीख निर्वासित व इतर लोकांनी सिद्ध करावे की ते मुसलमानाचे मित्र आहेत आणि आता यापुढे मी दिल्लीत थांबण्याची आवश्यकता नाही. असे झाले तर मी लगेच पाकिस्तानमध्ये जाईन व जाताना माझे प्रयत्न वाया जाणार नाहीत असा आत्मविश्वास माझ्या मनात राहील.

हे आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीने कस्तुरबा निधीलासुद्धा सोडलेले नाही. कस्तुरबा निधीचा कसा उपयोग केला जातो व त्याचा उपयोग निर्वासितांना मदत करण्याकरिता का केला जात नाही असेही या मित्राने विचारले आहे. पहिली गोष्ट ही आहे की मी तुरुंगात असताना काही विशिष्ट उद्देशाने हा निधी उभारण्यात आला होता. (गांधीजींची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर गांधीजींना कस्तुरबा गांधी राष्ट्रीय समृतीनिधीच्या विश्वस्तांतर्फे ऑक्टोबर २, १९४४ला ८० लाख रुपयांची थैली देण्यात आली होती. पाहा कस्तुरबा स्मृती विश्वस्तांच्या सभेतील भाषण, ऑक्टोबर २, १९४७) वेगळ्या शब्दांत हा निधी भारताच्या ग्रामीण विभागातील स्त्रियांना आणि मुलांना मदत करण्याकरिता उभारण्यात आला होता. या निधीच्या व्यवस्थापनाकरिता विश्वस्तमंडळ आहे. सदैव सावध असणारे ठक्कर बाप्पा (अ. वि. ठक्कर, १८६९-१९५१, १९१४ साली भारत सेवक समाजात सामील; १९२२ साली भिल सेवासदनची स्थापना; हरिजन सेवक संघाचे सचिव; अध्यक्ष, गुजरात अंत्यज सेवा मंडळ; सचिव कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मृती विश्वस्त संस्था १९४४-५१) त्याचे सचिव आहेत. ते पै आणि पैचा हिशेब ठेवतात. निधीचे हिशेब कोणीही पाहू शकतो. यामुळे हे मित्र सुचवतात त्याप्रमाणे या निधीतून खर्च करता येत नाही आणि असे करण्याची आवश्यकताही नाही. निर्वासितांकरिता जनता उदार हस्ते पैसा देत आहे आणि कांबळ्याकरिता मी केलेल्या आवाहनाचे (पाहा प्रार्थनाप्रवचन ऑक्टोबर ४, १९४७) लोकांनी उदारपणे स्वागत केले आहे. सरदार पटेल यांनी विशेष आवाहन केले आहे. त्याला जनतेचा भरपूर पाठिंबा मिळाला आहे आणि अजूनही मिळतो आहे.

पत्रलेखकाची शेवटची तक्रार अशी आहे - पाकिस्तानमध्ये जर डुक्कर मारण्यावर प्रतिबंध लावण्यात आला आहे तर भारतात गोहत्येवर प्रतिबंध का लावण्यात येऊ नये? पाकिस्तानमध्ये डुक्कर

मारण्याला कायदेशीर मनाई आहे की नाही हे मला माहीत नाही. या मित्राने दिलेली माहिती बरोबर असेल तर मला त्याबद्दल खेद होतो. मला हे माहीत आहे की इस्लाममध्ये डुकराचे मास खाण्याला मनाई आहे. परंतु एवढ्याकरिता मुसलमानेतरांना डुकराचे मांस खाण्याला मनाई करणे मला योग्य वाटत नाही.

पाकिस्तान देवाधिष्ठित राज्य नाही आणि त्यात धर्माला कायद्याचे रूप दिले जाणार नाही असे कायदे आझम म्हणाले नव्हते काय? परंतु दुर्दैवाने हे अगदी खरे आहे की या दाव्याची व्यवहारात अमलबजावणी होत नाही. भारत देवाधिष्ठित राज्य होणार आहे काय आणि हिंदू धर्माची तत्त्वे अहिंदूंवर लादली जाणार आहेत काय? आशा आहे की असे होणार नाही. जर असे झाले तर भारत आशा आणि उज्ज्वल भविष्याचा देश राहणार नाही. मग तो असा देश राहणार नाही की ज्याच्याकडे आशिया आणि आफ्रिकेतील समुदायच नाही तर सर्व जग अपेक्षेने पाहत असेल. जग संघराज्य वा पाकिस्तानकडून संकुचितपणाची वा धार्मिक उन्मादाची अपेक्षा करत नाही. ते भारताकडून मोठेपणा, चांगुलपणा आणि औदार्य यांची अपेक्षा करत आहे. आज जो घोर अंधकार सर्वत्र पसरला आहे त्यात भारताकडून आपल्याला प्रकाश मिळेल अशी ते आशा करत आहे.

गोभक्ती आणि गोपूजा यात मी कुणाहूनही कमी ठरणार नाही. परंतु ही भक्ती आणि श्रद्धा कायद्याने इतरांवर लादता येऊ शकत नाही. मुसलमान इतर अहिंदूंशी मैत्रीपूर्ण आणि चांगले व्यावहारिक संबंध प्रस्थापित करूनच ही भावना निर्माण करता येऊ शकते. असे दिसते की गुजराती आणि मारवाडी गायीचे रक्षण करण्यात इतर सर्वांपेक्षा पुढे आहेत.. परंतु हिंदू धर्माच्या तत्त्वांचा त्यांना इतका विसर पडला आहे की ते इतरावर तर आनंदाने निर्बंध आणू इच्छितात परंतु गाय व तिच्या संततीशी गैरवर्तन करतात. आज जगात सर्वात जास्त उपेक्षित भारतातील पाळीव पशूच का आहेत? ते जगात सर्वात कमी दूध देतात आणि म्हणून ते देशावर ओझे झाले आहेत असे समजले जाते. ओझे वाहणाऱ्या बैलांशी इतके कठोर वर्तन का केले जाते?

आपल्याला अभिमान वाटावा असे भारतातीत पांजरपोळ नाहीत. त्यांच्यावर भरपूर पैसा खर्च केला जातो परंतु जनावरांचे पालनपोषण वैज्ञानिक आणि बुद्धिमत्तापूर्वक क्वचितच केले जाते. हे पांजरपोळ आपल्या जनावरांना नवजीवनाची संजीवनी देऊ शकत नाहीत. जनावरांशी प्रेमाने आणि सहानुभूतीने वागूनच असे करता येऊ शकते. माझा दावा आहे की कायद्याच्या मदतीशिवाय इतर कोणत्याही भारतीयापेक्षा कसायाच्या सुरूपासून मी जास्त गायी वाचवल्या आहेत. याचे कारण मी मुसलमानांशी मैत्री करू शकलो हेच आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ४ नोव्हेंबर १९३४७

१०. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ५, १९४७

नवी दिल्ली,

नोव्हेंबर ५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कुराण शरीफमधील आयतीसंबंधी आज मला काहीही म्हणावे लागत नाही हे मी माझे भाग्य समजतो. माझ्याकरिता हा दैवी क्षण आहे असे मी समजतो. एक व्यक्ती आहे की जिचा आक्षेप आहे परंतु आता ती मित्र झाली आहे. त्यांचा आक्षेप आहेच परंतु अतिशय सौजन्याने. एकदा त्यांनी आपला विरोध व्यक्त केला की ते शांत राहतात. त्यांचा विरोधसुद्धा मी विरोध म्हणून घेत नाही. इतकेच नाही तर प्रत्येक जण अशा प्रकारे विरोध करू लागला तरी आपण काही गमावणार नाही. त्यांनी स्वतःच मला सांगितले की एकदा त्यांनी निषेध नोंदवला की ते प्रार्थनेत रमून जातात. तर ही गोष्ट चांगली आहे.

एका हरिजन मुलाने म्हटलेले भजन तुम्ही ऐकले. तुम्ही त्याचा गोड आवाज आधीच ऐकलेला आहे. तो रामधूनसुद्धा फार चांगली म्हणतो. माझ्याकरिता हा काही आगळावेगळा अनुभव नाही. मी हरिजनांमध्ये राहतो आणि देशभरात सतत सुरू असलेल्या माझ्या दौऱ्यात मी देशभरातील हरिजनांच्या संपर्कात येतो. एखादी व्यक्ती हरिजन आहे असे जर कोणी तुम्हाला सांगितले नाही व कोणी त्या व्यक्तीची तशी ओळख करून दिली नाही तर ती व्यक्ती हरिजन आहे हे कोणीही ओळखणार नाही. इतर माणसांप्रमाणेच त्यांच्यात गुणावगुण आहेत. त्यांच्यात काही दोषही आहेत. परंतु दोष कोणात नसतात? इतर लोकांमध्येही असे दोष असतात. परंतु हरिजनांमध्ये मला एक विशेष गुण आढळून आला. तो म्हणजे हरिजन मुलाला थोडेसे जरी संगिताचे शिक्षण दिले तरी तो फार मोठी प्रगती करतो. आतापर्यंत आपण त्यांचा छळ केलेला असल्यामुळे कोणी जर त्यांच्याशी प्रेमाने गोड बोलून शिकवू लागला तर ते लक्ष देऊन ऐकतात, खूप मेहनत घेतात आणि चांगली प्रगती करतात. सुखवस्तू घरांतील मुले गर्विष्ठ असतात आणि आपल्या आईवडिलांजवळ भरपूर काही आहे हे माहीत असल्यामुळे ते आपल्या कामावर लक्ष केंद्रित करत नाहीत. परंतु हरिजन सामान्यपणे गरीब असल्यामुळे व त्यांना अस्पृश्याप्रमाणे वागणूक मिळत असल्यामुळे जेव्हा कोणी त्यांना आपल्या बरोबरीची जागा देऊन आपल्याजवळ बसवतो व त्याच्याबरोबर खातोपितो तेव्हा ते भारावून जातात. सर्वच हरिजन अशा प्रकारे वागतात असे नाही. मी असेही हरिजन पाहिले आहेत की त्यांच्याकरिता कितीही केले तरी त्यांना त्याचे काहीही वाटत नाही. परंतु सर्व हरिजन सारखे नसतात. हिंदुधर्मात त्यांचा शेकडो वर्षांपासून छळ करण्यात आला आहे. तरीही ते आपल्या धर्माला घट्ट धरून राहिले. इतरांशी तुलना केली तर त्यांच्यात जास्त गुण आहेत.

तुम्ही कदाचित पंढरपूरचे नाव ऐकले नसेल. ते महाराष्ट्रातील तीर्थस्थळ आहे. तिथे ज्या मूर्त्या आहेत त्यांच्याबद्दल इतक्या दंतकथा आहेत की त्या सर्व सांगत बसण्याची माझी इच्छा नाही. पंढरपूरचे देऊळ हरिजनांकरिता उघडे नव्हते. साने गुरुजी (पां. स. साने ऊर्फ साने गुरुजी; पाहा पां. स. साने यांना तार, मे १, १९४७ आणि पां. स. साने यांना पत्र मे ३, १९४७ आणि जी. व्ही मावळणकर यांना तार मे ७, १९४७.) तिथे बसले आणि विश्वस्तांना म्हणाले की जेव्हा हरिजनांकरिता चोहोकडची मंदिरे उघडली आहेत तेव्हा पंढरपूरचे मंदिर का उघडू नये? याकरिता काही कारण नाही. जेव्हा त्यांची विनंती मान्य करण्यात आली नाही तेव्हा ते उपोषणावर बसले (मे १, १९४७ला). साने गुरुजी महान भक्त आहेत आणि विश्वस्त त्यांना तसेच कसे मरू देऊ शकत होते? त्यांना सद्बुद्धी सुचली व त्यांच्या मनात करुणा निर्माण झाली. परंतु त्यांनी साने गुरुजींना सांगितले की आम्ही असहाय आहो कारण आमच्यासमोर किती तरी तांत्रिक अडचणी आहेत. त्या आधी दूर कराव्या लागतील. मग मावळणकर (जी. व्ही. मावळणकर१९८८-५६; अध्यक्ष मुंबई विधान सभा, मुंबई १९३५-४५; अध्यक्ष लोकसभा १९४७-५६) तिथे गेले आणि उपवास सोडण्याकरिता त्यांनी साने गुरुजींना समजावले. (मे ४, १९४७ला) हरिजनांकरिता मंदिर उघडण्यात आले नाही तर मी परत उपवास करीन या अटीवर त्यांनी उपवास सोडला. आता मला तार मिळाली आहे की मंदिर उघडण्याकरिता जे विधेयक तयार होणार होते ते तयार झाले आणि ते मंदिर हरिजनांकरिता उघडले गेले. सर्वांनी आनंदाने ते उघडले आणि तिथे हजारो लोक गेले. तिथे कोणताही विरोध झाला नाही. त्या हजारो लोकांमध्ये एखाददुसऱ्याने कदाचित विरोध केला असेलही. तर पंढरपूरचे इतके मोठे मंदिर इतकी मेहनत केल्यानंतर उघडले. हरिजनांवर आपण जितके अत्याचार केले आहेत ते जर बंद झाले तर भारत किती तरी उंचावर पोहोचेल. परंतु आज तर आपण खाली पडत आहोत, कारण आपल्यामध्ये वैमनस्य भरलेले आहे. परंतु भारत नेहमीकरिता अशा वेडेपणाच्या अवस्थेत राहणार नाही अशी मी आशा करतो. मग काय होईल ते ईश्वराला माहीत.

माझ्याकडे काही प्रश्न आले आहेत. तसे तर ते वेगवेगळ्या पत्रात आहेत परंतु ते एकत्रित केले आहेत. पहिला प्रश्न एका मुसलमान भावाने विचारला आहे. ते म्हणतात - काल सांगितल्याप्रमाणे गोमांस खाणे सोडण्याकरिता हिंदू कोणावरही बळजबरी करू शकत नाहीत. त्यांना विनंती करता येऊ शकते, समजावून सांगता येते. जर त्यांची समजूत पटू शकली व आमच्याबद्दलचे प्रेम दाखवण्याकरिता का होईना त्यांनी गोमांस सोडले तर फारच चांगले. परंतु असेही अनेक हिंदू आहेत की जे मांसाहार करतात मग ते मांस मासोळीचे असो की अजून कशाचे. तुम्ही त्यांच्यावरही मांसाहार सोडण्याकरिता बळजबरी कराल काय आणि तुम्ही मांसाहार सोडला नाही तर तुम्हाला भारत सोडावा लागेल आणि नाही तर आम्ही तुम्हाला मारून टाकू असे तुम्ही त्यांना म्हणाल काय? जर असे होऊ शकत नसेल तर

मुसलमानांनी असा कोणता अपराध केला आहे? त्यांच्यावर बळजबरी का करण्यात यावी? मला माहीत आहे की काही हिंदू असे वेडे आहेत की जे मुसलमानांवर बळजबरी करतात. मी तर म्हणेन की हा अत्याचार आहे आणि आपण तो करायला नको.

दुसरा प्रश्न एका हिंदू मित्राने विचारला आहे. तो लिहितो की हे खरे आहे की सर्व हिंदू वैमनस्याच्या भावनेने भरलेले नाहीत. तुम्ही म्हणता की मरायचे असेल तर मरून जावे परंतु मुसलमानांनी आपले घर सोडायला नको. तुम्ही हे ज्ञान सर्वांना पाजता परंतु यामुळे सर्वांना तर ज्ञान मिळू शकत नाही. एकीकडे तुम्ही असा सल्ला देत राहाल आणि दुसरीकडे मुसलमानांना इथे इतका त्रास दिला जात आहे की ते घराबाहेरसुद्धा पडू शकत नाहीत, इथून पळा नाही तर मारून टाकू अशा धमक्या त्यांना दिल्या जात आहेत. मुसलमान ज्या मोहल्ल्यात राहतात तेथून ते बाहेर पडले तर कापून टाकले जातील, आणि मोहल्ल्यातच राहायचे तर खायचे काय? त्यांच्यात कारागीर अथवा मजूर लोक असतात. समजा की एक कोष्टी आहे आणि तो कपडे विणतो. आणि जर हिंदू म्हणाले की आम्ही याचे कापड विकत घेणार नाही आणि जर कोणी घेतले तर त्याला कापून टाकू. अशा परिस्थितीत तुम्ही त्याला इथे राहूही दिले तरी त्याचा काय फायदा? चांगल्या परिस्थितीतील एकही मुसलमान अशा गरीब वस्तीत राहत नाही आणि तिथे राहणारे गरीब लोक जर बाहेर जाऊ शकत नसतील तर ते आपले पोट कसे भरू शकतील? एकीकडे त्यांचा इतका छळ करण्यात यावा आणि दुसरीकडे तुमच्यासारखे लोक त्यांना मरून जा म्हणतील तर हे विचित्र नाही काय?

आपण मोठ्या अभिमानाने म्हणतो की दिल्लीत सर्व काही ठीक आहे, काही मोठ्या घटना तर घडत नाहीत. परंतु माझे म्हणणे आहे की लहानसहान घटना जरी घडत असतील तरी त्या आपल्याला बोचायला पाहिजे. भारतात जर अशा घटना घडत असतील तर तुम्ही कोणत्या तोंडाने मुलमानांना इथे राहण्याकरिता सांगता असा प्रश्न मला सारखा ऐकावा लागत असतो. भारतात जितके मुसलमान आहेत त्यांनी पाकिस्तानमध्ये निघून जावे आणि पाकिस्तानमध्ये जितके हिंदू आणि शीख आहेत त्यांनी भारतात यावे असे जर आपण केले तर आपण कायम शत्रू होऊन जाऊ. आणि मग मन भरून लढत राहू अशा मूर्खपणाच्या गोष्टीपासून आपण वाचलो पाहिजे.

तिसरा प्रश्न थोडा किचकट आहे. तो क्लिष्ट आहेही आणि नाहीही. एक मुसलमान मित्र लिहितो की तुम्ही जर माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले तर मला आणि माझ्या इतर मुसलमान मित्रांना आनंद होईल. (इथे ब्रिजकृष्ण चंडिवाला सांगतात की हा प्रश्न हिंदूने विचारलेला आहे.) ठीक आहे कोणी विचारला याला महत्त्व नाही. तो प्रश्न योग्य आहे. तो विचारणे योग्यही आहे आणि योग्य नाहीसुद्धा. हा प्रश्न आहे : "ब्रिटिशांसमोर जेव्हा पराभव उभा होता तेव्हाही तुम्ही ब्रिटिशांना अहिंसेचे अनुसरण करण्याकरिता

सांगत होता. तुम्ही त्यांना सल्ला देत होत की शस्त्र टाकून द्या आणि अहिंसक व्हा. असे करून तुम्ही किती तरी शौर्य दाखवू शकाल. मग तुम्ही सरकारला अहिंसक लढाई करण्याकरिता का सांगत नाही?" मी तर आधीच सांगितले आहे की मी कोणीच नाही आणि माझे कोणीही ऐकत नाही. लोक म्हणतात की सरदार तुमचे आहेत आणि पंडितजी तुमचे नसतील तर मग कोण असेल आणि मौलानाही तुमचेच आहेत. माझे आहेतही आणि नाहीतही. मी तर अहिंसा सोडलेली नाही. त्यांनाही तर शिकवत आलो आहे. ती तोपर्यंत चालली जोपर्यंत स्वातंत्र्य मिळाले नव्हते. आता ते म्हणतात की अहिंसेने कारभार कसा करता येऊ शकतो. मागे लष्कर आहेच. ते लष्कर घेऊन बसले आहेत. आता माझी किंमत राहिलेली नाही. जर माझी किंमतच राहिलेली नाही तर मी लोकांमध्ये कशाकरिता आहे? याच आशेने आहे की कदाचित लोक माझे ऐकतील. तुमच्यासारखे थोडेसे लोक येतात आणि सभ्यपणाने माझ्याबरोबर बसून प्रार्थना करतात. जसे तुम्ही आहा तसे कदाचित इतरही होतील आणि मग कदाचित सर्वांना शहाणपणा सुचेल. माझ्या बोलण्याचा कदाचित काही परिणाम होईल. याच मोहाने इथे पडलो आहे आणि इतके करतो आहे. मला माहीत नाही की ईश्वराची माझ्याकडून किती दिवस काम करवून घेण्याची इच्छा आहे. तो आजही माझे काम बंद करू शकतो. इथे बसल्याबसल्या माझा श्वास बंद झाला तर आताच मी मरून जाईन. यामुळे जी गोष्ट मी हिटलर (पाहा ॲडॉल्फ हिटलरला पत्र, जुलै २३, १९४७), मुसोलिनी (या आधीच्या टिपेप्रमाणे), चर्चिल (बहुधा हा संदर्भ प्रत्येक ब्रिटिशाला पत्र जुलै २, १९४७शी संबंधित आहे.) आणि जपानला (प्रत्येक जपानीला पत्र, जुलै १८, १९४७) सांगितली होती तिच्यावर मी अजूनही कायम आहे व तीच गोष्ट आपल्या सरकारला सांगतो आहे. परंतु काश्मीरचे तर शेख अब्दुल्ला आहेत. ते तर फार शूरवीर आहेत आणि शौर्याची मी नेहमीच तारीफ केली आहे. हे खरे आहे की ते हिंसा करत आहेत, परंतु त्यात शौर्य तर आहे, आणि शौर्याची मी नेहमीच तारीफ करत असतो. मी तर सुभाष बाबूंचीही तारीफ करत असतो. मला हिंसा पसंत होती म्हणून काही मी ती तारीफ करत नव्हतो. त्यांनी जी आझाद हिंद सेना तयार केली होती ती मी थोडाच तयार करू शकणार होतो. जर मी चांगली गोष्ट पाहिली आणि चांगल्या गोष्टीला मी चांगली म्हणालो नाही तर मी अहिंसक राहू शकत नाही. शेख अब्दुल्ला जर तिथे शेवटपर्यंत लढत राहिले आणि हिंदू आणि शिखांबरोबर राहिले तर ते फार मोठे काम होईल. जे लोक इथे आहेत त्यांच्यावरही त्याचा फार मोठा प्रभाव पडेल याबद्दल मला किंचितही संशय नाही. ते काहीही असले तरी मला जर माझ्या अहिंसक मार्गाने चालता आले आणि सर्वांनी माझे ऐकले तर तिथे जे सैन्य आम्ही पाठवतो आहो तेही पाठवण्याची गरज नव्हती. आणि पाठवलेच असते तर अहिंसक लष्कर पाठवले असते. आफ्रिदी लोक जर मारून टाकणार असतील तर आनंदाने मरायचे. ते अहिंसक युद्ध होईल. ते अहिंसक युद्ध होईल कारण ते अहिंसक राहून मरण पत्करतील. शेख अब्दुल्लासुद्धा आफ्रिडींना म्हणतील की तुम्ही श्रीनगर

घेऊ शकता परंतु आम्ही मेल्यानंतर. परंतु ते सर्व शस्त्रांनी लढत आहेत आणि शौर्याने लढत आहेत. तेसुद्धा अहिंसक होऊ शकतात, परंतु ते अहिंसेचे खरे रूप नसेल. कल्पना करा की एक लाख आफ्रिदी सैन्याने मूठभर लोकांच्या ठिकाणावर हल्ला केला आणि त्यांनी आपल्या निरागस मुलाबाळांना व स्त्रियांना वाचवण्याकरिता सशस्त्र प्रतिकर केला व लढत असताना त्यात ते मेले तर त्यांनी शस्त्रांचा उपयोग जरी केलेला असला तरी त्यांच्या प्रतिकाराला अहिंसक प्रतिकार म्हणता येऊ शकते. परंतु हे मी कोणाला सांगू शकतो? आज चोहोकडे विष पसरले आहे, लोक एकमेकांना रानटीपणाने मारत आहेत. या परिस्थितीत अहिंसेचा पाठ शिकवण्याची क्षमता माझ्यामध्येसुद्धा नाही. त्या काळात चर्चिल म्हणू शकत नव्हते परंतु आज शेख अब्दुल्ला आणि तिथे गेलेले सैन्य म्हणू शकते की दिल्लीत तुमच्या अहिंसेला अपयश आले कारण तिथे लोक रानटीपणाचे वर्तन करत आहेत परंतु आम्ही जे काही करतो आहे त्याला रानटीपणा म्हणता येऊ शकत नाही. आणि त्यांना असे म्हणण्याचा अधिकार आहे हे मी मान्य करतो. परंतु संघराज्यातील हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांची माझ्या अहिंसेबद्दल मी खात्री पटवून देऊ शकलो तर ते असे म्हणणार नाहीत. अशा परिस्थितीत मी स्वतः त्या अहिंसक सैन्याबरोबर काश्मीर, पाकिस्तान वा इतर कोणत्याही ठिकाणी जाऊ शकतो आणि मग माझे काम फार सोपे होईल. आणि मग अहिंसेचा प्रभाव इतका मोठा असेल की त्याकडे आपण पाहत राहू. परंतु असा प्रसंग केव्हा येईल अशी मी आशा करू शकतो? तुम्ही जर माझे शब्द ऐकाल आणि त्याप्रमाणे वागाल, माझे शब्द जर अधिक प्रभावशाली असते आणि माझे हृदय अधिक सामर्थ्यसंपन्न असते, माझी तपश्चर्या कितीही मोठी दिसत असली तरी ती अजून प्रभावी झाली असती आणि माझ्या एकेका शब्दात भारतावर पकड निर्माण करण्याची शक्ती आली तर माझे काम होईल. परंतु आज मी असहाय आहे. तुम्ही लोकही जर ईश्वराला माझे शब्द प्रभावी करण्याकरिता आणि मला त्याने जिथे आणले आहे तेथून पुढे नेण्याकरिता व माझ्या देहाकडून अजून काम घेण्याकरिता प्रार्थना कराल तर भारताचा जगावर फार मोठा प्रभाव पडेल.

सध्या आशियायी प्रादेशिक श्रम संमेलन होत आहे (आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेची परिषद दिल्लीत भरली होती. पाहा चिनच्या प्रतिनिधी मंडळाला मुलाखत नोव्हेंबर ५, ९४७) आणि त्यात इंग्लंड, चीन, अमेरिका आणि पाकिस्तानचे प्रतिनिधी आले होते आणि म्हणत होते की तुम्ही फार मोठे काम केले आहे. त्यांची ही तारीफ मला बोचते. आज तर माझे दिवाळे निघाले आहे. आज मी काही सांगू शकत नाही आणि काल सांगत होतो त्याची आज किंमत राहिलेली नाही. लोकांवर जेव्हा माझा प्रभाव पडेल तेव्हाच तारीफ करण्यालायक होईन. परंतु आज तो दिसत नाही. मी तर केवळ माझ्या लाचारीचे प्रदर्शन तुमच्यासमोर करतो आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ४५-७२

११. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ६, १९४७

नोव्हेंबर ६, १९४७

मला लेखकाचे नाव माहीत आहे, परंतु मला त्यांचे नाव सांगण्याचीही इच्छा नाही आणि त्यांच्या लेखांचा आशय सांगण्याचीही इच्छा नाही. (एका मित्राने पाठवलेल्या वृत्तपत्रातील दोन कात्रणांचा इथे संदर्भ आहे.) मी केवळ इतकेच सांगू इच्छितो की ते लेख हिंदू धर्माची सेवा करण्याच्या हेतूने लिहिलेले आहेत, परंतु त्यात जाणूनबुजून खोट्या गोष्टी भरलेल्या आहेत. त्यात जेव्हा एखादी नवीन गोष्ट सांगण्यात येते तेव्हाही तथ्ये चुकीच्या पद्धतीने संगितली जातात. परंतु असे केल्यामुळे कोणताच हेतू साध्य होऊ शकत नाही, आणि धर्माचा तर मुळीच नाही हे सांगण्याचे साहस मी करतो. जेव्हा आरोप सत्यावर आधारित नसतो उलट असत्यावर आधारलेला असतो तेव्हा ज्याच्यावर आरोप करण्यात आलेला असतो त्याची काहीच हानी होत नसते. यामुळे अशा वर्तमानपत्रांचे लेखक कितीही प्रसिद्ध असले तरी त्यांना कोणतेही प्रोत्साहन देण्यात येऊ नये अशी मी जनतेला सावधगिरीची सूचना देऊ इच्छितो.

खाद्यमंत्र्यांनी जी अशासकीय लोकांची समिती (खाद्यान्न धोरण समिती) बनवली होती तिने आपला अहवाल त्यांना सादर केला आहे. त्या समितीच्या अहवालावर काही निर्णय घेण्याकरिता मदत करण्याकरिता डॉ. राजेंद्र प्रसाद यंना भेटण्याकरिता प्रांतांचे जे मंत्री आले होते त्यांना मी भेटलो (पाहा मागील विषय). मला जेव्हा त्या समितीबद्दल कळले तेव्हा कंट्रोल बंद करण्यावषयीची माझी भूमिका अगदी बरोबर असल्याची माझी खात्री असल्यामुळे लोकांच्या शंका दूर करता याव्या म्हणून या समितीसमोर मला माझे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी असे मी राजेंद्र प्रसाद यांना म्हणालो. राजेंद्र प्रसाद यांनी ताबडतोब माझे म्हणणे मान्य केले आणि मला खाद्यमंत्र्यांसमोर वा त्यांच्या प्रतिनिधींसमोर माझे म्हणणे मांडण्याची संधी दिली. जुन्या मित्रांना भेटून मला फार आनंद झाला. मी सांगत राहिलो आहे की जोपर्यंत सांप्रदायिक भांडणांसंबंधीच्या माझ्या मताचा संबंध आहे माझे मत कोणालाच मान्य नाही. परंतु हे सांगताना मला आनंद होतो की अन्नधान्याच्या समस्येसंबंधीच्या माझ्या मतासंबंधी तसे नाही. बंगालचे राज्यपाल श्री कॅसी यंच्याशी माझ्या अनेक भेटी झाल्यापासूनच भारताला अन्नधान्य वा कंट्रोल यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता नाही असे माझे मत झाले आहे. या बाबतीत मला लोकांचा पाठिंबा आहे की नाही हे त्या वेळी मला माहीत नव्हते. परतु नुकताच झालेल्या चर्चेवरून मला जनतेच्या परिचित आणि अपरिचित प्रतिनिधींचा बराच पाठिंबा आहे हे पाहून आश्चर्य वाटले. अन्नधान्य समस्येसंबंधी माझ्याकडे जी अनेक पत्रे येतात त्यांत पत्रलेखकाने माझ्या मतापेक्षा वेगळे मत व्यक्त केल्याचे एकही पत्र मला आठवत नाही. श्री घनश्याम दास बिर्ला (उद्योगपती) आणि लाला

श्रीराम (उद्योगपती) यासंबंधी काय विचार करतात ते मला माहीत नाही. समाजवादी पक्ष माझ्या मताला पाठिंबा देईल की नाही हेही मला माहीत नाही. परंतु डॉ. राममनोहर लोहिया जेव्हा मला भेटले तेव्हा कंट्रोल काढून टाकण्याविषयीच्या माझ्या मताशी ते पूर्णपणे सहमत झाले. सध्या देश ज्या अन्नधान्याच्या चणचणीच्या परिस्थितीतून जात आहे तिच्यातून मार्ग काढण्याकरिता डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आपल्या संपूर्ण कर्मचारी वर्गावर विसंबून राहू नये, आपल्या समितीतील केवळ एक दोन सदस्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

आता मी कापडाच्या कंट्रोलवर येतो. अन्नधान्यावरील कंट्रोल हटवण्यापेक्षाही कापडावरील नियंत्रण हटवण्यासंबंधी मला जास्त खात्री वाटत असली तरी कापडावरील नियंत्रण हटवण्याला मला तितका पाठिंबा मिळत नाही जितका अन्नधान्यावरील नियंत्रण दूर करण्यासंबंधीच्या माझ्या विचारांना मिळतो. विदेशी वा स्वदेशी गिरणी कापडाची जागा खादी घेऊ शकते या माझ्या मताला काँग्रेसने आनंदाने मान्यता दिली. तिने जमनालालजींच्या (जमनालाल बजाज) अध्यक्षतेखाली एका खादी मंडळाची स्थापना केली होती आणि येरवडा तुरुंगातून सुटका झाल्यानंतर त्याला अखिल भारतीय चरखा संघाचे रूप देण्यात आले होते. हिंदुस्तानात ४० कोटी लोक राहतात. पाकिस्तानमध्ये गेलेला भाग जरी वगळला तरी भारतात ३० कोटी लोक राहतात. भारत संपूर्ण लोकसंख्येला पुरेल इतका कापूस निर्माण करतो. कापसापासून सूत तयार करण्याकरिता पुरेसे लोक आहेत आणि त्या सुताचे कापड तयार करण्याकरिता भारतात पुरेसे विणकर आहेत. कोणत्याही मोठ्या गुंतवणुकीशिवाय आपण देशात सहजपणे चरखे, हातमाग आणि इतर साहित्य तयार करू शकतो. याकरिता गरज आहे ती प्रखर आत्मविश्वासाची आणि खादीशिवाय इतर कोणतेही कापड वापरायचे नाही या निर्धाराची. तुम्हाला माहीत आहे की आपण गिरणीपेक्षाही चांगली खादी निर्माण करू शकतो व त्यावरील रंग, रेषा इत्यादींची मांडणी (डिझाईन) इतकी सुंदर करता येऊ शकते की गिरणीतील कापडही त्यासमोर फिके पडावे. आता भारत परकियांच्या जोखडापासून मुक्त झालेला असल्यामुळे खदीकरिता विरोध राहणार नाही असे वाटत होते. विदेशी सत्तेच्या प्रतिनिधींचे ते वैशिष्ट्य होते. आता आपण आपल्याला हवे ते करण्याकरिता पूर्णपणे स्वतंत्र झालेलो असूनही आपण खादीसंबंधी ना तर बोलतो ना खादीच्या क्षमतेवर आपला विश्वास आहे. आणि भारताची कापडाची गरज पूर्ण करण्याकरिता आपण गिरणीतील कापडाशिवाय इतर कशाचाही विचार करत नाही. भारताकरिता खादीचे अर्थशास्त्र हेच एकमेव योग्य अर्थशास्त्र आहे याबद्दल मला किंचितही संशय नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ ५२-४

१२. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ७, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर ७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तिहार (गांधीजी तिहारला ४ वाजता भेट दिली आणि तेथील मुसलमानांना ते भेटले.) आणि जवळपासच्या भागातील मुसलमानांना विनाकराण त्रास सहन करावा लागत आहे हे पाहून मला दुःख होते. त्यांच्यापैकी अनेक जमीनमालक असूनही त्यांना आपल्या जमिनीची लागवड करता येत नाही कारण त्यांना छळ होण्याची भीती वाटते. त्यांनी आपले पाळीव पशू, नांगर, आणि इतर साधने विकून टाकली आहेत. सैन्य त्यांचे रक्षण करत आहे. (गांधीजी दिल्लीला परतत असताना त्यांची गाडी अनेक भारतीय सैनिकांनी अडवली. त्यांनी गांधीजींना अभिवादन केले आणि सांगितले की आम्ही संकटग्रस्तांना पूर्ण संरक्षण देत आहो. गांधीजी स्मित करत त्यांना म्हणाले की जात वा धर्म यांचा भेदभाव न करता सर्वांना संरक्षण देणे हेच सैनिकाचे कर्तव्य असते.) माझ्या आजूबाजूला दुःखी लोकांपैकी २००० पेक्षाही जास्त लोक गोळा झाले होते. इथे त्यांचे जीवन असह्य झालेले असल्यामुळे आपल्या पुढाऱ्यांद्वारे त्यांनी पाकिस्तानला जाण्याची इच्छा व्यक्त केली. ते म्हणाले की आमचे अनेक मित्र आणि नातलग आधीच पाकिस्तानमध्ये गेलेले आहेत. यामुळे सरकारने आमची लाहोरला जाण्याची व्यवस्था केली तर आमच्यावर कृपा होईल. ते म्हणाले की सैन्याविरुद्ध आमची कोणतीही तक्रार नाही. असे असले तरी त्या भेटीचा संपूर्ण वृत्तांत मी तुम्हाला सांगत बसणार नाही. त्या लोकांना मी सांगितले की माझ्या हातात कोणतीही सत्ता नाही. परंतु तुमचा निरोप मी प्रधानमंत्री आणि उपप्रधानमंत्री, जे गृहमंत्रीसुद्धा आहेत, यांना आनंदाने कळवीन.

दिल्लीमध्ये निर्वासित एक समस्या झाले आहेत आणि पाकिस्तानमध्ये त्यांना बरेच अत्याचार सहन करावे लागलेले असल्यामुळे त्यांना इथे विशेषाधिकार आहेत असे वाटते असे मला सांगण्यात आले आहे. ते जेव्हा बाजारात काही विकत घेण्याकरिता जातात तेव्हा दुकानदारांने त्यांना पैसे न घेता वा अगदी कमी किंमतीत वस्तू द्याव्या असे त्यांना वाटते. काही वेळा तर एकच व्यक्ती शेकडो रुपयांपेक्षाही जास्त खरेदी करतात. टांगेवाल्याने त्यांना फुकट न्यावे वा नाममात्र पैसे घ्यावे असे त्यांना वाटते. मला मिळालेले हे वृत्त खरे असेल तर सामान्यपणे कठीण काळापासून माणूस जो धडा घेत असतो तो या निर्वासितांनी घेतला नाही हे सांगणे माझे कर्तव्य आहे. असे करून ते स्वतःचे आणि देशाचेही नुकसान करत आहेत आणि आधीच बिकट झालेली समस्या अजून बिकट करत आहेत. ते जर असेच वागत राहिले तर दिल्लीतील व्यापाऱ्यांची सहानुभूती ते गमावतील.

याचबरोबर पाकिस्तानमध्ये सर्व काही गमावून आलेले निर्वासित एका वेळी शकडो रुपयांची खरेदी कसे करू शकतात हे मला कळत नाही. निर्वासितांनी आवश्यक आणि क्वचित प्रसंग वगळता कुठेही जाण्याकरिता ईश्वराने दिलेले पाय सोडून इतर कशाचाही उपयोग करू नये असे मला वाटते. याशिवाय मी असे ऐकले आहे की दिल्लीत लाखो निर्वासित आल्यापासून दिल्लीतील तीव्र मद्यार्क असलेल्या दारूच्या विक्रीपासून मिळणाऱ्या अबकारी कराच्या उत्पन्नात एकाएकी भरपूर वाढ झाली आहे. खरे म्हणजे त्यांना कळले पाहिजे की प्रांतीय सरकार जेव्हा काँग्रेसची मागणी पूर्ण करतील तेव्हा भारतीय संघराज्यात ना तर दारू मिळेल ना गांजा, ना अफूसारखे मादक पदार्थ मिळतील. आमच्या मुसलमान बांधवांना पूर्ण दारूबंदी करण्याकरिता काँग्रेसच्या ठरावाची आवश्यकता पडणार नसल्यामुळे हीच गोष्ट पाकिस्तानची असेल. ज्या निर्वासितांनी मोठमोठे संकट सहन केले आहेत ते दारू आणि इतर मादक पदार्थांचे सेवन सोडू शकत नाही काय? ऐशआरामाच्या जीवनाचा त्याग करू शकत नाहीत काय? मागील व्याख्यानात मी दिलेला सल्ला माझे निर्वासित बांधव ऐकतील अशी मला आशा आहे. मी त्यांना सल्ला दिला होता की ते जिथे कुठे जातील तिथे त्यांनी दुधात साखर मिसळते तसे मिसळून जावे आणि तेथील लोकांवर ओझे न बनण्याचा निर्धार करावा. श्रीमंत वा गरीब निर्वासितांनी एकाच शिबिरात राहावे आणि पूर्ण सहकार्य करावे व आदर्श स्वावलंबी नागरिक बनावे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ५५-७

१३. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ८, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर ८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

प्रार्थनेवर आक्षेप घेणारांबद्दल मनात क्रोधाची वा बदल्याची भावना न ठेवता शांतपणे बसून प्रार्थना पूर्ण होईपर्यंत तिच्यावरच लक्ष केंद्रित करण्याची प्राथमिक अट पूर्ण कराल काय? (आम्ही शांत राहू असे आश्वासन आक्षेप घेणाऱ्या चार लोकांसह सर्वांनी गांधीजींना दिले आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय प्रार्थना पार पडली.)

मला एका शीख मित्राचे पत्र मिळाले. तो म्हणतो की मी प्रार्थना सभांना उपस्थित राहत असतो आणि तसे करणे मला आवडतेसुद्धा. त्यांना प्रार्थनेमधील सहनशीलतेची भावना आवडते. त्यांना ग्रंथसाहेब, सुखमणी (ग्रंथसाहेबचा भाग) जपजी इत्यादीविषयी मी केलेले भाष्य आवडते. त्यांचे म्हणणे आहे की या धर्मग्रंथातून काही भाग निवडून दररोजच्या प्रार्थनेत मी त्याचा समावेश केला तर शिखांवर त्याचा फार चांगला परिणाम होईल. ते हे सर्व शीख समुदायातर्फे म्हणू शकतात असे त्यांना वाटते. ते म्हणतात की अशा प्रकारे निवडलेल्या भागांचे वाचन ते प्रार्थना म्हणत असताना करू शकतात. मी त्यांच्या सूचनेशी सहमत आहे. परंतु यासंबंधीचा अंतिम निर्णय त्या गृहस्थांकडून ते भजन ऐकल्यानंतरच मी घेईन. याकरिता त्यांनी ब्रजकिशनकडून वेळ ठरवली पाहिजे.

मी एकदा सांगितले होते की कापूस, कॅलिको (छपाई केलेले कापड), सुया इत्यादी गोष्टी निर्वासितांना उपलब्ध करून देण्यात याव्या म्हणजे ते आपल्या दुलया स्वतः तयार करू शकतील. (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १२, १९४७) असे करून आपण लाखो रुपये वाचवू शकू आणि निर्वासितांना काही तरी पांघरूण मिळू शकेल. माझ्या या विनंतीला प्रतिसाद देत आम्ही या वस्तू पुरवण्याकरिता तयार आहो असे मुंबईच्या रुई व्यापाऱ्यांनी मला लिहिले आहे. असे केल्याने आपलेसुद्धा काही मूल्य आहे असे निर्वासितांना स्वतःलाही जाणवेल व निरोगी सहकार्याचा ते पहिला पाठ शिकतील. दिल्लीतही कापड गिरण्या काही कमी नाहीत. शहरात बऱ्याच सूतगिरण्या आहेत. तरीही मुंबईच्या या देणगीचे मी स्वागत करतो कारण स्वतःहोऊन देणगी देणारांवर कोणतेही मोठे दडपण आणण्याची माझी इच्छा नाही. जितके जास्त लोक दान देण्याकरिता तयार असतील तितके ते निर्वासितांकरिता आणि देशाकरिता चांगले होईल. यामुळे मुंबईतील रुईचे व्यापारी शक्य तितक्या लवकर रुईच्या गाठी पाठवतील अशी आशा आहे. श्रीमंतांनी अशा प्रकारे सहकार्य दिले तर शासनावरील ओझे कमी होईल. आता आपण स्वतंत्र राष्ट्र असल्यामुळे स्वतःहोऊन प्रत्येक व्यक्ती

देशाच्या कारभाराला हातभार लावू शकते, परंतु त्याकरिता त्याला स्वातंत्र्यामुळे देशाच्या नागरिकांवर येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे पूर्णपणे भान असले पाहिजे

जेव्हा रुईच्या गाठी येतील तेव्हा दुलयांकरिता पुरेसे छीटचे कापड देण्याकरिता मी गिरणी मालकांना समजावू शकेन याबद्दल मला मुळीच संशय नाही. रुईच्या गाठीवरून मला कापडावरील कंट्रोलची आठवण झाली. माझ्या मते भारतातील लोक आपल्या हाताने आपल्याकरिता पुरेशी खादी सहजपणे तयार करू शकतात. हे सोपेही आहे आणि शक्यही आहे. त्याकरिता देशात पुरेसा कापूस उपलब्ध असला पाहिजे इतकीच अट आहे. देशात कधीही कापसाचा दुष्काळ असल्याचे मला माहीत नाही. आपल्याला कापसाचा तुटवडा कधीच पडू शकत नाही कारण देशाला जितक्या कापसाची गरज असते त्यापेक्षा आपण जास्त कापूस निर्माण करतो. देशातून हजारो, लाखो रुईच्या गाठींची निर्यात केली जाते. तरीही देशातील कापड गिरण्यांकरिता कापसाचा तुटवडा कधीही पडत नाही. मी आधीच या गोष्टीकडे तुमचे लक्ष वेधले आहे की हाताने धुनाई करणे, कताई करणे आणि विणणे यांच्याकरिता लागणारे सर्व साहित्य देशात मिळू शकते. तसेच हे काम करू शकणारे लोकही देशात मोठ्या संख्येत आहेत. यामुळे देशातील कापडाच्या तुटवड्याकरिता आपला सुस्तपणाच कारणीभूत आहे इतकेच मी म्हणू शकतो. आज कापडाचे कंट्रोल देशात कोणालाही नको आहे, ते ना तर गिरण्यांना हवे आहे ना गिरणी मजुरांना हवे आहे ना कापड विकत घेणाऱ्या लोकांना. कंट्रोलमुळे आळशी लोकांचा वर्ग वाढत आहे व अशा प्रकारे ते देशाचा विनाश करत आहेत. अशा प्रकारच्या लोकांना कोणतेही काम नसल्यामुळे ते नेहमी खोडसाळपणा करण्याकरिता तत्पर असतात.

निर्वासितांची काही उपयुक्त कामात स्वतःला गुंतवून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनी आधी स्वतःकरिता दुलया तयार केल्या पाहिजे. आणि नंतर सर्वांनी, स्त्री-पुरुषांनी, आपला वेळ धुनाई, कताई, विणाई इत्यादी कामामध्ये घालवला पाहिजे. किती तरी लाख निर्वासितांनी सहकार्याने केलेल्या या कामातून जी शक्ती निर्माण होईल तिने देशात विद्युतसंचार होईल. यामुळे अधिक धान्य पिकवण्याकरिता आणि आपल्या घरातच खादी तयार करण्याकरिता ते लोकांना प्रोत्साहित करतील. हेही लक्षात ठेवले पाहिले की रुईच्या गाठी तयार करण्याऐवजी कताई करणारांना सरळ रुई उपलब्ध करून देण्यात आली तर आपण एक प्रक्रिया वाचवू शकतो ही बाबसुद्धा लक्षणीय आहे. यामुळे रुई खराब होणार नाही, तिची धुनाई करणे सोपे होईल व ग्रामीण भागाकरिता सरकी उपलब्ध होईल.

श्रीमती माऊंटबॅटन मला भेटण्याकरिता आल्या होत्या. त्या दयेच्या देवी झाल्या आहेत. त्या दोन्ही उपनिवेशांना भेटी देत असतात, (संयुक्त मदत आणि कल्याण समितीच्या अध्यक्ष म्हणून.) वेगवेगळ्या शिबिरातील निर्वासितांना भेटतात, आजारी आणि दुःखी लोकांशी बोलतात व

आपल्याकडून शक्य होईल तितके त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करतात. कुरक्षेत्रातील शिबिराला जेव्हा त्यांनी भेट दिली तेव्हा मी तिथे कधी येणार असे लोकांनी त्यांना विचारले. त्या सर्व लोकांना भेटण्याची मला इतकी इच्छा होती की मी तिथे निश्चितच गेलो पाहिजे असे श्रीमती माऊंटबॅटन यांनाही वाटले. मी त्या शिबिराला भेट देईन असे तुम्ही त्यांना सांगितले हे योग्य केले असे म्हणून मी त्यांना आश्वस्त केले. तुम्हाला खरे सांगायचे म्हणजे मी पानीपतला भेट देण्याची तयारी केली होती. तेथील शिबिरात हिंदू आणि मुसलमान दोघेही आहेत. मी पानिपत आणि कुरुक्षेत्रला एकाच दौऱ्यात भेट देण्याचे ठरवले होते. परंतु आता मला कळले आहे की मी एकाच दौऱ्यात या दोन्ही शिबिरांना भेट देऊ शकत नाही. यामुळे कुरुक्षेत्रला भेट देण्याचा माझा कार्यक्रम अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक होईपर्यंत (ही सभा नोव्हेंबर १५ आणि १६ तारखेला होणार होती.) पुढे ढकलणे मला आवश्यक झाले. असे असले तरी कुरुक्षेत्रच्या फार मोठ्या छावणीत ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करणे जरी कठीण होणार असले तरी त्यांच्याशी रेडिओवर बोलणे कठीण होणार नाही असे मला सुचवण्यात आले. याकरिता शिबिरात ध्वनिक्षेपकांची व्यवस्था मात्र करावी लागणार आहे. जर अशी व्यवस्था करण्यात आली तर तेथील लोकांशी मला मंगळवारी वा बुधवारी बोलता येऊ शकेल आणि नंतर मी त्यांना भेटण्याकरिता जाऊ शकेन. मध्यंतरीच्या काळात पानीपतच्या शिबिराला भेट देण्याचा कार्यक्रम मला पूर्ण करता येईल अशी आहे.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ५७-६०

१४. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ९, १९४७

(गांधीजींचे मौनव्रत सुरू असल्यामुळे त्यांनी हे भाषण लिहून काढले व ते प्रार्थनेनंतर वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,
नोव्हेंबर ९, १९४७

मला उद्या पानीपतला जावे लागत आहे याचा मला खेद होतो. पानीपतला पोहोचल्यानंतर तेथील हिंदूंशी आणि मुसलमानांशी बोलता यावे म्हणून मला मौनव्रत लवकर सुरू करावे लागणार आहे. मला आशा आहे की उद्या सायंकाळी प्रार्थनेच्या वेळेपर्यंत मी दिल्लीला पोहोचू शकेन आणि तेव्हा मी तुमच्याशी बोलू शकेन. मी उद्या कुरुक्षेत्रला जात आहे असे जे वृत्त वर्तमानपत्रांनी दिले आहे ते चुकीचे आहे. माझा कुरुक्षेत्रला जाण्याचा निश्चितच विचार आहे परंतु अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीआधी नाही असे मी त्यांना अर्थातच सांगितले होते. मी त्यांच्याशी बहुधा बुधवारी बोलेन अशी अपेक्षा आहे. त्याच्या वेळेची सूचना दिली जाईल.

काहीच दिवसात दिवाळी येणार आहे. एक भगिनी, जी स्वतःच निर्वासित आहे, लिहिते - (तिचे पत्र इथे दिलेले नाही. स्वतंत्र भारतातील ही पहिली दिवाळी असल्याने भूतकाळातील दुःख आपण विसरू या आणि सर्वांनी दिवाळी साजरी करावी.)

त्या भगिनीचे आणि तिच्यासारखा विचार करणारांचे मला कौतुक वाटते हे खरे असले तरी ती आणि तिच्याप्रमाणे विचार करणारे चूक आहेत असे म्हटल्याशिवाय मी राहू शकत नाही. ज्या कुटुंबावर दुःखाची कुऱ्हाड कोसळलेली असते ते कुटुंब आपल्या क्षमतेप्रमाणे कोणत्याही सणात वा उत्सवात सामील होत नाही ही गोष्ट सर्वश्रुत आहे. अतिशय लहान प्रमाणावर आपण सर्व एक आहो या तत्त्वाचे हे द्योतक आहे. कूपमंडुक वृत्ती सोडून भारतातील आपण सर्व एक कुटुंब होऊ या. आणि भारत खरोखरच एक कुटुंब आहे. ज्यामुळे माणूस माणूस होतो त्या सर्व सुंदर सद्भावनांकडे दुर्लक्ष करतो असे हे बंधन न तोडण्याचा अर्थ आहे. आपण आत्मकेंद्रित होऊ नये आणि भावनात्मक होऊन आपण वास्तवाकडे दुर्लक्षही करायला नको. मी जो आनंदोत्सव साजरा करू नये म्हणून सांगत असतो त्याच्या मागे काही निश्चित विचार आहे. निर्वासितांच्या समस्येमुळे लाखो हिंदू, मुसलमान आणि शीख प्रभावित झालेले आहेत. याशिवाय अन्नधान्याची व कापडाची चणचण माणसाने निर्माण केलेली असली तरी ही चणचण आहेच. याला कारण जनमतावर प्रभाव असणारे लोक जसे आहेत तसेच आपल्या दुःखापासून धडा न शिकणारे लोक आणि माणसाचे माणसाप्रती अमानवीय वर्तनही आहे. अशा या संकटाच्या काळात सण साजरा करण्याकरिता मला कोणतेही कारण दिसत नाही. कोणताही सण साजरा

करायचा नाही असे जर आपण जर दृढपणे आणि बुद्धिमत्तापूर्वक ठरवले तर आम्हाला अंतर्मुख व पवित्र होण्याची प्रेरणा मिळेल. आपण असे कोणतेही काम करू नये की ज्यामुळे इतक्या मेहनतीने आणि मुश्किलीने मिळवलेले वरदान आपल्याला फेकून द्यावे लागेल.

आता मी त्या मित्रांबद्दल सांगेन जे फ्रेंच भारतातून (पाहा चंद्रनगरच्या लोकांना संदेश, ऑगस्ट १७, १९४७.) मला भेटायला आले होते. "भारतीय संघराज्यात संपूर्ण स्वायत्तता मिळावी आणि त्याचबरोबर तेथील फ्रेंच संस्कृतीचेही जतन करण्यात यावे" या फ्रेंच भारतातील लोकांच्या भावना दाबून टाकण्याकरिता मी चंद्रनगरच्या सत्याग्रहासंबंधी जे म्हणालो होतो (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १७, १९४७) त्याचा दुरुपयोग करण्यात येत आहे अशी त्यांची तक्रार आहे. त्यांनी मला असेही सांगितले की ब्रिटिश भारतात ज्याप्रमाणे पंचमस्तंभी होते तसेच फ्रेंच भारतातही पंचमस्तंभी असू शकतात. आपल्या स्वार्थसिद्धीकरिता ते लोक फ्रेंच अधिकाऱ्यांशी सहकार्य करू शकतात. अशा प्रकारे फ्रेंच भारतातील स्वाभाविक आकांक्षा दडपून टाकण्याचा ते प्रयत्न करत आहेत. फ्रेंच भारतातून आलेल्या मित्रांनी दिलेली माहिती बरोबर असेल तर मला फार दुःख होईल. ते काहीही असले तरी माझे मत स्पष्ट आहे की करोडो भारतीयांना ब्रिटिशापासून स्वातंत्र्य मिळालेले असताना लहान लहान उपनिवेशात राहणारे लोक (उदाहरणार्थ गोवा, दमण, दीव, माहे, पॉदेचेरी आणि चंद्रनगर) गुलामगिरीत राहणे अशक्य आहे. मला आश्चर्य वाटते की चंद्रनगरबद्दल माझी जी मैत्रीभावना आहे त्याचा चुकीचा अर्थ लावला जातो. भारताच्या या भागांना गुलामगिरीत राहावे लागावे व त्यांना नेहमीकरिता उपनिवेशाचा दर्जा असावा ही गोष्ट मी कधीही सहन करू शकत नाही. यामुळे मी आशा करतो की मला देण्यात आलेल्या बातमीला वास्तवात कोणताही आधार नसेल. आणि लोकांना, मग ते काळे असो वा गोरे, भारतात असो वा अजून कुठे दाबून ठेवले जावे या गोष्टीचे महान फ्रेंच समाज कधीही समर्थन करणार नाही.

प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ६०-३

१५. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १०, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर १०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण मिराबाईप्रमाणे केवळ ईश्वराचे सेवक झालो तर आपला सर्व त्रास संपून जाईल. (म्हने चाकर राखोजी या मिराबाईच्या भजनाचा इथे संदर्भ आहे. प्रार्थनेत हे भजन म्हणण्यात आले होते.) मी जे काही आता सांगणार आहे ते ऐकल्यानंतर याचे महत्त्व तुमच्या लक्षात येईल. तुम्ही वृत्तपत्रांमध्ये जुनागढसंबंधी ऐकलेच असेल. (भारत सरकारने जारी केलेल्या प्रेसविज्ञप्तीनुसार राजकोटच्या विभागीय आयुक्तांकडे मेजर हार्वे जोन्स यांनी जुनागढच्या दिवाणचे पत्र दिले. जुनागढचे प्रशासन आपल्या हातात घ्यावे अशी त्यात भारत सरकारला विनंती करण्यात आली होती. संस्थानातील संपूर्ण शासनव्यवस्था कोलमडू नये म्हणून ही विनंती करण्यात आली होती. भारत सरकारने जुनागढच्या संस्थानाचे प्रशासन नोव्हेंबर ९ला आपल्या हातात घेतले. जुनागढ शहरात भारतीय सैन्य सायंकाळी ६ वाजता शिरले.) वृत्तपत्रातील बातमी अगदी बरोबर आहे असे सांगणाऱ्या दोन तारा मला मिळाल्यानंतर माझे समाधान झाले. जुनागढचे प्रधानमंत्री शाह नवाझ भुट्टो आणि नबाब कराचीत आहेत. उपप्रधानमंत्री मेजर हार्वी जोन्स जुनागढमध्ये आहेत. भारतीय संघराज्यातील जुनागढच्या सामिलीकरणाकरता हे सर्व जबाबदार आहेत. या सगळ्या गोष्टींवरून कायदे आझम जिनांनीसुद्धा जुनागढच्या भारतातील सामिलीकरणाला मान्यता दिली आहे असा अर्थ होतो. जर असे असेल तर काश्मीर आणि हैद्राबाद (हैद्राबात प्रभुत्वसंपन्न स्वतंत्र राज्य व्हावे अशी निझामची इच्छा होती व त्यांनी भारतात विलीन होण्याकरिता नकार दिला. भारत सरकार व निझाम यांच्यात दूत स्तरावर प्रदीर्घ काळ वाटाघाटी सुरू होत्या. वाटाघाटी सुरू असतानाच्या काळाचा उपयोग निझामने युरोपमधून शस्त्रांची आयात करून आपली सैनिकशक्ती वाढवण्याचा प्रयत्न केला.) येथील अडचणीसुद्धा लवकरत दूर होतील. आणि मी तर इतकेसुद्धा म्हणेन की आता शांततेकडे कल राहील. दोन्ही उपनिवेशांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण होतील व ते एकमेकांशी सहकार्य करून काम करतील. महाराज्यपाल म्हणून मी कायदे आझमचा विचार करत नाही, महाराज्यपाल म्हणून पाकिस्तानच्या कामात हस्तक्षेप करण्याचा त्यांना कोणताही कायदेशीर अधिकार नाही. महाराज्यपाल म्हणून कायदे आझम यांची तीच स्थिती आहे जी भारतात लॉर्ड माऊंटबॅटन यांची आहे. माऊंटबॅटन केवळ घटनात्मक महाराज्यपाल आहेत. माऊंटबॅटन अशा व्यक्तीच्या विवाहाकरिता गेले आहेत की जी त्यांना मुलापेक्षाही अधिक आहे त्या मुलाची वाग्वधू ही इंग्लंडची भावी राणी आहे. त्यांना तिथे मंत्रिमंडळाची परवानगी घेऊनच जाता आले व ते नोव्हेंबर २४, १९४७ला परतणार आहेत.

यामुळे माझ्या मते जिना हे सध्याच्या मुस्लिम लीगला घडवणारे आहेत आणि त्यांच्या मंजुरीशिवाय आणि माहितीशिवाय पाकिस्तानमध्ये काहीही करता येऊ शकत नाही. यामुळे जुनागढला भारतात सामील होऊ देण्यात जिनांचा हात असावा असे मला वाटते. आणि तसे असेल तर हा एक शुभशकून आहे.

माझ्या पानीपतच्या भेटीबद्दल मी तुम्हाला काही सांगू इच्छितो. माझ्याबरोबर मौलाना अबुल कलाम आझादही होते. राजकुमारीसुद्धा माझ्याबरोबर येईल अशी अपेक्षा होती. परंतु त्या शासकीय गृहात होत्या आणि मी माझ्या घड्याळाप्रमाणे साडेदहापलीकडे त्यांची वाट पाहू शकत नव्हतो. मी पानिपतला गेलो याचा मला आनंद होतो. तेथील रुग्णालयात मी मुसलमान रुग्ण पाहिले. (गांधीजी प्रत्येक रुग्णाजवळ काही मिनीट थांबले. काही वेळा त्यांनी रुग्णावर नीट पांघरूण घातले.) त्यांच्यातील काहींना अतिशय गंभीर जखमा झाल्या होत्या. परंतु त्यांच्याकडे शक्य तितके चांगल्यात चांगले लक्ष पुरवले जात आहे कारण राजकुमारीने तिथे चार डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय मदतनिसांना पाठवले आहे. यानंतर आम्ही मुसलमान, स्थानिक हिंदू आणि निर्वासितांच्या प्रतिनिधींना भेटलो. पानीपतमध्ये २०,०००पेक्षा जास्त निर्वासित आहेत. त्यात अजून अजून निर्वासितांची दररोज भर पडत असल्यामुळे त्यात गंभीर धोका लपलेला आहे अशी भीती उपायुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना वाटते. या अधिकाऱ्यांची हिंदू आणि मुसलमान स्तुती करत असलेले पाहून मला आनंद झाला. आणि निर्वासिंतांबद्दल बोलायचे तर त्यांची कोणतीही तक्रार नव्हती. त्यांना तर त्यांच्यामुळे समाधानच वाटते.

नगरपालिका भवनजवळ गोळा झालेल्या निर्वासितांनासुद्धा आम्ही भेटलो. पाकिस्तानमध्ये आणि पानिपत येथील अनियमित जीवनात निर्वासितांना भयानक अडचणींना तोंड द्यावे लागले होते आणि अजूनही द्यावे लागते. त्यांच्यातील काहींना रल्वेच्या फलाटावर राहावे लागत आहे तर अनेकांना उघड्या आकाशाखाली. तरीही त्यांच्या चेहऱ्यावर कोणताही राग न दिसल्यामुळे मला आनंद झाला. आम्ही तिथे गेलो याचा त्यांना फार आनंद झाला. पानीपतचे उपयुच्चायुक्तांना वा तेथील लोकांना न कळवता तिथे इतके निर्वासित भरणे हा मला अधिकाऱ्यांचा निर्दयपणा वाटला. पानीपतच्या अधिकाऱ्यांना निर्वासितांची संख्या तेव्हा कळली जेव्हा आगगाड्या फलाटावर येऊन थांबल्या होत्या. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. पानीपत येथील निर्वासितांमध्ये स्त्रिया, मुले आणि वयस्कर लोक आहेत. त्यातील काही स्त्रियांचे रेल्वेच्या फलाटावरच बाळांतपण झाल्याचे मला सांगण्यात आले.

हे सर्व पूर्व पंजाबमध्ये होत आहे जिथे डॉ. गोपीचंद (गोपीचंद भार्गव) मुख्यमंत्री आहेत. डॉ. गोपीचंद हे माझे सहकार्यकर्ते होते. मला त्यांच्याबद्दल फार आदर आहे. वर्षांपासून मी त्यांना एक चांगला संयोजक म्हणून ओळखतो आणि त्यांचा पंजाबी लोकांवर फार प्रभाव आहे. हरिजन सेवक

संघ, अखिल भारतीय चरखा संघ अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ यांच्याकरिता त्यांनी भरपूर काम केले आहे. पूर्व पंजाबचे काम त्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे असे मला वाटत नाही. परंतु पानीपत हा जर त्यांच्या कार्यक्षमतेचा नमुना असेल तर सरकारकरिता ही फार लाजिरवाणी गोष्ट आहे. कोणतीही सूचना न देता पानीपत येथे इतके जास्त निर्वासित का पाठवण्यात आले? याशिवाय काल मला माहिती मिळाली की गुडगावमध्ये तीन लाख असे मुसलमान आहेत की जे घाबरून आपले घर सोडून पळाले आहेत. ते रस्त्याच्या दोन्ही बाजूला उघड्यावर पडलेले आहेत आणि बायका, मुले, जनावरे यांच्यासह पंजाबच्या या कडाक्याच्या थंडीत ते ३०० मैलांचा रस्ता कापू इच्छितात. माझा या गोष्टीवर विश्वास बसत नाही. मला वाटते की माझ्या मित्रांनी मला जे सांगितले त्यात काही चूक असावी. अजूनही मला आशा आहे की एक तर ही माहिती चुकीची असावी वा तिच्यात भरपूर अतिशयोक्ती असावी. परंतु पानीपतला मी जे पाहिले त्यामुळे अशा गोष्टींवर जो माझा विश्वास नव्हता त्याला धक्का लागला. इतकेच नाही तर डॉ. गोपीचंद आणि त्यांचे मंत्रिमंडळ वेळ राहताच या धोक्याच्या सूचनेपासून धडा घेतील आणि निर्वासितांची योग्य व्यवस्था होईपर्यंत विश्रांती घेणार नाहीत अशी मला आशा आहे. अशा प्रकारची व्यवस्था दूरदृष्टीने आणि अतिशय काळजीपूर्वकतेनेच करता येऊ शकते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ६३-८

१६. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ११, १९४७

नोव्हेंबर ११, १९४७

जुनागढ संस्थानाचे प्रधानमंत्री (शाह नवाझ भुट्टो) आणि उपप्रधानमंत्री (मेजर हार्वी जोन्स) यांच्या विनंतीनुसार जुनागढच्या तात्पुरत्या सरकारने जुनागढ संस्थानात प्रवेश केला आहे. ही बातमी सांगताना मला आश्चर्यही वाटले आणि आनंदही झाला. जुनागढच्या लोकांच्या आणि त्यांच्यातर्फे सुरू असलेल्या लढ्याच्या इतक्या सुखद परिणामांची व लढ्याच्या अशा अंताची मला अपेक्षा नव्हती. (भारत सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या विज्ञप्तीत सांगण्यात आले होते की "राजकोटच्या विभागीय आयुक्तांकडे मेजर हार्वी जोन्स जुनागढच्या दिवाणचे पत्र घेऊन गेले होते. जोपर्यंत जुनागढच्या सामिलीकरणासंबंधीच्या अनेक वादांवर सन्माननीय तोडगा निघत नाही तोपर्यंत संस्थानाची प्रशासनिक व्यवस्था बंद पडू नये म्हणून भारत सरकारने जुनागढचे प्रशासन आपल्या हाती घ्यावे अशी विनंती भारत सरकारला पत्रातून करण्यात आली होती.) मी अशीही भीती व्यक्त केली होती की जुनागढच्या अधिकाऱ्यांच्या विनंतीमागे कायदे आझम जिना यांची मान्यता नसेल तर आतापासून आनंद मानण्याला अर्थ नसेल. जुनागढच्या जनतेतर्फे तात्पुरत्या सरकारने जुनागढचा जो ताबा घेतला आहे त्याला पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी विरोध केला आणि "भारतीय सैन्य जुनागढच्या सीमेबाहेर काढून घेण्यात यावे आणि तेथील प्रशासन तेथील अधिकृत सरकारला सोपवण्यात यावे व भारतीय जनतेद्वारे संस्थानावर जे हल्ले होत आहेत ते थांबवण्यात यावे" अशी मागणी केली आहे हे कळल्यामुळे तुम्हाला दुःखही होईल आणि आश्चर्यही वाटेल. त्यांचे असेही म्हणणे आहे की जुनागढच्या नबाबांना वा दिवाणला स्थायी वा तात्पुरती तडजोड करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. पाकिस्तानच्या म्हणण्यानुसार भारत सरकारची कृती "स्पष्टपणे पाकिस्तानच्या सीमेचे व आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणारी आहे".

काल वृत्तपत्रात जे वृत्त आले होते ते पाहता मला यात ना तर आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग दिसतो ना ते संस्थान ताब्यात घेण्याचा संघराज्याचा प्रयत्न दिसतो. जोपर्यंत मला कळते जुनागढच्या जनतेच्या तात्पुरत्या सरकारने जे आंदोलन केले त्यात मला कोणतीही बेकायदेशीर गोष्ट दिसत नाही. हे खरे आहे की काठेवाडच्या राजांच्या विनंतीप्रमाणे संपूर्ण काठेवाडच्या संरक्षणाकरिता संघराज्याच्या सरकारने सैन्य पाठवले. यामुळे या कार्यवाहीतसुद्धा मला बेकायदेशीर काही दिसत नाही. याउलट जुनागढच्या दिवाणने जाहीरपणे आपले मत बदलून जे काही केले ते बेकायदेशीर होते. या प्रकरणाकडे मी या दृष्टीने पाहतो - जुनागढच्या नबाबसाहेबांनी आपल्या प्रजेच्या मान्यतेशिवाय, ज्यात ८५ टक्के हिंदू आहेत असे मला सांगण्यात आले आहे, (जुनागढच्या नबाबांनी भारतात सामील होण्याला

मान्यता दिली होती. नंतर त्यांनी आपला निर्णय मागे घेतला आणि ते पाकिस्तानमध्ये पळून गेले आणि तिथे गेल्यानंतर त्यांनी पाकिस्तानमध्ये जुनागढ संस्थान सामील होण्यासंबंधीच्या दस्तावेजावर सही केली. त्या दस्तावेजाच्या आधारावर पाकिस्तानमध्ये जुनागढ विलीन झाल्याची घोषणा करण्यात आली. ज्या परिस्थितीत हे विलीनीकरण करण्यात आले होते त्या परिस्थितीमुळे भारत सरकराने हे विलिनीकरण मान्य केले नाही.) गिरनारचा पवित्र पर्वत आणि तेथील सर्व मंदिर हे सर्व जुनागढचा भाग आहेत. त्यावर हिंदूंनी किती तरी पैसा खर्च केला असून दरवर्षी किती तरी लोक गिरनारच्या यात्रेवर जात असतात. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संपूर्ण देशावर जनतेचा अधिकार आहे. त्यातील इंचाइतका भागसुद्धा संस्थानिकांची खाजगी मालमत्ता नाही. ते आपला दावा जनतेचे विश्वस्त बनूनच करू शकतात आणि यामुळेच त्यांनी जी कृती केली आहे तिला जनतेचा पाठिंबा आहे याचा त्यांनी पुरावा दिला पाहिजे. हे खरे आहे आहे की आपण जनतेचे विश्वस्त आणि प्रतिनिधी आहो हे अजून संस्थानिकांना कळलेले नाही. आणि हेसुद्धा खरे आहे की काही संस्थानांतील काही जागृत नागरिक वगळता संस्थानांच्या सर्व लोकांनासुद्धा आपणच आपल्या संस्थानाचे खरे मालक आहो हे कळलेले नाही. परंतु यामुळे मी सांगितलेल्या तत्त्वाचे मूल्य कमी होत नाही.

यामुळे दोनपैकी कोणत्या देशात सामील व्हावे हे ठरवण्याचा अधिकार प्रत्येक संस्थानाच्या जनतेलाच आहे. तत्कालीन सरकार जर जुनागढच्या जनतेचे कोणत्याही पातळीवर प्रतिनिधित्व करत नसेल तर तत्कालीन सरकार अशा लोकांचा समूह असेल की ज्याने जुनागढ संस्थानातील सत्ता अधिकार नसताना अन्यायाने बळकावली. त्यांना दोन्ही देशाच्या सरकारांनी काढून टाकले पाहजे. कोणताही संस्थानिक आपल्या वैयक्तिक पातळीवर कोणत्याही एका उपनिवेशात सामील होत असेल तर त्या उपनिवेशाला जगासमोर आपल्या कृत्याचे समर्थन करता येणार नाही. या दृष्टिकोनातून जोपर्यंत नबाबांच्या सामिलीकरणाच्या कृतीचे लोक समर्थन करतात असे सिद्ध होत नाही तोपर्यंत अगदी सुरुवातीपासूनच ती कृती निराधार होती असे म्हणावे लागेल. जुनागढने कोणत्या राज्यात सामील व्हावे हे केवळ जनमताच्या आधारानेच म्हणजे सार्वमतानेच ठरवता येऊ शकते. हे काम योग्य पद्धतीने झाले पाहिजे व त्यात हिंसा वा हिंसक प्रदर्शनाचा उपयोग होऊ नये. पाकिस्तान सरकारने आणि आता जुनागढच्या प्रधानमंत्र्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तान बरोबर आहे की संघराज्य सरकार बरोबर आहे हे कोण ठरवील? ही गोष्ट तलवारीच्या साहाय्याने ठरवता येऊ शकते याचा कोणी विचारही करणार नाही. ही बाब लवादामार्फत ठरवणे हाच यावर एकमेव उपाय आहे. आपल्याला आपल्या देशातच अनेक निष्पक्ष व्यक्ती सापडू शकतात परंतु संबंधित पक्ष भारतीय लवाद मान्य करू शकत नसतील तर जगातील कोणत्याही भागातील कोणत्याही निष्पक्ष व्यक्तीला लवाद म्हणून स्वीकारण्यात वैयक्तिक पातळीवर माझी हरकत नाही.

मी जे जुनागढबद्दल म्हणालो तेच काश्मीर (ऑक्टोबर २३ला काही दोन हजार वा अधिक आफ्रिदी आणि इतर काही कबिलेवाले लोक काश्मीर संस्थानात घुसले व त्यांनी लूटमार, जाळपोळ आणि हत्याकांड करण्याकरिता सुरुवात केली. संस्थानामध्ये आणीबाणीची गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे जम्मू आणि काश्मीरचे महाराज हरिसंग यांना भारतीय संघराज्याकडे सैनिकी मदतीकरिता विनंती केली व ऑक्टोबर २७ला सामिलीकरणाच्या दस्तावेजावर सही केली.) आणि हैद्राबादलाही (निझामची इच्छा होती की हैद्राबाद स्वतंत्र प्रभुत्वसंपन्न राज्य असावे व त्यामुळे त्यांनी भारतीय संघराज्यात सामील होण्याकरिता नकार दिला. भारत सरकार आणि निझाम यांच्यात दीर्घकाळ वाटाघाटी झाल्यानंतर छतारीच्या नबाबांच्या प्रतिनिधीमंडळाने २२ ऑक्टोबरला यथास्थिती कायम ठेवण्याचा करार केला. असे असूनही मंत्रिमंडळयाच्या सल्ल्याच्या विरोधात जाऊन निझामनी त्या प्रतिनिधिमंडळाच्या ठिकाणी २९ ऑक्टोबरला दुसरे प्रतिनिधीमंडळ नेमले. पाहा एका पत्रातील अंश नोव्हेंबर, २६, १९४७) तितक्याच प्रमाणात लागू होते. ना तर काश्मीरच्या महाराजांना ना हैद्राबादच्या निझामना जनतेच्या संमतीशिवाय कोणत्याही एका उपनिवेशात सामील होण्याचा अधिकार आहे. मला जोपर्यंत माहीत आहे हा मुद्दा काश्मीरच्या प्रकरणी स्पष्ट करण्यात आला होता. (जम्मू आणि काश्मीरचे भारतातील सामिलीकरण मान्य करत असताना भारत सरकारने "स्पष्ट केले होते की घूसखोरांना काश्मीरच्या भूमीवरून हाकलून लावल्यानंतर शक्य तितक्या लवकर संस्थानातील लोक काश्मीरच्या सामिलीकरणासंबंधी निर्णय घेतील".) जर केवळ महाराजांची इच्छा भारतीय संघराज्यात सामील व्हावे अशी असेल तर अशा कृतीचे मी कधीही समर्थन केले नसते. भारतीय संघराज्याने हे सामिलीकरण तात्पुरते मान्य केले कारण महाराज आणि शेख अब्दुल्ला (शेख मोहम्मद अब्दुल्ला, १९०५-८२, अखिल भारतीय संस्थानातील जनतेच्या परिषदेचे अध्यक्ष, अध्यक्ष जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स. काश्मीरचे भारतात सामिलीकरण झाल्यानंतर त्यांनी जम्मू आणि काश्मीरच्या आपत्कालीन प्रशानाचे प्रमुख म्हणून ऑक्टोबर ३१, १९४७ला शपथ घेतली होती.) जे जम्मू आणि काश्मीरच्या जनतेचे प्रतिनिधी आहेत, या दोघांचीही तशी इच्छा होती. शेख अब्दुल्ला पुढे आले कारण आपण काश्मीरमधील केवळ मुलमानांचेच नाही तर सर्व जनतेचे प्रतिनिधित्व करतो असा त्यांचा दावा होता.

काश्मीरची फाळणी होऊ शकते व जम्मू हिंदूंकडे येईल आणि मुसलमानांना काश्मीर मिळेल अशी कुजबुज लोक करत आहेत असे मी ऐकले आहे. भारतीय संस्थानांची अशी विभाजित निष्ठा आणि विविध भागात फाळणी यांची मी कल्पनाही करू शकत नाही. यामुळे मी आशा करतो की किमान त्या लाखो लोकांकरिता ज्यांना निर्वासित होणे भाग पडले आहे, संपूर्ण भारत समंजसपणाने वागेल व दुर्दैवी परिस्थिती टाळेल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, १९४७

१७. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १२, १९४७

नोव्हेंबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज दिवाळीचा दिवस आहे यामुळे मी तुम्हा सर्वांचे अभिनंदन करतो. आपल्या हिंदू वर्षाचा हा फार मोठा दिवस आहे. विक्रम संवतप्रमाणे उद्या गुरुवारपासून नवीन वर्ष सुरू होईल (गुजराती पंचांगप्रमाणे). दरवर्षी दिवे लावून दिवाळी का करण्यात येते हे तुम्हाला कळले पाहिजे. रामरावणाच्या महान युद्धात राम चांगुलपणाच्या शक्तीचे प्रतीक होता तर रावण वाईट शक्तीचा. रामाने रावणावर विजय मिळवला व भारतात रामराज्य स्थापन केले.

परंतु दुर्दैव! आज भारतात रामराज्य नाही. मग आपण दिवाळी कशी साजरी करणार? ज्याच्या मनात राम आहे तोच माणूस हा सण साजरा करू शकतो, कारण रामच आपल्या आत्म्याला प्रकाश देऊ शकतो आणि तोच खरा राम असतो. आज जे भजन ("आमचे अंतःकरण प्रकाशित कर आणि तेथून वाईट विचार आणि क्रोध घेऊन जा", आश्रम भजनावली २५१, डिसेंबर १३, १९३०) म्हणण्यात आले त्यात कवीच्या (रणछोड) ईश्वरदर्शनाच्या इच्छेवर जोर देण्यात आला आहे. लोकांच्या झुंडी दिव्यांची रोषणाई पाहायला जातात परंतु आज आपल्याला ज्या प्रकाशाची आवश्यकता आहे तो तर प्रेमाचा प्रकाश आहे. आमच्या अंतःकरणातून प्रेमाचा प्रकाश निर्माण झाला पाहिजे तेव्हा कुठे सर्व लोक अभिनंदनाकरिता पात्र ठरतील. आज आपले लाखो लोक दुःखी आहेत. प्रत्येक दुःखी व्यक्ती, मग ती पुरुष असो, स्त्री असो वा हिंदू, शीख, मुसलमान कोणीही असो माझा सख्खा भाऊ अथवा बहीण आहे असे तुमच्यापैकी कोणी छातीवर हात ठेवून म्हणू शकेल काय? ही तुमची परीक्षा आहे. राम आणि रावण हे चांगुलपण आणि वाईटपण यांच्यातील अविरत संघर्षाचे प्रतीक आहेत. खरा प्रकाश अंतःकरणातून येत असतो.

काल जखमी काश्मिरी माणसाला पाहून पंडित जवाहरलाल नेहरू किती व्यथित होऊन गेले होते! काल त्यांना कार्यकारिणीच्या सभेत हजर राहणे शक्य झाले नाही आणि आज दुपारीसुद्धा. त्यांनी बारामुल्लाहून काही फुले आणली होती. (आक्रमकांनी क्रूरपणे हल्ला केल्यानंतर भारतीय सैनिकांनी ते शहर परत काबीज केले होते.) मला निसर्गाच्या अशा देणग्या पाहून नेहमीच आनंद होत असतो. परंतु आज लूट, जाळपोळ आणि रक्तपात यांनी त्या सुंदर भूमीच्या सौंदर्याचा विध्वंस केला आहे. जवाहरलाल जम्मूमध्येसुद्धा गेले होते. तिथेसुद्धा सर्व काही चांगले नाही.

सरदार पटेल यांना श्री श्यामलदास गांधी आणि ढेबरभाई (यू. एन. ढेबर, राजकोट गिरणी कामगार मझदूर संघाचे संघटक, सौराष्ट्रात मंत्री १९४८, अध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १९५५-५९, अनुसूचित जमातीच्या भागाचे अध्यक्ष, १९६२ साली लोकसभेवर निवडून गेले. अध्यक्ष भारतीय आदिम जाती संघ १९६२-६४) यांच्या विनंतीवरून जुनागढला जावे लागले. त्यांना सरदार पटेल यांचा सल्ला हवा होता. जिना आणि भुट्टो हे दोघेही संतापलेले आहेत आणि त्यांना वाटते की भारत सरकारने त्यांना फसवले आहे व जुनागढवर विलीनीकरणाकरिता दडपण आणत आहेत.

संपूर्ण देशात शांतता आणि सद्भावना निर्माण होण्याकरिता आपल्या मनातून घृणा आणि संशय काढून टाकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जर तुम्ही आपासातील लहानलहान भांडणे विसरणार नाही तर काश्मीर आणि जुनागढचा विजय व्यर्थ जाईल. जोपर्यंत भीतीमुळे पळून गेलेल्या मुसलमानांना आपण भारतात परत आणत नाही तोपर्यंत खरी दिवाळी साजरी करता येत नाही. पाकिस्तानने जर तेथील हिंदू आणि शिखांबरोबर असे केले नाही तर तो जिवंत राहू शकणार नाही. (यानंतर गांधीजींनी प्रक्षेपण गृहाला दिलेल्या भेटीबद्दल उल्लेख केला.)

उद्या मला काँग्रेस कार्यकारिणीसंबंधी जे काही सांगता येणे शक्य होईल ते सांगेन. गुरुवारी सुरू होणाऱ्या नववर्षात तुम्ही आणि सर्व भारत सुखी होवो आणि ईश्वर तुमची अंतःकरणे प्रकाशित करो. म्हणजे त्या प्रकाशात तुम्हाला परस्परांचीच नाही, संपूर्ण भारताचीच नाही तर संपूर्ण जगाची सेवा करता यावी.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, ६९-७१

१८. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १३, १९४७

नोव्हेंबर १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल दिवाळी होती आणि आज नवीन वर्षाचा पहिला दिवस आहे. काल मी याचा आधीच उल्लेख केला होता. मी ऐकले आहे आणि काल रात्री तर अजूनच जोरात ऐकले की दिल्लीत मुंबईप्रमाणेच जोरदार रोषणाई होते आणि कदाचित मुंबईपेक्षाही जास्त होत असेल. मुंबईत तर फार मोठी रोषणाई होते. परंतु आज रोषणाई करण्याचा दिवस नाही हे लोकांना कळले हे पाहून मला आनंद झाला. परंतु तरीही दिवाळी आहे तर काही ना काही दिवे लावलेच पाहिजे असा भ्रम लोकांमध्ये निर्माण झाला आहे. यामुळे काही ठिकाणी तेलाचे थोडे दिवे जळत होते आणि विजेचे दिवेही होते. परंतु फार कमी. मी घरातून बाहेर तर जात नाही परंतु तरीही कळतेच.

आजपासून नवीन वर्षाची सुरुवात होते. याचा मी काल उल्लेख केला होता. परंतु आज मी याचा परत उल्लेख करणे चांगलेच राहील. नववर्षाच्या दिवशी आपण काही शुभ चिंतन वा काही शुभ निर्धार करतो आणि ईश्वराची कृपा असली तर आपण वर्षभर त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतो. आपण जर असे केले आणि आजचे वातावरण बदलले व हिंदू आणि मुसलमान एकोप्याने राहू लागले तर पुढील दिवाळी रोषणाई करून साजरी करण्याचा आपल्याला अधिकार असेल. परस्परांना शत्रू लेखून आपण काहीही मिळवणार नाही. यामुळेच मी म्हणालो होतो की आज तर ही बाह्य दिवाळी साजरी करण्याची वेळच नाही. परंतु आपल्या मनात जी ज्योत तेवते आहे ती बाहेर अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. आपल्या अंतःकरणात राम आहे आणि तिथे रामरावणाचे युद्ध अविरत सुरू असते. आपल्या अंतःकरणात जर रामावर रावणाने विजय मिळवला तर याचा अर्थ आपल्या अंतःकरणात प्रकाश नाही तर केवळ काळोख आहे. परंतु जर रामाने रावणावर विजय मिळवला तर याचा अर्थ आपल्या अंतःकरणात खरोखरच प्रकाश आहे आणि यामुळे आपल्याला बाह्य रोषणाई करण्याचासुद्धा अधिकार मिळतो. अशा प्रकारे आतील प्रकाशाचे जर बाह्य प्रकाश प्रतीक असेल तर सर्व काही चांगले आहे. उलटपक्षी आपल्या अंतःकरणात जर काळोख असेल आणि आपण बाह्य रोषणाई करून सर्व काही चांगले आहे अशी स्वतःची समजूत घालण्याचा प्रयत्न केला तर आपण ढोगी आणि खोटारडे ठरू. आम्ही कधीही खोटारडे होणार नाही इतकीच मी आशा करतो.

काल मी तुम्हाला सांगितले होते की काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेबद्दल मी तुम्हाला काही तरी सांगेन. काल मला वेळ नव्हता कारण मी १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेऊ शकत नाही. आज काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेचा तिसरा दिवस आहे. अजूनही ती सुरू आहे. एक महत्त्वाची गोष्ट मला तुम्हाला

सांगायचा अधिकार आहे. आज तीन दिवसांपासून कार्यकारिणीचे लोक आणि आचर्य कृपलानींनी (जे. बी. कृपलानी, १८८८-१९८२; प्राचार्य गुजरात विद्यापीठ १९२०-२७; भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महासचिव, १९३४-४५; घटनासमितीचे सदस्य; तिचे अध्यक्ष १९४६-४७; कृषक मझदूर प्रजा पक्ष काढला व नंतर तो प्रजा समाजवादी पक्षात विलीन झाला; १९५४साली प्रजा समाजवादीपक्षातून राजीनामा दिला.) विशेषत्वाने आमंत्रित केलेले इतर लोक (काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेत खालील लोकांना विशेषत्वाने आमंंत्रित करण्यात आले होते - बी. जी. खेर, पट्टाभी सीतारामैय्या, एस. के. पाटील, जयप्रकाश नारायण, कामराज नादर, डॉ. सैफुद्दिन किचलू आणि प्रा. एन.जी रंगा.) हे सर्व सभेत तीन दिवसांपासून एकत्र बसलेले आहेत. सर्वांना मान्य आहे की काँग्रेस कोणत्याही धर्माचा प्रचार करणारी संस्था नाही. काँग्रेसमध्ये सर्व धर्माचे लोक आहेच वा असे म्हणा की काँग्रेस सर्व धर्मांची आहे आणि म्हणूनच ती कोणत्याही धर्माची नाही. ती सर्व लोकांची संस्था आहे आणि तिने राजकीय उद्दिष्टांच्या पूर्तीकरिताच काम करायचे आहे. ती जर या पद्धतीने काम करील तर ती धार्मिक संथा राहणार नाही. समजा प्रत्येकाला खाण्याकरिता मिळाले पाहिजे असे काँग्रेसचे धोरण आहे. आणि तसे असेल तर आपल्या नावाला सार्थ करण्याकरिता तिला सर्वांच्या खाण्याची व्यवस्था करावी लागेल. काँग्रेस जर तिच्या बरोबर असणारांना वा असे म्हणा की हिंदू आणि शिखांनाच अन्न पुरवते कारण त्यांचे बहुमत आहे व इतरांची उपासमार होऊ देत असेल व आम्हाला तुमची फिकीर करण्याचे कारण नाही असे म्हणत असेल तर ती वरवर पाहता धार्मिक संसथा होईल परंतु खऱ्या अर्थाने ती अधर्माचरण करणारी संस्था होईल. ती जर तिला अनुसरणांचीच सेवा करणार असेल आणि इतरांना मारून टाकण्याची तिची इच्छा असेल तर तो धर्म नसेल, धर्माच्या नावावरील अधर्म असेल.

मी जर रामभक्त असेन आणि इतर कोणत्याही देवाची भक्ती करत नसेन तर तसे करण्याकरिता कायदा माझ्यावर बळजबरी करू शकत नाही. ही गोष्ट वेगळी की मी स्वतःच माझ्या धर्मानुसार वागत नसेन वा त्या अमूक एका माणसाजवळ तलवार आहे आणि मी त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागलो नाही तर तो मला मारून टाकील असे मी घाबरून म्हणत असेन. परंतु मी जर भित्रा नसेन आणि रामाऐवजी अल्लाची भक्ती करण्याकरिता कोणी माझ्यावर बळजबरी करत असेल तर मी अल्लाची नाही तर रामाचीच भक्ती करीन असे मी म्हणायला पाहिजे आणि असे म्हणण्याचा मला अधिकार आहे. समोरचा माणूस जास्तीतजास्त माझा गळा कापू शकतो. त्याला तसे करू द्या. हा श्रद्धेचा प्रश्न आहे. यालाच आपण माणसाचा व्यक्तिगत धर्म म्हणतो. जगात अशी कोणतीही शक्ती नाही की जी माणासाचा व्यक्तिगत धर्म नष्ट करू शकते. माणसाची स्वतःचीच तो धर्म सोडण्याची जर इच्छा असेल तर तो अर्थातच तसे करू शकतो. वा जेव्हा त्याच्या अंतःकरणात प्रकाशाऐवजी केवळ काळोख असेल तेव्हाही तो असे करू शकतो. अशा परिस्थितीत त्याला जेव्हा काही सुचत नाही व चोहोबाजूला

काळोख पसरलेला असल्यामुळे तो दुसऱ्याची मदत घेतो वा इतर कोणाच्या तरी मार्गदर्शनाप्रमाणे चालतो. परंतु जो माणूस आपल्या श्रद्धेवर अढळ असतो तो केवळ ईश्वराची आज्ञा ऐकेल, इतर कोणाचीही नाही. याचप्रमाणे जेव्हा संघटना लोककल्याणाकरिता काम करते तेव्हा तिला आपल्या धर्माला सुसंगत असेल असेच वर्तन करावे लागते, इतर कोणतेही नाही. आणि अशा प्रकारे ती धर्माचे संवर्धन करते, अधर्माचे नाही. माझ्या मते राजकारणाचा हा खरा अर्थ आहे आणि काँग्रेसने आपल्या स्थापनेपासून त्याचे अनुसरण केले आहे. तुम्ही काँग्रेसचे असा वा असू नका परंतु काँग्रेसच्या या वर्तनाबद्दल तुम्हाला आनंद झाला पाहिजे. मीसुद्धा काँग्रेसचा नाही. म्हणून काय झाले? मी काँग्रेसचा कार्यकर्ता होतो आणि मी तिची सेवा केली आहे. मी चार आणे सदस्यशुल्क देत नाही म्हणून काय झाले? मला जर अध्यक्ष व्हायचे असेल तर मी चार आणे सदस्यशुल्क दिलेच पाहिजे. परंतु तो प्रश्न नाही. तुम्ही सर्व जर माझ्याप्रमाणे विचार करत असाल तर ती फार मोठी गोष्ट होईल. तीन दिवसांपासून मी काँग्रेस महासमितीच्या बैठकीत बसलो आहे. कार्यकारिणीत अनेक मतभेद आहेत. अखेरीस काँग्रेसचे सदस्यही माणूस आहेत, ते काही दगड नाहीत. एक सदस्य एक गोष्ट सांगतो तर दुसरा दुसरी. मतभेद असू शकतात परंतु वर्तनात विरोध नसावा. यामुळे या मतभेदांची चर्चा करण्याकरिता ते तीन दिवस बसले. परंतु काँग्रेस आजपर्यंत जशी होती तशीच राहावी याबद्दल त्यांचे एकमत होते. या प्रक्रियेत जर ती नष्ट होणार असेल तर नष्ट होऊ द्या. ती कदाचित अल्पमतात जाऊ शकेल परंतु ती पूर्णपणे नष्ट मात्र होऊ शकत नाही. आणि सध्यासुद्धा ती बहुमतात आहे याबद्दल मला शंका आहे. जर काँग्रेसचे बहुमत असते तर पाकिस्तान झाले नसते. भारतात मुसलमानांवर किती अत्याचार करण्यात आले आहेत याची मी अनेक उदाहरणे दाखवू शकेन. परंतु मी काय म्हणू? माझ्यापेक्षाही तुम्हाला जास्त माहीत आहे. पाकिस्तानमध्ये हिंदू आणि शिखांचा कमी छळ झालेला आहे काय? परंतु आपण त्याबद्दल बोलू नये. त्या गोष्टींचा आपण विचार करण्याचे कारण नाही. जगातील इतर लोक आपल्या धर्माचे पालन करत नाहीत म्हणून मी माझ्या धर्माचे पालन करू नये काय? यामुळेच काँग्रेसने आपल्या मूळ धर्माचे पालन केले पाहिजे, मग त्यामुळे ती बहुमतात राहो की अल्पमतात. याच दृष्टीने ती आपल्या ठरावांची रचना करत आहे. ती आपला दृष्टिकोन सरळ आणि प्रामाणिक पद्धतीने मांडू इच्छिते. एकाही मुसलमानावर बळजबरी करून त्याला पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता भाग पाडण्याची आमची इच्छा नाही. मुसलमान चांगले आहेत की वाईट हा प्रश्न इथे उपस्थित होत नाही. भारतात केवळ देवदूत राहतात असे आपण म्हणू शकतो काय? आणि देवदूत जरी नसतील तरी इथे केवळ जे चांगले आणि सज्जन लोक आहेत तेच इथे राहू शकतात काय? आणि जर केवळ चांगले लोक इथे राहू शकत असतील तर हिंदू आणि शिखांमध्ये वाईट लोक नाहीत काय? आणि जर असतील तर त्यांच्याबद्दल काय म्हणाल? इथून निघून जा आणि आमचे ऐकले नाही तर तलवारीने तुमचा गळा छाटून टाकू असे त्यांना म्हणाल

काय? कोणालाही दुष्ट समजण्याचा वा मारून टाकण्याचा तुम्हाला अधिकार नाही. आपण मुसलमानांवर अत्याचार केले आहेत. मला दररोज जे अहवाल मिळतात त्यात अतिशयोक्ती असू शकते. परंतु अखेरीस त्या वृत्तांमध्ये सत्य असल्याचे मला आढळले. काँग्रेसच्या नावावर जेव्हा कहीही केले जाते तेव्हा अखिल भारतीय काँग्रेस कमेटीची सभा बोलावली जाते. काँग्रेसचे अधिवेशन वर्षातून एकदा होते. तो फार मोठा सोहळा असतो आणि तिथे इतकी गर्दी असते की कोणीही स्पष्टपणे विचार करू शकत नाही. परंतु त्यांना माहीत असते की अखिल भारतीय काँग्रेस समिती विचारपूर्वक काम करते आणि म्हणून ती जे करते त्यावर काँग्रेस ठप्पा मारते. यामुळे काँग्रेस कार्यकारिणी नेहमी तत्पर असते आणि परवा इथे तिची सभा होणार आहे. काँग्रेस महासमितीसमोर कार्यकारिणीने कार्यक्रम ठेवायचा असतो. कार्यकारिणी ही महासमितीच्या खाली आहे. महासमिती कार्यकारिणी तयार करू शकते वा तिला रद्द करू शकते.

कार्यकारिणीने कोणताही कार्यक्रम ठेवला नाही तर कार्यकारिणी योग्य प्रकारे काम करत नाही असे महासमिती म्हणू शकते व याकरिता कार्यकारिणीने राजीनामा द्यावा असेही महासमिती म्हणू शकते. महासमितीने कार्यकारिणीचे प्रस्ताव स्वीकारले नाही वा त्यात फार मोठे फेरबदल केले तरी कार्यकारिणीला राजीनामा द्यावा लागतो. यामुळेच कार्यकारिणी अखिल भारतीय काँग्रेसच्या नावाने काम करत असते. तिने जर स्वतःच्या नावावर काम केले तर त्याचा तो प्रभाव पडणार नाही. एकाही मुसलमानाला मारू नये अशी १५ व्यक्तींनी घोषणा केली तर तिचा काय उपयोग आहे? परंतु हीच गोष्ट अखिल भारतीय काँग्रेसच्या नावाने केली तर तिचा फार मोठा प्रभाव पडतो. यामुळेच गेल्या तीन दिवसांपासून मी कार्यकारिणीला सल्ला देत आहे की आम्ही हीच गोष्ट केली पाहिजे असे कार्यकारिणीने स्पष्ट शब्दांत सांगावे. मग ही गोष्ट लोकांना आवडते की नाही याची तिने फिकीर करू नये. आपण जर काँग्रेसचे खरे सेवक असू तर हीच अशी गोष्ट आहे की जी आपण केली पाहिजे. अखिल भारतीय काँग्रेसला ती गोष्ट मान्य नसेल तर नसू द्या. अखेरीस आपल्याला आणि पाकिस्तानलाही जगासमोर उभे राहायचे आहे. जग काय म्हणेल या भीतीने आपण अनेक गोष्टी करत असतो. परंतु तुम्हाला जे योग्य वाटते तेच तुम्ही केले पाहिजे असे मी म्हणेन. मग जगालासुद्धा ती गोष्ट योग्य वाटेल. असे म्हणतात की पंचांचा शब्द हा ईश्वराचा शब्द असतो. जग हे पंचांप्रमाणे असते. यामुळे जग जे काही म्हणते तो खऱ्या अर्थाने एका प्रकारे ईश्वरी न्याय असतो. आज कार्यकरिणीची सभा सुरू आहे. उद्याही ती भेटणार आहे. माझी तर अशीच इच्छा आहे की तिने अखिल भारतीय काँग्रेससमोर असा प्रस्ताव ठेवावा की ज्यामुळे भारताचा जयजयकार होईल व प्रत्येकाला इथे शांततेत राहता येईल. परंतु एखादी विशेष व्यक्ती देशद्रोही आहे असे आपण गृहीत धरू नये. एखादी व्यक्ती देशद्रोही आहे असे सिद्ध झाले तर तुम्ही तिला मारू शकता, फासावर चढवू शकता वा गोळी घालू शकता. परंतु तुम्ही जर म्हणाल की एकही

मुसलमान देशाशी प्रामाणिक असू शकत नाही आणि प्रामाणिकपणाचा ठेका केवळ हिंदू आणि शिखांनीच घेतला आहे तर ही गंभीर बाब आहे असे मी म्हणेन. काँग्रेस तर असे काम कधीही करणार नाही याची मला खात्री आहे. तुम्हीसुद्धा अशी प्रार्थना करा की काँग्रेस जो सल्ला देईल त्याच्याही वर आपण जाऊ, सर्व भारत वर जावा आणि मग जगातील इतर भागांनाही वर जावे लागेल. भारताला वर उचलण्याकरिताच काँग्रेसची स्थापना झाली आहे परंतु इतरांचे काही हिरावून घेऊन वा कोणाची संपत्ती लुटून काँग्रेसला वर जाण्याची इच्छा नाही. सर्व जगाकरिता काँग्रेस मरेल परंतु ती कोणाला मारणार नाही. काँग्रेसचे हे ध्येय मी काँग्रेसमध्ये आल्यापासूनच नाही तर अनेक वर्षांपासूनच आहे. युरोपमधून जे लोक पैसा लुटण्याकरिता इथे येत होते ती लूट बंद व्हावी आणि आशिया आणि आफ्रिकेतील लोकांना सुखासमाधानाने राहता यावे याकरिता काँग्रेस प्रयत्नशील होती. भारताने याकरिताच जिवंत राहिले पाहिजे. याकरिताच भारताने स्वातंत्र्य मिळवले आहे, इतर कशाकरिताही नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ७१-७

१९. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १४, १९४७

नोव्हेंबर १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला आणि सरोजिनी देवी (सरोजिनी नायडू १८७९-१९४९; कवयित्री आणि वक्ता; अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, १९२५; राज्यापाल उत्तर प्रदेश १९४७-४९), मिराबेन (मॅडॅलिन स्लेड, गांधीजींच्या कामात १९२५पासून सहभागी), महादेवभाईला (महादेवभाई देसाई, १८९२-१९४२; गांधीजींचे स्वीय सचिव, १९१७ ते १५ ऑगस्ट १९४२ला मृत्यू होई पर्यंत) अटकेत ठेवण्याकरिता आगाखान महालाला तुरुंगाचे रूप देण्यात आले होेते. त्या तुरुंगात मी जेव्हा उपवास करत होतो तेव्हा या भजनाने माझे लक्ष वेधून घेतले होते. इथे उपवासाच्या कारणाची चर्चा करण्याची माझी इच्छा नाही.

त्यासंबंधी केवळ एका गोष्टीचा उल्लेख करण्याची माझी इच्छा आहे. ती म्हणजे त्या उपवासात २१ दिवस जो मी टिकलो होतो तो मी जे पाणी पीत होतो त्यामुळे वा काही दिवस मी जो संत्र्याचा रस घेत होतो त्यामुळे नाही तसेच माझ्या प्रकृतीची जी अतिशय काळजी घेतली जात होती त्यामुळेही नाही. तर मी जो टिकलो होतो तो माझ्या अंतःकरणात माझ्या ईश्वराला, ज्याला मी राम म्हणतो, मी संस्थापित केले होते म्हणून. त्यावेळी या भजनाच्या ओळींनी मी अतिशय मुग्ध झालो होतो परंतु भजनाचे नेमके शब्द मला आठवत नव्हते. यामुळे या भजनाशी संबंधित लोकांना या भजनाची नेमकी शब्दरचना मला तार करून कळवा असे मी सांगितले. मला जेव्हा ते संपूर्ण भजन मिळाले तेव्हा मला फार आनंद झाला होता. या भजनाचा सार असा आहे की रामनाम सर्व काही आहे आणि त्याच्या तुलनेत इतर देवता काहीच नाहीत. उद्या म्हणजे शनिवारी नवी दिल्लीत अखिल भारतीय काँग्रेसचे जे महत्त्वाचे अधिवेशन होणार आहे त्यात सदस्यांनी आपल्या अंतःकरणात ईश्वराची स्थापना करून व त्याला स्मरून चर्चा करावी म्हणून मी तुम्हाला माझ्या जीवनातील ही उपदेशपूर्ण हकिगत सांगतो आहे. ते काँग्रेसचे प्रतिनिधी असल्यामुळे त्यांनी असे केलेच पाहिजे. काँग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांच्या अंतःकरणात ईश्वराऐवजी सैतान असेल तर ते आपल्या मिठाला जागणार नाहीत.

अखिल भारतीय काँग्रेससमोर ठेवावयाच्या प्रस्तावांवर कार्यकारिणीने तीन तास चर्चा केली. हिंदू आणि शीख निर्वासितांना पश्चिम पंजाबमधील आपल्या घरी सुरक्षितपणे आणि प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही अशा प्रकारे कसे पाठवावे हा चर्चेचा मुख्य विषय होता. कुरापतीची सुरुवात पाकिस्तानकडूनच झाली या निष्कर्षावर ते पोहोचले परंतु त्यांना असेही जाणवले की जेव्हा इतक्या मोठ्या प्रमाणावर त्या वाईटपणाची नक्कल करण्यात येते आणि पूर्व पंजाबमध्ये व संघराज्यातील

त्याच्या जवळपासच्या भागात बदला घेण्याकरिता हिंदूं आणि शिख जेव्हा इतके भयानक वर्तन करतात तेव्हा सुरुवात कोणी केली याला काहीही महत्त्व राहत नाही. जोपर्यंत संघराज्याचा संबंध आहे आमचे वेडेपणाचे दिवस संपले आहेत आणि संघराज्याच्या या टोकापासून तर त्या टोकापर्यंत सर्व लोक समंजस झाले आहेत असे जर अखिल भारतीय काँग्रेस कमेटी पूर्ण विश्वासाने म्हणू शकली असती तर पाकिस्तानला हिंदू आणि शीख निर्वासितांना सन्मान आणि सुरक्षिततेच्या आश्वासनासह परत बोलावणे भाग पडले असते. अशी परिस्थिती तेव्हाच निर्माण करता येऊ शकते जेव्हा हिंदू आणि आणि शीख आपल्या अंतःकरणात रावणाऐवजी रामाला सुस्थापित करतील. जेव्हा तुम्ही सैतानाला तुमच्या अंतःकरणातून काढून टाकाल आणि या वेडाच्या अवस्थेतून बाहेर पडाल तेव्हा आज ज्याप्रमाणे प्रत्येक हिंदूचा वा शिखाचा मुलगा रस्त्यातून बिनधास्तपणे फिरू शकतो तसाच प्रत्येक मुसलमानाचा मुलगाही मोकळेपणाने रस्त्याने फिरू शकेल. मग ज्या मुसलमानांना निरुपायाने आपले घर सोडून जावे लागले ते आनंदाने आपल्या घरी परततील आणि मग प्रत्येक हिंदू आणि शीख निर्वासिताकरिताही सुरक्षितपणे आणि सन्मानाने पाकिस्तानमधील आपल्या घरी परतण्याचा मार्ग मोकळा होईल.

मझ्या शब्दांचा प्रतिध्वनी तुमच्या अंतःकरणात उठतो काय आणि अखिल भारतीय काँग्रेस कमेटी समंजसपणाच्या न्याय्य निष्कर्षावर पोहोचेल काय?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ७८-७९

२०. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १५, १९४७

नोव्हेंबर १५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या बैठकीत मी दुपारी काय बोललो ते मी तुम्हाला सांगावे अशी तुमची अपेक्षा असेल हे मला जाणवते. परंतु ते सर्व परत सांगण्याची मला इच्छा होत नाही. खरे म्हणजे मी तिथे तेच सांगितले होते जे मी तुम्हाला इतक्या दिवसांपासून सांगत आलो आहे. मला जर कोणी प्रामाणिकपणे राष्ट्रपिता म्हणत असतील तर ते या अर्थाने खरे आहे की १९१५ साली मी दक्षिण आफ्रिकेतून आल्यानंतर काँग्रेसला जे स्वरूप मिळाले त्याकरिता मोठ्या प्रमाणात माझा हातभार लागला होता. याचा अर्थ असा आहे संपूर्ण देशात माझा प्रभाव होता. परंतु आज मी अशा प्रभावाचा दावा करू शकत नाही. याची मला काळजी नाही, कमीत कमी ती असायलाही नको. सर्वांनी आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे आणि परिणाम ईश्वराच्या हाती सोडला पाहिजे. ईश्वराच्या इच्छेशिवाय काहीही होत नाही, आपले काम केवळ प्रयत्न करणे आहे. यामुळे अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या बैठकीत मी हे कर्तव्य लक्षात ठेवूनच गेलो होतो. सभेची कार्यवाही सुरू होण्यापूर्वी मला माझे म्हणणे मांडण्याची संधी मिळाली तर मला जे खरे वाटते ते कार्यकारिणीसमोर ठेवण्याकरिता मी तिथे गेलो होतो.

तुम्हा लोकांना मी कंट्रोलविषयी काही सांगू इच्छितो. अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या बैठकीत सध्याच्या महत्त्वाच्या विषयावर मी जास्त वेळ बोलल्यामुळे कंट्रोलच्या विषयाचा मी केवळ उल्लेख करू शकलो.

कंट्रोल राहू देणे अपराध आहे असे मला जाणवते. कंट्रोलची पद्धती युद्धकाळात चांगली राहिलीही असेल. सैनिकशाही असलेल्या एखाद्या देशाकरिता ती आजही चांगली असू शकते परंतु भारताकरिता ती हानिकारक आहे. माझा विश्वास आहे की देशात अन्नधान्य वा कापडाची चणचण नाही. या वर्षी पावसाने आपल्याला दगा दिलेला नाही. आपल्या देशात भरपूर कापूस आहे आणि चरखा व हातमागावर काम करणारे भरपूर लोक आहेत. याशिवाय देशात गिरण्या आहेत. यामुळे हे दोन्ही कंट्रोल वाईट आहेत असे मला वाटते. आपल्याकडे दुसरे कंट्रोलही आहेत जसे पेट्रोल, साखर वगैरेवरील कंट्रोल. या वस्तूंवर कंट्रोल ठेवण्याकरिता मला कोणतेही तार्किक कारण दिसत नाही. कंट्रोलमुळे लोक आळशी आणि परावलंबी होतात. आळशीपणा आणि परावलंबित्व कोणत्याही देशाकरिता हानिकारक असतात. कंट्रोलबद्दल मला दररोज तक्रारी मिळतात. मला आशा आहे की

देशाचे प्रतिनिधी सुज्ञपणाने निर्णय घेतील आणि सरकारला लाचलुचपत, ढोंगीपणा आणि काळाबाजार पसरवणारा कंट्रोल बंद करण्याचा सल्ला देतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, ८०-१

२१. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १६, १९४७

नोव्हेंबर १६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज सायंकाळी म्हटलेल्या भजनात सांगितले आहे की माणसाचे सर्वात महत्त्वाचे काम ईश्वरप्राप्तीकरिता प्रयत्न करणे आहे. ईश्वर मंदिरात, मूर्तीत वा माणसाने बनवलेल्या पूजाघरात सापडत नसतो आणि ना व्रत वा उपवास करून त्याची प्राप्ती करून घेता येते. ईश्वर केवळ प्रेमाच्या मार्गाने मिळू शकतो व ते प्रेम लौकिक नाही तर अलौकिक असले पाहिजे. मिराबाईला प्रत्येक गोष्टीत ईश्वराचे दर्शन होत होते व अशाच प्रेमात ती जीवन व्यतीत करत होती. तिच्याकरिता ईश्वर सर्वत्र होता.

रामपूर संस्थानाचे संस्थानिक मुसलमान आहेत. परंतु याचा अर्थ ते मुसलमानांचे संस्थान आहे असा होत नाही. दिवंगत अली बंधूंनी (महम्मद अली आणि शौकत अली) किती तरी वर्षांपूर्वी मला तिथे नेले होते (मार्च ६, १९१९ला). त्या वेळचे नबाब हकीम अजमल खान (१८६३-१९२७; रामपूरच्या नबाबांचे मुख्य चिकित्सक १८९२-१९०२; भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष १९२१; जामिया मिलियाचे पहिले कुलपती, १९२०-२७) आणि दिवंगत डॉ. अंन्सारी (डॉ. एम.ए. अन्सारी, १८८०-३६; नामवंत चिकित्सक आणि शल्यचिकित्सक, काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य; भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महासचिव, १९२०, १९२२, १९२६, १९२९, १९३१, आणि १९३२; तिचे अध्यक्ष १९२७; जामिया मिलिया इस्लामियाचे कुलपती १९२८-३६.) या त्या काळातील राष्ट्रवादी मुसलमानांचे मित्र असल्यामुळे मला त्यांना भेटण्याचीही सुसंधी मिळाली होती. त्या दिवसांत आजपेक्षा हिंदू-मुसलमान अधिक शांतपणे राहत होते आणि त्यांच्यात अधिक सुसंवाद होता. परंतु तिथून गेल्या रविवारी जे हिंदू मित्र मला भेटण्याकरिता आले होते त्यांनी मला एकदम वेगळीच गोष्ट सांगितली. त्यांनी सांगितले की ते संस्थान जरी भारतीय संघराज्यात विलीन झालेले असले तरीही ते संस्थान अजूनही मुस्लिम लीगच्या दुष्प्रभावाखाली आहे. केवळ तितकाच अडथळा असता तर तो सहजपणे ओलांडता आला असता. परंतु तिथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने हिंदू महासभाही आहे. भारतीय संघराज्यातून सर्व मुसलमानांना घालवून लावावे अशी त्यांची इच्छा आहे.

काँग्रेसच्या उद्दिष्टांशी सहमत असलेल्या लोकांनी आपले स्थान कसे बळकट करावे हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. यश मिळवण्याकरिता ते सत्याग्रह करू शकतात काय? काँग्रेस महासमिती आपल्या उद्दिष्टांवर भक्कमपणे स्थिर आहे आणि ज्यात केवळ हिंदूच मालकाप्रमाणे राहू शकतात असा हिंदुस्तान बनू देण्याच्या विरोधात आहे हे कळल्यामुळे त्यांना आनंद झाला. काँग्रेसची तत्त्वे आणि

उद्दिष्टे इतकी व्यापक पायावर आधारित आहेत की तिच्यात सर्व समुदायांचा समावेश होतो. त्यात संकुचित सांप्रदायिकतेला वाव नाही. सर्वात जुन्या राजकीय संस्थांपैकी ती एक आहे. तिचे एकमेव उद्दिष्ट जनतेची सेवा करणे आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या सभेत जे काही घडले त्यामुळे रामपूर काँग्रेसच्या लोकांना बळ मिळाले. तरीही त्यांना यासंबंधीचा माझा दृष्टिकोन जाणून घ्यायचा आहे. मी त्यांना सांगितले की मला तेथील परिस्थिती माहीत नाही यामुळे मी काही नियम तर सांगू शकत नाही आणि परिस्थितीचा अभ्यास करण्याकरिता मला वेळही नाही. तरीही पूर्ण आत्मविश्वासाने मी इतकेच सांगू शकतो की सत्याग्रह ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे. त्यांनी उल्लेख केलेल्या विरोधी शक्ती सत्याग्रहासमोर फार काळ उभ्या राहू शकत नाहीत.

आजकाल सशस्त्र वा इतर कोणत्याही विरोधाला सत्याग्रह म्हणण्याची फॅशन झाली आहे. यामुळे समाजाची केवळ हानी होते. यामुळे तुम्हाला सत्याग्रहाचा खरा अर्थ कळत असेल आणि सत्य व प्रेम यांच्या स्वरूपातील ईश्वराची तुम्हाला ओळख पटलीअसेल तर तो ईश्वर सत्याग्रहींबरोबर आहे हे लक्षात ठेवा आणि मग सत्याग्रहाच्या विरोधात कोणीही यशस्वी होऊ शकत नाही असा विश्वास बाळगताना तुम्ही कचरणार नाही. हिंदूमहासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल जे म्हणणे मला भाग पडले त्याचे मला दुःख आहे. मला माझी चूक कळली तर आनंद होईल. मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुखाशी (माधव स. गोवळलकर उर्फ गोवळलकर गुरुजी) भेटलो आहे. या संघाच्या एका बैठकीतही (पाहा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मेळाव्यात भाषण, सप्टेंबर, १६, १९४७) मी गेलो होतो. तेव्हापासून त्या मेळाव्याला हजर राहिल्याबद्दल अनेक लोकांनी माझी कानउघाडणी केली आहे व अनेकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल तक्रारीही केल्या आहेत.

आपण सर्व जरी देशातील सांप्रदायिकतेची आग विझवण्याच्या कामात गुंतलेलो असलो तरी भारताबाहेर जे आपले देशबांधव राहत आहेत त्यांना आपण विसरायला नको. तुम्हाला माहीतच असेल की भारतीय प्रतिनिधीमंडळ (विजयालक्ष्मी पंडित, एम. सी. सेटलवाड, के. एम. पणिक्कर आणि महाराज सिंग यांचा त्या प्रतिनिधीमंडळात समावेश होता.) दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या हक्कांकरिता अतिशय धैर्याने आणि एकोप्याने युनोमध्ये झगडत आहेत. तुम्हा सर्वांना विजयालक्ष्मी पंडित (१९००-१९९०; पंडित मोतिलाल नेहरू यांची मुलगी; युनोमध्ये गेलेल्या भारतीय प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व १९४६, १९४७ आणि १९६३; रशियात भारताच्या राजदूत १९४७-४९; अमेरिकेत भारताच्या राजदूत १९४९-५२; इंग्लंडमध्ये भारताच्या उच्चायुक्त १९५४-६१; महाराष्ट्राच्या राज्यपाल १९६२-६४; संयुक्त राष्ट्र संघाच्या अध्यक्ष १९५३.) माहीत आहेत. त्या जवाहरलाल नेहरू यांच्या भगिनी आहेत म्हणून त्या प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व करत आहेत असे नसून

त्या आपले काम कार्यक्षम पद्धतीने करतात म्हणून त्यांच्याकडे नेतृत्व आहे. त्याची चमू कार्यक्षम लोकांची आहे आणि ते सर्व एका आवाजाने बोलतात. (संयुक्त राष्ट्रसंघातील राजकीय समितीतील वादविवादाच्या दरम्यान १५ नोव्हेंबरला दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना मिळणाऱ्या वागणुकीबद्दल एम. सी. सेटलवाड म्हणाले - "मानवी अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्य यांच्या रक्षणार्थ ही समिती आणि महासभा बोलावण्यात आली आहे. केवळ दक्षिण आफ्रिकेत वसलेले २,५०,००० भारतीय आणि आशियायी लोकच यामुळे प्रभावित होत नाहीत तर जगातील लाखोकरोडो लोकसुद्धा यामुळे प्रभावित होत आहेत. वांशिक श्रेष्ठता आणि वांशिक अहंकाराच्या सदोष सिद्धांताच्या विरोधात या संस्थेकडून अपेक्षा आहेत") मला सर्वात जास्त आनंद जफरुल्ला साहेब (मोहम्मद जफरुल्ला खान, पाकिस्तानच्या विंदेश विभागाचे मंत्री आणि युनोतील पाकिस्तानच्या प्रतिनिधी मंडळाचे नेते. त्यांनी भारताच्या भूमिकेला पाठिंबा दिला आणि म्हणाले : "मला बायबलची चांगली माहिती नाही, परंतु मला असे सांगण्यात आले आहे की दक्षिण आफ्रिकेतील बोअरांच्या मनात बायबलबद्दल नितांत श्रद्धा आहे. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना जी वागणूक मिळते ती ख्रिश्चन संस्कृतीप्रमाणे आहे काय?") आणि इस्फहानी साहेब (एम. ए. एच. इस्फहानी, पाकिस्तानचे अमेरिकेतील वकील. वादविवादाच्या दरम्यान ते म्हणाले : "भारतीय लोक दक्षिण आफ्रिकेचे नागरिक असूनही ज्या पद्धतींमुळे त्यांचे वैध आणि न्याय्य हक्क हिरावून घेतले जातात आणि त्यांना युरोपीय रहिवाशांपेक्षा निकृष्टतम परिस्थितीत व जवळपास गुलामगिरीच्या अवस्थेत पोहोचवले जाते त्याच्या विरोधात भारतीयांची तक्रार आहे..") यांची जी भाषणे आज वृत्तपत्रांमध्ये आली त्यामुळे मला फार आनंद झाला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना गोऱ्यांप्रमाणे वागणूक मिळत नाही. त्यांना तिथे अपमानित करण्यात येते आणि एखाद्या जातीबाहेरच्या माणसाप्रमाणे त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात येतो. हे खरे आहे की दक्षिण आफ्रिकेतील भारतीय गरीब आणि उपासमार होणारे लोक नाहीत. परंतु माणूस केवळ भाकरीवर जगत नाही. मानवी अधिकारासमोर पैशाचे काहीच मूल्य नाही. आणि दक्षिण आफ्रिकेतील सरकार तेथील भारतीयांना हे अधिकार देण्याकरिता तयार नाही. देशाबाहेर राहणाऱ्या भारतीयांच्या समस्यांबद्दल हिंदू आणि मुसलमान यांची मते वेगवेगळी नाहीत. यावरूनच द्विराष्ट्र सिद्धांत चुकीचा होता हे सिद्ध होते. यापासून प्रेम हीच सर्वोच्च गोष्ट हा धडा मी शिकलो आणि मी आज हे तुम्हाला सांगितल्यानंतर तुम्हीसुद्धा हा धडा शिकायला पाहिजे. हिंदुस्तानबाहेर हिंदू आणि मुसलमान जर एकमुखाने बोलू शकतात तर ते इथेसुद्धा काळजीपूर्वक असे करू शकतात. इतकेच की त्यांच्या अंतःकरणात परस्परांबद्दल प्रेम असले पाहिजे. माणूस चुका करतच असतो. परंतु त्याची इच्छा असेल तर तो आपल्या चुका दुरुस्तही करू शकतो. ही गोष्टसुद्धा माणसाकरिता स्वाभाविक आहे. क्षमा करणे आणि विसरणे माणसाकरिता नेहमीच शक्य असते. आपण आज बाहेर जसे केले तसे जर आपण इथे

केले तर आपल्या समस्या संपून जातील. जोपर्यंत दक्षिण आफ्रिकेचा संबंध आहे मला आशा आहे की प्रतिष्ठित हिंदू आणि मुसलमानानी एका स्वरात जे सांगितले त्याचा दक्षिण आफ्रिकेतील सरकार आणि गोरे लाभ घेतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ८१-८४

२२. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १७, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नोव्हेंबर १७, १९४७

काल मी तुमच्याशी रामपूर आणि दक्षिण आफ्रिकेतील आपल्या देशबांधवांबद्दल बोललो होतो. आज दक्षिण आफ्रिकेच्या विषयावर मी अधिक विस्ताराने बोललो पाहिजे असे मला वाटते. मी दक्षिण आफ्रिकेत वीस वर्ष म्हणजे १८९३ ते १९१४पर्यंत राहिलो आहे. त्यामध्ये बहुधा एक वर्षाचा खंड पडला असावा. माझ्या जीवनाच्या या प्रदीर्घ आणि घडणीच्या काळात स्वाभाविकपणेच मी दक्षिण आफ्रिकेतील सर्व प्रकारच्या भारतीयांच्याच संपर्कात आलो नाही तर या उपखंडात येऊन स्थायी झालेल्या गोऱ्यांच्याही संपर्कात आलो. तेव्हापासून दक्षिण आफ्रिकेने जर प्रगती केली असेल तर भारताने प्रगतीची उंच उडी घेतली आहे. काल जे अशक्यप्राय वाटत होते ते आज घडलेले आहे. आपण कारणात शिरण्याचे कारण नाही. सत्य हे आहे की भारत राष्ट्रकुलात आला आहे म्हणजे दक्षिण आफ्रिकेचे जे स्थान आहे नेमके तेच स्थान आज भारताचे आहे. एका उपनिवेशातील लोकांनी दुसऱ्या उपनिवेशातील लोकांना गुलाम मानायला पाहिजे काय? राष्ट्रकुलात आशियायी राष्ट्राचा समावेश पहिल्यांदाच होत आहे. राष्ट्रकुलाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडत आहे. आता भारताचा राष्ट्रकुलात प्रवेश झाल्यानंतर पाच दिवसांनी ऑरेंजिया सरकारचे प्रशासक डॉ. एस. पी. बर्नॉर्ड यांनी डरबन येथील नाताळ इंडियन काँग्रेसला कोणता संदेश पाठवला ते पाहा -

तुम्ही नवीन उपनिवेशाचे स्वातंत्र्य साजरे करत आहा कारण हा दिवस भारताच्या इतिहासात फार मोठा दिवस आहे. यामुळे मी आशा करतो की दक्षिण आफ्रिकेतील सर्व हिंदुस्तानी आपापल्या उपनिवेशात निघून जातील आणि तिथे जाऊन त्या संदेशाचा ते प्रचार करतील जो त्यांना दक्षिण आफ्रिकेत मिळाला आहे म्हणजे शांततापूर्वक आणि अनुशासनात राहणे आणि हिंदुस्तानात सांप्रदायिक संघर्षात ज्याप्रमाणे शेकडो लोक मरत आहेत तशा संघर्षापासून दूर राहणे.

विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की भारत राष्ट्रकुलात सामील होत आहे ही गोष्ट डॉ. बर्नार्ड यांना मोठी वाटत नाही आणि दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांनी आपापल्या उपनिवेशात निघून जावे आणि शांततेत व शिस्तीने राहण्याचा व सांप्रदायिक संघर्षापासून दूर राहण्याचा जो संदेश भारतीयांना दक्षिण आफ्रिकेत मिळाला आहे त्याचा प्रचार करा असा सल्ला ते नाताळ इंडियन काँग्रेसला न मागता देत आहेत. दक्षिण आफ्रिकेतील सर्वसामान्य माणूस अशा प्रकारेच विचार करत

असावा अशी भीती मला वाटते आणि म्हणूनच आमच्या देशातील लोकांवर वेगवेगळे प्रतिबंध लावले जातात. त्यांचा दोष हाच आहे की ते आशियातील आहेत आणि त्यांचा रंग काळा आहे. दक्षिण आफ्रिकेतील सर्वात चांगल्या पाश्चात्य लोकांना मी विनंती करतो की त्यांच्यात आशियायी विरोधी आणि रंगभेदाचा प्रवृत्ती निर्माण झाली आहे व त्यामुळे ते जे पक्षापाती धोरण अवलंबितात त्याचा त्यांनी फेरविचार करावा. त्यांच्यामध्ये बरेच हब्शी लोक आहेत. काही बाबतीत तर त्यांच्याशी आशियाची लोकांपेक्षाही वाईट वर्तन केले जाते. तिथे जाऊन वसलेल्या युरोपिअन लोकांना मी म्हणेन की बदललेल्या काळाची पदचिन्हे त्यांनी ओळखावी. एक तर रंगभेदासंबंधीचा त्यांचा पूर्वग्रह सुरुवातीपासूनच चूक असावा अथवा ब्रिटिशांनी आणि राष्ट्रकुलाच्या इतर सदस्यांनी आशियायी देशांना राष्ट्रकुलात प्रवेश देऊन अक्षम्य चूक केलेली असावी. ब्रह्मदेशही स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आहे. (ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य देण्यासंबंधीचे विधेयक इंग्लंडच्या लोकसभेत १४ नोव्हेंबरला मंजूर झाले होते व ब्रह्मदेशाला जानेवारी ४, १९४८ला स्वातंत्र्य मिळाले होते.) सिलोनही राष्ट्रकुलाचा लवकरच सदस्य होणार आहे. (सिलोन स्वतंत्रता विधेयक इंग्लंडच्या लोकसभेत नोव्हेंबर २६ला मंजूर झाले होते आणि सिलोन फेब्रुवारी १९४८मध्ये स्वायत्त राष्ट्र होऊन राष्ट्रकुलात राहणार होते.) याचा अर्थ काय? मला असे शिकवण्यात आले होते की राष्ट्रकुलाचे सदस्यत्व जवळपास स्वातंत्र्यापेक्षा उच्च जरी नसले तरी स्वातंत्र्यासारखे असते. या स्वतंत्र राष्ट्राच्या जबाबदार स्त्री-पुरुषांनी आपण आपल्या स्वातंत्र्याचे काय करणार आहो याचा विचार केला पाहिजे. आज बऱ्याचशा राष्ट्रांना स्वतंत्र करण्याची मोहीम सुरू आहे. हे योग्य आणि चांगलेही आहे. परंतु यातून अजून असे एक युद्ध भडकेल काय की जे मागील दोन महायुद्धापेक्षाही भयानक असेल? की विश्वबंधुत्वाच्या प्रसाराकरिता ते आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग करतील?

उपनिषदातील मंत्र सांगतो की माणूस जसा विचार करतो तसा तो होतो. (यथाकारी यथाचारी तथा भवती। साधुकारी साधूर्भवती। पापकारू पापो भवति पापः पापेन। अथो खल्वाहुः काममथ एवार्थ पुरूष इति। स यथाकामो भवति तत्क्रतुर्भवति तत् कर्म कुरुतेः यत्कर्म कुरुते तदभिसंगते। — बृहदारण्यदउपनिषद, ४.४.५. या मंत्रानुसार माणूस जसे वर्तन करील, आचरण करील तसा होईल. चांगले काम करणारा चांगला होतो तर वाईट काम करणारा वाईट होतो. सद्गुणी वर्तन करून माणूस सद्गुणी होतो, वाईट वाईट वर्तन केल्याने. माणूस त्याच्या इच्छांप्रमाणे घडत असतो असे इतर सांगू शकतात. जशी त्याची इच्छा असेल तसा तो वागेल, तसेच वर्तन तो करील. जे काही वर्तन तो करील तसेच त्याला फळ मिळेल.) सुज्ञ माणसांचा अनुभव या सुभाषिताच्या सत्यत्वाची साक्ष देईल. अशा प्रकारे सुज्ञ माणसे जसा विचार करतात तसे जग घडेल. निरुद्योगी विचार नसतो. आपण जर म्हणू की मूढ जनता जसे घडवील तसे जग होईल तर ही चूक असेल. ते विचार करणार नाहीत. जमावाप्रमाणे ते

अनुसरण करत राहतील. (हे वाक्य प्रार्थना प्रवचन २मधून भाषांतरित करून घेतले आहे.) स्वातंत्र्याचा अर्थ लोकशाही व्हायला पाहिजे. प्रत्येक नागरिकाला बुद्धी मिळवण्याची संधी मिळाली पाहिजे. बुद्धीचा अर्थ केवळ तथाकथित माहितीपेक्षा वेगळा आहे. दक्षिण आफ्रिकेत जसे चांगले सैनिक आहेत तसेच चांगले शेतकरीही आहेत. तसेच तिथे अनेक बुद्धिमान स्त्री-पुरुषही आहेत. ते जर आपापल्या अवतिभवतीच्या अधःपतनाकडे नेणाऱ्या वातावरणावर मात करून वर उठू शकणार नसतील व गोरे लोकच श्रेष्ठ असतात या मान्यतेतून त्रस्त करणाऱ्या समस्येच्या बाबतीत देशाला योग्य नेतृत्व देणार नसतील तर जगाकरिता ती शोकांतिका होईल. हा खेळ खेळताखेळता लोक अजूनही थकले नाहीत काय?

आता मी तुम्हाला कंट्रोलच्या अतिशय वादग्रस्त प्रश्नासंबंधी काही सांगितले पाहिजे. कंट्रोलच्या सर्व सद्गुणांची आपल्यालाच माहिती आहे असा दावा करणाऱ्या पंडितांच्या गलबल्यात सर्वसामान्य जनतेचा आवाज दबून गेला पाहिजे काय? आपले मंत्री, जे जनतेतून आलेले आहेत व जे जनतेचे आहेत ते जनतेचा आवाज ऐकणार आहेत की ज्यांना लाल फितीद्वारे नियंत्रण ठेवणेच माहीत आहे त्यांचे ते ऐकणार आहेत? या लोकांनी असहकाराच्या काळात जनतेला खूप त्रास दिला होता. तेव्हा हे पंडित अतिशय कठोरपणे आपले शासन चालवत होते. आताही त्यांनी असेच केले पाहिजे काय? लोकांना चुका करण्याची आणि त्यापासून शिकण्याची संधी मिळणार आहे काय? आपली इच्छा असेल तेव्हा कंट्रोल परत सुरू करता येतात हे मंत्र्यांना माहीत नाही काय? मी खाली दिलेल्या कंट्रोलच्या उदाहरणातून एखाद्यात कंट्रोल नसल्यामुळे हानी होते आहे असे आढळले तर मंत्री परत कंट्रोल सुरू करू शकत नाहीत काय? माझ्यासमोरील यादीने माझ्या साध्यासरळ मनाचा गोंधळ उडाला आहे. त्यांतील काहींमध्ये गुणही असू शकतील. मला इतकेच म्हणायचे आहे की विज्ञानाचा, जर कंट्रोलबद्दलचे असे काही विज्ञान असेल तर, भावनाशील न होता विचार करण्याची गरज आहे आणि मग सर्वसामान्य वा एखाद्या विशेष गोष्टीवरील कंट्रोलच्या रहस्याचे लोकांना ज्ञान दिले पाहिजे. मला मिळालेल्या यादीचे गुणदोष न पाहता मी त्यातील उदाहरणादाखल काही घेतले आहेत - एक्सचेंजवरील कंट्रोल, भांडवल गुंतवणुकीवरील कंट्रोल, बॅंन्कांच्या शाखा उघडण्यावरील व त्यांच्या गुंतवणुकीवरील कंट्रोल, विमासंबंधातील गुंतवणूक, धान्य, साखर, गुळ, ऊस आणि सरबत, वनस्पती, रेशमी वा लोकरी कापडासह सर्व कापड, मद्य, पेट्रोल आणि मातीचे तेल, कागद, स्टील, अभ्रक, मॅंगनीज, कोळसा, दळणवळण, कारखाना, यंत्र, फॅक्टरी वगैरे उभारण्यावरील कंट्रोल, काही प्रांतांत मोटार गाड्यांचे वितरण, चहाचे मळे अशा प्रत्येक प्रकारच्या वस्तूच्या आयतनिर्यातीवरील कंट्रोल ही त्यातील काही उदाहरणे आहेत.

हरिजन, नोव्हेंबर ३०, १९४७

२३. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १८, १९४७

नोव्हेंबर १८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीने मंजूर केलेले ठराव (पाहा अ. भा. कॉं. कमेटीचे ठराव १५।१६।१७ नोव्हेंबर १९४७) तुम्ही वाचलेच असतील. त्यातील काही ठराव आपल्या जीवनात - जीवनाच्या मोठ्या भागात उपयोगी आहेत. असेही म्हणता येईल की प्रत्येक माणसाच्या जीवनात त्यांचा उपयोग आहे. ते ठराव असे नाहीत की त्यांची अंमलबजावणी केवळ सरकारनेच करायची आहे. उदाहरणार्थ कंट्रोलवरील ठरावाची अंमलबजावणी जवाहरलाल, राजेंद्र प्रसाद - आता राजेंद्र प्रसादांनी पद सोडले आहे - आणि इतरांनी करायची आहे. त्यांना अन्न, कापड, आणि इतर प्रत्येक गोष्टीवरील कंट्रोलच्या ठरावाची अंलबजावणी करावी लागेल. आपल्यालासुद्धा हेच करावे लागेल. आपण जर खोटेपणा केला आणि कायद्याचे पालन केले नाही तर परिणाम अतिशय घातक होतील. आपल्याला जर एक वार कापड हवे असेल तर आपण १० वार कापड विकत घ्यायचे आणि घेऊन टाका, घरात पडले राहील असे कशासाठी म्हणायचे? आपण जर असे वागू लागलो आणि आपलाच स्वार्थ पाहू लागलो आणि देशाचा विचार केला नाही तर आम्ही बदमाश होऊ.

अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीने मंजूर केलेल्या ठरावातील एकेक ठराव तुम्हाला समजावून सांगण्याची माझी इच्छा होती. मी अजून इथेच आहे आणि मला संधी मिळाली तर मी ठरावांसंबंधी काही तरी सांगेन. परंतु आज निदान मी त्यांचा सार सांगेन. जे लोक घाबरून परत गेले त्यांना परत आणण्याविषयीचा एक ठराव आहे. आणि हा ठराव आपल्यापैकी प्रत्येकाला लागू होतो. कन्याकुमारीपासून तर काश्मीरपर्यंत आपण सर्व भारताचे आहो. हिंदुस्तानची फाळणी झाली म्हणून काय झाले, आपण सर्व भाऊभाऊ आहो. यामुळे आपणा सर्वांवर जबाबदारी येते. जर एक माणूस आपलेच पोट भरत असेल, मग तो स्वादाकरिता का खात असेना, पण तो गरिबांची फिकीर करत नसेल तर तो चोरी करतो व भारताचा गुन्हेगार होतो. भारताला जितके धान्य पाहिजे तितके त्याच्याजवळ नसले म्हणून काय झाले? गरिबांनाही तर धान्य मिळालेच पाहिजे. श्रीमंतांना जर एक, दोन, चार छटाक मिळत असेल व त्यावर ते भागवत असतील तर मग मी समजेन की गरीब आणि श्रीमंत सर्व एक झाले आहेत. इतरांचे सोडून मी ज्या श्रीमंताच्या घरी पडलो आहे त्यांचीच गोष्ट करू. तुम्ही जर मला विचारले की घनश्यामदासला जितके धान्य मिळते तितक्यावर त्यांचे भागते काय तर मी म्हणेन की नाही भागत. अखेर मला खरे तर सांगावेच लागेल. ते श्रीमंत असल्यामुळे त्यांना सर्व प्रकारे सर्व काही मिळते. मला माहीत नाही की इथे जितके लोक येतात त्यांना दूध मिळते की नाही. इथे दूध कुठून येते, कसे येते हे

सर्व मी थोडाच पाहत असतो. एक बकरी ठेवा, दोन बकऱ्या ठेवा, हा महात्मा आहे तर याला तर दूध द्यावेच लागेल, जितका गहू पाहिजे तितका चांगल्यात चांगला द्या कारण तो महात्मा आहे. मी हे कुठे विचारत असतो की हे कुठून आले आहे. महात्म्याला भाजी पाहिजे असेल तर भाजी द्या, फळ हवे असतील तर फळ द्या. कार्यकारिणीचे लोक येतात तर त्यांना काही तर द्यावेच लागेल. मग फळांचा रस द्या. करोडोंची संपत्ती घेऊन बसले आहेत. ही श्रीमंतांची परिस्थिती आहे. श्रीमंतांना सर्व काही मिळू शकते. परंतु असे असतानाही ते उपाशी राहत असतील तरच काही होऊ शकते. नाही तर गरीब कुठून आणतील. श्रीमंतांनी आणि व्यावसायिकांनी अनुचित नफा घेऊ नये आणि त्यांनी खरे व्यापारी व्हावे. त्यांनी नफा घ्यावा, पण किती? पोट भरेल तितकाच घ्यावा. सर्व लोक जर नफ्याची ही पद्धती अवलंबितील तर किती चांगले होईल? धान्यावर कंट्रोल का? त्याची काहीही गरज नाही. अशा प्रकारे सर्व काही होईल तर चांगले होईल.

सर्वात महत्त्वाची गोष्ट तर ही आहे की जोपर्यंत सर्व निर्वासित आपापल्या घरी परतत नाहीत तोपर्यंत आम्ही शांततेत बसू शकत नाही. मुसलमान आला तर त्याला कापून टाकायचे अथवा तो पाकिस्तानमधून आपले घरदार सोडून इथे आला आहे तर यामुळे त्याला येथून हटवा असे करणे वेडेपणा आहे. आता तर अखिल भारतीय काँग्रेस कमेटीने हुकूम दिला आहे की जो जिथे असेल तिथेच त्याला ठेवायचे आहे आणि आरामात ठेवायचे आहे. ज्याला स्वतःहोऊन घरी परतायचे असेल त्यांना परत जाऊ द्यायचे आहे. लोक आपली सुंदर घरे सोडून आले, लखपती, करोडपती शेकडो, हजारो होते, ते सर्व आले. परंतु जे गरीब होते ते बिचारे तर अजूनही तिथेच पडलेले आहेत. आज हे सर्व ऐकवण्याची माझी इच्छा नाही, परंतु आपले कर्तव्य काय आहे हे अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचा प्रस्ताव सांगतो. तीच सर्वात चांगली गोष्ट आहे. ते जे मुसलमान बसलेले आहेत ते सर्व कुचकामाचे आहेत असे जर आपण म्हणू तर तो भयंकर अपराध होईल. कोणालाही काढून न लावणे हा आपला सर्वश्रेष्ठ धर्म आहे. तीनचार दिवसांपूर्वी कार्यकारिणीचा प्रस्ताव लोकांनी पाहिला होता आणि वृत्तपत्रांमधून जो इशारा देण्यात आला तोही तुम्ही पाहिला. असे असूनही मुसलमान पळून जात आहेत. लोक म्हणतात की काँग्रेसने हा ठराव माझ्या आग्रहाखातर मंजूर केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की मुसलमानांनी जायलाच पाहिजे नाही तर ते मारले जातील. मी काय करीन ते मी आधीच सांगितले आहे - मी करेन अथवा मरेन. जेव्हा माझी मरायची तयारी आहे तेव्हा गरज पडली तर मुसलमानांनीसुद्धा मरण्याची तयारी ठेवली पाहिजे. आपण इतके पाषाणहृदयी झालो आहोत की या कडाक्याच्या दिवसात आपण त्यांना ३०० मैल चालण्याला भाग पाडू इच्छितो. असे म्हणतात की शिबिरांमध्ये फारशी माणसे दगावली नाहीत. - दररोज काही दहावीस लोक मरतात. आता पाच, दहा वा पन्नास हजार लोकांमधून दररोज इतके लोक मरत असतील तर याच गतीने संपूर्ण भारतात किती लोक मरतील? काहींना खायला

मिळत नाही, काहींना कॉलरा झाला आहे, काहींना हगवण लागली आहे वा इतरांना अजून काही होत आहे. परंतु हे लोक का मरत आहेत हे जाणून घेण्याचा कोणी त्रास घेतला आहे काय? आमच्याकरिता खायला आहे की नाही आणि इतर सर्वांकरिता काही आहे की नाही याची आपण काळजी करतो. जिथून मुसलमान पळून गेले तिथे हिंदूंना आणि शिखांना वसवण्याचा आपण विचार करतो. वाटते की त्यांना काय नाराज करायचे. सर्वच ठिकाणी अशी परिस्थिती नाही. परंतु अनेक ठिकाणी अशी परिस्थिती आहे हे निश्चित. याचे मला फार दुःख होते आणि माझी ही भावना मी तुम्हाला अनेकदा कळवली आहे. आता अखिल भारतीय काँग्रेस कमेटीसुद्धा म्हणते की जे झाले ते निंदनीय आहे. ही गोष्ट लाखो करोडो लोकांना कळवली पाहिजे आणि हे काम एका दिवसात होऊ शकत नाही. सरकारमध्ये जवाहरलाल, सरदारसारखे मोठेमोठे लोक आहेत. राजेंद्र बाबू - पण राजेंद्र बाबू आता तिथे नाहीत. परंतु इतर सदस्य त्यांना नाराज कसे करू शकतात? यामुळे ते या प्रस्तावावर सहमत झाले. मी तर असे ऐकले आहे की आता तर काँग्रेसचे लोकही असेच झाले आहेत. त्यांनाही वाटू लागले आहे की इथे मुसलमानांनी राहू नये. त्यांना असे वाटते की असे केल्यानेच हिंदू धर्माचे कल्याण होऊ शकते, हिंदू धर्म उंच जाऊ शकतो. परंतु दिवसेंदिवस हिंदू खाली जात आहे. ते जर आपली वृत्ती बदलवणार नसतील तर फार वाईट गोष्ट आहे. काँग्रेस कमेटीचे जितके प्रतिनिधी आले आहेत ते सर्व भारताचे प्रतिनिधी आहेत. त्यांची मने जर एक असतील, आणि एकच असायला पाहिजे, तर भारताचा चेहरामोहरा बदलून जईल. दुसरे काही न घडू देणे हा त्यांचा धर्म होईल. भारतातून जितके निघून गेले त्यांना कशा प्रकारे परत आणावे हेच त्यांचे काम आहे. भारतातून जितके मुसलमान गेले आहेत त्यांना अजून परत न आणू शकल्याबद्दल आपण अस्वस्थ झालेलो असलो पाहिजे. असे वातावरण निर्माण करायचे आहे आणि हे काही कठीण काम नाही. अजूनही भारतात साडेतीन कोटी मुसलमान आहेत ही मोठी गोष्ट आहे. किती गेले आणि किती येणार आहेत हे कोणालाही माहीत नाही. समजा की ते सर्व परत आले तर ते जे घर सोडून गेले होते ती घरे तर आहेतच. आपल्या पुर्वीच्याच घरात ते राहतील. त्याकरिता काही खर्च तर येणार नाही. त्यांचे जे घर आहे ते त्यांना देऊन टाकायचे इतकेच आमचे काम आहे. परंतु सर्व घरे रिकामी कुठे आहेत, त्यांच्यात शरणार्थी घुसले आहेत. परंतु तरीही आलेल्यांना वसवावे तर लागेलच. आपण जर विचारपूर्वक वागलो नाही आणि आपली अंतःकरणे जर शुद्ध नसतील तर आपण पाठवलेले प्रतिनिधीही असेच दांभिक आहेत काय असा बाहेरच्या राष्ट्रांना प्रश्न पडेल. मला वाटते ते नाहीत. आपण मुसलमानांवर राग करायचा दिवस गेले. आता आपण भाऊभाऊ आहो.

मी समजतो की दिल्लीचे लोक चांगले झाले आहेत. गुडगावचे लोक चांगले झाले आहेत. मी जेव्हा पानिपतला गेलो होतो तेव्हा सर्व काही चांगले होते. परंतु आता असे ऐकले आहे की निर्वासित

मुसलमानांच्या घरात शिरले आहेत आणि आता मुसलमानांना पाकिस्तानमध्ये जायचे आहे असे म्हणतात. ते म्हणतात की आम्ही पाकिस्तानमध्ये काही आनंदाने जात नाही, तिथे काही आमच्याकरिता शिरखुरमा वाढलेला नाही, घालायला चांगले कपडे नाहीत, आणि तिथे याहून वेगळ्या प्रकारच्या गोष्टी कशा असू शकतील. आणि वेगळ्या कशा असतील, जसे आपण इथे आहो तसेच ते तिथे आहेत. आणि तिथे फार सोयी आहेत आणि इथे नाहीत अशी काही गोष्ट नाही. जे गेले आहेत ते लिहितात की आम्ही भारतात असतो तर चांगले झाले असते. आता घरदार सोडले, शिबिरात पडले आहेत. फार त्रासात आहेत. असे तर होणारच होते. मग काय कारण आहे की पानिपतचे मुसलमान पाकिस्तानला जाऊ इच्छितात? जर अशीच गोष्ट असेल तर पानिपतमध्ये माझी परीक्षा होणार आहे व मला कदाचित तिथे जावे लागेल. ते येथून ५० मैल तर दूर आहे. त्याला दूर म्हणता येऊ शकत नाही. ते दिल्लीसारखेच आहे. आता तेथील एकाला जरी पाकिस्तानमध्ये जावे लागले तर मलाही ती गोष्ट खुपेल आणि तुम्हालाही खुपेल. अर्थातच ते जर इथे राहतील तर त्यांना जो पैसा मिळेल त्याचे त्यांना खाण्याकरिता मिळाले पाहिजे. ते मेहनती आहेत, कमावतात आणि खातात. जर त्यांनी पैसे दिले आणि खायला मिळाले नाही तर कसे चालेल? पंजाबमधून आलेल्या दुसऱ्या भावांमुळे जर भाऊभाऊ होऊन राहणाऱ्या या कारागिरांना जावे लागत असेल तर किती वाईट गोष्ट आहे? याहून अधिक वाईट काय असू शकेल? पानिपतमध्ये जितके निर्वासित आहेत त्यांना मी म्हणेन की मुसलमानांची घरे सोडून द्या, आणि मुसलमानांनीही म्हणावे की आम्ही राहू. रक्षणाकरिता आम्हाला पोलिसांची गरज नाही. आम्ही आपसात मिळूनमिसळून राहू. पोलिसांचे हेच काम आहे की जितके धान्य येईल ते सर्वांना द्यावे, सर्वांना कापड द्यावे. याहून जास्त काम करण्याची गरज नाही. असे झाले तर मी म्हणेन की काँग्रेसने चांगले काम केले. आपण चार आण्यांचे सदस्य असू अथवा नसू परंतु तरीही आपण काँग्रेसचा आदर करतो. इतके दिवस या संस्थेने देशाची सेवा केली आहे आणि आजही विपरीत वातावरण असातनासुद्धा जाणूनबुजून ती जी गोष्ट सांगते आहे तिला आपण पाठिंबा द्यावा व त्यानुसार वागावे. बस मी इतकेच म्हणेन.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ८८-९३

२४. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १९, १९४७

नोव्हेंबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अखिल भारतीय काँग्रेस कमेटीने हिंदू-मुसलमान संबंधाबद्दल मंजूर केलेल्या ठरावाचा काल सायंकाळी मी उल्लेख केला होता. परंतु दुर्दैवाने दिल्लीत आजच तो ठराव व्यर्थ ठरवण्याचा कसा प्रयत्न झाला हे मला तुम्हाला दाखवावे लागत आहे. दिल्लीतील लोकांच्या व्यवहाराबद्दल काल सायंकाळी मी जेव्हा संशय व्यक्त करत होतो तेव्हाच तो संशय खरा ठरवण्याचा प्रयत्न जुन्या दिल्लीच्या केंद्रीय ठिकणीच केला जाईल अशी कल्पनासुद्धा मी केली नव्हती. मला असे सांगण्यात आले की हिंदू आणि शिखांची फार मोठी गर्दी एका मुसलमानाच्या दुकानासमोर गोळा झाली. ते दुकान जरी मुसलमानाचे होते तरी तो ते सोडून निघून गेलेला होता. तो दुकानदार परत आला तर ते दुकान मूळ मालकाला परत करण्याच्या अटीवर एका निर्वासिताला देण्यात आले होते. सुदैवाने त्या दुकानाचा मालक परतला. त्याला आपला व्यवसाय कायमचा बंद करायचा नव्हता. ज्या अधिकाऱ्याकडे हे काम होते तो त्या निर्वासिताकडे आला व त्याने त्याला ते दुकान खाली करण्याकरिता सांगितले. आधी तो निर्वासित ते दुकान रिकामे करण्याकरिता काचकूच करत होता. परंतु नंतर मूळ मालक ताबा घेण्याकरिता संध्याकाळी येईल तेव्हा मी दुकान रिकामे करतो असे त्याने कबूल केले. सायंकाळी जेव्हा अधिकारी परत गेला तेव्हा त्या निर्वासिताने दुकान रिकामे करण्याऐवजी आपल्या मित्रांना कळवले व असे म्हणतात की जो कोणी दुकान रिकामे करून घेण्याकरिता येईल त्याला धमकी देण्याकरिता ते मित्र तिथे गोळा झाले होते. चांदनी चौकातील थोडेसे पोलीस त्या जमावाला नियंत्रणात ठेवू शकत नव्हते. यामुळे त्यांनी जास्त मदत बोलावली. पोलीस वा लष्करातील सैनिक आले आणि त्यांनी हवेत गोळीबार केला. जमाव घाबरून पांगला, परंतु या गोंधळात एका पादचाऱ्याला भोसकण्यात आले. सुदैवाने त्याला झालेली जखम जीव घेणारी नव्हती. परंतु दंगलखोरांच्या या गोंधळाचा विचित्र परिणाम झाला. दुकान रिकामे करण्यात आले नाही. त्या अधिकाऱ्याच्या आदेशाची अवहेलना करण्यात आली की एव्हाना ते दुकान रिकामे करण्यात आले आहे हे मला माहीत नाही. भारताला मिळालेल्या अमूल्य स्वातंत्र्यामुळे सरकारला जी सत्ता मिळाली आहे तिची बूज कायम राखण्याकरिता सरकार या प्रकरणातील अपराध्याला शिक्षा केल्याशिवाय राणार नाही अशी आशा तरीही मी करतो. असे केले नाही तर सरकारची सत्ता सत्ताच राहणार नाही. हिंदू आणि शिखांचा तो जमाव दोन हजार लोकांपेक्षा कमी नव्हता असे मला सांगण्यात आले आहे.

मला ही जी बातमी सांगण्यात आली तिचा प्रखरपणा कमी करून मी सांगितली आहे. तिच्यात काही चूक असेल व ती जर माझ्या लक्षात आणून दिली गेली तर ती तुम्हाला कळवण्यात मला आनंद होईल.

ही केवळ एक गोष्ट आहे. दिल्लीच्या दुसऱ्या भागातसुद्धा हिंदू आणि शीख निर्वासितांना सामावून घेता यावे म्हणून मुसलमानांना त्यांच्या घरातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. शीख आपल्या तलवारी परजत निघतात आणि मुसलमानांनी आपले घर रिकामे केले नाही तर त्यांना गंभीर परिणामांची भीती दाखवून घाबरवतात. मला असेही सांगण्यात आले आहे की शीख दारू पितात. त्याच्या परिणामांची कल्पना सहज करता येऊ शकते. ते आपल्या नग्न तलवारीसह नाचतात आणि पादचाऱ्यांना घाबरवतात. मला असेही कळले आहे की चांदनी चौकाच्या जवळपासच्या भागात कबाब आणि इतर मांसाचे पदार्थ न विकण्याची मुसलमानंमध्ये रीत आहे. परंतु शीख आणि इतर निर्वासित हे निषिद्ध पदार्थ त्या परिसरात बिनदिक्कतपणे विकतात. हा उपद्रव इतका वाढला आहे की चांदनी चौकाच्या गर्दीतून लोकांना चालणेसुद्धा कठीण होते. त्यांना अपमानित होण्याची भीती वाटते. माझ्या निर्वासित बांधवांना माझी विनंती आहे की त्यांनी स्वतःकरिता आणि आपल्या देशाकरिता तरी अशा प्रकारचे वर्तन करू नये.

किरपाणबद्दल बोलायचे तर शिखांना ठरवण्यात आलेल्या लांबीपेक्षा जास्त लांबीची किरपाण ठेवण्याकरिता मनाई आहे. ही मनाई असताना ती काढून टाकण्यात यावी अशी विनंती करण्याकरिता अनेक शीख मित्र माझ्याकडे आले होते. शिखांना कितीही लांब किरपाण ठेवण्यास परवानगी देणारा जो निवाडा अनेक वर्षांपूर्वी प्रिव्ही कौन्सिलने दिला होता तो ते उद्धृत करत होते. मी तो निवाडा वाचलेला नाही. मला वाटते की न्यायाधीशांनी किरपाण म्हणजे कोणत्याही आकाराची तलवार असा अर्थ घेतला असावा. प्रिव्ही कौन्सिलच्या आदेशाचे पालन करण्याकरिता मग तेव्हाच्या पंजाब सरकारने प्रत्येकाला तलवार ठेवण्याची मुभा दिली. यामुळेच पंजाबमध्ये अनेक लोक आपल्याला हव्या त्या आकाराची तलवार ठेवतात.

याबबतीत मला पंजाब सरकार वा शिखांबद्दल कोणतीही सहानुभूती वाटत नाही. किरपाण हे निरपराध लोकांवर हल्ला करण्याचे वा कशाही प्रकारे उपयोग करावा असे हत्यार नाही या माझ्या मताचे समर्थन करणारे ग्रंथसाहेबमधील उतारे काही शीख मित्रांनी मला काढून दाखवले. ग्रंथसाहेबमधील आज्ञांचे पालन करणारे शीखच असहाय स्त्रिया, मुले आणि वृद्ध यांच्या रक्षणाकरिता किरपाणचा उपयोग करू शकतात. यामुळे एक शीख सव्वा लाख विरोधकांच्या बरोबरीचा समजला जातो. यामुळे जो शीख मादक पदार्थांचे सेवन करतो, जुगार खेळतो वा इतर दोषांना बळी पडतो त्याला

किरपाण ठेवण्याचा अधिकार नसतो कारण किरपाण हे शुद्धता आणि संयम यांचे प्रतीक आहे. किरपाणचा उपयोग विशिष्ट परिस्थितीतच विशेष पद्धतीने करता येऊ शकतो.

माझ्या मते किरपाणचा मनात येईल तसा उपयोग करण्याकरिता प्रिव्ही कौन्सिलच्या कालबाह्य निवाड्याचा उल्लेख करणे निरर्थक आणि हानिकारक आहे. नुकताच आपण स्वतःला विदेशी शासनापासून मुक्त केले आहे. स्वातंत्र्याच्या या अवस्थेत सर्व चांगले निर्बंध तोडणे योग्य नाही. अशा नियमांशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. यामुळे मी माझ्या शीख मित्रांना सांगेन की संशयास्पद कामाकरिता किरपाणचा उपयोग करून शीख धर्माची बदनामी करू नये आणि जो धर्म अनेक हुतात्म्यांच्या हौतात्म्यावर उभारलेला आहे, व ज्यांच्या हौतात्म्याचा जगाला फार मोठा अभिमान वाटतो त्या धर्माच्या विनाशाकरिता कारणीभूत होऊ नये.

मी तुमचे लक्ष अजून एका गोष्टीकडे वेधू इच्छितो. मला एका अशा निर्वासित शिबिराची माहिती कळवण्यात आली आहे की जिथे सैन्यावर असभ्य वर्तुणुकीचे आरोप करण्यात आले आहेत. शिबिरातील संपूर्ण जीवन बाह्य आणि आंतर शुद्धतेच्या दृष्टीने नमुनेदार असले पाहिजे. ही शुद्धता टिकवण्याकरिता पोलीस आणि सैन्यात चुरस लागली पाहिजे. यामुळे मला जी सूचना देण्यात आली आहे ती कायदा आणि व्यवस्था यांची जबाबदारी असलेल्या या लोकांवर सरसकट लागू होऊ शकत नाही अशी मला आशा आहे. तो एक अपवाद असावा. सैन्य आणि पोलीस यांना सर्वात आधी स्वातंत्र्याचा प्रकाश दिसायला पाहिजे आणि त्याने ते उत्तेजित झाले पाहिजे. त्यांच्यावर जेव्हा वरून कडक शिस्त लादली जाते तेव्हाच त्यांच्याकडून सद्वर्तनाची अपेक्षा करता येते असे म्हणायची संधी लोकांना मिळायला नको. आम्हीसुद्धा भारताचे उत्तम आणि आदर्श नागरिक आहो हे त्यांनी आपल्या उत्तम वागणुकीद्वारे दाखवून दिले पाहिजे. कायद्याचे हे रक्षकच जर कायद्याकडे दुर्लक्ष करतील तर प्रशासन चालवणे अगदीच कठीण व अशक्य होऊन जाईल. आणि मग अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या ठरावांचा अंमल करणे तर अजूनच कठीण होऊन जाईल.

या चित्राची धूसर बाजू दाखवल्यानंतर मी तुमच्यासमोर चांगली बाजूसुद्धा मांडू इच्छितो. मला आदर्श शौर्याची प्रत्यक्षदर्शीकडून जी हकिगत कळली ती मी तुम्हाला सांगेन.

मीर मकबूल शेरवाणी हा नॅशनल कॉन्फरन्सचा बारामुल्ला येथील तरुण पुढारी होता. त्याने नुकताच १३व्या वर्षात प्रवेश केला होता. तो नॅशनल कॉन्फरन्सचा महत्त्वाचा पुढारी आहे हे कळल्यानंतर घूसखोरांनी त्याला निशांत टॉकीजवळील दोन खांबांना बांधले. आधी त्यांनी त्याला मारले आणि मग त्याला म्हणाले की तू नॅशनल कॉन्फरन्स आणि तिचे पुढारी काश्मीरचे शेर शेख

अब्दुल्ला यांना सोडायला पाहिजे. तू तुझी निष्ठा पॉलंद्रा येथे मुख्यालय असलेल्या आझाद काश्मीरला वाहिली पाहिजे.

शेरवाणीने दडपणाखाली नॅशनल कॉन्फरन्स सोडण्याला नकार दिला. त्याने त्यांना स्पष्टपणे सांगितले की काश्मीर सरकारचे प्रमुख शेखच आहेत आणि भारतीय सैन्य आधीच काश्मीरमध्ये पोहोचलेले आहे व लवकरच ते घुसखरांना हाकलून लावणार आहे.

हे ऐकून हल्लेखोर चिडले आणि घाबरलेसुद्धा. त्यांनी त्याच्या शरिरावर १२ गोळ्या झाडल्या. त्यांनी त्याचे नाक कापले आणि त्याचा चेहरा विद्रूप केला व त्याच्या शरीरावर एक पत्रक डकवले, ज्यावर लिहिले होते - "हा गद्दार आहे, याचे नाव शेरवाणी आहे. सर्व देशद्रोह्यांची हीच गत होणार आहे"

परंतु या निर्घृण खुनानंतर व रक्तपातानंतर ४८ तासांच्या आतच शेरवाणीची भविष्यवाणी खरी ठरली. घुसखोर घाबरून बारामुल्लाहून पळाले व भारतीय सैन्याने त्यांचा पाठलाग करत त्यांना पळवून लावले.

अशा प्रकारच्या हौतात्म्याचा प्रत्येकाला, मग तो हिंदू, शीख, मुसलमान वा इतर कोणीही असो अभिमान वाटला पाहिजे.

माझ्या एका मित्राने मला हा असा प्रसंग सांगितला की ज्याचे तेज या दुःखद प्रसंगातही कमी होऊ शकत नाही आणि या महान कसोटीच्या प्रसंगातही मैत्रीच्या या क्षणाचे मूल्य कधीही कमी होऊ शकत नाही.

ही गोष्ट नारायण सिंग या माजी अधिकाऱ्यांनी सांगितली आहे. त्यांनी पश्चिम पंजाबमध्ये प्रचंड संपत्ती गमावली आहे. आता ते दिल्लीत आहेत. आता त्यांच्याजवळ काहीही शिल्लक राहिले नाही. याचा अर्थ भीक मागणे वा मृत्यूने त्यांना वरणे हे दोनच मार्ग त्यांच्यासमोर शिल्लक राहिले आहेत. ते आपल्या एका जुन्या मित्राला भेटले परंतु आपल्या दुःखाची छाया त्या मित्रावर पडू देण्याची त्यांची इच्छा नाही. आणि त्यांना आपल्या दुर्दैवाची मुळीच फिकीर वाटत नाही. या शीख अधिकाऱ्याला आपले जुने मित्र आणि साथी अधिकारी अली शाह यांना भेटून फार आनंद झाला. अली शाह यांनीसुद्धा आपली संपूर्ण मालमत्ता गमावली आहे. परंतु सांप्रदायिक कारणामुळे तसे झालेले नसून इतर काही दुर्दैवी घटनेमुळे तसे झालेले आहे. नारायणसिंगसारखेच ते बहादूर आहेत आणि दोघांनाही आपल्या मैत्रीचा अभिमान वाटतो. पंचवीस वर्षांनंतर जेव्हा ते भेटले तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की त्यात ते आपले सर्व दुःख विसरून गेले.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ९३-९८

२५. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २०, १९४७

नोव्हेंबर २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला पूर्वीच्याच व्यक्तीकडून चिठ्ठ्या मिळाल्या आहेत. एका चिठ्ठीत ते म्हणतात की त्यांनी नोकरी सोडली आहे आणि माझ्या हाताखाली काम करण्याची त्यांची इच्छा आहे. दुसऱ्या एका चिठ्ठीतून त्यांनी प्रार्थनेच्या वेळी भजन म्हणण्याची इच्छा व्यक्त केली आहे. पहिल्या इच्छेबद्दल मी म्हणेन की त्यांनी नोकरी सोडून चूक केली आहे आणि मी त्यांची इच्छा पूर्ण करू शकत नाही. हे खरे आहे की ब्रिटिशांच्या काळात मी लोकांना नोकरी सोडण्याकरिता व सरकारशी असहकार करण्याकरिता आवाहन करत असे. परंतु आता ती परिस्थिती नाही. ज्या कोणाला आपल्या देशाची सेवा करायची असेल तो आपली नोकरी करतानाही तसे करू शकतो. प्रत्येक पगारदार माणूस आपले काम प्रामाणिकपणे व कोणत्याही हिंसक प्रकारात भाग न घेता करील तर तो देशाची सेवाच करत असतो यात काही संशय नाही. माझ्याजवळ देण्यासारखे कोणतेही काम नाही हे ही चिठ्ठी लिहिणाराने लक्षात ठेवावे. त्यांना जर सेवाच करायची असेल तर आता मी ज्या गोशाळेच्या विषयासंबधी मी बोलणार आहे त्यासंबंधी त्यांनी काही तरी अवश्य करावे.

प्रार्थनेत भजन म्हणण्यासंबंधी सांगायचे तर कोणालाही भजन म्हणण्याची परवानगी देता येऊ शकत नाही. जे लोक ईश्वराचे सेवक म्हणून ओळखले जातात तेच पूर्वपरवानगीने भजन म्हणू शकतात.

शिबीर (गांधीजी दुपारी सुचेता कृपलानी आणि इतरांबरोबर ओखला येथील शिबिर पाण्याकरिता गेले होते.) कौतुक करावे इतके स्वच्छ ठेवलेले दिसल्यामुळे मला आनंद झाला. यात्रेच्या काळात येणाऱ्या लोकांकरिता तिथे अनेक ठिकाणी धर्मशाळा आहेत. तिथे अशा यात्रा विशिष्ट कालावधीनंतर वारंवार होत असतात. सध्या या धर्मशाळा निर्वासितांकरिता वापरल्या जात आहेत. तिथे पाण्यासंबंधी काही अडचणी आहेत परंतु अधिकारी त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. पाणीपुरवठ्याची समस्या सोडवली गेली तर तिथे अजून किती तरी निर्वासितांची व्यवस्था होऊ शकेल याबद्दल मला किंचितही संशय नाही.

आता मी निर्वासितांबद्दल बोलत असल्यामुळे त्यांच्या ज्या उणिवा माझ्या निदर्शनास आणून देण्यात आल्या त्यांच्याबद्दलही मी बोलणार आहे. मला असे सांगण्यात आले की निर्वासित निर्वासितांमध्येच काळाबाजार करतात. ज्या अधिकाऱ्यांवर निर्वासितांकडे पाहण्याची जबाबदारी आहे तेच दोषी असल्याचेही मला सांगण्यात आले आहे. शिबिराच्या संबंधित अधिकाऱ्यांना लाच

दिल्याशिवाय शिबिरात जागा मिळणे अशक्य आहे असे मला कळले आहे. इतर बाबतीतील त्यांची वर्तणूक टीकास्पद नाही असे नाही. हे खरे आहे की सर्व अधिकारी गुन्हेगार असू शकत नाही परंतु एका पाप्यामुळेसुद्धा संपूर्ण नाव बुडू शकते.

याशिवाय मला असेही सांगण्यात आले आहे की निर्वासित भुरट्या चोऱ्या करतात. मी त्यांच्याकडून प्रामाणिक आणि सरळ व्यवहाराची अपेक्षा करतो. मला असे कळले आहे की थंडीचा बचाव करण्याकरिता निर्वासितांना ज्या दुलया पुरवण्यात आल्या होत्या त्यातील काही फाडण्यात आल्या, त्यातील कापूस फेकून देण्यात आला आणि छीटची जी खोळ होती तिचे शर्ट इत्यादी तयार करण्यात आले. मला अशा अनेक गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. परंतु निर्वासितांची सर्व अपकृत्ये सांगण्यात तुमचा वेळ घेण्याची माझी इच्छा नाही. मी आता लगेच संध्याकाळच्या मुद्यावर येऊ इच्छितो.

दिल्लीतील किशनगंज भागातील वस्तीत गोशाळेचा वार्षिक समारंभ आहे. आचार्य कृपलानी उद्या त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष राहणार आहेत आणि मी निदान दहा मिनीट तरी उपस्थित राहिलो पाहिजे असा गोशाळेच्या लोकांचा आग्रह आहे. मला असे वाटते की केवळ देखाव्याकरिता मी कोणत्याही कार्यक्रमाला हजर राहू नये. दहा मिनीटात मी काहीही करू वा पाहू शकत नाही. याशिवाय या सांप्रदायिक समस्येत मी इतका काही गुंतलो आहे की मला इतर कुठेही उपस्थित राहण्याकरिता वेळच नाही. यामुळे मी माझी असाहयता व्यक्त केली आणि संघटकांनीसुद्धा मला क्षमा केली आणि माझी अडचण ओळखून ते म्हणाले की मी गोसेवा व विशेषतः गोशाळेसंबंधी प्रार्थना प्रवचनात काही म्हणालो तर आमचे समाधान होईल. मी ही गोष्ट तत्परतेने मान्य केली. मी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की पाळीव पशू आणि गाय व तिच्या वासराची काळजी घेणे ही गोष्ट भारतात राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यापेक्षासुद्धा किती तरी कठीण आहे. (पाहा गाय कशी वाचवावी ऑगस्ट २२, १९४७) माझा दावा आहे की मी या क्षेत्रात श्रद्धा आणि भक्तिभावाने काम करत आहे. त्याचबरोबर गाय कशी वाचवावी याचेही मला ज्ञान आहे. असे असले तरी या समस्येकडे लोकांचे जितके लक्ष वेधता यायला पाहिजे तितके वेधायला लावण्याइतका माझा जनतेवर प्रभाव नाही हेसुद्धा मला मान्य आहे. जे लोक गोशाळा चालवतात त्यांना या कामाकरिता पैसा कसा खर्च करावा वा निधी कसा गोळा करावा हे माहीत असते. परंतु जनावरांची वैज्ञानिक पद्धतीने देखभाल कशी करावी हे त्यांना माहीत नसते. गाय जास्त दूध देईल अशा प्रकारे तिचे संगोपन कसे करावे हे त्यांना माहीत नसते. वळूची निगा कशी राखावी वा त्यांच्या वंशात कशी सुधारणा करावी हेही त्यांना माहीत नसते.

यामुळे संपूर्ण भारतातील गोशाळा अशा नाहीत की जिथे माणासाला पशुपालनाच्या कलेचे शिक्षण मिळू शकेल, त्या गोशाळा अशा नाहीत की ज्यांना उत्तम प्रतीचे दूध पुरवू शकणारे आदर्श दुग्धालय म्हणता येईल आणि ज्यांच्यामधून गायी आणि बैलांच्या उत्तम जाती तयार होऊ शकतील. उलट गोशाळांमधील पशूंची अवस्था दयनीय असते. परिणाम असा झाला आहे की ज्या भारतात उत्तम प्रतीचे गायीबैल आणि दूधदुभते कमीतकमी किंमतीत मिळायला पाहिजे त्याबाबतीत भारत अगदी खालच्या पातळीवर आहे. त्यांना हेसुद्धा माहीत नसते की पशूंच्या शेणाचा आणि मुत्राचा फार किफायतशीरपणे उपयोग करता येऊ शकतो. तसेच त्यांना मृत जनावरांचा चागल्यात चांगला उपयोग कसा करावा हेही कळत नसते. या अज्ञानामुळे आपले करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. तज्ज्ञ लोक सांगतात की आपले पशुधन हे देशावर केवळ ओझे आहे व त्यामुळे ते नष्ट करण्याच्या पात्रतेचे आहे. मला हा दृष्टिकोन मान्य नाही. परंतु या बाबतीतील लोकांचे अज्ञान अजून असेच काही काळ सुरू राहिले तर आपले पशू देशावर ओझे झाले तर मला नवल वाटणार नाही. यामुळे गोशाळेचे संचालक गोशाळेला सर्व दृष्टींनी आदर्श गोशाळा बनवण्याचा प्रयत्न करतील अशी मी आशा करतो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ९८-१०१

२६. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २१, १९४७

नोव्हेंबर २१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझे हे भाषण सुरू असतानाच मी तुम्हाला काल सांगितल्याप्रमाणे गोशाला आपला वार्षिक कार्यक्रम साजरा करत असेल. मला एका गोष्टीचा उल्लेख करायचा आहे. कालच्या भाषणात सौनिकांकरिता सुरू असलेल्या संपूर्ण भारतातील दुग्धालयांचा मी उल्लेख केला नव्हता. डॉ. राजेंद्र प्रसाद सांगत होते की ही दुग्धालये अजूनही कार्यरत आहेत. अनेक वर्षांपूर्वी (जून १२, १९४७ला; पाहा विल्यम स्मिथ यांना पत्र जून १४, १९४७) मी बंगलोर येथील केंद्रीय दुग्धालयाला भेट दिली होती. ते दुग्धालय कॉलनल स्मिथ यांच्या देखरेखीखाला काम करत होते. तिथे मी काही सुंदर गायी पाहिल्या. त्यातील एक बक्षीस मिळवणारी गाय होती. संपूर्ण आशियात ती पहिल्या क्रमांकाची गाय होती असे समजले जात होते. ती दररोज ७५पौंड दूध देत होती की एका वेळी हे मला नीट आठवत नाही. कोणत्याही बंधनाशिवाय हवे तिथे ही गाय फिरू शकत होती. तिच्याकरिता विविध ठिकाणी चारा ठेवलेला असे. तो ती केव्हाही खाऊ शकत असे. ही त्या चित्राची चांगली बाजू आहे. मी दुसरी बाजू पाहिलेली नाही. परंतु मला असे अधिकृत सुत्रांकडून कळले आहे की तिथे मोठ्या संख्येत गोऱ्ह्यांना (नर वासरू) मारून टाकले जात असते. जड ओझे वाहून नेतील अशा बैलांमध्ये सर्वच गोऱ्ह्यांची वाढ होऊ शकणार नसल्यामुळे तिथे असे करत असत. ही दुग्धालये जास्त जरी नाही तरी शेकडो एकर जमिनीत पसरलेली असत. ती विशेषतः युरोपीय सैनिकांकरिता असत व त्यांच्यावर करोडो रुपये खर्च केले जात असत. आता आपल्या देशात ब्रिटिश शिपाई नसल्यामुळे मी या दुग्धशाळा आवश्यक आहेत असे समजत नाही. आपल्याकरिता असलेल्या दुग्धालयांवर इतका अधिक खर्च होतो असे भारतीय सैनिकांना कळले तर त्यांना लाज वाटेल. सर्वसामान्य माणसांना जे मिळू शकत नाही त्याची भारतीय सैनिक हक्क म्हणून मागणी करतील असे मला निश्चितच वाटत नाही.

गाय आणि म्हैस यांच्या संबंधात सर्वात जास्त प्रामाणिक आणि कदाचित संपूर्ण माहिती खादी प्रतिष्ठानचे श्री सतीश चंद्र दास गुप्ता यांच्या मोठ्या जाडजूड ग्रंथात मिळू शकेल. (काऊ इन इंडिया या दोन खंडात प्रकाशित झालेल्या ग्रंथात. या ग्रंथाला गांधीजींनी प्रस्तावना लिहिली आहे. पाहा काऊ इन इंडिया या ग्रंथाची प्रस्तावना मे २०, १९४५) इकडून तिकडून घेतलेल्या अवतरणांनी हा ग्रंथ भरलेला नाही. उलट ते तुरुंगात होते तेव्हा स्वतःच्या अनुभवाने त्यांनी तो ग्रंथ लिहिला आहे. बंगाली आणि हिंदुस्तानीत त्याचा अनुवाद झाला आहे. जे हा ग्रंथ काळजीपूर्वक वाचतील त्यांना या पशूंची प्रजाती कशी चांगली करावी आणि त्यांच्यापासून अधिक दूध कसे मिळवावे हे कळू शकेल. या पुस्तकात गाय

आणि बैल यांचा तुलनात्मक अभ्यासही आहे. (यानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नाला गांधीजींनी उत्तर दिले. ते प्रश्न होते - हिंदू म्हणजे काय'? या शब्दाचे मूळ कशात आहे'? हिंदूधर्म म्हणून काही आहे काय'?)

हे सर्व या वेळेकरिता योग्य प्रश्न आहेत. मी काही इतिहासाचा फार मोठा विद्वान नाही. माझा तर विद्वान असल्याचाही दावा नाही. परंतु हिंदुत्वावर लिहिलेल्या कोणत्या तरी चांगल्या पुस्तकात मी वाचले आहे की वेदांमध्ये हिंदू हा शब्द नाही. महान अलेक्झॅन्डर जेव्हा भारतावर आक्रमण करण्याकरिता आला तेव्हा या सिंधूच्या, म्हणजे जिला इंग्रजी भाषिक लोक इंडस म्हणतात, पूर्वेकडे राहणाऱ्या या भागातील लोकांचे वर्ण हिंदू करत असत. सिंधूतील 'स' हे अक्षर ग्रीकमध्ये 'ह' झाले. व या भागात राहणाऱ्या लोकांचा धर्म हिंदू धर्म म्हणून ओळखला जाऊ लागला. हा धर्म जगातील इतर सर्व धर्मांपेक्षा अधिक सहिष्णू आहे. इतर धर्माच्या लोकांचा छळ चुकवण्याकरिता पळून आलेल्या ख्रिश्चनांना त्याने आश्रय दिला. याशिवाय बेने इस्राईल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्यूंना आणि पारसी लोकांनाही या धर्माने आश्रय दिला. या धर्मात सर्व धर्मांचा समावेश असल्यामुळे व हा धर्म सर्वात जास्त सहनशील असल्यामुळे मला या धर्माचा सदस्य असल्याबद्दल अभिमान वाटतो. विद्वान आर्य आधी वेदातील धर्माचे पालन करत असत आणि भारताला आधी आर्यावर्त म्हणत असत. परत त्याला आर्यावर्त म्हणावे अशी मला कोणतीही इच्छा नाही. माझ्या कल्पनेतील हिंदूधर्म हा परिपूर्ण धर्म आहे. त्यात वेदांचा समावेश आहे यात काही संशय नाही, परंतु त्यात इतरही अनेक गोष्टींचा समावेश आहे. हिंदू धर्माची महत्ता कोणत्याही प्रकारे कमी केल्याशिवाय मुसलमान, पारसी, यहुदी, ख्रिश्चन या धर्मांची जी महत्ता आहे व त्या धर्मांबद्दल मी हिंदू धर्माइतकीच श्रद्धा जाहीर करू शकतो आणि असे करताना मी काही चुकीचे करतो असे मला मुळीच वाटत नाही. असा हा हिंदू धर्म तोपर्यंत जिवंत राहील जोपर्यंत आकाशात सूर्यचंद्र आहेत. तुलसीदासांनी ही कल्पना आपल्या एका दोह्यामधून व्यक्त केली आहे -

"दया धरम को मूल है। पाप मूल अभिमान।

तुलसी दया न छोडिये, जब लगि घटमें प्राण।।"

दया हे धर्माचे मूळ आहे व अहंकार हे पापाचे मूळ आहे. जोपर्यंत तुझ्यात जीव आहे तोपर्यंत दया सोडू नको असे तुलसीदास सांगतात.

मी जेव्हा ओखला छावणी पाहण्याकरिता गेलो होतो तेव्हा एक भगिनी माझ्याबरोबर होत्या (सुचेता कृपलानी). काही छावण्यांमधील निर्वासितांच्या गैरवर्तणुकीबद्दल मी जे बोललो ते ओखला छावणीतील निर्वासितांबद्दल तर नाही ना असा विचार मनात येऊन त्या घाबरल्या. मी ओखला येथील छावणीला घाईगडबडीत भेट दिली होती. यामुळे त्या छावणीबद्दल असे काही म्हणण्याची शक्यताच

नव्हती. सर्वसाधारणपणे निर्वासितांच्या छावण्याबद्दल जे घडत होते त्याबद्दल मी माझ्या भाषणात बोललो होतो.

मला मिळालेल्या माहितीप्रमाणे दिल्लीत दंगलींच्या दरम्यान जवळपास १५० मशिदी उद्ध्वस्त करण्यात आल्या याचा उल्लेख केल्याशिवाय मी राहू शकत नाही. त्यातील काहींचे देवळात रूपांतर करण्यात आले आहे. अशीच एक मशीद कॅनॉट प्लेसजवळ आहे. तिच्याकडे कोणाचेही लक्ष गेल्याशिवाय राहत नाही. आज तिच्यावर तिरंगा फडकत आहे. तिथे मुर्ती ठेवून तिला मंदिराचे रूप देण्यात आले आहे. मशिदीला अशा प्रकारे बिघडवणे ही गोष्ट हिंदू आणि शीख धर्माकरिता लांछनास्पद आहे. माझ्या दृष्टीतून हा सरळसरळ अधर्म आहे. पाकिस्तानमध्ये मुसलमानांनीसुद्धा हिंदूंच्या देवळांना अशाच प्रकारे बिघडवले वा त्यांचे मशिदीत रूपांतर केले असे म्हणून हा कलंक पुसला जाऊ शकत नाही. माझ्या दृष्टिकोनातून अशा कोणत्याही कृत्यामुळे धर्माचा विध्ववंस होतो मग तो धर्म हिंदू धर्म असो, शीख धर्म असो वा इस्लाम असो. (यानंतर गांधीजींनी अखिल भारतीय काँग्रेस कायकारिणीचे नोव्हेंबर १५,१६, १७ १९४७चे या विषयावरील ठराव वाचून दाखवले. पाहा परिशिष्ट अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीचे नोव्हेंबर १५,१६, १७ १९४७चे ठराव.)

आज नेहमीपेक्षा प्रार्थनेत जास्त वेळ थांबण्याचा धोका पत्करूनसुद्धा एक गोष्ट सांगणे माझे कर्तव्य आहे असे मी समजतो. मला असे सांगण्यात आले आहे की गुडगावजवळ रोमन कॅथॉलिक लोकांना त्रास देण्यात येत आहे. ही गोष्ट दिल्लीहून २५ मैल अंतरावर असलेल्या कन्हाई गावात घडलेली आहे. एक भारतीय रोमन कॅथॉलिक पाद्री आणि एक ख्रिश्चन मिशनरी मला भेटायला आले होते. रोमन कॅथॉलिक लोकांचा हिंदू कसा छळ करत आहेत याचे वर्णन करणारे पत्र त्यांनी मला दाखवले. आश्चर्य म्हणजे ते पत्र उर्दूत लिपीत लिहिलेले होते. मला असे वाटते की त्या भागात राहणारे हिंदू, शीख आणि इतर सर्व लोक हिंदुस्तानीत बोलतात व केवळ उर्दू लिपीत लिहितात. तुम्ही हे गाव सोडून गेला नाही तर त्याचे गंभीर परिणाम होतील अशी धमकी तेथील रोमन कॅथॉलिक लोकांना देण्यात आली आहे असे सूचना देणाऱ्या लोकांनी मला सांगितले. मला आशा आहे की धमकीची ही गोष्ट खोटी आहे आणि तेथील ख्रिश्चन बंधुभगिनींना कोणत्याही अडथळ्याशिवाय आपल्या धर्माचे पालन करू देण्यात येत असेल व काम करू देण्यात येत असेल. आता आम्हाला इंग्रजांच्या गुलामगिरीपासून स्वातंत्र्य मिळाले आहे. यामुळे आजही धर्म आणि काम करण्याचे त्यांना तेच स्वातंत्र्य आहे जे त्यांना ब्रिटिशांच्या काळात होते. आपण जे स्वातंत्र्य मिळवले त्याचा अर्थ भारतात हिंदूंची सत्ता आणि पाकिस्तानमध्ये मुसलमानांची सत्ता आहे असा होत नाही. माझ्या एका भाषणात (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २१, १९४७) मी आधीच सांगितले आहे की मुसलमानांविरुद्धचा हा राग

जेव्हा निवळेल तेव्हा तो हिंदू आणि शीख परस्परांवर काढतील. परंतु माझे भविष्य इतक्या लवकर खरे ठरेल असे मला वाटले नव्हते. मुसलमानांविरुद्धचा राग अजून पूर्णपणे निवळलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे हे ख्रिश्चन पूर्णपणे निरपराध आहेत. ते ख्रिश्चन आहेत हाच त्यांचा एकमेव अपराध आहे. त्यांचा सर्वात मोठा अपराध ते गोमांस आणि डुकराचे मांस खातात हा आहे. या गोष्टीत काही तथ्य आहे काय असे उत्सुकता म्हणून मी त्या पाद्र्याला विचारले. तेव्हा तो म्हणाला की या रोमन कॅथॉलिकांनी गोमांस खाणे स्वतःहोऊन काही दिवसांपूर्वीच सोडले आहे. अशा प्रकारचे बालीश पूर्वग्रह कायम राहिले तर भारताचे भवितव्य काळोखात बुडालेले राहणे अपरिहार्य आहे. हा पाद्री जेव्हा रेवाडीत होता तेव्हा त्याची सायकल हिसकून घेतली गेली व तो मोठ्या मुश्किलीने वाचला. हिंदू आणि शीख सोडून सर्व लोक जेव्हा नष्ट होतील तेव्हाच ही दुःखद वेळ संपणार आहे काय?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १०१-५

२७. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २२, १९४७

नोव्हेंबर २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काही वाईट घटना सोनीपतच्या काही ख्रिश्चनांबरोबरही घडल्या असल्याचे वृत्त मला मिळाले आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन नोव्हेंबर २१, १९४७) मला असे सांगण्यात आले की निर्वासितांना तुमच्या इमारतींचा उपयोग करू द्या असे आधी ख्रिश्चनांना सांगण्यात आले व त्याकरिता त्यांनी आनंदाने परवानगीही दिली होती. परंतु हे उपकार शापात बदलले कारण त्यांच्या इतर इमारतीही बळजबरीने निर्वासितांच्या कामाकरिता घेण्यात आल्या आणि सोनीपतमधील तुमचे राहणे दुःखकारक होऊ नये असे तुम्हाला वाटत असेल तर येथून निघून जा असे त्यांना सांगण्यात आले. मला जशी ही गोष्ट सांगण्यात आली तशीच असेल तर हा आजार वाढत चालला आहे आणि भारताला तो कुठे घेऊन जाईल हे सांगता येत नाही.

मी जेव्हा या विषयावर मित्रांशी चर्चा करत होतो तेव्हा मला सांगण्यात आले की पाकिस्तानमधील अशाच प्रकारच्या घटना जोपर्यंत कमी होत नाहीत तोपर्यंत परिस्थितीत फारसा फरक पडेल अशी आशा करता येणार नाही. या गोष्टीच्या समर्थनार्थ लाहोरसंबंधी वृत्तपत्रांमध्ये जे काही छापून आले होते त्याचे उदाहरण माझ्यासमोर ठेवण्यात आले. मी स्वतःच वृत्तपत्रांमध्ये छापलेल्या बातम्या १०० टक्के खऱ्या आहेत असे समजत नाही व वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या कहाण्यांचा आपल्या मनावर तितकासा प्रभाव पडू देऊ नका असे मी वृत्तपत्रे वाचणारांना सूचीत करीन. चांगल्यात चांगली वृत्तपत्रेसुद्धा बातम्यांना तिखटमीठ लावून सांगणे आणि त्यांच्यात रंग भरण्याच्या प्रवृत्तीपासून दूर नाहीत. आणि समजा की वृत्तपत्रात तुम्ही वाचलेले सर्व काही सत्य असेल तरी एखाद्या वाईट गोष्टीची नक्कल करू नये.

एका अशा काटकोनाकृती फोटोफ्रेमच्या चौकटीची कल्पना करा की ज्यांत फोटो लावलेला नाही. त्या चौकटीला तुम्ही थोडेसेही आडवेतिडवे धरले तरी तिच्या कोनांची रचना बदलेल. काही कोन लघुकोन होतील तर काही विशाल. आणि त्या चौकटीचा एक कोन बरोबर होईल अशा प्रकारे धरले तर तिचे इतर सर्व कोन आपोआप काटकोन होतील.

याचप्रमाणे भारतीय संघ सरकार आणि जनता योग्य वर्तन करतील तर पाकिस्तानही असेच करू लागेल व संपूर्ण हिंदुस्तान परत समंजसपणा धारण करील याबद्दल मला किंचितही संशय नाही. ख्रिश्चनांबरोबर केलेल्या वाईट वर्तनावरून, ज्यांनी माझ्या माहितीप्रमाणे कोणताही अपराध केलेला

नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की हे वेड अधिक वाढू नये म्हणून आपण खबरदारी घेतली पाहिजे. आणि भारताला जगासमोर आपले चांगले चित्र ठेवायचे असेल तर ताबडतोब आणि वेगात या वेडाला आपण तोंड दिले पाहिजे.

यानंतर निर्वासितांच्या समस्येवर बोलताना गांधीजी म्हणाले -

निर्वासितांमध्ये डॉक्टर, वकील, विद्यार्थी, शिक्षक, परिचारिका इत्यादी सर्व आहेत. ते जर गरीब निर्वासितांपासून स्वतःला वेगळे ठेवतील तर ते आपल्या दुर्दैवापासून काहीही शिकू शकणार नाहीत. माझी इच्छा आहे की सर्व व्यवसायी आणि गैरव्यवसायी निर्वासितांनी, गरीबांनी आणि श्रीमंतांनी सोबत राहिले पाहिजे व लाहोरच्या हिंदू आणि शिखांना जरी लाहोर सोडावे लागले असले तरी या निर्वासितांनी असे आदर्श शहर बनवावे की जसे लाहोर आदर्श शहर आहे. अशी शहरे दिल्लीसारख्या अतिशय जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांवरील ताण कमी करतील व तिथे राहणाऱ्या लोकांची प्रकृतीही चांगली राहील व ते प्रगतीही करतील. कुरुक्षेत्राच्या मोठ्या शिबिरात राहणारे दोन लाख निर्वासित जर बाह्य आणि आंतर स्वच्छतेच्या दृष्टीने आदर्श झाले, जर व्यावसायिक आणि श्रीमंत गरीब निर्वासितांबरोबर बरोबरीच्या नात्याने राहू लागले, जर त्यांनी तंबूंच्या या वस्तीत चांगले जीवन व्यतीत केले, जर साफसफाईपासून सर्व काम स्वतः करू लागले व दिवसभर कोणत्या ना कोणत्या चांगल्या कामात व्यस्त राहिले तर ते सरकारच्या अर्थसंकल्पावर ओझे होणार नाहीत. आणि त्यांचा साधेपणा व सहकार्य पाहून शहरातील लोक केवळ त्यांची तारीफच करणार नाहीत तर त्यांना आपल्या जीवनपद्धतीची लाज वाटेल व तेसुद्धा निर्वासितांच्या जीवनाची नक्कल करू लागतील. तेव्हा सध्याचा कटूपणा व परस्परातील हेवेदावे एका क्षणात मिटतील. मग निर्वासित लोक, मग ते कितीही का असेना केंद्रीय सरकारकरिता काळजीचा विषय राहणार नाहीत. आणि जगही या लक्षावधी निर्वासितांचे कौतुक करील.

शेवटी मी कंट्रोल काढून घेण्याविषयी, विशेषतः कापडावरील कंट्रोल काढून घेण्याविषयी बोलणार आहे. सरकार अन्नधान्य आणि कापडावरील कंट्रोल काढायला घाबरते कारण देशात या गोष्टींची खरोखरच टंचाई आहे व कंट्रोल काढून घेताच या गोष्टींच्या किंमती आकाशाला भिडतील व गरीब लोकांना फार त्रास सहन करावा लागेल असे सरकारला वाटते. कंट्रोलच्या मदतीनेच गरिबांना उपासमारीपासून वाचवता येऊ शकते व शरीर झाकण्याकरिता त्यांना कपडे मिळू शकतात असे सरकारला वाटते. सरकारला व्यापारी, अन्नधान्य निर्माण करणारे आणि दलाल यांच्याबद्दल संशय वाटतो. त्यांना वाटते की गरिबांची शिकार करून बेइमानीने कमावलेल्या पैशाने आपले खिसे भरण्याकरिता कंट्रोल हटवले जाण्याची हे लोक गिधाडांप्रमाणे वाट पाहत आहेत. सरकारला या दोन

अनिष्टांमधून एका अनिष्टाची निवड करायची आहे. त्यांना वाटते की कंट्रोल रद्द करण्याऐवजी ते सुरू ठेवण्यात कमी धोका आहे.

यामुळेच मी व्यापारी, दलाल, आणि उत्पादकांना आवाहन करतो की सरकारच्या मनातील संशय त्यांनी दूर करावा आणि कंट्रोल रद्द झाले तरी किंमती वाढणार नाहीत याबद्दल त्यांनी सरकारची खात्री पटवावी. कंट्रोल रद्द केल्याने काळाबाजार व अप्रामाणिकपणाचे व्यवहार जरी समूळ नष्ट होणार नसतील तरी आतापेक्षा गरिबांचे जीवन किती तरी सोपे होईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १०६-८

२८. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २३, १९४७

नोव्हेंबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

वीस मिनिटांपेक्षा वा शक्य झाले तर १५ मिनिटांपेक्षा मी जास्त बोलायला नको हा रेडिओवाल्यांचा नियम कधीकधी मी मोडतो या करिता आकाशवाणीच्या लोकांची मी क्षमा मागतो. माझ्यासमोर प्रत्यक्ष हजर असलेल्या लोकांच्या हृदयापर्यंत पोहोचण्याचा माझा मुख्य उद्देश असल्यामुळे मी हा नियम अनेकदा पाळू शकत नाही. रेडिओ नंतर येतो. रेडिओकरिता लांब भाषणांचे ध्वनिमुद्रित करता येण्याची शक्यता आहे की नाही हे मला माहीत नाही. मी कोणत्याही हेतूशिवाय केवळ माझा आवाज ऐकण्याकरिता बोलत नसतो. (हा परिच्छेद हरिजनमधून घेतला आहे.)

एक बंधू लिहितात की जर हक्क मिळत नसतील तर हिंसेच्या मार्गाचा अवलंब का करू नये? हिंसेच्या मार्गाने आपण आपले हक्क मिळवू शकत नाही. इतकेच नाही तर हिंसेच्या मार्गाने आपण काहीही मिळवू शकत नाही असेसुद्धा मी म्हणेन. वरवर पाहता असे दिसते की त्या मार्गाने आपण गोष्टी मिळवू शकतो. पण कशा? कल्पना करा की एखाद्या मुलाजवळ रुपया आहे. समजा मी त्याच्या दोन थोबाडीत मारल्या आणि त्याच्याजवळील रुपया घेतला. त्याच्याजवळील रुपया घेतल्याचे समाधान मला मिळू शकेल परंतु असे करण्यात मी किती आणि काय गमावेन? ते बितारे मूल काय करू शकेल? परंतु त्या गरीब मुलाला मारून मी त्याचा रुपया हिसकावून घेतला ही गोष्ट मला खुपत राहील. जगात अर्थातच असे दुष्ट लोक भरपूर आहेत. परंतु मी अशी गोष्ट करू शकत नाही. अशा प्रकारे कोणालाही वंचित करण्याचा मला कोणताही अधिकार नाही. कोणाजवळून काही तरी हिसकावून घेण्याचे दुष्परिणाम होतील. म्हणूनच मी म्हणतो की हिंसेच्या माध्यमातून आपण हक्कांची मागणी करू शकत नाही. हक्क मिळवण्याचा एकच मार्ग आहे आणि तो मी तुम्हाला आधीच सांगितलेला आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन जून २८, १९४७ आणि प्रार्थना प्रवचन जून २९, १९४७) प्रत्येकाला तो आवडला. लोकांचे अधिकार आणि ते कसे मिळवावे हे मी आधीच सांगितले आहे. मी तर म्हणेन की हक्क म्हणून जगात काहीही नाही. ज्याच्याकरिता कर्तव्य नसतात त्याच्याकरिता अधिकारसुद्धा नसतात. वेगळ्या शब्दांत कोणत्याही अधिकारांचा जन्म कर्तव्यातून होत असतो - जर कर्तव्य नसेल तर अधिकारसुद्धा नसतात. मी जेव्हा माझे कर्तव्य पार पाडतो तेव्हा त्याचे परिणाम होतात आणि तेच माझे अधिकार असतात. उदाहरणार्थ मी खातो कारण तसे करणे माझे कर्तव्य असते. मी जर मजेकरिता काही खात असेन तर मी एका ना एका आजाराला बळी पडतो. मी जर कर्तव्य म्हणून खात असेन, मी जर ईश्वराची प्रार्थना करत असेन, मी जर जगाची सेवा करत असेन, तर तोसुद्धा माझा अधिकार आहे. माझा अधिकार

काय आहे? सेवा करणे हा अधिकार आहे. तुम्ही विचाराल की याला अधिकार कसे काय म्हणता येऊ शकते? परंतु यावर थोडा विचार केला तर तुमच्या हे लक्षात येईल. मी म्हणेन की तोच हक्क होऊन जातो. समजा की मी दिवसभर काम करतो आणि आठ आणे मिळवतो - ते आठ आणे मला हक्क म्हणून मिळतात. मला तो अधिकार कसा मिळाला? कारण मी काम केले. मी जर काम केले नाही आणि ते आठ आणे घेतले तर मी ते पैसे हिसकून घेतले, ते मला अधिकार म्हणून मिळालेले नाहीत. मला ते आठ आणे घेण्याचा अधिकार तेव्हाच मिळेल जेव्हा मी काम करण्याचे माझे आश्वासन पूर्ण करेन आणि तेही विचार, मन, आणि वर्तनात प्रामाणिकपणा ठेवून. परंतु ते काम जर मी मन लावून करणार नाही, सरदारचे काम बिघडवतो, सरदार पाहत नाही म्हणून त्याची फसवणूक करतो तर हे पाप आहे. आणि जेव्हा मी पाहतो की इतरांना एक रुपया मिळतो तर मी एक रुपयासुद्धा घेऊ शकतो, परंतु केव्हा? सरदारला सांगून. मी त्याला म्हणेन की सर्वांना तर एक रुपया मिळतो, मी कसा आठ आण्यात काम करू. एक रुपया नाही तर पंधरा आणे तरी द्या. तो मला म्हणू शकतो आठ आण्यात काम कर नाही तर जा. मग मी काय करावे? धरणे धरू? उपवास करू? काय करू? त्याचा माल जाळून टाकावा? त्यचे काम बंद पाडावे? परंतु मी जर त्याला म्हणालो की मी काम सोडू शकतो परंतु मी आठ आण्यात काम करणार नाही तर मी सभ्य गृहस्थाप्रमाणे वागलो. मी तर म्हणेन की जे काही म्हणायचे असेल ते सौजन्यपूर्वक म्हणा. सौजन्य म्हणजे आपल्या धर्माचे पालन करणे, आपले कर्तव्य पार पाडणे आणि आपले कर्तव्य पार पाडून अहिंसक पद्धतीने आपले अधिकार मिळवणे. हिंसेने आपण काहीही मिळवण्याचा प्रयत्न करू नये - यामुळे जग चालते, नाही तर जग बिघडते.

मी तुमच्याशी ख्रिश्चनांबद्दल आधीच बोललो आहे. आज मी तुम्हाला हरिजनांबद्दल सांगेन. आपल्याकरिता ही लाजेची गोष्ट आहे की रोहतकमध्ये हरिजन आहेत, वा असे म्हणा की रोहतक जिल्ह्यात - ते तिथे सर्वत्र होते आणि अजूनही आहेत. तिथे जाट आणि अहीरही आहेत. त्यांना असे वाटते की हरिजन आपले गुलाम आहेत व त्यांच्याकडून ते कोणतेही काम करून घेऊ शकतात. परत एकदा त्यांच्या हक्काचा प्रश्न निर्माण झाला व त्यांना वाटते की हरिजन जन्मजात गुलाम आहेत. त्यांना खण्यापिण्याकरिता देता येऊ शकते परंतु त्यांना कोणतेही हक्क मिळू शकत नाही. मला हा उद्धटपणा वाटतो, अहंकार वाटतो. ब्रिटिशांच्या काळात हा होता आणि आता तर हा अजूनच वाढला आहे. हे गरीब हरिजन भितात आणि म्हणून ते माझ्याकडे आले आणि या छळाच्या विरोधात आम्ही काय करावे असे विचारू लागले. ते मला विचारू लागले की आम्ही गुलामच राहिलो पाहिजे काय? की मेलो पाहिजे? की रोहतक सोडले पाहिजे? ते ते ठिकाण सोडू शकत नाहीत हे अगदी समजण्यासारखे आहे. त्यांनी जर रोहतक सोडले तर इतर लोक मरतील कारण त्यांचे काम बिघडेल. परंतु याचा अर्थ हरिजनांनी कायम गुलाम राहिले पाहिजे. आणि म्हणून हे गरीब लोक माझ्याकडे आले. यांच्यातील

काही शाळेत शिकतात, काही त्याच्याही पुढे शिकतात आणि काही मागे राहतात. काही तर हस्तोद्योग शिकतात. परंतु जे लोक त्यांचा छळ करत आहेत त्यांना ते काय म्हणू शकतात? आपण अशा अवस्थेत पोहोचलो आहो की आपण कुठे चाललो आहो याचासुद्धा आपण विचार करत नाही. ब्रिटिशांच्या काळात आपल्याला मारहाणीची वा मारले जाण्याची भीती वाटत होती. आता परकीय सत्तेचा अंत झाल्यामुळे आपले कोणीही काहीही करू शकत नाही असे आपल्याला वाटू लागले आहे. आपल्याला वाटते की न्यायाधीशासमोर जरी आपल्याला उभे केले तर न्यायाधीशाला आम्ही धाक दाखवू. न्यायाधीश आपले काही करू शकत नाही. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आपण इतके उद्धट झालो आहो. परिणामी हरिजनांची बर्बादी होते आहे. यामुळे तुम्ही बाप्पाकडे (अमृतलाल वि. ठक्कर, १८६९-१९५१; १९१४साली भारत सेवक समाजात सामील; १९२२ साली भिल सेवासदनची स्थापना; हरिजन सेवक संघाचे सरचिटणिस; अध्यक्ष गुजरात अंत्यज सेवा मंडळ; सचिव कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मृती विश्वस्त संस्था १९४४-५१; भारतीय आदिम जाति सेवक संघाची स्थापना.) जा असे मी त्या लोकांना सांगितले. त्यांचा जन्मच हरिजन आणि आदिवासींच्या सेवेकरिताच झाला आहे. ते हरिजनांकरिता सर्व काही करतात. तर ते गेले आणि मला येऊन संगितले की आमच्याकरिता बाप्पासाहेब काहीही करत नाहीत. त्यांना काय हवे आहे हे मला माहीत होते. ते इथेच बसलेले आहेत. मी त्यांना सांगितले की डॉ. गोपिचंदकडे (गोपिचंद भार्गव, १८८९-१९६६; अध्यक्ष, हरिजन सेवक संघ, पंजाब; पंजाबचे मुख्यमंत्री १९४७-५१) जा. ते आता मुख्यमंत्री झाले म्हणून काय झाले? एके काळी हरिजन सेवक संघाच्या प्रत्येक कार्यक्रमाला ते हजर राहायचे. ते आज इथे येणार असल्याचे कळल्यामुळे मी त्यांची भेट घ्यायचे ठरवले व मी त्यांना भेटलो. परंतु तेथील लोक असे जुलमी झाले असतील, जबरदस्ती करत असतील, मनमानी करत असतील आणि ऐकत नसतील तर काय करता येऊ शकते? आता तिथे ब्रिटिशांचे शासन नाही व लोक अशा प्रकारे वागू शकत नाहीत. मग हरिजनांनी काय करावे? यामुळे आज हरिजनांच्या दुरावस्थेसंबंधी बोलावे, त्यांची करुण कथा ऐकवावी असे मला वाटले. त्यांच्याकरिता आपण इतकेही करू शकत नाही काय? आज आपले कर्तव्य काय आहे? आपला धर्म काय आहे आहे? आजपर्यंत आपण त्यांना अस्पृश्य, गुलाम मानत आलो. तो अधर्म होता. चूक केली होती, पाप केले होते. ते धुऊन काढण्याकरिता हरिजन सेवक संघाची स्थापना केली. [ऑक्टोबर २६, १९३२ला अखिल भारतीय अस्पृश्यता विरोधी हरिजन सेवक संघाची (ऑल इंडिया ॲन्टी अनटचेबिलीटी लीग) स्थापना झाली. घनश्याम दास बिर्ला तिचे अध्यक्ष आणि अमृतलाल वि. ठक्कर सरचिटणीस होते.] संघाने बरेच कामही केले. सर्व हिंदूंनी असे केले नाही. करोडोच्या संख्येत हिंदू आहेत - परंतु सगळ्या हिंदूंनी तर ही गोष्ट स्वीकारली नाही. हिंदूंनी जर हा विचार ग्रहण केला असता तर मला ही करुण कथा का ऐकवावी लागली असती? इंग्रजांच्या राज्यात तर असेच करत

होतो, इंग्रजांना शिव्या देत होतो, ते नसतो तर आम्ही चांगले झालो असतो असे म्हणत होतो. आता ते तर निघून गेले - आपण चांगले आहो की वाईट? मी तर म्हणेन की आधीपेक्षाही आपल्यामध्ये जास्त वाईटपणा आला आहे. आपण तेव्हाही अतिरेक करत होतो आणि आताही करतो. आधी तर मुसलमानांवर अतिरेक केला - ते पाप केले. पाकिस्तान आहे ते विसरून जा. त्याचा विचार करू नका. समजा की एक माणूस पाप करत आहे, तर काय आम्हीही पाप करावे? विचार कराल तर लक्षात येईल की हे वाईट आहे - एका वाईटपणातून दुसरा वाईटपणा निर्माण होतो. आम्ही अनेक लोकांना मारून टाकले आहे. आपल्या मध्ये खोटे धैर्य आले आहे आणि आम्ही ख्रिश्चनांना मारायचा निर्धार केला आहे. मग आम्ही जाटीस्थान, अहिरीस्थान असे आपापले स्थान बनवू. परंतु हिंदुस्तान कोणीही बनवणार नाही. हरिजनांना तर आपल्यात सामावूनच घेतले पाहिजे. ते तर आमच्यासारखेच हिंदू आहेत. ते पंचमवर्णीय नाहीत. हिंदू धर्मात पाचवा वर्ण नाही, चार वर्ण आहेत आणि त्यातही हा श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे नाही. या चारमध्ये एक शिकवतो, दुसरा रक्षण करतो, तिसरा व्यापार करतो - आपले घर भरण्याकरिता नाही, आपल्या तिजोरीत करोडो रुपये भरण्याकरिता नाही, लोकांचे भले करण्याकरिता, चौथा प्रजेची सेवा करतो. परंतु हे चारही सोबत बसू शकतात, खाऊपिऊ शकतात. जर शुद्र असेल आणि तो बॅरिस्टर झाला तर बॅरिस्टरी करू शकत नाही असे नाही. तो बॅरिस्टर होऊनही सेवा करू शकतो, व्यवसाय करू शकतो, नोकरी करू शकतो. जो माणूस धर्म शिकवतो तोही सेवा करतो. याचप्रमाणे जो व्यवसाय करतो, व्यापार करतो, नोकरी करतो आणि जो झाडू मारतो तोसुद्धा सेवा करतो. ही चारही क्षेत्रे सेवाक्षेत्रे आहेत. जो धर्म शिकवतो त्याला जास्त अभ्यास करावा लागतो.परंतु याचा अर्थ असा होत नाही की त्याने आपले काम सोडले म्हणून त्याने पाप केले. तो ते काम करू शकत नाही अशी गोष्ट नाही. अशा प्रकारे आपण अनेक जाती निर्माण केल्या आणि आता पंचम वर्ण निर्माण करत आहो तर ती चूक आहे, दुष्टपणा आहे. प्रत्येकजण आपापल्या धर्माचे पालन करील तर सर्व काही ठीक होईल. आज आपल्या हातात सत्तेचे लगाम आले आहेत तर हिंदू, शीख सर्वांनी आपापल्या धर्मानुसार वागावे. माझे भाषणही संपले आणि ही सभाही संपली.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १०९-१२

२९. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २४, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांचे हिंदुस्तानीतील लेखी भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नोव्हेंबर २४, १९४७

मी जेव्हा प्रार्थनेकरिता येतो तेव्हा तुम्ही चांगुलपणाने माझ्याकरिता आणि माझ्या मुलींकरिता भरपूर जागा सोडता. मी जेव्हा प्रार्थना करून परत जातो तेव्हाही तुम्ही ही शिस्त पाळावी अशी माझी विनंती आहे. मी जेव्हा परततो तेव्हा मला नमस्कार करण्याकरिता लोक माझ्या आजूबाजूला गर्दी करतात. हे चांगले वाटत नाही. माझी विनंती आहे की परतातानासुद्धा तुम्ही मला शांततेने मोकळी वाट द्यावी. तुमचे प्रेम आणि त्याचे मूल्यही मला कळते. परंतु या प्रेमाने बाह्य रूप धारण न करता रचनात्मक रूप धारण करावे. याबद्दल मी अनेकदा सांगितले आहे आणि लिहिले आहे. माझ्याकरिता तर आज साप्रदायिक सुसंवाद निर्माण करणे हाच रचनात्मक कार्यक्रम आहे. आधीही भांडणे होत असत परंतु त्यात कोणाचा नायनाट करून टाकायची गोष्ट नसायची. विष पसरले आहे. एकीकडे हिंदू आणि मुसलमान एकमेकांचे शत्रू झाले आहेत. याचे लाजिरवाणे परिणाम तुम्ही पाहिले आहेत.

प्रार्थनेत येणारांच्या अतःकरणात वैरभाव नसणेच पुरेसे नाही. त्यांनी परत सांप्रदायिक सद्भाव निर्माण व्हावा म्हणून सक्रिय प्रयत्न केला पाहिजे. खिलाफतीच्या दिवसात हा सांप्रदायिक सद्भाव आपल्याकरिता अभिमानाची गोष्ट होती. त्या दिवसातील हिंदूमुसलमानांच्या ज्या प्रचंड सभा होत असत त्या मी विसरलेलो नाही. ते ऐक्य पाहून माझे अंतःकरण आनंदाने उचंबळून यायचे. ते दिवस परत कधीही येणार नाहीत काय?

भारताच्या राजधानीत काल जी दुःखद घटना घडली तिचा विचार करा. असे सांगतात की काही हिंदू आणि शिखांनी मुसलमानाच्या रिकाम्या घराचा बळजबरीने बेकायदेशीरपणे ताबा घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे भांडण झाले आणि काही लोक जखमीही झाले. परंतु सुदैवाने कोणी मेला नाही. ही घटना वाईट होती. परंतु तिलाही तिखटमीठ लावण्यात आले. पहिली बातमी ही होती की चार शीख मारले गेले. अशा गोष्टीचे जसे परिणाम होत असतात तसाच परिणाम झाला. बदल्याची भावना पेटली आणि लोक सुरामारीने जखमी झाले.

असे ऐकतो की आता एक नवीन पद्धती अवलंबिली जात आहे. लहान किरपाणच्या ठिकाणी शीख मोठी तलवार ठेऊ लागले आहेत. तलवार उगारून ते हिंदूंबरोबर वा एकटेच मुसलमानाच्या घरात जातात आणि त्यांना घर रिकामे करून देण्याकरिता धमकावतात. ही बातमी खरी असेल तर राजधानीतील हे पशुत्व असह्य आहे. आणि हे जर बरोबर नसेल तर याकडे फारसे लक्ष देण्याची गरज

नाही. बरोबर असेल तर केवळ सत्तेत असणारांनीच नाही तर जनतेनेही हिच्याकडे लक्ष दिले पाहिजे. जनतेच्या पाठबळाशिवाय सत्ताधारी काहीही करू शकत नाहीत.

अशा परिस्थितीत माझे कर्तव्य काय हे मला माहीत नाही. इतकी गोष्ट स्पष्ट आहे की परिस्थिती बिघडते आहे. लवकरच आश्विन पोर्णिमा येणार आहे. माझ्याकडे तऱ्हेतऱ्हेच्या अफवा येत असतात. मला आशा आहे की दसरा आणि बकरी ईदच्या वेळी जशा या अफवा खोट्या ठरल्या तशाच या वेळीही ठरतील.

या अफवापासून आपण एक धडा तर शिकूच शकतो. आज आपल्याजवळ शांततेची कोणतीच संपत्ती शिल्लक नाही. आपल्याला दररोजची कमाई दररोज करावी लागत असते. ही स्थिती कोणत्याही राज्याकरिता वा राष्ट्राकरिता चांगली नाही. हे मारक विष नष्ट करण्याकरिता आम्ही काय केले पाहिजे याचा विचार प्रत्येक देशसेवकाने केला पाहिजे.

इथे लायलपूरचे सरदार संतसिंहजी यांच्या एका दीर्घ पत्राची चर्चा करणे योग्य होईल. ते आधी केंद्रीय विधिमंडळाचे सदस्य होते. त्यांनी शिखाना वाचवण्याकरिता भरपूर प्रयत्न केले (पाहा प्रार्थना प्रवचन नोव्हेंबर १९, १९४७) आहेत. मागील बुधवारी मी जे भाषण केले त्याचा त्यांनी जो अर्थ काढला तो त्या शब्दांतून निघत नाही. आणि माझ्या मनात तर तो अर्थ मुळीच नव्हता. कदाचित सरदार साहेबांना माहीत असेल की १९१५ साली मी जेव्हा दक्षिण आफ्रिकेतून परत आलो तेव्हापासून शीख मित्रांशी माझा जवळचा संबंध होता. तेव्हा हिंदू आणि मुसलमानांप्रमाणेच शिखांकरिताही माझा शब्द कायदा होता. काळाप्रमाणे रीतभात बदलली आहे. त्याच्याबरोबर लोकांची राहणीसाहणीही बदलली आहे. परंतु मला माहीत आहे की मी बदललो नाही. कदाचित सरदार साहेबांना माहीत नसेल की शीख आज कुणीकडे वाहत चालले आहेत. मी त्यांचा पक्का मित्र आहे. मला माझा कोणताही स्वार्थ साधायचा नाही. यामुळे मी प्रत्येक गोष्ट पाहू शकतो. मी माझ्या अंतःकरणातील प्रत्येक गोष्ट त्यांना स्पष्टपणे आणि मोकळेपणाने सांगू शकतो कारण मी त्यांचा खरा मित्र आहे. अनेकदा शीख बांधवांनी माझा सल्ला ऐकला व त्यामुळे ते वाचलेले आहेत असे म्हणण्याचे साहस मी करू शकतो. यामुळे शिखांसंबंधी वा इतर कोणासंबंधीसुद्धा मी विचारपूर्वक बोललो पाहिजे असा विचारसुद्धा माझ्या मनात आला नव्हता. सरदार साहेबांनी आणि प्रत्येक शिखाने ज्याला शीख समाजाचे हित व्हावे अशी इच्छा आहे व जो आजच्या प्रवाहात वाहून गेलेला नाही त्याने या महान जातीला वेड, मद्यपान आणि अशा गोष्टींमुळे होणाऱ्या दुषपरिणामांपासून वाचवण्याकरिता मदत करावी. ज्या तलवारीचे त्यांनी भरपूर प्रदर्शन केले आहे ती त्यांनी आता परत म्यान करावी. कृपाणचा अर्थ कोणत्याही मापाची तलवार असा जरी प्रिव्ही कौन्सिलने केला असला तरी त्यामुळे त्यांनी वेडावून जाण्याचे कारण नाही. किरपाण जेव्हा

तत्त्वहीन मद्यप्याच्या हाती जाते वा जेव्हा तिचा बेमुर्वतपणे उपयोग केला जातो तेव्हा ती आपले पावित्र्य हरवून बसत असते. पवित्र गोष्ट पवित्र प्रसंगी आणि कायदेशीरपणेच उपयोगात आणायची असते. किरपाण निश्चितच शक्तीचे प्रतीक आहे. परंतु तिचा उपयोग करणारा जर आश्चर्यजनक पद्धतीने संयम ठेवत असेल व अतिशय विपरीत परिस्थितीच तिचा उपयोग करत असेल तरच ती त्याला शोभते.

शीख इतिहासाचा मी काळजीपूर्वक अभ्यास केला आहे व ग्रंथसाहेबमधील तत्त्वांचे अनुसरण केले आहे असे जर मी म्हणालो तर सरदार साहेब मला माफ करतील. त्यातील वचनांच्या आधाराने पाहिले तर शिखांनी जे केले त्याचे कोणतेही समर्थन करता येऊ शकत नाही. तो आत्मघातकी मार्ग आहे. शिखांच्या शौर्याचा आणि प्रामाणिकपणाचा अशा प्रकारे नाश होता कामा नये. ते भारताची महान संपत्ती होऊ शकतात. आज मात्र ते भीतीदायक झाले आहेत जसे की त्यांनी व्हायला नको.

शीख इस्लामचे पहिल्या क्रमांकाचे शत्रू आहेत असे म्हणणेही अर्थातच मुर्खपणाचे आहे. मलाही तर ही पदवी देण्यात आली होती. हा सन्मान मला शिखांबरोबर वाटून घ्यावा लागेल काय? मला सन्मानाची कधीच इच्छा नव्हती. हा आरोप चुकीचा आहे हे सिद्ध करण्यात माझे सर्व आयुष्य गेले आहे. हीच गोष्ट शिखांबद्दलही म्हणता येईल काय? शेरे काश्मीरच्या (शेख मोहम्मद अब्दुल्ला; शब्दशः अर्थ काश्मीरचे सिंह) बाजूने जे शीख उभे आहेत त्यांच्यापासून या शिखांनी शिकायला पाहिजे. त्यांच्या नावाने ज्या मुर्खपणाच्या गोष्टी केल्या जात आहेत त्याचा त्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला पाहिजे.

हिंदूंनी शिखांना साथ देणे सोडून दिले तर पाकिस्तानमध्ये हिंदूंना काहीही धोका नाही अशी एक वाईट आणि भयानक गोष्ट सध्या सुरू आहे हे मला माहीत आहे. पाकिस्तानमध्ये शिखांना कधीही सहन केले जाणार नाही. अशा भावाभावाला मारणाऱ्या सौद्यात मी तरी कधीही सहभागी होऊ शकत नाही. आपल्या स्वतःच्या खाजगी कारणासाठी परतण्याची इच्छा नसलेले लोक सोडून प्रत्येक हिंदू आणि शीख आपल्या इभ्रतीसह आणि सुरक्षितपणे पश्चिम पंजाबमधील आपापल्या घरी जोपर्यंत परतत नाही आणि प्रत्येक मुसलमान संघराज्यात तशाच प्रकारे आपल्या घरी परतत नाही तोपर्यंत या दुर्दैवी देशाला विसावा नाही. आपल्याला शांत आणि मदतीकरिता तत्पर असलेले शेजारी म्हणून राहायचे असेल तर लोकसंख्येच्या अदलाबदलीचा विचार आपण आपल्या मनातून काढून टाकला पाहिजे.

पाकिस्तानच्या गैरवर्तनाचा इथे पाढा वाचण्यात काहीही अर्थ नाही, त्यामुळे दुःखी हिंदू आणि शिखांचा कोणताही लाभ होणार नाही. पाकिस्तानला आपल्या पापाचे ओझे उचलायचे आहे आणि ते भयानक आहे हे मला माहीत आहे. माझे काय मत आहे हे कळणे पुरेसे असले पाहिजे. माझ्या मताची काही किंमत असेल तर १५ ऑगस्टच्या फार पूर्वीपासूनच मुस्लिम लीगने तयारीला सुरुवात केली होती. मी असेही म्हणू शकत नाही की १५ ऑगस्टला त्यांनी नवजीवनाची सुरुवात केली आणि ते

मागील सर्व विसरून गेले. परंतु माझ्या या मताची तुम्हाला कोणतीही मदत होऊ शकत नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की संघराज्यात आम्ही त्यांच्या पापाची नक्कल केली आणि आम्हीही त्यांच्यासारखेच पापी झालो. दोन्हीकडचे पारडे जवळपास सारखे झाले. अजून तरी आपण शुद्धीवर येणार आहोत काय आणि आपल्या पापाचे प्रायश्चित्त घेणार काय? वा परत आपल्याला अधःपतीत व्हायचे आहे?

हरिजन, डिसेंबर ७, १९४७

३०. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २५, १९४७

नवी दिल्ली,

नोव्हेंबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मला तुम्हाला पाकिस्तानमधील शरणार्थ्यांसंबंधी काही सांगायचे आहे. परंतु त्यांना शरणार्थी म्हणायचे की नाही हा प्रश्न आहे. काल काही लोक मला भेटले आणि त्यांना शरणार्थी म्हणायचे कारण काय असे विचारू लागले. एका अर्थाने तर ते म्हणतात ते बरोबर आहे कारण शरणार्थी त्यांना म्हणतात जे आश्रय मागत असतात. ते तेथील त्रासामुळे आले होते परंतु इथे त्यांनी कोणाला का शरण यावे? आणि शरण तरी कोणाला? हा जो आपला संपूर्ण हिंदुस्तान आहे तो सर्वांचा आहे. इथे तर मी पाकिस्तानलाही त्याच्यात मानतो. परंतु आज तो त्याच्यात नाही वा असे म्हणा की आमचे दोन तुकडे झाले असले तरी संघराज्य तर सर्वांचे आहे आणि असायलाही पाहिजे. यामुळे ते इथे येतात तर आपल्या हक्कामुळे येतात. यामुळे मला त्यांचे म्हणणे बरोबर वाटले. माणसाला जर एखाद्या ठिकाणी त्रास होत असेल व त्यामुळे तिथून पळून तो आईच्या मांडीवर डोके ठेवत असेल तर काय त्याला शरणार्थी म्हणायचे? की तो हक्काने आला आहे असे म्हणाल? मी त्यांना म्हणालो की अशा कटू भाषेचा प्रयोग करण्याकरिता माझ्यात द्वेषभावना नाही हे तर तुम्ही मान्य कराल. वास्तवात आधी हा इंग्रजी शब्द 'रिफ्युजी' होता. आणि आपण तर इंग्रजी भाषेचे असे गुलाम आहोत की त्या गुलामगिरीतून आपली सुटका होऊ शकत नाही. यामुळे 'रिफ्यूजी','शरणार्थी', 'सफरर्स' हे शब्द तर आधी तयार झाले आणि त्यांचा एकच अर्थ होऊ शकत होता जसा की वर्तमानपत्रवाल्यांनी निराश्रित केला. तेव्हा ते म्हणाले की इंग्रजीत तर अजून बरेच शब्द आहेत, उदाहारणार्थ 'सफरर्स' - पिडीत आहे की नाही, मग त्यांना 'सफरर्स' का नाही म्हणायचे? मला तर इंग्रजीची इतकी माहिती आहे मग मी 'सफरर्स' कसा म्हणू? मग त्यांना काय म्हणायचे? यामुळे माझ्या मनात आले की ते दुःखी तर आहेतच म्हणून त्यांना दुःखी म्हणालो. तसे तर आपण सर्व इथे असलेले दुःखीच आहो, परंतु जे लोक लाखोच्या संख्येत आपले घरदार सोडून आले ते खरोखर दुःखी आहेत. यामुळे त्यांच्याबद्दल माझी काही सांगण्याची इच्छा आहे.

आज मला तीन प्रकारचे लोक भेटायला आले. एका प्रकारच्या लोकांना तर मी पूर्णपणे सोडून देऊ इच्छितो. लाहोरमध्ये त्याचे एक भलेमोठे कुटुंब होते. त्याचे काही हॉटेल वगैरे सुरू होते. तर तिथे त्यांची सर्व मालमत्ता सुटली आणि केवळ मुलाबाळांना घेऊन ते आले. सर्वांना तर इथे आणले नाही. परंतु मला त्यांनी सर्व हकिगत सांगितली आणि मग म्हणाले की मला इथे कुठे तरी घर मिळवून द्या. मी

म्हणालो की माझ्या हातात तर काही सत्ता नाही आणि जरी सत्ता असती तरी मी तुम्हाला घर मिळवून दिले नसते. एक तर दिल्ली शहरात आधीच कमी घरे आहेत आणि इथलेच लोक घरांकरिता त्रस्त आहेत. आणि असे असूनही सरकार त्यांना घर सोडायला लावते. जेव्हा कोणी अधिकारी वा राजदूत येतो तेव्हा त्याला तंबूत तर ठेवता येत नाही. यामुळे कोणाचे तरी घर वा बंगला खाली करायला लावून त्याला देऊन टाकतात. जे लोक आधीपासून त्या घरात राहत होते ते विचारतात की आम्ही कुठे जायचे तर म्हणतात की कुठेही जा. सरकार या सीमेपर्यंत तर जात नाही, परंतु जाऊ शकते आणि अनेक लोकांना अशा प्रकारे घर सोडण्याकरिता नोटिसा मिळाल्या आहेत. अशी जर अवस्था आहे तर या लाखो दुःखी लोकांना घर कुठून मिळवून देता येईल? त्यांनी सांगितले की आम्ही सतरा माणसे गमावून इथे आलो आहो. असेही कुटुंब आहेत की ज्यात एका स्त्रीपुरुषाशिवाय कोणीही उरले नाही. हा सर्व हिंदुस्तान आमचा आहे असे जर तुम्ही समजत असाल तर ते सतरा लोक जरी गेले तरी उरलेला हिंदुस्तान तर आहे? ठीक आहे, हे तर तत्त्वज्ञान झाले. ते सोडा. मी त्यांना म्हणालो की जे शिबीर सुरू आहे त्यात तुम्ही जायला पाहिजे. तिथे सर्व प्रकारचे लोक राहतात आणि तिथे राहणे काही वाईट गोष्ट नाही. ते गृहस्थ म्हणाले की मी काय भिकारी आहे? मी म्हणालो मुळीच नाही. मी जर शिबीर चालवणारा झालो तर एकाही भिकाऱ्याला अन्न देणार नाही. तुम्ही सर्व लोक धष्टपुष्ट आहा, काम करा आणि खा, कपडे तयार करा आणि घाला. हं रात्री दव पडतो तर काही पांघरूण घ्या. यामुळे वरून पडणाऱ्या दवापासून वाचाल. दिवसा तर त्याचीही गरज नाही. आकाश स्वच्छ असते आणि सूर्यनारायणाचा प्रकाश असतो. मी तर दिवसाच्या वेळी घरात राहत नाही. बाहेर सुर्यनारायचे उन्ह मला आवडते. ते गृहस्थ म्हणाले की आम्ही तर असे नाही. आम्हाला लहानलहान मुले आहेत, आम्हाला राहण्याकरिता तर घरच पाहिजे. मी म्हणालो की काय तुम्हालाच मुले आहेत आणि अजून कोणालाही नाहीत? मी ज्या शुबिरात गेलो होतो तिथे मी आयांना आणि त्यांच्या मुलांनाही तिथे राहताना पाहिले होते. काही त्यातील गर्भवती स्त्रीया होत्या आणि तिथेच त्यांना मुले होत होती. मग तुम्हाला तिथे राहण्यात कोणती अडचण आहे? तिथे लोक जे खातात ते खा, ते लोक जी मेहनत करतात ती करा. तुम्ही तर चांगले ताजेतवाने आणि धष्टपुष्ट आहा. हॉटेल वगैरेही चालवू शकता. मग असे काम का करत नाही की ज्यामुळे इतरांनाही काही मदत होईल?

ते म्हणाले की इथे जे मुसलमान राहतात ते सोडून का जात नाहीत? ते अजून इथे का बसलेले आहेत? हे ऐकून मला धक्का बसला. मुसलमान एक तर भीतीमुळे आधीच चालले आहेत आणि जे राहिले आहेत त्यांच्यातीलही दररोज काही ना काही मारले जात आहेत. कोणीही जातो आणि त्यांना म्हणतो की घर खाली करा, आम्हाला या घरात राहायचे आहे. अशा प्रकारे प्रत्येक माणूस जर अधिकार बजावू लागला तर मग प्रजा कोण राहील आणि हा देश कोणाचा असेल? प्रत्येकजण अधिकार गाजवू

शकत नाही. जगात कुठेही अशा प्रकारे घटना घडत नसतात. रानटी लोकांमध्ये कोणी पुढारी नसतो असे मात्र म्हणतात. परंतु लुटारूंचासुद्धा पुढारी असतो. अलीबाबा आणि चाळीस चोरची जी गोष्ट आहे त्यातसुद्धा सरदार आहे. अशा प्रकारे जगात एकही असे ठिकाण नाही की जिथे कोणीही नेता नसेल वा सर्वजण पुढारी असतील. आपल्याला सत्ताधारी होणे आणि हुकूम चालवणे तर येतच नाही. म्हणून तर आज आपण या संकटात सापडलो आहो. तुम्ही त्या लोकांच्या घरावर, जे भीतीने पळून गेले आहेत वा मारले गेले आहेत वा पोलिसांनी पकडले आहे, अशी नजर ठेवावी ही फार वाईट गोष्ट आहे. ही गोष्ट तुम्हाला शोभत नाही. तुम्ही जर कोणाला असे म्हणू शकत असाल तर ते मला म्हणू शकतात कारण मी जिथे राहतो ते एका महालासारखे घर आहे. तुम्ही मला म्हणू शकता तू येथून निघ आणि एखाद्या शिबिरात जा. तुला काय आहे, तुला ना बायको आहे, ना मुले आहेत ना मुली आहेत. या काही दुसऱ्या तिसऱ्याच्या पोरी घेऊन बसला आहेस आणि म्हणतोस की माझ्या मुली आहेत. तिथे शिबिरात जा. त्यासुद्धा तुझ्या मुली आहेत. मी तुमचे हे म्हणणे ऐकेन. ऐकेन आणि हसेनही. कारण मी जरी पळून गेलो तरी काय तुम्ही इथे राहू शकाल? हे घर तर दुसऱ्याचे आहे, माझे नाही. हं, या घराचा मालक असा आहे की त्याने मलाच याचा मालक बनवून टाकले आणि सांगून ठेवले आहे की ज्याला तुला ठेवायचे असेल त्याला ठेव आणि ज्याला नसेल ठेवायचे त्याला नको ठेवू. मुसलमान आपली घरे कसे सोडू शकतील? केवळ गांधीच असे करण्याच्या परिस्थितीत आहे. त्याला इथून उचलून अजून कुठेही आदळले तरी लोक तर त्याला तसाच ठेवणार नाही. त्याला कोणी दूध देईल, कोणी फळ देईल. अशा प्रकारे त्याचा निर्वाह तर होऊनच जाईल. तो नंगा तर राहणार नाही. कपडेही कोणी तरी देईल. असे मी जेव्हा त्यांना म्हणालो तेव्हा त्यांना लाज वाटली.

यानंतर माझ्याकडे जे लोक आले ते शीख होते. ते म्हणाले की आम्ही येथील शिखांसारखे नाही. आश्चर्याची गोष्ट ही होती की त्यांच्याजवळ किरपाण नव्हत्या. मी त्यांना कारण विचारले नाही. परंतु त्याच्या हातात कडे होते आणि मला वाटते त्यांना दाढीही होती. ते म्हणाले की आम्ही फार अडचणीत सापडलो आहो. तुम्ही तिथे काय करत होता असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले की आम्ही हजारा जिल्ह्यातील आहो व तिथे आमची जमीन होती आणि ते शेती करत होते. ते म्हणाले की आम्हाला जमीन आणि अवजारे दिली तर आम्ही इथेही शेती करू शकतो. मला वाईट वाटले. त्यांचे म्हणणे तर योग्य होते. मी त्यांना विचारले की तुम्ही पूर्व पंजाबमध्ये का जात नाही. ते म्हणाले पूर्व पंजाब सरकार केवळ पश्चिम पंजाबमधून आलेल्या लोकांना सामावून घेण्याकरिता तयार आहे. कुठूनही आलेल्या लोकांना आम्ही सामावून घेऊ शकत नाही असे ते म्हणतात. आणि ते सरहद्द प्रांतातील असल्यामुळे त्यांना केंद्र सरकारकडे जाण्याकरिता सांगण्यात आले.

केंद्र सरकारजवळ तर जमीन नसते परंतु ते जर यांना जमीन देईल व हे काम करू लागतील तर फार चांगले होईल. सरकारने त्यांच्याकरिता बैल, नांगर, बियाणे इत्यादी गोष्टींची व्यवस्था करावी. दिल्ली प्रांतात इतकी जमीन आहे की नाही हे मला माहीत नाही. परंतु ज्यांना नांगर हाती धरायची इच्छा आहे त्यांना कुठेतरी वसवले पाहिजे. माझ्या हाती सत्ता असती तर त्यांच्याकरिता मी वेगळी छावणी उघडली असती. तिथे त्यांनी आपल्या गरजेचे अन्नधान्य आदी सर्व निर्माण केले असते. हे जर शक्य नसेल तर सरकारने या गोष्टींना येणाऱ्या खर्चाकरिता त्यांना कर्ज द्यावे. हे लोक म्हणतात की आता आमच्याजवळ पैसा नाही, परंतु ते उद्योगी आहेत आणि त्यांना जर सोय उपलब्ध करून दिली तर ते सर्व काही उत्पन्न करतील व आळशीपणा करणार नाहीत. अशा प्रकारच्या शेतकऱ्यांना किती तरी ठिकाणी कामाशिवाय बसावे लागत असल्यामुळे देश बरेच काही गमावत आहे असे मला वाटते. ते आपले भाऊ आहेत आणि आपण त्यांच्याकरिता काही तरी केले पाहिजे. सरकारमध्ये कोणाला भेटायला पाहिजे हे मला माहीत नाही. परंतु तुमच्या माध्यमातून सराकरला मी सांगू इच्छितो की अशा लोकांना मदत करणे आमचे कर्तव्य आहे. ते म्हणतात की आम्ही कोठे राहावे आणि काय खावे? मी तर म्हणेन की त्यांच्याकरिता वेगळे शिबीर असले पाहिजे आणि जोपर्यंत तसे होत नाही तोपर्यंत त्यांनी याच शिबिरात राहून आपले पोट भरावे. तिथे जर त्यांना जागा मिळू शकत नसेल तर संपूर्ण भारतात जिथेकुठे जागा असेल ती आमचीच जागा आहे. ते असे म्हणत नाहीत की आम्हाला एखाद्या मुसलमानाचे घर मिळवून द्या. ते म्हणतात की आम्हाला जो त्रास भोगावा लागला तो दुसऱ्याला देण्याची आमची इच्छा नाही. ते म्हणतात की आम्ही गरीब लोक आहो. तसे तर ते मजबूत लोक आहेत परंतु त्यांची मजबुती इतरांना घाबरवण्याकरिता नाही. आपल्याला तर इथे ईश्वराला घाबरून बसायचे आहे आणि जसे जीवन व्यतीत होईल तसे करायचे आहे. परंतु मी सांगितले की या सर्व गोष्टी काही दिवसांकरिता आहेत. त्यांनी विचारले की हे कसे. ज्याप्रमाणे इथल्या एका बंधूंनी विचारले की पाकिस्तानमधून आलेल्या लोकांना परत जावे लागेल आणि पाकिस्तानमध्ये जे मुसलमान गेले त्यांना परत यावे लागेल हे कसे शक्य आहे. मी म्हणालो की हे आज नाही तर उद्या झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु याची अट ही आहे की आम्ही चांगले व्हावे, आमचा कोणी शत्रू नाही, मुसलमानसुद्धा आपले शत्रू नाही असे आपण समजायला पाहिजे. काही लोक म्हणतात की इथले मुसलमानसुद्धा पंचमस्तंभी आहेत. ते गरीब बिचारे पंचमस्तंभी कसे असू शकतील? आपण इथे असे आहो की आपल्याला कोणीही त्रास देऊ शकत नाही आणि जर कोणी त्रास देईलच तर ईश्वर त्याला पाहून घेईल वा आपले सरकार त्याला मारून टाकील. आज जर आपण भानावर आलो तर उद्या सर्व काही ठीक होईल. मीसुद्धा मोकळा होईन. आज मी अतिशय अस्वस्थ आहे. माझ्याकरिता जगणे आता ओझ्यासारखे झाले आहे. मी विचार करतो की अजूनही मी इथे का आहे. जर दिल्लीने सुज्ञपणा धारण

केला जर मी शक्तिशाली होईन आणि पळत पश्चिम पंजाबमध्ये चालला जाईन आणि जे मुसलमान इथून गेले आहेत त्यांना सांगेन की तुमच्यासाठी मी भूमी तयार केली आहे आणि तुमची इच्छा असेल तेव्हा तुम्ही परत येऊ शकता. अशी वेळ केव्हा तरी येणे क्रमप्राप्त आहे कारण करोडो लोक परस्परांचे फार काळ शत्रू कसे राहू शकतील? भारतामध्ये असलेल्या साडेतीन - चार कोटी मुसलमानांना मारून टाकणे वा हाकलून लावणे शक्य नाही. असे कोणी स्वप्नसुद्धा पाहू शकत नाही आणि असे स्वप्न पाहण्याची मला इच्छा देखील नाही. परंतु आज मी एक प्रकारचे ओझे झालो आहे. एक काळ असा होता की जेव्हा माझा शब्द कायदा होता. परंतु आज असे नाही. अशा परिस्थितीत मी पळून जायला पाहिजे काय? मी जिवंत असो वा मरो परंतु जे लोक दुःखीकष्टी जगत आहेत ते एक ना एक दिवस निश्चितच आपल्या घरी परततील आणि तेही आपल्या मानमर्यादांसह. आपल्या भावंडांना भेटण्याकरिता ते परत येतील, त्यांच्याशी भांडण्याकरिता नाही. याचप्रमाणे मुसलमांनानीही परतावे. हाच असा एकमेव मार्ग आहे की ज्याने आपण जिवंत राहू शकतो, इतर कोणत्याही मार्गाने नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ११७-२२

३१. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २६, १९४७

नोव्हेंबर २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका बंधूंनी मला पत्र लिहिले आहे. त्यात मुंबईच्या वर्तमानपत्रातील एक कात्रण पाठवले आहे. त्यात लिहिले आहे की गांधी तर काँग्रेसचाच नगारा वाजवत असतो. लोकांना ते ऐकायचीसुद्धा इच्छा नसते. अशाच प्रकारे रेडिओ वगैरेचाही काँग्रेस जर आपल्याच प्रचाराकरिता उपयोग करत असेल तर अखेरीस इथे हिटलरशाही स्थापन होईल. हे अगदी चूक आहे. मी तर कोणाचा नगारा वाजवत नाही वा सर्व जगाचा वाजवतो. त्या कात्रणात असेही म्हटले आहे की अहिंसेची गोष्ट तर मी असाच करतो, सत्य हे आहे की सरकारला आपलेच गाणे गायचे आहे. मला हेच सांगायचे आहे की जे सरकार स्वतःचेच गाणे गाते ते चालू शकत नाही. आणि मी तर राष्ट्राचीच सेवा करत असतो. धर्माशी संबंधित गोष्टीच मी तुम्हाला सांगत असतो. शक्य आहे की काही लोकांना त्या ऐकाव्याश्या वाटत नसतील परंतु काही लोक सांगतात की माझे बोलणे ऐकल्यामुळे त्यांना फार मोठा धीर वाटतो, दिलासा मिळतो. लोकांच्या मनाविरुद्ध माझे बोलणे ऐकण्याची कोणीही बळजबरी करत नाही. तुमचे मन जर कुठे तरी दुसरीकडे असेल तर माझे बोलणे न ऐकता तुम्ही मध्येच उठून जाऊ शकता. तुम्ही लोक मला सोडाल तर मी प्रार्थनाही करवणार नाही आणि भाषणही होणार नाही. मी खास रेडिओवर बोलण्याकरिता जाणारा माणूस नाही आणि मला ते आवडतही नाही. इथेसुद्धा काय बोलायचे याचा विचार करून मी येत नाही.

आपल्या अनेक स्त्रिया पाकिस्तानमध्ये राहिल्या आहेत. लोक त्यांच्यावर अत्याचार करतात. त्या बिचाऱ्यांची घडण अशी झालेली आहे की त्यांना त्याची लाज वाटते. माझ्या मते लाजिरवाणे व्हावे असे त्यांनी काहीही केलेले नाही. एखाद्या स्त्रीला मुसलमानांनी धरावे आणि समाजाने तिला कुचकामी समजावे, आई, बाप, नवरा सर्व तिला सोडून देत असतील तर ही घोर निर्दयता आहे. माझी मान्यता आहे की ज्या स्त्रीमध्ये सीतेचे पावित्र्य आहे त्या स्त्रीला कोणीही स्पर्श करू शकत नाही. परंतु प्रत्येक स्त्री तर सीता होऊ शकत नाही. जिला पकडले, जिच्यावर बळजबरी केली तर आम्ही तिची घृणा केली पाहिजे काय? ती थोडेच व्यभिचारीणी असते. माझ्या मुलीला वा बायकोलाही धरून नेऊ शकतात, तिच्यावरही बलात्कार होऊ शकतो. परंतु मी कधीही त्यांची घृणा करणार नाही. अशा किती तरी स्त्रिया नोआखालीत माझ्याकडे आल्या होत्या. मी त्यांचे सांत्वन केले. लाज तर त्या बलात्काऱ्यांना वाटायला पाहिजे. त्या बिचाऱ्या भगिनींचा काय दोष?

एक बंधू (प्रांतीय काँग्रेस कमेटीचे सचिव. ते शेतकरीही होते.) लिहितात की कल्पना करा की कंट्रोल रद्द झाले, लोकांनी स्वतःकरिता धान्योत्पादन सुरू केले, गावातील लोक सोंगण्याकरिता स्वतःहोऊन परस्परांना मदत करू लागले तर धान्य स्वस्त होईल. परंतु शेतकऱ्यांना मजूर देऊन मजुरांना कामावर लावावे लागले तर किंमती वाढतील. आधी तर एक शेतकरी सोंगण्याकरिता दुसऱ्या शेतकऱ्याला निमंत्रण देत असे. आणि आलेले पीक साफ करून घरात आणणे सहज होऊन जात असे. आज आपण ती पद्धत विसरलो आहो, परंतु ती परत आणली पाहिजे. एका हाताने काहीही होऊ शकत नाही.

याच बंधूंचे असेही म्हणणे आहे की मंत्र्यांमध्ये किमान एक तरी शेतकरी असला पाहिजे. आमच्या दुर्दैवाने आमचा एकही मंत्री आज शेतकरी नाही. सरदार जन्माने शेतकरी आहेत, शेतीबद्दल त्यांना ज्ञानही आहे, परंतु ते व्यवसायाने बॅरिस्टर होते. जवाहरलालजी विद्वान आहेत, मोठे लेखक आहेत परंतु बिचाऱ्यांना शेती कशी करावी हे काय माहीत? आमच्या देशात ८० टक्क्यांपेक्षा जास्त लोक शेतकरी आहेत. लोकशाहीत देशात शेतकऱ्यांचे राज्य असायला पाहिजे. त्यांनी बॅरिस्टर होण्याची गरज नाही. चांगले शेतकरी कसे व्हावे, उत्पन्न कसे वाढवावे व जमीन सूपीक कशी ठेवावी हे त्यांना कळले पाहिजे. आपल्याजवळ जर असे शेतकरी असतील तर जवाहरलालला मी त्यांचा सचिव व्हायला सांगेन. आपल्या शेतकरी मंत्र्याने प्रासादात राहायला नको तर मातीच्या घरात राहिले पाहिजे व त्याने दिवसभर शेतीची मशागत केली पाहिजे. असे झाले तरच शेतकऱ्याचे राज्य येईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १२३-४

३२. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २७, १९४७

बिर्ला भवन,,

नोव्हेंबर २७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही कदाचित पाहिली असेल किवा पाहाल (बातमी) की मी महाराज्यपालांना भेटण्याकरिता गेलो होतो (जे २७ नोव्हेंबरला इंग्लंडहून परतले होते). आता ही बातमी केव्हाही वृत्तपत्रांमध्ये येऊ शकते. त्यानंतर मी लियाकत अली साहेबांनाही भेटण्याकरिता गेलो होतो. अशा प्रकारे मला दोघांनाही भेटण्याची संधी मिळाली. बऱ्याच गप्पा झाल्या आणि ते कामही करत आहेत. लियाकत साहेब आजारी तर आहेत आणि मी पाहिले की त्यांना अंथरुणातच पडून राहावे लागते. त्यांच्या छातीत वेदना झाल्या होत्या आणि मी पाहिले की त्यांच्या हृदयाचे ठोकेही वेगात पडत होते. आता ते बरे आहेत, परंतु फार अशक्त झाले आहेत. ते माहाराज्यपालांच्या बंगल्यातच थांबले असल्यामुळे त्यांनाही भेटायला गेलो. जवाहरलालजी जसे येथील प्रधानमंत्री आहेत तसेच तेही पाकिस्तानचे प्रधानमंत्री आहेत. तर ते आणि तेथील जे अर्थमंत्री आहेत ते, त्यांचे नाव मी विसरलो आहे (गुलाम मोहम्मद), सरदार पटेल आणि अजून दोघे हे सर्व भेटले आणि त्यांनी काही ना काही केले. सगळीच्या सगळी माहिती तर मी सांगू शकत नाही. परंतु त्यावर कार्यवाही झाली तर शक्य आहे की आज ज्या अडचणीत आपण सापडलो आहो, जो गोंधळ सुरू आहे त्यातून आपण काही प्रमाणात बाहेर पडू. परंतु काय घडेल आणि काय घडणार नाही हे सर्व ईश्वराच्या हाती असते. अखेरीस माणूस केवळ प्रयत्न करू शकतो.

वृत्तपत्रांमधून तुम्ही हेही ऐकले असेल की शेख अब्दुल्ला इथे आले आहेत. महत्त्वाची गोष्ट ही आहे की त्यांनी काश्मीरमध्ये जितके हिंदू, मुसलमान आणि शीख राहतात त्या सर्वांना आपल्या सोबत करून घेतले आहे. काश्मिरी लोक त्यांना शेरे काश्मीर म्हणतात. आणि ते खरेही आहे. त्यांनी भरपूर काम केले आहे. मुसलमानांची संख्या तर बरीच जास्त आहे आणि हिंदू आणि शीख मूठभर आहेत असे आपण म्हणतो परंतु ते सर्वांना बरोबर घेऊन चालतात. त्यांना आवडणार नाही असे कोणतेही काम ते करत नाहीत. तुम्ही हेही पाहिले असेल की इथे येत असतानाच ते जम्मूला गेले होते. जम्मूमध्ये हिंदूंनी काही अतिरेक केला आहे आणि बराच जास्त केला आहे. त्याची संपूर्ण माहिती तर आपल्या वर्तमानपत्रांमध्ये आलेली नाही. महाराज साहेबही तिथे गेले होते आणि त्यांचे नवीन प्रधानमंत्रीही (मेहरचंद महाजन, पंजाब उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांची नोव्हेंबरमध्ये जम्मू आणि काश्मीरचे प्रधानमंत्री म्हणून नियुक्ती झाली होती.) तिथे गेले होते. मग तिथे दोन प्रधानमंत्री आहेत काय असे मी

त्यांना गंमतीत विचारले. ते म्हणाले की मलाही याची माहिती नाही, परंतु मी व्यवस्था करतो आहे. दोन असो वा एक. तर तेही जम्मूमध्ये निघून गेले होते. जम्मूमध्ये जे काही घडले ते महाराजांनी घडवले की त्यांच्या नवीन प्रधानमंत्र्यांनी घडवले हे मला माहीत नाही. परंतु या गोष्टी तिथे घडल्या आणि आपल्याकरिता या अतिशय लाजिरवाण्या आहेत. तरीही शेख अब्दुल्ला यांनी आपला तोल ढळू दिला नाही व जम्मूतील हिंदूंनी त्यांना पाठिंबा दिला. यामुळे त्यांना अधिक काही सांगण्याची आवश्यकताच कुठे होती? परंतु तरीही हिंदू, मुसलमान आणि शीख या सर्वांनी एकोप्याने व परस्परांवर विश्वास ठेवून राहणे हाच एकमेव मार्ग आहे हे त्यांना काश्मीरला आणि संपूर्ण भारताला दाखवून द्यायचे आहे. असे झाले तरच भारत आणि काश्मीर सोबत राहू शकतील. त्यांचे प्रयत्न त्या दिशेने सुरू आहेत यात काही संशय नाही. परंतु त्यात एक अडचण आहे. तो पहाडी इलाखा आहे. चौदा हजार फूट जरी नाही तरी दहा हजार फूट उंच असेल. तिथे बराच बर्फ पडतो. यामुळे तिथे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे सोपे नसते. तिथून आरामात यायचे असेल तर पाकिस्तानच्या मार्गानेच येणे शक्य असते. परंतु ते जाऊयेऊ देतील की नाही कोणी सांगावे? याशिवाय जे आफ्रिदी हल्ला करणारे आहेत, वा ते पाकिस्तानचे आहेत असे म्हणा, त्यांच्याशी लढाई सुरू आहे. अशा अवस्थेत काश्मिरी लोक तिकडून कसे येऊ शकतील? अशी तर भारत सरकारने आता त्यांना मदत पाठवली आहे. पण त्यांना रस्ता संघराज्यातूनच मिळू शकतो. काश्मीरमध्ये काही मोठा व्यापार तर नाही, परंतु तेथील लोक उद्‌द्यमी आहेत, कारागीर आहेत. काश्मीर तर एक मोठी फळबागच आहे. परंतु या सर्व गोष्टी काश्मीरमधून कोणी आणाव्या आणि कशा आणाव्या? विमानाने तर या सर्व गोष्टी येऊ शकत नाहीत आणि जे विकणारे आहेत ते विमानाने कसे येतील? असे तर काम होऊ शकत नाही. यामुळे तिथे एकच मार्ग आहे. तो पूर्व पंजाबमधील पठाणकोटकडून आहे. तो लहानसा रस्ता आहे, परंतु आहे. परंतु पूर्व पंजाबमधील हिंदू इतके वाईट झाले आहेत की तिकडून कोणताही मुसलमान येऊ शकत नाही. शेख साहेब म्हणतात की हाच सगळ्यात मोठा धोका आहे. शेख अब्दुल्ला तर मोठे माणूस आहेत परंतु तेसुद्धा सांगतात की मलासुद्धा तिकडून जायचे असले तर संकट उभे राहिल्यासारखे वाटते. पोलीसच नाही तर कोणताही माणूस म्हणतो, पगडी काढून दाखव. शेडी आहे की नाही पाहतात. अजून काही बाही विचारतात आणि जर तो मुसलमान निघाला तर संपलाच. तिथे अशी परिस्थिती आहे.

तर अशा प्रकारे महाराज्यपाल आणि हे चार लोक भेटले. त्यांनी जर काही केले तर चांगलेच आहे. आणि त्यांनी काही केलेसुद्धा. परंतु त्यांनी केल्याने काय होते? लोकांनाच वेडाने झपाटले असेल तर काहीही करता येऊ शकत नाही. पूर्व पंजाबच्या लोकांना मी म्हणेन की आता फार झाले, आम्ही पुष्कळ वाईट वागलो आहो, आता आपण सर्व काही विसरू या. की हे सर्व असेच चालत राहणार आहे? मला असे वाटते की मार्ग मोकळा झाला पाहिजे. सरकारनेसुद्धा आपली जबाबदारी पार पाडली

पाहिजे. सरकार जर हे करू शकणार नसेल तर तिथे विमानाने सैन्य पाठवून काय उपयोग? त्यामुळे काश्मीरमधील व्यापाराला मदत होणार आहे काय? असे होणार नसेल तर संघराज्य काश्मिरी लोकांना खाऊ घालत राहणार आहे काय? हे शक्य नाही. आज आपल्या सरकारजवळ करोडो रुपये जरी असले तरी ते अशा प्रकारे पैसा उधळत राहणार आहे काय?

मी असे ऐकतो की प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याला एक सचिव मिळेल. ते सचिव काय करतील वा त्यांना किती पगार असेल हे मला माहीत नाही. या गतीने जर आपण पैसा उधळू लागलो तर आपला विनाश व्हायला वेळ लागणार नाही. आपली भूमी करोडपती लोकांची भूमी नाही. आपला देश तर गरिबांचा देश आहे. इथे अतिशय मेहनत करून मोठ्या मुश्किलीने लोकांना काही तांब्याची नाणी मिळत असतात. इथे हाताच्या बोटावर मोजण्याइतके करोडपती वा व्यवसाय करणारे असतील.आणि या लोकांजवळसुद्धा किती पैसा आहे? त्याची जर अशी उधळपट्टी झाली तर तो खर्च व्हायला वेळ लागणार नाही. आणि आपल्याला तर संपूर्ण देशाची काळजी घ्यायची आहे. आपण अशा प्रकारे पैसा वाया घालवू शकत नाही. यामुळे कोणालाही सुरक्षितपणे जातायेता येईल अशा प्रकारे तो मार्ग सुरक्षित कसा करता येईल हे सरकारने पाहिले पाहिजे. काश्मिरी लोक सुंदर कपडे तयार करतात. ते रस्त्याच्या वाहतुकीने आणता येऊ शकतात. शाली आणि हस्तोद्योगाने तयार केलेले साहित्यसुद्धा आणता येते. अशाच प्रकारे काश्मीरमधून सुका मेवासुद्धा आणता येऊ शकतो. आज तुम्हाला काश्मिरी सफरचंद खायचे असतील तर ते मोठ्या मुश्किलीने मिळू शकतील. काश्मीर भारतीय संघराज्यात विलीन झाले आहे परंतु अशा प्रकारे ते भारतात किती दिवस राहू शकेल? काश्मीरला सुरक्षित मार्ग मिळाला नाही तर काय होईल हे मला माहीत नाही.

आता तिसऱ्या मुद्द्याचा उल्लेख करून मी दिवस संपवीन. मला नुकताच द डॉन आणि पाकिस्तान टाईम्सच्या प्रती मिळाल्या. हे दोन्ही पाकिस्तानमधील प्रमुख दैनिक आहेत. डॉन वा पाकिस्तान टाईम्समध्ये जेव्हा काही प्रकाशित होते तेव्हा आपण त्या गोष्टीकडे सहजासहजी दुर्लक्ष करू शकत नाही, ती काय वृत्तपत्रे आहेत असे म्हणू शकत नाही. अशाच प्रकारे पाकिस्तानचे लोक हिंदुस्तान टाईम्स वा बॉम्बे क्रॉनिकलमध्ये काही आले तर त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत, करू शकतात? नाही ना? यामुळे हा युक्तिवाद व्यर्थ आहे. मी तर असे समजतो की तीसद्धा चांगली वृत्तपत्रे आहेत, मुसलमान लोक ती वाचत असतात. आणि चांगले चांगले मुसलमान ते वर्तमानपत्र चालवत आहेत. तर ते त्या काठेवाडच्या मुसलमानांबद्दल लिहितात. सरदार जेव्हा जुनागढमध्ये गेले होते तेव्हा तेथील मुसलमानांनीसुद्धा त्यांचा उपयोग केला हे पाहून मला फार आवडले होते. बरे झाले तुम्ही आला, आम्ही सर्व त्रस्त होतो, आता कदाचित शांततेत राहू शकू असे ते म्हणू लागले होते. काठेवाडचे सर्व

राजे आणि प्रजा एक झाल्यानंतर जुनागढ कुठे वेगळा जाऊ शकत होता? यामुळे काही मारपीटही झाली नाही व सर्व प्रकरण निपटले म्हणून मला आनंद झाला होता. त्यांनी काही पूर्णपणे अहिंसेचा अवलंब केला नव्हता, परंतु त्यांनी जी हिंसा केली ती अतिशय विचारपूर्वक संयमाने केली. हे सर्व पाहून मी तर खुश झालो होतो. परंतु आता ऐकतो की काठेवाडच्या मुसलमानांना आरमशीरपणे राहता येत नाही असे डॉनमध्येसुद्धा आले आहे. ऐन वेळी एका मुसलमानाने पाठवलेली तारही मला मिळाली. काठेवाड असा भाग होता की जिथे मुसलमान आरामात राहत होते आणि कोणी त्यांना स्पर्शसुद्धा करत नव्हता. तिथे चांगले आणि बलवान मुसलमान जसे आहेत तसेच बंडखोर मुसलमानही आहेत. ते आपसात बंडखोरी करत नाहीत तर उपजिविकेकरिता करतात. आता त्याच काठेवाडमध्ये त्यांना राहता येईल की नाही असा प्रश्न त्यांना पडला आहे. मग काय काठेवाडमधील सर्व मुसलमानांनी निघूल जायला पाहिजे वा हिंदूंनी सर्व मुसलमानांना कापून काढले पाहिजे? त्यांचा भयंकर छळ करण्यात आला आणि माझ्याकरिता तर ही गोष्ट असह्य आहे कारण मीही काठेवाडमध्ये जन्मलो आहे आणि तेथील सर्व संस्थानिकांना आणि हजारो लोकांना मी ओळखतो. सावलदास गांधी, जे मला मुलासारखे आहेत, तिथे सर्वेसर्वा झाले आहेत. त्यांनी तिथे कार्यकारी सरकारही स्थापन केले आहे. कार्यकारी सरकार असूनही निष्पाप लोक मारले जात असतील तर त्या सरकारचा उपयोग काय? लोक जर अशा प्रकारे कायदा हातात घेणार असतील तर मुसलमानांना सुरक्षित कसे वाटेल? या परिस्थितीची लागण इतरत्रही होऊ लागली तर काय होईल हे मी सांगू शकत नाही. हे सर्व तिथे झाले की नाही हे मला माहीत नाही परंतु डॉनमध्ये मी याचा वृत्तांत वाचला आहे आणि अशा ताराही मला आल्या आहेत. नंतर मी यासंबंधी काही हिंदूंना विचारले. ते म्हणाले की जाळपोळ आणि लुटीच्या काही घटना झाल्या आहेत परंतु खून वा मुसलमान स्त्रियाच्या अपहरणाच्या घटनांबद्दल आम्ही काहीही सांगू शकत नाही. परंतु डॉनचे म्हणणे आहे की असे चारही प्रकार तिथे झाले आहेत आणि तेही व्यापक प्रमाणात. मला अशा अनेक तारा आल्या आहेत परंतु त्यातील एकच तार मला दाखवण्यात आली. इतर तारा दाखवायच्या चुकून राहून गेल्या. वेगवेगळ्या ठिकाणच्या जवळपास ५०एक तारा मला आल्या असतील. आणि माझा मुलगा तिथे सर्वेसर्वा आहे हे सांगण्याचा त्यांना अधिकार आहे. परंतु माझा मुलगा जे काही करील त्या प्रत्येक गोष्टीची जबाबदारी मी कसा काय घेऊ शकतो? त्याचबरोबर या बाबतीत मी जगाची वा मुसलमानांची समजूत कसा काय घालू शकतो? ते जे लिहितात ते खरे आहे. परंतु माझ्या मुलाला मी माझ्या भावना केव्हा कळवू? आजच मी त्यासंबंधी वाचले. यामुळे तुमच्या माध्यमातून माझ्या मुलालाच नाही तर काठेवाडच्या सर्व हिंदूंना, कारण तिथे हिंदूच आहेत, शीख तर एखाददुसरा काम करण्याकरिता गेला असेल, सांगू इच्छितो की जर तेथील हिंदू इतके बदमाश झाले असतील तर काठेवाड सुरक्षित राहू शकत नाही. आम्ही जुनागढ घेतले यात काही संशय नाही. परंतु तो अशा प्रकारे

घेतला आहे की तो आम्ही ठेवणार आहो की नाही हे सांगता येणार नाही. ज्याप्रमाणे आम्ही स्वातंत्र्य घेतले परंतु ते गमावण्याच्या मार्गावर आहो त्याचप्रमाणे जुनागढचेही आहे. मग सरदार जुनागढमध्ये काय म्हणाले याची त्यांनी आठवण करून दिली. ते म्हणाले होते की मुसलमान जर काठेवाडशी म्हणजे संपूर्ण भारताशी प्रामाणिक असतील तर त्यांच्या मुलालासुद्धा कोणी स्पर्श करू शकणार नाही. ते म्हणाले होते की एखाद्या मुसलमान तरुणीला कोण कसा हात लावतो ते मी पाहीन. ते असे म्हणू शकतात कारण ते एकाच वेळी सरदार आणि भारताचे गृहमंत्री आहेत. त्यांना तसे म्हणण्याचा अधिकार आहे. परंतु ते असे म्हणाल्यानंतर काय झाले? काठेवाडमध्ये अशा घटना घडू शकतात आणि लोक इतके झपाटल्यासारखे होतात याचे मला दुःख होते. आपण आपला धर्म गमावला आहे, आपली कार्यक्षमता गमावली आहे आणि अशा प्रकारे आपण देश गमावणार आहो. या सर्व गोष्टी तुमच्यासमोर ठेवणे माझे कर्तव्य आहे असे मला वाटले. या गोष्टी आपल्या वृत्तपत्रांमध्ये आलेल्या नाहीत. परंतु मला सगळ्या बातम्या मिळतात. चौकशी करणे अर्थातच माझे कर्तव्य होते, परंतु त्याकरिता मला वेळ कुठे होता? यामुळे मी जे काही ऐकले ते तुम्हाला सांगितले. इतकेच नाही तर लियाकत अलींनासुद्धा मी म्हणालो की तुमची परवानगी असेल तर मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे. त्यांनी मान्य केले. काठेवाडमध्ये काय होत आहे याची तुम्हाला कल्पना आहे काय असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले की मला सर्व काही माहीत आहे. अशा गोष्टी तिथे घडलेल्या आहेत आणि अशा चारही प्रकारच्या गोष्टी तिथे झालेल्या आहेत. परंतु त्या किती प्रमाणात हे मी सांगू शकत नाही. ते पाकिस्तानचे प्रधानमंत्री आहेत. यामुळे त्यांनी सर्व काही मला उघडउघड सांगितले. उलट मी मात्र अतिशय संयमाने बोलत होतो. नंतर मी ठरवले की या सर्व घटनांनी मी किती व्यथित झालो आहे ते तुम्हाला सांगावे.

काठेवाड माझे घर आहे. त्या माझ्या घरालाच आग लागली असेल तर मला कोणाला काही म्हणायची काय सोय आहे? दिल्लीतील लोकांना मी काय म्हणू शकतो? माझ्या आजूबाजूला सतत एक ना एक घटना घडत आहे. अशा परिस्थितीत मी गप्प कसा राहू शकतो? अशा प्रकारच्या वातावरणात कोणताही समंजस माणूस गप्प राहू शकत नाही. ही माझी दुःखद काहाणी आहे आणि इतकेच काय ही संपूर्ण भारताचीसुद्धा कहाणी आहे. यामुळेच मी ती तुमच्यासमोर ठेवली आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १२५-३१

३३. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २८, १९४७

नोव्हेंबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्हाला माहीतच आहे की आज गुरू नानक जयंती आहे. कोणी तरी मला निमंत्रण पाठवले होते परंतु त्या वेळी तर मी म्हणालो की येण्याकरिता मला माफ करा. परंतु आज बाबा बख्तियार सिंह माझ्याकडे आले आणि तुम्ही यायलाच पाहिजे असा आग्रह त्यांनी केला. ते १० वाजता माझ्याकडे आले होते आणि एका तासातच मला जायचे होते. मग मी विचार केला की आता मी जायलाच पाहिजे. मी तर माझ्याकडून काही केले नाही परंतु शीखबंधू माझ्यावर नाराज आहेत. हं, मी त्यांना एक कडू घोट पाजण्याचा प्रयत्न मात्र केला होता. परंतु जगात हे असेच चालत असते. ते परत म्हणाले की ते काहीही असले तरी तुम्हाला यावेच लागेल. तिथे हजारो शीख बांधव असतील आणि त्यांत अनेक दुःखीकष्टी शीखही असतील. त्यांना तुमचे म्हणणे ऐकायची इच्छा असू शकते. तेव्हा मी म्हणालो की ठीक आहे मला ११ वाजता घेऊन जा. ११ वाजता ते शेख अब्दुल्लांनाही सोबत घेऊन आले. त्यांनाही तिथेच घेऊन जाणार होते. मी म्हणालो की शेख अब्दुल्ला तिथे कसे जाऊ शकतात, आज तर शीख आणि मुसलमान एकमेकांना सहन करू शकत नाहीत. परंतु ते काहीही असो, शेख अब्दुल्लांनी एक फार मोठे काम केले आहे. काश्मीरमध्ये त्यांनी हिंदू, मुसलमान आणि शीख यांना सोबत ठेवले आहे आणि सोबत जगायचे आणि सोबत मरायचे असे त्यांनी ठरवले आहे. मग मला वाटले की शेख अब्दुल्ला यांनाही सोबत नेले पाहिजे. यामुळे मी त्यांना माझ्याबरोबर घेऊन गेलो. मला हे फार चांगले वाटले. हजारो स्त्रीपुरुष तिथे होते. मी तर थोडेसेच बोललो परंतु शेख अब्दुल्ला भरपूर बोलले आणि सर्वांनी त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेतले. डोळ्यांतूनही कोणी काही दाखवत नव्हता, मग आवाज करण्याची तर गोष्टच वेगळी. आमंत्रण देऊन आम्हा लोकांना घेऊन गेले होते ना! अखेरीस शीख शूर असल्यामुळेच हे सर्व व्यवस्थित पार पडले. मला वाटले की हे सर्व तुम्हाला सांगितलेच पाहिजे.

मला बंगालमधील एक पत्र मिळाले. ते मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्सने पाठवले आहे. मी त्या पत्राला उत्तर पाठवू शकलो नाही. परंतु मी त्याबद्दल विचार केला आणि घनश्यामलाही त्याबद्दल काही माहिती आहे काय म्हणून विचारले. ते म्हणाले की मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्सला सरकारशी व्यवहार करायचा आहे व त्यांच्याशी पत्रव्यवहार करायचा आहे. परंतु सरकार सर्वांचे आहे मग ते हिंदू, मुसलमान, पारशी कोणीही असो. मग हिंदू, पारशी इंग्रज यांची चेंबर ऑफ कॉमर्स वेगवेगळी कशी असू शकते? यामुळे सरकारने त्यांना मान्यता दिली नाही. ते सद्गृहस्थ आपल्या पत्रात म्हणतात की मारवाडी आणि युरोपिअन चेंबर ऑफ कॉमर्स अस्तित्वात आहे पण मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्स

अस्तिवात येण्याला मात्र परवानगी देण्यात आलेली नाही. मला त्यांचा मुद्दा पटतो आणि यामुळे मला दुःख होते. सरकारला मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्सशी कोणताही व्यवहार करण्याची जर इच्छा नसेल तर ते युरोपिअन चेंबर ऑफ का ॉर्सशीही व्यवहार करू शकत नाही. आतापर्यंत या संस्था अस्तित्वात होत्या आणि युरोपिअन चेंबर ऑफ कॉमर्स अस्तित्वात आली कारण युरोपीय लोक सत्तेत होते व त्यांची आपल्यावर सत्ता असल्यामुळे व्हाईसराय तिचे अध्यक्ष होते. आणि ख्रिसमसमध्ये ते कलकत्त्याला जात असल्यामुळे ते तिथे लांबलांब भाषण देत असत. परंतु आता ही परंपरा कायम राहू शकत नाही. युरोपिअन, मुसलमान, मारवाडी यांची वेगवेगळी चेंबर ऑफ कॉमर्स कशी काय असू शकते? केवळ एकच भारतीय चेंबर ऑफ कॉमर्स असू शकते. हिंदू, मुसलमान, पारसी या सर्वांची वेगवेगळी चेंबर ऑफ कॉमर्स असेल तर भारताच्या स्वातंत्र्याचा काय उपयोग? विशेषतः युरोपीय लोकांनी आता नमते घेतले पाहिजे. वेगळे राहून त्यांनी काहीही करू नये. कोणतेही विशेषाधिकार त्यांनी नाकारले पाहिजे आणि इतरांच्या बरोबरीचेच अधिकार आपल्याला मिळायला पाहिजे असा आग्रह धरला पाहिजे. असे झाले तर भारताच्या स्वातंत्र्याचे हे फार मोठे चिन्ह असेल. युरोपिअन चेंबर ऑफ कॉमर्स दरवर्षी व्हाईसरायना आमंत्रित करते. परंतु माझ्या मते ते प्रधानमंत्री, उप-प्रधानमंत्री वा लॉर्ड माऊंटबॅटन यांनासुद्धा दरवर्षी आमंत्रित करू शकत नाही. युरोपिअन म्हणून माऊंटबॅटन त्यांना निश्चितच जाऊन भेटू शकतात. परंतु चेंबर या नात्याने त्यांना आमंत्रित करू शकत नाही. मी लहान माणूस आहे परंतु याबद्दल मला मुळीच संशय नाही. याचप्रमाणे मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्ससुद्धा सरकारमधून कोणालाही आमंत्रित करू शकत नाही. ती मारवाडी म्हणून कोणालाही आमंत्रित करू शकते परंतु चेंबरतर्फे नाही. त्या सर्वांचे अस्तित्व आहे कारण भारताचे अस्तित्व आहे. इतकेच नाही तर मुसलमानसुद्धा इथे वेगळा समुदाय म्हणून राहू शकत नाहीत. त्यांनी इथे भारतीय म्हणून राहावे. याचप्रमाणे शीख, हिंदू आणि युरोपीयसुद्धा इथे भारतीय म्हणून राहू शकतात. ते सर्व इथे भारताला निष्ठा वाहिलेले नागरिक म्हणून राहू शकतात आणि इतर कोणत्याही नात्याने नाही. यामुळे हा महत्त्वाचा मुद्दा त्यांना कळवावा असे मला वाटले. मी इथून जे लिहितो ते त्यांना पोहोचण्याआधी माझा आवाज त्यांच्यापर्यंत पोहोचला तर चांगले होईल. मुसलमानांना जर राजकीय आणि इतर दृष्टीने वेगळे अस्तित्व हवे असेल तर त्यांची ती इच्छा पूर्ण करता येऊ शकत नाही. युरोपीय इथे ख्रिश्चन म्हणून राहू शकतात आणि ख्रिश्चन धर्मात ज्या सुंदर गोष्टी आहेत त्यांचे ते पालन करू शकतात. अखेरीस हे त्यांचे सामाजिक आणि धार्मिक क्षेत्र आहे. परंतु जोपर्यंत प्रशासन आणि राजकारण यांचा संबंध आहे या सर्वांना समान पातळीवरून वागणूक दिली पाहिजे. याचप्रमाणे व्यापाराचासुद्धा प्रत्येकाशी संबंध येतो. मारवाडी म्हणतील की आम्ही खाऊ, गुजराती म्हणतील की आम्ही खाऊ, पंजाबी म्हणतील की आम्ही खाऊ तर उरलेल्या भारताकरिता काय राहील? अशा प्रकारे आम्ही आमचे काम चालवू शकत नाही.

एक गोष्ट तर मी तुम्हाला सांगायची विसरूनच गेलो. शीखांच्या सभेत मी तिचा उल्लेख केला होता. परंतु इथेसुद्धा शीख आणि हिंदू आहेत. आणि जी गोष्ट एकाकरिता खरी आहे ती दुसऱ्याकरिताही खरी असते. मी तर म्हणेन की आज शिखाचा नवीन दिवस आहे असे मानायला पाहिजे. यामुळे आजपासूनच लोकांना आपले भावंड मानणे हा शिखांचा धर्म होऊन जातो. गुरु नानक साहेबांनी इतर काही शिकवलेच नव्हते. ते तर मक्का शरीफलाही गेले होते आणि गुरूग्रंथसाहेबमध्येही (सांप्रदायिक ऐक्यासंबंधी) लिहिले आहे. गुरू गोविंदनी काय केले होते? अनेक मुसलमान त्यांचे शिष्य होते व त्यांना सामावून घेण्याकरिता त्यांच्या रक्षणाकरिता त्यांनी अनेकांना मारले होते. त्यांनी हातात तलवार तर घेतली होती परंतु तिलाही एक मर्यादा घातली होती. यामुळे मुसलमानांनी काहीही केलेले असले तरी आपण त्यांची नक्कल करायला नको. आपण सर्वांनी सौजन्याने वागायला पाहिजे आणि आपल्या कर्तव्याचे पालन केले पाहिजे. आज जेव्हा मी शिखांच्या सभेत बोलण्याकरिता गेलो होतो तेव्हा रस्त्यात मला एकही मुसलमान दिसला नाही याचे फार वाईट वाटले. चांदनी चौकात एकही मुसलमान दिसू नये याहून जास्त लाजिरवाणी गोष्ट कोणती आहे? मला तिथे माणसांची खूप मोठी गर्दी दिसली होती आणि मोटारींची लांबची लांब रांग चालली होती. परंतु त्यात एकही मुसलमान नव्हता. केवळ एक मुसलमान शेख अब्दुल्ला माझ्याजवळ बसले होते. अशा परिस्थितीत आपले काम कसे पुढे जाऊ शकते?

एक बंधू मला लिहितात की सोमनाथचे जे मंदिर होते त्याचा जिर्णोद्धार होईल. (इसवी सन १०३५ मध्ये महम्मद गझनीच्या आक्रमणात त्याचा विध्वंस करण्यात आला होता) त्याकरिता पैसा पाहिजे आणि जुनागढमध्ये सावलदास गांधींनी तयार केलेल्या सरकारने त्याकरिता ५०,००० रुपये मंजूर केले आहेत. जामनगरने त्याकरिता १ लाख कबूल केले आहेत. आज सरदार जेव्हा माझ्याकडे आले होते तेव्हा मी त्यांना विचारले की सरदार असून हिंदू धर्माकरिता सरकारी खजिन्यातील हवा तितका पैसा काढून देईल असे सरकार तुम्ही तयार करणार आहा काय? सरकार तर सर्व लोकांनी बनवले आहे. इंग्रजीत याला सेक्युलर स्टेट म्हणतात. याचा अर्थ होतो हे काही धार्मिक सरकार नाही. वा असे म्हणा की कोणत्याही एका धर्माचे हे सरकार नाही. असे असेल तर ते असे तर म्हणू शकत नाही की हिंदूकरिता इतका, शिखांकरिता इतका आणि मुसलमानांकरिता इतका पैसा देऊन टाकू. आपल्याजवळ तर एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे सर्व भारतीय आहेत. वेगवेगळ्या व्यक्तींचा वेगवेगळा धर्म असू शकतो. माझ्याजवळ माझा, तुमच्याजवळ तुमचा.

एका दुसऱ्या बंधूंनी एक चांगली चिठ्ठी लिहिली. ते म्हणतात की जुनागढ सरकार सोमनाथ मंदिराच्या जिर्णोद्धाराकरिता जर पैसा देईल वा येथील केंद्रीय सरकार पैसा देईल तर तो फार मोठा अधर्म

होईल. मला वाटते की त्यांनी अगदी योग्य मुद्दा मांडला आहे. यामुळे हे खरे आहे काय असे मी सरदारजींना विचारले. ते म्हणाले की मी जिवंत असताना असे होऊ शकत नाही. सोमनाथच्या जिर्णोद्धाराकरिता जुनागढची एक कवडीसुद्धा जाऊ शकत नाही. जर माझ्या हातून हे होणार नसेल तर बिचारा एकटा सावळदास काय करू शकतो? सोमनाथकरिता अनेक हिंदू पैसा देऊ शकतात. जर ते कंजूष होतील आणि पैसा देणार नाहीत तर सोमनाथचे मंदिर असेच पडून राहील. दीड लाख तर झाले आहेत आणि जामनगर साहेबांनी एक लाख रुपये दिले आहेत. अजून लागले तरी रुपयांची व्यवस्था होऊन जाईल.

मला अजून एक गोष्ट कळली. तुम्ही पाहिले असेल की पाकिस्तानमध्ये आपल्या मुलींचे अपहरण झाले आहे. त्यांना सोडवण्याकरिता प्रयत्न होत आहेत आणि ते व्हायलाही पाहिजे. तिथे जी कोणती अपहृत मुलगी जिवंत आहे तिला परत आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यांनी बळजबरी करून तिच्याबरोबर व्यभिचार केला असेल तर त्यामुळे तिचा धर्म आणि तिचे कर्म सर्व संपतात काय? मी तर असे समजत नाही आणि काल याबद्दल मी तुम्हाला सांगितलेही होते. बळजबरीने कोणाचाही धर्म बदलू शकत नाही. परंतु काही गुंड येतात आणि म्हणतात की एक हजार रुपये द्या, आम्ही त्या मुलीला परत आणू शकतो. मग काय हा व्यापार झाला आहे? माझ्या या तीन मुलीतून कोणी एकीला उचलून नेले व माझ्याकडे येऊन म्हणाला की एक हजार वा एक शंभर तरी द्या, मी मुलीला परत आणून देईन. तर मी त्याला उत्तर देईन की तू तिला मारून टाक. ईश्वराला तिला वाचवायचे असेल तर ती माझ्याजवळ येऊन जाईल. त्याने माझ्याशी सौदेबाजी का करावी? मी त्याला म्हणेन की तुला काय तिचा सौदा करायचा आहे? एक तर लुटारूपणा करतोस आणि वरून दंगेही करतोस. स्वतःचा धर्म तर तू सोडलास आणि आता माझी मुलगी आहे म्हणून मलाही दाबायला आलास? मी एक कवडीही देणार नाही. अशा प्रकारे कोणत्याही आईवडिलांनी आपल्या मुलीकरिता सौदा करू नये. त्यांची मुलगी ईश्वराजवळ आहे. ईश्वर सर्वत्र आहे. एका मुलीचा नवरा मेला तर ती मुलगी कुठे जाईल? हं, ही गोष्ट वेगळी की मुलीला तिथून यायचे आहे आणि भाड्याकरिता तिच्याजवळ पैसे नाहीत तर पैसे देऊन दिले. परंतु तो गुंड येऊन म्हणेल की इतके पैसे द्या तर ही गोष्ट काही होऊ शकत नाही. अशाच प्रकारचा एक दृष्टांत देतो तिथले आणि इथलेही, कारण इथेही तर आम्ही असेच केले आहे आणि मुसलमान मुली हिसकल्या आहेत, मग पूर्व पंजाबच्या सरकारने वा केंद्रीय सरकारने जिना साहेबांना सांगावे की आम्हाला एक लाख रुपये द्या, आमच्या ताब्यात जितक्या मुसलमान मुली आहेत त्या सर्व आम्ही परत करू. मी अशा सरकारला एक कवडीसुद्धा देणार नाही. अशा प्रकारच्या लज्जास्पद कृत्याचे बक्षीस ते कसे काय मागू शकतात? सरकारने आपली चूक कबूल करावी, अशी चूक परत कधीही करणार नाही

असे शपथेवर सांगावे व नुकसान भरपाईसह मुलीला परत करावे. आपण शुद्ध आणि शूर झालो नाही तर आपण काहीही साध्य करू शकणार नाही.

काल मी काठेवाडबद्दल चर्चा केली होती. पाकिस्तानच्या वृत्तपत्रांमध्ये मी काय वाचले आणि नंतर काही हिंदूंनीही मला जे सांगितले ते मी तुम्हाला सांगितले होते. परंतु आज सरदार माझ्याजवळ आले तेव्हा त्यांच्याशी मी चर्चा केली. मी त्यांना म्हणालो की तुम्ही जेव्हा काठेवाडमध्ये गेला होता तेव्हा मोठी मोठी व्याख्याने देऊन सांगितले होते की इथे एकाही मुसलमान मुलाला वा मुलीला कोणीही स्पर्श करू शकणार नाही. परंतु आता तिथे मुसलमानांना लुटण्यात आले, त्यांना मारहाण करण्यात आली, त्यांची घरेदारे जाळण्यात आली त्यांच्या मुलींनाही लोक उचलून घेऊन गेले. ते म्हणाले की जोपर्यंत माझी माहिती आहे, आणि ती बरोबरच आहे, एकही मुसलमान मारला गेला नाही, एकाही मुसलमानाचे घर जाळले गेले नाही आणि लुटण्यातही आले नाही. हं, तिथे काही झाले होते खरे, परंतु ते त्यांच्या पोहोचण्याच्या आधी झाले होते. तेव्हा तिथे गोंधळ सुरू होता. तेव्हा काही लूटमार झाली होती आणि कदाचित काही घरांना आगही लावण्यात आली होती. परंतु त्यावेळी सुद्धा खून वा अपहरण झाले नव्हते. तिथे केंद्र सरकारचा कोणी प्रतिनिधी असतो वा कमीश्नर वगैरे असतो. असे काहीही होऊ नये हे पाहण्याचे आदेश त्यांना देण्यात आले होते. मुसलमानांची लूटमार वा त्यांना मारून टाकण्याची गोष्ट तर सोडाच पण एकाही मुसलमानाला स्पर्शसुद्धा केला जाणार नाही असा बंदोबस्त करण्याकरिता त्यांना सांगण्यात आले होते. यामुळे तिथे असे काहीही घडले नाही. ही गोष्ट मी सायंकाळच्या प्रार्थनेत सांगू शकतो काय असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले की तुम्ही निश्चितच तसे करू शकता. ते म्हणाले की तिथे काही घडले असते तर मी त्याचा पाठपुरावा केला असता. ते म्हणाले की काँग्रेसच्या हिंदूंनी जिवाचा धोका पत्करून मुसलमानांच्या जिवाचे आणि संपत्तीचे रक्षण केले. तिथे कोणतीही गुंडगिरी चालू शकत नाही. सरदार म्हणाले की जोपर्यंत मी आहे आणि गृहमंत्रालयाची जबाबदारी माझ्याकडे आहे तोपर्यंत मी असे काहीही घडू देणार नाही. हे सर्व ऐकून मला फार आनंद झाला आणि या सर्व गोष्टींचा जाहीर सभेत उल्लेख करण्याची परवानगी मी मागितली. ते म्हणाले की तुम्ही खुशाल असे करा आणि माझे नावही सांगा. या विषयावर आपण कालच बोललो होतो आणि आज मला ही माहिती मिळाल्यामुळे तर मला अतिशयच आनंद झाला.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १३१-८

३४. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २९, १९४७

नवी दिल्ली,
नोव्हेंबर २९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी तुम्हाला सांगितले होते की हा दिवस शीख लोकांकरिता अत्यंत महत्त्वाचा आहे. या दिवसाचे आपल्याकरिताही तितकेच महत्त्व असले पाहिजे. त्यांनी जर नवजीवनाला सुरुवात केली आणि गुरु नानक देवांच्या तत्त्वांचे आपण सर्वांनी अनुसरण करायचे ठरवले तर सध्या ज्या संकटाच्या परिस्थितीत आपण सापडलो आहो त्या संकटात आपण राहणार नाही.

वर्तमानपत्रांमधून मी वाचले आहे व इतर सुत्रांकडूनही मी ऐकले आहे की फार मोठ्या संख्येत दिल्लीतील लोक मद्यपानाच्या आहारी गेले आहेत. मद्याच्या धुंदीत माणूस काय करू शकतो हे आपल्याला चांगले माहीत आहे. आता मी ऐकतो की मद्यपानाची ही समस्या संपूर्ण शहरात पसरली आहे आणि ती इतकी कठीण झाली आहे की तिला नियंत्रणात आणणे कठीण झाले आहे. कालपासून जर आपण नवीन प्रकरणाला सुरुवात करणार असू तर मद्यपानाचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी झाले पाहिजे. मद्यामुळे आपली शुद्धबुद्ध हरवते. मग आपण या सवयीचे गुलाम का व्हावे? मी तुम्हाला सर्व काही कसे सांगू शकतो? माझ्या नजरेला सगळ्या प्रकारच्या गोष्टी आणून दिल्या जात असतात.

ही एक गोष्ट झाली. दुसऱ्या गोष्टीबद्दल सांगायचे तर तोडफोड करण्यात आलेली मशीद अजूनही तशीच भग्नावस्थेत आहे आणि ज्या मशिदींच्या ठिकाणी मंदिर बांधले होते ते बंद करण्यात आले आहेत कारण पोलिसांचा तिथे पहारा आहे. परंतु तरीही यामुळे मला दुःख होते. कालपासून जर आपण नवीन प्रकरणाला सुरुवात केली असेल तर अशा प्रकारच्या घटना कशा घडू देता येऊ शकतात? शीख काही मशिदीच्या ठिकाणी देऊळ बांधू शकत नाही. शीख ही महान जमात आहे आणि त्यांनी जर आजपासून पवित्र राहायचे ठरवले असेल व केवळ पवित्र वर्तनच करायचे ते ठरवतील तर त्याचा प्रभाव हिंदूंवरही पडल्याशिवाय राहणार नाही याबद्दल मला किंचितही संशय नाही. असे झाले तर शीख सत्य आणि न्यायाचे प्रसारक होतील. मग हाच त्यांचा व्यवसाय होऊन जाईल. म्हणजे कुठेही ते शांततेच्या बाजूने उभे राहतील आणि शांततेशिवाय अजून कशाच्याही बाजूने नाही. असे झाले तर संपूर्ण देशाचा चेहरामोहरा बदलून जाईल. यामुळे ज्या लोकांनी मशिदीचे देवळात रूपांतर केले आणि तिथे मूर्त्यावगैरे ठेवल्या त्या त्यांनी तत्परतेने उचलाव्या व परत तिथे मशीद बनवावी. असे केले तर पोलिस आणि सैन्याचा तिथे पहारा ठेवण्याची काय आवश्यकता राहील? सर्व लोक जर चांगले असतील तर पोलिसांची आवश्यकताच राहणार नाही.

तिसरी गोष्ट ही आहे की मोठ्या संख्येत आपल्या मुलींना पाकिस्तानमध्ये पळवण्यात आले आहे. त्यांना कुठे नेण्यात आले आहे ते आपल्याला माहीत नाही. अपहृत मुलींना परत आणण्याकरिता आपण एक कवडीसुद्धा द्यायला नको असे काल मी म्हणालो होतो. ज्या लोकांनी मुलींच्या अपहरणाचा अपराध केला आहे त्यांनी त्या मुलींना परत करायला पाहिजे व त्याचबरोबर त्याकरिता प्रायश्चित्त घ्यायला पाहिजे. त्या मुलींना परत आणण्याकरिता पैसे देणे योग्य नाही. परंतु याबद्दल फार धक्कादायक वृत्त आहे. पूर्व पंजाबमध्ये ज्या मुसलमान मुलींना आपण बळजबरीने अडकवून ठेवले आहे त्यांच्याशी आपण गैरवर्तन करत असल्याचे वृत्त आहे. आपण इतके कसे घसरू शकतो हे मला समजू शकत नाही. हे पाहणे माझ्या सहनशक्तीच्या पलीकडील आहे हे मी मान्य करतो. या मुलींना आपण आपली बहीण वा आई मानायला पाहिजे. जी मुसलमानाची मुलगी आहे ती माझीच मुलगी आहे. मग माझी जी मुलगी आहे तिच्याशी कोणी दुर्वर्तन करत असेल तर मी कसा आनंदात राहू, जिवंत राहू आणि खाऊपिऊ? ज्या बांधवांनी मला ही बातमी सांगितली त्यात काही अतिशयोक्ती असावी असे मला वाटते. परंतु अतिशयोक्ती समजून त्याकडे दुर्लक्ष तर करता येत नाही? आणि जर त्यात अतिशयोक्ती निघाली तर चांगलेच आहे. माणूस इतका अधःपतीत होऊ शकतो काय याचा तरी त्या निमित्ताने विचार करता येईल. आपल्या अंगावर शहारे यावे अशी ही गोष्ट आहे. असे समजा की कालपासून आपण एक नवीन पान उघडले आहे. शिखांनी उघडले तर हिंदूंनीही उघडले आणि असे समजा की मुसलमानांनीही उघडले. परंतु मुसलमानांना तर तुम्ही विसरूनच जा. संघराज्यात आपण त्यांना असहाय बनवले आहे, लाचार बनवले आहे. परंतु हिंदू आणि शीख तर लाचार नाहीत? आपण काय केले पाहिजे याचा त्यांनी विचार केला पाहिजे. हं, इथे जरी आपण असे करत नसलो तरी कोणीही कुठेही अपराध करत असेल तर मी अपराधी आहे असे मला वाटते आणि तुम्हालाही असेच वाटले पाहिजे. मी जर काही अपराध केला तर गांधीने अपराध केला म्हणजे तुम्हीही अपराध केला असाच तुम्हीही विचार केला पाहिजे. आपण परस्परांशी असे एकजीव होऊ या जसे समुद्रातील थेंब होतात. समुद्रातील थेंब वेगवेगळे राहिले तर ते वाळून जातील. परंतु ते जेव्हा समुद्रातच राहतात तेव्हा ते सर्व एकमेकात मिसळून जातात आणि मोठमोठ्या जहाजांना आपल्या छातीवर वाहून नेतात. जी गोष्ट समुद्राची तीच आपली. अखेरीस आपणही तर मानवसमुद्राचे भाग आहो? एकाने वाईट केले तर सर्वांनी वाईट केले. मग तो अपराध राहत नाही. आपण सर्वांनी सावध राहायला पाहिजे. याकरिताच या सर्व गोष्टींबद्दल मी बोललो. परंतु आता मी कंट्रोलच्या विषयावर येईन.

साखरेवरील नियंत्रण उठले आहे, आणि मला आशा आहे की कापड आणि खाद्य वस्तूंवरील नियंत्रणही लवकरच उठेल. परंतु हे नियंत्रण कसे उठू शकेल आणि ते उठल्यानंतर आपले कोणते कर्तव्य असेल? साखरेवरील नियंत्रण आधीच उठले आहे. यामुळे आपण आधी त्यासंबंधीच बोलू. साखरेचे

मोठमोठे कारखाने आहेत. परंतु आता संधी मिळाली आहे तर लोकांकडून जितका पैसा काढता येईल तितका काढा असा विचार साखर कारखानदारांनी करू नये. त्यांनी जर साखरेच्या किंमती वाढवल्या तर लोक गरीब होतील. सुदैवाने भारतातील सगळे लोक साखर खात नाहीत. गुळावर नियंत्रण नाही म्हणून लोकांनी गूळ खावा. गावकरी आपल्या घरात गूळ सहज बनवू शकतात, परंतु साखर बनवू शकत नाहीत. भारतात साखरेचे प्रचंड कारखाने आहेत आणि तिथे करोडपती लोक लोकाना कामावर लावून साखर निर्माण करतात. परंतु जिथेकुठे ऊस निर्माण होतो तिथे गूळ तयार करता येऊ शकतो. परंतु गूळ जर स्वच्छ असेल तर तो प्रकृतीकरिता फार हितकारक असतो. मी जेव्हा मुलगा होतो तेव्हा माझे वडील मला आपल्याबरोबर खेड्यांमध्ये न्यायचे अथवा त्यांच्या हाताखालील कर्मचारी मला आपल्याबरोबर तिथे घेऊन जायचे. तेथील लोक आम्हाला स्वच्छ आणि ताजा गूळ खायला द्यायचे. गूळ एक प्रकारचे अन्न आहे, पण साखर तसे कधीही होऊ शकत नाही. यामुळे गरिबांनी केवळ गूळ खावा. परंतु आजकाल त्यांच्यापैकी काहींनी चहा घ्यायला सुरुवात केली आहे आणि चहात ते साखर टाकतात. मी तर लोकांना शिकवीन की साखरेऐवजी गूळ टाका परंतु ते माझे ऐकतील काय? आणि साखरेची किंमत जेव्हा वाढेल तेव्हा साखरेवर नियंत्रण असणे चांगले कारण तसे झाले तर आपल्याला स्वस्त साखर मिळेल असा विचार ते करतील. अशा परिस्थितीत साखरेचे व्यापारी आणि साखर कारखानदार यांनी परस्परात करार करून अशी व्यवस्था करावी की आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे असे संपूर्ण भारताला वाटले पाहिजे. तर या स्वातंत्र्यात आपण केवळ शुद्ध मार्गानेच पैसा मिळवू शकतो. या स्वातंत्र्यात आपण लोकांना धोका देणार नाही आणि धोकेबाजी करणार नाही. जी काही सडण वा घाण आहे ती निपटून आम्ही बाहेर काढून फेकून देऊ. जर असे होणार नाही तर मला बोलणे खावेच लागतील कारण कंट्रोल उठवण्याचा मीच आग्रह धरला होता आणि अजूनही तो आग्रह सुरू आहे. साखर व्यापारी आणि कारखानदारांनी नफ्याचे प्रमाण वाढवले तर साखरेचे भाव वाढणे अपरिहार्य आहे. जर ते शंभरातून पाचच घेत असतील तर ती शुद्ध कमाई मानली जाईल. आणि जर ते १०० मधून १५ वा २० रुपये खिशात टाकत असतील तर तिला मुळीच शुद्ध कमाई म्हणता येऊ शकत नाही. १००मधून पाच भरपूर आहे, त्याहून जास्त तर घ्यायला नको. असे झाले तर जे दुसरे कंट्रोल आहेत ते आपोआपच उडून जातील. तेव्हा तर तुम्ही म्हणत होता की नियंत्रण काढून टाका, आता नियंत्रण काढून टाकले तर जे गरीब लोक आहेत ते काय खातील? गरिबांना तर ती मिळतच नाही. असे म्हणायची सरकारला संधी मिळायला नको. असे व्हायला नको. जे कारखानदार आहेत त्यांनी एक समिती तयार करावी आणि सर्वांकरिता साखरेचा एक भाव ठरवावा. कोणत्याही साखर कारखानदाराने त्याहून जास्त किंमत आकारू नये. परंतु जे ऊस लावणारे शेतकरी आहेत त्यांनाच कमी भाव द्यायचा असेही व्हायला नको. शेतकऱ्याला जास्त पैसे दिल्यामुळे जर काही भाव वाढत असतील तर ती शुद्ध नफ्याचीच गोष्ट

झाली. त्यांनी खरा हिशेब ठेवावा आणि शेतकऱ्याच्या खिशात सरळ किती पैसे जातात आणि आधी मध्यस्थ जे १० वा २० टक्के घ्यायचा आता तो सव्वापाच टक्केही घेत नाही व काल शेतकऱ्याला किती पैसे मिळत होते आणि आज किती मिळतात हे त्यांनी सर्वांना दाखवून द्यावे. कल्पना करा की साखर कारखानदार पाच टक्क्यांपेक्षा जास्त घेत नाही परंतु मध्यस्थ जास्त किंमत घेतो तर साखर खाणारे तर निश्चितच मरतील. अशा परिस्थितीत साखर कारखानदारांनी स्वतःच उपभोक्त्यांना सरळ साखर विकावी. अशा प्रकारच्या व्यवस्थेत सर्व काही सुरळीत होईल याची मला खात्री आहे.

एक बंधू लिहितात की तिसऱ्या वर्गाने प्रवास करणारांचे भाडे वाढले आहे. हे खरे आहे की पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाइतके ते वाढलेले नाही. परंतु त्यांचे म्हणणे आहे की, आणि ते योग्यच आहे, तिसऱ्या वर्गाच्या प्रवासभाड्यात इतकीशी तरी वाढ का करण्यात यावी? मान्य की आता आम्हाला जास्त काम करायचे आहे आणि त्याकरिता आम्हाला पैसा पाहिजे. परंतु अशा तर अनेक गोष्टी आहेत, तंबाखू आहे, विदेशातून येणाऱ्या अनेक गोष्टी आहेत की ज्या प्रत्येक माणसाच्या जीवननिर्वाहाकरिता आवश्यक नसतात हवे तर त्यांच्यावरील करात काही वाढ करा. त्यातून काही प्रमाणात आपला हेतू साध्य होऊ शकेल. शासनामधील सत्ताधारी लोकांनी या गोष्टीची शक्यता तपासून पाहिली पाहिजे. परंतु या मुद्द्याचा विचार नक्कीच केला पाहिजे आणि अशा उपयुक्त सूचना देणारे लोक माझ्याजवळ आहेत हे शासनाने लक्षात ठेवले पाहिजे. ते काही निर्बुद्ध लोक नाहीत. उलट ते अतिशय समंजस लोक आहेत. आज जर आपल्याजवळ करोडो रुपये असतील तर याचा अर्थ ते सर्व उधळून टाकावे असा होत नाही. त्या करोडो रुपयातील लहानशी रक्कमसुद्धा आपण विचारपूर्वक खर्च केली पाहिजे. आणि अशा प्रकारे खर्च केलेल्या लहानलहान रकमांमुळे जर भारतातील गरीब ग्रामीण लोक लाभान्वित होत असतील तर तितके माझ्याकरिता पुरेसे आहे. आपल्या ग्रामीण लोकांकडून आपण जे करोडो रुपये गोळा करतो त्यातील किती त्यांना परत करतो? खऱ्या पंचायत राजला वा लोकशाहीला आपले साधनस्रोत लोकांकडून गोळा करावे लागत असतात. परंतु त्यामुळे त्यांचा दहापट लाभ झाला पाहिजे. उदाहरणार्थ मी जर लोकांकडून शिक्षणाकरिता पैसा घेत असेन तर त्यांना असे शिक्षण दिले पाहिजे व त्यावर अशा प्रकारे खर्च केला पाहिजे की त्यांना त्यांच्या पैशाचा दहापट परतावा मिळेल. उदाहरणार्थ मी ग्रामीण भागात स्वच्छतेचे काम सुरू केले व ग्रामीण लोकांकरिता रस्ते बांधले तर त्या लोकांना कळेल की आपण जो पैसा दिला होता त्याचा उपयोग आपल्या हिताकरिता होतो आहे. परिणामी आज आपण सैन्याच्या विचाराने जितके भारलो आहो तितके भारणार नाही. मग आपण सैन्यावर शक्य तितका कमी खर्च करायचा विचार करू व लोकांवर शक्य तितका जास्त खर्च करू. अशा परिस्थितीत लोक स्वतःच सैन्य होतील व सैन्यासंबंधीचे ज्ञान मिळवायला सुरुवात करतील. अशा प्रकारे ते जेव्हा

स्वतःचे व आपल्या शेजाऱ्यांचे रक्षण करण्याकरिता पात्र होतील तेव्हा भारताच्या संरक्षणाची व्यवस्था आपोआपच होऊन जाईल. तसे तर भारतावर आज कोणाचीही कुदृष्टी नाही.

परंतु सध्या ब्रिटिश जरी गेलेले असले तरी ब्रिटिशांनी निर्माण केलेले वातावरण अजून गेलेले नाही. आपण हे वातावरण बदलू या. ब्रिटिश भरमसाट खर्च करायचे व त्यातून लोकांना कोणताही परतावा मिळत नसे. परंतु आता लोक जे देतात त्याची पैनपै त्यांना परत मिळाली पाहिजे. असे झाले तर देशाकरिता ते हितकारक होईल. आज मला इतकेच सांगायचे होते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १३८-४३

३५. प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ३०, १९४७

नोव्हेंबर ३०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कालच मला तुम्हाला सांगायचे होते परंतु अजून बरेच काही सांगायचे असल्यामुळे हे राहून गेले. तुम्ही पाहिले असेल की मुली जमिनीवर बसल्या आहेत आणि थंडीने कुडकुडत आहेत. मी त्यांना सांगितले की आपल्याजवळ जुनी वर्तमानपत्रे पुष्कळ आहेत. ती आपण वाचलेली आहेत. त्यांचा उपयोग आपण बसण्याकरिता करू शकतो. परंतु आज तर कोणा सज्जनांनी चादर अंथरली ही चांगली गोष्ट केली. आपण जमिनीवर बसलो की आपल्याला थंडी लागावी इतके नाजूक आपण का झालो पाहिजे? तरीही आपण जर गवतावर बसायचे असेल तर गवतावर आपण कागद अंथरला आणि जर तो ओला झाला नाही तर थंडीपासून तो आपला बचाव करू शकतो. असे होत नसेल तर कोणालाही कुठे जायचे असले तर आपण आपल्याबरोबर आपले आसन घेऊन जायचे व त्यावर बसायचे ही आपली जुनी रीत होती. आज तर आपण हे सर्व विसरलो आहो आणि ऐषआरामाची आपल्याला सवय लागली आहे. परंतु माझे म्हणणे आहे की कागदाचा तुकडा सोडा, घ्यायचा असेल तर घ्या, आणि तोही वर्तमानपत्राचा साधा तुकडा असेल तर घ्या. परंतु जे आसन असते ते लोकरीचे असते वा ज्यूटचे वा दोघांचे मिळूनही असू शकते. काही आसन केवळ कापडाचे वा वाळलेल्या गवताचे असतात. यापैकी कशाचेही असले तरी ती फार मोठी गोष्ट आहे. जिथे बसायचे आहे तिथे ते टाकायचे आणि काम झाले की बगलेत टाकून चालायला लागायचे. मला ज्याअर्थी थंडी वाजते त्याअर्थी सर्वांना थंडी तर वाजतच असेल. शिवाय डॉक्टरसुद्धा सांगतात की थंड वा ओल्या जमिनीवर बसू नये. जे बंधू धोतर नेसतात वा ज्या भगिनी सलवार वा घागरा घालतात त्यांनी जर आतून जाड कापड घातले तर ते आसनाचे काम करू शकेल. परंतु त्याही तर नाजूक झाल्या आहेत, त्यांनाही घालायला नरम कपडेच पाहिजे. त्या जाड कापड कसे घालतील आणि अंतर्वस्त्रही मऊच असले पाहिजे. मग त्या या थंडीपासून स्वतःचा बचाव करू शकणार नाहीत.

मला काठेवाडमधून बऱ्याच तारा मिळाल्या आहेत. मी काय ऐकले होते आणि पाकिस्तानमधील वर्तमानपत्रांमध्ये काय आले होते हे मी तुम्हाला आधीच सांगितले आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २७, १९४७ आणि प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर २८, १९४७). तिथे हजारो लोक ती वृत्तपत्रे वाचतात. शक्य आहे की १०,००० वा त्याच्या जवळपास. किती लोक ती वृत्तपत्रे वाचतात हे मला माहीत नाही, परंतु त्यांच्यात ज्या गोष्टी आल्या त्या खऱ्या आहेत की नाही काय माहीत असा विचार करून तर काम भागणार नाही. यामुळे त्यांत मी जे वाचले ते तुमच्यासमोर ठेवले हे मी चांगलेच

काम केले. हे सर्व चूक आहे की बरोबर हे मला कळत नाही. हे सर्व जर बरोबर असेल तर ही सर्व काठेवाडकरिता लाजेची गोष्ट असेल व हे जर खरे नसेल तर ते जे लिहिणारे आहेत त्यांच्याकरिता ही लाजेची गोष्ट आहे. मग एकाकरिता वा दुसऱ्याकरिता तर लाजिरवाणी गोष्ट झालीच आहे. याबद्दल सरदारांचे काय म्हणणे आहे हेही मी तुम्हाला सांगितले. आजही ते आले आणि सांगत होते की तिकडून ज्या गोष्टी ऐकिवात येतात त्या तुम्हाला सांगण्यासारख्या नसतात. त्यांना भरपूर तिखटमीठ लावलेले असते.

परंतु राजकोटहून मला जी तार मिळाली ती तुम्ही लक्षात घेण्यासारखी आहे. ती बरीच लांब तार आहे आणि तिचा थोडक्यात आशय मी तुम्हाला सांगेन. अखेरीस काठेवाडमधील मुसलमानांना मी ओळखतो. त्यांच्यातील प्रत्येकाला तर मी ओळखत नाही परंतु तिथे जे खोजा लोक आहेत, बाघेर आहेत आणि शेतकऱ्यातही कुम्बीय आहेत, म्हेर आहेत त्या सर्वांना मी ओळखतो. अखेरीस मी तिथेच जन्मलो आहे आणि कुठेही बाहेर शिकण्याकरिता गेलो नाही. यामुळे पूर्ण सतरा वर्षे मी तिथे राहिलो आहे. माझ्या वडिलांनी मला दुसरीकडे कुठे पाठवलेच नाही. यामुळे माझे शिकणे तिथेच झाले आणि कॉलेजमध्ये काही दोन चार महिने शिकलो आणि तेही भावनगरमध्ये. माझी परीक्षाही अहमदाबादपुढे गेली नाही. माझी परिस्थिती ही अशी आहे. तिथे जे काही घडले ते मी पाहिलेले आहे आणि मी तिथे जात असे तेव्हाही तेथील लोकांशी संबंध येतच असे. ते लिहितात की तुम्हाला आमची फार काळजी वाटते आणि तुमच्या काळजीमुळे आमची काळजी वाढली आहे. हे ठीक आहे की त्यांनी काही हिंसा केली आहे आणि काही मुसलमानांना दुखापतही केली आहे. त्यांनी त्यांच्या घरांची तोडफोड केली आहे व त्यांची जाळपोळही केली आहे. परंतु त्यांचे म्हणणे आहे की काँग्रेसच्या लोकांनी परिस्थिती फार चिघळू दिली नाही. ते ढेबरभाई यांच्या नेतृत्वाखाली काम करत होते. मी त्यांना चांगला ओळखतो. मुसलमानांच्या रक्षणाकरिता ते पुढे आले आणि त्यांना त्यात बरेच यशही मिळाले. लूटमार आणि जाळपोळीच्या कृत्यांत सर्वच हिंदू सामील नव्हते. तसे असते तर राजकोटमधील मुसलमानांच्या घरांना आगी लावण्यात आल्या असत्या, मोठ्या प्रमाणावर हिंसा झाली असती आणि काही लोक मारले गेले असते. परंतु परिस्थिती अशा अवस्थेपर्यंत गेली नाही. काँग्रेसच्या लोकांनी आणि इतरांनीही सर्व दृष्टींनी काळजी घेतली. ढेबरभाईंना शिवीगाळ आणि धक्काबुक्की करण्यात आली. ते जरी मोठे माणूस आणि वकील असले तरी अशा वेळी जमाव उत्तेजित झाला की त्याची विवेकबुद्धी सुटते आणि लहानमोठ्याचे भान राहत नाही. ढेबरभाईंना त्यांनी त्रास दिला कारण ते मुसलमानांना वाचवण्याचा प्रयत्न करत होते. ढेबरभाईंबरोबर असलेले काही लोक लिहितात की त्यांना जरी काही दुखापत झालेली असली तरी इतर लोकांनी ढेबरभाईंना वाचवले होते. ठाकोर साहेब आणि पोलिसांनी केलेल्या मदतीचाही तारेत उल्लेख आहे. अशा परिस्थितीत या दंगलीकरिता कोण जबाबदार आहे? त्यांचे

म्हणणे आहे की "हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनांनी निश्चितच काही खोडसाळपणा केलेला आहे. निदान राजकोटमधून मुसलमानांना घालवून लावण्याचा त्यांचा उद्देश होता. परंतु यामुळे तुम्ही काळजी करू नका. इतरत्रही परिस्थितीवर आमची नजर आहे आणि आम्ही तुम्हाला परत तार पाठवू."

याच ठिकाणावरून मला एका मुसलमान सद्गृहस्थांचीही तार मिळाली. मुसलमानांचा जीव वाचवण्याकरिता आणि त्यांच्या संपत्तीचे रक्षण करण्याकरिता काँग्रेसच्या लोकांनी सर्वतोपरी प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. परंतु मुंबईहून एका मुसलमान सद्गृहस्थांनी पाठवलेली तारही आहे. ते म्हणतात की काठेवाडसंबंधी मी आधी जे म्हणालो होतो ते बरोबर आहे आणि नंतर जे म्हणालो ते चूक आहे. तिथे अनेक गोष्टी घडल्या आहेत आणि अजूनही घडत आहेत.

मला कळत नाही की मुंबईहून आलेल्या तारेवर मी विश्वास ठेवावा की या मुसलमान सद्गृहस्थांनी पाठवलेल्या तारेवर. परंतु मला मूंबईहून आलेल्या तारेतील सत्याबद्दल संशय वाटतो कारण ती मुंबईहून पाठवण्यात आली आहे तर दुसरी तार त्या लोकांनी पाठवली आहे जे काठेवाडमध्येच राहतात. याशिवाय काठेवाडचे लोक माझी फसवणूक करू शकत नाहीत. मला फसवल्यानंतर ते कुठे पळतील? यामुळे मुंबईच्या तारेत अतिशयोक्ती आहे असे मला वाटते. मला वास्तव परिस्थितीची माहिती यथावकाश मिळेलच. सध्या तरी हे सर्व मी तुमच्यासमोर ठेवले पाहिजे.

भावनगरहूनसुद्धा मला तार आली आहे. ती भावनगरच्या महाराजांची आहे. मी त्यांना ओळखतो कारण मी तिथे तीन वा चार महिने राहिलेलो आहे. यामुळे त्यांना माझी काळजी वाटली व मी इतकी काळजी का करावी असा प्रश्न त्यांना पडतो. मी काळजी करू नये असे त्यांनी तारेत लिहिले आहे. ते म्हणतात की आम्ही सावध आहो. हिंदू सावध आहेत. ते म्हणतात की मुसलमानांना कोणतीही हानी पोहोचू दिली जाणार नाही. याबद्दल तुमच्या मनात कोणताही संशय ठेवू नये.

परंतु जुनागढहून काही मुसलमानांनी पाठवलेली तार आली आहे. ते म्हणतात की माझी फसवणूक करण्यात येत आहे आणि मुसलमानांना त्रास दिला जातो की नाही हे पाहण्याकरिता तुम्ही एक चौकशीसमिती बसवा. अशाच तारा जवाहरलाल, सरदार आणि इतरांनाही पाठवण्यात आल्या आहेत. प्रत्येक गोष्टीकरिता चौकशीसमिती बसवता येत नसते इतकेच यासंबंधात मी त्याना सांगेन. चौकशी आयोग बसवणे ही काही गंमत नाही. मुसलमानांना जरी काही हानी पोहोचवण्यात आली असेल तरी चौकशी समितीची आवश्यकता कशी निर्माण होते? काठेवाडसंबंधी बोलायचे तर मी स्वतःच चौकशी आयोगाप्रमाणे आहे. माझ्या लक्षात काही बाब आली तर मी तिची शहानिशा करून घेऊ शकतो. काठेवाडमधील संस्थानिक तसेच जनतेला मी हाताळू शकतो. मी करत असलेल्या प्रत्येक

गोष्टीत मला यश आले वा मी म्हणतो ती प्रत्येक गोष्ट ऐकली जाते असा माझा दावा नाही. परंतु काठेवाड बिहार सारखाच नाही काय? कोणी मला बिहारमध्ये चौकशी आयोग बसवायला सांगितले तर मी ऐकेन असे तुम्हाला वाटते काय? मी स्वतःच त्यांच्या सेवेकरिता उपलब्ध आहे. तेथील लोक माझ्यावर प्रेम करतात, माझे ऐकतात. यामुळे तिथे कोणताही चौकशी आयोग बसवण्याची आवश्यकता नाही.

राजकोटमधील अनेक मुसलमानांची पत्रेही मला मिळाली आहेत. त्यांच्यातील अनेक हिंदूंशी माझे मैत्रीपूर्ण संबंध आहेत व काँग्रेसच्या कामाबद्दल ते समाधानी आहेत. मग हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कोण आहेत? माझे त्यांच्याशी शत्रुत्व नाही. हिंदू धर्म वाचवण्याचा हाच एकमेव मार्ग आहे असे त्यांना वाटते. परंतु या पद्धतीने हिंदू धर्म वाचवता येऊ शकत नाही असे मला वाटते. दुर्व्यवहार करणारांना हिंसक उत्तर दिले पाहिजे असे त्यांना वाटते. परंतु एका वाईटाशी संघर्ष करण्याकरिता दुसऱ्या वाईटाची मदत कशी होऊ शकेल? आपल्याला आपले सरकार मिळाले आहे. त्याला धारेवर धरा आणि अशा घटना का घडतात हे त्यांना विचारा. याशिवाय आपले सरकार सावध आहे आपल्याकडून जे शक्य असेल ते सर्व ते करत आहे. यामुळे हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला मी म्हणेन की - कारण या दोन्ही संघटना हिंदूंच्या आहेत व त्यांच्याशी इतर संघटनांप्रमाणेच अनेक सुशिक्षित हिंदू जुळलेले आहेत - तुम्ही अशा प्रकारे हिंदू धर्म वाचवू शकत नाही. त्यांनी मुसलमानांना त्रास दिला हे खरे आहे काय? नसेल तर कोणी दिला? याकरिता आज आपल्याला सर्व हिंदूंना आणि शिखाना दोष द्यावा लागेल ज्याप्रमाणे आपण आज पाकिस्तानमधील सर्व मुसलमानांना दोष देतो, आणि आपण दोष देतो ते योग्यच आहे. यामुळेच जे निरपराधी आहेत आणि तरीही ज्यांचे आरोपीत नाव आहे त्यांनी आपले नाव स्वच्छ केले पाहिजे. जुनागढच्या मुसलमानांना न्याय हवा असेल तर तो मिळू शकतो. मग आयोगाची आवश्यकता काय?

तेथील परिस्थितीबद्दल सांगतल्यानंतर आता येथील परिस्थितीबद्दलही मी तुम्हाला सांगेन. सरदारांनी काही व्यवस्था केली आहे आणि इथे असलेल्या सर्व मशिदींना ते संरक्षण देणार आहेत. मशिदीवर अतिक्रमण करून बळकावलेल्या जागा एका आठवड्यात रिकाम्या करण्याबद्दलच्या सूचना त्यांनी वृत्तपत्रांमधून दिलेल्या आहेत व तसे न केल्यास त्या जागा पोलिसांच्या मदतीने रिकाम्या करवून घेण्यात येतील. परंतु मी तुम्हाला विचारतो की पोलीस पाठवून फायदा काय? काही हिंदूंनी मशिदीत मूर्तीची स्थापना केली असेल - मग ती मूर्ती सोन्याची, चांदीची, पितळेची, दगडाची वा मातीची का असेना - तरी असे म्हणतात आणि माझासुद्धा विश्वास आहे की जोपर्यंत त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जात नाही आणि शुद्ध हातांनी तिची पूजा केली जात नाही तोपर्यंत ती मूर्ती मूर्ती नसते तर तो सोन्याचा वा चांदिचा केवळ तुकडा आहे असे म्हणावे लागेल. कॅनॉट प्लेसच्या कोपऱ्यावरील मशिदीत अशा

मूर्ती ठेवण्यात आल्या आहेत. माझ्याकरिता हनुमानाचा आकार असलेले व शेंदूर लावलेले ते केवळ दगड आहेत. माझ्या दृष्टिकोनातून ती मूर्ती पूजा करण्याच्या पात्रतेची नाही. पूजा करण्याच्या पात्रतेची ती तेव्हा होते जेव्हा तिला पद्धतीशारपणे स्थापित करण्यात येते व तिच्यात प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. परंतु असे करण्यात आले नव्हते. यामुळे ज्यांनी ती वा त्या मूर्ती तिथे ठेवल्या असतील त्यांनी त्या तिथून सायंकाळ होण्यापूर्वी उचलाव्या आणि त्यांची इच्छा असेल तिथे त्या ठेवाव्या. परंतु अशा प्रकारे मशिदीत मूर्ती ठेवल्यामुळे एकीकडे ते मशिदीला अपवित्र करतात आणि दुसरीकडे मूर्तीला अपमानित करतात. हिंदू धर्माचे अनुयायी म्हणून आपण मूर्तिपूजक आहो. परंतु अशा प्रकारे मूर्ती ठेवल्याने धर्म होत नाही तर अधर्म होतो. यामुळे सरदारांनी तिथे पोलीस कशाला पाठवावे? तुमच्यापैकी जे हिंदू असतील त्यांनी पहारेकरी व्हावे आणि तेथील मूर्ती हलवाव्या. मशिदीची जी तोडपोड झाली असेल ती आपण दुरुस्त करण्याचा प्रस्ताव ठेवावा. परंतु सरदार म्हणतात की ज्या मशिदींची तोडफोड करण्यात आली आहे त्यांच्या दुरुस्तीचा खर्च सरकार करील. सरकारने हे काम का करावे? आपण हे काम करत नाही म्हणून ते सरकारला करावे लागत नाही काय? प्रत्येकाचे रक्षण करणे हे सरकारचे काम आहे. परंतु ही गोष्ट आपणा सर्वांकरिता लज्जास्पद आहे - हिंदू आणि शिखांकरिताही. शिखांनी मूर्ती ठेवल्याचे अर्थातच मी ऐकले नाही कारण शिखांची एकच मूर्ती आहे वा असे म्हणा की पवित्र ग्रंथ ग्रंथसाहेबच आहे. शिखांनी मशिदीत ग्रंथसाहेब ठेवल्याचे मी कधी ऐकले नाही. जर कोणी असे केले असेल तर त्याने ग्रंथसाहेबांचा अपमान केला आहे. ग्रंथसाहेब केवळ गुरुद्वारातच ठेवला जाऊ शकतो. केवळ पवित्र शीखच उंच व्यासपीठावर तो सुशोभित करून ठेवू शकतो. माझ्यासारखा एखादा तो सुंदर खादीत गुंडाळील. परंतु आज जरी लोक स्वदेशीच्या दृष्टिकोनातून विचार करत नसले तरी आपण हाताने सुंदर रेशमी वा लोकरीचे कापड विणत नाही. अशा प्रकारच्या कापडावर आपण ग्रंथसाहेबांना ठेवले तर ते पूजा करण्यासारखे होतील आणि एखादा शीख जर त्यांना मशिदीत ठेवत असेल तर तो ग्रंथसाहेबांचा अपमान करतो व मग तो ग्रंथ पूजा करण्याच्या पात्रतेचा राहत नाही.

एक मुसलमान सद्गृहस्थ आज मला भेटायला आले. त्यांना काय म्हणायचे आहे हे मला कळू शकले नाही. परंतु त्यांच्या हातात अर्धवट जळलेली कुराणची प्रत होती. तरीही त्यांच्याकरिता तो पवित्र ग्रंथ होता व तो त्यांनी स्वच्छ कापडात गुंडाळलेला होता. त्यांनी ते कापड काढले आणि मला जळलेले कुराण दाखवले. ते मला काहीच म्हणाले नाही परंतु अश्रूपूर्ण डोळ्यांनी माझ्याकडे पाहून ते निघून गेले. ब्रजकिशनशी ते थोडेसे बोलले कारण मी माझ्या कामात व्यस्त होतो. याचप्रमाणे एखादा मुसलमान इथे आला आणि त्याने इथे कुराण ठेवले व मला वा तुम्हाला मारू लागला तर मी म्हणेन की त्याने कुराणचा अपमान केला. बळजबरीने कोणी कुराण मान्य केला पाहिजे असे कुराण म्हणत नाही.

शीख महान समाज आहे आणि जर गुरु नानकचे शीख खरे शिष्य झाले तर हिंदूसुद्धा स्वाभाविकपणेच त्यांचे अनुसरण करू लागतील. यामुळेच हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आणि अशाच इतर लोकांना माझे ऐकण्याची इच्छा असेल तर त्यींना आणि शिखांनाही मला हेच सांगायचे आहे. आज माझ्या अंतःकरणात शिखांबद्दल फार आदर आहे. परंतु आज हिंदू असो वा शीख मार्गावरून भरकटत आहेत व भारताचा विनाश करत आहेत. भारताला इतक्या उच्च स्थानी नेल्यानंतर आपण आता त्याला धुळीत मिळवणार आहोत काय? आपण आपल्या धर्माचा, आतापर्यंत आपण जे मिळवले त्याचा आणि आपल्या देशाचा विनाश करणार आहो काय? ईश्वर या सर्वांपासून आपले रक्षण करो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १४४-५०

३६. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांनी लिहिलेले हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,
डिसेंबर १, १९४७

माझ्या वक्तव्यात मी 'जर बरोबर असेल तर' असे जे शब्द मी वापरतो त्याला अनेक मित्रांचा विरोध आहे. मला जे म्हणायचे आहे ते बरोबर आहे की नाही हे मी आधीच ठरवले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की जेव्हाकेव्हा मी 'जर' हा शब्द वापरून काही विधान केले असेल तर त्यामुळे माझी काही हानी झाली नाही. त्यामुळे त्या वेळी जे काम मी करत असतो त्यात माझा लाभच झाला आहे.

या वेळी काठेवाडसंबंधी चर्चा सुरू आहे. मित्रांचे म्हणणे आहे की काठेवाडसंबंधी जे अतिशयोक्त विधान करण्यात आले त्याला मी प्रसिद्धी दिली. यापैकी बहुतेक आरोप पूर्णपणे निराधार आहेत. जी काही थोडी गडबड झाली होती तिच्यावर लगेच नियंत्रण मिळवण्यात आले. परंतु 'जर' हा शब्द वापरून मी जर ते आरोप परत केले असतील तर त्यामुळे सत्याची कोणतीही हानी झाली नाही. काँग्रेसने आणि काठेवाडच्या प्रशासकांनी सत्याच्या बाजूने जितकी भूमिका घेतली असेल तितकाच त्यांचा लाभ होईल. मित्रांचे म्हणणे आहे की ज्या लोकांना सत्य-असत्याशी काहीही देणेघेणे नसते, ते अप्रामाणिकपणे आपल्या स्वार्थाकरिता माझ्या वक्तव्याचा उपयोग करतात व त्यामुळे अंतिमतः जरी सत्य बाहेर येत असले तरी त्याआधीच हानी होऊन गेलेली असते. यामुळे माझ्या वक्तव्याने असत्य पसरू नये म्हणून मी काळजी घेईन. परंतु जेव्हाकेव्हा लोक या युक्त्याप्रयुक्त्यांचा आश्रय घेतात तेव्हातेव्हा त्यांना अपयश आले आहे आणि त्यांचा अप्रामाणिकपणा आणि खोटेपणा उघड झाला आहे. मी जर 'जर' हा शब्द वापरून आरोप करत असेन तर त्यामुळे कुणीही अस्वस्थ होण्याचे कारण नाही. ज्यांच्याविरुद्ध मी अशा भाषेत आरोप केलेले असतात ते मात्र पूर्णपणे निरपराध असले पाहिजे इतकीच याकरिता आवश्यकता असते.

आता आपण याच्या दुसऱ्या बाजूचा विचार करू. परत आपण काठेवाडचेच उदाहरण घेऊ. मी जर पाकिस्तानमधील प्रमुख वृत्तपत्रांमध्ये आलेल्या आरोपांकडे लक्ष दिले नसते, आणि जे आरोप सत्य असल्याचे पाकिस्तानच्या प्रधानमत्र्यांनीही सांगितले होते, तर मुसलमानांना ते आरोप धर्मग्रंथाप्रमाणे सत्य वाटले असते. परंतु आता मुसलमानांना त्यांच्या सत्यत्वाबद्दल शंका येऊ लागली आहे.

यामुळे आपल्या घरात कोणताच गोंधळ नसेल तर कितीही कटू असली तरी टीकेचे स्वागत करायचे, अधिक सत्यवादी व्हायचे आणि जिथेकुठे चूक दिसेल ती दुरुस्त करायची असा धडा यापासून काठेवाड आणि इतर ठिकाणच्या मित्रांनी घेतला पाहिजे असे मी म्हणेन. आपल्या हातून कधीही चूक घडू शकत नाही या भ्रमात आपण राहू नये. कटूहून कटू टीका करणारामध्येही आपल्याविरुद्ध काही ना काही खरा वा काल्पनिक मुद्दा असतोच. आपण जर धीराने वागलो तर आपण विरोधकाची चूक दुरुस्त करू शकतो आणि संधी मिळाली की त्याला त्याची चूक दाखवू शकतो वा आपली चूक आढळली तर आपण ती दुरुस्त करू शकतो. असे करून आपण कधीही चुकीच्या मार्गाने जाणार नाही. परंतु असे करताना तोल सांभाळायला पाहिजे यात काही संशय नाही. विवेकाची नेहमीच आवश्यकता असते. खोडसाळपणाच्या वक्तव्यांची आपण कधीही दखल घेऊ नये. मला वाटते की दीर्घ अनुभवानंतर सारासारविवेक करण्याची कला मी आत्मसात केली आहे.

आज वातावरण विषाक्त झाले आहे. पक्ष परस्परांवर आरोपप्रत्यारोप करत आहेत. अशा वातावरणात आपण चूक करणारच नाही हे समजणे चूक आहे. आज असा दावा करता येण्याइतके आपण सुदैवी नाही. आवश्यक ते प्रयत्न करून आपण जर आपल्यामधील खोडसाळपणा दूर करू शकलो व तो मुळपासून उपटून काढून टाकू शकलो तर तितके पुरे आहे. असे आपण तेव्हाच करू शकतो जेव्हा आपले दोष पाहण्याकरिता आणि ऐकण्याकरिता आपले डोळे आणि कान उघडे असतील. आपल्याला आपले दोष दिसू नये अशा प्रकारे निसर्गाने आपल्याला घडवले आहे. आपण केवळ दुसऱ्याचे दोष पाहू शकतो. यामुळे इतराना आपले जे दोष दिसतात त्याचा लाभ घेणे हाच सुज्ञपणा आहे.

जुनागढहून मला जी लांब तार आली होती तिची काल मी सविस्तर चर्चा करू शकलो नव्हतो कारण त्या वेळी प्रार्थना संपवून जाण्याच्या बेतात असल्यामुळे मी त्या तारेवर केवळ एक दृष्टिक्षेपच टाकू शकलो होतो. आज मी तिचा पूर्ण अभ्यास केला. ती तार पाठवणारांचे म्हणणे आहे की त्या तारेत करण्यात आलेले आरोप सत्यावर आधारित आहेत. हे जर खरे असेल तर काठेवाडकरिता ही गोष्ट फार वाईट आहे. परंतु आमच्या कार्यकर्त्यांनी जे आरोप खरे आहेत म्हणून मान्य केले आहे आणि जे मी प्रकाशित केले आहेत त्याच आरोपांची जर त्यात अतिशयोक्ती करण्यात आली असेल तर त्या तारेमागे जे लोक असतील त्यांनी पाकिस्तानचे नुकसान केले आहे. त्यांनी मला काठेवाडला येऊन स्वतः परिस्थिती पाहण्याचे निमंत्रण दिले आहे. आज हे करण्याच्या परिस्थितीत मी नाही हे त्यांना माहीत असले पाहिजे. त्यांनी चौकशी आयोगाची मागणी केली आहे परंतु त्याकरिता त्यांनी आपली बाजू तयार केली पाहिजे. जुनागढ आणि काठेवाडच्या नावाची बदनामी करण्याचा त्यांचा उद्देश नाही हे

मला माहीत आहे. सत्य बाहेर यावे, अल्पसंख्य समुदायाच्या जिवाला वा संपत्तीला धक्का लागू नये व त्यांना प्रतिष्ठेने जगता यावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांना माहीत आहे की वृत्तपत्रातील प्रचार जर असत्यावर आधारित असेल तर त्यामुळे जिवित वा संपत्ती वा अब्रू यापैकी कशाचेही रक्षण होऊ शकत नाही. या तिन्ही गोष्टींच्या रक्षणार्थ ज्यांनी तार पाठवली आहे त्यांनी सत्याला धरून राहावे व त्यांनी आपल्या हिंदू मित्रांकडे जाऊन त्यांची भेट घ्यावी. कोणते हिंदू आपले मित्र आहेत हे त्यांना माहीत आहे. त्यांना हेही माहीत आहे की मी काठेवाडहून जरी दूर असलो तरी इथूनसुद्धा मी त्यांचेच काम करत आहे. मी हे पूर्ण विचार करून बोलतो आहे आणि आता मी तथ्ये गोळा करत आहे. मी सरदार पटेल यांना भेटलो. ते तर इथपर्यंत म्हणतात की एकही सांप्रदायिक दंगल न होऊ देण्याची क्षमता त्यांच्यात आहे आणि कोणीही मुसलमान बंधूभगनींशी दुर्व्यवहार केला तर त्याला कठोर शिक्षा केली जाईल. काठेवाडमधील कार्यकर्ते, जे अगदी निष्पक्ष आहेत, स्वतः सत्य शोधण्याचा प्रयत्न करत आहेत व काठेवाडमधील मुसलमानांना होणारी पीडा कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते स्वतःइतकेच मुसलमानांवरही प्रेम करतात. मुसलमान त्यांना मदत करतील काय?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १५१-३

३७. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी तुम्हाला सांगितले होते की मी पानिपतला जाईन. चार वाजता परतण्याचा माझा विचार होता. परंतु मी परतलो तेव्हा साडेपाच वाजून गेले होते. त्यानंतर ५मिनीटही झाले होते, किमान तीन मिनीट तरी झालेच असतील. तेव्हा मला प्रार्थनेचा आवाज ऐकू आला. मी सांगितले होते की मी असो वा नसो प्रार्थना वेळेवर सुरू झाली पाहिजे. मग मी गेलो आणि हातपाय धुऊन ताजातवाना झालो. यामुळे उशीर झाला. याकरिता मी माफी मागतो.

पानिपतला जाण्यामागील उद्देशाची मी आधीच कल्पना दिली होती. पानिपतधील मुसलमानांना पाकिस्तानमध्ये जाण्यापासून परावृत्त करता येईल अशी मला आशा वाटत होती आणि अजूनही वाटते. असे झाले तर ही गोष्ट आपल्याकरिता चांगली असेल, संपूर्ण भारताकरिता चांगली असेल आणि ही गोष्ट भारताकरिता चांगली असेल तर पाकिस्तानकरिताही चांगली असेल.

तिथे असलेले पाकिस्तानमधून आलेले निर्वासित आज दुःखी आहेत, संकटात सापडले आहेत. व जोपर्यंत ते आपापल्या घरी परतत नाहीत तोपर्यंत त्यांना अशा दुःखी अवस्थेतच इथे राहावे लागेल. याचप्रमाणे ज्या मुसलमानांना पाकिस्तानमध्ये पळून जाणे भाग पडले तेही तिथे असमाधानी असतील. याबद्दल तुम्ही शंंका घेण्याचे कोणतेही कारण नाही.

मी तिथे गेलो हे चांगले झाले. असे करणे माझे कर्तव्य होते. डॉ. गोपिचंद भार्गव आले आहेत आणि गृहमंत्री सरदार स्वर्णसिंगही आले आहेत. डॉ. गोपिचंद येत आहेत याची मला मुळीच कल्पना नव्हती. माझी गरज असेल तर मी येतो असा निरोप सरदार स्वर्णसिंग यांनी मात्र नक्कीच पाठवला होता. मी त्यांना सांगितले की तुमची येण्याची आवश्यकता नाही, जे काही करायचे असेल ते मलाच करावे लागेल. तरीही ते आले. पूर्व पंजाब अखेरीस त्यांचा भाग आहे आणि यामुळे त्यांना येण्याचा अधिकार होता. देशबंधू गुप्तांनी निरोप पाठवला होता की त्यांची प्रकृती बरी नाही आणि त्यामुळे ते येऊ शकणार नाहीत. मी कबूल केले, परंतु तेही तेथीलच असल्यामुळे तेसुद्धा आले. यानंतर मौलाना आहेत ज्यांना आपण इथे अनेकदा पाहतो. यानंतर मी लोकांशी बोललो. दोन मंत्री जरी तिथे हजर असले तरी मुसलमानांशी मी वेगळा बोललो. (पाहा मुसलमान प्रतिनिधीमंडळाशी चर्चा, डिसेंबर २, १९४७.) मंत्र्यांनी तिथे राहावे असे त्यांना वाटत होते कारण माझ्या सांगण्यात जे काही चांगले असेल ते मंत्र्यांना

माहीत नसेल आणि मग ते करण्याकरिता मी त्यांना भाग पाडू शकणार नाही असे त्यांना वाटले. मुसलमानांनी कबूल केले की चर्चेच्या दरम्यान पाकिस्तानमध्ये न जाण्याचे आम्ही कबूल केले होते परंतु नंतर परिस्थिती अजूनच चिघळली व मी आश्वासिलेल्या दृष्टीने काहीही करण्यात आले नाही व आपल्याला त्रास देण्यात येतो असे त्यांना वाटू लागले, आपल्या अब्रूचे रक्षण होत नाही असे त्यांना जाणवू लागले. त्यांची अब्रू, त्यांचे जीवन, त्यांची संपत्ती याचे रक्षण केले जाईल असे जर त्यांना वाटत नसेल तर ते कसे राहतील? ते म्हणाले की एकदा आमच्या घरांची तोडफोड झाली तर त्याचा आम्ही विचार करणार नाही, जाळपोळ झाली तर तीसुद्धा सहन करू, इतकेच नाही तर जीवावर बेतले तरी पर्वा करणार नाही परंतु शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही आमच्या अब्रूचे रक्षण करू. ते जर असे करू शकतील तर ते थांबतील. मी त्यांना सांगितले की जो मानवजातीवर प्रेम करतो तो ईश्वरावर प्रेम करतो. त्याला भिण्यासारखे काहीही नसते.

यानंतर मी तेथील निर्वासितांशी बोललो (पाहा जाहीर सभेत भाषण, डिसेंबर २, १९४७). ते संपले तेव्हा साडेतीन वाजले होते. मी येथून साडेदहा वाजता निघालो होतो व तिथे जवळपास साडे अकरा वाजता पोहोचलो होतो. मुसलमानांशी ३ वाजेपर्यंत माझी चर्चा सुरू होती. तिथे चर्चेकरिता बरेच काही होते. नंतर मी निर्वासितांशी बोललो. माझ्यानंतर डॉ. गोपिचंद भार्गव त्यांच्याशी बोलले. परंतु सरदार स्वर्णसिंग बोलायला उभे राहिले तेव्हा तिथे गोंधळ सुरू झाला. लोकांनी आरडाओरड सुरू केली. असे त्यांनी त्यांचा अपमान करण्याकरिता केले नव्हते तर स्वतःवर नियंत्रण न ठेवल्यामुळे लोकांनी असे केले होते. त्यांनी बोलण्याचे साहस केले हे पाहून ते संतापले होते.

तो फार मोठा जमाव होता. तिथे वीसेक हजार लोक तरी असावे. मैदान पूर्ण भरले होते. रस्त्यांवरही लोकांची गर्दी होती. त्यांनी माझे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. परंतु इतरांनी सुरुवात केली तेव्हा लोक उभे राहिले. आपल्या रागाला वाट करून देण्याची आपली रीतच आहे. ते उभे राहिले आणि मुसलमानांना काढून टाका अशा घोषणा देऊ लागले. मी त्यांना सांगितले की मुसलमानांना बाहेर काढणे बरोबर नाही. इथे त्यांची घरे आहेत व त्यांना बळजबरीने ती सोडायला लावणे बरोबर नाही. मुसलमानांना आपण बळजबरीने जायला लावले तर आतापर्यंत आपण जे केले त्यावर पाणी फिरेल. मी माझ्या जागेवर बसायला तयार होतो. परंतु सरदार स्वर्णसिंग अशा प्रकारे दबून जाणारांपैकी गृहस्थ नव्हते. ते गृहमंत्री होते. ते म्हणाले की हे असे चालणार नाही. त्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना यश आले नाही. लोकांची आरडाओरड आणि उभे राहणे सुरूच होते. मग त्यांचे प्रतिनिधी, त्यांचे पुढारी पुढे आले. त्यांनी पंजाबीमधील भजनाला सुरुवात केली आणि त्यांना सांगितले की स्वर्णसिंग तुमचे प्रतिनिधी आहेत आणि तुम्ही त्यांचे ऐकायलाच पाहिजे. मग स्वर्णसिंगांनी त्यांची

पंजाबीत खरडपट्टी काढली आणि सांगितले की मी तुमचा प्रतिनिधी आहे, तुम्ही माझे ऐकायलाच पाहिजे, तुमच्या आरडाओरडीने काहीही साध्य होणार नाही. सभेत गोंधळ घालून तुम्ही काय साध्य करणार आहा? यामुळे तुमची केवळ हानीच होईल. अखेरीस जमावाला शांत करण्यात आले. परंतु त्याकरिता काही करावे लागले. लोक बसले आणि पंजाबीत सभेचे कामकाज सुरू झाले.

मला पंजाबीत बोलता येत नाही परंतु मला ती समजते. (सरदार स्वरणसिंग) जे म्हणाले ते मला आवडले. मुसलमान पुढाऱ्यांना त्यांनी सांगितले की पाकिस्तानमध्ये काहीही झाले तरी आम्ही अमानवीय होणार नाही. ते म्हणाले की आपले लोकशाहीवादी सरकार आहे व इथे अशा प्रकारच्या घटना घडू देता येऊ शकत नाहीत. जर एकाही मुसलमान मुलीचे अपहरण करण्यात आले असेल तर काहीही करून तिला परत करण्यात येईल. याकरिता मदत निश्चितच लागेल कारण अपहृत मुलगी कुठे आहे हे त्याशिवाय कळणार नाही. परंतु ती कुठे आहे हे कळले तर तिला परत केले जाईल. शिवाय ज्या मुसलमानांचे हिंदू धर्मात वा शीख धर्मात धर्मपरिवर्तन करण्यात आले आहे त्यासंबंधीही काम करायचे आहे. ते अजूनही मुसलमान आहेत. अशा प्रकारचे धर्मपरिवर्तन कायदेशीर म्हणून मान्य केले जाणार नाही कारण ते नैतिकतेविरुद्ध आहे. पाकिस्तानमधील हिंदूंचे संरक्षण होते की नाही याचा विचार न करता इथे असलेल्या मुसलमानांचे काहीही करून रक्षण केले जाईल. अर्थातच जीवित आणि वित्त यांचे रक्षण करणे कठीण असते. इथे पोलीस आहेत, सरकार आहे - त्यांना जे काही शक्य असेल ते ते करतील. परंतु प्रत्येकजण जर लूटमार करू लागला तर प्रत्येकाला गोळी तर मारता येत नाही. सरकार असहाय होते. आपले स्वातंत्र्य पांगळे झाले आहे आणि आम्ही आमची असाहायता कबूल केली पाहिजे. लोकांना आम्ही विनंती नक्कीच करू शकतो परंतु आम्हाला आमची असहायता कबूल करावीच लागेल. लोकांची समजूत घालण्याचा ते आटोकाट प्रयत्न करत होते. त्यांची समजूत घालत ते म्हणाले की भारताची अब्रू आणि प्रतिष्ठा तुमच्या हातात आहे व हे सरकार तुमचे आहे कारण मंत्र्यांना तुम्ही निवडून दिले आहे. आणि हे सरकार तुमचे असल्यामुळे ते आपले कर्तव्य पार पाडील, जे करणे आवश्यक आहे ते ते करील व या सरकारला तुम्ही मदत केली पाहिजे. त्यांनी हे सर्व स्पष्ट करून सांगितले. त्याकरिता बराच वेळ लागला. अखेरीस सभा शांत झाली. नेहमी असेच होत असते. लोक जेव्हा अस्वस्थ होतात, संतापतात तेव्हा मी पाहिले आहे की थोड्या वेळाने शांत झाल्यानंतर ते जेव्हा विचार करू लागतात तेव्हा त्यांना हे सर्व कळू लागते. मी जेव्हा स्वातंत्र्याकरिता लढा देत होतो तेव्हाही असेच होत होते. अशीही वेळ यायची की सभा संपल्याचे घोषित करावे लागेल असे वाटायचे. परंतु नंतर लोकांची समजूत पटायची. नंतर त्यांचे प्रतिनिधी आले. मी म्हणालो की तुम्ही माझ्या मागे या. त्यांना जर गाडीत घेतले नसते आणि मी तिथेच बसलो असतो तर वेळेवर पोहोचू शकलो नसतो. अजून वेळ लागता असता. मी मिनिटामिनिटाचा हिशेब ठेवला नसता तर इथे वेळेवर पोहोचलो नसतो.

मी आराम करणे सोडून दिले आहे. सर्व दुःखी आहेत मग मी काय आराम करू? त्यांच्यापेक्षा तर मी किती तरी आरामात आहे. ते मला सांगत होते की इथे जे निर्वासित आहेत ते फार दुःखी आहेत. काही तर झाले आहे, जसे मी पाहिले तसेच आहे असे नसेलही. काहींची तर सोय झाली आहे. काही छत लावण्यात आले आहेत. आता ते तंबूतच राहतील. खायचे जसे असायला पाहिजे तसे नाही. पूर्व पंजाबच्या राज्यपालांनी (एल. सी. त्रिवेदी) पाहिले आणि कबूल केले की असे तर असायला नको. कपड्यांबद्दल असे होते की जे चांगले कपडे असतात ते आतूनच काढून घेतले जातात. कोण काढून घेतो ते मी काय सांगू? ते मी सोडून देतो. परंतु नंतर निर्वासितांना फाटकेतुटके कपडे मिळतात. असे व्हायला नको. जी गोष्ट त्यांच्याकरिता पाठवण्यात येते ती त्यांनाच मिळाली पाहिजे. तिथे लोक मरतातसुद्धा. मेलेल्या दोन लोकांच्या दहनाकरिता लाकूडच मिळाले नाही. सर्व दिवस गेला. कोणी डॉक्टर महोदय आहेत. त्यांचे नाव विसरलो. त्यांच्या हाती ही व्यवस्था आहे. ते एका ठिकाणी भेटले नाही, दुसऱ्या ठिकाणी गेले तर तिथेही भेटले नाही, तिसऱ्या ठिकाणी गेले तर तिथेही भेटले नाही. अशा प्रकारे पूर्ण दिवस गेला. सात वाजून गेले होते. लाकडाची कोणतीच व्यवस्था न झाल्यामुळे त्यांच्यापैकी काही लोक एकाच्या नातलगांकडे गेले. ते म्हणाले की लाकडाची व्यवस्था झाली नाही म्हणून काय झाले. आठआठ आणे देऊ. असे केल्याने १० ते १५ रुपयांची व्यवस्था होऊन जाईल. परंतु तो नातलगही करारी माणूस होता. त्यांने दान घेण्याला नकार दिला. तो म्हणाला की लाकूड नसेल तर मी प्रेताचे दफन करीन. हिंदू दफन करत नसातात परंतु त्याने दफन केले. असे व्हायला नको होते. मला वाईट वाटले.

नंतर मला सांगितले की कोणतीही गोष्ट असली तरी ती श्रीमंत निर्वासितांना मिळून जाते परंतु गरिबांना मिळत नाही कारण ही व्यवस्था अधिकाऱ्यांच्या हाती नाही. आणि या कामाकरिता माणसेसुद्धा कसे आणि किती ठेवणार? तिथे जे लोक होते ते त्यांच्यातूनच घेतले होते व प्रत्येक गोष्ट त्यांच्यामार्फत केली जात असे. ते जर चांगले असतील, स्वार्थी नसतील आणि सेवेला वाहून घेणारे असतील तर सर्व काही सुरळीत होते. परंतु त्यांच्यात सेवाभावना नसेल तर हे काम कठीण होते. मला सर्व गोष्ट जाहीरपणे करणे आवडते. आम्ही मारपीट करायला नको कारण यामुळे वातावरण विषारी होते. आपल्याजवळ दुसरा उपाय आहे. स्पष्ट बोलायला पाहिजे. लपवल्याने काही फायदा होत नाही. मी तर म्हणेन की जी गोष्ट जशी आहे तशी सांगितली पाहिजे. जे वाईट करतात त्यांच्यावर आरोप केला तर त्यात वाईट काय आहे? दोष देण्यासारखे काही असेल तर दोष दिलाच पाहिजे. माणसाने वाईटाला वाईट म्हटलेच पाहिजे. असे समजूनच मी सांगतो की ही गोष्ट वाईट आहे. आपण आधीच दुःखी आहो. हजारो हजारो लोक त्यांच्या घरातून विस्थापित झाले आहेत आणि इथे आले आहेत. आणि आपण जर असे करू लागलो तर ती दुःखाची गोष्ट आहे. आज मला एक मुलगा भेटला. त्याने स्वेटर घातलेला

होता. ते काढून तो उभा राहिला. माझ्याकडे डोळे वटारून पाहत होता. जणू खाऊन टाकेल. परंतु मुलगा होता, काय करू शकत होता? तो म्हणाला, "तुम्ही म्हणता की तुम्ही आमचे रक्षण करायला आला. परंतु माझे वडील मारले गेले आहेत. माझे वडील परत आणून द्या." परंतु त्याचे वडील मेलेले होते. त्यांना मी परत कसा आणणार? मुलगा संतापला होता. मी त्याच्या वयाचा असतो आणि त्याच्या परिस्थितीत असतो तर त्याला काय वाटते याची मला कल्पना येऊ शकली असती. त्यावेळी मी कदाचित असेच केले असते. मला राग आला नाही, दया वाटली.

आज अशी दृश्ये पाहायला मिळाली. निर्वासितांचे म्हणणे आहे की आमच्यातील सर्वच वाईट नाहीत. आमच्यापैकीच काही लोकांकडे व्यवस्थापकाचे काम देण्यात यावे. अखेरीस मॅजिस्ट्रेट वगैरे आमच्यावर देखरेख करण्याकरिता आहेतच. इतर लोकांवरही लक्ष ठेवावेच लागत असते. कांबळी वाटायची असतील तर आम्हाला द्या, मुलांना दूध मिळायला पाहिजे परंतु मिळत नाही. ते तर वरच्या अधिकाऱ्यांकरिता आहे. ते अथवा सेवाभावना असलेल्या लोकांची जी समिती तयार करण्यात आली आहे त्यांनी ते दूध पिण्यापेक्षा आम्ही प्यालो तर काही वाईट नाही. चोरी होत असेल तर काय, जसे करतील तसे भरतील. वरून ते म्हणतात की इतर ठिकाणच्या निर्वासितांनीही आम्हाला चिठ्ठ्या लिहायला सुरुवात केली आहे. चिठ्ठ्यांमध्ये ते म्हणाता की महात्म्याला सांगा की आमचेही काही ऐका. ते सांगत होते की चिठ्ठ्यांमध्ये अशा अशा गोष्टी लिहिल्या आहेत. मी गेलो ते चांगलेच झाले. मी त्यांना सांगितले की तुम्ही शांततेने राहिलात आणि मुसलमानांना सांगा की तुम्ही आमचे भाऊ आहा, तुम्ही इथेच राहा. पानिपतमध्ये अनेक लढाया झाल्या आहेत परंतु तुम्ही इथेच राहिलात तर ही सर्वात चांगली गोष्ट होईल.

या शिबिरात २८,००० निर्वासित साहतात. मी त्यांना सांगितले, "दुसरे येतात म्हणून काय झाले? तुम्हाला जेवायला मिळाले, अंथरुणापांघरुणाकरिता कापड मिळाले आणि घालण्याकरिता कपडे मिळाले, छत किंवा तंबू मिळाले तर पुरे आहे. कुठेही राहिलात तरी अजून चौथी गोष्ट तर मिळणार नाही."

या तीन गोष्टींच्या मदतीने तुम्ही अनेक गोष्टी निर्माण करू शकता. संपूर्ण भारतात काय होत आहे, कोणत्या समस्या निर्माण होत आहेत व त्या कशा सोडवायच्या हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. सरकार इथे आहे परंतु सरकार काही करण्याकरिता तुमच्यावर बळजबरी तर करू शकत नाही." काल जवाहरलालनी फार सुंदर गोष्ट सांगितली. आज मी ती वृत्तपत्रांमध्ये पाहिली. आज पाहिले. रोज तर वृत्तपत्रांमधून पाहायची संधी मिळत नाही. जवाहरलाल म्हणतात की मला प्रधानमंत्री म्हणतात तेव्हा मला ती गोष्ट बोचते. मी प्रधानमंत्री कधी झालो होतो? हं, मी देशाचा पहिल्या क्रमांकाचा सेवक आहे

असे म्हटले तर मला आवडेल. सर्व जर असे पहिल्या क्रमांकाचे सेवक झाले तर ते चोवीस तास जनतेचा विचार करू लागतील. आणि मग त्यांच्या हाताखालील लोकही असा विचार करतील तर आपला देश सुवर्णभूमी होईल. मग या भूमीवरच रामराज्य म्हणजे देवाचे राज्य निर्माण होईल. मग आपले स्वातंत्र्य पूर्ण होईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आज आपण जसे वागतो तसेच वागत राहिलो तर हे स्वातंत्र्य मला बोचेल. अशा प्रकारचेच स्वातंत्र्य आपल्याला पाहिजे काय? नाही, असे होऊ शकत नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १५४-९

३८. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ३, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला अनेक लोक भेटायला येतात. ते सांगत असलेली प्रत्येक गोष्ट मी तुम्हाला सांगत नसतो. एखादी गोष्ट पुरेशा महत्त्वाची असली तर तेवढी मी तुम्हाला सांगत असतो. आजही काही लोक मला भेटायला आले होते. असे वाटते की त्यांना प्रधानमंत्र्यांशी काही काम होते. त्यांचे म्हणणे आहे प्रधानमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी वचन दिले होते परंतु आता ते त्या वचनापासून माघार घेत आहेत. हे कसे काय म्हणून मी त्यांना विचारले. ते म्हणाले की आमच्याजवळ पत्र आहे. मी त्यांना पत्र दाखवायला सांगितले. अखेरीस त्यांच्यापेक्षा माझ्याजवळ कोणतेही वेगळे अधिकार नाहीत मी काही सरकार नाही. होय मी प्रधानमंत्र्यांचा सेवक, मित्र, सहकारी आहे आणि म्हणून मी त्यांच्याशी बोलू शकतो. परंतु हे मी त्यांना कसे सांगू? मग मी विचार करू लागलो की आम्ही बोलतो एक आणि करतो वेगळे असे का होते? मला हे सर्व सहन करावे लागते. मला असे वाटते की मी समजूनउमजून कधी कोणाची फसवणूक केलेली नाही. हं, असे होऊ शकते की माणसाला माहिती नाही, तो सद्भावनेने म्हणाला असावा, हेतू वाईट नसावा तर अशा गोष्टीला धोका मानायचा काय? दुःख मानायचे तर अशा अनेक दुःखद गोष्टी आहेत. अनेक गोष्टी आपण नकळत करतो आणि त्यामुळेही वचनभंग होतो. परंतु कोणी जाणूनबुजून वचनभंग करत असेल तर ती वाईट गोष्ट आहे. असे व्हायला नको. कधीही एक शब्दसुद्ध बोलू नये आणि जर बोललो तर त्याप्रमाणे काम करायला पाहिजे. आपण असे करू तेव्हाच एकवचनी होऊ शकतो. आणि आता आपण स्वतंत्र झालो व संपूर्ण देशाचा कारभार आपल्याला करायचा आहे तर आपण अतिशय सावधगिरीने काम केले पाहिजे. आपण संयम, विवेक आणि नम्रतापूर्वक काम केले पाहिजे. आपण उद्धटपणा करायला नको. असे केले तर आपले काम यशस्वी होऊन शेवटापर्यंत पोहोचेल.असे झाले तर कोणीही आपल्यावर विश्वासघाताचा आरोप करणार नाही. आपण जर म्हणू की अमूक गोष्ट तुम्हाला फुकट देऊ आणि नतर त्या गोष्टीकरिता आपण नाममात्र किंमत जरी आकारली तरी तो विश्वासघात होईल. आज आपली परिस्थिती अशी झाली आहे की आपल्यालाच आपल्या शब्दाची किंमत वाटत नाही. एक दिवस आपण वचन देतो आणि दुसऱ्या दिवशी आपण ते मोडतो. मी जर तुम्हाला उद्या दुपारी ४ वाजता भेटायचे कबूल केले परंतु त्यावेळी जर मी नृत्याचा कार्यक्रम पाहायला गेलो तर तो विश्वासघात होईल. म्हणून मी म्हणतो की आपण फार काळजीपूर्वक वागलो पाहिजे. आपण आपल्या शब्दावर ठाम राहिलो पाहिजे, आपल्या शब्दाचा

उच्चार करण्यापूर्वी आपण त्यावर विचार केला पाहिजे. आवेगाच्या भरात आपण काहीही बोलू नये. उदाहरणार्थ आपण म्हणू की तिथे दंगल सुरू आणि मग तिला रंग भरण्याकरिता तिथे खून झाला असे आपण म्हणतो. अशी गोष्ट फार काळ लपत नसते. अखेरीस सत्य बाहेर येतेच. म्हणून आपण काळजीपूर्वक वागलो पाहिजे.

सिंधमधील एक डॉक्टर मला लिहितात की तिथे जितके हरिजन राहिले आहेत त्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. (चोईथराम गिडवाणी यांनी डॉ. भि. रा. आंबेडकर यांना लिहिलेल्या पत्रानुसार सिध आणि बलुचिस्थानमधील हरिजनांना आवश्यक सेवा अध्यादेशानुसार भारतात स्थलांतर करण्यापासून अडवण्यात येत होते.) सवर्ण हिंदू निघून आल्यानंतर केवळ हरिजन तिथे राहिले तर असे म्हणतात की तिथे त्यांना मरावे लागेल वा मरावे लागले नाही तर आयुष्यभर गुलामीत राहावे लागेल. त्याच्यासमोर तिथे जिवंत राहण्याचा एकमेव उपाय संपूर्ण गुलामगिरी स्वीकारणे वा इस्लाम स्वीकारणे हाच असेल. ही वाईट परिस्थिती आहे. आज परिस्थिती अशी आहे की पाकिस्तान सरकार काही म्हणेलही तरी त्यांच्या हाताखालील अधिकारी त्या आदेशांचे पालन करत नाहीत. हीच परिस्थिती भारतातसुद्धा आहे. जवाहरलाल आणि सरदार म्हणतात की आम्ही मुसलमानांचे रक्षण करू, एकाही मुसलमानाला पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता भाग पडावे अशी आमची इच्छा नाही. परंतु असे घडत नाही. ते जे म्हणतात त्याचे पालन करवून घेण्याकरिता त्यांच्याजवळ लोक नाहीत. त्यांच्या हाताखालील लोक त्यांच्या इच्छेप्रमाणे चालत नाहीत व लोकांनाही त्याचे काही वाटत नाही. काल मी तुम्हाला सांगितले होते की मी पानिपतला गेलो होतो. तिथे आलेल्या हिंदूंची आणि शिखांची दयनीय अवस्था आहे. त्यांच्याशी पाकिस्तानमध्ये दुर्व्यवहार करण्यात आला होता आणि त्यांना पळून येणे भाग पडले. ते आले कारण त्यांच्यावर अत्याचार होत होता. असे नसते तर त्यांना पळून येण्याची गरज काय होती? अत्याचारामुळे पळून यावे लागलेल्या या लोकांना इतरांचीही तशीच अवस्था व्हावी असे वाटते काय? परंतु असे घडत आहे. मग मी पाकिस्तानविरुद्ध तक्रार कसा काय करू शकतो? परंतु मला असे करावे लागते. पत्रलेखकाने सविस्तर लिहिले आहे. ते म्हणतात की एकाही हरिजनाला सिंधमध्येच राहायचे नाही. त्यांना जरी एका ठिकाणी एकत्र राहायचे असले तर त्यांना शांततेत राहू दिले जात नाही. त्यांच्याकडून वेठबिगारी करवून घेतली जाते. त्यांना संडास साफ करणे, झाडझूड करणे आणि इतर काम सांगितले जातात. आज भंग्यांवर संडास सफाईची बळजबरी करण्यात येऊ नये. तो जर बॅरिस्टर होऊ शकत असेल तर त्याला का अडवण्यात यावे? त्यांचे काम संडाससफाई आहे असा आग्रह आपण का धरावा? त्यांना त्यांच्या प्रवृत्तीप्रमाणे काम करण्याची मुभा असली पाहिजे. तुम्ही इस्लामचा स्वीकार कराल तरच इथे राहू शकाल असे जर त्यांना सांगण्यात आले असेल तर ते काय करू शकतील आणि कुठे जाऊ शकतील? जगजीवन राम (एप्रिल ५, १९०८-जुलै ६, १९८६; अखिल

भारतीय दलित वर्ग संघाचे अध्यक्ष १९३६-४६; मध्यंतरकालीन सरकारमध्ये मजूरमंत्री; नंतर रेल्वे, अन्न आणि शेती, व संरक्षण अशा महत्त्वाच्या खात्याचे केंद्र सरकारमध्ये मंत्री) यांनी काढलेले लांब वक्तव्य तुम्ही पाहिले असेल. ते म्हणतात की सिंधमधून हरिजनांनी निघून यायलाच पाहिजे. त्यांना जर यायचे असेल तर त्याकरिता त्यांना व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे. जोपर्यंत ते पाकिस्तानमध्ये आहेत तोपर्यंत त्यांना आपले काम कोणताही अडथळा न आणता करू दिले पाहिजे आणि ते शक्य नसेल तर त्यांना येऊ दिले पाहिजे. तसे जर करू दिले नाही तर हिंदू आणि शिखांच्या मनावर याचा कायम ठसा राहील. भारत आणि पाकिस्तान हे जरी दोन देश असले तरी आपण एकमेकांना विसरू शकत नाही. आपल्याला सौजन्यपूर्वक वागणे शिकायचे आहे. आपण कोणालाही दुखवता कामा नये. आपण कोणालाही मुसलमान होण्याकरिता बाध्य करू नये. कोणाच्या बायकोची वा मुलीची अब्रू घेऊ नये वा त्यांचे अपहरण करू नये. डॉ. गोपिचंद भार्गव आणि सरदार स्वर्णसिंगसुद्धा काल म्हणाले होते की भारत अशा गोष्टी सहन करू शकत नाही. आज परिस्थिती अशी काही झाली आहे की एखाद्या मुसलमानाने मी स्वतःहोऊन हिंदू धर्म स्वीकारला असे म्हटले तरी ते खरे आहे असे मान्य करता येऊ शकत नाही. हरिजन हे मुसलमानेतर आहेत. ते जर म्हणत असतील की आम्ही इस्लामचा स्वीकार केला तरी ते मान्य करता येऊ शकत नाही. ते असे म्हणतात कारण त्यामागे केवळ भीती असते. अशा प्रकारचे सर्व धर्मपरिवर्तन रद्दबातल ठरवण्यात यावे.

काठेवाडमधून परस्परविरोधी वृत्त येत आहे. काही वृत्तांत सांगतात की वर्णन केल्याप्रमाणेच काठेवाडमधील परिस्थिती वाईट आहे. त्या आशयाची तार आजच आली. इतर अहवाल काँग्रेसच्या सुत्रांकडून आलेले आहेत व ते म्हणतात की परिस्थिती अशी नाही. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणतात की आम्ही कोणाचेही घर जाळले नाही. मी कोणाचा अहवाल खरा आहे असे समजू? मी काँग्रेस व मुसलमानांवर विश्वास ठेवावा की हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर? सत्य काय आहे हे कळणे फार कठीण झाले आहे. जर चुका झाल्या असतील तर आपण त्या कबूल केल्या पाहिजे. हिंदूंनी जर चूक केली असेल, त्यांनी जर अत्याचार केले असतील तर ते कबूल केले पाहिजे. परंतु जर परिस्थिती अशी असेल आणि 'आमच्या संपत्तीची जाळपोळ करण्यात आली आहे, हिंदू होण्याकरिता आमच्यावर बळजबरी करण्यात आली आहे व आपच्या मुलींचे अपहरण करण्यात आले आहे' या मुसलमानांच्या म्हणण्यात जर अतिशयोक्ती असेल तर परिस्थिती अशी नाही हे आपण जगाला घोषित करून सांगितले पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काहीही चूक केली नसेल तर मी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. सत्य काय आहे ते मला माहीत नाही, परंतु ते मी शोधण्याचा प्रयत्न करतो आहे. माझ्या ओळखीच्या तेथील लोकांना मी लिहिले आहे. (पाहा जयशंकर पंड्या यांना पत्र, डिसेंबर २, १९४७ आणि शामलदास गांधी यांना पत्र, डिसेंबर ३,

१९४७) मी मुसलमानांनासुद्धा लिहिले आहे. तिथे काय सुरू आहे हे कळण्याकरिता आणि पुढे काय घडण्याची शक्यता आहे हे कळण्याकरिता मी त्यांना सविस्तर माहिती मागितली आहे.

आता दक्षिण आफ्रिका. विजयालक्ष्मी पंडित काय म्हणतात ते तुम्ही पाहिले असेल. त्या म्हणतात की आपल्याला दोन-तृतीयांश मते मिळू शकली नाही म्हणून आपण पराभूत झालो. (दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना मिळणाऱ्या वागणुकीबद्दलच्या ठरावाची चर्चा करण्याकरिता गोलमेज परिषद बोलवावी या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेत भारताने मांडलेल्या ठरावाला दोन-तृतीयांश मते मिळू शकली नाही. ठरावाच्या बाजूने ३१ मते पडली होती तर विरोधात १९ आणि १ मत अनुपस्थित होते.) असे असले तरी त्यांनी घेतलेल्या भूमिकेला किती तरी लोकांनी पाठिंबा दिला. याशिवाय सत्य आपल्या बाजूला आहे आणि एक प्रकारे आपण विजयी झालो आहो. (विजयालक्ष्मी पंडित म्हणाल्या होत्या की आपला नैतिक विजय झाला आहे आणि तोही काही कमी मोलाचा नाही.) यामुळे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांनी नाराज होऊ नये. परंतु याबद्दल मला काही म्हणायचे आहे. विजयालक्ष्मी असे म्हणू शकल्या नसतील कारण त्या भारत सरकारचे प्रतिनिधित्व करत होत्या. तुमच्याजवळ कोणताही उपाय नसेल परंतु माझ्याजवळ आहे आणि मी दक्षिण आफ्रिकेत असताना त्याचा अवलंब केला होता. जयपराजय काय आहे? दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना आणि स्मट्सना (दक्षिण आफ्रिकेचे प्रधानमंत्री, फिल्ड मार्शल जॉन ख्रिश्चन स्मट्स) आम्ही तिथे नको आहे, आणि आम्ही दक्षिण आफ्रिका सोडलीच पाहिजे असे ते म्हणत असतीलही. पाकिस्तानमधील मुसलमानेतरांबद्दल व भारतातील मुसलमांनाबद्दल होते त्याप्रमाणे ते आपल्याला अन्नपाणी नाकारत असतील. पाकिस्तानमध्ये धाक दाखवून हिंदूंना आणि मुसलमानांना घालवून लावण्यात आले आहे. तरीही बन्नूमध्ये मोठ्या संख्येत हिंदू आणि शीख आहेत. त्यांचे काय होईल हे मला माहीत नाही. मेहरचंद खन्ना (वायव्य सरहद्द प्रांतात भूतपूर्व अर्थमंत्री; खुदाई खिदमदगार सांसदीय पक्षाचे सचिव. त्यांना सहा महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा नोव्हेंबर २७ला झाली होती आणि जमानतीवर सुटल्यानंतर ते दिल्लीला आले. अजूनही पेशावर, मरदान, बन्नू, डेरा इस्माईल खान आणि परचिनार येथील स्थलांतराची वाट पाहत असलेल्या ४०,००० हिंदूंचे काय होईल याबद्दल त्यांनी आशंका व्यक्त केली होती. वायव्य सरहद्द प्रांतातून निर्वासितांना घेऊन जाणाऱ्या ट्रेनकरिता ऑक्टोबर २८पासून परवानगी देण्यात आलेली नव्हती. ज्या हिंदू आणि मुसलमानांवर खटले भरण्यात आले होते व सरहद्द प्रांतातील तुरुंगात डांबण्यात आले होते त्यांच्या सुरक्षिततेबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली होती.) आज मला ते भेटायला आले होते. ते म्हणतात की इतर ठिकाणच्या लोकांचीही अशीच परिस्थिती आहे आणि ते आपला जीव वाचवू शकतात की नाही हे सांगता येऊ शकत नाही. ते जर वाचले तर त्यांना इस्लाम स्वीकारावा लागेल. परंतु बांटूमधील लोकांची संख्या बरीच जास्त आहे. त्यांनी काय करावे? ते कैद्यासारखे आहेत.

ते बाहेर निघून जाऊ शकत नाहीत आणि तिथे राहिले तर खायचे काय? त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. सरकार काय करू शकते? त्यांच्यासमोर त्यांच्याच समस्या आहेत. मी जे सांगतो आहे ते दक्षिण आफ्रिकेतील हिंदू, मुसलमान आणि शीख यांनाही लागू होते. विजय आणि पराजय यांना काहीही महत्त्व नाही हे मी त्यांना सांगायलाच पाहिजे. 'तुम्ही सांगायला पाहिजे की दक्षिण आफ्रिकेत आम्ही इज्जतीने राहू आणि आम्ही दक्षिण आफ्रिका सोडणार नाही. तुमची इच्छा होती म्हणून आम्ही इथे आलो होतो. आम्हाला आमंत्रित करण्यात आले होते. आम्ही तिथे बंधुआ मजूर म्हणून आलो होतो आणि मग तिथेच आम्हाला मुले झाली. हक्कांबद्दलच बोलायचे तर हब्शी लोकांशिवाय तिथे कोणालाही राहण्याचा अधिकार नाही. तिथे राहण्याचा बोअर लोकांना जितका अधिकार आहे त्याहून तुम्हाला कमी अधिकार नाही.' संयक्त राष्ट्र संघात जगभरातील प्रतिनिधी होते. आपल्या देशालासुद्धा प्रतिनिधीमंडळ पाठवावे लागले. आपण योग्य तेच केले. तिथे तर न्याय व्हावा म्हणून गोळा होत असतात, पण ते न्याय करू शकत नाहीत वा त्यांना न्याय करायची इच्छा नाही ही वेगळी गोष्ट आहे. दक्षिण आफ्रिकेतील लढा आपण सुरू ठेवलाच पाहिजे, परंतु तलवारीने नाही तर आत्मशक्तीने. माझ्या बाजूला बसलेल्या या लहानशा मुलीतही आत्मशक्ती आहे, आणि तुम्हा सर्वांमध्येही ती आहे. सैनिकांमध्येही आत्मशक्ती आहे. तलवार आपल्याजवळून हिसकून घेतली जाऊ शकते. मग आपण निःशस्त्र होऊन जातो. आपला हात कापून टाकला जाऊ शकतो परंतु कोणीही आत्मशक्ती हिरावून घेऊ शकत नाही. ती चिरंतन आहे. ती आज आहे, उद्या असेल आणि परवाही असेल. आत्म्याशिवाय देहाला काहीही किंमत नाही. एक ना एक दिवस या देहाची विल्हेवाट लावली जाईल. माझी पत्नी वारली आणि तिला मी माझ्याबरोबर ठेवू शकलो नाही. मला इतकी मदत करणारा महादेव (महादेव देसाई) वारला. परंतु मी त्याला माझ्यासोबत ठेवू शकलो नाही आणि त्याच्या देहाचे दफन करावे लागले. यामुळे मी म्हणेन की दक्षिण आफ्रिकेमधील भारतीयांत स्वाभिमान असेल, आणि मला वाटते की तो त्यांच्यात आहे, धैर्य असेल तर त्यांनी म्हणायला पहिजे की आम्हाला युनोत दोनतृतियांश मते जरी मिळाली नसतील तरी आम्हाला मोठ्या संख्येत मते मिळाली आहेत. त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना सांगायला पाहिजे की आम्हाला दक्षिण आफ्रिकेत प्रतिष्ठापूर्वक राहू द्या. आम्हाला आमची इभ्रत राखून काम करायचे आहे. आम्हाला शासकीय नोकऱ्या नको. आम्हाला गोऱ्यांनी मदत करावी अशी अपेक्षा नाही, परंतु आम्हाला श्वासोच्छवास करण्याची, पाणी पिण्याची व या भूमीवर राहण्याची परवानगी असली पाहिजे. अखेरीस इथे येण्याकरिता आम्ही भाडे भरले आहे, जिथे कुठे असलो तरी आजिविका कमावली आहे. आम्हाला मताधिकार मिळावा असा आमचा दावा नाही. आम्हाला जर मताधिकार मिळणार असेल तर तो गोऱ्यांच्या बरोबरीने मिळाला पाहिजे, नाही तर आम्हाला मताधिकार नको. आम्ही मताधिकाराकरिता सत्याग्रह करणार नाही परंतु आमच्या इभ्रतीचे जतन

आम्ही केलाच पाहिजे. परंतु आम्हाला भाकरी पाहिजे, पाणी पाहिजे व राहायला जागा पाहिजे. त्याचबरोबर आमच्या मुलांना शिक्षणही पाहिजे. याकरिता कोणतेही अनुदान मिळाले नाही तर ते आम्हाला समजू शकेल परंतु मुलांचे शिक्षण हा आमचा अधिकार आहे आणि या अधिकाराकरिता संघर्ष करण्याचा आम्हाला अधिकार आहे. हा प्रश्न जयपराजयाचा नसून जीवनमरणाचा आहे. याकरिता आम्ही करायला वा मरायला पाहिजे. याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही.आम्हाला या जगात जर इभ्रतीने राहायचे असेल तर आम्ही करायला वा मरायला पाहिजे. आमचे कर्तव्य स्पष्ट आहे आणि त्यात तडजोडीला कोणताही वाव नाही. दक्षण आफ्रिकेतील भारतीयांना मला हेच सांगायचे आहे आणि याहून अधिक मी तुम्हाला काहीही देऊ शकत नाही.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १६०-५

३९. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ४, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी तुमच्याशी काठेवाडसंबंधी होतो आणि मला शामलदास गांधींची तार आली. काल ढेबरभाईंचीही तार आली होती. दोघांचेही म्हणणे आहे की मला मिळालेल्या बातम्या अतिशय अतिरंजित आहेत. तिथे स्त्रियांचे अपहरण मुळीच झालेले नाही आणि जोपर्यंत त्यांची माहिती आहे तिथे एकही खून झालेला नाही. सरदार पटेल गेल्यानंतर तर काहीही झाले नाही. त्याआधी तिथे काही लूटमार आणि दंगे झाले होते. मी जे म्हणालो होतो त्यामुळे शामलदास गांधी दुखावले होते, आणि दुखावणे स्वाभाविकही आहे. ते स्वतः मुंबहून काठेवाडला गेलेले आहेत आणि तिथे पोहोचल्यानंतर अजून चौकशी करून ते सविस्तर बातमी देणार आहेत.

अमेरिका, इराण आणि लंडनहून मला तारा आहेत. त्यात लिहिले आहे की काठेवाडमध्ये मुसलमानांवर फार अत्याचार करण्यात आले आहेत. अशा प्रकारचा प्रचार करणे सत्यवादी लोकांचे काम नाही. आणि भारतात काय होते याचे इराणला काय करायचे आहे? शामलदास गांधींचे म्हणणे आहे की ते हिंदू आणि मुसलमानांमध्ये कोणताच भेदभाव करत नाही. मला लिहिणाऱ्या मुसलमान बांधवांना मदत करण्याची माझी इच्छा आहे, परंतु त्याकरिता ते सत्याच्या मार्गावर असले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. परंतु ते सत्याचा अपलाप करत असतील व राईचा पर्वत करत असतील व अशा गोष्टी जगभर पसरवत असतील तर हे फार होईल. भारतातून आलेल्या तारा मी समजू शकतो परंतु विदेशातून आलेल्या तारांनी मी दुखावतो.

हुशंगाबादहून एका मुसलमान गृहस्थांचे मला पत्र आले आहे. त्यांनी लिहिले आहे की गुरू नानक जयंतीवर शिखांनी आम्हाला बोलावले आणि सांगितले की तुम्ही आमचे भाऊ आहा. तुमच्याशी आमचे कोणतेही भांडण नाही. मला हे ऐकून फार आनंद झाला. हुशंगाबाद तेच ठिकाण आहे की जिथे स्टेशनवर एक घटना घडली होती. हुशंगाबादमध्ये गुरू नानक जयंतीवर शिखांनी जे केले तसे सर्व ठिकाणी जर लोक करतील तर आपल्याला लागलेला काळीमा पुसला जाईल. मला वाटते की वृत्तपत्रांनी अशा घटनांना प्रसिद्धी दिली पाहिजे.

व्यापारी मंडळाबद्दल (चेंबर ऑफ कॉमर्स) बोलणे सुरू आहे. मारवाडी आणि युरोपीय चेंबर ऑफ कॉमर्स जर आहेत तर मुसलमानांचे व्यापार मंडळ का असू नये असा मी प्रश्न तर केला होता.

(पाहा प्रार्थना प्रवचन नोव्हेंबर २८, १९४७.) एका मारवाडी बंधूंनी मला लिहिले आहे की आम्ही मारवाडी असलो तरी इतर लोकही आमच्या व्यापारी मंडळात येऊ शकतात. मी त्यांना विचारले की तुमच्या मंडळात मारवाडी नसलेले किती लोक आहेत आणि हिंदू किती आहेत. त्यांच्या इंग्रजी पत्राने मला वाईट वाटले. त्यांचा अहवालही इंग्रजीत आहे. मला काय इंग्रजी जास्त समजते? माझा दावा आहे की मला जितकी मातृभाषा कळते तितकी इंग्रजी भाषा कळत नाही. जी भाषा मी आईचे दूध पिऊ लागल्यापासून शिकलो त्या भाषेइतकी बारा वर्षांचा झाल्यापासून जी भाषा मी शिकू लागलो ती भाषा कशी येईल? मला मातृभाषेपेक्षा इंग्रजी जास्त चांगली येते असे जेव्हा कोणी समजतो तेव्हा मला एक भारतीय म्हणून लाज वाटू लागते.

आपण स्वतःचीच फसवणूक करू नये. युरोपीय व्यापार मंडळही म्हणू शकते आमच्या मंडळात सर्व लोक येऊ शकतात. जर सर्व येऊ शकतात तर वेगवेळे व्यापार मंडळ ठेवण्याची आवश्यकता काय? युरोपीय लोकांनी भारतीय होऊन राहावे असे माझे त्यांना सांगणे आहे. जर ते भारतीय होऊन राहिले आणि भारताच्या हिताकरिता त्यांनी काम केले तर ते बरेच काही शिकू शकतात. ते फार हुशार व्यापारी आहेत. त्यांनी आपला व्यापार बंदुकीच्या बळावर नाही तर बुद्धीच्या बळावर वाढवला आहे.

ब्रह्मदेशचे प्रधानमंत्री मला भेटण्याकरिता आले होते. (पाहा याआधीचा विषय.) ते अतिशय नम्र आहेत. मी त्यांना सांगितले की तुम्ही भारताला भेट दिली हे फार चांगले केले. आमचा देश मोठा आहे आणि आमची संस्कृती प्राचीन आहे. परंतु आज आम्ही जे करत आहो, हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये जे अविश्वासाचे वातावरण आहे त्यातून तुम्ही शिकण्यासारखे काहीही नाही. आमच्या देशात गुरू नानक झाले, आम्ही सर्वांनी मित्र होऊन राहावे, शिखांनी मुसलमानांना मित्र बनवावे आणि हिंदूंनाही असे त्यांनी शिकवले. हिंदू आणि शीख यांच्यात अंतर तरी काय आहे? आजच मास्टर तारासिंग यांना वक्तव्य काढले. ते म्हणतात की कातडीपासून नख वेगळे करता येत नाही त्याचप्रमाणे हिंदूंपासून शिखांना वेगळे करता येऊ शकत नाही. गुरू नानक स्वतः कोण होते? हिंदूच होते ना? गुरुग्रंथसाहेब वेद, पुराण यांच्यातील उपदेशांनी भरलेला आहे. कुराणमध्येही हेच सांगितलेले आहे. गुरू गोविंदसिंह यांच्या शिकवणुकीबद्दलही हेच म्हणता येईल. त्यांनी जी शिकवणूक दिली तीसुद्धा हिंदूंच्या धर्मग्रंथात सापडू शकते. त्यात नवीन काहीच नाही. त्यांनी केवळ काही गोष्टींवर भर दिला आहे. या सर्वांचा जन्म वेदांतूनच झाला आहे असा माझा दावा आहे. शीख धर्म, हिंदू धर्म, बौद्ध धर्म आणि जैन धर्म हे वेगवेगळे धर्म आहेत असे म्हणता येऊ शकत नाही. हे चारही धर्म आणि त्यांच्या उपशाखा या सर्व हिंदू धर्माच्याच उपशाखा आहेत. हिंदू धर्म हा सागर आहे व त्यात सर्व नद्या वाहत येतात. त्याच्यात इस्लाम, ख्रिश्नधर्म आणि इतर धर्मही सामावू शकतात. असे झाले नाही तर तो केवळ

असा एक लहानसा प्रवाह राहील की जो आपल्या वक्षावर मोठमोठे जहाज वाहून नेऊ शकणार नाही.. परंतु आज हिंदुस्तान आणि हिंदू आपला वारसा विसरून गेले आहेत अस वाटते.

ब्रह्मदेशवाल्यांनी भारताकडून एकमेकांचा गळा कापणे शिकावे अशी माझी इच्छा नाही. आज आपण आपल्या संस्कृतीचे अधःपतन करत आहो. परंतु ब्रह्मदेशातील लोकांनी आमचा हा काळा वर्तमान काळ विसरायला पाहिजे. हिंदुस्तानच्या चाळीस कोटी लोकांनी रक्तपात न करता स्वातंत्र्य मिळवले. इतिहासात असे उदाहरण सापडणार नाही. इतकीच त्यांनी आठवण ठेवायला पाहिजे. तुम्ही म्हणू शकाल की इंग्रज थकलेले असावे.परंतु गोष्ट अशी नाही. परंतु ते म्हणाले होते की भारतीयांचा लढा अपूर्व होता. भारतापासून जर त्यांनी कोणता धडा शिकायला पाहिजे तर तो अहिंसेचा आहे. असे नाही की आम्ही अहिंसेचा धडा पूर्णपणे आत्मसात केला. आम्ही दुबळे आहो. आम्ही अहिंसेचा स्वीकार केला कारण आमच्याजवळ शस्त्र नव्हते. अहिंसा हे सर्वोत्तम आयुध आहे. केवळ पवित्र अंतःकरणाचे लोकच त्याचा वापर करू शकतात. यामुळे ब्रह्मदेशाच्या प्रधानमंत्र्यांना मी सांगितले की तुम्हाला हिंदुस्तानकडून काही शिकायचे असेल तर ही अहिंसा शिका. भारताकडून आपण धर्म घेतला खरा परंतु हा भारतच जर रानटीपणाकडे वळणार असेल तर मग आपली प्रगती कशी होईल त्यांनी असा विचार करू नये. त्यांना मी सांगितले की तुम्हाला जर भारताची नक्कल करायची असेल तर भारतात एके काळी जे सद्गुण होते व अजूनही जे कायम आहेत त्यांची करा. कोणत्याही पाशवी गोष्टाचा त्यांनी स्वीकार करू नये. जे चांगले आहे केवळ त्याचीच आपण निर्यात केली पाहिजे. असे झाले तरच जग आपल्याकडून शिकू शकेल. भारताने जर स्वातंत्र्य मिळवले नसते तर ब्रह्मदेश आणि सिलोनलासुद्धा स्वातंत्र्य मिळाले नसते. आणि भारत तलवारीच्या बळावर स्वतंत्र झालेला नाही.आणि आपल्याला स्वातंत्र्य मिळवण्याकरिता जर तलवारीची गरज पडली नसेल तर स्वातंत्र्य राखून ठेवण्याकरिताही आपल्याला तलवारीची गरज पडणार नाही. आपण जर तलवारीशिवाय आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकणार नाही तर भारताने जगाकरिता काहीही केले नाही असे मी समजेन. आज आपल्याजवळ सैन्य आहे. त्याची अजून ताकद वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. नौदल आणि वायूसेना यांच्यातही वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा प्रकारे आपण आपले सामर्थ्य वाढवू शकत नाही हे मी घोषित करतो. या मार्गाने आपण जगाचे कोणतेही कल्याण करणार नाही. आणि जग जर आपल्याकडून अशा प्रकारची गोष्ट शिकत असेल तर त्यामुळे त्याचा कोणताही फायदा होणार नाही उलट त्याचा विनाश होईल.

हिंदीवरून. आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १६६-८

४०. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ५, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला इथे देण्यात आलेली पत्रे काहीशी जास्त लांब आहेत. मी ती वाचावी आणि त्यांचे उत्तर द्यावे अशी अपेक्षा तुम्ही करू शकत नाही. मी ती इथे वाचू शकत नाही कारण यामुळे माझा आणि तुमचाही वेळ वाया जाईल. मी लियाकत अली खान यांना भेटलो असल्याचा उल्लेख असलेलीही एक चिठ्ठी आहे. काठेवाडमध्ये काहीही झाले नाही याबद्दल तुमचे अजूनही समाधान झाले नाही का असे एक पत्रलेखक विचारतात. चिठ्ठी लिहिणारे गृहस्थ जर हजर असतील तर मी त्यांना सांगेन की आणि हजर नसतील तर आकाशवाणीद्वारे त्यांनी ऐकावे की काठेवाडमध्ये काहीही झाले नाही. मला मिळालेल्या अहवालांचे समर्थन करता येईल असे तिथे काहीही घडलेले नाही असे शामलदास गांधी म्हणतात. तिथे काही घटना घडलेल्या आहेत परंतु त्या क्षुल्लक आहेत. त्यांना पाकिस्तान सरकारने प्रसिद्धी दिली व तारा पाठवण्यात आल्या. अहवाल भयानक आहेत परंतु अशा भयानक घटना घडलेल्या नाहीत. आज शामलदास गांधींकडून अजून एक तार आली. त्यांनी चौकशी केली आणि त्यांचे म्हणणे आहे की असे काहीही घडले नाही. सरदारांच्या भेटीनंतर तर काठेवाडमध्ये अगदीच असे काही घडले नाही की जसे घडायला नको होते. मला आधी मिळालेल्या वृत्तांतामध्ये असे सूचित करण्यात आले होते की सरदारांनीच लोकांना गुडगिरीकरिता चिथावणी दिली होती. परंतु ते काठेवाडमध्ये गेल्यानंतर काहीही विपरीत घडलेले नाही. यामुळे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. अशा तारा पाठवू नये असे मी मुसलमानांना सांगेन असे शामलदास गांधी म्हणतात. ज्या मुसलमानांनी पूर्वी आरोप करणाऱ्या तारा पाठवल्या होत्या त्यांनीच आता परत तारा पाठवल्या आहेत आणि लिहिले आहे की आमच्या तारांमध्ये अतिशयोक्ती होती. आम्ही चूक केली आहे. पाकिस्तानच्या वृत्तपत्रांमध्ये आलेले वृत्त चुकीचे होते, ज्या प्रमाणात नुकसान झाल्याचे त्यांत लिहिले होते तेसुद्धा चूक होते आणि मुसलमान घाबरलेले व निराश झालेले होते हेही बरोबर नाही असेही ते लिहितात. हे ऐकून मला आनंद होतो. आमच्या मुसलमान भावंडांकरिता माझ्याकडून शक्य होईल ते मी करीन असे मी म्हणालो होतो. जो पडलेला आहे त्याला अजून मारण्यात अर्थ नसतो. त्याला आपण वर उचलले पाहिजे. माणुसकी, प्रेम यांची ही मागणी आहे. यालाच सुसंस्कृत वर्तन म्हणतात. मला कोणी शत्रू नाही हे खरे आहे परंतु माझा कोणी शत्रू जरी असला तरी मी त्याला खाली पाडणार नाही. एकदा का पाकिस्तान अस्तित्वात आला की मुसलमानांना सर्व काही मिळेल हे केवळ एक स्वप्न होते. असे काही नाही की जे

पाकिस्तानमध्ये आहेत तेच जिवंत राहतील आणि जे बाहेर आहेत ते मरतील. पाकिस्तान म्हणजे खरोखरी हिंदू-मुसलमानांचा सागर आहे. ते तिथून सर्व हिंदूंना आणि शिखांना बाहेर काढणार आहेत काय? जे बाहेर आले त्यांनाही खरे म्हणजे आपले घर सोडायचे नव्हते. परंतु ते घडले. मला शिखांची पत्रे मिळाली आहेत. ते म्हणतात की जोपर्यंत आम्ही परत आमच्या घरी जाणार नाही तोपर्यंत आम्हाला स्वस्थता नाही. उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीची ल्यालपूर येथे हजार एकर शेती असू शकेल. त्यात तो गहू, केळी, कापूस आणि फळांचे पीक घेत असेल. तो ते नेहमीकरिता कसे सोडू शकेल? जोपर्यंत तो परत जात नाही तोपर्यंत तो विश्रांती घेऊ शकणार नाही. आणि भारतात काय घडले? स्थलांतर करावे लागलेले शीखही संतापलेले होते व त्यांना बदला घ्यायचा होता. मी म्हणालो होतो की ही माणूसकी नाही. हा पाशवीपणा आहे. असे करायला नको. वाईटाचा बदला चांगलाच झाला पाहिजे. चांगल्याची नक्कल केली पाहिजे. यामुळे काठेवाडहून तार आली हे मला आवडले. मी तर मुसलमान बांधवांना म्हणेन की एखादी गोष्ट घडून गेली असेल तर तिचे अर्धे सांगा, पाव सांगा.त्याचे दुप्पट, दाहपट काय करायचे होते आणि बाहेर काय पाठवायचे होते. जगभरात पसरवले असे का केले? आता मागे हिंदू, शीख तर राहिले नाहीत, हं, आता थोडे परतले आहेत ही गोष्ट वेगळी. परंतु हिंदू आणि शिखांना जर वेड लागले असते तर काय जग वाचवायला आले असते? होय, ते म्हणू शकले असते की तुम्ही स्वातंत्र्याचा सदुपयोग केला नाही. आम्ही तुमच्याकडून ते परत घेतो अशी ते धमकी देऊ शकले असते. हे सर्व शक्य आहे. परंतु जे मेले ते थोडेच परत येऊ शकतात. म्हणूनच मी म्हणतो की आपण कोणतीही गोष्ट वाढवून सांगू नये. जे दुःख आहे ते दुःखच आहे, ते काही बाहेरचा माणूस दूर करू शकत नाही. ते लहान करून दाखवले तर माणूस जगात काम करू शकतो. आपण जगाला तेव्हाच प्रभावित करतो जेव्हा इतरांच्या कामाची आपण स्तुती करतो, त्याच्या दोषाची निंदा करून नाही. तर तुम्हाला ही बातमी सांगायची होती. ती सांगितली. एका बंधूंनी लिहिले होते तेही आले. त्यात अजून काय लिहिले ते पाहीन. सागण्यासारखे काही असेल तर उद्या सांगेन.

अजून एक गोष्ट तुम्हाला सांगायची आहे. तसा तिच्याशी तुमचा संबंध नाही. पण वाटले तुमच्याद्वारे सांगून टाकावे. मी ब्रिजकिशनजींना सांगून ठेवले आहे की मला जे भेटायला येतात त्यांना ६ पासून १३ तारखेपर्यंत वेळ देऊ नये. याचा अर्थ असा नाही की मी कोणाला भेटू इच्छित नाही वा मी आजारी आहे वा मी एकटाच मजा करू इच्छितो. किती तरी महिन्यांपासून ही गोष्ट सुरू आहे. मी सेवाग्रामला जाऊ शकत नाही. यामुळे सेवाग्रामचे लोक इथे येत आहेत. उद्यापासून कस्तुरबा ट्रस्टची सभा आहे. त्यानंतर चरखा संघ, नयी तालीम, ग्रामोद्योग संघटना यांच्या सभा आहेत. या चार संघटनांच्या या काळात सभा होणार आहेत. सभेचे संचालन चांगल्या प्रकारे झाले तर त्याला काही वेळ लागेलच. मग यांना वेळ देऊ की भेटणारांना? तर मी सांगून टाकले की कृपाकरून या दिवसांत

वेळ मागू नका. वाटल्यास आपण नंतर भेटू शकतो. मी इथे माझे काम करणार नाही असे नाही. परंतु बाहेरून आलेले लोक मला केवळ उत्सुकतेमुळे भेटू इच्छितात.

कापड आणि अन्नधान्यावरील नियंत्रण उठवण्याची चर्चा सुरू आहे. असे नाही की हे नियंत्रण उद्याच रद्द होईल. प्रक्रिया सुरू आहे आणि असे सुचवून मी चांगले काम केले आहे असे प्रत्येकजण म्हणतो. नियंत्रण उठवले जात आहेत ही चांगली गोष्ट आहे असे सांगणारी पत्रे चोहोकडून येत आहेत. नियंत्रण उठवले गेले म्हणजे आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त झालो असे होत नाही. एकदा निर्नियंत्रण अंमलात आले की व्यापाऱ्यांवर काही जबाबदारी येते. घनश्यामलासुद्धा मी जास्त कापड निर्माण करण्याकरिता सांगेन. मी केवळ आदेशाचे पालन करत आहे असे तो म्हणू शकतो. जे कापड तयार करायला त्याला सांगण्यात येते ते तो तयार करतो व त्याची किंमत घेतो. परंतु एकदा कापडावरील नियंत्रण उठले की घनश्याम आणि इतर मित्र काय करतील? मग ते लोकांना लुबाडण्याकरिता स्वतंत्र असतील काय? असे झाले तर माझी हजामत होईल. असे झाले तर लोक म्हणतील की मी नियंत्रण दूर करायला लावले. शासनामध्ये माझी भावंडे आहेत, माझे मित्र आहेत. त्यांना सांगितले की झाले काम असे थोडेच आहे. मी तर शासनाला मदत केली आहे. मी कितीही मोठा असलो, कितीही सांगितले तरी शासनाला पटत नसेल, लोकांना, ज्यांचे शासन आहे त्यांना कितीही सांगितले तरी पटत नसेल तर मग काय? मी जे म्हणतो ते योग्य असायला मी ईश्वर थोडाच आहे. मी तर्क करतो, विचार करतो आणि मग सांगतो की कापड आणि इतर वस्तूंवर जे नियंत्रण आहे ते रद्द करण्यात यावे. याचा अर्थ आहे की आज आमच्याजवळ पाच मण धान्य शिल्लक असेल तर उद्या दहा मण शिल्लक असायला पाहिजे. याचे कारण लोकांनी धान्य दाबून ठेवले आहे. आज जर शेतकऱ्यांजवळ धान्य नसेल आणि तरीही मी म्हणालो की नियंत्रण काढून टाका तर लोक उपाशी मरणार नाहीत काय? लोकांना उपाशी मरू देण्याइतका मी मूर्ख नाही. माझ्याकरिता तर घमश्याम बकरीच्या दुधाची व्यवस्था करतो, फळादींची व्यवस्था करतो. भाज्या वगैरे देतो. मी काय उपाशी थोडाच मरतो. मला वाटते की शेतकऱ्यांजवळ धान्य पडलेले आहे परंतु त्यांना त्याची इतकी किंमत मिळत नाही की त्यांचे पोट भरावे. सरकार त्यांना जितके देण्याकरिता भाग पाडते तितके देऊन टाकतात, आणि म्हणतात की जेव्हा नियंत्रण उठेल तेव्हा सांगू की आमच्याजवळ किती धान्य आहे. मला वाटते की शेतकऱ्यांना जेव्हा आपल्या मालाची रास्त किंमत मिळेल तेव्हा त्यांची उपासमार होणार नाही. मान्य की आपल्याजवळ आपल्या गरजेइतके अन्नधान्य नाही. याचा अर्थ असा होतो काय की आपले शेजारी उपासमारीने मरत असताना आपल्या हाती जितके धान्य पडेल तितके सर्व आपण खाल्ले पाहिजे? आपले जर इतके अधःपतन झाले असेल तर मग यावर कोणताही इलाज नाही. तरीही मी म्हणेन की यावरील उपाय नियंत्रण नाही. जर असे घडणार असेल तर आज सरकार चालवणारे जे मंत्रिमंडळ आहे त्याने शासनापासून दूर झाले पाहिजे.

लोक हुशारी करतात, सत्याला धरून राहत नाहीत, ज्या व्यापाऱ्यांनी लोकांकरिता व्यापार केला पाहिजे ते आपलीच घरे भरत असतील व आपल्या मुलाबाळांकरिता संपत्ती गोळा करत असतील तर सरकारने काय करावे? त्यांनी बळाचा वापर करावा की लोकांवर गोळ्या झाडाव्या? आपल्याजवळ असे अधिकार नाहीत आणि ते आपल्याला नकोतसुद्धा. आपल्याजवळ पोलीसदल असले पाहिजे परंतु ते लोकांना गोळ्या घालण्याकरिता नाही. आपण जर लोकांना गोळ्या घालायला सुरुवात केली तर शिल्लक कोण राहील. आपले तीस वर्षांचे प्रशिक्षण कुठे गेले? आपली माणुसकी कुठे गेली? हे असे चालू शकत नाही. अशा प्रकारे आपण आपले नवजात स्वातंत्र्य गमावू. यामुळे मी म्हणतो की नियंत्रण (कंट्रोल) गेलेच पाहिजे. सरकार जर म्हणत असेल की नियंत्रण काढून टाकले तर लोक उपाशी मरतील. असे झाले तर पंचायत राजची स्थापना झाली नाही असे मी म्हणेन. म्हणजे अजून आपल्या देशात लोकशाही आली नाही. म्हणजे ज्या रामराज्याकरिता मी जगतो आहे त्या रामराज्याची अजून स्थापना झालेली नाही. मी म्हणेन की ज्या लोकांना नियंत्रणापासून मुक्त करण्यात आले आहे त्यांनी स्वतःवर नियंत्रण लावले पाहिजे आणि इतरांना सुखी केले पाहिजे. सरकारी सेवेतील नागरी सेवेचे लोक कदाचित मला नावे ठेवतील. हस्तक्षेप करण्याचा मला कोणताही अधिकार नाही, मला सरकार चालवण्याचा अनुभव नाही, एकदा नियंत्रण काढले की नंतर ते परत लावणे व लोकांना खाऊ घालणे कठीण होईल असेही ते म्हणतील. मी म्हणतो की ते बरोबर आहेत. मी कधीही नागरी सेवेत नव्हतो, परंतु मी करोडो लोकांमध्ये फिरलो आहे. मला लोकांच्या अतःकरणाची माहिती आहे. मी त्यांना ओळखतो.

आता कापडाबद्दल. धान्याबद्दल तुम्ही म्हणू शकता की आमच्याजवळ पुरेसा साठा नाही. परंतु आपल्याजवळ पुरेसा कापूस नाही असे कोणीही म्हणालेले नाही. आपल्याजवळ इतका कापूस आहे की आपण त्याची निर्यात करतो. तुम्ही म्हणाल की आपल्याजवळ पुरेश्या गिरण्या नाहीत. मी म्हणेन की गिरण्या आपल्या घरात आहेत. इथे बसलेल्या सर्व स्त्रियांच्या घरात त्या गिरण्या आहेत. तुम्हापैकी प्रत्येकाला ईश्वराने कृपावंत होऊन दोन हात दिले आहेत. तुम्हाला जर तुमच्या पाठीवर कापड हवे असेल तर तुम्ही कताई केली पाहिजे. तुम्ही जर तसे करू शकत नसाल तर तुम्ही नागडे फिरा. आपल्याकडे किती तरी गिरण्या आहेत परंतु तरीही गरजेइतके उत्पादन होत नसेल तर आपण हातकताई आणि हातविणाईचा आधार घेतला पाहिजे. विणाई इतकी कठीण नाही. आपल्या देशात किती तरी विणकर आहेत. त्यांच्याकडून आपण किती तरी कापड विणून घेऊ शकतो. परंतु काही लोक अतिशय शौकीन आहेत गिरणीतील सूत मिळाले तर ते विणू शकतात, हातकताईच्या सुताने विणणार नाही. असे दडपण कोणी आणत असेल तर नागडे राहा. त्यांनी जर हातकताईच्या सुताने कापड विणायला सुरुवात केली तर कोणालाही नागडे राहावे लागणार नाही. तर आपला सुंदर देश - करोडो लोक राहत असलेला

देश, ज्यांना आपला व्यवसाय माहीत आहे, ज्यांना कापड कसे तयार करावे हे माहीत आहे त्या देशातील लोकांना नग्न राहण्याची आवश्यकता पडू शकत नाही. दोन वार कापड मिळेल, चार वार कापड मिळेल असे बंधन ठेवणे चांगले वाटत नाही. यामुळे कापडावरील नियंत्रण ही आपल्या अज्ञानाची परिसीमा आहे. ते जितके लवकर उठवले जाईल तितके बरे. जोपर्यंत अन्नधान्याचा प्रश्न आहे शेतकऱ्यांनी आणि व्यापाऱ्यांनी म्हटले पाहिजे की आम्ही जनतेकरिता पिकवतो. आम्हाला कोणताही अप्रामाणिकपणा करायचा नाही. शेतकऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की धान्य पेरायचे आहे ते केवळ पोट भरण्याकरिता नाही तर सर्वांकरिता. मी म्हणेन की आपल्या जमिनीतून अर्धा शेर निर्माण होत असेल तर एक शेर निर्माण करण्याचा प्रयत्न का करू नये? याकरिता लोकांना मार्गदर्शन करू या. त्यांना आपण उत्तेजन दिले पाहिजे. भारतात कोणीही उपाशी वा नग्न राहण्याचे कारण नाही. आम्ही आमच्या अज्ञानामुळे नग्न राहतो. जितके धान्य पाहिजे तितके उत्पन्न करत नाही, जितके दूध पाहिजे तितके उत्पन्न करत नाही. आपल्याकडे इतक्या गायीम्हशी आहेत तरी आपली अशी अवस्था आहे. यापेक्षा अधिक मोठा मूर्खपणा कोणता हे मला कळत नाही.

हिंदूवरून. आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १६९-७४

४१. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ६, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही सुब्बालक्ष्मींचे (माधुरी शण्मुखवादिवू सुब्बूलक्ष्मी, सप्टेंबर १९१६-डिसेंबर ११, २००४, कर्नाटक संगिताच्या प्रसिद्ध गायिका.) भजन ऐकले आणि रामधूनही ऐकली. या तर इथे नवीन आहेत, संगिताच्या कार्यक्रमाला जात असतात. रामधून अशी गोष्ट आहे की ज्यात लीन व्हावे लागत असते. भजनही अशीच गोष्ट आहे. त्यांचे गाणे ऐकण्याकरिता लोक का उत्सुक असतात हे आज तुम्हाला कळले असेल. त्यांचा गळा अतिशय गोड आहे. इथे येऊन गाणे म्हणण्याची त्यांची इच्छा होती. मी त्याचे स्वागत केले.

आज मी तुमचा १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेणार नाही. काल मी तुमची २५ मिनिटे घेतली. मला त्याची लाज वाटते. मी माझे बोलणे १५ मिनिटातच संपवले पाहिजे. आज तुमचे १५ मिनीट घेण्याचाच माझा विचार आहे व त्यात जे येऊ शकणार नाही ते सोडून देईन.

काल मला एका बंधूंचे पत्र आले. मी त्यातील काही भागच वाचू शकलो. मला दुसरे एक पत्र मिळाले आहे परंतु ते मी अजून वाचू शकलेलो आहे. त्याकरिता माफी मागतो. पत्रांचा एक ढीग पडला आहे, त्यात ते कुठे तरी पडले असेल. जे पत्र मी वाचून आलो आहे त्यात लिहिले आहे की मी भोळासांब माणूस आहे. माझ्यामागे जग कसे चालते ते मला माहीत नसते आणि त्यामुळे माझी फसवणूक होऊ शकते. याचे उत्तर कसे द्यावे हेही मला माहीत नाही. मला कशा प्रकारे धोका दिला जाऊ शकतो तेही पत्रलेखक सांगतो आणि मला सावध राहण्याकरिता सांगतो. तो म्हणतो की पाहा पाकिस्तानमध्ये काय होते आहे आणि आपणही तसेच केले पाहिजे आणि त्याचा बदला घेतला पाहिजे. मी याच्याशी सहमत नाही. आपण मुसलमानांची घरे जाळू शकत नाही. ती घरे कितीही साधी असली तरी त्यांच्या मालकांना ती तितकीच प्रिय आहेत जितका एखाद्या करोडपतीला आपला प्रासाद प्रिय असतो. ते अशाच घरात राहत असतात. मुसलमान जेव्हा पाकिस्तानमध्ये जातो तेव्हा त्यालाही पीडा सहन करावी लागत असते.

पाकिस्तानमध्ये सर्व काही सोडून आलेल्या हिंदूंना आणि शिखांना ते सर्व कधी परत मिळेल व त्यांना आपल्या घरी कधी परतता येईल असे पत्रलेखक विचारतो. मी त्याला सांगेन की ते जोपर्यंत परतत नाहीत, जे मेले त्यांची गोष्ट वेगळी आहे, जोपर्यंत एकाही हिंदूला वा शिखाला त्याचे घर परत

मिळत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही. हं, जे घर जळाले आहे ते जसेच्यातसे परत बांधून द्या असे कोणतेही सरकार करू शकत नाही, तुमचे सरकारही करू शकत नाही. शासनाकडून अशी अपेक्षाही करायला नको. मी तर म्हणेन की हिंदूंनी आणि शिखांनी नमुन्यादाखल वसवलेल्या शहरात जाऊन राहावे. तितके झाले तरी पुरे आहे. लाहोरच्या हिंदूंनी आणि शिखांनी आमची घरे जशी आहेत तशीच आम्हाला परत द्या, आमची जमीन जशी आहे तशीच आम्हाला परत द्या असे पाकिस्तान सरकारला सांगितले पाहिजे. अशा प्रकारे सर्व आपापल्या घरी जाऊन राहू शकले तर माझ्याकरिता ते पुरे आहे. इतके करता येऊ शकते की ज्या मुसलमानांनी त्या घरांचा ताबा घेतला आहे तिथून त्यांना हटवले पाहिजे आणि ज्या अवस्थेत ते घर आहे त्या अवस्थेत ते परत केले पाहिजे. त्यांनी प्रासाद बांधून द्यावा असे थोडेच आहे. आता जे लोक भारतीय संघराज्यात आहेत त्यांनी सत्याचरणी व्हावे, सज्जन व्हावे. याहून वेगळे काही होऊ शकत नाही याबद्दल मला शंका नाही. आपण पाकिस्तानचे अनुकरण करायला नको. ते जरी त्यांचे नाक कापत असले तरी आपण आपले नाक कापू नये.

यापढे जाऊन मी पत्रलेखकाला सांगेन की आपण जर काही चूक केली असेल तर आपण ती दुरुस्त केली पाहिजे. प्रत्येकजण चुका करत असतो. माणसाने त्या परत परत करू नये इतकेच. माणसात जरी चांगले करण्याची क्षमता आहे तरी तो चूक करणारा प्राणी आहे. एकदा त्याने चूक दुरुस्त केली की नंतर तो केवळ चांगलेच करू शकतो. आपण जर आपल्या धर्मानुसार वागलो तर जगासमोर त्याची जाहीरात करायची आवश्यकता नसते.

काठेवाडच्या मुसलमानांचे जे नुकसान झाले त्याबद्दल मला लिहावे लागले आणि ते योग्यच आहे आणि तेथील हिंदूंना त्यांच्याबद्दल सांगणेही उचितच होते. तेथील सरकारलाही सांगणे योग्यच होते. तो आपला हक्क आहे. आपण जेव्हा पाकिस्तानच्या निर्मितीला मान्यता दिली होती तेव्हा तेथील हिंदूंची आणि शिखांची घरे जाळून टाकली जावी व त्यांना देशातून बाहेर हाकलून देण्यात यावे असे आपण असे थोडेच मान्य केले होते. जर चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त केल्या पाहिजे. तेसुद्धा असे म्हणू शकतात की आपणसुद्धा आपल्या चुका दुरुस्त केल्या पाहिजे. ते म्हणू शकतील की भारतातून हुसकावून लावण्यात आल्यामुळे ज्या मुसलमानांना पाकिस्तानमध्ये जावे लागले त्यांनासुद्धा परत घेतले पाहिजे. अशाच प्रकारे पाकिस्तामधून ज्या हिंदूंना आणि शिखांना इथे यावे लागले ते जर परत गेले तर आपणा दोघांकरिताही ही गोष्ट चांगली होईल. आपण पाक होऊ. असे झाले नाही तर जगात आपले तोंड काळे होईल. आपले तोंड नेहमीच उजळ राहिले आहे. हं, आपण गुंड असतो आणि गुंडगिरीने स्वातंत्र्य मिळवले असते तर गोष्ट वेगळी होती. बाहेरचे जग म्हणते की आपण जे स्वातंत्र्य मिळवले आहे ते सौजन्यशीलतेने मिळवले आहे. मी म्हणालो असतो तर वेगळी गोष्ट आहे, हिंदू-

मुसलमान म्हणाले असते तर वेगळी गोष्ट असती परंतु बाहेरचे जगही म्हणते की आम्ही सौजन्याने स्वातंत्र्य मिळवले आहे, सौजन्याने घेतले आहे. तर ते सौजन्यानेच टिकवले पाहिजे, गुंडगिरीने नाही. गुंडगिरीने आपण ते घालवणार आहो. अशाच प्रकारे आपण आपले आचरण ठेवले, वागणे ठेवले तर जग म्हणेल की आपण आपली चूक दुरुस्त केली आहे. मग जग पाकिस्तानचे काय करील असे तुम्ही विचारू शकाल. मी तर म्हणेन की जगाला काहीही म्हणण्याची वा सांगण्याची गरज नाही. पाकिस्तानला स्वतःलाच स्वच्छ व्हावे लागेल.

अखिल भारतीय काँग्रेसने जो ठराव मंजूर केला (पाहा परिशिष्ट अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे ठराव, ठराव क्रमांक २, विस्थापित निर्वासितांचे पुनःस्थापन, नोव्हेंबर १५, १९४७) त्यात माझा हात होता व तो मंजूर करवून घेण्याकरिता मी जबाबदार आहे. या गोष्टीची मला आठवण करून देण्यात येते आणि ते पुढे सांगतात की लोकांना तो ठराव पसंत नव्हता. पाकिस्तानमधून जे हिंदू आणि शीख आले आहेत त्यांची परतण्याची इच्छा नाही. त्यांनी भिकाऱ्याप्रमाणे जावे असे मला म्हणायचे नाही. ते पाकिस्तानमधून आले कारण ते असहाय होते हे खरे आहे. परंतु त्यांनी प्रतिष्ठापूर्वक जायला पाहिजे. पाकिस्तानच्या मुसलमानांनी त्यांना सांगितले पाहिजे की आता आम्ही सर्व मुसलमान चांगले झालो आहो व तुम्ही परत या. अशाच प्रकारे मुसलमानांना आपण सांगितले पाहिजे की आता तुम्ही परत या, तुमची घरे, तुमची जमीन जशीच्या तशी कायम आहे, ती ताब्यात घ्या. आमचे वेड निघाले आहे आणि आम्ही सभ्य गृहस्थाप्रमाणे वागत आहो. यात कोणती फसवणूक आहे? मी कोणालाही फसवत नाही. जगाने यात फसवणूक पाहू नये. आम्ही सभ्य गृहस्थाप्रमाणे वागलो तर आपला आज चांगला होईल. फसवणूक कशी असते व ती कशी करतात हे तर मला माहीत नाही. अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचा ठराव म्हणतो की विस्थापित होऊन इथे जितके हिंदू आणि शिख परत आले आहेत त्या सर्वांनी आदराने, प्रेमाने आपल्या घरी, जमिनीवर जावे. ल्यालपूरला जावे. आमचे शीख बांधव तिथे शेती करत होते. त्यांनी तर जायलाच पाहिजे असे माझे स्वप्न आहे. या स्वप्नाची परिपूर्ती पाहण्याकरिताच मी जिवंत आहे. ईश्वराला माझे हे स्वप्न पूर्ण करायचे नसेल तर त्याने मला घेऊन जावे. म्हणूनच मी दिल्लीत राहतो आहे. इथे जर मी हे करू शकणार नसेन तर अजून कुठे मी काय करू शकेन? आपण सज्जन झालो तर असे होऊ शकते याबद्दल मला मुळीच शंका नाही. पाकिस्तानींनीही म्हणावे की आम्ही चांगले झालो. त्यांनी अंतःकरणपूर्वक म्हणावे की आमची चूक झाली, आम्ही तुमच्याशी सौजन्यपूर्वक वागू, तुम्ही या. अशा प्रकारे झाले तर सर्व चांगले होऊ शकते. असे झाले तरच आपण चांगले शेजारी होऊन राहू शकतो.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १७५-८

४२. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ७, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी तुमच्याशी फार गहन विषयावर बोलू इच्छितो आणि तो संवेदनशीलसुद्धा आहे. तो वृत्तपत्रांमध्ये आलेला आहे. काल तुम्ही वृत्तपत्रांमध्ये पाहिलेच असेल की काही हिंदू स्त्रिया लाहोरला गेल्या आणि तेथील मुसलमान स्त्रियांना भेटल्या. (लाहोरमध्ये अपहृत स्त्रियांच्या पुनर्वसनाकरिता एका आंतरराज्यीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनात आलेल्या प्रतिनिधींनी पाकिस्तान आणि भारतातील लोकांना सर्व अपहृत स्त्रियांना त्याच्या घरी परत करण्याची विनंती केली. या आवाहनावर सह्या करणारांमध्ये प्रमुख होते - गजनफर अली, इफ्तखार हुसेन खॉं मामदोत वाले, बेगम लियाकत अली खॉं, बेगम शाहनवाझ, बेगम बशीर अहमद, इफ्तिखारुद्दिन, के. सी. नियोगी, स्वर्णसिंह, रामेश्वरी नेहरू, मृदुला साराभाई आणि कमलादेवी चटोपाध्याय.) पाकिस्तानमध्ये मुसलमानांनी अपहरण केलेल्या स्त्रियांचे आणि पूर्व पंजाबमध्ये हिंदू आणि शिखांनी अपहरण केलेल्या मुसलमान स्त्रियाचे काय करावे या प्रश्नाची त्यांनी चर्चा केली. फार मोठ्या संख्येत मुसलमानांनी भारत सोडला आहे आणि अजूनही काही सोडण्याच्या बेतात आहेत. यापुढे एकाही मुसलमानाला भारत सोडण्याकरिता बाध्य केले जाणार नाही असा आपण निर्धार केला पाहिजे. परंतु स्वतःहोऊन जाण्याची कोणाचीच इच्छा नसते. आपले घरदार सोडून कोणी का जावे? तिथे पाकिस्तानमध्ये त्यांच्याकरिता घरदार तयार आहे अशी तर काही गोष्ट नाही. त्यांनी स्वतःहोऊन तिथे जायचे ठरवले असेल वा नोकरी करणारे जात असतील तर गोष्ट वेगळी. परंतु असे फार कमी आहेत. इतरांनी तिथे जाण्याचे काय कारण? तिथे पाकिस्तानमध्ये काम त्यांची वाट पाहत आहे अशी तर काही गोष्ट नाही. भारतातील त्यांच्या व्यवसायावर प्रतिकुल परिणाम होत नसेल तर ते कशाला जातील?

हे तर झाले, परंतु स्त्रियांचे काय? ही समस्या क्लिष्ट आहे. काही म्हणतात की हिंदूंनी आणि शिखांनी काही १२,००० स्त्रियांचे अपहरण केले आहे व त्यापेक्षा दुप्पट स्त्रियांचे पाकिस्तानमधील मुसलमानांनी अपहरण केले आहे. इतर काहींचे म्हणणे आहे की हा अंदाज अगदीच कमी आहे, वास्तवात ही संख्या बरीच जास्त आहे. मी म्हणेन की १२,००० ही संख्या काही कमी नाही. माझ्या दृष्टीने एक हजार कमी नाही आणि एकही कमी नाही. असे का व्हावे? कोणी एखाद्या स्त्रीला का उचलून न्यावे? कोणी मुसलमान स्त्री आहे तिला हिंदूंनी वा शिखांनी उचलून न्यावे वा हिंदू वा शीख स्त्रीला मुसलमानांनी उचलून न्यावे असे का व्हावे? हा तर फार मोठा अत्याचार आहे. काही लोक म्हणतात

की १२,००० स्त्रियांचे अपहरण करण्यात आले असे जे सांगण्यात येते ती कमीतकमी संख्या आहे. मी तर कमीत कमी संख्या घेऊ इच्छितो, परंतु माझ्याकरिता ही संख्या फार मोठी आहे. बारा हजार हिंदू स्त्रियांना मुसलमान उचलून घेऊन गेले आणि बारा हजार मुसलमान स्त्रियांना हिंदू आणि शीख उचलून घेऊन गेले. त्यांना कसे परत आणायचे हा कठीण प्रश्न आहे. या प्रश्नावरील उपाय शोधण्याकरिता या भगिनी गेल्या होत्या. मुसलमान भगिनी होत्या. त्या सर्वांनी विचार केला. जितक्या काही हिंदू आणि शीख भगिनींना उचलून घेऊन गेले आहेत त्यांना परत आणले पाहिजे म्हणून या भगिनी गेल्या होत्या. अशाच प्रकारे जितक्या मुसलमान भगिनी आहेत त्याही त्यांच्या घरी पोहोचल्या पाहिजे. असे नाही की त्यांनी येऊन घेऊन जावे. आपणच पोहोचवून दिले पाहिजे. त्या तिथे गझनफर अली (पाकिस्तानमध्ये मदत आणि पुनर्वसन खात्याचे मंत्री; अपहरण करण्यात आलेल्या स्त्रिया आणि मुले यांना परत त्यांच्या घरी पोहोचवण्याकरिता भारत आणि पाकिस्तान या उपनिवेशांची संयुक्त समिती गठित करावी असे त्यांनी या परिषदेत सुचवले होते.) यांना व एका पोलीस अधिकाऱ्यालाही त्या भेटल्या, परंतु त्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव मी विसरलो. मृदुलाबेन (अंबालाल साराभाई यांची मुलगी; उपाध्यक्ष कस्तुरबा गांधी स्मृती राष्ट्रीय न्यास) आणि रामेश्वरीबेन (रामेश्वरी नेहरू; उपध्यक्ष हरिजन सेवक संघाच्या केंद्रीय समिती; अध्यक्ष, मदत आणि पुनर्वसन खाते, स्त्रीविभाग) या दोघीही लाहोरला गेल्या होत्या आणि या दोघींनीही मला स्वतंत्र अहवाल दिले व अपहृत स्त्रियांना त्यांच्या मूळ घरी परत कसे पोहोचवता येईल यासंबंधी त्यांनी चर्चा केली असल्याचेही त्यांनी मला सांगितले. या स्त्रियांच्या संरक्षणाकरिता पोलिसांना वा सैन्यातील लोकांना पाठवावे लागले तर त्याला काहीही अर्थ नाही. काही हिंदू आणि शीख स्त्री कार्यकर्त्या पूर्व पंजाबमधील पोलिसांबरोबर पाकिस्तानमध्ये जाऊन त्या अपहृत स्त्रियांना सोबत घेऊन अर्थातच येऊ शकतात. परंतु दोनपैकी एकाही ठिकाणी असे झालेले नाही. असे म्हणतात की अपहृत हिंदू आणि शीख स्त्रियांनी इस्लामचा स्वीकार केला आहे व त्यांची परतण्याची इच्छा नाही. हीच गोष्ट भारतातील मुसलमान स्त्रियांचीही आहे.

आपले वर्तन रानटीपणाचे झाले आहे. ही गोष्ट पूर्व पंजाबमधील लोकांकरिता जितकी खरी आहे तितकीच पश्चिम पंजाबमधील लोकांकरिताही खरी आहे. यापैकी कोण अधिक रानटी आहे असे विचारण्यात काहीही अर्थ नाही. रानटीपणाचे मोजमाप नसते. राजा गझनफर अली म्हणतात की दोन्ही पक्षांनी अत्याचारी वर्तन केले होते. कोण अधिक अपराधी आहे हे विचारण्यात अर्थ नाही. सामूहिक स्तरावर अत्याचार झाले आणि पहिले पाऊल कोणी टाकले हे विचारून कय उपयोग? अपहृत स्त्रियांना मदतीची गरज आहे. त्यांचा छळ करण्यात आला आहे. त्यांना परत आपल्या घरी पोहोचवले पाहिजे. पोलीस हे करू शकत नाही हा माझा विश्वास आहे. सैन्य हे करू शकत नाही. काही भगिनींना पूर्व पंजाबमध्ये पाठवा आणि काही भगिनींना पश्चिम पंजाबमध्ये पाठवा. मग काम होऊ शकते, नाही तर

नाही होऊ शकत असे काही नाही. एक अनुभवी माणूस म्हणून मी सांगतो की ही पद्धत नाही. हा गुंता सरकारने सोडवायचा आहे. मला असे म्हणायचे नाही की या अपहरणामागे सरकार होते. पूर्व पंजाब सरकारने काही या अपहरणाचे आयोजन केले नव्हते. पूर्व पंजाबमध्ये हिंदू आणि शीख या अपहरणांकरिता जबाबदार होते आणि पश्चिम पंजाबमध्ये मुसलमान जबाबदार होते. अजून आपण कोणती चौकशी करणार आहो? अपहृत स्त्रियांची जी काही संख्या असेल - मी ती कमीतकमी बारा हजार समजतो - पूर्व पंजाब आणि पश्चिम पंजाबच्या लोकांनी त्या सर्वांना परत केले पाहिजे.

असे म्हणतात की आता अपहृत स्त्रियांना त्यांच्या घरातील लोक परत घ्यायला तयार नाहीत. जे लोक आपल्या अपहृत बायकोला वा मुलीला आता आम्ही परत घेणार नाही असे म्हणत असतील ते रानटी आहेत असे म्हणावे लागेल. अपहृत स्त्रियांनी काही चूक केली असे मला वाटत नाही. त्यांच्यावर हिंसक अत्याचार करण्यात आले होते. त्यांना दोष देणे, कलंकित समजणे आणि आता त्या घरात वा समाजात घेण्याच्या पात्रतेच्या नाहीत असे म्हणणे अन्याय आहे. कमीतकमी मुसलमानांमध्ये असे होत नाही. कमीतकमी इस्लाम याबाबतीत उदार आहे. यामुळे ही गोष्ट सरकारने आपल्या हातात घेतली पाहिजे. या सर्व स्त्रियांचा शोध सरकारने घेतला पाहिजे. त्यांचा शोध घेऊन त्यांना आपापल्या घरी पुनःस्थापित केले पाहिजे. पोलीस आणि स्त्री सामाजिक कार्यकर्त्या यावर प्रभावी उपाययोजना करू शकत नाही. ही समस्या किचकट आहे याचा अर्थ जनमत या बाजूने नाही. बारा हजारच्या बार हजार स्त्रियांचे गुंडांनी अपहरण केले होते असे तुम्ही म्हणू शकत नाही. चांगले लोकच गुंड झाले होते. कोणाचाही जन्म गुंड म्हणून झालेला नसतो, काही विशिष्ट परिस्थितीत ते तसे बनतात. दोन्ही सरकारांनी याबाबतीत दुबळेपणा दाखवला. अपहृत स्त्रियांचा शोध घेण्याचा एकाही सरकारने प्रयत्न केलेला नाही. अपहृत स्त्रियांना परत आणण्याकरिता दोन्ही सरकारांनी आपल्या अधिकाराचा उपयोग केला नाही. दोन्ही सरकारांनी आपल्या अधिकाराचा उपयोग केला असता तर पूर्व पंजाब आणि पश्चिम पंजाबमध्ये जे घडले ते घडले नसते. परंतु आपल्या स्वातंत्र्याचा जन्म केवळ तीन महिन्यांपूर्वी झाला आहे. अजून ते बाल्यावस्थेत आहे.

माझ्या दृष्टिकोनातून हे विष पसरवण्याकरिता पाकिस्तान जबाबदार आहे. परंतु जबाबदार धरल्यामुळे काय लाभ होणार आहे? या अपहृत भगिनींना वाचवण्याचा एकच मार्ग आहे, तो मार्ग म्हणजे शासनाने आता तरी जागे व्हावे, आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवावी, या कामाला सर्वाधिक प्राधान्य देऊन सर्व वेळ द्यावा व या कामाकरिता मरण्याचीसुद्धा तयारी ठेवावी. असे केले तरच या स्त्रियांना वाचवता येऊ शकते. असे न करता कितीही भगिनींना पूर्व पंजाब वा पश्चिम पंजाबमध्ये पाठवा

काहीही होणार नाही. या बाबतीत सरकारला जर मदतीची गरज असेल तर अर्थातच आपण मदत करू शकतो.

मी काल सांगितल्याप्रमाणे मी पंधरा मिनिटांपेक्षा जास्त बोलायला नको. यामुळे मी इथे संपवतो. दोन वा तीन गोष्टी अजून राहिलेल्या आहेत व अजूनही दोन वा तीन मिनिट राहले आहेत. परंतु मी त्यांचा उपयोग करणार नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १७८-८२

४३. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ८, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांचे लेखी भाषण सभेत वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

मौनवार, डिसेंबर ८, १९४७

एका मुस्लिम सोसायटीने मला सुचीत करत लिहिले आहे की हिंदू आणि मुसलमानांच्या गोष्टी ऐकून मी वादात पडू नये. आधी चौकशी करून नंतरच मला जे काही करायचे असेल ते मी करावे. यापुढे जाऊन सोसायटीचा मला सल्ला आहे की काठेवाडमध्ये मी स्वतः जाऊनच सर्व काही पाहिले पाहिजे. मी सांगितले आहे की आज मी हे करू शकत नाही. दिल्ली आणि आजूबाजूच्या भागातच मी माझ्या धर्माचे पालन केले पाहिजे. हे सल्लागार विसरतात की माझ्या गोडीगोडीच्या पद्धतीनेच आवश्यक होते तितक्या प्रमाणात मी आरोप मागे घ्यायला लावले आहेत. माणूस जेव्हा सत्याकरिता सत्याचा शोध घेतो तेव्हा परिणाम नेहमीच चांगले होत असतात. याकरिता वारंवार प्रयत्न करण्यात आले आहेत. अशा बाबतीत धीर आणि चिकाटीला सर्वाधिक महत्त्व असते.

सिंधमधून मला पत्र येणे सुरूच आहे. कराचीत एक बंधू आहेत. त्यांचे दुःखद पत्र आले आहे. ते म्हणतात की "इथे खून तर होत नाहीत परंतु हिंदू आणि शीख इथे सन्मानाने व प्रतिष्ठापूर्वक जगू शकत नाहीत. भारतातून तिथे गेलेले मुसलमान हिंदूंच्या घरांत शिरू शकतात आणि आम्ही इथेच राहू असे म्हणतात. त्यांना तसा अधिकार नाही, परंतु आम्ही त्यांच्यासमोर बोलण्याचे साहस करू शकत नाही. अशा प्रकारच्या किती तरी घटना घडल्या आहेत. असे वाटते की काही महिन्यांपूर्वीची कराची स्वप्नात पाहिलेली गोष्ट असावी". त्यांच्या लांबलचक पत्राचा हा सारांश आहे. पत्रात जे लिहिलेले आहे ते विश्वसनीय असावे असे मला वाटते. याचा अर्थ तिथे संपूर्ण अराजक पसरले आहे. ही तर रक्त शोषून माणसाला मारण्याची गोष्ट झाली. त्याचबरोबर यात आत्म्याचेही हनन होते. पाकिस्तानने या अराजकाला आळा घालावा अशी माझी विनंती आहे. हा रोग आहे आणि हे अराजक जितक्या लवकर संपेल तितके बरे होईल.

साखरेवरील नियंत्रण उठले आहे. धान्य, डाळी आणि कापड यांच्यावरील नियंत्रणही लवकरच उठेल. नियंत्रण काढून घेण्याचा हेतू एकदम किंमती उतराव्या असा नाही. जीवन स्वाभाविक व्हावे हा त्यामागील हेतू आहे. वरून लादलेले निर्णय नेहमीच वाईट असतात. आपल्या देशात विशेषत्वाने असे आहे कारण आपला देश १९०० मैल लांब व १५०० मैल रुंद असा विशाल देश आहे व त्यात प्रचंड लोकसंख्या राहते. इथे देशाची फाळणी समोर ठेवण्याची आवश्यकता नाही. आम्ही सैनिकी राष्ट्र नाही.

आपण आपले अन्नधान्य निर्माण करत होतो आणि कोणत्याही परिस्थितीत निर्माण करू शकतो. आपल्या गरजेपुरते कापडही आपण निर्माण करू शकतो. नियंत्रण उठल्यानंतर लोकांना मोकळेपणाने श्वास घेता येईल व त्यांना चुका करण्याचाही अधिकार राहील. चुका करत करत आणि त्या दुरुस्त करत करत पुढे जाणे हाच पूर्वापार चालत आलेला प्रगतीचा मार्ग आहे. तुम्ही जर मुलाला रुईमध्ये गुंडाळून ठेवाल तर ते गुदमरेल वा मरून जाईल. त्याचा सुदृढ माणसात विकास व्हायचा असेल तर तुम्हाला त्याला प्रत्येक प्रकारच्या अडचणींना तोंड देणे शिकवावे लागेल. याचप्रमाणे शासनाला शासन म्हणून राहायचे असेल तर तुटवड्याच्या परिस्थितीला कसे तोंड द्यावे हे त्याने जनतेला शिकवले पाहिजे. सामूहिक प्रयत्नाने कठीण काळातूनही मार्ग काढणे त्यांनी शिकायला पाहिजे. जगण्याकरिता धडपड न करता कसे तरी करून जनतेला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणे ही काही चांगली गोष्ट नाही.

अशा प्रकारे पाहिले असता निर्नियंत्रणाचा अर्थ होतो सरकारमधील काही लोकांनीच नाही तर संपूर्ण जनतेने दूरदृष्टीचे होणे. ही गोष्ट जनतेने शिकायला पाहिजे. जनतेबद्दलच्या आपल्या कर्तव्याची परिपूर्ती करण्याकरिता शासनाला नवीन जबाबदारी उचलावी लागेल. गाड्यांची व्यवस्था सुधारावी लागेल, उत्पादन वाढवण्याच्या पद्धती लोकांना सांगाव्या लागतील. याकरिता अन्नधान्य विभागाला मोठ्या जमीनदारांऐवजी लहानलहान शेतकऱ्यांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. शासनाला एकीकडे सर्व लोकांवर विश्वास ठेवावा लागेल तर दुसरीकडे त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवून लहानलहान शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष द्यावे लागेल. आजपर्यंत त्यांच्या हिताकडे लक्ष देण्यात आले नाही परंतु करोडो लोकांमध्ये बहुसंख्य लोक हेच आहेत. आपल्या पिकाचा उपयोग स्वतः शेतकरीच करत असतो. पिकाचा लहानसा भाग तो विकतो आणि त्याने तो आपल्या गरजेच्या इतर वस्तू विकत घेतो. नियंत्रणामुळे शेतकऱ्याला बाजारात कमी किंमत मिळते. यामुळे नियंत्रण काढल्यानंतर शेतकऱ्यांना जितके जास्त पैसे मिळतील तितक्या प्रमाणात अन्नधान्याची किंमत वाढेल. ग्राहकाची याबद्दल तक्रार असू नये. या नवीन व्यवस्थेमुळे जो नफा होईल तो सर्वच्यासर्व शेतकऱ्याच्या खिशात जाईल हे शासनाने पाहिजे. जनतेला ही गोष्ट दररोज वा दर आठवड्याला समजावून सांगितली पाहिजे. मोठमोठ्या गिरणी मालकांनी आणि मध्यस्थांनी याबाबतीत शासनाशी सहकार्य केले पाहिजे व शासनाच्या निदेशानुसार काम केले पाहिजे.

मला असे वाटते की आज असे होत आहे. या काही लोकांमध्ये आणि संघटनांमध्ये सहकार्य असले पाहिजे. आतापर्यंत त्यांनी गरिबांचे शोषण केले आहे. त्यांच्यामध्ये जी स्पर्धा सुरू आहे ती थांबवली पाहिजे. विशेषतः अन्नधान्य आणि कापड यांच्या व्यापारात पैसे कमावण्याचा हेतू नसावा.

निर्नियंत्रणामुळे व्यापारी जर भरघोस नफा घेणार असतील तर निर्नियंत्रणाचा हेतू विफल होईल. भाडवलदार आणि व्यापारी संपूर्ण सहकार्य करतील अशी आपण आशा करू या.

सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १८२-८३

४४. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ९, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ९, १९४७

आज मी चरखा संघाच्या सभेला हजर राहिलो आणि स्वाभाविकपणे मला तेथील स्त्रियांशी अर्धा तास बोलावे लागले. मला जर वेळ मिळाला - कारण मला १५ मिनिटात भाषण संपवायचे असते - तर त्यासंबंधी मी तुम्हाला आज सांगेन. नाही तर उद्या सांगेन.

वृत्तपत्रांमध्ये तुम्ही पाहिलेच असेल की सरदार पटेल आणि मी पिलाणीला जात आहो. का? हवामानबदलाकरिता? ती केवळ अफवा आहे. सरदारांच्या मनात काय आहे ते मला माहीत नाही परंतु मला हे निश्चित माहीत आहे की हवामानबदलाची ही वेळ नाही. सरदार दिवसभर काम करतात आणि रात्री विश्रांती घेतात, त्यांच्याकरिता हाच हवामानबदल आहे. हीच गोष्ट मलाही लागू आहे. हे खरे आहे की मला इतके आंगभर काम नाही कारण मला सरकार चालवावे लागत नाही. परंतु मला अनेक लोक भेटायला येतात आणि मी थकून जातो. यामुळे मला स्वतःला विश्रांती द्यावी लागते. सध्या दिल्लीतील हवामान अनुकूल आहे व त्यामुळे हवामानबदलाकरिता बाहेर जाण्याचे कारण नाही. पिलाणी काय देऊ शकते? माझा जोपर्यंत संबंध आहे मी करा वा मराची शपथ घेतलेली आहे. अजून माझी ती शपथ पूर्ण झालेली नाही. वर्तमानपत्रे अशा अफवा का छापतात हे मला कळत नाही. यावरून मी इतकाच निष्कर्ष काढू शकतो की वृत्तपत्रात येणारा बराचसा भाग सत्यावर आधारित नसतो. नंतर मला कळले की - वृत्तपत्रांद्वारे नाही - आम्ही तिथे जाणार असल्यामुळे आम्हाला साखर, गहू आणि इतर साहित्य किती लागेल यासंबंधीचे जयपूरहून निदेश देण्यात आले होते. जरी केवळ आम्हा दोन माणसांकरिता व्यवस्था करायची होती तरी तेवढ्याने बाजारात तुटवडा निर्माण झाल्याचे दिसते. अर्थातच ही सगळी वदंता होती. हे जर खरे असेल तर आमच्या हालचालीने बाजारात खळबळ माजावी ही धक्कादायक बाब होती. आम्ही केवळ खाण्याकरिता जगतो वा आमच्यामागे प्रचंड ताफा असतो असाच याचा अर्थ होतो. असे होऊ नये. सरदार गरीब माणूस आहे आणि मीसुद्धा. हे खरे आहे की ते प्रासादतुल्य घरात राहतात; आणि मीसुद्धा तशात घरात राहतो. खरे म्हणजे आम्ही मातीच्या झोपडीत राहावे हीच माझ्याकरिता आणि त्यांच्याकरिता उत्तम गोष्ट आहे. असो, तर अफवा कशा पसरतात हे मला तुम्हाला सांगायचे होते. अखेरीस मी इथे उपलब्ध आहे. मी पिलाणीला जात आहे काय हे ते मला विचारू शकले असते. या बाबतीतत मला असोसिएटेड प्रेसची तारही आली आणि त्यामुळे तर मी अजूनच दुखावलो. सरदार सतत कामात असतात परंतु आम्ही जात आहो काय असे ते मला विचारू शकले असते.

सिंधमधील एका मित्राचे मला पत्र आले आहे. त्याने आपले नाव दिले आहे, परंतु मी त्यांचे नाव उघड करणार नाही. मी असे केले तर त्यांना काही वाटणार नाही हे मला माहीत आहे. सिंधमधील हरिजनांना भोगाव्या लागणाऱ्या त्रासासंबंधी एका डॉक्टरचे जे पत्र आले होते त्यासंबंधी मी तुम्हाला सांगितलेच आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ३, १९४७) त्या डॉक्टरला अटक झाली. त्या डॉक्टरने मला लिहिले म्हणून अटक झाली की इतर कोणत्या कारणाने हे मला माहीत नाही. हरिजनांची सेवा करणाऱ्या अनेकांना अटक झाली आहे. सिंधमध्ये हे असे घडत आहे. मला मान्य आहे की लोकांचा खून होत नाही, परंतु मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे कालची गोष्ट खुनापेक्षाही वाईट आहे. तुम्ही जेव्हा एखाद्याचा खून करता तेव्हा तो मरतो आणि लोक त्या तथ्याशी जुळवून घेतात. परंतु लोकांचा छळ करणे आणि कणाकणाने त्यांना मारणे ही गोष्ट खुनापेक्षाही वाईट आहे. एका माणसाला अटक करण्यात आली होती आणि नंतर सोडण्यात आले होते - शक्य आहे की ते इतरांनाही सोडतील. परंतु अशा प्रकारे लोकांना अटक करणे वाईट आहे. पाकिस्तान सरकारवर दोषारोपण करण्याची माझी इच्छा नाही, परंतु मी त्यांना सूचीत करू इच्छितो की हरिजन कार्यकर्त्यांना जर ते अशा प्रकारे अटक करत राहतील तर त्या कार्यकर्त्यांना सिंधमध्ये राहणे अशक्य़ होईल. हीच गोष्ट हरिजनांकरिताही खरी आहे. अशा प्रकारच्या गोष्टी ब्रिटिशांच्या काळात सतत घडत असत. आजही आपण असेच सुरू ठेवले पाहिजे काय?

अजून माझ्याकरिता काही मिनीट आहेत. यामुळे मी तुम्हाला दुसऱ्या विषयासंबंधी म्हणजे स्त्रियांसबंधी सांगेन. कस्तुरबा विश्वस्त संस्था स्थापन करण्यात आली कारण भारतात सात लाख खेडी आहेत व तिथे राहणाऱ्या स्त्री-पुरुषांची सेवा करणे आवश्यक आहे. परंतु आज आपल्याला याहून मोठे विषय भेडसावत आहेत. मुसलमानांनी मोठ्या संख्येत हिंदू आणि शीख स्त्रियांचे अपहरण केले आहे आणि तितक्याच मोठ्या संख्येत हिंदूंनी आणि शिखांनी मुसलमान स्त्रियांचे अपहरण केले आहे. कोणत्या समाजाच्या लोकांनी जास्त स्त्रियांचे अपहरण केले आहे हा विषय बाजूला ठेवा. ते काहीही असले तरी प्रत्येक सरकारच्या अंतर्गत बारा हजारपेक्षा कमी स्त्रियांचे अपहरण झालेले नाही. अशा परिस्थितीत कस्तुरबा विश्वस्त संस्थेने काय केले पाहिजे? मला जे काही करता येणे शक्य आहे ते मी करीन. एक गोष्ट स्पष्ट आहे की आपली स्वतःची जाहीरात करण्याकरिता आपण हे काम करू शकत नाही. जनसेवक असलेल्या लोकांनी सेवेचे काम केले पाहिजे. एकदा काम संपले की संपले. वृत्तपत्रांमध्ये ती बाब आली की नाही याला काहीही महत्त्व नसते. याशिवाय स्त्रियांकरिता आपल्याला ज्या अनेक गोष्टी करायच्या आहेत त्यांचा विचार करावा लागतो. मी काही गोष्टी सुचवू शकतो. आपल्यामधील पुष्कळशा स्त्री कार्यकर्त्या शहरातील आहेत. त्यातील काही खेड्यांमधील असूही शकतील परंतु त्यांचाही शहरांशी संबंध असतो. मला असे म्हणायचे नाही की ही गोष्ट वाईट आहे वा

शहराशी कोणत्याही प्रकारचा संबंध असणे चूक आहे. परंतु गत १५० वर्षांचा इतिहास पाहता खेड्यांमधील संपत्तीचे शोषण करण्याकडे शहरांचा कल राहिला आहे. ते खेड्यातून कच्चा माल घेतात, परदेशांशी त्यांचा व्यापार करतात व करोडो रुपये कमावतात. हा पैसा खेड्यात जात नाही वा गेलाच तर त्यातील अगदी अल्पांश जातो. त्यातील बहुतेक पैसा कोट्याधीशांकडे वा गिरणीमालकांकडे जातो. शहरे खेड्यांच्या शोषणाकरिता अस्तित्वात आहेत. यामुळे खेड्यांच्या चौकटीत शहरांची संस्कृती नीट बसत नाही. शहरातील स्त्री कार्यकर्तीने खेड्यात शहराचे वातावरण आणि शहरी मार्ग नेऊ नये. तिच्याजवळ भरपूर पैसा आणि विलासाची किती तरी साधने असू शकतील. तिच्याजवळ मोटारगाडी, सौंदर्य प्रसाधने, रेशमी पोषाख, स्वदेशी वा विदेशी टूथपेस्ट, टूथब्रश, नाजूक जोडे आणि चपला अशा किती तरी गोष्टी असू शकतील. या सर्व गोष्टी घेऊन जर ती खेड्यात जाईल तर ती खेड्यांची सेवा कशी करू शकेल? आपल्याकरिता या आदर्श गोष्टी आहेत असे ग्रामिणांना वाटले तर या गोष्टी ग्रामिणांना खाऊन टाकतील. शहरांचे अस्तित्व खेड्यांची समृद्धी वाढवण्याकरिता असले पाहिजे, ग्रामीण भागातील संस्कृतीच्या विकासाकरिता पैसा उपलब्ध करून देण्याकरिता असले पाहिजे. परंतु आज जे काही घडते आहे ते अगदी याविरुद्ध आहे. मी तुम्हाला सर्व गोष्टी स्पष्ट करून सांगू शकत नाही. परंतु इतके सांगतो की ज्या भगिनींना खरी सेवा करायची असेल, शोषण करायचे नसेल, त्यांनी विवेकबुद्धी ठेवली पाहिजे. आणि विवेक ठेवून ज्या गोष्टी खेड्यात जाऊ शकतात केवळ त्याच गोष्टी खेड्यात नेल्या पाहिजे. ज्या सुधारणा करायच्या असतील त्याही गावांच्या साच्यात राहून केल्या पाहिजे. असे केले तरच आपली जी सात लाख खेडी आज अवनतावस्थेत आहेत त्यांचा उद्धार होऊ शकेल. असे काही नाही की खेड्यात जंगली लोक राहतात, तिथे कला नाही, तेथील जीवनात कोणतीच चांगली गोष्ट नाही. ग्रामीण जीवनात किती तरी सौंदर्य भरलेले आहे असे माझे मत आहे. तिथे किती तरी कला भरलेली आहे, किती तरी उद्योग आहेत. सर्व जगाला त्यांची माहिती आहे. येथील उद्योगाचे उदाहरण म्हणूनच पश्चिमेत गेले. तर आज मी इतकेच सागू इच्छितो की ज्या भगिनींना सेवा करायची आहे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की शहरातील गोष्टी शहरातच ठेवून दिल्या पाहिजे. असे केले तरच कोट्यवधी भगिनींना आणि मुलांना त्या मदत करू शकतील. इतके तर आम्ही करूच शकतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १८५-८

४५. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १०, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी तुम्हाला सांगितले होते की मी अखिल भारतीय चरखा संघाच्या सभेकरिता गेलो होतो व तेथील स्त्रियांशी काही वेळ बोललो होतो. आजही मला तालिमी संघाच्या सभेला जायचे आहे. हेही शक्य आहे की आज कदाचित मी त्या सभेकरिता जाणार नाही. आज मी चरखा संघाच्या सभेविषयी सांगायला पाहिजे. चरखा संघ काय आहे हे तुम्हाला माहीत आहे. त्यात खादी आणि पर्यायाने चरख्याशी संबंधित कार्य होते. आधी कापसातून सरकी काढावी लागते, त्याची धुनाई करावी लागते, रुईचे पेळू तयार करावे लागतात मग सूतकताई आणि विणाई या गोष्टी येतात. भारतातील करोडो लोक जर हे काम करू लागतील - हे काम सोपे आहे, आपण ते मुलांनासुद्ध शिकवू शकतो - तर कापडावर होणारा सर्व खर्च वाचू शकेल. अशा प्रकारे खेड्यांमध्ये जर कापड तयार करण्यात आले तर ते जवळपास फुकट होते. आणि कापसाचे पीक जर खेड्यात घेण्यात आले तर ही बचत दुप्पट होते कारण कापडावर आपल्याला काहीही खर्च करावा लागणार नाही व हस्तोद्योगाचा लाभ मिळून आपली समृद्धीही वाढू शकते. यामुळे आपण जर मूर्खपणाने वागलो नाही तर आपल्या देशात कापडाची तूट निर्माण होण्याचे कारण नाही असे मला वाटते. भारतात एकही कापडगिरणी राहिली नाही तरी कापडाची तूट होणार नाही. आज आपल्याला गिरण्यांच्या तोंडाकडे पाहावे लागते. आपण चरखा आणि खादी यांना विसरलो आहो. लोक निश्चितच खादी टोपी घालतात कारण त्यांना तिची सवय झाली आहे. तिच्या मदतीने आपण स्वातंत्र्याचा लढा लढलो होतो,. परंतु आज तिच्यात तो जिवंतपणा नाही. आपल्या जीवनात खादीला ते जिवंत स्थान नाही. चरखा संघ अनेक वर्षांपासून काम करत आहे. त्याने कोट्यवधी रुपये वाटले आहेत. आणि तरीही आपण जिथे होतो तिथेच आहो. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. चरखा आपल्याला अहिंसा शिकवतो. प्रत्येकाने चरखा घेतला तर गावातील लोकांची संपन्नता वाढेल आणि गावात आज जे निराशाजनक चित्र दिसते ते दिसणार नाही. चरखा आणि खादीमुळे कापडाची तूट कशी भरून निघू शकेल व गिरणी कापड विकत घेण्याची गरज न राहिल्यामुळे रोख जरी नाही तरी बचतीच्या स्वरूपात गावखेड्यातील लोकांना करोडो रुपये कसे देता येतील हे या सभेतील चर्चेच्या दरम्यान दाखवण्यात आले. खादी तयार करण्याकरिता आपल्याला कापूस विकत घ्यावा लागेल असे कदाचित सांगितले जाईल. परंतु कापसाची किंमत फार अल्प असेल. आज जितका कापूस निर्माण होतो तितक्याचा जर आपण उपयोग केला तर तितके पुरेसे असेल. परंतु

सरकार गिरण्यांना सर्व सोयीसवलती देते. त्यांना शेतकऱ्यांपेक्षा भांडवलदारांची जास्त फिकीर आहे. हे दुर्दैवी सत्य आहे. मी भांडवलदारांच्या विरोधात नाही. मी स्वतः भांडवलदाराच्या घरात राहतो आहे. परंतु भाडवलदारांनी धारण केलेल्या वृत्तीची मला माहिती आहे. आम्ही गरिबांकरिता सर्व काही करत आहो असे सरकार म्हणू शकेल. परंतु ब्रिटिशसुद्धा असेच म्हणत होते. परंतु गरिबांच्या हिताचा विचार केला जात नाही हेच सत्य आहे. सरकारने ही गोष्ट नम्रपणे मान्य केली पाहिजे. गरिबांना मदत केली पाहिजे असे म्हणणे सोपे आहे. मंत्र्यांनी खेड्यात राहायला जाण्याचा निर्णय घ्यावा. ते जर खरे समाजवादी असतील - आणि माझे चालले तर मी त्यांना तसे व्हायला लावीन - ते जर गरिबांचे, केवळ कामगारांचेच नाही तर किती तरी जास्त गरीब असलेल्या शेतकऱ्यांचे खरे सेवक असतील, जर त्यांना जनतेचा उद्धार करायचा असेल तर तुम्ही केवळ खादी वापरा असे मी त्यांना सांगेन. आपल्याला लागणारी खादी आपल्या स्वतःच्या घरी निर्माण करण्याला मनाई करील असे काहीही नाही. ते काय करत आहेत हे मी लोकांना सांगेन. मी जेव्हापासून इथे आलो तेव्हापासून मी हे लोकांना सांगतो आहे परंतु मी काहीही साध्य करू शकलो नाही. खेड्यांकरिता कोट्यवधी रुपये गोळा करण्याशिवाय मी अधिक काहीही करू शकलो नाही. परंतु प्रत्येक घरात चरख्याचे संगीत ऐकू यावे आणि खादीशिवाय कोणतेच कापड दिसू नये अशी माझी इच्छा आहे. असे जर झाले तर आज गावांमध्ये जी गरिबी दिसते ती दिसेनाशी होईल. असे अजून घडले नाही हे आपले दुर्दैव आहे.

इतर बाबतीतही सर्व काही ठीक सुरू आहे, काही गडबड नाही असे आपण म्हणू शकत नाही.“इथे काही मुसलमान राहिलेले आहेत, त्यांनाही राहू देणार नाही. ज्या मशिदी शिल्लक आहेत त्या ताब्यात घेऊ आणि त्यांच्यात हिंदू राहतील.” अशी भाषणे सुरू आहेत. मी वक्त्याचे नाव घेणार नाही, कारण सगळी नावे अजून आलेली नाहीत पण हिंदू मुसलमानांसंबंधी अशी व्याख्याने सुरू आहेत म्हणून मी ऐकतो. मग हे काय करतील हे केवळ देवालाच माहीत, मला माहीत नाही. जर मशिदीत हिंदू राहू लागतील तर मग तो हिंदू धर्माचा अंत होईल. इतके दिल्लीकरिता पुरे.

आता अजमेरचीही गोष्ट निदर्शनास आली. अजमेरमध्येही असेच होत आहे. तिथे तर मी अनेकदा गेलो आहे. तिथे मुसलमान राहतात, हिंदू राहतात. तिथे फार मोठा मुसलमानांचा दर्गा आहे (हजरत मोइनुद्दिन चिश्ती यांचा). तिथे हिंदूही जातात आणि तिथे जाऊन हिंदू नवसही बोलतात. अशाच प्रकारे मुसलमानही जातात. मग सर्व एक झाले. असे चालत असते. धर्माने नाही, कर्माने. हिंदू-मुसलमानांचे तिथे कधीच भांडण झाले नाही अशी गोष्ट नाही. होत असते परंतु आज जास्तच झाले आहे. वर्तमानपत्रात असे काहीसे आले आहे आणि त्यावरून कळते की तिथे अनेक मुसलमान मारले गेले आहेत. आधी तर ते घाबरले आणि घाबरून पळून गेले. मग दंगल झाली. असे ऐकतो की

आजूबाजूच्या खेड्यापाड्यातही असेच होत आहे. संपूर्ण बातमी मिळेल तेव्हा सर्व काही सांगेन. इतके तर सांगेनच की ही लाजिरवाणी गोष्ट आहे. ईश्वराला आपण प्रार्थना करू या आणि त्याला विनंती करू या की असे काही न करण्याची त्याने आम्हाला सद्बुद्धी द्यावी. आपले इतके अधःपतन होऊ नये की त्यामुळे हिंदू धर्माचाच नाश व्हावा. मुसलमानांचा नाश करण्याच्या निमित्ताने हिंदू धर्माचाच नाश व्हावा ही तर काही चांगली गोष्ट नाही. आपल्याला जर जिवंत राहायचे असेल तर आम्हाला सर्वांना जिवंत ठेवावे लागेल. असे करू तेव्हाच आपण जिवंत राहू. ईश्वराने असे काही सांगितले नाही की एकाला मारू तेव्हाच दुसरा जिवंत राहू शकेल. पाकिस्तानमध्ये सर्व हिंदू आणि शिखांना मारून टाकावे आणि भारतात सर्व मुसलमानांना मारून टाकावे व जे शिल्लक राहतील त्यांना गुलाम करावे असे तर होऊ शकत नाही. मी तर म्हणेन की आम्ही विनाशाचे काम करत आहो. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे - विनाशकाले विपरीत बुद्धी. आपची बुद्धी विपरीत झाली आहे. मुसलमानांना मारा, कापा, बाहेर हाकलून द्या ही पागलपणाची भाषा आहे. अशा बऱ्याचशा गोष्टी झाल्या आहेत परंतु सर्व सांगू शकत नाही कारण १५ मिनिटांपेक्षा जास्त बोलायचे नाही असे मी ठरवले आहे आणि त्याकरिता मी घड्याळ बाहेर काढून ठेवतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १८९-९२

४६. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ११, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ११, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका बंधूची इच्छा आहे की कुराण शरीफमधील ज्या आयती आपण म्हणतो त्यांचा अर्थ समजून सांगितला तर बरे होईल. या आयती प्राचीन आहेत. कुराणची रचना महम्मद साहेबांनी केली होती. तेराशे वर्षांपूर्वी ते त्यांना सांगण्यात आले होते. त्यातील जो भाग आपण प्रार्थनेत म्हणतो तो आपल्या मंत्रांप्रमाणे पूज्य आहे. ते वाचल्याने जसे माणसाला पुण्य मिळते तसेच कुराण शरीफमधील या आयतींबद्दलही समजा. अर्थ कळो वा न कळो शुद्ध उच्चारणामुळेच पुण्य मिळून जाते. मी केवळ त्याचा अर्थ सांगू शकतो, सार सांगू शकतो कारण मला अरबी वा फारसी येत नाही. माझ्याजवळ त्याचे भाषांतर आहे, परंतु ते इथे नाही. आता तर ते माझ्याजवळ नाही, परंतु उद्या सांगेन. याचा अर्थ आहे आम्ही ईश्वराची प्रार्थना करतो. ईश्वर तर एकच आहे. मग त्याला कोणत्याही नावाने संबोधा. त्याचे एक नाव अल्लाही आहे. तो कसा आहे, त्याची विशेषणे दिली आहेत. तो रहीम आहे, रेहमान आहे, दयावान आहे, दयेचा भांडार आहे. ईश्वर एक आहे, अनेक नाही हेच त्यात येते. त्यात असेही आहे की तो आम्हाला सैतानापासून वाचवू शकतो, सैतान तर आम्हाला अधःपतीत करतो व आम्हाला पापकृत्ये करायला लावतो. तर तो ईश्वर त्या सैतानापासून आपल्याला वाचवू शकतो. माणूस आपण होऊन सत्कृत्ये करत नसतो तर तो ईश्वर त्याला तसे करण्याची प्रेरणा देतो. माणूस सागरातील एखाद्या थेंबासारखा असतो. ईश्वर माणसाला वाचवणार नसेल तर सैतान त्याला खाऊन टाकील. ईश्वर महान आहे. तो सर्व काही आहे. त्याची कृपा असेल तर आपण वाचू शकतो. तर मी म्हणेन की आपण त्याचा जितका जप करू, त्याचे मनन चिंतन करू, त्याने सांगितलेल्या मार्गाने चालू तितके कमी आहे. यामुळेच जग चालते. मग तुम्ही विचाराल की मुसलमान असे मिथ्याचरण का करतात? त्याचे उत्तर हेच असू शकते की ज्या ख्रिश्चनांनी इतकी प्रगती केली, जे विद्वान आहेत, ते बायबलमधील शिकवणुकीनुसार आचरण करतात काय? गायत्रीमंत्रानुसार आचरण करणारे हिंदू कुठे आहेत? तो किती मोठा मंत्र आहे? आपण उपनिषदातील मंत्र म्हणतो, ईशावास्यमिदंम् सर्वम्. याचा अर्थ होतो सर्व जग ईश्वराने भरलेले आहे, व्याप्त आहे. सर्व काही तोच देतो. तर माणूस म्हणतो की माझ्याजवळ जे काही आहे ते सर्व त्याचेच आहे. आपण सर्व गोष्टींचा त्याग केला पाहिजे आणि केवळ आवश्यक आहे तितका उपभोग घेतला पाहिजे. आपले स्वतःचे काहीही नाही. घरदार सर्व ईश्वरार्पण केले. ही तर फार मोठी गोष्ट आहे. नंतर असे आहे की दुसऱ्याची जी संपत्ती असेल तिचा द्वेष करू नका. तिची इच्छासुद्धा करू नका. त्या

मंत्रात हे सर्व काही आहे. या एकाच मंत्राप्रमाणे सर्व हिंदू आचरण करतील तर सगळे जग चालेल - कारण हा मंत्र काही हिंदूंकरिताच थोडा आहे, त्यात हिंदू हा शब्दही नाही - शीख चालतील, शीख हा मंत्र मानत नाहीत असे थोडेच आहे, याप्रमाणे आपण वागलो असतो तर आज जगात जे कारुण्यपूर्ण दृश्य दिसते ते थोडेच दिसले असते. मग तुम्ही म्हणाल की याप्रमाणे चालत नाही तर मग जग कसे चालते? तर मी म्हणेन की सर्वच्या सर्व बदमाष आहेत असे कुठे आहे. सर्व हिंदू देवदूत थोडेच आहेत. सर्व शीख बदमाष आहेत असे थोडेच आहे. सर्व शीख देवदूत आहेत, हिंदू देवदूत आहेत पण मुसलमान वाईट आहेत असे काही नाही.

दुसरा मंत्र पारसी लोकांचा आहे. पहिल्या मंत्रात गुरूला नमस्कार आहे. त्यानंतर संस्कृतमधील कडवे येतात. नंतर भजन म्हणतात. आणि इतके होऊनही आपण आपले अंतःकरण स्वच्छ करत नाही. ही दुःखद गोष्ट आहे.

हरिजन कॉलनीमध्ये काय घडत आहे त्यातील एक गोष्ट समजावून सांगू इच्छितो. परंतु आता मला तो प्रश्न सोडून द्यावा लागत आहे, कारण मला इतर विषयांवर बोलायचे आहे आणि माझ्याजवळ केवळ १५ मिनिटे आहेत. काही मुसलमान मला भेटायला आले होते. याआधीही ते भेटायला आले होते. आज दुसऱ्यांदा आले. त्यांनी मला सांगितले की आम्ही पाकिस्तानमध्ये - पंजाबमध्ये गेलो होतो. हेच काम करण्याकरिता संयुक्त प्रांतातील मुसलमान तिथे गेले होते. नंतर तिथे भारतातील इतर मुसलमानांची भेट झाली. तेथील मुसलमानांशी काही तडजोड घडवून आणावी म्हणजे तेथील वातावरण निवळेल व मागे काही राहणार नाही असे त्यांना वाटले. ते मला विचारून गेले होते. मी जा म्हणून सांगितले होते. मनापासून जात असाल तर चांगले आहे. ते आज तेथून परतले. ते माझ्याकडे आले आणि म्हणाले की आम्हाला तुमच्याकडून एक गोष्ट हवी आहे. हिंदूंना सांगा, शीखांना सांगा की तुम्ही लाहोरला जा, - आधी हिंदूंना सांगा की तुम्ही लाहोरला जा, आम्ही त्यांच्याबरोबर जाऊ. आधी आम्ही मरू मग दुसरा कोणी मरेल. परंतु असे तर होणार नाही. आम्ही तेथील सरकारशी चर्चा केली आहे. ते मुसलमानेतरांना वसवण्याकरिता तयार आहेत. तेव्हा मी म्हणालो की हे सर्व लिहून तर द्या. आजच्या आज तर असे होणार नाही. ही फार मोठी गोष्ट आहे. जर असे झाले तर माझे फार मोठे ओझे उतरेल. ते म्हणाले की निदान आमच्या शब्दांची परीक्षा तरी घ्या. नंतर ते म्हणाले की करा तर खरे. आम्ही जे म्हणतो त्याची हवी तितकी परीक्षा घ्या. तर त्या लोकांनी लिहून दिले. त्यात लिहिले आहे -

संयुक्त प्रांताच्या शांतता समितीने पश्चिम पंजाबचा दोन वेळा दौरा केला. पहिल्या वेळी एक महिना आणि दुसऱ्या वेळी एक आठवडा आम्ही फिरलो. आता तेथील परिस्थिती चांगली आहे. पहिल्या वेळेच्या तुलनेत जनता आणि सरकार दोघेही शांततेकरिता प्रयत्न करत

आहेत. पश्चिम पंजाब सरकारची इच्छा आहे की तिथे जे मुसलमानेतर राहत होते त्यांनी तिथेच राहावे आणि स्थलांतरित मुसलमानेतरांनी पश्चिम पंजाबमध्ये परत यावे आणि ते परतले तर त्यांना त्यांच्या संपत्तीवरील हक्क परत मिळतील, त्यांना संपूर्ण संरक्षण मिळेल व ज्या काही सोयीसवलती त्यांना हव्या असतील त्याही त्यांना मिळतील असे निदेश सरकारने काढले आहेत. आणि या सर्व विनंतीनंतरही काही मुसलमानेतरांना परतायची इच्छा नसेल तर त्यांना त्यांची संपत्ती आपल्या इच्छेप्रमाणे विकण्याचा संपूर्ण अधिकार असेल. जे लोक दंगलींकरिता लोकांना चिथावणी देतील त्यांच्याविरुद्ध सरकार कठोर पावले उचलेल आणि परतलेल्या लोकांच्या संरक्षणाकरिता सर्व प्रकारची उपाययोजना करील. मुसलमानेतरांचा मानसन्मान आणि अब्रू सुरक्षित राहिल याकरिता जबाबदारी स्वीकारण्याकरिता शांतता पथकाने तेथील जनतेला आणि पाकिस्तान सरकारला तयार करण्यात यश मिळवले आहे. आम्ही, संयुक्त प्रांतातील शांतता पथकाचे सदस्य परतलेल्या मुसलमानेतर बंधूंना विनंती करतो की त्यांनी पश्चिम पंजाबमध्ये परतावे व तिथे कायम वास्तव्य करावे. आम्ही त्यांच्याबरोबर तिथे जायला तयार आहो आणि आमचा जीव गेला तरी आम्ही त्यांचे रक्षण करू. या मुसलमानेतरांना पुर्ण सुरक्षित असल्याचे जाणवल्यानंतरच आम्ही परतू.

यावर चार लोकांनी सह्या केल्या आहेत. हे बरोबर असेल तर ही चांगली बातमी आहे असे मी समजतो. ते सभ्य गृहस्थ आहेत असे वाटल्यामुळे मी त्यांना म्हणालो की लिहून द्या, मग यावर मी कार्यवाही करेन, सगळ्या जगाला दाखवेन. आणि जर असे नसेल तर फार वाईट गोष्ट आहे. मागे मी म्हणालो होतो की मॉडेल टाऊनमध्ये बरेच हिंदू आणि शीख आले आहेत. लाहोरमध्येही हिंदूंच्या मोठमोठ्या इमारती आहेत. शिखांच्याही इमारती आहेत. तिथे त्यांचा गुरुद्वाराही आहे. शीख तिथे जाऊ शकतात काय असे संयुक्त प्रांतातील पथकातील लोकांना मी विचारले. तेव्हा ते म्हणाले की सर्वसामान्य लोकांमध्ये मैत्रीभाव निर्माण झाला आहे असे काही नाही.अजूनही वातावरण विषाक्त आहे. हे विष एकाएकी काढता येत नाही. परंतु यापुढे हत्त्या होणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे सरकारने सांगितले.

खरोखर असे घडले असेल तर ही फार मोठी गोष्ट आहे. इतक्या लवकर काम होईल अशी अपेक्षा नव्हती. हे कितपत खरे आहे हे मला माहीत नाही. परंतु असे करणारेही मुसलमान आहेत हे तर आपण समजून घेतले पाहिजे. सर्व मुसलमान बदमाश आहेत असे समजणे माणुसकी नाही. त्यांच्यातही सज्जन लोक आहेत. नंतर त्यांच्याबरोबर एक हिंदूसुद्धा आला. त्यानेही पत्र आणले होते. आता अधिक वेळ नाही म्हणून मी ते वाचणार नाही. परंतु त्यातही हीच गोष्ट आहे. ते तिथे हॉटेल, विश्रामगृह

चालवतात. तिथे दररोज जवळपास एक हजार माणसे नेहमी येतात. मुसलमान जास्त येत असतील परंतु काही हिंदूही येत असतात. त्यांच्या येण्यात कोणताही अडथळा नसतो. त्या पत्रात त्यांनी लिहिले आहे आणि ते म्हणतात की मुसलमानेतर बांधवांना तिथे परतण्याकरिता कोणतीही अडचण नाही. इतके मी आजच्या अनुभवावरून सांगतो. परंतु उद्याच जा असे मला म्हणायचे नाही. जाऊ नका असेही मी म्हणणार नाही. जाल तर चांगले होईल.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १९२-६

४७. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १२, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका बंधूंनी पत्र लिहिले आहे. त्यात लिहिले आहे की पाकिस्तानमध्ये जाणे सुरू करावे असा सल्ला मी दिला आहे. मी तर म्हणालो होतो की मी या गोष्टीची चौकशी करीन आणि खात्री पटली तर मग सांगेन. ज्या बंधूंनी हे सांगितले ते बरोबर आहे की नाही हे मी पाहीन. मग सांगेन की जायचे की नाही. ते बंधू तर म्हणतात की आताच जावे अशी त्यांची इच्छा आहे. इथे सर्व अराजक माजले आहे, कोणी विचारपूस करणारे नाही, खायला प्यायला नाही, कपडेलत्ते नाहीत आणि निर्वासितांकरिता काहीही केले जात नाही. हे सर्व खरे आहे हे मला माहीत आहे. गोष्टी अशा स्तरापर्यंत पोहोचल्या आहेत की प्रत्येकाची काळजी घेतली जाऊ शकत नाही व प्रत्येक गोष्ट उपलब्ध करून देता येऊ शकत नाही. मला वाटते की जे शक्य होते ते करण्यात आले आहे. परंतु जरी तसे करण्यात आले नसेल तरी मी कोणालाही परत जाण्याचा सल्ला देऊ शकत नाही. ते जर मुळात आलेच नसते तर ती वेगळी गोष्ट असती. परंतु आता ते आलेले असल्यामुळे परिस्थिती सामान्य झाल्यानंतरच त्यांनी परत जायला पाहिजे. त्यांनी जितक्या लवकर परत जाण्याची संधी मिळेल तितक्या लवकर परतण्याची तयारी ठेवली तर ते अधिक चांगले होईल.

काल मी तुम्हाला सांगितले होते की इथे कुराणमधील ज्या आयती म्हणण्यात येतात त्यांचे भाषांतर मी तुम्हाला वाचून दाखवीन. मी तुम्हाला आधीच सार समजावून सांगितला होता. भाषांतर असे आहे - "दुष्ट सैतानापासून रक्षण व्हावे म्हणून मी अल्लाला शरण जातो. मी ईश्वराच्या नावापासून सुरुवात करतो. मी जे काही करतो ते ईश्वराच्या नावावर करतो कारण तोच मला सर्व काही देणारा आहे. तो रहीम आहे, रेहमान आहे, दयाळू आहे, सर्व काही आहे." नंतर सांगितले आहे की "अल्ला एक आहे, तो जन्म घेत नाही आणि जन्म देत नाही. जे काही जन्म घेते ते त्याने निर्मिलेले असते. त्याच्या समान कोणीही नाही. तो स्वतःच पूर्ण आहे. म्हणनच तो निर्दोष आणि निराकार आहे असे आपण म्हणतो. सर्व गुणांचा जन्म त्याच्यापासून झाला आहे. त्याच्या गुणांचा थाक लागू शकत नाही."

आज मला मला चार वा पाच पत्रे आली आहेत. काठेवाडमधील एका मुसलमानाच्या पत्राचा मी उल्लेख केला आहे (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ५, १९४७), परंतु काही मुसलमानांचा त्यालाही आक्षेप आहे. का ते मला माहीत नाही. ज्या लोकांनी आरोप केले होते त्यांनीच मला लिहिले आहे की विशेष असे काही घडलेले नाही आणि जर कुठे थोडेसे काही घडलेही असेल तरी काँग्रेसच्या लोकांनी

शांततानिर्मितीकरिता शक्य तितका प्रयत्न केला आहे आणि आम्ही आमच्या घरात सुखात राहत आहो.

दुसरे एक पत्र ब्रह्मदेशातून आले आहे आणि अजून एक मुंबईहून आले आहे. त्याच्यावर सही नाही आणि त्याचे उत्तर कुठे पाठवावे हे मला माहीत नाही. मुंबईहून आलेले पत्र मला सांगते की गोंधळ निर्माण करण्याशिवाय मी वेगळे काहीही करत नाही. मी गोंधळ निर्माण करतो की नाही हे मला माहीत आहे, आणि माझे ऐकत असलेल्या तुम्हा लोकांनाही माहीत आहे. ते म्हणते की काठेवाडमध्ये काय घडले याची मी चौकशी केली पाहिजे, परंतु मला सर्व माहिती मिळाल्याशिवाय मी कसा चौकशी करू शकतो? एखादी चौकशी सुरू करण्याचा मला अधिकार नाही. असे करण्यासंबंधी मी सरकारला केवळ सांगू शकतो. दुसरे पत्र अजमेरसंबंधी आहे. ते हिंदूंनी लिहिले आहे. ते म्हणतात की मी जे म्हणालो ते खरे नाही (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १०, १९४७). दंगल झाली होती हे खरे आहे परंतु दंगलीची सुरुवात हिंदूंनी केली नव्हती. ती मुसलमानांनी केली होती. नेहमी तसेच घडत असते. मग माझ्या लक्षात आले की ही चित्राची दुसरी बाजू आहे. काय खरे आणि काय खोटे हे केवळ ईश्वरालाच माहीत. वृत्तपत्रांमध्ये मी जे पाहिले त्यावर माझे वक्तव्य आधारलेले होते. अनेक लोकांकडूनसुद्धा मी बरेच काही ऐकले होते. आपण अशा प्रकारचे वर्तन करणार असू तर सरकार काम करू शकणार नाही.

सोमनाथ मंदिराच्या जिर्णोद्धाराकरिता पैसा उपलब्ध व्हावा असे एका पत्रलेखकाचे म्हणणे आहे. सरदारांना सोमनाथ मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा हे मान्य आहे परंतु त्याकरिता जुनागढच्या खजिन्यातून व भरात सरकारच्या तिजोरीतून पैसा घ्यावा हे त्यांना मान्य नाही. अशा प्रकारे पैसा का उपलब्ध होऊ नये असे पत्रलेखक विचारतो. या प्रश्नाचे सविस्तर उत्तर देण्याच्या भानगडीत मी पडू इच्छित नाही. मी इतकेच म्हणू शकतो की या कामाकरिता जर सरकारकडून पैसा घेतला तर हाच नियम सर्वांना लागू करावा लागेल. त्याचे दूरगामी परिणाम होतील.

वृत्तपत्रांच्या वृत्तानुसार कलकत्त्यात गुंडगिरीचे काही प्रकार झाले. (विधान परिषदेत सादर करण्यात आलेल्या विधेयकाच्या विरोधात डिसेंबर ११ला कलकत्ता येथे निदर्शने झाली होती व त्यात काही हुल्लडबाजीचे प्रकार झाले होते. निदर्शक आणि पोलीस यांच्या झटापटीत एक माणूस मरण पावला होता आणि अनेक लोक जखमी झाले होते.) असे दिसते की हुल्लडबाजी करून आपल्याला हवे ते मिळू शकते असा आपला समज झाला आहे. ही घातक प्रवृत्ती आहे. ही गोष्ट मी कधीही शिकवली नाही. ब्रिटिशांविरुद्ध आपण तीस वर्षे झगडलो. परंतु तो अहिंसक संघर्ष होता. कोणाला मारहाण करण्याचा तो संघर्ष नव्हता. कोणाकडून काही बळजबरीने हिसकून घेण्याचा तो संघर्ष नव्हता. बंगालमध्ये जे सरकार आहे ते आपले आहे, त्यात काँग्रेसची माणसे आहेत. त्यांच्याबरोबर काय असे

वागायचे होते? समजा की चूक केली, मला तर माहीत नाही की काय चूक केली, परंतु समजा की चूक केली तर हुल्लडबाजी काय करायची? आपण पाशवी पद्धतीने का वागायचे? वर्तमानपत्रांमध्ये जेव्हा अशी बातमी येते तेव्हा मी ती वाचतो आणि तिचा सार तुम्हाला सांगतो. तेथील हुल्लडीत विद्यार्थीसुद्धा होते. ते चांगले शिकलेले आहेत, मग विधानसभेत जे लोक जात होते त्यांना अडवायचे, विधानसभेच्या सर्व दारांवर अडथळे निर्माण करायचे, आणि इतकेच नाही तर आतही घुसायचे हा तर त्याचा मार्गअसू शकत नाही. या लोकांनी जेव्हा असे केले तेव्हा मला वाटले की अशा प्रकारे तर आपण सरकार चालवू शकत नाही. आम्हाला जे नको आहे त्यासंबंधी आम्ही कायदा करू देणार नाही याकरिता बळजबरी करण्याकरिता ही हुल्लडबाजी होती. लोकांनी हिंसक कृत्यात भाग घेण्यास प्रवृत्त होऊ नये म्हणून हे विधेयक होते. निदर्शकाना हे विधेयक जरी आवडत नसेल तरी त्यांनी आपला विरोध शांततामय मार्गाने करायला पाहिजे होता. त्यांनी हुल्लडबाजी करायला नको होती. आपण असे ब्रिटिशांविरुद्धही केले नाही, आणि त्या वेळी जर कोणी असे केले असेल तर मी त्यांची कानउघाडणी करत असे. आम्ही नेहमी सौजन्यपूर्वक वागत होतो - मी तर केव्हा केव्हा उपोषणही करत असे.

आपल्या सरकारसमोर आज किती तरी महत्त्वाच्या समस्या आहेत. त्या समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तिकडे लक्ष देण्याच्या कामात अडथळे आणणे व मग पोलिसांना जर लाठीमार करावा लागत असेल तर त्याचीच तक्रार करायची, अश्रुधूर सोडावा लागत असेल तर त्याची तक्रार करायची, गोळीबार करावा लागत असेल त्याची तक्रार करायची या दोन्ही गोष्टी होऊ शकत नाही. शांततेचा भंग करणारांना शिक्षा करू नये असा स्वातंत्र्याचा अर्थ होत नाही. गोंधळ केला तर त्याच्यावर लाठीमार केला व त्याची कोणी तक्रार केली तर ते चालू शकत नाही. विरोध व्यक्त करण्याचे किती तरी सनदशीर मार्ग आहेत. तुम्ही लोकांशी बोलू शकता, संसदेकडे वा केंद्र सरकारकडे तक्रार करू शकता. आपल्याजवळ सर्व आवश्यक साधने आहेत. सरकार कार्यक्षम नाही असे तुम्ही म्हणू शकत नाही. ते केवळ तीन महिन्याचे आहे. आपण तीन महिन्यांच्या मुलाप्रमाणे आहो. या तीन महिन्यात आपण परिपूर्ण झालो असे मी म्हणू शकत नाही. यामुळे हुल्लडबाजी करणाऱ्या लोकांना मी विनंती करतो की त्यांनी या मार्गाचे अनुसरण करू नये.

असे काही नाही की हुल्लडपणा करणारे हे सर्व लोक गुंड वा अडाणी आहेत. त्याच्यात चांगले शिकलेले लोकही आहेत. ते जर अशा प्रकारचे वर्तन करत असतील तर आजपर्यंत आपण केलेले सर्व काम पाण्यात वाहून जाईल. आपल्याला लोकांपर्यंत अन्न पोहोचवायचे आहे. इतर अनेक बाबतीतही आपल्याला त्यांना मदत करायची आहे. असे दिसते की सुरू असलेल्या चांगल्या कामात अडथळा आणणे हेच काही लोकांचे काम झाले आहे. असे व्हायला नको. कलकत्त्यातील सगळे लोक यात

सामील झाले नव्हते हे भाग्य. परंतु ते जरी सामील झाले असते तरी ते योग्य झाले नसते. अशा प्रकारच्या गोष्टी थांबल्या पाहिजे. सरकार त्यांचे आहे आणि ते जर मदत करत नसेल तर सनदशीर मार्गाने आपण विरोध केला पाहिजे.

(हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ १९६-९

४८. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १३, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी जेव्हा हरिजन निवासात जात होतो तेव्हा त्यासंबंधी दररोज थोडेथोडे तुम्हाला सांगायची मला इच्छा असायची. परंतु मी असे करू शकलो नाही. आज तुम्हाला परत चरख्यासंबंधी सांगण्याची इच्छा आहे. चरख्याचे काय महत्त्व, त्यावर मी इतका भर का देतो यासंबंधी तिथे वाद सुरू होता.

मी जेव्हा सुरुवातीला चरख्यासंबंधी बोलू लागलो होतो तेव्हा मला माहीत नव्हते की पंजाबमध्ये चरख्याचे इतके प्रचलन आहे. परंतु मी तिथे गेलो तेव्हा तेथील भगिनींनी माझ्यासमोर चरख्याचे ढीग ठेवले. नंतर कळले की गुजरात, काठेवाडमध्येही एखाददुसऱ्या ठिकाणी चरखा चालतो. गायकवाडांच्या संस्थानात बीजापूर म्हणून एक गाव आहे. तिथे हिंडता हिंडता गंगाबेन जाऊन पोहोचल्या होत्या. चरख्याचे मला वेड लागले आहे हे त्यांना माहीत होते. तिथे पडदा ठेवणाऱ्या राजपूत स्त्रिया चरखा चालवायच्या. गंगाबेनने त्यांना पेळू देऊन त्यांच्याकडून सूतखरेदी सुरू केली. त्या वेळी फार कमी किंमत दिली जायची. त्यानंतर आम्ही बरीच प्रगती केली. खादीद्वारे आपण आपल्या भगिनींचे पोट भरू शकतो इतकेच तेव्हा आम्हाला वाटत होते. त्यांचे पोट कुठे मोठे असते? दोन पैशांच्या ठिकाणी तीन पैसे मिळाले की त्यांचे समाधान होत असे. त्या खुष होत असत.

नंतर माझ्या लक्षात आले की चरख्यात तर फार मोठी ताकद भरलेली आहे. ती ताकद अहिंसेची होती. एकीकडे हिंसेची, सैन्याची शक्ती आणि दुसरीकडे भगिनींच्या पवित्र हाताने चरखा चालवल्यामुळे निर्माण होणारी अहिंसेची शक्ती. म्हणूनच मी चरख्याला अहिंसेचे प्रतीक म्हणतो. सर्व लोकांना ही गोष्ट कळली असती तर त्यांनी चरखा जाळून टाकला नसता.

एक काळ असा होता की जगभर चरखा चालायचा. कापसापासून जितके काही कापड तयार होत असे ते सर्व चरख्याने कातलेल्या सूतापासून. भारतातील ढाक्याची मलमल आणि शबनम (शब्दशः अर्थ दव) चोहोकडे प्रसिद्ध झाली होती. सर्वांचे डोळे तिच्याकडे लागले होते. कापसापासून इतके चांगले कापड तयार होते याचे सर्वांना आश्चर्य वाटायचे. हा रंजक इतिहास मी सोडून देतो. परंतु त्या वेळी चरखा गुलामगिरीचे प्रतीक होता. इतके सूत द्यावेच लागेल अशी स्त्रियांवर सक्ती केली जात असे आणि इतक्या कमी मजुरीवर आम्ही कताई करू शकत नाही असे आपल्या मालकाला त्या म्हणू शकत नव्हत्या. मोठ्या मुश्किलीने पोट भरावे इतकेही पैसे त्या स्त्रियांना मिळत नसत. स्त्रियांना लुबाडले

जात असे. तो करुण इतिहासही मी सोडून देतो. परंतु जो चरखा गुलामगिरीचे प्रतीक होता तोच आता स्वातंत्र्याचे प्रतीक झाला आहे. असे हिसेच्या बळावर झाले नाही तर अहिंसेच्या बळावर झाले आहे. अली बंधू चरख्याच्या चातीला बॉम्ब म्हणत असत. ते आपल्या हाताने सूत कातायचे, कापड तयार करायचे आणि चरख्याने शक्ती निर्माण करायची हे चरख्याचे रहस्य आहे. ही गोष्ट मी जाहीरपणे सांगत आलो आहे.

१९१६ साली चरखा सुरू झाला. १९१९मध्ये माझा पंजाबचा दौरा सुरू झाला (गांधीजींनी १९१८-१९मध्ये पंजाबचा दौरा सुरू केला होता). स्वातंत्र्य तर आम्ही मिळवले परंतु आज देशात जे वादळ सुरू आहे त्याचे काय? आपण चरखा चालवला परंतु तो स्वीकारला नाही. भगिनींनी माझ्यावर कृपाकरून चरखा चालवला परंतु मला ती मेहरबानी नको आहे. त्याची ताकद काय आहे हे त्यांना कळले असते तर आज ही अवस्था झाली नसती. आपल्याला जर अहिंसक शक्ती वढवायची असेल तर परत चरखा स्वीकारावा लागेल आणि चरख्याचा पूर्ण अर्थ समजावून घ्यावा लागेल. असे झाले तरच आपण तिरंगा झेंड्याचे गीत गाऊ शकू. आज आपल्या तिरंगा झेंड्यात चरख्याचे केवळ चक्र राहिले आहे. त्यात दुसऱ्या अर्थाचाही समावेश करण्यात आला आहे. (प्रा. राधकुमुद मुखर्जी यांनी चक्राचे महात्म्य सांगताना त्याची उत्पत्ती विष्णूच्या सुदर्शन चक्रातून झाली असल्याचे सांगितले. सुदर्शन चक्रात व्यक्त आणि अव्यक्त संपूर्ण ब्रह्मांडाचा समावेश आहे. गौतम बुद्धाने याला धर्मचक्र म्हणून संबोधले होते. नंतर सम्राट अशोकने त्याला आपल्या राज्याचे चिन्ह बनवले.) हा अर्थ चांगला आहे. परंतु आधी जेव्हा तिरंगा झेंडा तयार झाला होता तेव्हा हा अर्थ नव्हता. हिंदुस्तानातील सर्व जमातींनी मिळून मिसळून काम करावे आणि चरख्याच्या माध्यमातून अहिंसक शक्ती निर्माण करावी असा त्याचा अर्थ होता. आजही चरख्यात अनंत शक्ती भरलेली आहे. इंग्रज गेले परंतु आमचा लष्करावरील खर्च वाढतो आहे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. इतकी वर्षे अहिंसेकडून काम घेतले आणि आता आपली नजर लष्करावर खिळलेली आहे. आपण चरखा विसरलो म्हणून आपण आपसात भांडतो आहो. सर्व स्त्री-पुरुष चरख्याची खरी शक्ती ओळखून त्याचा समजूनउमजून स्वीकार करतील तर बरेच काही करता येऊ शकते.

मी जेव्हा पंजाबमध्ये गेलो होतो तेव्हा तेथील मुसलमान आणि शीख बांधव मला म्हणाले होते की चरखा चालवणे तर स्त्रियांचे काम आहे, पुरुषाच्या हातात तर तलवार असते. नंतर काही पुरुषांनी चरखा चालवला होता परंतु तो आपलासा केला नव्हता. आज जर सर्व लोकांनी चरखा जाळून टाकला, खादी फेकून दिली तर मला त्याची पर्वा नाही. परंतु जर चरखा ठेवायचा असेल तर समजूनउमजून ठेवा. चरखा अहिंसेचे प्रतीक असल्यामुळे आणि प्रचंड शक्तीचे कोठार असल्यामुळे ते धैर्याचे प्रतीक आहे.

आपल्याला जर असे शौर्य दाखवायचे असेल तर आपण समजूनउमजून मनबुद्धीने चरख्याचा स्वीकार केला पाहिजे. ४० कोटी लोकसंख्येतील लहान मुले सोडून दिली तर पाचसात वर्षाच्या वरील मुलांनी आणि धडधाकट असलेल्या सर्व मोठ्या माणसांनी दररोज अर्धा तास कताई केली तर भारतात कापड कमी पडू शकत नाही आणि कोट्यवधी रुपये वाचू शकतात. परंतु हे सर्व विसरा. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की कोट्यवधी लोक जेव्हा एकाच वेळी एखादे काम करतात तेव्हा त्यातून जी शक्ती निर्माण होते तिला शत्रूची कोणतीही शक्ती पराभूत करू शकत नाही. मी हे सिद्ध करू शकत नसेन तर तो दोष अहिंसेता नाही, माझा आहे. माझी तपश्चर्या अपूर्ण आहे, अहिंसेची शक्ती कधीही कमी पडू शकत नाही. त्या शक्तीचे प्रदर्शन चरख्याच्या माध्यमातून होऊ शकते कारण चरखा करोडो लोकांच्या हाती ठेवला जाऊ शकतो आणि त्यामुळे कोणाचेही नुकसान होऊ शकत नाही. करोडो माणसे गिरणी चालवू शकत नाही, दुसरा कोणताही व्यवसाय करू शकत नाही. चरख्यात नीतीशास्त्र भरलेले आहे, अर्थशास्त्र भरलेले आहे आणि अहिंसा भरलेली आहे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २०० - २

४९. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १४, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

प्रार्थनेकरिता येत असताना मला एक चिठ्ठी मिळाली. तिच्यात लिहिले आहे आहे की एका मुसलमान बांधवाला पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता भाग पाडण्यात आले आहे. त्यांनी आपल्या मेहनतीच्या कमाईतून घेतलेले काही सोनेचांदी माझ्याजवळ ठेवले आहे. हे सोनेचांदी मूळ मालकाकडे कसे पाठवावे हे तुम्ही सांगू शकाल काय असे ती चिठ्ठी लिहिणाऱ्या मित्रांने मला विचारले आहे. त्यांनी लिहून पाठवले तर मूळ मालकाकडे हे सोनेचांदी पाठवण्याची व्यवस्था करण्याविषयी मी सरकारला सांगू शकतो. जोपर्यंत त्या व्यक्तीचा शोध लागत नाही तोपर्यंत त्यांची संपत्ती सरकारजवळ राहील. अशाही परिस्थितीत आमच्यामध्ये असे सज्जन लोक आहेत हे सांगण्याकरिता या गोष्टीची चर्चा मी केली. चला मित्र तर गेला, आता त्याचा माल हडप करून टाकू या असे या गृहस्थांच्या मनातही आले नाही. त्याला त्याच्याकडील ठेव परत करण्याची काळजी आहे. आपण सर्व जर चांगले झालो तर सर्व काही चांगलेच होईल.

मी तुमच्याजवळ कबूल केले होते की हरिजननिवासात मी जेव्हा जातो तेव्हा तिथे विविध संघांसबंधी जी चर्चा होते त्यासंबंधी मी तुम्हाला थोडेथोडे सांगेन. चरखा संघ आणि कताई विणाईसंबंधी सुरू असलेल्या कामासंबंधी काल मी तुम्हाला सांगितले होते. आज मला तुम्हाला ग्रामोद्योग संघ आणि नयी तालीमबद्दल सांगायचे आहे. नयी तालीम अशी गोष्ट नाही की जिचा प्रत्येकाला परिचय आहे. तालीम सुरू होऊन सातआठ वर्ष झाले. या संस्थेचा उद्देश राष्ट्राला नवीन आधारावर सेवा देणे हा आहे. या दृष्टीने हा काळ काही दीर्घ नाही. बुनियादी शिक्षणाचा अर्थ हस्तोद्योगाद्वारे शिक्षण असा सामान्यपणे करण्यात येतो. तो काही प्रमाणातच बरोबर आहे. नयी तालीमची मुळे याहून जास्त खोलवर रुजलेली आहेत. तिचा आधार आहे सत्य आणि अहिंसा. व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन या दोघांमध्येही तिला आधार आहे. विद्या ती असते जी मुक्त करत असते - सा विद्या या विमुक्तये. असत्य आणि हिंसा तर बंधनकारक आहे. त्यांचे शिक्षणात कोणतेही स्थान असू शकत नाही. मुक्ती अर्थातच अनेक प्रकारची असते. कृतीच्या बंधनापासून मुक्ती असते, अत्याचारी माणसाच्या कचाट्यातून सुटण्याची मुक्ती असते, वेडपटाच्या हातून एखाद्या मुलीला सोडवण्यामुळे तिची मुक्ती होत असते आणि परकीय शासनाच्या जोखडातून देशाची सुटका झाल्यामुळे मुक्ती होत असते. मुलांना असत्य आणि हिंसेचे शिक्षण द्या असे कोणताही धर्म सांगत नाही.

उच्चशिक्षित लोकही सैतानी मार्गाचा अवलंब करतात अशी किती तरी उदाहरणे आहेत. याचे प्रसिद्ध उदाहरण रावणाचे आहे. रावण अतिशय विद्वान होता आणि त्याने कठोर तपश्चर्यासुद्धा केली होती. परंतु त्याचे वर्तन सैतानी असल्यामुळे त्याचा नाश झाला. उलटपक्षी आजही राम राहत आहे. आपण रामाला ईश्वराचा अवतार मानतो. यामुळे ज्ञानाची संपत्ती मिळवण्याकरिता आपण आपल्यामध्ये सत्य आणि अहिसा रुजवली पाहिजे. अशा प्रकारचे शिक्षण कसे देता येईल यासंबंधी सभेत चर्चा सुरू होती. स्पष्ट आहे की असे शिक्षण पुस्तकांमधून देता येऊ शकत नाही. मग आपण काय केले पाहिजे? देशातील करोडो लोक काही ना काही हस्तोद्योग शिकत असतात. ते सर्व श्रीमंत असू शकत नाहीत. अमेरिकेतसुद्धा सर्व लोक श्रीमंत नाहीत. हे खरे आहे की गरिबी विविध स्तरावरील असते. परंतु गरिबीमुळे सहन करावा लागलेला त्रास एकसारखाच असतो. अशाच प्रकारे भारतातसुद्धा अनेक प्रकारचे दोष भरलेले आहेत. अमेरिकेजवळ इतकी संपत्ती आणि ज्ञान असूनही तिला त्या दोषांवर विजय मिळवता आलेला नाही. करोडो लोकांना जर शिक्षण द्यायचे असेल तर ते केवळ हस्तोद्योगाद्वारेच देता येऊ शकेल असा मी विचार केला. करोडो लोकांमधून केवळ काही लाख लोकांनाच आपण आज ज्याला शिक्षण म्हणतो ते मिळू शकत असेल तर त्याचा कितपत फायदा होऊ शकेल? आणि प्रत्येकजण ते शिक्षण घेण्याचा प्रयत्न करू लागला तर आपले दिवाळे निघेल. जे शिक्षण गरिबांना आणि श्रीमंतांना, राजाला आणि प्रजेला हस्तोद्योगातून मिळते ते खरे शिक्षण असेल. आणि जोपर्यंत आपण सत्य आणि अहिंसेला धरून राहत नाही तोपर्यंत असे शिक्षण देता येऊ शकत नाही. इथे हा प्रश्न धर्माचा होतो - संप्रदायांच्या स्वरूपाच्या अर्थाने नाही तर वैश्विक अर्थाने. असा धर्म चिरंतन असतो. त्यात बदल होत नसतो. तो सर्वांकरिता सारखा असतो. तो जितका हिंदूंकरिता असतो तितकाच मुसलमानांकरिताही असतो. हिंदूंनी खरे बोलायला पाहिजे आणि मुसलमानांनी खोटे असे कोणीही म्हणू शकत नाही. खरे बोलणे हे सर्वांच्या हिताकरिता असते. हिंसा करणे हे कोणाचेही धार्मिक कर्तव्य असू शकत नाही. मला जर कोणी विचारले की शीख आणि मुसलमानांना नयी तालीममध्ये शिक्षण मिळाले पाहिजे की नाही तर मी म्हणेन की आम्ही हिंसेचे भक्त आहो असे शीख आणि मुसलमान जर म्हणत असतील तर निश्चितच त्यांच्याकरिता नयी तालीम नाही. नयी तालीम ही काही खास एखाद्या पंथाकरिता राखीव गोष्ट नाही. मी सर्व धर्मांचा अभ्यास केला आहे आणि त्यांचा सार पचवला आहे. शीख आणि मुसलमान दोघेही माझ्या बाजूला येऊन बसतात. जेव्हा इतर सर्व उपाय अपयशी होतात तेव्हाच ते हिंसेचा पुरस्कार करतात. परंतु आपण जेव्हा मुलाला शिकवायला सुरुवात करतो तेव्हा कसे मारावे यापेक्षा कसे मरावे हे त्याला शिकवले पाहिजे. यामुळे नयी तालीम द्यायची असेल तर ती याच पद्धतीने दिली पाहिजे असे आम्ही ठरवले. हे काम जे करतात त्यांनी सत्य आणि अहिंसेचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. असे केले तरच त्यात यश येईल. परंतु आज तसे होत असल्याचे मला दिसत नाही.

तुम्ही जर विचाराल की नयी तालीम देणारे सर्व सत्य आणि अहिंसेचे पुजारी झाले आहेत काय तर मी काही कोणाच्या अंतःकरणात शिरून पाहू शकत नाही. मी प्रेषितसुद्धा नाही. नयी तालीमची सुत्रे माझ्या हातात नाहीत. मला विचारले तर मी सल्ला तेवढा देत असतो. हे खरे आहे की नयी तालीमची कल्पना माझी होती. परंतु ही संघटना काँग्रेसने निर्माण केली. झाकिर हुसेन तिचे अध्यक्ष आहेत. ते जर सत्य आणि अहिंसेचे पालन करत नसतील तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. परंतु त्यांनी असत्याचरण वा हिंसा केल्याचे मला माहीत नाही. ते माझ्याबरोबर आहेत कारण त्यांचा हिंसेवर विश्वास नाही. हिंदुस्तानी तालिमी संघाचे सचिव आर्यनायकम आणि त्यांची पत्नी आहे. तेसुद्धा सत्य आणि अहिंसंचे भक्त आहेत. मी इतर कामात व्यस्त असतो आणि ते योजना राबवतात. नयी तालीममागील प्रेरणास्रोत तेच आहेत. झाकिरसाहेबसुद्धा हे काम करत नाहीत. ते केवळ अध्यक्ष आहेत. आर्यनायकम आणि आशादेवी यांनी जर या योजनेतून अंग काढून घेतले तर ही योजना कोसळून पडेल. ही अशी संघटना नाही की जी स्वतःच्या बळावर चालू शकेल. काँग्रेसचेच उदाहरण घ्या. मी अर्थातच तिच्याबाहेर आहे. परंतु जवाहरलाल, सरदार आणि राजेंद्रबाबू जरी संघटनेबाहेर गेले तरी संघटना सुरू राहील. वा चरखासंघ घ्या. मी त्याचा अध्यक्ष आहे. चरखासंघ अशी संघटना आहे की जी अनेक वर्षांपासून सुरू आहे. मी जरी ती सोडली तरी तिचे काम चालेल. परंतु नयी तालीमसंबंधी अशी गोष्ट नाही. अजून ती आपल्या पायांवर घट्टपणे उभी राहिलेली नाही. ती चालवणारांमध्ये गीतेत सांगितलेले स्थितप्रज्ञाचे गुण (गीता अध्याय २, श्लोक ५५-७२) जेव्हा येतील तेव्हाच तिचे पाय घट्ट रोवले जातील. आपण अशा कामाचा शोध घेतला पाहिजे की ज्यात प्रत्येकजण भाग घेऊ शकेल. हस्तोद्योगच अशी गोष्ट आहे की ज्यात असे होऊ शकते हे मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २०२-४

५०. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १५, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे सभेत त्यांचे हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,
डिसेंबर १५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

नगरपालिकेच्या शाळांच्या सहा इमारतीत निर्वासित घुसले व त्यांनी ताब्यात घेतलेल्या त्या सर्व इमारती रिकाम्या करून लावण्याचे सर्व प्रयत्न आतापर्यंत विफल झाले हे वर्तमानपत्रात वाचताना मला दुःख झाले. नगरपालिका आता पोलिसांची मदत घेत आहे हे मी समजू शकतो.

ही घटना निर्लज्ज हुल्लडबातीची आहे. भारताच्या राजधानीत अशा प्रकारच्या घटना होणे ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. जे लोक या घटनेकरिता जबाबदार आहेत त्यांना पश्चात्ताप होईल व ते शाळेची इमारत रिकामी करतील अशी मी आशा करतो. ते जर असे करणार नसतील तर त्यांच्या मित्रांनी ही गोष्ट योग्य नाही हे त्यांना समजून सांगावे. सरकारला आपल्या धमकीप्रमाणे वर्तन करावे लागणार नाही अशी आशा आहे. निर्वासितांबद्दल सर्वसामान्यपणे अशी तक्रार आहे की त्यांना इतके दुःख सहन करावे लागले असतानाही ते समंजस, गंभीर आणि मेहनती झालेले नाहीत. सर्व निर्वासित आणि शाळेमध्ये शिरलेले निर्वासित बंधू प्रायश्चित्त घेऊन ही तक्रार चुकीची आहे हे सिद्ध करतील अशी आशा आहे.

शनिवारी (डिसेंबर १२) मी कलकत्त्यातील हुल्लडबाजीचा अल्लेख केला होता. तिथे हुल्लडबाजी करणारे लोक निर्वासित नव्हते. या घटनेची पार्श्वभूमी वेगळी होती. भारताच्या प्रतिष्ठेचे जतन करणे पुढारी लोकांचे कर्तव्य आहे. भारतात जर गोंधळ आणि भ्रष्टाचार माजणार असेल तर भारताच्या अब्रूचे जतन होऊ शकत नाही. मी भ्रष्टाचाराचा उल्लेख केला कारण गोंधळ आणि भ्रष्टाचार हातात हात घालून चालत असतात. देशात भ्रष्टाचार वाढत असल्याचे मला विश्वसनीय सुत्रांकडून कळले आहे. देशाचा विचार न करता प्रत्येकजण जर केवळ स्वतःचा विचार करेल तर काय होईल? एक पत्रलेखक लिहितात -

नुकताच मी रेडिओवर तुमचे कालचे प्रार्थना प्रवचन ऐकत होतो. त्यात तुम्ही म्हणाला की जे मुसलमान बंधू लाहोरला जाऊन आले आहेत त्यांनी पाकिस्तान सरकारतर्फे तुम्हाला आश्वस्त केले आहे की मुसलमानेतर, विशेषेकरून हिंदू तिथे जाऊन परत आपले कामकाज सुरू करू शकतात. पहिली गोष्ट तर ही आहे की हिंदूंनाच बोलवायचे आणि शिखांना नाही

ही चलाखी आहे. शीख आणि हिंदू यांच्यात फूट टाकणारी ही चाल आहे. अशा प्रकारचे आश्वासन धोकेबाजी आहे, चीड आणणारे आहे. बहुधा तुमच्यासारखेच मुसलमानांच्या अशा प्रकारच्या भूलथापांना बळी पडू शकतात. मी तुम्हाला ११ डिसेंबरच्या हिंदुस्तान टाईम्सचे एक कात्रण पाठवत आहे. त्यावरून पाकिस्तान सरकारच्या खरेपणा आणि प्रामाणिकपणाविषयी तुम्हाला कळेल. तुमच्याकडे आलेले मुसलमान प्रामाणिक लोक आहेत असे तुम्ही तरीही म्हणाल काय? त्यांना इतकेच दाखवायचे आहे की पाकिस्तान सरकार अल्पसंख्याकांबद्दल न्याय करू इच्छिते आणि तिथे सर्व काही ठीक आहे. परंतु परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. ते मुसलमान जर परत तुमच्याकडे आले तर त्यांना वृत्तपत्राचे हे कात्रण दाखवा. गेल्या २० नोव्हेंबरला जे लोक हिंदू बॅन्केतील आपली ठेव काढण्याकरिता गेले होते त्यांची काय परिस्थिती झाली होती हे तुम्ही विसरला नसाल अशी मला आशा आहे. त्यांच्या रक्षणासाठी गेलेल्या सशस्त्र दलावर पाकिस्तानच्या जबाबदार सरकारी अधिकाऱ्यांसमोर हल्ला करण्यात आला व हल्ला करणारांना थांबवण्याचा त्यांनी कोणताही प्रयत्न केला नव्हता.

त्या कात्रणात लिहिले आहे -

इतक्यातच प्रकाशित झालेल्या लाहोर नागरी आणि सैनिकी राजपत्रात पुढील वृत्त करण्यात आले होते. दंगलीच्या दरम्यान जे मुसलमानेतर व्यापारी व दुकानदार पाकिस्तानमधून पळून गेले होते ते आपला व्यापार परत सुरू करण्याच्या आशेने हळूहळू काही महिन्यांनंतर परत येत आहेत. परंतु त्यांची दुकाने वगैरे परत करण्याआधी त्यांना अशा दस्तावेजावर सही करायला लावण्यात येते की त्यामुळे किती तरी मुसलमानेतर निराश होऊन परतले आहेत. त्यांचे पुनर्वसन करणारा आयुक्त या अटींवर त्यांना दुकाने उघडून देतो.

१, दुकानदाराला वा हिशेबनिसाला आपल्या विक्रीचा पूर्ण हिशेब ठेवावा लागेल.

२. सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय त्याला पैसे वा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवता येणार नाही.

३. आपले दुकान वा व्यवसाय चालू ठेवण्याचे त्याने आश्वासन दिले पाहिजे.

४. विक्रीपासून आलेली रक्कम त्याला रोजच्या रोज बॅंकेत जमा करावी लागेल.

५. त्याला नेहमीकरिता लाहोरमध्ये राहावे लागेल.

मुसलमानांवर अशा कोणत्याही अटी लादण्यात आलेल्या नाहीत. मग हिंदूंकरिता या अटी का? हिंदूंचे म्हणणे आहे की आम्ही या अटींचे पालन करू शकत नाही. यामुळे निराश होऊन ते परत येत आहेत.

तर या निराशेबद्दल तर मी आधीच बोललो आहे. ही बातमी जरी खरी नसू शकेल तरी या मुसलमानेतर बांधवांनी जे सांगितले ते सर्व चुकीचे ठरत नाही. संबंधित लोकांनी केवळ स्वतःचा विचार करायचा नसतो तर भारताचा विचार करायचा असतो. ते भारताचे प्रतिनिधी आहेत आणि पाकिस्तानने त्यांना आश्वासन दिले आहे. संबंधित मुसलमान मित्रांनी माझ्या संपर्कात राहावे असे मी म्हणू शकतो. आज ते मला भेटायला आले होते. परंतु माझे मौन सुरू होते आणि मी प्रार्थनेचा संदेश लिहत होतो त्यामुळे मी त्यांना भेटू शकलो नाही. आम्ही शांत बसलेलो नाही आणि आमचे काम सुरूच आहे असा निरोप त्यांनी मला दिला होता. पत्रलेखकाने अशा प्रकारे संशयग्रस्त आणि संवेदनशून्य होऊ नये असा माझा त्याला सल्ला आहे. विश्वास ठेवून आपण काहीही गमावणार नाही. संशय माणसाला खात असतो. त्याने विवेकाने वागायला पाहिजे. माझ्याबद्दल बोलायचे तर मी जे केले त्याचा मला पश्चात्ताप होत नाही. आयुष्यभर डोळे उघडे ठेवून मी लोकांवर विश्वास ठेवत आलो आहे. या मुसलमान मित्रांवर मी तोपर्यंत विश्वास ठेवीन जोपर्यंत त्यांच्यावर विश्वास ठेवणे योग्य नाही असे सिद्ध होत नाही. विश्वासाने विश्वास वाढतो. त्यामुळे विश्वासघाताला तोंड देण्याची शक्ती माणसाला मिळते. दोन्ही बाजूच्या निर्वासितांनी जर आपल्या घरी परतायचे असेल तर त्याकरिता मी जो मार्ग अनुसरत होतो आणि अजूनही अनुसरत आहे तोच मार्ग आहे. हिंदू आणि शिखांमध्ये फूट पाडण्याची ही युक्ती आहे हा पत्रलेखकाचा संशय चुकीचा आहे. मी मुसलमान बांधवांना सांगितले होते की पूर्वग्रह असणारा माणूस तुमच्या बोलण्याचा असाही अर्थ काढू शकतो. यात काही चलाखी आहे. हे त्यांनी सपशेलपणे नाकारले. जे लोक परतू इच्छितात त्यांच्याकरिता हा जो मार्ग काढण्यात येत आहे त्यात मला काहीही चूक दिसत नाही. पाकिस्तानमध्ये शिखांच्या विरोधात जितके विषाक्त वातावरण आहे तितके भारतात नाही हे अमान्य करता येऊ शकत नाही. परंतु हिंदूंनी आणि शिखांनी सोबत पोहायला पाहिजे आणि वेळ आली तर सोबत बुडायला पाहिजे. त्यांनी मनात कोणताही दुजाभाव ठेवू नये. कटकारस्थान करणारांमध्ये कधीही भ्रातृभाव निर्माण होऊ शकत नाही.

पूर्व पाकिस्तानमधील एक पत्रलेखक लिहितो -

हिंदुस्तानची आता फाळणी झाल्यानंतरही तुम्ही स्वतःला संपूर्ण हिंदुस्तानचे नागरिक कसे म्हणवू शकता? आता जो एका उपनिवेशाशी संबंधित आहे तो दुसऱ्या उपनिवेशाशी संबंधित असू शकत नाही.

कायदेपंडित काहीही म्हणत असले तरी माणसाच्या अंतःकरणावर ते राज्य करू शकत नाहीत. पत्रलेखक जर म्हणाला की मी जागतिक नागरिक आहे तर त्याला कोण अडवू शकतो? कायदेशीरपणे तसे नसते आणि काही देशांत त्याला प्रवेश नाकारला जाऊ शकतो. परंतु आपल्यापैकी काही लोक ज्याप्रमाणे यांत्रिकपणे वागत नाहीत त्याप्रमाणे जर माणूस यांत्रिकपणे वागणार नसेल तर आपले कायद्याप्रमाणे काय अधिकार आहेत याची तो फिकीर करणार नाही. जोपर्यंत आपण नैतिक मार्गावर आहो तोपर्यंत आपण काळजी करण्याचे कारण नाही. कोणत्याही व्यक्तीबद्दल वा देशाबद्दल आपल्यामध्ये शत्रुत्वाची भावना नसली पाहिजे इतकी मात्र आपण काळजी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ ज्याच्या मनात मुलमानांबद्दल वा पाकिस्तानबद्दल शत्रुत्वाची भावना आहे तो भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा नागरीक असल्याचा दावा करू शकत नाही. अशा प्रकारच्या शत्रुत्वाची भावना पसरली तर तिची परिणती भारत आणि पाकिस्तानच्या युद्धात होईल. जो कोणी आपल्या स्वतःच्या देशाबद्दल दुर्भावना ठेवील आणि दुसऱ्या देशाला मदत करील त्याला तो देश देशद्रोही समजेल. निष्ठा अविभाज्य असते.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २०४-८

५१. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १६, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला सांगण्यात आले आहे की - आणि काही प्रमाणात ते खरे आहे - काही वस्तू व खाद्य पदार्थ आणि कापड यांच्यावरील नियंत्रण उठवण्यात आले आहे, व अजूनही काही पदार्थांवरून उठवण्यात येईल. आता कंट्रोल उठवले जाण्याच्या मार्गाने आहेत यात काही संशय नाही ब्रिजकिशन यांनी मला त्याचे परिणाम सांगितले आहेत. तेही मी तुम्हाला सांगितले तर चांगले होईल असे मला वाटले. जो गुळ आधी १ रुपया शेर विकला जात होता तो आता आठ आणे शेर मिळू लागला आहे. ही तर मोठी गोष्ट झाली. याहूनही भाव कमी झाले पाहिजे. ते का कमी होऊ नये हे काही मला माहीत नाही. मी जेव्हा तरुण होतो तेव्हा इतके भाव कुठे होते? केवळ एक आणा द्यायचा आणि एक शेर गुळ घ्यायचा. यामुळे अजूनही भाव कमी होत जातील अशीच आशा आहे. हं, फुकट तर तो मिळणार नाही, परंतु पूर्वी जे भाव होते त्या पातळीवर जर ते पोहोचू शकत असतील तर पोहोचायला पाहिजे. साखरेचे भावही ३२ रुपये मण होते ते १६ रुपये मण झाले. इतके भाव उतरले हे पाहून फार चांगले वाटते. मूंग, उडीद आणि तूरडाळ आहे ती एक रुपयाची दीड शेर झाली आहे. किती मोठे अंतर पडले? असेच अंतर हरभऱ्यातही पडले आहे. माझ्या दृष्टीत तर हरभरेही डाळीच्याच प्रकारात मोडतात. परंतु संयुक्त प्रांतात त्यांचा विविध प्रकारे उपयोग होतो म्हणून त्यांना वेगळे ठेवले आहे. हरभरा २४ रुपये मण होता पण आता तो १८ रुपये मण झाला आहे. आणि गहू काळ्याबाजारात ३४ रुपये मण होता तो आता २४ रुपये मण झाला आहे. अशा प्रकारे हे सर्व आहे. आधी तर मला सर्व लोक घाबरवत होते. म्हणायचे की तुम्हाला बाजार कसा चालतो, भाव कसे चढतात उतरतात हे माहीत नाही. तुम्हाला अर्थशास्त्र माहीत नाही, बस महात्मा आहा म्हणून सांगून टाकता. याचा तुमच्यावर परिणाम होणार नाही परंतु गरिबांना तो भोगावा लागेल. परंतु मला दिसणाऱ्या परिणामांप्रमाणे यामुळे गरीब मरणार नाहीत तर तरणार आहेत. यामुळे माझे तर म्हणणे आहे की मका आणि बाजरी यांच्यावरही जे नियंत्रण आहे ते दूर झाले पाहिजे. कारण बाजरी खाणारे बाजरीच खातात, त्यांना गहू पचत नाही. याचप्रमाणे मका खाणारेही बरेच आहेत. ते मकाच खातील. यामुळे त्यांच्यावरील नियंत्रण सुरू ठेवण्याचे मला तर कोणतेही कारण दिसत नाही. सर्व नियंत्रण हळूहळू काढून टाकले जातील असे यामुळेच डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले होते. काही नियंत्रण दूर झाले आहेत आणि इतर जे आहेत तेसुद्धा दूर होतील. त्याचे शुभ परिणामही आपल्यासमोर आले आहेत. हीच गोष्ट आगपेटीची आहे. आता तर तिची फार कमी किंमत द्यावी

लागते. काळ्याबाजाराबद्दल काय बोलायचे, खुल्याबाजारातसुद्धा तिची किती तरी किंमत द्यावी लागते. तिच्यावरील नियंत्रणही काढून टाकण्यात आले तर फार चांगले परिणाम होतील याबद्दल मला मुळीच संशय नाही. आगपेटीवरील नियंत्रण नक्कीच जाईल व तिच्या किंमती निश्चितच कमी होतील. आगपेटीची इतकी किंमत तर कधीच नव्हती. माझ्या काळात तर तिला कोणी विचारतही नव्हते. आज आगपेटीची किंमत एक आणा आहे, परंतु तेव्हा एका आण्यात १२ आगपेट्या मिळायच्या. असाही एक काळ होता आणि आता असा काळ आला आहे. लोकांचे उत्पन्न वाढले तर मला आनंद होतो परंतु महागाई वाढली तर मला आनंद होत नाही. भाव काही वाढायचेही असले तरी ते मेहनत करणारांच्या घरांत गेले पाहिजे. परंतु त्यांच्या घरात जाणार असले तरी भाव इतके वाढू शकत नाहीत. इतके भाव तर तेव्हा वाढतात जेव्हा व्यापार करणारे लोक बदमाष आणि लोभी होतात, त्यांची नियत बिघडते आणि सर्व पैसा त्यांच्या खिशांत जातो. आपण स्वातंत्र्य मिळवून तर बसलो आहोत, आमच्यावर इतके मोठे संकटही आले परंतु तरीही आपल्या वर्तनात नीतिमत्ता आली नाही. योग्य नफ्यावर आपल्या व्यापाऱ्यांनी समाधान मानले तर निर्नियंत्रणामुळे किंमती वाढतील अशी मला मुळीच भीती वाटत नाही. इतकेच नाही तर ज्यांना किंमती वाढण्याची भीती वाटते तेसुद्धा याकरिता अनैकतिकता आणि अप्रामाणिकपणा यांनाच जबाबदार धरतात. व्यापारी केवळ स्वतःच्या नफ्याची चिंता करतात आणि शेतकऱ्यांना व उत्पादकांना केवळ स्वतःचे पोट भरण्याची चिंता आहे. आणि उपभोक्त्याची कोणालाही चिंता नाही. असे जर असेल तर भारतात लोकशाही आहे असे कसे म्हणता येईल? लोकशाहीत अशा गोष्टीला परवानगी कशी देता येईल? लोकशाहीत जनतेवर विश्वास ठेवणे हे सरकारचे कर्तव्य असते. सरकारने स्पष्टपणे सांगितले पाहिजे की जनता जसे म्हणेल तसे आम्ही करू. जनतेला जर अडचणी ओढवून घ्यायच्या असतील तर त्याकरिता आम्हाला जबाबदार धरता येणार नाही. हे खरे आहे की आपल्याजवळ नागरी सेवा आहे. परंतु आपण सर्व लोकांनी स्वतःला शिपाई आणि सेवक समजायला पाहिजे. आज गैरव्यवहार वाढत आहेत. मला सतत चोहोकडून तारा, पत्रे येत असतात. मी तर ऐकले आहे की मुंबईतही फार मोठा घोटाळा सुरू आहे. तो काय आहे हे मला माहीत नाही. परंतु हे सर्व व्हायलाच नको. परंतु आतापर्यंत जे चांगले काम झाले त्याकरिता सरकारचे अभिनंदनच केले पाहिजे. त्यामुळे सरकारलाही उत्साह वाटेल. निर्नियंत्रणाबद्दल इतके पुरे.

नागरी सेवेसंबंधीच्या प्रश्नाचाही विचार करावा लागतो. नागरी सेवेवर इतका अधिक खर्च होत असल्याबद्दल तक्रार करणारी इकडूनतिकडून मला सतत पत्रे येत असतात. नागरीसेवेतील सर्व अधिकाऱ्यांना एकाएकी कसे काढून टाकता येईल? आणि त्यांना काढून टाकले तर काम कसे चालेल? त्यांतील काही तर आधीच गेले आहेत आणि जे आहेत त्यांच्याकडून बरेच काम घेतले जात आहे. आपले जे सरदार आहेत त्यांच्या अंतर्गत हे लोक करत असतात. या लोकांनी फार चांगले काम केले

म्हणून सरदार तर यांना धन्यवाद देत असतात. ते थोडे असले तरी काम सांभाळत आहेत. ते जर धन्यवादाला पात्र असतील तर ते त्यांना दिले पाहिजे. त्यांना दरमहा पगारही तर भरपूर मिळतो. परंतु खरी नागरी सेवा तर आपण आहो. सरकारने खरी नागरी सेवा आम्हाला बनवायला पाहिजे व जितका विश्वास ते नागरी सेवेच्या लोकांवर ठेवतात तितका त्याने आमच्यावर टाकला पाहिजे. नागरी सेवेच्या लोकांनी जर धोका दिला तर त्यांना शिक्षा होऊ शकते व शिक्षा होतेसुद्धा. अशाच प्रकारे त्यांनी आम्हालाही शिक्षा करावी. कोणालाही बोलावून सांगावे की तुला इतके काम करायचे आहे. बदमाशी आणि धोकेबाजी करणारांकरिता शिक्षा सुनावणारा कोणताही कायदा नाही काय? जर असा कायदा नसेल तर मी म्हणेन की असा कायदा केला पाहिजे. ज्या प्रकारे सरकार नागरी सेवेला जबाबदार मानते त्याचप्रमाणे त्याने सर्वसामान्य प्रजेलाही जबाबदार मानले पाहिजे. अखेरीस हे जनतेचे सरकार आहे.

मला हे सर्व का सांगावे लागत आहे? कारण एक नवीन घटना घडली आहे. काँग्रेसचे म्हणणे आहे की मंत्रालयातील प्रत्येक खात्याकरिता एक सांसदीय सचिव असेल व तो नागरी सेवेतील अधिकाऱ्यांमधून नसेल. हा सांसदीय सचिव एक तर काँग्रेस पक्षाचा असेल वा काँग्रेसला पाठिंबा देणाऱ्या पक्षातील असेल. कोणी फुकट तर काम करत नाही. प्रत्येकाला दरमहा पगार द्यायला पाहिजे. आज जर करोडो रुपयांची सत्ता आपल्या हाती आली नसती तर आपण कुठून हे पैसे देऊ शकलो असतो? आज जेव्हा ही सत्ता आपल्या हातात आली आहे तर आम्ही दरमहा दीडदोन हजार रुपये देतो, घर देतो, हे देतो, ते देतो आणि मग सांसदीय सचिव बनवायचे. मला तर हे सर्व खुपते. हा सांसदीय सचिव पंतप्रधाचा असो, गृहमंत्र्याचा असो की अजून कोणाचाही असो.आणि याकरिता संसदेने त्यांना बाध्य करावे? आणि संसद म्हणजे काय काँग्रेस पक्ष. ही संसद हे पद निर्माण करण्याकरिता आज आग्रह धरत आहे. हे सांगताना मला वेदना होतात. काँग्रेस तर सर्व लोकांची आहे. हिंदू, मुसलमान, पारशी वगैरेंनी आपसात भाडू नये म्हणून काही करायचे असेल तर त्याकरिता दरमहा काय मोठा पगार दिला पाहिजे? मगच लोक काम करणार आहेत काय? केवळ पगाराकरिताच काम केले पाहिजे? अशा अवस्थेत भारत एक बेकार देश होऊन जाईल. आपल्यामध्ये काल शक्ती नव्हती आणि आजच ती निर्माण झाली आहे असे तर काही नाही? आधी आपण काही निर्माण करू या. जितके १४ ऑगस्टपूर्वी निर्माण होत होते त्याहून जास्त काय निर्माण केले? आमच्या अन्नधान्याचे उत्पन्न वाढले काय? कापड वाढले की आपल्या उद्योगात वाढ झाली? लोक जेव्हा खऱ्या उद्योगाला लागतील, त्यांच्याजवळचा पैसाअडका वाढेल आणि ते म्हणतील की काय पैसापैसा करता, आमच्याजवळून घेऊन जा तेव्हा मी समजेन की आमचे काम वाढले. परंतु आज तर दरमाणशी दरवर्षी आपले उत्पन्न ७० रुपये आहे. हे उत्पन्न तर काहीच नाही. जेव्हा ते दुपटीने वा त्याहूनही जास्त वाढेल, ग्रामीण लोकांनाही आपले उत्पन्न वाढले आहे असे वाटू लागेल तेव्हा त्यांच्याकडून जास्त पैसे मागता येतीलसुद्धा. परंतु आपले उत्पादन

जर वाढले नसेल व आपण आपले खर्च वाढवत गेलो तर आपली काय अवस्था होईल? असे समजा की एक दुकान आहे - भारतही तर एक मोठे दुकानच आहे - व त्याचा मालक येऊन दररोज आपल्या दिवाणजीला आणि कारकुनाला विचारतो की साहेब आज किती विक्री झाली. त्यांनी जर सांगितले की आज १००० रुपयांची विक्री झाली, काल मात्र ५०० रुपयांचीच विक्री झाली होती तर मालक खुष होईल. आणि मालकाने जर विचारले की खर्च किती झाला व दिवाणजीने जर उत्तर दिले की विक्री १००० रुपयांची आणि खर्च १५०० रुपये तर मालकाचे डोके बिघडेल. त्याचे डोळे लाल होतील व तो आपल्या कारकुनाला वा दिवाणजीला शिव्याही देऊ शकेल. ठीक आहे लाल डोळे करणे चांगले नाही आणि शिव्या देणेही चांगले नाही. परंतु हजार रुपयांची विक्री आणि १५०० रुपये खर्च तर ५०० रुपये मी कुठून आणू आणि ते मला कोण देईल असे जर मालक म्हणाला तर त्याचे हे म्हणणे बरोबरच असेल. आज आपल्या हातात पैसे आहेत म्हणून आपण इतके नाचतो. परंतु तो राहणार नाही. यामुळे आपण इतका खर्च करणे मला खुपते. बस याहून अधिक पुढे जाण्याची आज मला इच्छा नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २०८-१३

५२. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १७, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

होशियारपूरमध्ये राहणाऱ्या एका बंधूने, कदाचित ते तेथीलच असावे, मला किती तरी प्रश्न विचारले. त्यांनी त्यांचे नावही सांगितले आहे, परंतु मी ते उघड करू इच्छित नाही. मी त्यांचा प्रश्नसुद्धा सोडून देईन. ते म्हणतात की विभाजनापूर्वी पंजाब एक होता. यामुळे अनेकांचा व्यवसाय एका भागात तर घरदार दुसऱ्या भागात असे असू शकत होते. या मित्राचा व्यवसाय पश्चिम पंजाबमध्ये होता तर घरदार आणि पैसाअडका पूर्व पंजाबमध्ये होते. हजारो लोकांप्रमाणे त्यांना पश्चिम पंजाबमधून पळून यावे लागले. आपला व्यवसाय पूर्व पंजाबमध्ये आहे म्हणून तिथेच आपला व्यवसाय करता येईल असे त्यांना वाटत होते. परंतु तिथे गेल्यानंतर त्यांच्या घरात सरकारी अधिकारी राहत असल्याचे त्यांना आढळले. त्यांना केवळ दोन खोल्या देण्यात आल्या आणि इतर खोल्या त्या अधिकाऱ्याने ठेवल्या. असे दिसते की ते मोठे घर असावे. मला माझे घर मिळू शकत नाही काय असा त्यांचा प्रश्न आहे. त्यांना जर त्याचे घर मिळाले नाही तर सरकार त्यांना मदत करील काय की त्यांना न्यायालयातच जावे लागेल? मला वाटते की घरमालकाला त्याचे घर परत दिले पाहिजे.

मी आधीही सांगितले होते की निर्वासित लोक वाटेल तिथे जाऊन घराचा ताबा घेतात व तिथे राहू लागतात. एखादे घर कडीकुलुपाने बंद असेल तर त्याचे कडीकुलुप तोडून टाकतात आणि तिथे मुक्काम ठोकतात. तिथे जो अधिकारी राहतो तो भाडे देऊन राहतो हे तर योग्य आहे परंतु घरमालक जेव्हा येतो तेव्हा तो तिथे कसा राहू शकतो? जर त्याला राहायचेही असेल तर घरमालकाशी बोलूनच त्याने घराचा एखादा भाग आपल्याजवळ ठेवावा. परंतु घराचा मोठा भाग आपल्याजवळ ठेवायचा आणि मालकच स्वतःच्या घरात पाहुणा व्हावा असे तर होऊ शकत नाही. परंतु निर्वासित भाडेकरूच्या भूमिकेत नसतात. ते जास्तीतजास्त इतकेच म्हणू शकतात की "आम्हाला आमच्या घरातून हुसकावून लावण्यात आले आहे." म्हणून काय त्यांनी कोणाच्याही घरात घुसून घराचा ताबा घ्यावा? आणि असे घर मुसलमानाचे असले तर सर्व काही संपलेच. निर्वासितांना वाटते की त्या घरावर आपला हक्कच आहे. परंतु अशा प्रकारे वागून ना तर आपण भारताचे भले करू शकतो ना स्वतःचे. माझी तर खात्री आहे की अशा वर्तनाने कधीही कोणाचेही भले होऊ शकत नाही. चोऱ्यामाऱ्या करून वा संपत्ती लुटून वा कोणाचे घर वगैरे जाळून माणूस काय कधी स्वतःचे भले करू शकतो? मग हे लोक स्वतःचे भले कसे करू शकतील? अशा प्रकारे जर गोष्टी सुरू राहिल्या आणि पाकिस्तानमध्ये मुसलमानांशिवाय

अजून कोणीही राहू शकत नसेल तर कसे होईल? "मुसलमानांच्या गोड बोलण्याला मी भुलून जाऊ नये आणि स्वतःची फसवणूक करून घेऊ नये अशी पत्रे तर माझ्याकडे दररोज काही ना काही येत असतात." इतके खरे की जर कोणी मुसलमान नसेल तर तो पाकिस्तानमध्ये आरामात राहू शकत नाही. परंतु अखेरीस पाकिस्तानमध्ये केवळ मुसलमान राहिले तर ते आपसात भांडू लागतील. पाकिस्तान वा भारतात असे काही घडत असेल तर ते चांगले नाही. आणि भारतात जर असे घडणार असेल तर ते अजूनच वाईट आहे कारण भारतात केवळ हिंदूच राहू शकतात असे आपण कधीही म्हणालो नव्हतो. जो कोणी भारतात जन्मला असेल व स्वतःला भारतीय समजत असेल त्याला भारतात राहण्याचा अधिकार आहे. असे जर होते आणि आजही आहे तर आमच्याजवळ तक्रार करण्यासारखे काहीही राहत नाही. पाकिस्तानबद्दल तर अनेक वर्षांपासून ते म्हणत असत की मुसलमानांना राहण्याकरिता एखादी जागा असली पाहिजे. याचा तर अर्थ असाच झाला की तिथे अजून कोणी राहो वा न राहो मुसलमान तिथे राहतीलच. परंतु १४ ऑगस्टला जेव्हा पाकिस्तान वास्तवात आले तेव्हा प्रत्येकाला पाकिस्तानमध्ये राहण्याचा अधिकार आहे असे ते म्हणाले होते. यामुळे मला ही गोष्ट फार आवडली. परंतु खुपणारी गोष्ट ही आहे की जे काही सांगितले जाते त्याची अंमलबजावणी होत नाही. इथे जर हिंदू आणि शीख असे करतील तर त्यात मला या दोघांचाही संहार आणि विनाश दिसेल. त्यात मला वेगळे काही दिसत नाही हे मी सांगून ठेवतो.

लाहोरमधील एक बंधू लिहितात की "मला माझ्या इच्छेविरुद्ध घर आणि जमीनजुमला सोडावा लागला". आता ते लाहोरमध्ये नाहीत. ते म्हणतात की "मला तिथून निघावे लागले, निघून येण्याची इच्छा होती असे काही नाही. परंतु निघालो आणि पश्चिम पंजाब सोडून इथे आलो. तुम्ही मला परतण्याचा सल्ला दिल्यामुळे मी परत गेलो. तिथे गेल्यानंतर मी पाहिले की माझ्या जमिनीचे व घराचे काहीच होत नाही. मला मोठ्यामोठ्या गोष्टी सांगण्यात आल्या परंतु माझे घर आणि जमीनजुमला काही परत मिळाले नाही. असे असताना परत तिथेच जा असे तुम्ही कसे म्हणू शकता?"

मी या प्रश्नाचे अनेकदा उत्तर दिले आहे. आणि आताही कोणी काही लिहिले असल्यामुळे काही तरी लिहावेच लागेल. मी स्पष्टपणे म्हणालो होतो की जाण्यासारखी परिस्थिती होईल तेव्हा मी सागेन. मी तर तेव्हा तयारीबद्दल म्हणालो होतो. ज्यांची मनातून परतायची इच्छा आहे त्यांनी परतण्याकरिता तयार राहावे. आधी तर ज्या मुसलमान बांधवांनी या गोष्टीत पुढाकार घेतला होता त्यांनी परत जायचे आहे. परंतु अजून तर या केवळ गोष्टी आहेत, परंतु या गोष्टी केवळ गोष्टी राहतील असे नाही. पाकिस्तान सरकारचे नाव घेऊन ते बोलले होते. एक तर आम्ही अपयशी झालो व ज्या हिंदूंना परतायचे असेल ते परतू शकतात असे पाकिस्तान सरकारच्या वतीने सांगण्यात आम्ही चूक केली असे

अखेरीस त्यांना मान्य करावे लागेल. पत्रलेखकाचे म्हणणे आहे की घोषणा ही एक गोष्ट आहे आणि प्रत्यक्षातील वागणे अगदी वेगळी. मी परत जायला पाहिजे काय असे पत्रलेखकाने विचारले आहे. त्याला तसे विचारण्याचा निश्चितच अधिकार आहे. सध्या कोणत्याही निर्वासिताने परतण्याचा प्रश्नच उद्भवत नाही हे मी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. अनेक लोकांना परतायची इच्छा आहे. मी त्यांना सांगतले की जेव्हा परतायची वेळ येईल तेव्हा मी तुम्हाला तारीख सांगेन. सध्या मी कोणालाच जाण्याकरिता सांगणार नाही. इतक्या लवकर यासंबंधी कोणीही काहीही सांगू शकत नाही. परंतु हे मुसलमान बंधू जेव्हा आश्वासन देतात तेव्हा फार बरे वाटते. त्यांना जर यश आले तर वातावरणात सध्या जे विष भरले आहे ते ताबडतोब नष्ट होईल याची मला खात्री आहे. जे करण्याची आवश्यकता आहे ते केले जाईल हे पाहण्याची गरज आहे. परंतु सध्या तरी पत्रलेखकाने आणि त्यांच्यासारख्या लोकांनी शांत राहावे. वेळ येईल तेव्हा मी सांगेन. अखेरीस पाकिस्तानमध्ये गुप्तपणे जाण्याची कोणालाही इच्छा नाही. ५००० लोकांना परत नेता येऊ शकेल अशा आगगाडीची व्यवस्था पाकिस्तान सरकार करील अशी मी अपेक्षा करतो. तसे झाले तर ते स्वतःहोऊन आणि अधिकारवाणीने जातील. ते पाकिस्तानमध्ये परत जातील कारण त्यांना निमंत्रित करण्यात आलेले असेल.

अजून एका तिसऱ्या गोष्टीसंबंधी मला बोलायचे आहे. ती आहे पूर्व आफ्रिकेसंबंधी. तुम्हाला माहीतच असेल की नैरोबी हा पूर्व आफ्रिकेतील सर्वात चांगला भाग आहे. तो भारतातील सिमल्यासारखा आहे. आपल्या भारतात ४ वा ५ महिने सुंदर हवामानाचे असतात आणि बाकीच्या महिन्यात भयंकर उकाडा असतो. विशेषतः सपाटीच्या प्रदेशात असे जास्त होते. मग लोकांना थंड हवा हवी असते आणि ते त्याकरिता सिमल्याला वा दार्जिलिंगला जातात. भारत मोठा देश आहे. पूर्व आफ्रिका इतका मोठा नाही. याशिवाय नैरोबीला घडवणारेही शीखच होते. शीख लोक काही असे तसे थोडेच आहेत, अतिशय कार्यक्षम लोक आहेत ते आणि फार मेहनत करणारे व मजबूत लोकही आहेत ते. अतिशय मेहनत करून त्यांनी तिथे रेल्वे तयार केली. परंतु खास गोष्ट अशी आहे की रेल्वे बनवली त्यांनी आणि आता ते तिथे जाऊसुद्धा शकत नाही. जाऊ शकतात, परंतु केवळ मजुरी करण्याकरिता, राहण्याकरिता वा व्यापार करण्याकरिता नाही. नैरोबीबद्दल इतके पुरे. परंतु गोष्टी इथेच थांबत नाहीत. एकदा पहिले पाऊल चुकीचे पडले तर सर्व काही भरकटत जाते. यामुळे आता ते पूर्व आफ्रिकेत भारतीयांच्या येण्यावर प्रतिबंध घालणारे विधेयक मंजूर करू इच्छितात. दक्षिण आफ्रिकेत केले होते त्याचप्रमाणे इथेही करण्याची त्यांची इच्छा आहे. भारतीयांचे हक्क हिरावून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अजून हा कायदा झालेला नाही परंतु त्यासंबंधीचे विधेयक त्यांच्या विधिमंडळात आले आहे. यामुळे तिथे राहणारे आपले भारतीय बांधव आपल्याकडून अपेक्षा तर करतीलच. पंडित नेहरूंनाही त्यांनी लिहिले आहे कारण ते आपले विदेशमंत्री आहेत. बाहेर जे काही होते ते सर्व त्यांच्या हाती

असते. याशिवाय ते आपले प्रधानमंत्रीही आहेत. यामुळे त्यांनी पंडित नेहरूंना एक तार पाठवली आणि त्याची प्रत मला पाठवली. याबाबतीत काही तरी म्हणावे अशी त्यांची इच्छा आहे आणि मी आफ्रिकेत राहिलेलो असल्यामुळे माझ्यावर त्यांचा जास्त हक्क आहे. यामुळे यासंबंधी बोलण्याची मी संधी घेतो. माझा आवाज तिथे पोहोचेल याबद्दल मला शंका नाही. भारत आता स्वतंत्र देश आहे. स्वतंत्र भारताला अशी वागणूक मिळणार आहे काय? मोंबासा आणि पूर्व आफ्रिका हे ब्रिटिशांचे प्रदेश आहेत. ब्रिटिश प्रदेशात गेलेल्या भारतीयांचे अशी अवस्था होणार आहे काय? तिथे मोठ्या संख्येत भारतीय व्यापारी आहेत हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. त्यातील बरेच खोजा आहेत आणि काही मुसलमान. तिथे अनेक हिंदूही आहेत. ते भारताच्या सर्व भागांमधून गेलेले आहेत. तेथील हब्शी लोकांशी व्यापार करून त्यांनी बराच पैसा मिळवला आहे. ब्रिटिशांनी त्या भागात प्रवेश करण्याच्या पूर्वीपासून ते तिथे गेलेले होते. इतकेच नाही तर युरोपीय लोकांनीसुद्धा त्या वेळी त्या भागात प्रवेश केलेला नव्हता, आणि केलाच असेल तरी त्यांची संख्या नगण्य होती. भारतीयांनी तिथे मोठमोठे महाल बांधले आहेत कारण तसे करण्याची त्यांच्यात क्षमता होती. इतकेच नाही तर त्या काळात आपली जहाजेसुद्धा तिथे होती. परंतु आपली जेव्हा अवनती झाली तेव्हा आपली जहाजेही गेली.

यानंतर ब्रिटिश आणि इतर युरोपीय लोक तिथे गेले. ही लांब कहाणी आहे आणि त्यात शिरण्याची माझी इच्छा नाही. हब्शी लोकांमध्ये भारतीय शांतपणे राहत होते व त्यांच्याशी व्यापार करत होते. ते प्रामाणिकपणे व्यापार करत होते असे मी म्हणणार नाही परंतु त्यांनी बळजबरीने कुणाकडूनही काहीही घेतले नाही. मुसलमानही तिथे गेले होते आणि असे काही नाही की मुसलमानांना तिथे काही जास्त मिळाले होते आणि हिंदूंना कमी. तेथील हिंदू आणि मुसलमानांमध्ये आजही सांप्रदायिक वाद नाही. यामुळेच ते सगळे एक होऊन लिहितात की हे विधेयक तुम्ही काही ना काही करून अडवा. असे झाले नाही तर आमचे फार मोठे नुकसान होईल. माझे तर म्हणणे आहे की हे विधेयक थांबवले पाहिजे.

भारत एक स्वतंत्र राष्ट्र आहे आणि यासंबंधी जे करणे आवश्यक असेल ते जवाहरलाल करील याची मला खात्री आहे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २१३-८

५३. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १८, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १८, १९४७

बंधूंनो आणि भगनींनो,

एका बंधूंचे एक पत्र आले आहे. त्यात त्यांनी विचारले की तुमचा जर इंग्रजीच्या वापराला आक्षेप आहे तर मग उर्दूच्या वापराला का नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे भारत जर सर्वांचा मित्र आहे तर इंग्रज आणि मुसलमान आपल्याकरिता सारखेच असले पाहिजे.

या बंधूंना जे दुःख झाले आहे ते अज्ञानामुळे झाले आहे. अज्ञानाशिवाय याचे काही वेगळे कारण असू शकते असे मला तरी वाटत नाही. उर्दूला माझा आक्षेप नाही, मी तर तिचे समर्थन करतो. प्रांतिक भाषांच्या पातळीवर तर उर्दू आहे, पंजाबी आहे, मराठी, गुजराती, बंगाली उडिया वगैरे सर्व भाषा आहेत. जितके भाषावार प्रांत आहेत तितक्याच भाषा आहेत. भारतात अशा तर अनेक भाषा आहेत परंतु सर्व विद्वानांनी मिळून ठरवले त्या प्रमाणे १४ वा १५ भाषा बऱ्याच भव्य आहेत. त्यांचे स्वतःचे साहित्य आहे आणि त्यांच्यापासून आपण काही ना काही शिकतो. परंतु या चौदा वा पंधरा भाषा सर्व प्रांतांत तर चालू शकत नाहीत. परस्परांशी व्यवहार करण्याकरिता सर्व प्रांतांची कोणती भाषा असली पाहिजे हा प्रश्न आहे. जेव्हापासून मी दक्षिण आफ्रिकेतून परतलो तेव्हापासून मी हेच सांगतो आहे की आपली राष्ट्रभाषा तीच असू शकते जी बहुसंख्याक हिंदू आणि मुसलमान बोलू शकतात. अशी भाषा देवनागरी आणि उर्दू लिपीत लिहिली जाणारी हिंदुस्तानीच असू शकते. मी तर सांगितले आहे की मी उर्दूचे समर्थन करतो परंतु सगळ्या जगाचा मित्र असूनही मी इग्रजीचे समर्थन का करत नाही ही समजून घेण्यासारखी गोष्ट आहे. इंग्रजीला या देशात स्थान नाही. इंग्रजांनी इथे राज्य केलेले असल्यामुळे इंग्रजीला महत्त्व आले. परंतु इंग्रज गेल्यानंतर इथे जे राज्य चालवायचे आहे ते आपल्या भाषेत चालवायचे आहे. इंग्रजी विदेशी भाषा आहे स्वदेशी भाषा नाही. यामुळे मी लाजेने नाही तर अभिमानाने सांगत असतो की उर्दू ही भारतीय भाषा आहे, तिची घडण भारतात झाली आहे. तुलसीदासचे तर आपण भक्त आहो, आणि असायलाही पाहिजे. तुम्हाला हे पाहून आश्चर्य वाटेल की त्यांच्या रामायणात किती तरी अरबी आणि फारसी शब्द घेतलेले आहेत. बाजारात जे शब्द बोलले जात होते तेच शब्द त्यांनी घेतले. अखेरीस त्यांनी जे लिहिले आहे ते तुमच्याकरिता व माझ्याकरिता लिहिले आहे. जे थोडेसे लोक संस्कृत बोलणारे आहेत त्यांच्याकरिता तुलसीदासजींनी थोडेच लिहिले आहे. यामुळेच जी तुलसीदासजींची भाषा आहे तीच आमची भाषा आहे. आपली राष्ट्रभाषा कोणती आहे याचा जर तुम्हाला निर्णय घ्यायचा असेल तर मी दाव्याने सांगू शकतो की आमची राष्ट्रभाषा तीच

असू शकते जी उर्दू आणि देवनागरी लिपीत लिहिली जाते. याकरिता मला लोकांनी मारले, कापले वा अजून काही केले तरी मी असेच म्हणेन.

लाला लजपतराय (जानेवारी २८, १८६५ - नोव्हेंबर १७, १९२८; पंजाबमधील राष्ट्रवादी पुढारी, शिक्षाविद आणि पत्रकार; १९०७ साली पंजाबमध्ये कृषक आंदोलन सघटित केले. बह्मदेशात तडीपार केले; भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष, १९२०; सायमन आयोगाच्या विरोधात निदर्शने करत असताना झालेल्या जखमांमुळे मृत्यू.) यांना पंजाबकेसरीम्हणून ओळखत असत. ते आता नाहीत. ते माझे मित्र होते. तुम्ही हिंदी कधी शिकणार असे मी त्यांना थट्टा करत विचारत असे. ते म्हणत की कधीही नाही. ते आर्यसमाजी होते हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. (आर्यसमाजाचे सदस्य, दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेला हिंदू धर्माचा सुधारणावादी पंथ) ते होमहवन व इतर अनेक धार्मिक परंपरांचे पालन करत असत. त्यांच्याबरोबर राहत असताना मी हे सर्व पाहत असे. हवनात केवळ संस्कृत भाषेचा उपयोग होत असे आणि विचित्र गोष्ट तर ही होती की हे सर्व असतानाही ते थोडेथोडे वाचू शकायचे. परंतु त्यांची मातृभाषा उर्दूच होती. ते म्हणायचे की उर्दूत कोणी मला बोलायला सांगितले तर मी तासंतास बोलू शकतो, आणि बोलायचेही. आणि काय सांगू उर्दूचे तर ते फार मोठे विद्वान होते व उर्दूत फार जलदगतीने लिहू शकायचे. ते इंग्रजीतही तासंतास बोलू शकायचे. परंतु संस्कृतप्रचूर हिंदी तर त्यांना कळतसुद्धा नसे. जेव्हा मी निवडूननिवडून अरबी, फारसी शब्द वापरत असे तेव्हा कुठे त्यांना मी काय बोलतो ते कळत असे. आता जेव्हा मी त्यांची गोष्ट सांगितली तर असे समजा की सर्वांची सांगितली. आता हे बंधू विचारतात की उर्दूवर आक्षेप का नाही? मी तर म्हणेन की कोणाचाही आक्षेप असू नये. परंतु इंग्रजीवर माझा आक्षेप आहे. अखेरीस हिंदी साहित्य संमेलनाचाही मी दोनदा अध्यक्ष राहिलो आहे (मार्च १९१८ आणि एप्रिल १९३५) आणि अध्यक्ष म्हणून मी ही गोष्ट दोनदा सांगितली होती आणि कोणीही आक्षेप घेतला नव्हता. कोणी तक्रार केलीही असेल तर एकदोन लोकांनी केली असेल. खरे म्हणजे त्यांनी त्याचे टाळ्या वाजवून स्वागत केले व मी जे काही म्हणतो आहे ते योग्य आहे असेही ते म्हणाले. आजही मी तोच माणूस आहे. मग मी हिंदीची बाजू कमी घेतो म्हणून मी कमी भारतीय आहे असे कसे म्हणता येईल?

आज आपण गोंधळात सापडलो आहो आणि आपण आपल्याकरिताच विष निर्माण केले आहे. हीच गोष्ट अजमेरमध्ये घडली. तुम्हाला जर हिंदू धर्म वाचवायचा असेल तर भारतात राहत असलेल्या मुसलमानांना शत्रूप्रमाणे वागवून तुम्ही असे करू शकणार नाही. या जगातील माझे थोडेच दिवस राहिलेले आहेत. थोड्याच दिवसात मी निघून जाणार आहे. मी जे काही म्हणतो ते बरोबर होते हे तेव्हा तुम्हाला कळेल. हीच गोष्ट मुसलमानांनाही लागू होते. मुसलमान जर केवळ मुसलमानांनाच

ओळखतील आणि इतर सर्व आमचे शत्रू आहे असे म्हणतील तर इस्लाम मृतप्राय होईल. हीच गोष्ट ख्रिश्चनांना आणि ख्रिश्चनधर्मालाही लागू आहे. जे बायबलला मानतात तेच खरे अहले किताब आहेत वा जे कुरण शरीफला मानतात तेच खरे अहले किताब आहेत तर मी म्हणेन की ते चुकीच्या मार्गावर आहेत. जगातील सर्व धर्म चांगले आहेत कारण ते नैतिकता आणि मैत्री शिकवत असतात. जे धर्म माणसामाणसात शत्रूत्व शिकवतात त्यांना मी धर्म समजत नाही.

इंग्रजांच्या काळातही मी म्हणत असे की भारताची भाषा इंग्रजी असू शकत नाही. मला ती लिहिता वाचता येते. मी इंग्रजांचा वा त्यांच्या भाषेचा शत्रू नाही हे प्रत्येकाला माहीत आहे. प्रत्येकाची एक जागा असते. इंग्रजी आंतरराष्ट्रीय भाषा आहे. आपल्याला जर विदेशांशी व्यवहार करायचा असेल तर आपण तो इंग्रजीतूनच करू शकतो. इंग्रजी विश्वभाषा आहे. हिंदुस्तानीला ती सार्वत्रिक मान्यता मिळालेली नाही. आपण इंग्रजांच्या राज्यातून मुक्त झालेलो असलो तरी इंग्रजी संस्कृतीच्या प्रभावापासून आणि इंग्रजी भाषेपासून आपण मुक्त झालेलो नाही ही खेदाची गोष्ट आहे.

लक्षात ठेवा की गंगा आणि यमुनेचा ज्याप्रमाणे प्रयागमध्ये संगम झाला आहे त्याप्रमाणे हिंदी आणि उर्दूचा हिंदुस्तानीत संगम झाला आहे. हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांचे व्याकरण सारखे आहे व तेच हिंदुस्तानीचेही व्याकरण आहे. तिच्यात संस्कृत, फारसी, इंग्रजी आणि इतर अनेक भाषांमधील शब्द आहेत. कोर्ट हा शब्द जितका विदेशी आहे तितकाच कचहरी हा शब्दही विदेशी आहे. यामुळे पहिला शब्द नाकारून दुसरा स्वीकारण्यात काहीही अर्थ नाही. याचप्रमाणे बायसिकल आणि रेल हे शब्द आहेत. तुम्ही रेल या शब्दाकरिता दुसरा कोणता शब्द वापराल? सत्य हे आहे की किती तरी इंग्रजी शब्दांनी आपल्या भाषेत प्रवेश केला आहे आणि आपण त्यांचा दुस्वास करत नाही. परंतु पत्रलेखक जर कोणी मला इंग्रजीत पत्र लिहित असेल तर त्याला हिंदुस्तानी येत नाही असे म्हणून मी त्याचे पत्र बाजूला फेकून देईन. याचप्रमाणे मी जर त्याला इंग्रजीत पत्र पाठवले तर त्यालाही ते पत्र फेकून देण्याचा अधिकार असेल. वास्तवात ही गोष्ट फार साधी आहे परंतु काय योग्य आणि काय अयोग्य हेच आपण विसरलो आहो. आपल्यामध्ये एक प्रकारची विकृती निर्माण झाली आहे. ईश्वर आपले रक्षण करो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ २१८ - २२

५४. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १९, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज दुपारी मेवोंना भेट देण्याकरिता मी गुडगावला गेलो होतो. तिथे तीन प्रकारचे मेवो होते. एक तर अलवरहून पळून आले होते, दुसरे भरतपूरहून आणि तिसरे तेथीलच. पूर्व पंजाबचे प्रधानमंत्री गोपिचंद भार्गवही सोबत होते. त्यांनी मेवोंना सांगितले की ज्यांची राहण्याची इच्छा आहे त्यांना कोणीही हटवू शकत नाही. सरकार त्यांचे रक्षण करील. लाखो लोकांना आपले घरदार आणि जमीनजुमला सोडून जावे लागले. कोणी जास्त पाशवीपणा केला या प्रश्नाचा विचार करण्यात अर्थ नाही कारण जे शत्रुत्व निर्माण झाले आहे ते अशा चर्चेने संपवता येऊ शकत नाही आणि कोणी आरामात बसू शकत नाही. या दोन संप्रदायांतील कायम शत्रुत्व आपल्या नशिबात असू नये. असे झाले तर त्याचा शेवट आपल्या विनाशात होईल. मी तर सांगितलेच आहे की हे मी सहन करू शकत नाही. हं, ज्यांनी जायचे ठरवले आहे वा जे घाबरल्यामुळे जाऊ इच्छितात त्यांना कोणीही अडवू शकत नाही, परंतु जाण्याकरिता कोणावरही बळजबरी केली जाणार नाही. जे काही होईल ते त्या लोकांच्या इच्छेप्रमाणे होईल. परंतु कोणालाही बळजबरीने जाण्याकरिता भाग पाडण्यात येऊ नये. सरकारने असे करू नये, सरकरी अधिकाऱ्यांनी असे करू नये आणि जनतेनेही असे करू नये. आणि कोणी असे करत असेल तर तो वेडेपणा होईल. तिथे सर्व भगिनीही होत्या आणि पुरुषही होते. सर्व दुःखी आहेत. अनेकांकरिता निवाऱ्यापुरते तंबूसुद्धा नाहीत, आणि थंडीचे हे असे दिवस आहेत. ही सर्व एक अतिशय दुःखद कहाणी आहे. अलवर संस्थानाने त्यांना परत बोलावून आपली चूक कबूल केली पाहिजे. अशीच गोष्ट भरतपूरची आहे. मेवो गुन्हेगार जमात आहे असे आपण म्हणू शकत नाही. कोण गुन्हेगार आहे आणि कोण नाही हे कोण सांगू शकतो? तुम्ही त्यांना मारून टाकणार काय? असे कधीही चालणार नाही. तुम्ही त्यांच्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे आणि शिक्षण दिले पाहिजे व त्यांना सुसंस्कृत जीवनाचा मार्ग दाखवला पाहिजे.

माझा दुसरा विषय साखरेसंबंधी आहे. साखर प्रत्येक ठिकाणी तयार होत नाही. ती जिथे तयार होते तेथून ती दुसरीकडे न्यावी लागत असते. आपल्या इथे जर साखर नसेल तर आपल्याला ती संयुक्त प्रांतातून वा कोईम्बतूरहून बोलवावी लागते. परंतु हे कसे करावे? ती केवळ रेल्वेमार्गानेच येऊ शकते. परंतु आपल्याजवळ तर गाड्या नाहीत. जॉन मथाई यांच्या हातात हा विभाग आहे. ते याबाबतीत असहाय आहेत. ते म्हणतात की सर्व रेल्वे वाघिणी आधीच कामात आहेत व त्यांचा पूर्ण उपयोग

करण्यात येत आहे. याशिवाय, लोखंड, कोळसा आणि कर्मचारी या सर्वांचीही उणीव आहे. याशिवाय साखर उत्पादक सारख्या किमती वाढवत आहेत आणि डोक्यावरून तिची वाहतूक करता येत नाही. परंतु रेल्वेच्या वाघिणीचा जरी तुटवडा असला तरी ट्रकने ही वाहतूक करता येऊ शकते. ट्रक रेल्वेइतकेच वेगात धावू शकतात व त्यांच्या वाहतुकीकरिता लोखंडी रूळही लागत नाहीत. परंतु ट्रक वा लॉरींकरिता पेट्रोल पाहिजे व अजूनही पेट्रोलवर नियंत्रण आहे. पेट्रोलवरील नियंत्रण निघाले तर ट्रक आणि लॉरी अधिक सहजपणाने धावू लागतील व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल नेऊ शकतील. मिठाची वाहतूकसुद्धा त्यामुळे अधिक सोपी होईल. आपण इतके सगळे मीठ तयार करतो आणि आता त्याच्यावर करसुद्धा नाही आणि तरीही ते महाग आहे ही विचित्र गोष्ट आहे. याचे कारण पुरवठा होत नाही. मीठ तयार करण्याकरता व त्याचा पुरवठा करण्याकरिता ठेकेदारांची जी नेमणूक केली जाते ती चूक आहे असे मला वाटते. सर्वांना मीठ आणण्याची परवानगी असली पाहिजे. पेट्रोलवरीन नियंत्रण निघाले तर ट्रकचा उपयोग मीठ आणि इतर गोष्टींच्या वाहतुकीकरिता करता येईल. एका वस्तूवरील नियंत्रण काढायचे आणि दुसऱ्या वस्तूवरील तसेच राहू द्यायचे हे बरोबर नाही. एकदा का नियंत्रण हटवायचा निर्णय घेतला तर ते सर्व गोष्टींवरून काढून टाकले पाहिजे आणि लोक काय करतात हे पाहिले पाहिजे. बाजारात पेट्रोल नाही असे आपण म्हणू शकत नाही. पेट्रोलचा काळा बाजार चालू आहे व जोपर्यंत पेट्रोलवर नियंत्रण राहील तोपर्यंत काळा बाजार सुरू राहील. चोरबाजार तर अंधारात चालला पाहिजे, परंतु तो तर दिवसाढवळ्या चालू आहे. मग त्याला काळा बाजार म्हणायचे की पांढरा वा अजून कोणते नाव द्यायचे? यामागे काय होते? ऐकले आहे की यामागे खूप लाचलुचपतही चालते. जो पेट्रोलचा अधिकारी असतो त्याच्या हातात थोडा पैसा ठेवलाच पाहिजे. थोडा म्हणजे रुपया दोन रुपये नाही, शेकडोने गोष्टी चालतात. जेव्हा एक गोष्ट वाईट होते तेव्हा तिच्याबरोबर इतरही अनेक वाईट गोष्टी सुरू असतात. ज्या गोष्टींवरून नियंत्रण निघाले आहे त्यांच्या बाबतीत आपल्याला थोडी सवलत मिळाली असेच समाधान लोकांना वाटत आहे. आणि पेट्रोल तर काही खाण्याची गोष्ट नाही आणि ना ती प्रत्येकाच्या गरजेची गोष्ट आहे. जे लोक मोटारीची वाहतूक करतात त्यांना पेट्रोल पाहिजे. सरकारला जितके पेट्रोल पाहिजे तितके त्यांनी आपल्याकरिता ठेवून घ्यावे आणि बाकीचे खुल्या बाजारात मोकळे करावे. समजा की पेट्रोल बाजारात अगदीच मिळत नाही आणि रेल्वेही सर्वच्या सर्व बंद झाल्या तरी भारताचा कारभार पेट्रोल नसल्यामुळे बंद पडणार नाही. केवळ माल वाहतुकीची आज जी पद्धत आहे ती बदलून जाईल. मग आपण पूर्वीच्या काळाप्रमाणे मालवाहतूक करू. पेट्रोलवरील नियंत्रण निघाले तर मला त्याची मुळीच भीती वाटत नाही.

अजून एक गोष्ट ही आहे की आपल्याकडे पुरेसे अन्नधान्य निर्माण होत नाही. मग लोकांना सांगा की जमिनीत पेरणी करा म्हणजे तिच्यातून अन्नधान्य निर्माण होईल. गोष्ट तर खरी आहे परंतु

त्याकरिता जी तयार रासायनिक खते येतात त्याकरिता आम्ही काही कोटी रुपये फुकट देतो, वा असे म्हणा की जमीन खराब करण्याकरिता ते पैसे देतो. हे माझे म्हणणे नाही, मला तर हे कळतसुद्धा नाही. परंतु ज्या लोकांना याची माहिती ते हे सांगतात. मीराबेननेच हे सर्व केले आहे आणि तिनेच या गोष्टीतील तज्ज्ञांना बोलावले आहे. तिला हौस आहे आणि ती खरोखरच शेतकरी झाली आहे.

अजूनही मोठमोठे लोक तिच्याबरोबर आहेत. राजेंद्र बाबू तर आहेतच शिवाय सर दातार सिंगही आहेत. याशिवाय शेतीची कमीअधिक माहिती ठेवणारे जे चांगले चांगले लोक आहेत तेही आले होते. ते भेटले आणि त्यांनी जे केले ते वर्तमानपत्रांमध्ये आलेले आहे. खत कसे बनवावे हे त्यांनी सांगितले आहे. त्याला जिवंत खत म्हणतात. आपल्याकडे शेण तर भरपूर होते आणि जिथे माणूस असतो तिथे विष्टा ही असतेच. यांनी चांगले खत तयार होते. ते मिसळल्यानंतर ते खत कसे झाले हे कोणीही सांगू शकत नाही. ते बनल्यानंतर हातात घेतले तर त्यातून सुगंध बाहेर पडतो, दुर्गंध नाही. अशा प्रकारे त्याच्यात परिवर्तन होते. जे काही गवत असते, काडीकचरा असतो तो सर्व मिसळला जातो व फुकटात खत तयार होते. कचऱ्यातून कोट्यवधी रुपये कसे निर्माण करता येऊ शकतात याचा विचार करण्याकरिता हे काही लोक दोनतीन दिवस बसले होते. या परिषदेत अनेक ठराव मंजूर करण्यात आले. त्या सर्वांचा आशय हाच होता की आपण सर्वांनी शेतीत मेहनत केली पाहिजे व जिथे एक मण धान्य पिकते तिथे चार मण धान्य पिकवले पाहिजे. आज मिराबेन गेल्या. त्या हरिद्वारजवळील हृषिकेष इथे राहतात. हे काम तिथे सुरू ठेवण्याचा त्यांचा विचार आहे. हे सर्व तुम्हाला सांगावे आणि त्याचा तुम्हाला जो काही उपयोग करायचा असेल तो तुम्ही करावा असे मला वाटले.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २२२-६

५५. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २०, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अतिशय दुःखाची गोष्ट आहे की दिल्लीत परत दंगली सुरू झाल्या आहेत. त्या क्षुल्लक प्रमाणात आहेत परंतु तरीही ही खेदाची गोष्ट आहे. सर्व मुसलमानांनी येथून जायला पाहिजे असे आपल्याला वाटत असेल तर आपण त्यांना तसे स्पष्टपणे सांगितले पाहिजे हीच सभ्यपणाची गोष्ट होईल. अथवा मुसलमानांना आम्ही सुरक्षितपणे ठेवू शकत नाही असे सरकारने त्यांना सांगणे योग्य होणार नाही काय? वा हळूहळू दंगलींमध्ये मारले जाण्याऐवजी तुम्ही निघून जाणे उत्तम असे आपण सर्वांनी मिळून त्यांना सांगितले पाहिजे. परंतु आपण जर त्यांना असे सागितले तर त्यात मला हिंदू धर्म आणि शीख धर्म या दोन्ही धर्मांचा विनाश दिसतो. त्याचप्रमाणे आपल्या देशात मुसलमानांशिवाय इतर कोणीही राहू शकणार नाही असा निर्णय पाकिस्तान घेणार असेल तर त्यात मला पाकिस्तानमधील इस्लामचाही अंत दिसतो. भारतात तर फार जास्त मुसलमान राहिलेले नाहीत. आपण आधीच मोठ्या संख्येत मुसलमानांना घालवून लावले आहे. ते काही स्वतःहोऊन गेले नव्हते. त्यांना जाण्याकरिता आपण भाग पाडले होते. आपण शूर, सज्जन आणि धैर्यशाली झालो पाहिजे. मुसलमानांनी भारतात राहू नये असे केवळ भ्याड माणूसच म्हणेल. मुसलमान भारतात का राहू शकत नाही? ते जर वाईट असतील तर त्यांच्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे. हिंसेने नाही तर समजावून. हिंदूंनी आणि शिखांनी पाकिस्तानमध्ये भीतीच्या दडपणाखाली राहावे आणि मुसलमानांनी भारतात तशाच मानसिकतेत राहावे आणि इथे सगळे लोक आरामात राहू शकतात, तिथे आरामात राहू शकतात अशा मोठमोठ्या गप्पा आम्ही मारायच्या ही गोष्ट तर मला फार खुपते. मी तर आपल्या सरकारलाही सांगत असतो की तुम्ही तुमचे वचन पार पाडले पाहिजे. सैन्य, पोलीस आणि अधिकारी या सर्वांनी चांगले व्हायला पाहिजे. आपण जर चागुलपणाने वागू तर आपण प्रगती करू शकू. असे केले नाही तर सत्तेचे जे लगाम आपल्या हातात आले आहेत ते निसटून जातील.

चरखा संघाची जी सभा झाली होती त्यातील ग्रामोद्योग संघाची गोष्ट मी तुम्हाला अजून सांगितली नव्हती. थोडेसे सूचीत केले होते हे खरे आहे. चरखा संघ तर ग्रामोद्योग संघाच्या केंद्रस्थानी आहे. सात लाख गावात चरखा चालला नाही तर इतर गृहोद्योगही चालू शकणार नाहीत. चरखा सूर्य आहे आणि इतर जे उद्योग आहेत ते त्याचे ग्रह आहेत. ते सुर्याच्या अवतीभवती फिरत असतात. परंतु सूर्यच नाहीसा झाला तर इतर ग्रह फिरू शकणार नाही. त्यांची रचनाच अशी झालेली आहे. परंतु

खेड्यांचा सूर्य कोणाला म्हणावे? भारताचा सूर्य तर तो आहे जो आपल्या ध्वजातील चक्राप्रमाणे सुशोभित होत आहे. तुम्ही त्याला सुदर्शन चक्र म्हणू शकता, अशोकाचे राजचिन्ह म्हणू शकता. माझ्या दृष्टीत तर ते चरख्याचे चिन्ह आहे. तो चरखा जर भारताच्या सात लाख खेड्यात गेला तर इतर उद्योगही जातील. परंतु ते जातील याकडे आपल्याला लक्ष तर द्यावे लागेल. त्यांचा जर आपण सांभाळ केला नाही व त्यांनी सूर्याच्या आजूबाजूला फिरणे सोडून दिले तर हा जो सूर्य आहे त्यालासुद्धा कोणीही विचारणार नाही. त्यांचा जर अस्त होईल तर सूर्याचाही अस्त होईल. ही गोष्ट तर मी शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करू शकणार नाही पंरतु हे मात्र सिद्ध करू शकतो की चरख्याच्या आजूबाजूचे उद्योग चालले नाही तर बिचारा एकटा चरखा काहीही करू शकणार नाही. दिल्लीच्या आजूबाजूला काय कमी खेडी आहेत? ते सर्व जर दिल्लीला आधार देतील आणि त्यांना दिल्लीचा आधार घ्यावा लागेल तर किती चांगली गोष्ट होईल? असे झाले तर आपसातील भांडणाचे सर्व कारणच मिटून जाईल. ही खेडी दिल्लीला किती तरी गोष्टी पुरवत असत. आज तर त्या सर्व गोष्ट येऊ शकत नाहीत. तुम्हाला माहीत असायला पाहिजे होते, परंतु बहुधा तुम्हाला माहीत नसेल की दिल्ली मुसलमान कारागिरांनी भरलेली होती. ते सर्व निघून गेले आहेत. पानिपतकडे पाहा. तिथे किती तरी मुसलमान राहत होते. ते कांबळी विणत असत आणि अजून किती तरी काम करत असत. आज त्यांचा व्यापार नष्ट झाला आहे. मुसलमान कारागीर जर भारत सोडून जाणार असतील तर ती भारताची हानी होईल. अशा दृष्टीने पाहिले तर भारत आणि पाकिस्तान या दोघांचेही नुकसान होत आहे. काश्मीरकरिता आपण जे भांडत आहो त्याचे कारण काय? टोळीवाल्यांनी काश्मीरवर हल्ला करणे व काश्मीरच्या रक्षणाकरिता आपल्याला सैन्य पाठवावे लागणे हा रानटीपणा आहे असे मला वाटते.

ग्रामोद्योगाची गोष्ट तर एक फार मोठी गोष्ट आहे. काल मी तुम्हाला सांगितले होते की मीराबेन ते काम करत आहे व त्याला आपल्या सरकारमधील लोकही हातभार लावत आहेत. आपण सर्व हे काम आपल्या घरात करू शकतो.आपण मानवी विष्टा, शेण व काडीकचरा गोळा करू शकतो. त्याच्या मिश्रणापासून सुंदर खत तयार होते व त्याचा सुंदर वास येतो.

यामुळे ग्रामोद्योग आणि चरखा संघाचे काम तेव्हाच चालू शकेल जेव्हा करोडो लोक या कामात मदत करतील. जर ते मदत करणार नाहीत तर हे काम चालणार नाही. मला जोपर्यंत आठवते चरखा संघ, हरिजनसेवक संघ, ग्रामोद्योग संघ आणि तालिमी संघ या ज्या चार गोष्टी निर्माण करण्यात आल्या त्या श्रीमंतांकरिता नाही तर गरिबांकरिता निर्माण करण्यात आल्या होत्या. यांच्या कामात सर्वांनी हातभार लावायचा आहे. सर्वांनी हातभार लावला नाही तर हे काम चालू शकत नाही. भारतात जर आपल्याला पंचायत राज्य वा लोकांचे राज्य हवे असेल तर सर्व लोकांनी या कामात मदत केली पाहिजे.

असे राज्य ना तर हवेतून निर्माण करता येते ना हिमालयातून चालत येते. ही गोष्ट तर येथील जनताच करू शकते. जनता एक प्रकारचा पाया आहे आणि तिच्या आधारावर आपण फार उंच इमारत उभारू शकतो. त्यात कोणी मदत करत असेल तर चांगले आणि करत नसेल तर बरेचबरे आहे. आपण एकमेकांशी भांडत आहो आणि त्याचा परिणाम तोच होईल जो कौरवपांडवांच्या भांडणाने झाला होता. कृष्णही यदुवंशी होते परंतु नंतर सर्व भांडायचे आणि एकमेकांना धाक दाखवायचे. दारू पिणे, व्यभिचार करणे आपसात झगडणे इतकेच त्यांचे काम राहिले होते. अखेरीस त्यांचा शोकांत झाला. भारताच्या नशिबी असे काही येऊ नये अशी जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही मी सांगितलेल्या या चार संघटनांद्वारे सुरू असलेले काम तुमच्या हाती घ्यावे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ २२६-९

५६. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २२, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांचे लेखी भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,
डिसेंबर २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

येथून आठदहा मैलांवर महरौली येथे कुतुबुद्दिन बख्तियार चिश्ती यांचा दर्गा आहे. पावित्र्याच्या दृष्टीने अजमेरच्या खालोखाल याचे महत्त्व आहे. या ठिकाणी केवळ मुसलमानच जात नाहीत तर हजारो हिंदू आणि मुसलमानांव्यतिरिक्त इतरही लोक दरवर्षी दर्शनाकरिता जात असतात. मागील वर्षी हा दर्गा हिंदू जामावाच्या रागाला बळी पडला. जवळपास राहणाऱ्या मुसलमानांना अंदाजे आठशे वर्षांपासूनची घरे सोडून जाणे भाग पडले. मुसलमानांच्या मनात या दर्ग्याबद्दल प्रेम आणि भक्तिभाव असूनही आज तिथे एकही मुसलमान नाही म्हणून या प्रसंगाची आज चर्चा करावी लागली. तो दर्गा लवकरात लवकर परत उघडून आपल्यावरील कलंक धुऊन काढणे हे हिंदू, शीख, तेथील सरकारी अधिकारी आणि आपले सरकार या सर्वांचे कर्तव्य आहे. हीच गोष्ट दिल्ली आणि तिच्या आजूबाजूच्या भागांतील दर्ग्यांना आणि मुसलमानांच्या इतर पवित्र ठिकाणांनाही लागू होते. धार्मिक स्थळ मोठे असो की लहान, त्याची तोडफोड सहन केली जाणार नाही हे दोन्ही देशातील सरकारांनी आपापल्या देशातील बहुसंख्याकांसमोर स्पष्ट शब्दांत घोषित करण्याची वेळ आता आलेली आहे. दंगलीच्या दरम्यान या पवित्र ठिकाणांची जी तोडफोड करण्यात आली तिची दुरुस्ती केली पाहिजे.

मुस्लिम लीगच्या सभेने कराचीत जो निर्णय घेतला (कराचीत १५ डिसेंबरवा ऑल इंडिया मुस्लिम लीगच्या सभेने एक प्रस्ताव मंजूर करून मुस्लिम लीगचे दोन भागात विभाजन केले होते. एक पाकिस्तानकरिता आणि दुसरा भारताकरिता.) तो पाहता मुस्लीम लीगचे सदस्य मला विचारतात की "मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली लखनौमध्ये जी परिषद बोलावण्यात आली आहे तिला आम्ही उपस्थित राहावे की राहू नये? (लखनौमध्ये २७ आणि २८ ला मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संघराज्यातील मुसलमानांची सभा होणार होती. प्रांतिक विधानसभेचे सदस्य, घटना समितीचे सदस्य, मुसलमानांच्या विविध संघटना इत्यादींना त्या परिषदेकरिता निमंत्रित करण्यात आले होते.) वा भारतीय मुस्लिम लीगची जी मद्रास येथे सभा होणार होती तिला मुसलमानांनी जावे की जाऊ नये? भारतीय संघराज्यात राहणाऱ्या मुस्लिम लीगच्या सदस्यांनी अशा परिस्थितीत कोणते धोरण अवलंबिले पाहिजे?" मुसलमानांना जर वैयक्तिक वा जाहीर निमंत्रण मिळत असेल तर त्यांनी लखनौ येथील सभेत जायला पाहिजे आणि मद्रास येथील सभेतही

जायला पाहिजे याबद्दल मला मुळीच संशय नाही. दोन्ही ठिकाणी त्यांनी आपले विचार न घाबरता मोकळेपणाने मांडले पाहिजे. त्यांनी जर भारताच्या अहिंसक लढ्याच्या गत तीस वर्षांच्या इतिहासाचा अभ्यास केला असेल तर भारतात आपण अल्पसंख्य आहो आणि पाकिस्तानमधील बहुसंख्या त्यांना कोणतीही मदत करू शकत नाही याचा विचार करू नये. भारतात अल्पसंख्याकांचे प्रमाण कितीही कमी असले तरी आपली अब्रू आणि प्रिय असलेल्या गोष्टींचे रक्षण करण्याकरिता घाबरण्याचे कोणतेही कारण नाही ही गोष्ट समजून घेण्याकरिता अहिंसेवर विश्वास ठेवण्याची आवश्यकता नाही. माणसाची घडणच अशी झाली आहे की तो जर आपल्या निर्मात्याला समजून घेईल आणि आपण त्याच इश्वराचे प्रतिबिंब आहो हे लक्षात घेईल तर जगातील कोणतीही शक्ती त्याची अब्रू हिरावून घेऊ शकणार नाही. माझा आत्मसन्मान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, मीच तो गमावू शकतो. शक्तिशाली ट्रान्सवाल सरकारशी जेव्हा माझा संघर्ष सुरू होता तेव्हा जोहानिसबर्गमधील माझा एक जवळचा मित्र मला सांगत असे की "मला अल्पसंख्य लोकांच्या बाजूने राहणे आवडते कारण अल्पसंख्य कधीही चूक करू शकत नाहीत व त्यांनी चूक जरी केली तरी ती दुरुस्त करता येऊ शकते. परंतु बहुसंख्याकांच्या अंगात सत्ता शिरलेली असते व त्यामुळे त्यांच्यात सुधारणा घडवून आणणे कठीण असते." बहुसंख्याकाचा अर्थ एकतर्फी शस्त्रशक्ती असा असेल तर तो मित्र बरोबर होता असे म्हणावे लागेल. काही थोड्याशा इंग्रजांनी सस्त्रशक्तीच्या बळावर स्वतःच्या अल्पसंख्यत्वाचे रूपातर बहुसंख्यत्वात कसे केले व संपूर्ण हिंदुस्तानवर वर्चस्व कसे गाजवले याचा आपल्याला कटू अनुभव आलेला आहे. भारताजवळ शस्त्रे नव्हती आणि ती असती तरी ती कशी चालवावी याचे त्याला ज्ञान नव्हते. आपल्या देशातील ब्रिटिशांच्या राज्यापासून हिंदू आणि शीख कोणताही धडा शिकले नाही ही खेदाची गोष्ट आहे. पूर्व आणि पश्चिम भागांतील बहुसंख्येमुळे संघराज्यातील मुसलमानांना बरेच काही सहन करावे लागले. आज त्यांच्या डोक्यावरील ते ओझे उतरले आहे. आता त्यांना अल्पसंख्य असण्यातील लाभ कळत असतील तर ते इस्लामचे सौंदर्य आपल्या पद्धतीने दाखवू शकतील. इस्लामचे सर्वोत्तम दिवस ते दिवस होते जेव्हा महंमद पैगंबर मक्केत अल्पसंख्य होते. ख्रिश्चन धर्माच्या ऱ्हासाला कॉन्स्टंटाईननंतर (रोमची राणी, इसवीसन ३०६ ते ३३७, तिने ख्रिश्चन धर्माला राज्याचा धर्म घोषित केले होते.) सुरुवात झाली. इथे मला हा युक्तिवाद लांबवायचा नाही. माझा सल्ला माझ्या श्रद्धेतून निर्माण झाला आहे आणि मुसलमान मित्रांचा त्या श्रद्धेवर विश्वास नसेल तर ते ती श्रद्धा फेटाळून लावू शकतात.

माझ्या मते त्यांनी काँग्रेसमध्ये येण्याकरिता तयार असायला पाहिजे. परंतु जोपर्यंत काँग्रेसमध्ये त्यांचे मनापासून स्वागत होत नाही आणि समान वागणूक मिळण्याची त्यांना शाश्वती वाटत नाही तोपर्यंत त्यांनी काँग्रेसमधील प्रवेशाकरिता अर्ज करू नये. जोपर्यंत काँग्रेसचा संबंध आहे तात्त्विक दृष्टीने पाहिले तर अल्पसंख्य आणि बहुसंख्य हा प्रश्न उपस्थित होत नाही. मानवधर्म सोडून काँग्रेस इतर

कोणताही धर्म पाळत नाही. ती स्त्री-पुरुषांना समान लेखते. ती शुद्ध राजकीय संस्था आहे आणि तिच्यात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी आणि ज्यू हे सर्व समान गणले जातात. काँग्रेसला आपल्या शिकवणुकीप्रमाणे अनेकदा वागणे शक्य झालेले नाही. यामुळे काँग्रेस हिंदू संघटना आहे असा मुसलमानांमध्ये भ्रम निर्माण झाला आहे. जोपर्यंत ही ओढाताण सुरू आहे तोपर्यंत मुसलमानांनी आपली आब राखून या वादापासून दूरच राहावे. काँग्रेसला जेव्हा त्यांच्या सेवेची गरज असेल तेव्हा त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा. मी जसा काँग्रेसचा सेवक आहे तसेच तेही तोपर्यंत काँग्रेसचे सेवक असू शकतात. मी जरी काँग्रेसचा चार आण्याचा सभासद नसलो तरी संघटनेमध्ये माझे ऐकले जाते. आणि याचे कारण दक्षिण आफ्रिकेतून १९१५ साली मी परतलो तेव्हापासून मी निष्ठेने काँग्रेसची सेवा करत आहे. प्रत्येक मुसलमान अशाच प्रकारे जर काँग्रेसची सेवा करील तर त्यांच्या सेवेचेही कौतुक झाल्याचे त्यांना आढळून येईल.

आज प्रत्येक मुसलमान लीगला पाठिंबा देणारा आहे असे समजले जाते व त्यामुळे तो काँग्रेसचा शत्रू आहे असे समजण्यात येते. लीगच्या शिकवणुकीचा हा दुष्परिणाम आहे. आज शत्रुत्वाकरिता कोणतेही कारण उरलेले नाही. सांप्रदायिकतेचे विष निपटून काढण्याकरिता चार महिन्यांचा काळ फार कमी आहे. हिंदू आणि शिखांनी हे विष अमृताप्रमाणे घेतले व ते मुस्लिम लीगचे शत्रू झाले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आणि विटेला विटेने उत्तर देण्याच्या प्रयत्नात त्यांनी आपल्या नावाला बट्टा लावून घेतला व ते स्वतःही मुसलमानांच्या श्रेणीतच सामील झाले. अल्पसंख्य मुसलमानांना माझी विनंती आहे की त्यांच्याबद्दल जो संशय निर्माण करण्यात आला आहे तो दूर करण्याकरिता त्यांनी स्वतःला या विषारी वातावरणापासून वर ठेवावे व कोणत्याही प्रकारचा अप्रामाणिकपणा वा प्रतारणा न करता भारताचे सन्माननीय नागरिक म्हणून आपण राहू शकतो हे दाखवून द्यावे.

यापुढे लीग एक राजकीय संघटना म्हणून काम करू शकत नाही हा फाळणीचा एक परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणे हिंदू महासभा, शीख सभा आणि पारसी सभा या संघटनाही राजकीय संघटना म्हणून काम करू शकत नाहीत. त्या धार्मिक संघटना म्हणून राहू शकतात. तसे झाले तर आपापल्या समाजात सुधारणा घडवून आणणे, धार्मिक महत्त्वाच्या बाबी कोणत्या आहेत याचा शोध घेऊन त्यानुसार कृती करणे हे त्यांचे काम असेल. असे झाले तर वातावरणातील विष निघून जाईल व या संघटना परस्परांशी चांगुलपणाच्या कामात स्पर्धा करू लागतील. त्यांच्यात एकोपा आणि मैत्रीभाव असेल व त्या सरकारला मदत करतील. मुसलमान काँग्रेसमध्ये असो वा नसो त्यांच्या राजकीय आकांक्षांची परिपूर्ती काँग्रेसच्या माध्यमातूनच होऊ शकेल. जे लोक काँग्रेसमध्ये आहेत त्यांचाच जर काँग्रेस विचार करणार असेल तर तिच्या सेवेचे क्षेत्र फार लहान होईल. आजसुद्धा काँग्रेसमध्ये फार

कमी लोक आहेत. आज इतर कोणतीही संघटना काँग्रेसशी स्पर्धा करू शकत नाही कारण काँग्रेसने स्वतःला गरिबांच्या आणि तळागाळाच्या लोकांच्या सेवेला वाहून घेतले आहे आणि ती संपूर्ण भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न करत आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २२९-३२

५७. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २३, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एक बंधू म्हणतात वा सूचना करतात की थंडी बरीच पडत असल्यामुळे उद्यापासून प्रार्थना अर्धा तास आधी म्हणजे पाच वाजता सुरू करावी. सध्या बरीच थंडी पडते आहे हे मला मान्य आहे. आजच २३ डिसेंबर आहे. आता यापुढे मिनिटामिनिटाने दिवस मोठा होत जाणार असला तरी तुम्हा सर्वांची इच्छा असेल तर आपण उद्यापासून पाच वाजता प्रार्थना सुरू करू शकतो. (ज्यांना प्रार्थना लवकर हवी असेल त्यांनी हात वर करावे असे गांधीजी म्हणाले. अनेकांनी हात वर केले. यामुळे प्रार्थना पाच वाजता सुरू करावी असे ठरले.)

आज मी तीन मुद्द्यांवर बोलायचा विचार केला आहे. पहिली गोष्ट म्हणजे काल इथे बहावलपूरचे लोक आलेले तुम्ही पाहिले असेल. (बहावलपूरच्या ७०,००० हिंदूंना वाचवा असे फलक त्यांच्या हातात होते.) ते अतिशय दुःखी होते. (बहावलपूर संस्थान ८ नोव्हेंबरला पाकिस्तानमध्ये सामील झाले होते. तेथील ७०,००० हिंदू संस्थानातून बाहेर पडण्याची वाट पाहत होते. पाकिस्तान सरकार सैन्याच्या देखरेखीखाली त्यांना हलवण्याशी सहमत नव्हते. तेथील छावणीत गोळा झालेल्या हिंदू आणि शिखांना पुरेसे खायला आणि कपडे मिळत नव्हते.) तेथील सर्व हिंदू आणि शिखांचे जीवन धोक्यात असल्यामुळे त्यांना इथे आणण्यात यावे असे त्यांचे म्हणणे होते. आज बहावलपूरचे दोन बंधू मला भेटण्याकरिता आले होते. त्यांनीही हेच सांगितले. ते म्हणाले की या बाबतीत कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही तर आम्ही महाराज्यपालाच्या भवनासमोर उपोषण करू. यावर मी त्यांना सांगितले की तुमच्या उपोषणामुळे तेथील हिंदू आणि शीख परतही येऊ शकणार नाहीत आणि त्यांचे रक्षणही होणार नाही. याशिवाय मंत्रिमंडळाने दिलेल्या अधिकारांशिवाय महाराज्यपालांना कोणतेही अतिरिक्त अधिकार नाहीत. त्यांना केवळ सही करण्याचा अधिकार आहे. पंडित नेहरू वा सरदार पटेल यांच्या निवासस्थानासमोर उपवास केल्याने काही फायदा होईल असे जर तुम्हाला वाटत असेल तर तेसुद्धा तितकेच चूक आहे. त्यांना माझा मुद्दा पटला आणि त्यांनी उपोषणाचा विचार सोडून दिला. काल माझे मौन होते आणि त्यामुळे मी काहीही सांगू शकलो नाही. बहावलपूरच्या नबाबांनी हिंदूंना आणि शिखांना जिथे जायचे असेल तिथे जाऊ दिले पाहिजे. ते जर असे करणार नाहीत तर ते आपल्या कर्तव्याला चुकतील. तिथे नबाबांच्या अगदी नाकाखाली कायकाय घटना घडल्या ते मी तुम्हाला सांगू शकत नाही. हिंदू आणि शिखांचा मोठ्या प्रमाणात छळ करण्यात आला आणि त्यांना मारण्यात आले.

बहावलपूरला घडवणारे शीख होते. ते शूर लोक आहेत. ते लढूही शकतात आणि शेतीही करू शकतात. हिंदूंनीसुद्धा असेच केले आहे. त्यांनी कोणताही अपराध केलेला नाही. ते हिंदू आणि शीख आहेत केवळ हाच त्यांचा अपराध आहे. यांतील मोठ्या संख्येतील लोकांची कत्तल झाली आहे आणि काही पळून गेले आहेत. हिंदू आणि शीख जर तिथे शांततेत राहू शकत नसतील तर नबाब साहेबांनी काहीही सांगितले तरी त्याला काय अर्थ आहे? नबाब साहेबांनी आपले कर्तव्य पार पाडावे अशी माझी त्यांना विनंती आहे. हिंदू आणि शिख तिथे आपल्या अब्रूनिशी सुरक्षितपणे राहू शकत नसतील तर त्यांनी त्यांच्या निघून जाण्याची व्यवस्था केली पाहिजे अथवा अजूनही बहावलपूरमध्ये जे हिंदू आणि शीख राहतात त्यांना कोणी स्पर्शही करू शकणार नाही व ते बहावलपूरमध्ये शांततापूर्वक राहू शकतात असे त्यांनी घोषित केले पाहिजे. त्यांची जर उपासमार होत असेल त्यांना अन्नधान्य पुरवले पाहिजे.

मला जी दुसरी गोष्ट तुम्हाला सांगायची आहे ती आजच्या स्टेट्समनमध्ये आहे. लाहोर येथे जी छावणी आहे तिच्यात तर दुःखी लोक राहतात, तिथे तर मुसलमान राहतात. ती छावणी अतिशय घाणेरडी आहे. तेथील लोकांना कॉलरा झाला आहे, देवी निघत आहेत आणि बरेच लोक असे आहेत की अजून त्यांना काहीही झाले नाही परंतु ते उघड्या आकाशाखाली थंडीत तसेच कुडकुडत पडले आहेत. बाहेर तर राहावे लागतेच, पण उघड्या आकाशाखाली कसे राहतील? पावसापासून वाचण्याकरिता काही पाहिजे, शरीर झाकण्याकरिता काही पाहिजे आणि खायलाही काही पाहिजे. हे सर्व नसेल तर मेल्याशिवाय मार्ग कोणता? बाकी तिथे काय काय होत आहे ते मला माहीत नाही. हं, सियालकोटमधून शिबिरांची साफसफाई करण्याकरिता भंगी बोलावण्यात आले आहेत. ते घाण उचलतील. तेथील अधिकारी म्हणतात की ते सगळे काम करत नाहीत - कोणकोणते ते मला माहीत नाही, परंतु मी इतके सांगेन की ते तिथे अडचणीच्या परिस्थितीत राहत आहेत. ते लोक पाकिस्तानमध्ये आहेत म्हणून काय झाले? मुसलमान आहेत म्हणून काय झाले? माणूस इतका अधःपतीत का व्हावा? मला याच्या वेदना होतात. आपल्या अत्याचारापासून सुटका करून घेण्याकरिता त्या लोकांना आपले घरदार टाकून येथून पळून जावे लागले. त्यांचे तिथे घरदार तर नाही. मग त्यांना त्रास तर होणारच. परंतु स्वतःची सफाईही ते करू शकत नाहीत हे काय आहे? पाकिस्तानमधील असो वा भारतातील, माझा तर सगळ्या निर्वासितांना सल्ला आहे की त्यांनी प्रत्येक गोष्टीकरिता इतरांवर अवलंबून राहू नये. मी तर म्हणेन की आम्हाला कोणी स्वयंपाक करणारा द्या, विष्टा साफ करणारा द्या, झाडझूड करणारा द्या असे म्हणू नये. जर घरदार गमावून पळ काढावा लागला तर अशी मागणी का करावी? करोडपतींकरिता अशी सोय असते. एकाचे काम असताना ते दहा नोकर ठेवू शकतात, आपण नाही. हे आपल्या अधःपाताचे चिन्ह आहे. लाहोरमधील निर्वासितांनी दृढपणे आणि हिंमत ठेवून सांगायला पाहिजे की सियालकोटहून आमच्याकरिता भंगी बोलावण्याची गरज नाही. आम्हीच आमचे शिबीर स्वच्छ ठेवू.

पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी आणि तेथील सरकारनेही त्यांना सांगावे की आम्ही तुमच्याकरिता भंगी बोलावणार नाही. माणसाकडून जितके होत असेल तितके तर करा. आणि इतके करूनही तिथे मृत्यू झाले तर ती वेगळी गोष्ट असेल. परंतु तुम्ही हे करणार नसाल तर तो माणसाचा गुन्हा असेल आणि माणसावर त्या खुनाचे ओझे असेल. मी आधीही म्हणालो होतो आणि आताही सांगतो की निर्वासितांनी सौजन्यपूर्वक राहिले पाहिजे. त्यांनी स्वतःकडून जितके काम होत असेल तितके केले पाहिजे. इतरांवर ओझे होऊ नये.

एक गोष्ट अजून सांगेन. ती चांगली गोष्ट आहे. मला असे वाटते की प्यारेलाल इथे आले असल्याचे एकदा मी तुम्हाला सांगितले आहे. ते कोण आहेत हे तर तुम्हाला माहीतच आहे. ते माझे सचिव आहेत. किती तरी दिवसांपासून ते नोआखालीत काम करत आहेत. त्यांच्याबरोबर इतरही लोक काम करत होते. असुरक्षितता जाणवत असलेल्या तेथील हिंदूंना आपल्या जिवाची पर्वा न कराता त्यांनी आधार दिला. मुसलमानांनीही लवकरच कळले की ते त्यांचे मित्र आहेत, सेवक आहेत, मारहाण करण्याकरिता ते तिथे आलेले नाहीत. शक्य झाले तर ते दोन्ही संप्रदायांच्या लोकांमध्ये समेट घडवून आणायला आले आहेत. ते म्हणतात की तेथील एक गोष्ट माहीत करून घेण्यासारखी आहे. तशी तर ती गोष्ट लहान आहे परंतु महत्त्वाची आहे. तेथील एक मंदीर तोडण्यात आले होते आणि मुसलमानांनी त्याचा ताबा घेतला होता. तो दोन संप्रदायांमधील संघर्षाचा विषय झाला होता. नंतर मुसलमानांनी हिंदूंबरोबर एकोप्याने राहण्याची जेव्हा इच्छा व्यक्त केली तेव्हा हिंदूंना पूजाअर्चा करता येईल असे अेकही ठिकाण नसल्याचे प्यारेलालनी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यामुळे मुसलमानांनी आपल्या श्रमाने ते मंदिर परत बांधले आणि तुम्ही मंदिरात जाऊन पूजाअर्चा करण्याकरिता मोकळे आहा, रामधून करू शकता असे सांगितले. तिथे मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. आता ते सर्व आरामात राहतात. अधिकाऱ्यांनीही भाग घेतला. ही चांगली गोष्ट आहे. संपूर्ण हिंदुस्तानात म्हणजे भारतात आणि पाकिस्तानमध्ये असे झाले तर सर्व परिस्थितीच बदलून जाईल. आपण जर आपल्या धर्माला चिकटून राहिलो आणि इतरांच्या धर्मात हस्तक्षेप केला नाही तर ही फार चांगली गोष्ट होईल.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २३६-८

५८. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २४, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला भेटण्याकरिता अनेकदा शीख बांधव येत असतात. वर्तमानपत्रेही मी थोडी वाचतो. भेटण्याकरिता येणारेही मला काही सांगतात. त्यांचे म्हणणे आहे की मी शिखांचा शत्रू झालो आहे. माझ्या शब्दांना भारताबाहेर काही किंमत राहिली नसती तर त्यांना त्याचे काही वाटले नसते. भारताने अहिंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळवले असा बाहेरच्या लोकांचा विश्वास आहे. खरोखर असे असते तर मला वाईट वाटले नसते. यापूर्वी जगात असे कुठेही झाले नाही. झाडाची ओळख त्याच्या फळावरून होत असते, इतर कोणत्याही मार्गाने नाही. आज हिंदू, मुसलमान आणि शीख परस्परांचे शत्रू झाले आहेत.

मी आधीच सांगितल्याप्रमाणे आपला संघर्ष अहिंसक संघर्ष आहे या भ्रमात मी होतो. ईश्वराने मला आंधळे केले होते व मी चुकीच्या मार्गाने भरकटलो होतो. परंतु पंगू आणि नामर्द लोक अहिंसेचे पालन करू शकत नाहीत. हा पांगळेपण आणि मुकेपणा शारीरिक नाही. शरीराने पांगळे लोक तर ईश्वराच्या मदतीने अहिंसेचे पालन करू शकतात. प्रह्लादासारखा एखादा मुलगाही अहिंसेचे पालन करू शकतो. प्रह्लाद ऐतिहासिक व्यक्ती आहे की नाही हे मला माहीत नाही, खरोखर असे झाले होते की नाही हे मला माहीत नाही परंतु माझ्या लेखणीतून रामशिवाय इतर कोणताही शब्द निघू शकत नाही असे प्रह्लादने आपल्या वडिलांना (हिरण्यकश्यपला, राक्षस राजा.) स्पष्टपणे सांगितले होते असे म्हणतात. माझ्यासमोर बारा वर्षाचा प्रह्लाद आजही उभा आहे. परंतु जो माणूस आत्म्याने आंधळा आहे, लुळापांगळा आहे तो अहिंसेचे पालन कधीही करू शकत नाही. जोपर्यंत अंतःकरणातून प्रकाश येत नाही तोपर्यंत माणसाला अहिंसेचे सौंदर्य कळू शकत नाही. स्वातंत्र्याकरिता केलेल्या संघर्षात आम्ही अहिसेचे पालन करत नव्हतो तर शांततामय प्रतिकाराचे पालन करत होतो. त्याचा अर्थ आम्हाला जरी ब्रिटिशांना मारावे असे जरी वाटत होते तरी ब्रिटिशांना आम्ही मारणार नाही असा होता. कारण आमच्याजवळ तितकी शक्ती नव्हती. करोडो लोकांनी अहिंसक प्रतिकाराचा मार्ग अनुसरल्यामुळे आम्हाला स्वातंत्र्य मिळाले. आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य पांगळे होते. ते आंशिक होते. चुकून माझा समज झाला होता की भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष अहिंसक होता. परंतु नंतरच्या घटनांनी माझे डोळे उघडले. आमची अहिंसा ही दुर्बलांच्या दुर्बल विरोधासारखी होती. हिंदुस्तानचे लोक जर खरोखर शुराप्रमाणे अहिंसेचे पालन करणारे असते तर त्यांनी इतकी हिंसा कधीही केली नसती.

शीख बांधवांच्या रागाचे मला हसू येते. शीख आणि हिंदू यांच्यात फरक आहे असे मी समजत नाही. मी गुरु ग्रंथसाहेब वाचला आहे. ग्रंथसाहेबमधील मला काहीही कळत नाही असे मित्र मला चिडवत असतात. याबाबतीत मला जर खरोखर काही कळले नसते तर मी गुरू गोविंदसिंहबद्दल जे लिहिले ते लिहिले नसते. मी काही कोणाचा शत्रू नाही. मी जेव्हा शिखांच्या मद्यपानाबद्दल व जुगारीपणाबद्दल बोलतो तेव्हा सर्व शिखांना ते लागू होते असा त्याचा अर्थ नसतो. हिंदूंमध्येही असे अनेक लोक आहेत. परंतु शिखांमध्ये जी ताकद आहे ती हिंदूंमध्ये नाही. परंतु जिथे शिखांची तलवार चालायला नको तिथे ती चालते हे पाहून दुःख होते. वाईट वर्तन करणारा कोणीही असला तरी तो ईश्वरासमोर गुन्हेगार असतो, तो आपल्या धर्माला बट्टा लावतो असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा मी शिखांचा खरा मित्र असतो.

आज २४ तारीख आहे. उद्या ख्रिसमस आहे. हा सण ख्रिश्चनांकरिता तसाच आहे जशी आपल्याकरिता दिवाळी. ना तर दिवाळी नाचगाण्याकरिता असू शकते ना ख्रिसमस. ख्रिसमस हा येशू ख्रिस्ताचे स्मरण करून देणारा सण आहे. या निमित्ताने मी भारतातील आणि बाहेरील सगळ्या ख्रिश्चन बांधवांचे अभिनंदन करतो. नूतन वर्ष त्याच्याकरिता सुख आणि समृद्धी घेऊन येवो आणि ते येशू ख्रिस्ताच्या उपदेशाचे आपल्या स्वतःच्या जीवनात पालन करतील अशी आशा करतो. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे येथील ख्रिश्चनांचा विनाश अथवा त्यांनी ख्रिश्चन धर्म सोडून हिंदू वा मुसलमान वा शीख व्हावे असा होत नाही आणि अशी इच्छा मी कधीही केली नाही. ख्रिश्चनाकरिता हिंदू वा मुसलमान होणे ही गोष्ट मृत्यूपेक्षाही भयानक आहे. माझ्या दृष्टिकोनानुसार ख्रिश्चनांनी अधिक चांगले ख्रिश्चन व्हावे, मुलमानांनी अधिक चांगले मुसलमान व्हावे आणि शिखांनी अधिक चांगले शीख व्हावे.

भारतातील आणि भारताबाहेरी ख्रिश्चनांनी खऱ्या अर्थाने मुक्त व्हावे अशी माझी इच्छा आहे. येशू ख्रिस्ताने दाखवलेला आत्मसंयमाचा, त्यागाचा आणि हौतात्म्याचा मार्ग त्यांनी अनुसरावा. त्यांनी स्वतंत्र व्हावे आणि जगातील स्वातंत्र्याचा प्रदेश वाढत राहावा. वृत्तपत्रांमधून मला कळले आहे की सरकार त्यांना जे अनुदान देते ते बंद करण्याचा विचार करत आहे. त्यांना अमेरिका आणि इंग्लंडमधून जो पैसा येतो तोही येणे बंद होईल. असे ऐकतो की भारतातील ७५ टक्के चर्च बंद होतील. परंतु धर्माचा विकास पैशाच्या सहाय्याने होत नसतो. भारतातील बहुतेक ख्रिश्चन गरीब आहेत. सरकारने अनुदान देणे थांबवले तर त्यामुळे काय फरक पडतो? पैशाचे हे संकट टळले म्हणून ख्रिश्चनांनी खुष व्हायला पाहिजे. हजरत उमरच्या घरी एकदा भरपूर पैसे आणि इनाम वगैरे आले. यामुळे उमर काळजीत पडला आणि आपल्या बायकोला म्हणाला की इतकी मोठी संपत्ती घरात असली तर मी संयम ठेवू शकेन की नाही आणि मला सुखाची चटक लागेल की काय अशी भीती वाटते. चर्चकरिता इमारतीची गरज नसते.

मानवी शरीर हेच खरे चर्च आहे. तिथेच ईश्वर राहत असतो. असे झाले की आकाश आपल्याकरिता छप्पर होते आणि भूमी आंगण. ईश्वराचे नाव आपण कुठेही घेऊ शकतो. यामुळे ख्रिश्चनांनी मुळीच काळजी करू नये असे मी म्हणेन. त्यांना सरकारी वा इतर कोणाच्या मदतीची मुळीच गरज नाही. त्यांनी आपल्या धर्माच्या शिकवणुकीप्रमाणे वागावे. येशूने दाखवलेल्या त्यागाच्या मार्गाचे जर ते अनुसरण करतील तर त्यांचा धर्म कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २३६ - ८

५९. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २५, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काश्मीरमध्ये काय सुरू आहे ते तुम्हा सर्वांना माहीत आहे. परंतु तुमचे लक्ष काश्मीरच्या प्रस्तावाकडे वेधण्याची माझी इच्छा आहे. भारतीय संघराज्य आणि पाकिस्तानमध्ये एखादा लवाद नेमण्यात यावा अशी सूचना करण्यात आली आहे आणि ही गोष्ट वर्तमानपत्रांमध्येही आली आहे. ही लवाद नेमण्याची गोष्ट झाली. भारत आणि पाकिस्तान बसून आपसात निर्णय करूच शकणार नाही असे किती दिवस चालेल? किती काळ आपण आपसात भांडत राहू? काश्मीर आणि जम्मू हे दोन्ही एक आहेत. तिथे मुसलमानांचे बहुमत आहे. काश्मीरचे दोन तुकडे केले तर अशा प्रकारे तुकडे करण्याची गोष्ट कुठपर्यंत जाऊन थांबेल? हिंदुस्तानचे दोन तुकडे झाले इतके पुरे आहे. हेच सहनशीलतेच्या पलीकडे आहे. भारताला ईश्वराने घडवले आहे. माणूस त्याचे तुकडे कसे करू शकतो. परंतु तसे झाले. लीगने आणि काँग्रेसने वेगवेगळ्या कारणांनी हे मान्य केले. आज काश्मीरचे तुकडे करायचे तर इतर संस्थानांचे का नाही?

काश्मीरसंबंधी भांडण का झाले? असे म्हणतात की हल्ला करणारे डाकू आहेत. लुटारू आहेत. ते बाहेरून येतात. ते घूसखोर आहेत. परंतु जसजसा वेळ जातो आहे तसतसे कळते आहे की तसे नाही. उर्दूची अनेक नियतकालिके इथे येतात. मी स्वतः थोडेफार उर्दू वाचू शकतो. आजूबाजूचे लोक मला थोडीफार सूचनाही देत असतत. आज जमीनदार नावाच्या वृत्तपत्रातून माझी कानउघाडणी करण्यात आली. जमीनदारच्या संपादकांना मी ओळखतो. त्यांच्या जिभेवर कधीही नियंत्रण नसते. काश्मीरवर हल्ला करण्याकरिता सर्व मुसलमानांनी दाखल व्हावे असा आता तर त्यांनी उघडउघड सल्ला दिला आहे. डोगरा, शीख या सर्वांना त्यांनी शिव्या घातल्या आहेत. काश्मीरमधील लढाईला ते जिहाद म्हणतात. परंतु जिहादमध्ये तर संयम असतो, सीमा असतात. परंतु इथे तर काहीही नाही. तिथे जे काही सुरू आहे ते व्हायला नको. हिंदू, शीख आणि मुसलमानांनी नेहमीकरिता वेगवेगळेच राहिले पाहिजे अशी त्यांची इच्छा आहे काय? मुसलमानांनी जर हिंदूंची कत्तल करायला सुरुवात केली तर हिंदूंचा धर्म काय असेल? तो मी तुम्हाला दररोज सांगत असतो. हिंदूंनी आणि शिखांनी कधीही बदला घेऊ नये.

सरळ गोष्ट ही आहे की काश्मीरमध्ये पाकिस्ताननेच घूसखोरी केली आहे. भारतीय सैन्य तिथे गेले आहे परंतु आक्रमण करण्याकरिता नाही. महाराज आणि शेख अब्दुल्ला यांनी बोलावल्यामुळे ते

तिथे गेले आहे. काश्मीरचे खरे महाराज शेख अब्दुल्ला आहेत. हजारो मुसलमान त्यांचे भक्त आहेत. त्यांना काश्मीरकेसरी म्हणतात.

माणसाने आपली चूक केव्हाही कबूल केली पाहिजे. जम्मूमधील हिंदूंनी आणि शिखांनी व बाहेरून तिथे गेलेल्या लोकांनी तेथील मुसलमानांना मारले आहे. काश्मीरचे महाराज इंग्लंडच्या महाराजांप्रमाणे नाहीत. त्यांच्या संस्थानात जे काही कमीजास्त होते त्याकरिता ते जबाबदार असतात. तिथे अनेक मुसलमांनाची कत्तल झाली, अनेक मुलींचे अपहरण झाले. शेख अब्दुल्ला साहेबांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. जम्मूत जाऊन त्यांनी चर्चा केली. लोकांची समजूत घातली. काश्मीरचे महाराज डोगरा राजपूत आहेत. त्यांच्या अनेक दोषांचा पाढा वाचला जातो. काश्मीरच्या राजाने गुन्हा केला असेल वा अजून कोणी गुन्हा केला असेल तर त्याला हटवण्याची गोष्ट मी समजू शकतो. परंतु काश्मीरच्या मुसलमानांवर हल्ला करण्यात यावा असा कोणता अपराध त्यांनी केला? पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे की इस्लामची सगळ्यात मोठी शक्ती पाकिस्तान आहे. परंतु पाकिस्तान सरकारला मी नम्रपणाने सांगू इच्छितो की ते याचा अभिमान तेव्हाच बाळगू शकतील जेव्हा पाकिस्तानमधील प्रत्येक हिंदूला आणि शिखांना न्याय मिळू शकेल. पाकिस्तान आणि भारत सरकारने एकत्र बसून आपसात तडजोड केली पाहिजे. परंतु तिसऱ्या शक्तीच्या माध्यमातून नाही. दोन्हीकडील प्रधानांनी बसून चर्चा करावी, महाराजांनी समंजसपणा दाखवून बाजूला बसावे आणि लोकांना निर्णय घेऊ द्यावा. शेख अब्दुल्ला तर त्यात असतीलच. परंतु महाराजांनी समंजसपणा दाखवून म्हणावे की सत्ता माझी नाही, काश्मीरच्या जनतेची आहे. लोकांना जे ठरवायचे असेल ते त्यांनी ठरवावे. त्यांनी म्हणायला पाहिजे की काश्मीर काश्मीरच्या मुसलमानांचा आहे, हिंदूंचा आहे, शिखांचा आहे, माझा नाही. महाराज आणि त्यांचे प्रधान वेगळे झाले तर शेख साहेब राहतील. ते अंतरिम सरकारची स्थापना करू शकतील. सर्वांनी बसून आपसात तोडगा काढावा. त्यातच सर्वांचे भले आहे. संघराज्य सरकारने काश्मीरला मदत केली ती तेथील प्रजेकरिता केली होती, महाराजांकरिता नाही. प्रजेच्या विरोधात काँग्रेस कोणत्याही राजाचा पक्ष घेऊ शकत नाही. राजे लोक प्रजेचे विश्वस्त होऊन राहतील तरच ते राहू शकतील.

एका उर्दू मासिकात आज मी एक शेर पाहिला. त्याने मी दुखावलो. त्यात लिहिले आहे की "आज सर्वांच्या तोंडी सोमनाथ आहे. जुनागढचा बदला घेण्याकरिता एखाद्या नवीन गझनीला गझनीहून यावे लागेल." एखाद्या मुसलमानाच्या तोंडून असे उद्गार निघतात हे पाहूनच फार वाईट वाटते. एकीकडे मैत्रीभाव व निष्ठेबद्दलच्या गोष्टी आणि दुसरीकडे या अशा गोष्टी. संघराज्यातील मुसलमानांचा जीव वाचावा म्हणून तर मी माझे जीवन पणाला लावले आहेत. मी वाईटपणाला वाईटपणाने उत्तर देणार

नाही. मी तर जे ठरवले आहे तेच करीन कारण मला वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर द्यायचे आहे. आज मी हे सर्व सांगितले कारण लोकांच्या संतापाचा भडका उडू नये असे मला वाटते. गझनीने जे केले ते फार वाईट केले. इस्लाममध्ये ज्या वाईट गोष्टी घडल्या त्या मुसलमानांनी समजून घेतल्या पाहिजे आणि त्या कबूल केल्या पाहिजे. तसे करण्यात लाज वाटण्याचे काही कारण नाही. अपराध कबूल केल्याने त्याचे ओझे कमी होते. गझनीने यायला पाहिजे असे जर संघराज्यात बसून मुसलमान जर आपल्या मुलांना शिकवणार असतील तर त्याचा अर्थ होतो भारताला आणि हिंदूंना खाऊन टाका. हे कोणी सहन करणार नाही. दोघे आपसात बसून काहीही करू शकतात. हा खोडसाळपणाचा शेर एका प्रतिष्ठित मासिकात छापला गेला नसता तर मी याची चर्चासुद्धा केली नसती. (हा शेर अलिगढ येथून प्रकाशित होणाऱ्या अलिगढ उर्दू मासिकात प्रकाशित झाला होता. या गोष्टीकडे जेव्हा अलिगढच्या कुलगुरूंचे लक्ष वेधण्यात आले तेव्हा नजरचुकीने असे घडले असे खेद व्यक्त करत त्यांनी सांगितले.)

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २३९-४१

६०. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २६, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर २६, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

उद्या आपली प्रार्थना होणार नाही हे घोषित करताना मला आनंदही होतो आणि दुःखही होते. उद्या मी संबळ येथे जाणार आहे. तिथे ग्रामपंचायतची स्थापना करण्यात आली आहे. मी गेल्यामुळे तिथे मोठ्या संख्येत लोक गोळा होतील असे तेथील लोकांना वाटते. तिथे आम्ही प्रार्थना करू. यापूर्वी मी त्या गावात कधीही गेलो नव्हतो. ते गाव ११ मैलांवर आहे असे ते लोक सांगतात. कदाचित एखाद मैल इकडेतिकडे. परवा मात्र आपली प्रार्थना होईल.

आज मला तुम्हाला तिब्बिया कॉलेजबद्दल सांगायचे आहे. या महाविद्यालयाची स्थापना हकीम अजमलखॉं यांनी केली. दुर्दैवाने आज आपण सर्व मुसलमानांना शत्रू मानून बसलो आहो. परंतु तिब्बिया कॉलेजची स्थापना झाली होती तेव्हा असे नव्हते. हिंदू राजांनी, मुसलमान नबाबांनी आणि हिंदू आणि मुसलमान जनतेने त्या कॉलेजकरिता पैसे दिले होते. हकीम साहेब फार हुशार डॉक्टर होते. ते हे कॉलेज चालवत असत. आयुर्वेदाचे शिक्षण तिथे सुरू करण्यात आल्यामुळे त्या कॉलेजमध्ये हिंदू आणि मुसलमान विद्यार्थीही शिकत असत. या कॉलेजचा एक विश्वस्त मीसुद्धा झालो होतो. आज काही सज्जन हिंदू माझ्याकडे आले होते आणि तिब्बिया कॉलेजचे काय होईल असे त्यांनी मला विचारले. सध्याच्या परिस्थितीत ते कॉलेज चालवणे फार कठीण आहे असे त्यांनी मला सांगितले. पैसा येणे बंद झाले आहे. तिब्बिया कॉलेजसारखे मोठे कॉलेज बंद पडले तर ती फार दुःखाची आणि लाजेची गोष्ट होईल. हे संकट टळावे म्हणून माझ्याकडून मी सर्व काही करतो आहे. ते कॉलेज करोलबागेत आहे. परंतु मुसलमान मुलांना त्या कॉलेजजवळ जाण्याची भीती वाटते. अनेक मुसलमानांना आपण आपल्या वाह्यातपणामुळे पळवून लावले आहे. पानिपतमधूनही अनेक मुसलमानांना पळवून लावण्यात आले आहे. परंतु दिल्लीत आज मुसलमान कुठे राहू शकतात आणि कुठे राहू शकत नाहीत हा मोठा प्रश्न आहे. ही लाजिरवाणी गोष्ट आहे. जे दुसऱ्याला नष्ट करण्याचा प्रयत्न करतात ते स्वतःचाच विनाश घडवून आणत असतात. हा जीवनाचा नियम आहे. ही स्वतःला आणि आपल्या धर्माला मिटवणारी गोष्ट आहे.

दुसरी गोष्ट जी तुम्हाला मला सांगण्याची इच्छा आहे ती मी आधीही तुम्हाला सांगितली आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ७, १९४७) परंतु ती वारंवार सांगायला काही हरकत नाही. तसे केले तरच लोकांना ही गोष्ट कळेल. आमच्या हिंदू आणि शीख मुलींना मुसलमानांनी पळवून नेले आहे. त्या

सर्व कुठे आहेत? ही गोष्ट काही दहावीस मुलींची नाही. ही संख्या शेकडोत वा हजारोतही असू शकेल. किती ते कोणालाही माहीत नाही. या सर्व मुली कुठे आहेत? आपल्याला त्यांना परत आणायचे आहे. लाहोरमधील काही हिंदू, मुसलमान आणि शीख स्त्रिया भेटल्या आणि या अपहृत मुलींना परत आणायचे व त्यांना त्यांच्या घरी पुनःस्थापित करायचे असे त्यांनी ठरवले. हिंदू आणि शिखांनी ज्या मुसलमान मुलींचे अपहरण केले त्यांनासुद्धा परत त्याच्या घरी पाठवायचे असे त्यांनी ठरवले. पतियाळाहून अपहरण झालेल्या मुलींची मला लांब यादी मिळाली आहे. त्यातील काही अतिशय संपन्न मुसलमानांच्या घरातील आहेत. त्या सापडतील तेव्हा त्यांना त्यांच्या पालकांकडे परत पाठवणे कठीण होणार नाही. परंतु हिंदू मुलींचे कुटुंबीय त्यांचे स्वागत करतील की नाही ही अजूनही शंका आहे. ही फार वाईट गोष्ट आहे. यात मुलीची काहीही चूक नसते. आपलीही चूक नसते. त्यांच्याशी कोणी लग्न जरी लावले, त्यांनी इस्लाम जरी कबूल केला तरी माझ्या मते त्या मुसलमान झाल्या नाहीत. त्यांना मी आदरपूर्वक माझ्याजवळ ठेवीन. एखाद्या मुलीचे मुसलमानाने अपहरण केले तर ती मुलगी परत आपल्या घरात वा समाजात घेण्यायोग्य राहत नाही असा विचार एकाही हिंदूने वा शिखाने करावा असे मला वाटत नाही. आपण तिचा तिरस्कार करू नये. आपल्याला तिच्याबद्दल सहानुभूती वाटली पाहिजे व तिच्याबद्दल आपल्याला कीव आली पाहिजे. ती मुलगी जर शीख असेल तर ती माझ्या दृष्टीतून शीखच राहते आणि ती हिंदू असेल तर माझ्या दृष्टीतून हिंदूच राहते. माझ्या मुलीची एखाद्या गुंडाने अब्रू घेतली व त्यामुळे तिला गर्भ राहिला तर मी तिला आणि तिच्या अपत्याला टाकून दिले पाहिजे काय? आणि जन्माला आलेले मूल धर्माने मुसलमान आहे अशी भूमिकाही मी घेऊ शकत नाही. त्याचा धर्म केवळ त्याला जन्म देणाऱ्या आईचा धर्म असू शकतो. मूल मोठे झाल्यानंतर त्याला वा तिला कोणताही धर्म स्वीकारण्याचा अधिकार राहील. आज आपली अशी दुर्दैवी अवस्था आहे की घरी परतल्यानंतर आपल्याला अपमानित जीवनच जगावे लागेल हे माहीत असल्यामुळे काही मुली घरी परत यायला नकार देतात. आईवडीलच काय नवरासुद्धा तिला निघून जायला सांगेल. अशा मुलींकरिता आश्रयगृहाची स्थापना करण्यात यावी असे मी सुचवले आहे. त्यांनी त्या मुलींच्या अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची जबाबदारी घ्यावी व त्यांना असे शिक्षण द्यावे की ज्यामुळे त्या मुली आपल्या पायावर उभ्या राहू शकतील. या मुली निष्पाप आहेत. मुसलमान मुलींचे अपहरण करणारे हिंदू वा शीख असो की हिंदू वा शीख मुलींचे अपहरण करणारे मुसलमान असो ते सगळे अपराधी आहेत. ज्या मुसलमानांनी हिंदू वा शीख मुलींचे अपहरण केले असेल त्यांनी त्यांना परत करावे व आम्ही अपराध केला अशी जाहीर कबुली देऊन त्यांनी माफी मागावी. मला मिळालेली यादी पाहून माझा थरकाप उडतो. काश्मीरमध्ये काय घडले? मोठ्या संख्येत मुसलमानांची कत्तल करण्यात आली आहे. स्त्रियांची कत्तल करण्यात आली आणि तरुण मुलींचे अपहरण करण्यात आले. अशा अत्याचार करणारांपर्यंत माझा

आवाज पोहोचत असेल तर त्यांनी त्या मुलींना परत करावे असे मी त्यांना सांगेन. तसेच शेकडो हिंदू मुलींचेही अपहरण करण्यात आले असल्याचेही मला सांगण्यात आले आहे. असे सांगतात एका पिराने मोठ्या संख्येत हिंदू आणि शीख मुलींना आपल्या घरी ठेवले आहे. ज्यांनी त्यांचे अपहरण केले ते सांगतात की आम्ही या मुलींचे अपहरण कोणत्याही प्रकारे त्यांची अब्रू घेण्याकरिता वा त्यांना अपमानित करण्याकरिता केलेले नाही, परंतु जोपर्यंत अपहृत मुसलमान मुलींना परत केले जात नाही तोपर्यंत आम्ही या मुलींना परत करणार नाही. हा अतिशय हलकटपणाचा सौदा आहे. अशा प्रकारे आपण वागू नये. आपण सज्जन माणसाप्रमाणे वागलो पाहिजे. कोणत्याही पूर्वअटीशिवाय आपण सर्व अपहृत मुलींना परत केले पाहिजे. आपल्याला जर आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवायचे असेल तर आपण शिष्टाचारपूर्वक वागणे शिकलो पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २४१ - ४३

६१. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २७, १९४७

संबल,

डिसेंबर २७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी आज या गावात प्रार्थना करत असल्यामुळे मला फार आनंद होत आहे. परंतु तुम्ही माझे आभार मानता, हार घालता वा मानपत्र देता असे व्हायला नको. प्रार्थना तर आपला धर्म आहे. आपण जेव्हा सकाळी उठतो तेव्हाच प्रार्थना करतो. आपण दररोज सकाळी आणि सायंकाळी प्रार्थना केली पाहिजे. सायंकाळी वा पाच वाजता वा थंडी असली तर लवकर. आपण सामूहिक प्रार्थना करू शकतो. आपण उभे राहतो, बसतो वा झोपतो तेव्हा आपण ईश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. काम करतानाही आपण ईश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. प्रार्थनेत काय भरलेले आहे ते आज मी तुम्हाला समजावून सांगू शकत नाही. मला तितका वेळ नाही.

मला स्वागतपर भाषण नको आणि हारतुरे नको असे मी जरी सांगितले होते तरीही ते तुम्ही दिले. याकरिता आणि तुम्ही केलेल्या माझ्या सन्मानाकरिता मी तुमचे आभार मानतो. तुम्ही तुमच्या भाषणात सत्य आणि अहिंसेची महत्ता सांगितली. तुम्ही उल्लेखिलेली सत्य आणि अहिंसा ही फार मोठी गोष्ट आहे. परंतु आपले आचारविचार तसे नसतील तर आपण दांभिक होऊ. मी तर अशी फसवणूक करू शकत नाही. दक्षिण आफ्रिकेतून भारतात आल्यापासून मी देशभर हिंडतो आहे. एकदाच नाही तर अनेकदा संपूर्ण देशात मी फिरलो आहे. हजारो गाव पाहिले आहेत. ते सत्य आणि अहिसेची महत्ता सांगतात परंतु करत काहीच नाही. ते एका पद्धतीने विचार करातात, वेगळ्या पद्धतीने बोलतात आणि अजूनच वेगळ्या पद्धतीचे आचरण करतात. भारतात हिंदू, मुसलमान आणि शीख यांनी परस्परांची कत्तल करावी ही आपल्याकरिता लाजेची गोष्ट आहे. भाग्य की तुमच्या गावात आणि आजूबाजूला दंगली झाल्या नाहीत. इथे फार कमी मुसलमान राहतात आणि ते तुमचे कोणतेही नुकसान करू शकत नाहीत हे त्याचे कारण असावे. आपण जर परस्परांशी शत्रूप्रमाणे वागणार असू तर आपण अहिंसेसंबंधी बोलणे बंद केले पाहिजे. किमान इतके तरी सत्याचरण आपण केले पाहिजे. एकमेकांची कत्तल करण्याकरिता आपण स्वतंत्र झालेलो नाही. स्वातंत्र्य म्हणजे जे काही चांगले असेल त्याप्रमाणे आपण स्वतःहोऊन आचरण करणे. चांगले होण्याकरिता आपण स्वतंत्र झालो आहो, वाईट होण्याकरिता नाही. खोटे बोलण्याकरिता आपण कधीही ईश्वराची प्रार्थना करत नसतो. आपण तसे तरू तर ते सैतानाला शरण गेल्यासारखे होईल.

आपण पंचायतची स्थापना केली हे चांगले केले. परंतु ती योग्य पद्धतीने काम करणार नसेल व केवळ नावाकरिता पंचायत असेल तर तिच्यापासून काहीही लाभ होणार नाही. पूर्वीच्या काळी भारतात खऱ्या पंचायती असायच्या. मीसुद्धा त्या पाहिल्या नाही. परंतु चीन आणि ग्रीसमधून आलेल्या प्रवाश्यांनी त्यांचा उल्लेख केला आहे. त्या प्रवाश्यांना कोणी काही पैसा दिला नव्हता. त्यांना कोणी बोलावलेसुद्धा नव्हते. अनेक हालअपेष्टा सहन करून ते स्वतःहोऊन आले होते. ज्ञान मिळवण्याकरिता ते आले होते. ते लिहितात की त्या वेळी हिंदुस्तानमध्ये कुठेही चोऱ्या होत नव्हत्या, दारांना कुलुपे नव्हती. हे सर्व काही हजारो वर्षांपूर्वी घडले नव्हते. आपला इतिहास हजारो वर्षांइतका मागे जात नाही.

पूर्वी चार वर्ण होते. (ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र.) आज त्यांची संख्या किती तरी झाली आहे. त्यांना वर्ण म्हणण्याला काहीही अर्थ उरला नाही. पंचायतची स्थापना करून तुम्ही फार मोठी जबाबदारी पत्करली आहे. गायी इतके कमी दूध देतात की त्यांची कत्तल केली पाहिजे असे अनेक लोक म्हणतात. मुसलमान गायीची कत्तल करतात यात काही संशय नाही. परंतु हिंदू जितक्या गायींची कत्तल करतात तितकी कत्तल जगात कोणीही करत नाही. हिंदू गाय चांगल्या प्रकारे पाळत नाहीत. त्यांची कशी काळजी घ्यावी हेही त्यांना माहीत नसते. याचा परिणाम गाईचा हळूहळू मृत्यू होण्यात होतो. यापेक्षा त्यांना एकदम मारणे बरे. आपण गायीची पूजा करतो आणि तरीही त्यांच्याशी अतिशय क्रूरपणाचे वर्तन करतो. तुमच्या गायी जर आज तीन शेर दूध देत असतील व उद्या त्यांनी सहा शेर दूध दिले तर मी म्हणेन की तुमच्या पंचायतने काही काम केले.

याचप्रमाणे आतापेक्षा तुम्ही दुप्पट धान्य पिकवले पाहिजे. जमिनीचा कस वाढण्याकरिता जे खत पाहिजे ते देऊन तुम्ही असे करू शकता. मीराबेनने एक परिषद बोलावली होती व मोठ्या संख्येत तिला लोक हजर राहिले होते. शेण, विष्टा, भाज्यांमधून निघालेला कचरा इत्यादी ज्या गोष्टी खेड्यांमध्ये उपलब्ध असतात त्यांचे सुंदर खतात रूपांतर करता येते. त्याकरिता खर्च येत नसतो, केवळ थोडीशी मेहनत पाहिजे असते. तसे केले तर जमिनीचा कस वाढतो.

तुम्ही तुमचे गाव कसे स्वच्छ ठेवता की ठेवत नाही ते मला माहीत नाही. परंतु तुम्ही सशक्त होणे हे तुमचे आद्य कर्तव्य आहे. तुम्ही बाहेरून आणि आतून स्वच्छ असायला पाहिजे. तुमचे गाव धूळ आणि मलमुत्रापासून पूर्णपणे मुक्त असले पाहिजे. आणि घाणेरड्या वासापासूनही ते मुक्त असले पाहिजे. तुम्ही आरोग्याचे नियम पाळले पाहिजे.

तुम्हाला इथे सिनेमा का हवा? यापेक्षा आपल्याला माहीत असलेले किती तरी नाटक तुम्ही करू शकता. सिनेमांमुळे तुम्ही केवळ पैसे खर्च कराल. मग तुम्ही जुगार खेळणे व इतर दुर्व्यसनही शिकता. ज्या लोकांना दारू, गांजा आणि भांग यांचे व्यसन लागलेले असेल त्यांनी ते व्यसन सोडावे.

असे झाले तर पंचायतने काही चांगले काम केले असे मी म्हणेन. मग तुमचे गाव पाहण्याकरिता दिल्लीहून लोक येतील. तुम्ही अस्पृश्यता विसरायला पाहिजे. हिंदू, मुसलमान, शीख, पारसी हे सर्व भाऊ आहेत हे तुम्हाला कळले तर स्वतंत्र भारताचा काय अर्थ आहे ते तुम्हाला कळेल. ईश्वर तुम्हाला हे सर्व साध्य करण्याची शक्ती देवो.

कृपाकरून टाळ्या वाजवू नका. मी जे काही म्हणालो तो तुमच्या प्रार्थनेचा भाग आहे. मला तुमचे आशीर्वाद हवे आहेत आणि मी जे सांगितले ते सर्व तुम्ही केले तर मला सर्व काही मिळाले असे मी समजेन.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २४३ -४६

६२. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २८, १९४७

नवी दिल्ली,

डिसेंबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी कापड व्यापाऱ्यांच्या सभेकरिता गेलो होतो (पाहा याआधीचा विषय). इतर अनेक गोष्टींप्रमाणेच कापडसुद्धा निर्नियंत्रित झाले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. कापडावरील नियंत्रण उठवण्यात आले पाहिजे याबद्दल मला मुळीच संशय नाही. सभेत काय झाले ते वृत्तपत्रातून तुम्ही पाहिले असेल. नियंत्रण असतानासुद्धा कापडाचे भाव उतरू लागले आहेत. याचे कारण लोकांचे असे मत झाले आहे की गांधीजी लोकांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवतात व त्यामुळे कापडावरील नियंत्रण लवकरच उठेल. यामुळे चोरबाजारातील कापड उघड्या बाजारात आले व कापडाचे भाव उतरू लागले आहेत असे व्यापारी मला सांगत होते.

असेच साखरेबद्दलही घडत आहे. असे सांगतात की जिकडे जावे तिकडे साखरेचे ढीग लागलेले आहेत. तिथून सर्व लोक साखर घेऊन जातात. एक रुपया भावाने घेतात. काही लोक म्हणतात की या भावाने आम्ही घेऊ शकत नाही. मग १५ आणे ठीक आहे, चौदा आणे ठीक आहे असे म्हणतात. निर्नियंत्रामुळे भाव उतरले व त्यामुळे लोक थोडे आरामात राहू शकतात अशा आशयाच्या तारा मला येत आहेत. परंतु याकरिता मला नाही तर करोडो लोकांना धन्यवाद दिले पाहिजे कारण मी त्यांचाच आवाज उठवत होतो. आणि म्हणूनच माझा आवाज ऐकला जातो. असे नसते तर माझे कोणी ऐकले असते? माझ्या एकट्याच्या आवाजाला काहीही महत्त्व नाही.

जेव्हा मी म्हणतो की मुसलमानांना शत्रू समजू नका. तेव्हा लोक माझ्याकडे पाहायला तयार नसतात. ते मला वेड्यात काढतात. जनता जर माझे ऐकणार नसेल तर ते त्यांच्या धर्माची हानी करील हे मी तुम्हाला सांगायलाच पाहिजे. मी काहीही चुकीचे सांगत नाही. मी जर तुम्हाला नेहमी हितकारक सांगत असेन तर आताच मी तुम्हाला चुकीचे का सांगेन याचा तुम्ही विचार केला पाहिजे. मी कधीही चुकीचे सांगत नसतो. यात चुकीचे सांगण्यासारखे काय होते? दया धर्माचे मूळ आहे असे जे मी सांगतो ते तुलसीदासांनीच सांगितलेले आहे. तुलसीदास म्हणतात की दया धर्म का सार है. करुणा धर्माचे सार आहे. तुलसीदासला म्हणा की तू वेडा आहेस. परंतु तुलसी रामयणाइतके दुसरे कोणतेही पुस्तक लोकप्रिय नाही. ते केवळ बिहार आणि दिल्लीतच लोकप्रिय नाही तर ते सर्वत्र वाचले जाते. तुलसीदास

जे म्हणाले होते त्याचा मी केवळ पुनरुच्चार केला होता. मी केवळ त्यांचे काम करत होतो. त्यांनी सांगितलेलेच मी सांगत होतो. यात मला पागल म्हणण्यासारखे काय आहे? ते असे का म्हणतात?

इंधनावर काय नियंत्रण ठेवायचे? ती काही खायची गोष्ट तर नाही की मिळाली तर लोक खाऊन टाकतील म्हणजे लाकूड जाळून टाकतील. मग त्याच्यावर नियंत्रण का? ते तितकेच इंधन जाळतील जितक्याची त्यांना गरज आहे. जोपर्यंत लाकडावरील नियंत्रण हटत नाही तोपर्यंत माझे समाधान होणार नाही. आज लाकूड मिळणे इतके कठीण झाले आहे की लोकांना त्याचा त्रास होऊ लागला आहे.

लोक वरून मला सांगतात की तुम्ही इतके केले आहे तर पेट्रोलवरील नियंत्रण उठवायला सांगा. मी तर म्हणेन की पेट्रोलवरील नियंत्रणही दूर झाले पाहिजे आणि उद्यापासूनच दूर झाले पाहिजे. असे झाले तरच आपले हित होईल. पेट्रोलवरील नियंत्रण दूर झाले तर जास्त मोटारी चालतील. यामुळे गरिबांचे नुकसान होणार नाही, फायदा होईल. रेल्वेगाड्या जास्त चालल्या तर अर्थातच पेट्रोल तितके लागणार नाही. परंतु रेल्वेचे रूळ टाकण्याकरिता करोडोंचा खर्च येतो. जास्त रेलवेगाड्या धावायच्या तर जास्त खर्च येतो. परंतु जितक्या आहेत तितक्यांचा तर चांगला उपयोग होऊ द्या. जास्तीच्या गाड्यांचे काय कराल? जे काही आपल्याजवळ आहे त्याचा आपण जास्तीत जास्त चांगला उपयोग केला पाहिजे. आज आपल्याजवळ पुरेशा रेल्वे आहेत. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याकरिता पुरेसे रस्ते आहेत. आपल्याजवळ केवळ पेट्रोल नाही. आज आपल्याला रेल्वेच्या दळणवळणाची गरज नाही, सडकेने होणाऱ्या वाहतुकीची गरज आहे. मला खात्री आहे की पेट्रोलवरील नियंत्रण उठले तर सडकेवरील वाहतूक वाढेल. नियंत्रण काढले तर चोहोकडील किंमती उतरतील. नियंत्रण काढून घेण्यात आलेल्या एकाही वस्तूची किंमत वाढलेली दिसत नाही. असे नसते तर मला इतक्या सगळ्या तारा मिळाल्या नसत्या. पेट्रोलच्या निर्नियंत्रणामुळे आणि रस्त्याची वाहतूक वाढल्यामुळे कापड आणि धान्य एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी पाठवणे सोपे होईल. मीठसुद्धा सहजपणे उपलब्ध होऊ शकेल. मिठाची किंमत सर्वात आधी कमी होणे गरजेचे आहे. मिठावरील कर रद्द करण्यात आला आहे, परंतु मिठाची किंमत वाढली आहे. हे चूक आहे. आपण मीठ तयार करणे शिकलो नाही. आपल्याजवळ फार मोठा समुद्र किनारा आहे. त्यामुळे आपल्याला मिठाचा तुडवडा पडायला नको. समुद्राच्या पाण्यापासून लहान मूलसुद्धा मीठ तयार करू शकते. मी जर बंगालच्या उपसागरातून थोडेसे पाणी आणले तर त्याच्यापासून मी सहजपणे मीठ तयार करू शकेन. मिठाकरिता इतकी किंमत द्यावी लागावी आणि इतका त्रास घ्यावा लागावा हे दुर्दैव आहे. याचे कारण एकच आहे. मीठ जिथे तयार होते तिथून दुसरीकडे सहजपणे त्याची वाहतूक करता येत नाही. हेच मीठ महाग असण्याचे कारण आहे. मिठाच्या वाहतूकीकरिता ठेकेदार नेमण्यात चूक झाली हे मला माहीत आहे. ते अप्रामाणिकपणा करतात आणि

भरपूर पैसा कमावतात. इतरांना मिठाची वाहतूक करता येत नाही. ही ठेकेदारीची पद्धत बदलली पाहिजे व मिठावरील नियंत्रण उठवले पाहिजे. दोन गोष्टी आवश्यक आहेत - एक ठेकेदारी पद्धतीत बदल आणि दुसरी सडकेद्वारे दळणवळणाची व्यवस्था दुरुस्त करणे. आजकरिता इतके पुरे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २४७-९

६३. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २९, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे प्रवचन वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,
डिसेंबर २९,१९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल हकीम अजमल खॉ यांच्या मृत्यूचा दिवस होता. हिंदुस्तानातील हिंदू, शीख, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी, ज्यू इत्यादी सर्वांना ते प्रिय होते. ते कट्टर मुसलमान होते. परंतु या सुंदर देशात राहणाऱ्या प्रत्येकाची सेवा ते सारख्याच भक्तिभावाने करायचे. दिल्लीत काढण्यात आलेले तिब्बिया कॉलेज आणि रुग्णालय हे त्यांच्या श्रमाचे सर्वात सुंदर स्मारक आहे. तिथे सर्व प्रकारचे विद्यार्थी शिकायचे आणि तिथे युनानी, आयुर्वेद, आणि पश्चिमेतील चिकित्सा विज्ञानाचे शिक्षण दिले जात असे. या संस्थेत कोणत्याही प्रकारची सांप्रदायिकता नसूनही सांप्रदायिकतेच्या विषामुळे ही संस्था बंद पडली आहे. हे कॉलेज बनवणारे हकीम साहेब कितीही सज्जन व चांगले गृहस्थ असले व त्यांनी कितीही मानसन्मान मिळवलेला असला तरी ते मुसलमान असल्यामुळे हे कॉलेज बंद पडले असेच मला वाटते. हे कॉलेज बंद पडण्याकरिता याहून वेगळे कारण मला तरी दिसत नाही. या स्वर्गावासी देशभक्ताची आठवणसुद्धा हिंदू-मुसलमानांमधील वैमनस्य दूर करणार नसेल तरी निदान आपण या महाविद्यालयाला नवजीवन देऊ शकतो.

आपल्या सभा उघड्या आकाशाच्या मंडपाखाली व्हाव्या असे मी काल सुचवले होते. ही फार चांगली गोष्ट होईल. आपल्यामध्ये जर ही सवय रुजली तर या कामाकरिता विचारपूर्वक जागा वगैरेची व्यवस्था करावी लागेल. याकरिता लहानमोठ्या शहरांमध्ये पटांगणे लागतील. आपल्याला आपल्या सवयी बदलाव्या लागतील. गोंगाट करण्याऐवजी शांततेने पद्धतशीरपणे बसणे शिकावे लागेल. आवश्यक असेल तेव्हाच आपण बोललो पहिजे आणि तेही प्रसंगानुरूप. फार हळू नाही, फार जोरात नाही. आपण आपल्या शेजाऱ्यांच्या अधिकाराचा आदर केला पाहिजे व व्यक्तिगत पातळीवर वा सामूहिक पातळीवर आपण इतरांच्या मार्गात यायला नको. इतरांच्या कामात आपण हस्तक्षेप करू नये. या सर्व गोष्टींकरिता अनेकदा फार मोठा आत्मसंयम लागेल. अशी सामाजिक व्यवस्था झाली तर दिल्लीच्या या सर्वात जास्त घाईगर्दीच्या रस्त्यात आज जी धूळ व गोंगाट दिसतो तो दिसणार नाही व कितीही जास्त गर्दी असली तरी ढकलाढकल वा बाचाबाची वा गोंधळ दिसणार नाही. अशी परिस्थिती कधीही निर्माण होऊ शकणार नाही असा विचार आपण कधीही करायला नको. कोणत्या तरी एखाद्या

गटाने या कामाची जबाबदारी घेतली पाहिजे व त्याकरिता प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. असे केले तर किती शक्ती आणि पैसा वाचेल याचा विचार करा.

काश्मीर व तेथील महाराज यांच्याबद्दल मी जे काही म्हणालो (पाहा प्रार्थना प्रवचन डिसेंबर २५, १९४७) त्याबद्दल माझी फार जोरदार खरडपट्टी काढण्यात आली आहे. माझ्यावर टीका करणारांनी मी जे काही म्हणालो ते नीटपणे वाचले नाही असे दिसते. एखादा अतिशय नम्र माणूस देईल तसा माझा सल्ला होता. प्रसंगावशात असा सल्ला देणे हे माणसाचे कर्तव्य होत असते. महाराज जर माझ्या सल्ल्याप्रमाणे वागले असते तर त्यांच्या स्वतःच्या आणि जगाच्या दृष्टीत त्यांचा मानसन्मान वाढला असता. आजची त्यांची आणि त्यांच्या संस्थानाची अवस्था फारशी स्पृहणीय नाही. काश्मीरमध्ये बहुसंख्य मुसलमान असूनही काश्मीर हिंदू संस्थान आहे. घूसघोर त्यांच्या घूसखोरीला जिहाद म्हणतात. ते म्हणतात की काश्मीरच्या हिंदू राजाच्या अत्याचाराखाली तेथील मुसलमान पायदळी तुडवले जात आहेत व त्यांच्या रक्षणाकरिता आम्ही आलो आहो.

महाराजांनी शेख अब्दुल्लांना अगदी योग्य वेळी आमंत्रित केले. शेख अब्दुल्लांकरिता हे काम नवीन आहे. ते या कामाकरिता योग्य आहेत असे जर महाराज समजत असतील तर त्यांना प्रत्येक बाबतीत प्रोत्साहन मिळाले पाहिजे. शेख अब्दुल्ला अल्पसंख्याकांना आणि बहुसंख्याकांना जर आपल्याबरोबर ठेवू शकणार नसतील तर ते काश्मीरला केवळ सैनिकी शक्तीने वाचवू शकणार नाहीत हे मला आणि बाहेरच्या जगालाही स्पष्टपणे दिसते. महाराज आणि शेख अब्दुल्ला या दोघांनीही भारताची सशस्त्र मदत मागितली आहे.

इंग्लंडच्या राजाप्रमाणे काश्मीरच्या महाराजांनी केवळ घटनात्मक प्रमुख व्हावे असा माझा त्यांना सल्ला आहे व त्यांनी आपले सरकार व डोगरा सैन्य (जम्मू आणि कास्मीर संस्थानाचे सैन्य) यांना शेख साहेब व त्यांचे मंत्रिमंडळ यांच्या सल्ल्याप्रमाणे चालवावे. यात विचित्र असे काय आहे? काश्मीरच्या संघराज्यातील विलिनीकरणाच्या अटी तशाच राहतील. त्या अटींनी महाराजांना काही अधिकार दिले आहेत. महाराजांनी त्या अधिकारांचा स्वतःहोऊन त्याग करावा, हिंदु संस्थानिक म्हणून घटनात्मक प्रमुखाची भूमिक घ्यावी असा त्यांना सल्ला देण्याचे साहस मी केले आहे.

मला मिळालेले वृत्त चुकीचे असेल तर माझी चूक दुरुस्त करण्यात यावी. हिंदू धर्म आणि त्यानुसार राजाचे कर्तव्य याबद्दलच्या माझ्या कल्पना जर चुकीच्या असतील तर माझ्या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. आणीबाणीतील प्रशासक म्हणून अथवा एक चांगला मुसलमान म्हणून जर शेख अब्दुल्ला आपल्या कर्तव्यात कमी पडत असतील तर त्यांनी स्वतःहोऊन बाजूला व्हावे आणि जो कोणी अधिक चांगला प्रशासक असेल त्याच्या हाती त्यांनी सत्तेची सुत्रे द्यावी. आज काश्मीरच्या

भूमीवर हिंदूधर्म आणि इस्लामची परीक्षा होत आहे. जर दोघेही योग्य पद्धतीने काम करतील तर सर्व मुख्य कार्यकर्त्यांना यश मिळेल आणि त्यांचे यश, नाव आणि प्रतिष्ठा कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. देशातील आजच्या काळोखाच्या अवस्थेत काश्मीर प्रकाश देणारा तारा व्हावा हीच माझी प्रार्थना आहे.

महाराज आणि शेख साहेब यांच्याबद्दल इतके पुरे. पाकिस्तान सरकार आणि संघराज्य एकत्र येऊन हिंदुस्तानातील काही निष्पक्ष लोकांच्या मदतीने याबाबतीत तोडगा काढू शकणार नाही काय? हिंदुस्तानात एकही निष्पक्ष माणूस नाही काय? इतक्या मोठ्या प्रमाणत आपण दिवाळखोर झालो नाही अशी माझी खात्री आहे.

मथुरेतील एका भगिनीने कांबळी विकत घेण्याकरिता मला ५० रुपये पाठवले आहेत. मलासुद्धा आपले नाव सांगण्याची त्या भगिनीची इच्छा नाही. या रकमेची पोच मी प्रार्थना सभेत द्यावी अशी त्यांची इच्छा आहे. त्याप्रमाणे मी त्यांच्या रकेमीची साभार पोच देतो.

आश्चर्याची गोष्ट ही आहे की ज्या संस्थानिकांनी भारतात सामील होण्याची इच्छा व्यक्त होती ते आता तारा पाठवून तक्रारी करत आहेत. जर एखाद्या राजाला वा जमीनदाराला आपण एकट्याने आपला कारभार चालवू शकत नाही असे वाटत असेल तर त्याला वेगळे राहण्याकरिता कोण भाग पाडत आहे? जे लोक अशा तारांवर पैसा खर्च करतात त्यांनी आपला पैसा व्यर्थ खर्च करू नये असा सल्ला मी देईन. असे दिसते की या तारांमागे जे कोणी आहेत त्यांना आपली पोळी भाजायची आहे. त्यांनी गृहविभागाच्या सचिवांकडे जाऊन सल्ला घ्यावा. विशेषेकरून डाक आणि तार विभागातील अनेक मुसलमान कर्मचारी म्हणतात की प्रचाराकरिता आधी आम्ही भारतीय संघराज्यात राहण्याचा विकल्प मान्य केला होता. परंतु आता आम्हाला तो विकल्प बदलायचा आहे. अनेक मुसलमानांना नोकरीवरून बरखास्त करण्यात आले आहे. मला असे वाटते की ते हिंदूविरोधी असल्याच्या संशयामुळे असे करण्यात आले असावे. मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. परंतु मला वाटते की त्यांना कामावरून काढणे वैयक्तिक पातळीवर कितीही अन्याकारक असले तरी तरी ते क्षम्य समजण्यात आले पाहिजे व त्यांनी आपल्या रागावर नियंत्रण ठेवावे. मी तर यावर माझा नेहमीचाच उपाय सांगू शकतो. फार कमी लोकांना सरकारी नोकरी मिळू शकते. सरकारी नोकरी मिळवणे हा माणसाच्या जीवनाचा उद्देश कधीही असू शकत नाही. माणसाच्या जीवनाचे उद्दिष्ट प्रामाणिकपणे जीवन जगणे आहे. माणसाची जर हातपाय हलवण्याची म्हणजे मेहनत करण्याची इच्छा असेल तर प्रामाणिकपणे जगण्याचा मार्ग त्याला केव्हाही सापडेल. मला वाटते की मुसलमानांना जर आपला स्वाभिमान टिकवायचा असेल तर त्यांनी सरकारी नोकरी मिळाली नाही तर ती मिळवण्याकरिता पाकिस्तानमध्ये

जाण्याची इच्छा ठेवण्याच्या सीमेपर्यंत धावपळ करू नये. मनोभावे सेवा केल्याने सत्ता मिळते. बहुधा सत्ता मिळाल्यामुळे माणसाचा अधःपात सुरू होतो. तिच्याकरिता भांडण्यात शोभा नाही. त्याचबरोबर मोठ्या संख्येतील बेकार लोकांकरिता काम निर्माण करणे सरकारचे काम आहे. हे काम कौशल्याने पार पाडले तर सरकारकरिता ते ओझ्यासारखे तर होणारच नाही उलट त्यामुळे सरकारचा लाभच होईल. मी असे गृहीत धरतो आहे की ज्या लोकांकरिता काम पाहायचे आहे त्याची शरीरप्रकृती चांगली आहे व ते कामाची टाळाटाळ करणारे नसून त्यांना काम करण्याची इच्छा आहे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ २४९-५३

६४. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ३०, १९४७

नवी दिल्ली,
डिसेंबर ३०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण किती सुसंस्कृत झालो पाहिजे हे मी तुम्हाला काल सांगितले होते. मी तुम्हाला काल सांगितले होते की कोट्यवधी माणसे असली तरी पूर्ण शांतता राहील अशा प्रकारे आपण बोललो पाहिजे, चाललो पाहिजे. आणि आपली वागणूक अशी असली पाहिजे की लाखो लोक जरी असले तरी गोंधळ निर्माण व्हायला नको आणि गर्दी जाणवायला नको. असे सैन्यात होत असते. ते बाह्यतः शिस्तीचे पालन करत असतात. आत काय होते हा वेगळा प्रश्न आहे. आपल्याला अशा प्रकारचे प्रशिक्षण मिळालेले नाही. अनेकदा माझ्या लक्षात आले आहे की मी जेव्हा प्रार्थना संपवून जाऊ लागतो मला पाहण्याकरिता माझ्या बाजूला लोक गर्दी करतात. प्रार्थनासभा संपल्यानंतर प्रत्येकाने शांतपणे जायला पाहिजे. मी जे काही म्हणतो त्यात जे चांगले असेल त्याच्यावर घरी जाताना चिंतन केले पाहिजे.

मला बहावलपूरहून एक पत्र मिळाले आहे. याआधीही बहावलपूरबद्दल मी तुमच्याशी बोललो होतो. (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २३, १९४७) मी जे काही म्हणालो होतो ते तेथील लोकांना आवडले होते. एका बंधूंनी मला लिहिले की मी परत एकदा बहावलपूरबद्दल बोलावे. तेथील अनेक हिंदू आणि शिखांमध्ये इथे येण्याची शक्ती नाही. अजूनही तिथे भरपूर हिंदू आणि शीख आहेत. कोणत्याही अडथळ्याशिवाय त्यांना शांततापूर्वक इथे येऊ दिले पाहिजे. परततांना आपल्यावर हल्ला होऊ नये अशी त्यांची इच्छा आहे. माझ्या म्हणण्याचा काही परिणाम होतो की नाही ईश्वरालाच माहीत. तेथील नबाब साहेब तर म्हणतात की मला तर माझी सर्व प्रजा सारखी आहे. असे असूनही ते हिंदू आणि शिखांचा सांभाळ करू शकत नसतील तर ज्या कोणाला इथे यायची इच्छा असेल त्याला त्यांनी गाडीत बसवावे आणि इथे पाठवून द्यावे. सीमेपर्यंत त्यांना संरक्षण द्यावे. जोपर्यंत त्यांना आणण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांच्या खाण्याची, कपड्याची व पांघरुणाची नीट व्यवस्था करावी. ते असे करतील अशी मला आशा आहे. आणि ते म्हणतात की त्यांना त्यांच्या सर्व प्रजेच्या कल्याणात सारखाच रस आहे. ते जेव्हा असे म्हणतात तेव्हा त्यांच्या हेतूवर संशय घेणारा मी कोण? तरीही मी त्यांना आणि त्यांच्या अधिकाऱ्यांना विनंती करीन की ज्या हिंदूंना आणि शिखांना तिथे राहायचे नाही त्यांना परतायची परवानगी देण्यात यावी. त्यांना स्वतःबरोबर जितका काही पैसा अडका सोबत घेता येईल तितका घेऊ द्यावा आणि व भारतात येण्याची परवानगी द्यावी. त्यांनी इतके केले तरी पुरेसे होईल.

परंतु मी केवळ नबाब साहेबांनाच विनंती करून थांबणार नाही. मी कायदे आझम जिना आणि त्यांच्या सरकारलाही सांगेन की आजकाल हिंदू आणि शीख यांना सिंधमध्ये शांततापूर्वक राहणे कठीण झाले आहे. ज्या हिंदूंना अस्पृश्य म्हणतात त्यांचा विशेषेकरून छळ करण्यात येतो व त्यांच्याजवळ उपजिविकेचे कोणतेही साधन नाही. कमीतकमी त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात येऊ नये. तिथे राहण्यात ज्यांना समाधान वाटत नाही त्यांना निदान निघून जाण्याची परवानगी देण्यात यावी. सिंधमधील परिस्थिती पूर्ववत झाली आणि तिथे राहणारांचे जीवन सुखावह झाले तर जे सिंधमधून निघून गेले आहेत तेसुद्धा परततील. परंतु सध्या तशी परिस्थिती नाही. इतकेच नाही तर काठेवाडमधून गेलेल्या निर्वासितांकरिता त्यांच्या शाळासुद्धा ताब्यात घेण्यात आल्या आहेत. तेथील सरकारचे म्हणणे आहे की निर्वासितांच्या गरजेला सर्वाधिक प्राधान्य आहे. अशा परिस्थितीत तिथे हिंदू कसे राहू शकतील? याचा अर्थ असा होईल की पाकिस्तान इस्लामिस्तान झाले आहे आणि तिथे एकही मुसलमानेतर राहू शकत नाही वा केवळ गुलाम म्हणूनच मुसलमानेतर राहू शकतात. मला वाटते की कोणालाही गुलाम होऊन राहणे आवडत नाही. ही गोष्ट कोणाच्याही हिताची नाही. मला अजूनही बऱ्याच गोष्टी सांगायच्या आहेत आणि माझ्याजवळ केवळ पंधरा मिनिटेच आहेत.

मी तुमच्याशी पंढरपूरबद्दल बोललो होतो (पाहा प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ५, १९४७). तिथे विठ्ठलाचे मंदिर आहे. महाराष्ट्रातील ते सर्वात मोठे मंदिर आहे. मी तिथे गेलो आहे. ते हरिजनांकरिता उघडावे अशी मी सूचना केली होती. यानंतर मंदिराच्या विश्वस्तांनीसुद्धा माझ्या मागणीला पाठिंबा दिला होता. हरिजनांकरिता मंदिर उघडण्यात आले ही बातमी जेव्हा मला कळली तेव्हा मी ती तुम्हाला सांगितली. सर्वांचे समाधान झाले असे दिसत होते आणि कोणाचाही विरोधी आवाज ऐकू येत नव्हता. आता ते सांगतात की दररोज अनेक हरिजन मंदिरात दर्शनासाठी येत असल्यामुळे ब्राह्मण पुजारी फार नाराज आहेत. काही पुजारी उपोषणावर गेले आहेत असे दिसते. हे ऐकून मला फार वाईट वाटले. मला आजच ही तार मिळाली आणि तिथे पोहोचण्याचा माझ्याजवळ इतर कोणताही मार्ग नसल्यामुळे या प्रकरणाचा इथे उल्लेख केला तर माझा आवाज पंढरपूरपर्यंत पोहोचेल असे मला वाटले. ज्या लोकांनी उपोषण सूरू केले आहे व तरीही जे स्वतःला पुजारी म्हणवतात ते खरे पुजारीच नाहीत असे मी नम्रपणे आणि दृढतापूर्वक सागतो. आज तर ते लोकांना लुटत आहेत. ते ना तर स्वतःचे हित करतात ना धर्माचे. मंदिरातील मुर्ती विठ्ठलाची म्हणजे कृष्णाची म्हणजे विष्णूची आहे. काहींनी आपले दर्शन घ्यावे आणि इतर काहींनी नाही अशी विष्णूची इच्छा कधीही असू शकत नाही. देवाकरिता सर्व एक आहेत. जोपर्यंत हरिजनांना मंदिरात प्रवेश नव्हता तोपर्यंत माझ्या दृष्टिकोनातून ते मंदिर पवित्रच झालेले नव्हते. हे लोक आता का उपोषण करत आहेत? मंदिर प्रवेशासंबंधीचे विधेयक मंजूर झालेले आहे. हा कायदा करणारेसुद्धा हिंदूच होते. हे मंदिर हरिजनांकरिता उघडले पाहिजे असे करोडो लोक म्हणत असूनही हे

मंदिर हरिजनांकरिता बंद राहिले पाहिजे असे हे लोक कसे काय म्हणू शकतात? यामुळे त्या पुजाऱ्यांनी आता माघार घेतली पाहिजे आणि आम्ही चुकलो होतो आणि आता आमचे डोळे उघडले असे म्हणून त्यांनी उपवास सोडला पाहिजे. ईश्वराच्या देवळात एकाला प्रवेश आहे आणि दुसऱ्याला नाही असे होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे गंगेत आंघोळ केल्याने पापी माणसाचे पाप धुऊन निघतात त्याचप्रमाणे असे म्हणतात की या देवळात दर्शन घेतल्याने पापी माणसाचे पाप धऊन निघतात. गंगेच्या पाण्यात आंघोळ केल्याने माणसाचे पाप धुऊन निघतात यावर माझा व्यक्तीशः विश्वास नाही परंतु बरेच लोक असे मानतात. आणि गंगेत आंघोळ केल्याने आपले पाप धुऊन निघतील या श्रद्धेने जो गंगेत आंघोळ करतो कदाचित त्याचे त्यामुळे काही हितही होत असेल. आणि हरिजन पापी आहेत असे कोण म्हणू शकतो? हरिजनांमध्येही काही अतिशय गुणी लोक आहेत तसेच काही पापीही आहेत.

मुंबईबद्दल माझ्याकडे एक तक्रार आली आहे. ही गोष्ट इतर ठिकाणांबद्दलही खरी असू शकते. मुंबईतील कार्डधारकांना फार कमी तांदुळ पुरवला जातो, बहुधा दर आठवड्याला अर्धा शेर अशी तक्रार आहे. हे अगदीच कमी आहे आणि यामुळे काळाबाजार फोफावेल. माझे तर म्हणणे आहे की नियंत्रण गेले पाहिजे. काही लोक म्हणतात की नियंत्रणामुळे शहरातील लोकांना बरीच मदत झाली आहे. परंतु नियंत्रणामुळे शहरातील समस्याही पूर्णपणे सुटली नाही असे काही सांगतात. शहरातील लोक जर प्रामाणिक होतील तर हा त्रास नाहीसा होईल. लोकांचे पोट भरले तर लोक काळ्याबाजारात कशाला जातील? माझे तर मत आहे की शहरातूनसुद्धा नियंत्रण काढून टाकले पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय - प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २५४-५

६५. प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ३१, १९४७

नवी दिल्ली,

डिसेंबर ३१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझ्याजवळ किती तरी पत्रे आली आहेत. सर्वांचे उत्तर देऊ शकणार नाही, परंतु किती पत्रांचे उत्तर देता येईल ते पाहतो.

एक बंधू लिहितात की सिंधमध्ये हिंदू आणि शिख जर शांतपणे राहू शकणार नसतील तर पंजाब वा पाकिस्तानच्या इतर भागात परत जाऊन ते कसे राहू शकतील? लक्षात येईल असे काही हृदयपरिवर्तन तिथे झाले आहे काय? मुसलमान मित्रांशी चर्चा झाल्यानंतर मी पंजाबमधील हिंदूंना काय म्हणालो (पाहा प्रार्थना प्रवचन डिसेंबर ११, १९४७) हे जर पत्रलेखकाला पूर्णपणे माहीत असते तर त्यांने हा प्रश्न मला विचारला नसता असे मला वाटते. पंजाबी निर्वासितांना अजूनही मी परत जाण्याचा सल्ला निश्चितच देऊ शकत नाही. जोपर्यंत सिंधमध्ये हिंदू आणि शीख सुखासमाधानात राहू शकत नाहीत तोपर्यंत मला पंजाबबद्दलही आशा करता येत नाही. आता तर सिंधमध्येसुद्धा हिंदू राहू शकत नाहीत असे मी ऐकतो आहे. सिंधमध्ये किती तरी हिंदू आणि शीख अडकलेले आहेत. कदाचित हजारो असतील ज्यांना निघून यायचे आहे.

चित्रळहून एक बंधू माझ्याकडे आले होते. त्यांनी सांगितले की तिथे अजूनही २५१ हिंदू अडकलेले आहेत. मी म्हणालो की ही काही फार मोठी संख्या नाही. सिंधमध्ये तर यापेक्षाही कितीतरी जास्त लोक अडकलेले आहेत आणि त्यांना जर येण्याची परवानगी नाही तर चित्रळ आणि स्वातमधील थोड्याशा लोकांना तशी परवानगी मिळेल अशी अपेक्षा तुम्ही कसे काय करू शकता? जोपर्यंत ते सर्व परतणार नाहीत तोपर्यंत भारत सरकार गप्प बसणार नाही. त्यांचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे निर्वासितांनी पाकिस्तानमध्ये परतावे असे मी तोपर्यंत सांगणार नाही जोपर्यंत त्यांचे (पाकिस्तान सरकारचे आणि जनतेचे) हृदयपरिवर्तन झाल्याचे मला आढळत नाही. मला माहीत आहे की एका ठिकाणी जर हृदयपरिवर्तन झाले तर ते दुसऱ्या ठिकाणीही झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्याकडे जर हृदयपरिवर्तन झाले तर पाकिस्तानचेही हृदयपरिवर्तन होईल. याकरिता काही प्रयत्न करावे लागतील यात काही संशय नाही, परंतु तसे घडल्याशिवाय राहणार नाही. अखेरीस या वेडाने आपल्याला तेव्हा झपाटले जेव्हा त्याने पाकिस्तानमधील लोकांना झपाटले होते. आपल्यात जर सुज्ञपणा येणार नसेल तर आपण भारत आणि पाकिस्तान दोन्हीही गमावू.. युद्ध होईल. सध्याची परिस्थिती कायम राहू शकत नाही. काही लोक म्हणतात की परिस्थितीत जो बदल आवश्यक होता तो आधीच झालेला आहे. हिंदू आणि शीख भारतात आलेले आहेत आणि भारतातून मुसलमान पाकिस्तानमध्ये गेलेले आहेत. इतक्या

मोठ्या प्रमाणात लोकसंख्येची जी अदलाबदल झालेली आहे ती बदलता येऊ शकत नाही. माझा असा दृष्टिकोन नाही. असे सांगणारा मी जरी एकटा असलो तरी मी सांगत राहीन की जोपर्यंत लोक आपापल्या घरी परत जात नाहीत तोपर्यंत या दोन देशांत शांतता निर्माण होणार नाही. पाकिस्तानमधून आलेल्या हिंदूंना तुम्ही कितीही सोयीसवलती पुरवल्या तरी त्यांना झालेल्या जखमा दुरुस्त होणार नाहीत. आपली घरेदारे गमावल्याची गोष्ट त्यांना सतत खुपत राहील आणि ५० वा १०० वर्षांनंतरही युद्ध झाले तरी त्यांना ही गोष्ट आठवत राहील. अशा गोष्टी विसरल्या जात नसतात.

निर्वासित शिबिरांना हस्तोद्योगाच्या प्रशिक्षणाचे केंद्र बनवता येणार नाही काय असे एक मित्र विचारतो. एका जरी निर्वासिताची अशी इच्छा असेल तरी असे करता येईल. हे करण्याकरिता सरकारवर दडपण आणण्याची माझी इच्छा नाही. या छावण्या सुरू ठेवण्याकरिता सध्या जो प्रचंड खर्च येत आहे तो कमी करण्याला ते आनंदाने संमती देतील. यामुळे स्वाभिमान न गमावता निर्वासितांना आपली आजिविकाही मिळवता येईल. माझी सूचना आहे की या मित्राने प्रचार मोहीम उघडून याकरिता असे वातावरण निर्माण करावे की. स्वतः शरणार्थ्यांनी हस्तोद्योगाच्या प्रशिक्षणाची मागणी केली पाहिजे. यामुळे त्यांचा मानसन्मानही वाढेल आणि भारतही वर जाईल व आज जी भारताची अधोगती होत आहे तीही थांबेल.

आता एक भगिनी माझ्याकडे येऊन सांगत होती की मी घराला कुलुप लावून थोड्या वेळाकरिता बाहेर गेले तर माघारी चारपाच शीख आले आणि कुलूप तोडून घरात राहू लागले. त्या भगिनीने पाहिले तर पोलिसांमध्ये तक्रार नोंदवली. असे ऐकतो की काही शीख पकडले गेले आणि एक पळून गेला. हिंदूंनी आणि इतरांनीही अशा घाणेरड्या गोष्टी केल्या आहेत. यामुळे आपल्या धर्माला कलंक लागतो. अशा गोष्टी बंद झाल्या पाहिजे. मी घर सोडून देऊ काय असे त्या बहिणीने मला विचारले. मी म्हणालो नाही, कदापीही नाही. तुम्ही तुमचे घर सोडू नका असे पाकिस्तानमधून येणारांनासुद्धा मी सांगत असतो. परंतु माझ्या सल्ल्याला काय किंमत आहे? मी म्हणेन म्हणून काही लोक जीव द्यायला तयार होणार नाहीत. शीख मित्र बळजबरीने घरात का घुसले? आम्ही स्वतःला कोणावरही लादणार नाही, कोणाच्या घरात परवानगीशिवाय घुसणार नाही असे निर्वासितांनी घोषित केले पाहिजे. जो काही पैसा त्यांच्याजवळ असेल त्यात त्यांनी भागवले पाहिजे. शीख बांधवांनी मर्यादेत राहिले पाहिजे. आपण सर्व आपल्या मर्यादेत राहिलो पाहिजे. असे झाले तरच सर्व भाडणे मिटतील.

एका भगिनीने मला सुंदर पत्र लिहिले आहे. तिने मला आपले नाव व पत्ता दिलेला नाही. ती म्हणते की मी रेडिओवर दररोज तुमची भाषणे ऐकते. परंतु प्रार्थनेत जे भजन आणि स्तोत्र म्हणण्यात येतात त्यांचे प्रसारण होत नाही. तिचे म्हणणे आहे की दररोज जरी नाही तरी दर तिसऱ्या वा चौथ्या दिवशी संपूर्ण प्रर्थना प्रसारित करण्यात यावी. त्या भगिनीचे म्हणणे आहे की माझी भाषणे भौतिक

विषयावर असतात तर प्रार्थना आध्यात्मिक विषयावर असते. माझ्या भाषणांची रेकॉर्ड आकाशवाणीचे लोक करतात व नंतर तिचे प्रसारण होते. यात माझा काहीही हात नसतो. मी जे काही म्हणतो त्यामुळे जनतेचा लाभ होईल असे कदाचित त्यांना वाटत असेल. रेडिओच्या लोकांना काय करणे शक्य आहे हे मला माहीत नाही. परंतु मला वाटते की इथे म्हणण्यात येणारे भजन कितीही वाईट पद्धतीने म्हणण्यात येत असतील तरी त्यांचे प्रसारण झाले पाहिजे. या भगिनीने जे काही लिहिले त्याचा मी आदर करतो. परंतु ती जेव्हा प्रार्थना आणि प्रार्थना प्रवचन यांना वेगळे करते तेव्हा मी तिच्याशी सहमत होऊ शकत नाही. मी तुम्हाला सांगितलेच आहे की मी जे प्रार्थनेत सांगतो त्याचाच भाग प्रार्थनोत्तर प्रवचनात असतो. मी ते भजन म्हणू शकत नाही आणि माझ्या आवाजात तितकासा गोडवाही नाही. याशिवाय मी आता इतका म्हातारा झालो आहे की माझी इच्छा असली तरी मी गाऊ शकणार नाही. यामुळे मुली गातात आणि त्या चांगल्या गातात. जे काही म्हटले जाते वा गायीले जाते ते सर्व ईश्वरालाच उद्देशून असते. लोकांनी ही गोष्ट समजून घ्यावी असा माझा सल्ला आहे.

आता जुनागढ आणि अजमेरसंबंधी. मी तुमच्याशी जुनागढसंबंधीच्या तारांविषयी बोललो होतो. आता मला अजमेरहून तार आली आहे. अजमेरसंबंधीची गोष्ट मला माहीत आहे. तिथे जे काही घडले ते बरेच गंभीर होते. परंतु तारेत अतिशयोक्ती करण्यात आली आहे. अशा अतिशयोक्तीमुळे लोक संतापतात आणि उद्दिपित होतात. दिल्लीत आधीच भरपूर विष भरलेले आहे. परंतु मुसलमानांच्या संपत्तीची लूट करण्यात आली आहे, त्यांच्या घरांची जाळपोळ करण्यात आली आहे व तेथील दर्गा धोक्यात आहे असे म्हणणे बरोबर नाही. सत्य हे आहे की दर्ग्याला कोणीही स्पर्श केलेला नाही. मग ते मला अशा तारा का पाठवतात? तिथे लूटमारीच्या घटना निश्चितच झाल्या आहेत. तिथे जाळपोळ आणि खूनही झाले आहेत. या गोष्टी नाकारता येत नाहीत. परंतु त्यात अतिशयोक्ती केल्यामुळे या घटना लहान वाटू लागतात. अजमेरचा दर्गा शरीफ सुरक्षित आहे. जितके आहे तितके सांगा. घटना आणि प्रत्यक्ष बातमीची तुलना करा अशी माझी प्रत्येकाला विनंती आहे. असे केले तरच आपल्याला न्याय मिळू शकेल. आपण तथ्याला धरून राहिलो नाही तर आपला सर्वनाश होईल. सरकार शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. आम्ही शासनावर विश्वास ठेवला पाहिजे, ईश्वरावर विश्वास ठेवावा. आपण सर्व आपापल्या चुका दुरुस्त करणार नसू तर भारत आणि पाकिस्तान दोघांचाही अंत होईल.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २५५-८

६६. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी १, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

इंग्रजी पंचांगाप्रमाणे आज नववर्षदिवस आहे. आज इथे इतक्या मोठ्या संख्येत लोक जमलेले पाहून मला आनंद होतो. स्त्रियांना बसण्याकरिता जागा करून देण्याकरिता सात मिनिटे लागली याचा मला खेद होतो. अशा सभेत एका मिनिटाचे जरी नुकसान झाले तरी इतक्या सगळ्या लोकांचे मिळून शेकडो हजारो मिनिटांचे नुकसान होते. आपल्या बहिणींना आधी जागा करून दिली पाहिजे ही गोष्ट आपल्या बांधवांनी शिकायला पाहिजे. ज्या देशात स्त्रियाचा आदर केला जात नाही तो देश खऱ्या अर्थाने सुसंस्कृत नसतो. मनूच्या (मनुस्मृतीचा लेखक) सांगण्याप्रमाणे स्त्री-पुरुष या दोघांनाही आपल्या मर्यादा कळल्या पाहिजे. आता आपण स्वतंत्र असल्यामुळे आपण अधिकच जबाबदारीने वागलो पाहिजे. यापुढे प्रार्थना प्रवचनाला येणाऱ्या लोकांची गर्दी अजूनच वाढेल अशी मला आशा वाटते. परंतु जे येतात त्यांनी प्रार्थनापूर्ण अंतःकरणाने यायला पाहिजे कारण प्रार्थना हे हृदयाचे अन्न आहे. ईश्वरापासून मिळणारे अन्न मिळाले नाही तर आपण कुठेही जाऊ शकणार नाही. मी अशीही आशा करतो की इथे येणारे श्रोते शांतता पाळतील आणि घरी शांतपणे परततील.

नुकताच संयुक्त प्रांतात हरिजनपरिषद झाली होती. हरिजनांनी आपल्या घाणेरड्या सवयी सोडाव्या, घाणेरडे राहू नये आणि मळके व फाटके कपडे घालू नये व मद्यपान करू नये असा उपदेश तिथे गेलेल्या मंत्र्याने केला होता. एका हरिजनाने प्रतिवाद करत सांगितले की सरकार सर्व मळके व फाटके कपडे जाळून टाकू शकते, तसेच ते पामची सर्व झाडे कापून टाकू शकते व दारूची सर्व दुकाने बंद करून टाकू शकते. या हरिजनबंधूच्या धाडसाचे मला कौतुक वाटते. मी स्वतः पामपासून गुळ तयार करतो. हरिजन बंधूंना माझा सल्ला आहे की याचा उपाय तुमच्याच हातात आहे. दुकानांमधून जरी दारू विकण्यात येत असेल तरी तुम्ही दारूपासून दूर राहायला पाहिजे. खरे म्हणजे दारू विषापेक्षाही वाईट आहे. कौटुंबिक काळज्यांचा विसर पडावा म्हणून मजूर दारू पितात. विषाने केवळ शरीर मरते. दारू तर आत्म्यालाच मारून टाकू शकते. माणसाचे आपल्या वर्तनावर नियंत्रण राहत नाही. सरकारला मी सुचवीन की त्याने दारूची दुकाने बंद करावी आणि जिथे शुद्ध आणि हलके अन्न मिळेल अशी खाद्यपदार्थांची दुकाने तिथे सुरू करावी. तिथे त्यांनी अशी पुस्तके वाटावी की ज्यातून ते काही शिकू शकतील. तसेच हानिकारक नसलेली करमणुकीची साधनेही त्यांनी पुरवावी. परंतु तिथे सिनेमा नसावा. असे केल्याने लोकांना दारू सोडायला मदत होईल. अनेक देशातील माझ्या अनुभवावरून मी हे

सांगतो. मी हे भारतात पाहिले आहे आणि दक्षिण आफ्रिकेतही पाहिले आहे. दारू सोडल्यामुळे माणसाचा शारीरिक जोमही वाढतो आणि त्याची अर्थार्जन करण्याची शक्तीही वाढते. यामुळे १९२० पासून काँग्रेसच्या कार्यक्रमात दारुबंदीचा समावेश होता. आता आपण स्वतंत्र झालेलो असल्यामुळे सरकारने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली पाहिजे व अपवित्र अबकारी कराचा त्याग केला पाहिजे. तो खरा घाटाच नाही कारण असे केल्याने जनतेचे प्रचंड कल्याण होईल. आपल्या समृद्धीचा हा मार्ग आहे. आपल्या प्रयत्नांनी आपण आपली प्रगती साध्य केली पाहिजे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २५८-९

६७. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २, १९४७

नवी दिल्ली

जानेवारी २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

उद्या आपली सभा बहुधा वेव्हेल कॅन्टीनमध्ये होईल. तिथे अनेक निर्वासित राहतात. एकदा मी तिथे गेलो होतो आणि त्या वेळी मला तिथे प्रार्थना सभा घेण्याकरिता विनंती करण्यात आली होती, परंतु मी थांबू शकलो नव्हतो. आज तेथील शिबिरातून कोणी तरी आले आणि मला विनंती केली व मी त्याकरिता कबूल झालो. तर उद्या जर पाऊस आला नाही तर मी तिथे प्रार्थना करीन. परंतु पाऊस आला तर तिथे प्रार्थना होऊ शकणार नाही. तशा परिस्थितीत प्रार्थना इथे होईल. यामुळे उद्याबद्दल थोडेसे अनिश्चित आहे. अर्थात तुमची इच्छा असेल तर तुम्ही इथे येऊ शकता आणि प्रार्थना नसेल तर परत जाऊ शकता.

माझ्या लहानशा छत्रीला तुम्ही हसत होता हे मी पाहिले. (गवताचा रूंद टोप. गांधीजी तो छत्री म्हणून वापरायचे.) तो सुंदर आहे. त्याच्याकरिता काहीही पैसे द्यावे लागत नाहीत. मी महात्मा आहे म्हणून तो फुकट देण्यात आला नव्हता. खरी गोष्ट अशी आहे की मी जेव्हा नोआखालीत होतो (नोव्हेंबर ६, १९४६ ते मार्च १९४७) तेव्हा तिथे खूप उकाडा होता. तेव्हा काही लोकांना माझी दया आली व त्यांनी मला हा टोप दिला. पाऊस येतो तेव्हाही ते हा टोप डोक्यावर ठेवतात. बहुधा लोकांना शेतात काम करावे लागते. हा टोप घातल्याशिवाय तेथील कडक उन्हात ते काम करू शकत नाहीत. तिथे मुसलमान मोठ्या संख्येत राहतात. तिथे हिंदूही आहेत, परंतु त्यांच्यापैकी बहुतेक व्यापार करतात. प्रत्येकाजवळ अशी छत्री असते. तिथे एक मुसलमान मित्र होता. सर्वच मुसलमान काही मला शत्रू समजत नसतात. आणि नतर त्यांच्या लक्षात आले होते की मी त्यांना लुबाडण्याकरिता वा त्यांच्याविरुद्ध आरोपपत्राची तयारी करण्याकरिता तिथे गेलो नव्हतो. त्यांच्या हेही लक्षात आले होते की हिंदूंप्रमाणेच त्यांचेही सांत्वन करण्याकरिता मी तिथे गेलो होतो. यामुळे त्यांनी मला ही छत्री दिली. मला हीची फारशी गरज नसते कारण मी दररोज एक तासापेक्षा जास्त चालत नसतो. त्यांनी असा एक टोप निर्मल बाबूंनाही (निर्मल कुमार बोस, कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक. गांधीजीच्या नोआखालीतील पदयात्रेत ते गांधींचे दुभाष्या म्हणून गेले होते. माय डेज विथ गांधीचे लेखक.) दिला होता. मी जेव्हा नोआखाली सोडली तेव्हा मनूने हा टोप बरोबर घेण्याकरिता सांगितले. तिचे म्हणणे होते की मला उन्हात बरेच चालावे लागते व या टोपामुळे डोके चांगल्या प्रकारे झाकले जाते. हा टोप कुठेही तयार करता येतो. तो इथेसुद्धा तयार करता येतो. इतर प्रकारच्या छत्र्यांना हातात धरण्याकरिता

दांडा लागत असतो तो या टोपाकरिता लागत नाही. जेव्हा वारा असतो तेव्हा त्याला असलेल्या दोरीने तो चेहऱ्याला बांधता येतो.

आज इथे जे भजन म्हणण्यात आले होते ते चांगल्या पद्धतीने म्हणण्यात आले होते परंतु ते सकाळी म्हणायचे भजन होते. या भजनात आपण ईश्वराला जागे होण्याकरिता विनंती करतो. परंतु ईश्वर तर अष्टौप्रहर जागा असतो. तो कधीही झोपत नाही. परंतु जेव्हा सकाळ होते तेव्हा प्रत्येकाने जागे व्हायला पाहिजे अशी हिंदू धर्मात प्रथा आहे. आपल्याकडे सकाळकरिता भजन आहेत, दुपारकरिता भजन आहेत, सायंकाळकरिता भजन आहेत आणि रात्रीकरिताही भजन आहेत. केवळ संगीतकारांनाच या सर्व गोष्टींमधील फरकाची चांगली माहिती असते. मला याबद्दल फारशी माहिती नाही. परंतु इथे दररोज भजन म्हणतात म्हणून त्याबद्दल थोडीफार कल्पना आहे.

मला अलाहाबादहून एका बंधूंचे एक लांब पत्र आले आहे. ते हिंदूने लिहिल्याचे स्पष्ट दिसते. ते म्हणतात की कोणताही मुसलमान आपला भाऊ असू शकत नाही आणि भारतीय संघराज्याशी तो कधीही एकनिष्ठ असू शकत नाही असे वारंवार सांगूनही मी अजून काहीच शिकलो नाही आणि अजूनही मी मुसलमानांशी मैत्रीभावाने वागतो. जर इथे काही राष्ट्रवादी मुसलमान असतीलच तर त्या राष्ट्रवादी मुसलमानांना इथे ठेवून उरलेल्यांना पाकिस्तानमध्ये पाठवण्यात यावे. मी जर असे केले नाही आणि भारत व पाकिस्तानमध्ये युद्ध झाले, ईश्वर करो आणि तशी वेळ न येवो, तर काय होईल याचा विचार करा. भारतातील करोडो मुसलमान भारताशी प्रामाणिक राहतील व पाकिस्तानच्या विरोधात लढतील असे तुम्हाला वाटते काय? असे प्रश्न विचारणे सोपे असते परंतु त्यांचे उत्तर देणे कठीण. मला इतकेच म्हणायचे आहे की - आपण कुठेही राहायचे ठरवले तरी जोपर्यंत अशा गोष्टींच्या विरोधात पुरावा मिळत नाही तोपर्यंत आपण मुसलमानांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवला पाहिजे. आता मागील आठवड्यात जवळपास एक लाख मुसलमान लखनौत गोळा झाले होते. (भारतीय संघराज्यातील मुसलमानांच्या परिषदेकरिता. ही सभा डिसेंबर २७ आणि २८ला झाली होती. अबुल कलाम आझाद यांनी भारतातील मुस्लिम लीग गुंडाळायची सूचना केली. परिषदेने एकमताने ठराव मंजूर केला की भारतातील मुसलमानांनी सर्व सांप्रदायिक आणि राजकीय संस्था गुंडाळाव्या आणि त्यांनी काँग्रेसमध्ये सामील व्हावे.) त्यांनी स्पष्ट शब्दांत आपल्या राष्ट्रभक्तीचा घोषणा केली होती. त्यांच्यात एकही मुस्लिम लीगवाला नसेल यावर विश्वास ठेवता येत नाही. त्यांच्यात लीगचा पुढारी जरी कोणी नसेल तरी काही लोक तसे नक्कीच असतील. नंतर जर त्यांनी विश्वासघात केला तर तुम्ही त्याला गोळी घालू शकता. तुम्ही दोनचार लोकांना वा काही लोकांना गोळी घालू शकता. माझी जरी ही पद्धत नसली तरी तुम्ही त्यांना गोळी घालू शकता. पण प्रत्येकजण विश्वासघातकी नसतो. व्यर्थ अविश्वास हे भ्याडपणाचे

चिन्ह आहे. यामुळेच सांप्रदायिक घृणा वाढली आहे आणि रक्ताचे पाट वाहिले आहेत. पत्र लिहाणाऱ्या बंधूंनी अज्ञानामुळे तसे लिहिले आहे. आज ते संतापलेले आहेत. मुसलमानांनी केलेला रानटीपणा त्यांच्या मनाला सलतो आहे. त्यांना सर्व मुसलमानांना हाकलून लावायचे आहे. याचप्रमाणे भारतातील हिंदूंनी पाशवी वर्तन केलेले असल्यामुळे पाकिस्तानमधून सर्व हिंदूंना हाकलून लावले पाहिजे असे जर पाकिस्तानमधील लोक म्हणतील तर मी म्हणेन की असे म्हणणे मूर्खपणा आहे. ही घोडचूक होईल. हीच वृत्ती देशाच्या फाळणीकरिता जबाबदार होती. तुम्हाला जर हे दोन देश एकत्र आणायचे असतील तर तसे तुम्ही चांगले होऊनच करू शकता. उमदे लोकच शूर असू शकतात. मूर्ख लोक कधीही शूर नसतात. आज आपल्या आजूबाजूला पसरलेले विष वाढतच आहे. काश्मीरने या विषयात अजूनच भर घातली आहे. युद्ध झाले तर दोन्ही देशांचे रक्त वाहणार आहे. हे सर्व पाहायला जिवंत राहण्याची माझी इच्छा नाही. मला या रक्तपाताचा साक्षीदार होण्याची इच्छा नाही. मला घेऊन जा केवळ अशी प्रार्थनाच मी ईश्वराला करू शकतो व तुम्हा सर्वांना तिच्यात सहभागी होण्याकरिता विनंती करू शकतो. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये संघर्ष अशक्यप्राय व्हावा अशा प्रकारे आपण का वागू नये? आपण शुराप्रमाणे मुसलमानांवर विश्वास ठेवला पाहिजे. नंतर त्यांनी विश्वासघात केला तर तुम्ही त्यांचे डोके छाटू शकता. परंतु तुम्ही म्हणाल की जे कोणी मुसलमान पाकिस्तानमध्ये जायला तयार नाहीत त्यांचे डोके छाटा तर तसे होऊ शकत नाही. याचा अर्थ दोन्ही बाजूच्या करोडो लोकांचे डोके छाटा असा होईल. ही मूर्खपणाची परिसीमा होईल. सध्या भारतात बहुधा तीन वा साडेतीन कोटी मुसलमान आहेत. आपण जर त्यांचा छळ केला तर एक राष्ट्र म्हणून आपण अस्तित्वात राहू शकणार नाही आणि हिंदू धर्मही अस्तित्वात राहू शकणार नाही. आपल्या देशाची जी प्रगती होत आहे आहे ती तशीच होत राहावी म्हणून ईश्वराने आपल्या हातून ही चूक होऊ देऊ नये अशी माझी त्याला प्रार्थना आहे. आज आपण अधःपाताकडे जात आहो आणि पत्रलेखकाने आज जे पत्र लिहिले आहे त्यामुळे तर या अधःपाताला अजूनच गती येईल. त्यांनी आपले पत्र इंग्रजीत लिहिले आहे. ते इंग्रजी फार चांगले लिहितात परंतु त्याकरिता मी त्यांची स्तुती करू शकत नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २६०-६१

६८. प्रार्थना प्रवचन, जानेवारी, ३, १९४८

(ही सभा वेव्हेल कॅन्टीन कॅम्पमध्ये झाली होती.)

नवी दिल्ली,
जानेवारी, ३, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला आनंद होतो की अनेक दिवसांपूर्वी मी तुम्हाला दिलेले वचन पूर्ण करू शकलो आणि या शिबिरात राहणाऱ्या निर्वासितांशी दोन शब्द बोलू शकतो आहे. या शिबिरात जितक्या स्त्रिया आहेत तितकेच पुरुष आहेत हे पाहूनही मला आनंद होतो. भारतात आणि जगात परत शांतता आणि प्रेम प्रस्थापित व्हावे आणि सर्व माणसांनी भाऊभाऊ म्हणून राहावे या माझ्या प्रार्थनेत तुम्ही सर्वांनीही सामील व्हावे अशी माझी इच्छा आहे. शांतता कोणत्याही बाह्य गोष्टींनी म्हणजे पैशाने वा महालांनी मिळत नाही. शांतता ही आतील गोष्ट आहे. माणसाला जेव्हा अशा प्रकारची शांतता मिळते तेव्हा त्याच्या डोळ्यांतून, शब्दांतून आणि कामांतून शांतता टपकत असते हे सर्व धर्मांनी कबूल केले आहे. अशा प्रकारचा माणूस झोपडीत राहूनही सुखी असतो आणि तो उद्याची काळजी करत नाही. उद्या काय होईल हे तर एका ईश्वरालाच माहीत असते. श्री रामचंद्रांना, जे आपल्यासारखेच माणूस होते, माहीत नव्हते की ऐन गादीवर बसण्याच्या वेळी आपल्याला वनवासात जावे लागेल. परंतु त्यांना माहीत होते की खरी शांतता बाहेरच्या गोष्टींवर अवलंबून नाही. यामुळे वनवासात जाण्याच्या कल्पनेचा त्यांच्यावर काहीही परिणाम झाला नाही. हिंदू आणि शिखांना जर हे सत्य माहीत असते तर ही वेडाची लहर त्यांच्या डोक्यावरून निघून गेली असती आणि मुसलमानांनी काहीही केले असते तरी ते शांत राहिले असते. हिंदू आणि शिखांच्या अंतःकरणात या शब्दांनी जर घर केले तर मुसलमानांवरसुद्धा त्याचा वांछनीय परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

मी असे ऐकले आहे की हे शिबीर चांगल्या प्रकारे सुरू आहे. जोपर्यंत सर्व निर्वासित आपले शिबीर स्वच्छ ठेवण्याकरिता स्वतः प्रयत्न करत असल्याचे दिसत नाही आणि इतर शिबिरांपेक्षा आपले शिबीर अधिक स्वच्छ ठेवत नाहीत तसेच ते अधिकाऱ्यांशी सर्व प्रकारे सहकार्य करत असल्याचे मला कळत नाही तोपर्यंत ही गोष्ट मी पूर्णपणे मान्य करू शकत नाही. दिल्लीच्या सडका किती घाणेरड्या आहेत ते मला माहीत आहे. दिल्लीतील सडकांपेक्षाही शिबीर जेव्हा चांगले दिसेल तेव्हाच शिबिराचे संचालन चांगले आहे असे म्हणता येईल. तुम्हाला जो त्रास भोगावा लागला आहे त्याची मला कल्पना आहे. तुमच्यापैकी काही चांगल्या सुखवस्तू घरातून आले आहेत. तुम्हाला मागे ज्या सुखसोयी मिळत

होत्या त्याची अपेक्षा आता तुम्ही करू शकत नाही. नवीन परिस्थितीशी जुळवून घ्यायला तुम्ही शिकायला पाहिजे आणि शांतपणे मेहनत करून परिस्थितीवर मात करायला पाहिजे.

मला आठवते की १८९९ मध्ये बोअर युद्धाच्या अगदी आधी ट्रान्सवाल सोडून इंग्रज नाताळमध्ये निघून गेले होते. अडचणींना कसे तोंड द्यावे हे त्यांना माहीत होते. ते सर्व बरोबरीच्या नात्याने राहत होते. त्यातील एक इंजिनिअर होता आणि माझ्याबरोबर तो सुताराचे कम करत होता. आपण शेकडो वर्षांपासून गुलाम राहिलो असल्यामुळे आपण ही गोष्ट शिकलो नाही. आता आपण स्वतंत्र झालो आहो - आणि स्वातंत्र्य किती मूल्यवान गोष्ट आहे - आणि मी आशा करतो की निर्वासित बंधुभगिनीसुद्धा या संकटापासून काही तरी शिकतील व शिबिराला असे आदर्श शिबीर बनवतील की सर्व जगातील जरी नाही तरी संपूर्ण भारतातील लोक या शिबिराला भेट देतील व त्याबद्दल अभिमान बाळगतील. आताच प्रार्थनेत जे भजन म्हणण्यात आले त्यात आपण ईश्वराला शरण गेलो पाहिजे व त्याच्याकडून आपल्या गरजेकरिता किमान घेतले पाहिजे असे म्हटलेले आहे. आपण जर या भजनानुसार वागलो तर केवळ हे शिबीर नाही तर संपूर्ण दिल्ली नवजीवनाने भरून जाईल, आपणा सर्वांची अंतःकरणे अंतरीच्या आनंदाने भरून जातील.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी, शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २६१-२

६९. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ४, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी ४, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मला थोडासा उशीर झाला कारण पाऊस पडत होता आणि मला सांगण्यात आले होते की आज फारेसे लोक आलेले नसतील आणि त्यामुळे मला घाई करण्याची गरज नाही. परंतु कितीही कमी श्रोते असले तरी हजर राहणे माझे कर्तव्य आहे असे मी म्हणालो. याशिवाय मला दुसरे कामही होते व तेही मला करणे जरुरीचे होते. त्यालाही काही मिनिट लागले. पाऊस असूनही तुम्ही आला याबद्दल मी आभारी आहे आणि तुम्ही इतके सगळे लोक आला याचा मला आनंद होतो. यावरून तुम्ही प्रार्थना ऐकण्याकरिता उत्सुक आहा असे दिसते. काय होते हे केवळ पाहावे या कुतुहलाने तुम्ही आला असता तर त्याला काही किंमत राहिली नसती.

आज चोहोकडे युद्धाची चर्चा सुरू आहे. या दोन देशांमध्ये युद्ध सुरू होण्याची प्रत्येकाला भीती वाटते. असे झाले तर भारत आणि पाकिस्तान या दोघांकरिताही वाईट दिवस आले असे मला वाटते. आपण आपसात तडजोड करण्याकरिता बसू शकत नाही काय? भारताने संयुक्त राष्ट्रसंघाला लिहिले आहे कारण जेव्हा केव्हा संघर्ष पेटण्याची भीती असते तेव्हा तडजोड घडवून आणण्याकरिता, संघर्ष थांबवण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघ प्रयत्न करत असतो. यामुळे भारताने संयुक्त राष्ट्रसंघाला लिहिले आहे. हा विषय कितीही लहान वाटत असला तरी यामुळे या दोन देशांत युद्ध भडकू शकते. आपले म्हणणे मांडता येईल इतकी लांबलचक तार पाठवली जाऊ शकत असल्यामुळे भारताने त्या आशयाची तार पाठवली आहे. जानेवारी १, १९४८ला भारत सरकारने सुरक्षा समितीकडे रीतसर तक्रार दाखल केली (पाहा परिशिष्ट "भारतीय प्रतिनिधीद्वारा सुरक्षा समितीला पत्र", जानेवारी १, १९४८). पाकिस्तानचे झफरुल्ला खान (पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री महम्मद झफरुल्ला खान. यांनी जानेवारी १, १९४८ला कराचीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत काश्मीरवर झालेल्या हल्ल्यात पाकिस्तानचा हात असण्याला नकार दिला. ते म्हणाले - काश्मीरच्या चोहोबाजूला मुसलमान राहत असलेला भाग आहे. आणि काशमीरच्या मुसलमानांच्या संकटकाळात काही मदत करण्याकरिता काही तरी केले पाहिजे ही जाणीव झाल्यामुळे जी काही मदत करता येणे शक्य असेल ती त्यांनी केली.) आणि लियाकत अली खान (आक्रमणाचा आरोप फेटाळून लावत पाकिस्तानचे प्रधानमंत्र्यांनी इतर गोष्टींबरोबरच जानेवारी ३ला सांगितले : "काही लोक आझाद काश्मीर सरकारला मदत करत आहेत. सशस्त्र हिंदू, शीख आणि महाराजांचे सैन्य मुसलमानांची सरसहा कत्तल करत असल्याची माहिती मिळाल्यामुळे ते

टोळीवाल्यांच्या प्रदेशातून काश्मीरमध्ये गेले आहेत." त्यांनी दावा केला की काश्मीरवर ताबा मिळवण्याची योजना आणि कट हा पूर्णपणे पूर्वनियोजित होता आणि काश्मीरवर आक्रमण झाल्यानंतर भारताने काश्मीरला मदत करण्याकरिता आपले सैन्य पाठवले असे म्हणणे ही धोकेवृबाजी आहे. ते पुढे म्हणाले, "आम्ही स्पष्ट केले होते की काश्मीरमधील तदर्थ सरकारचे युद्धरत सैन्य वा टोळीवाले यांच्यावर आमचे कोणतेही नियंत्रण नाही.") यांनी दीर्घ वक्तव्ये जारी केली आहेत. मी इतकेच म्हणेन की त्यांचे युक्तिवाद माझ्या मनाला पटत नाहीत. तुम्ही जर मला विचाराल की भारत सरकारने युनोकडे तक्रार करणे तुम्हाला पटते काय तर मी म्हणेन की मला पटते आणि पटतही नाही. मला हे पटते कारण याशिवाय ते दुसरे काय करू शकत होते? आपण जे काही करतो आहो ते बरोबर आहे याबद्दल त्यांची खात्री पटलेली होती. काश्मीरच्या सा ीमेपलीकडून हल्ले होत असतील तर तसे पाकिस्तानच्या सहकार्याशिवाय होऊ शकत नाही हे स्पष्ट आहे. पाकिस्तान ते नाकारू शकते. काश्मीरचे भारतात सामीलीकरण झालेले आहे. आणि भारताने ते सामीलीकरण काही विशेष अटींवर मान्य केले आहे. पाकिस्तान जर काश्मीरला जेरीस आणत असेल आणि शेख अब्दुल्ला, जे काश्मीरचे पुढारी आहेत, भारतीय संघराज्याची मदत मागत असतील तर भारतीय संघराज्याला मदत पाठवणे क्रमप्राप्त आहे. यामुळे काश्मीरला अशी मदत पाठवण्यात आली. याच वेळी पाकिस्तानला काश्मीरमधून बाहेर पडण्याकरिता सांगण्यात आले व काश्मीरच्या प्रश्नाची द्वीपक्षीय वाटाघाटी करून तडजोड करण्यात यावी असेही सुचवण्यात आले. अशा पद्धतीने कोणतीही तडजोड करणे शक्य नसेल तर युद्ध अपरिहार्य होते. युद्धाची ही शक्यता टाळावी म्हणून भारतीय संघराज्याने हे पाऊल उचलले. त्यांनी उचलेले हे पाऊल बरोबर आहे की चूक हे ना मला माहीत, ना अजून कोणाला माहीत आहे, ते केवळ ईश्वरालाच माहीत असू शकते.

पाकिस्तानची प्रवृत्ती कशीही असली तरी माझे जर चालले असते तर मी पाकिस्तानच्या प्रतिनिधीला भारतात बोलावले असते. ते इथे येऊ शकले असते वा आपण तिथे कोणाला तरी पाठवू शकलो असतो. या संबंधात तडजोड करण्याकरिता एकमेकांची भेट तर घेतली पाहिजे. सर्व जगाला आपण सांगतो की आम्हाला भेटायचे आहे, परंतु भेटण्याची परिस्थिती निर्माण करत नाही असे मला वाटते. यामुळे पाकिस्तानचे जे जबाबदार लोक आहेत त्यांना मी विनंती करीन की हिंदुस्तानचे दोन तुकडे केल्यानंतर यापुढे आपण शांतपणे राहू असा करार तर आपण करायलाच पाहिजे. समजा की भारतात सर्व वाईट लोक राहतात परंतु पाकिस्तानचा जन्म तर नुकताच झाला आहे आणि तोही धर्माच्या नावावर म्हणजे इस्लामच्या नावावर. मग त्याने तर स्वच्छ राहायला पाहिजे होते. परंतु ते तसे नाहीत हे तेही कबूल करतात. पाकिस्तानमध्ये मुसलमानांनी अत्याचार केले नाही असे तेही म्हणत नाहीत. केले आहेत, म्हणूनच मी त्यांना विनंतीपूर्वक सांगतो की शक्य आहे तोपर्यंत भारताबरोबर

राहायला पाहिजे दोघांनी मिळून काम केले पाहिजे. चुका तर झाल्या आहेत आणि त्या दोघांकडून झाल्या आहेत यांत काही शंका नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की आम्ही दोघांनी आपसात भांडून मरावे. त्या चुका यापुढेही करत राहाव्या. असे झाले तर अखेरीस आपण युद्धात स्वतःचा नाश करून घेऊन आणि हा उपखंड तिसऱ्या शक्तीच्या हातात देऊ. याहून जास्त वाईट गोष्ट भारताकरिता वा कोणत्याही भारतीयाकरिता काय होऊ शकते? ही गोष्ट तर माझ्या आकलनशक्तीपलीकडील आहे. यामुळे दोन्ही शक्तींनी ईश्वराला साक्षी ठेवून आपसात भेटायला पाहिजे. अखेरीस युनोत तर हे प्रकरण गेलेलेच आहे. त्यांच्यापासून हे प्रकरण कोण काढून घेऊ शकतो. परंतु एक शक्ती अशी आहे की जी त्यांच्याकडूनही हे प्रकरण काढून घेऊ शकते. भारत आणि पाकिस्तानमधील मोठेमोठे लोक एकत्र झाले तर युनोतील मोठेमोठे लोकही ती गोष्ट मान्य करतील. असे केले तर ते नाराज थोडेच होणार आहेत? अखेरीस त्यांच्या हातात लेखणी आहे. ते म्हणतील की जे काही आमच्यासमोर येईल त्यानुसारच आम्ही निर्णय घेऊ. दोघांनीही एकत्र यावे म्हणून आम्ही सर्व काही प्रयत्न करू. असे झाले तर आम्हाला काहीही करावे लागणार नाही. तेसुद्धा खेळणे नाहीत की कोणतीही गोष्ट त्यांच्याकडून करवून घेतली जाईल. आपसात कोणताही निर्णय होऊ शकत नाही असे वाटल्यामुळे जेव्हा दोघेही असहाय होतात तेव्हा प्रकरण युनोकडे नेण्यात येत असते. ही एक गोष्ट मला तुम्हाला सांगायची होती. यामुळेच दोन्ही सरकारांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे युद्ध करण्यापासून वाचवावे अशी ईश्वराची प्रार्थना आपण करत असतो आणि जी प्रार्थना आपण इथे करतो तीच घरातही केली पाहिजे. मी तर म्हणत असतो की हे देवा एक तर दोघांना आदर आणि प्रेमाने सोबत ठेव आणि मनातून जर त्यांच्यात शत्रुत्वच राहणारच असेल तर मग आम्हाला पोटभर भांडू देणेच योग्य होईल. आम्ही मूर्खसुद्धा असू शकतो परंतु आम्हाला भांडू तर द्या. नंतर कधी ना कधी तर शुद्धीवर येऊच.

आता दिल्लीबद्दलही काही सांगणे योग्य होईल असे मला वाटते. इथे काय झाले याची माहिती मला रात्रीच कळली होती. ब्रिजकिशनजींनी मला सांगितले होते. मीसुद्धा काल तिकडे (वेव्हेल कॅन्टीन निर्वासित छावणी) प्रार्थना करायला गेलो होतो. मी तर सायंप्रार्थनेकरिता निघून आलो होतो परंतु ते छावणी पाहण्याकरिता आणि लोकांशी बोलण्याकरिता थांबले होते. तिथून थोड्याशाच अंतरावर मुसलमानांची काही घरे आहेत. निर्वासित छावणीतील अंदाजे चारपाचशे लोक, त्यांत बहुतेक स्त्रिया आणि मुले होती आणि काही पुरुषही होते, तिथे गेले. त्या सर्वांनी काय केले? कोणाला मारहाण केली नाही असे मी ऐकतो. तिथे मुसलमानांची जी थोडीशी घरे होती त्यातील काही रिकामी होती. परंतु जी घरे रिकामी असतील त्यातच जाऊन बसायचे असे थोडेच आहे. आणि त्यांनी तर लोक राहत असलेल्या घरांचाही ताबा घेण्याचा प्रयत्न केला. पोलीस तिथे हाताशीच होते. ऐकताच ते तिथे गेले. साडेसात वाजता सुरू झालेल्या या प्रकरणावर वृत्तपत्रांनी दिलेल्या माहितीप्रमाणे अखेर पोलिसांनी ९

वाजता नियंत्रण मिळवले, परंतु माझ्या माहितीप्रमाणे ११ वाजता. आणि जे एक नवीन शस्त्र काढण्यात आले आहे, अश्रुधूर, त्याचाही प्रयोग करण्यात आला. त्यामुळे लोक मरत नाहीत पण त्यांना फार त्रास होतो. नंतर ते लोक तिथून गेले परंतु मी ऐकतो की आजही तिथे काही सुरू होते.

मी तर म्हणेन की आमच्याकरिता ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. इतक्या सगळ्या हालअपेष्टांनंतरही आपण संयमाने वागलो पाहिजे इतकेही हे निर्वासित शिकले नाहीत? लोकांच्या घरांत घुसून ती ताब्यात घेणे हे मुळीच योग्य नाही. त्यांच्याकरिता निवाऱ्याचा वा इतर गोष्टींचा शोध घेणे हे सरकारचे काम आहे. आज आपले स्वतःचे सरकार आहे. परंतु आपण आपल्या सरकारच्याच आज्ञांचे पालन करणार नाही, पोलीसांच्या आज्ञांचे पालन करणार नाही आणि लोकांच्या घरात बळजबरीने घुसून ती ताब्यात घेऊ तर सरकार फार दिवस टिकणार नाही. आणि ही गोष्ट भारताच्या राजधानीत दिल्लीत व्हावी, जिथे किती तरी देशांचे राजदूत राहतात, ही तर अजूनच लाजिरवाणी गोष्ट आहे. इथे लोक हव्या त्या घराचा ताबा घेऊ शकतात हे दृश्य आपल्याला त्यांना दाखवायचे आहे काय? आणि हे सर्व करण्याकरिता स्त्रियांचा आणि लहान मुलांचा ढालीसारखा उपयोग करण्यात आला ही तर अजूनच खेदाची गोष्ट आहे. हे अमानवी वर्तन आहे. हिंदूंनी आपल्या सैन्यावर हल्ला करू नये म्हणून मुसलमान सत्ताधारी ज्याप्रमाणे आपल्या सैन्यासमोर गायीचे कळप ठेवत असत त्याप्रमाणेच हे झाले. हे असंस्कृतपणाचे पाशवी वर्तन आहे. लाठीमार करणाऱ्या पोलिसांच्या हल्ल्यापासून बचाव करण्याकरिता स्त्रियांना आणि मुलांना ठेवणे हे तर अजूनच रानटीपणाचे आहे. हा स्त्रीत्वाचा दुरुपयोग आहे. मी सर्व निर्वासितांना नम्रपणे विनंती करतो की त्यांनी स्त्रिया आणि मुलांचा अशा प्रकारे उपयोग करू नये. त्यांनी शांतपणे बसावे. जर ते तसे करणार नाही तर भारत पाकिस्तानच्या युद्धाची गोष्ट तर सोडाच, आपणच आपसात भांडून मरून जाऊ. आपण दिल्ली गमावू आणि जगाकरिता हास्याचा विषय होऊ. आपल्याला जर भारत स्वतंत्र देश राहावा असे वाटत असेल तर सध्या ज्या गोष्टी घडत आहेत त्या थांबल्या पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय - प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २६३-७

७०. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ५, १९४८

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे भाषण वाचून दाखवण्यात आले)

नवी दिल्ली,
जानेवारी ५, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला अनेक पत्रे आणि तारा येत आहेत आणि त्यांत बहुतेक गोष्टींवरील नियंत्रण काढल्याबद्दल लोक माझे अभिनंदन करत आहेत आणि ज्या गोष्टींवरील नियंत्रण अजून कायम आहे तेही उठवण्यात आले पाहिजे अशी मागणी करत आहेत. एका यशस्वी व्यापारी बंधूंने मला इंग्रजीत लिहिलेले पत्र खाली देत आहे -

तुम्ही सांगितले त्याप्रमाणे मी पांढरी साखर, गुळ, पिवळी साखर आणि इतर वस्तूंचे नियंत्रण असताना आणि नियंत्रण उठवण्यात आल्यानंतरचे भाव देत आहे.

	नियंत्रण असताना नोव्हेंबर महिन्यातील भाव	***आजचे भाव***
साखर	***८० ते ८५रुपये मण***	***३७ रु. ८ आणे***
गुळ	***३० - ३२रुपये मण***	***१३ - १५ रुपये मण***
पिवळी साखर	***३७ - ४५ रुपये मण***	***१४ - १८ रुपये मण***
खडीसाखरेचे पुडे	***दीड ते दोन रुपये***	***अकरा आणे***
साखर देशी	***३७ - ४५ रुपये मण***	***१४-१८रुपये मण***

तुमच्या लक्षात येईल की साखरेचे भाव पन्नास टक्क्यांनी पडले आहेत

गहू	***४०-५०रुपये मण***	***१८-२० रुपये मण***
तांदुळ बासमती	***४०-४५ रुपये मण***	***१८-२० रुपये***
मका	***३०-३५ रुपये मण***	***१८-२० रुपये***
चणे	***३८-४० रुपये मण***	***१६-१८रुपये***
मूंग	***३५-३८रुपये मण***	***२३ रुपये***
उडीद	***३४-३७ रुपये मण***	***२३ रुपये***

तूर	३२ रुपये	२२ रुपये
डाळी		
हरभऱ्याची डाळ	३० रुपये मण	२० रुपये
मुंग डाळ	३९ रुपये मण	२६ रुपये
उडीद डाळ	३७ रुपये मण	२६ रुपये
तूर डाळ	३२ रुपये मण	२२ रुपये
तेल		
सरसोचे तेल	७५ रुपये	६५ रुपये

नियंत्रण उठल्यानंतर बाजारात भरपूर लोकरी आणि रेशमी कापड आले आहे आणि त्यांचे भाव ५० टक्क्यांनी उतरले व काही ठिकाणी तर ६६ टक्क्यांनी उतरले आहेत.

सुती कपडे आणि सूत यांच्यावरील नियंत्रणही लवकरच उठेल या आशेने किंमती हळूहळू कमी होत आहेत. यामुळे विविध गिरण्यांमधील स्पर्धा वाढेल व कापड सहजपणे उपलब्ध होऊन त्याचे भाव अजूनच उतरतील व चांगले कापडसुद्धा मिळू लागेल. परंतु रेशमी कापडावरील नियंत्रण उठल्यानंतर ते यशस्वी करण्याकरिता रेशमी कापडाच्या निर्यातीवर कमीतकमी तीन वर्षांकरिता बंदी घातली पाहिजे. शासकीय कार्यालयातील आकडे जादूच्या खेळासारखे असतात. खाद्यान्न आणि कापडावरील नियंत्रणाच्या आड ते आकडे यायला नको.

पेट्रोलवर नियंत्रण तर युद्धामुळे लावण्यात आले होते. आता त्याची आवश्यकता नाही. खरी गोष्ट ही आहे की या नियंत्रणामुळे मालवाहतूक करणाऱ्या कंपन्यांचा काही फायदा होतो आहे आणि यामुळे हे नियंत्रण दूर होऊ नये असा त्यांचा प्रयत्न आहे. करोडो लोकांचा तर पेट्रोलच्या नियंत्रणाशी काहीही संबंध नाही. एका बसचा वा ट्रकचा मालक, ज्याच्याजवळ केवळ एकाच रस्त्यावर वाहन चालवण्याचा अधिकार आहे, महिन्याला १५,००० रपये कमावतो. परंतु अशा प्रकारे निर्बंध नसते तर एका वाहनधारकाला महिन्याचे ३०० रुपयांपेक्षा जास्त फायदा झाला नसता. एका लॉरीच्या पेट्रोलचा परवाना आज महिन्याला १०,००० रुपयांपर्यंत विकला जाऊ शकतो. जर हे नियंत्रण काढून टाकण्यात आले

तर देशासमोरील खाद्य पदार्थ, घरे, वगैरेसारख्या अनेक समस्या आपोआपच सुटतील. स्वतंत्र भारताला नियंत्रणांचा काहीही उपयोग नाही.

हे आकडे पाहिले की सांगण्याकरिता फारसे काही शिल्लक राहत नाही असे दिसते. शक्य आहे की मला कळत नसेल. तसे असेल तर अधिक कळणारांनी मला दुरुस्त केले पाहिजे. (यावर टिप्पणी करत वस्तूंच्या किंमती ठरवणाऱ्या मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष ए. डी. गोरेवाला म्हणाले की नियंत्रण दूर होण्यापूर्वीचे दर काळ्या बाजारातील होते. आणि मुंबईतील विविध भागातून मिळालेल्या बातम्यांवरून स्पष्ट होते की नियंत्रण काढून गेतल्यानंतर साखर आणि गहू यांच्या किंमतीत ५० ते १०० टक्के वाढ झाली.) लोकांना जेव्हा एखद्या गोष्टीची निकड असते तेव्हा लोकशाहीत त्या गोष्टीची हयगय करण्याला स्थान नसते.

असे म्हणतात की जगात जितके पेट्रोल निर्माण होते त्यातील भारतात केवळ १ टक्का पेट्रोलचा उपयोग होत असतो. यामध्ये निराश होण्याचे कारण नाही. अखेरीस रस्त्याने होणारी आपली वाहतून सुरू आहे. परंतु याचा अर्थ असा आहे की आपण युद्धखोर जमात नसल्यामुळे आपल्याला अधिक पेट्रोलची गरज नाही? वा आपल्याला जास्त पेट्रोल लागले तर जगात पेट्रोलचा तुडवडा होणार आहे? विद्वान लोकांनी माझ्या अडाणीपणावर हसू नये. मला प्रकाश हवा आहे. मी जर माझा काळोख लपवून ठेवला तर मला प्रकाश मिळणार नाही. प्रश्न आहे - इतके कमी पेट्रोल आपल्या वाट्यावर येत असेल तर मग काळ्याबाजारात पेट्रोला इतका प्रचंड साठा कसा?

पत्रलेखकाने सांगितलेली परिस्थिती जर खरोखरच असेल तर ही गोष्ट धक्कादायक आहे. याचा अर्थ नियंत्रण श्रीमंतांकरिता वरदान आहेत तर गरिबांकरिता शाप.आणि तरीही गरिबांच्या नावावर नियंत्रणे लादण्यात आली आहेत! एकाधिकारपद्धत जर अशा प्रकारे काम करत असेल तर क्षणाचाही विचार न करता ती बंद करण्यात आली पाहिजे.

कापडाबद्दल बोलायचे तर पंडित नेहरू जिला स्वातंत्र्याचा गणवेष म्हणतात त्या खादीला आपण विसरता कामा नये. (पाहा लेटर टू जवाहरलाल नेहरू, जुलै ३०, १९३७ आणि परिशिष्ट स्वातंत्र्याचा गणवेष जुलै ३१, १९३७) कापडावरील नियंत्रण राहण्याची मुळीच शक्यता नाही. आपल्याजवळ भरपूर कापूस आहे आणि असंख्य हात आहेत. ते लोक खेडेगावातही चरखा आणि माग चालवू शकतात. अशा प्रकारे कोणत्याही अडचणीशिवाय आपण स्वतः भरपूर कापड निर्माण करू शकतो. त्याकरिता ना तर शहरातील गोंगाटाची आवश्यकता असते ना मोटारीद्वारे दळणवळणाची. पुर्वीच्या काळी रेल्वे सैन्याच्या गरजा भागवायची. तिचे दुसरे काम बंदरांवर कापूस पोहोचवणे आणि बंदरापासून अंतर्गत भागात कापड आणणे हे असायचे. आता आपली मलमल खादी आहे. ती खेड्यात

तयार होते आणि खेड्यातच तिचा उपयोग घेतला जायचा. यामुळे या गोष्टीचे केंद्रिकरणाचे करण्याची गरज नाही. आपल्या आळशीपणामुळे वा अडाणीपणापायी आपण खेड्यांचा विनाश करू नये.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २६७-७०

७१. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ६, १९४७

नवी दिल्ली,
जानेवारी ६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी असे ऐकले आहे की आजसुद्धा लोक मुसलमानांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न करत होते. पोलीस आपले कर्तव्य पार पाडत आहेत आणि त्यांना अडवण्याचा प्रयत्न करत आहेत. अखेरीस पोलीस बिचारे काय करतील? ते अश्रुधूर सोडतात. आजही त्यांनी असा प्रयत्न केल्याचे मी ऐकले. इथे भरपूर जागा आहे. दिल्लीत जागा नाही असे काही नाही. हं, येथील निर्वासित अडचणीत आहेत. त्यांनी आकाशाखालीच राहावे हे तर बरोबर नाही. पाऊस आला तर आकाश आणि ते यांच्यामध्ये केवळ अंगावरील कपडे असतील. तर तेसुद्धा बरोबर नाही. यामुळे त्रस्त होऊन ते काहीही करून टाकतात. परंतु याकरिता त्यांनी केवळ मुसलमानांचीच घरे निवडावी हे तर काही योग्य नाही. मी त्यांना सांगितले की हे फार मोठे घर आहे, इथे भरपूर लोकांना सामावून घेता येऊ शकते. तुम्ही मला बाहेर फेकून देऊ शकता आणि इथे माझ्याबरोबर जी आजारी स्त्री आहे तिलाही फेकून देऊ शकता व त्यानंतर घरमालकालाही फेकून देऊ शकता. ही गोष्ट मी समजू शकतो. त्यावर ते म्हणाले की तुम्हाला राहायला घर मिळून जाईल परंतु आम्हा निर्वासितांना राहायला जागा कोण देईल? मी तर म्हणेन की त्यांनी असे करावे, परंतु केव्हा? त्यांच्याजवळ जे काही उपाय आहेत ते थकतील आणि दिल्लीतील लोक काही करणार नाही तेव्हा ही गोष्ट मी समजू शकेन. त्यात मला सभ्यपणा दिसेल. परंतु ज्यांना आम्ही घाबरवले आहे वा जे पळून गेले आहेत त्यांच्या घराचा ताबा घ्यावा वा त्यांच्या घरात घुसून राहायचे तर ही गोष्ट चांगली असू शकत नाही. यामुळे हिंदू, मुसलमान, शीख वा भारत असे कोणाचेही भले होऊ शकत नाही.

आज काही ना काही करून पोलिसांनी त्या लोकांना काही घरे दिली. परंतु ते लोक म्हणाले की आम्हाला ही घरे नको, आम्हाला तीच घरे पाहिजे. तर मी म्हणेन की आम्हाला मुसलमान नको असे स्पष्ट शब्दांत सांगा की. असे करणे सभ्यपणाचे होणार नाही परंतु वाकड्या मार्गाने काढण्यापेक्षा सरळसरळ काढलेले बरे. स्पष्टपणे सांगा की पाकिस्तानमध्ये हिंदू आणि शिखांना मारण्यात आले म्हणून इथे भारतात आम्ही तुम्हाला मारू वा आमचा तुमच्यावर विश्वास नाही. परंतु आज जे काही घडते आहे तो शुद्ध वेडेपणा आहे.

आपल्या दुर्दैवाने लोक विचार न करता किती तरी गोष्टीत गुंडगिरीवर उतरतात. आता आपण स्वतंत्र झालो आहो, आमचे राज्य आले आहे म्हणून आम्हाला हवे ते आम्ही करू अशी मानसिकता

यामागे दिसते. मुंबईहून आलेले वृत्त सांगते की तेथील सरकार फार संकटात आहे. मालधक्क्यावरील मजुरांनी संप केला आहे. (पोर्ट ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांनी वेतन आयोगाच्या शिफारसींची त्वरित अंमलबजावणी व्हावी अशी मागणी केली होती.) अशा प्रकारच्या संपांनी आम्ही मरणार आहो. यामुळे जे संप करतात त्यांचेही भले होऊ शकणार नाही. यात कोणाचाही हात असला, समाजवाद्यांचा हात असला वा काँग्रेसचा हात असला वा साम्यवाद्यांचा हात असला तर मला त्याची फिकीर नाही. मी तर सर्वांना सांगेन की अशा प्रकारे कारभार चालू शकत नाही. असे करून आपण आत्महत्येचा प्रयत्न करतो. आज देशाची परिस्थिती नाजुक असल्यामुळे आपण सर्व वाचू शकू असे वर्तन आपण केले पाहिजे.

मला औंधहून तेथील महाराजांचे एक पत्र आले आहे. औंध महाराष्ट्रातील एक लहानसे संस्थान आहे. त्यांनी तर इंग्रजांचे राज्य असल्यापासूनच सर्व कारभार आपल्या प्रजेच्या हाती सोपवला होता. (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी ४, १९४८) आपण आपल्या प्रजेची सेवा केली पाहिजे असे त्यांना आणि त्यांच्या मुलाला वाटले. त्याकरिता त्यांनी घटना तयार केली, त्यांनी पंचायत राजची स्थापना केली व त्यांच्या हातात सत्तेची सुत्रे देऊन टाकली. महाराज साहेब सांगतात की मला सर्व लोक सांगतात तुम्ही एकटे असे करू शकत नाही, सर्व करतील तेव्हा तुम्हीही करू शकाल. आपल्या संस्थानाचे भारतात विलिनीकरण करण्याचा निर्णय तर त्यांनी जवळपास घेतलेलाच आहे. तरी ते राजे राहतातच परंतु लोकांचे सेवक होऊन. जनता त्यांना जितके देईल तितकेच ते घेऊ शकतात. संस्थानांचे विलीनीकरण झाले याचा अर्थ जशी जनता राहते तसेच या संस्थानिकांनी राहावे. सरदार साहेबांनी ओरिसात राजांना निवृत्तीवेतन द्यायला सुरुवात केली. (ओरिसातील २५ संस्थानांचे प्रशासन भारत सरकारने १ जानेवारीला ताब्यात घेतले व त्यांना ओरिसा प्रांतात सामील करण्यात आले.) मग ते काम करो वा न करो. औंधचे राजे बसून राहिले तरी त्यांना निवृत्तीवेतन द्यावे हे मला योग्य वाटत नाही. हं, इतके खरे की त्यांनी प्रशासननाच्या कामात आता हस्तक्षेप करू नये कारण औंधचे प्रशासन जबाबदार सरकारच्या हातात आहे. यालाच पंचायत राज म्हणतात . पंचायत राज सुरू आहे तर त्यानुसार कारभार चालू शकतो की नाही असे ते विचारतात. परंतु त्यांना सांगण्यात आले आहे की त्यांच्या संस्थानातील प्रशासन पद्धती भारतात सामील झालेल्या इतर संस्थानांतील प्रशासन पद्धतीपेक्षा वेगळी असू शकत नाही. या संस्थानांकरिता वेगळा कायदा असू शकत नाही. परंतु माझे म्हणणे आहे की याकरिता वेगळ्या कायद्याची आवश्यकताच नाही. का? कारण राजा तर आता नाही. मग कायदा कोण करील? पंचायत करील. सत्ता जेव्हा लोकांच्या हातात सोपवली जाते तेव्हा त्याचा अर्थ असा होत नाही ते प्रशासन दिल्लीहून चालवले जावे. जर सरकार प्रातिनिधिक असले तर त्यात ग्रामीण लोकही असतील. अशा पंचायतने प्रशासन चालवावे. त्या पंचायतीचा हक्क तर कोणताही माणूस हिरावून घेऊ शकत नाही.

मग त्यात घाबरण्याचे कारण काय? खरा हक्क तर तोच असतो की जो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. तो तर कर्तव्यपालनाने मिळत असतो. आपले कर्तव्य पार पाडणे हा त्यांचा धर्म आहे. काही लोक एकत्रित आले आणि त्यांनी एक गट बनवला तरी त्याने काय होते? फार थोडे लोक अपराध करत असतात. त्यांचा न्याय पंचांद्वारे करू. ते पंचायतच्या बाहेर जाणार नाहीत. जी न्यायालये झाली आहेत त्यांच्यांत का जायचे? या पंचायतीच्या कामात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. सर्व लोकांची अशीच इच्छा असते. यालाच प्रजेचे राज्य म्हणतात. त्यात हस्तक्षेप करण्याकरिता कोणता कायदासुद्धा करता येत नाही. तसे केले तर ते लोकांचे सरकार राहणार नाही. लोकांचे सरकार तलवारीच्या बळावर स्थापन केले जाऊ शकत नाही.

एक तिसरी गोष्टही मी तुम्हाला आताच सागंतो. एक बंधू लिहितात की - हे विशेष पत्र आहे. हिंदुस्तानीत आहे - जो देश नेहमी सुखी असतो तिथेच रामराज्य असू शकते. बाहेरच्या देशातून कोणी माल विकत घेत नाही अशी गोष्ट नाही. परंतु आपण तितकाच माल घ्यायला पाहिजे जितक्या किंमतीचा माल आपण बाहेर पाठवू शकतो. मग हिशेब सरळ होतो. आपण बाहेरचा माल आणण्याकरिता ५० रुपये खर्च करू तर तितका माल बाहेर पाठवला पाहिजे. मग ठीक होईल. ते म्हणतात की आमचा देश कधी असा नव्हता. आपण नेहमीच कर्जदार राहिलो आहो. आता आपण धनको झालो आहो. परंतु आपण जर खर्च करत राहिलो तर असे किती दिवस चालेल? सांगायचा अर्थ हा आहे की जितका माल आपण पाठवतो तितकाच माल आपण बाहेरून बोलावत नाही. जर तितका माल पाठवत असू तर ठीक आहे, परंतु नगदी पैसे देऊन जर आपण आयात करू तर ते बरोबर नाही. आज आपण बाहेरून जो माल मागवतो तो जास्त असायला नको. आपण बाहेरून कमी माल मागवू आणि बाहेर जास्त पाठवू तर आपला देश धनको होऊ शकेल. मग आपली शिल्लक वाढेल म्हणजेच आपल्याजवळ जास्त पैसे होतील. आपण असे करू तर आपल्याला जे काम करायचे असेल ते आपण करू शकू, नाही तर नाही.

एक गोष्ट अशी आहे की आपण बाहेरून जो माल मागवतो तो आपल्या कच्च्या मालापालून पक्का होऊन येत असतो. यामुळे आपली पद्धत बदलून जाते. आपण तर आपला देशच असा केला पाहिजे की बाहेरून मागवायची आवश्यकताच पडू नये. मागवायचेच असेल तर इतरांची मदत करण्याकरिता. कोणी म्हणेल की आम्हाला पैशाची अडचण आहे तर पैसे पाठवून द्या. अमेरिका अशीच घडली हे जे ते म्हणतात ते खरेच आहे. आपल्याला अमेरिकेसारखे व्हायचे नाही. परंतु एक तर आपण बाहेर जास्त पाठवावे आणि ते शक्य शक्य नसेल तर कमीतकमी बाहेरून मागवायचे तरी नाही. असे केले तर आपण वाचू शकू.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ २७१-४

७२. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ७, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी ७, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला किती तरी चिठ्ठ्या आलेल्या आहेत आणि या पंधरा मिनिटात जितक्या चिठ्ठ्यांचे उत्तर देणे शक्य होईल तितक्यांचे मी उत्तर देईन.

एका बंधूंनी मला लिहिले त्यानी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांनी उपोषण करणे योग्य नाही इतकेच मी याबद्दल सांगेन. अशा प्रकारे उपोषण करणे पाप आहे. मी जिवंत आहे तोपर्यंत या बाबतीत माझा सल्ला घेतला पाहिजे कारण उपोषणांचा मला बराच अनुभव आहे. याबद्दल मी अधिक खोलात शिरणार नाही.

असे ऐकतो की विद्यार्थी संप करणार आहेत. तो ९ तारखेपासून सुरू होणार आहे. मला या बाबतीत इतकेच म्हणायचे आहे की हे फार चूक आहे. अशा प्रकारे संप करणे व त्यापासून आपला लाभ करून घेणे ही काही चांगली गोष्ट नाही. ही अहिंसा नाही याबद्दल माझ्या मनात मुळीच संशय नाही. मी अनेक अहिंसक संपांचे संचालन केले आहे. प्रत्येक संप अहिंसक असतो आणि प्रत्येक संप न्याय्य असतो असे म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांनी स्वतःला अभ्यासापर्यंत सीमीत ठेवले पाहिजे व त्यांनी संपापासून दूर राहिले पाहिजे. ते माझे ऐकतील अशी मला आशा आहे. मला अहिंसक संपांचा ५० वर्षांचा दीर्घ अनुभव आहे हे परत एकदा मी या संदर्भात सांगेन. मी असे संप केवळ भारतातच नाही तर दक्षिण आफ्रिकेतही यशस्वी केले होते. मी सुरू केलेल्या संपात अपयश आल्याचा मला एकही प्रसंग आठवत नाही. असे होऊच शकत नाही. संप जर खरोखर न्याय्य असेल व तसे केल्याशिवाय दुसरा कोणताही उपाय नसेल तेव्हा यश मिळाल्याशिवाय राहत नाही.

आज मला भेटण्याकरिता पंजाब, सिंध, सरहद्द प्रांत आणि अजून कुठलेकुठले बंधू भेटायला आले होते. ते सर्व पाकिस्तानमधील होते. त्यांचे प्रतिनिधी भेटायला आले होते. सर्व थोडेच येऊ शकणार होते. ते त्यांच्या दुःखद हकिगती सांगत होते. तुम्ही यात का लक्ष घालत नाही असे ते मला विचारत होते. खरी गोष्ट तर ही आहे की मी काय करतो आहे हे त्यांना कसे कळणार? मी तर इथे याच कामाकरिता बसलो आहे. कुणाकडून करवून घेता येईल तर करवून घ्यावे असे वाटत असते. आज मी दीनदुबळा झालो आहे. एक काळ असा होता की मी जर असे व्हायला पाहिजे असे सांगितले तर तसे होत असे. आज असे होत नाही. मी तेव्हा अहिंसक सेनापती होतो. आता जर माझे कोणी ऐकत नाही

तर मी सेनापती कसा? आज माझे बोलणे अरण्यरुदनासारखे आहे. परंतु मी एकटा जरी असलो तरी काय योग्य आहे ते मी सांगितलेच पाहिजे. धर्मराजानेही सांगितले होते की मी एकटा असलो तरी काय झाले, धर्माची गोष्ट तर करावीच लागेल. तो काळ गेला. परंतु मी काहीही म्हणालो तरी लोक माझे ऐकतील असा दावा त्या काळातही मी कधी केला नाही. लोक म्हणतात की सरकार आहे, त्यात तुमचे मित्र आहेत व तुम्ही जे काही म्हणाल ते ते करतील. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे त्यांनी वागायलाच पाहिजे. ते माझे मित्र आहेत हे खरे आहे, परंतु त्यांनी माझे म्हणणे का ऐकायला पाहिजे? आज माझे सर्व मित्र आहेत म्हणून मी म्हणतो त्याप्रमाणे त्यांनी केलेच पाहिजे असे कुठे आहे? मनाला पटत असेल तर करावे, आणि पटूनही करणार नसतील तर ते आळशी आहेत असे म्हणावे लागेल. सरकारमध्ये माझे मित्र आहेत, त्यांच्याशी मी चर्चा करेन आणि त्यांना सांगेन. एकतील तर चांगले आहे, नाही तर मी लाचार आहे. सरकार चालवण्यात अनेक अडचणी असतात, तुम्ही सरकार चालवाल तर तुम्हीसुद्धा असे करू शकणार नाही असे ते मला म्हणू शकतात. सरकारमध्ये माझे मित्र आहेत म्हणून त्यांनी केले, त्यांच्यामागे त्यांचे सचिव आहेत तेही माझे मित्र आहेत, त्यांनाही माहीत आहे की मी कोणाचा शत्रू नाही म्हणून त्यांनी ऐकले, पोलीस आहेत त्यांनी ऐकले तर मग अजून काय पाहिजे? जर असे झाले असते तर आज जे भारतात सुरू आहे ते झाले नसते. सरकार म्हणू शकते की आमच्याजवळ असे शिपाई, कारकून कुठे आहेत? इंग्रजांच्या काळात जे होते तेच आहेत. ते निघून गेले तरी काम चालू शकत नाही. असे म्हणायचा त्यांना अधिकार आहे. ते काहीही असले तरी मी आज जे म्हणतो ते करून घेऊ शकत नाही. मी तुमच्यासारखाच असहाय आहे. मी तर काही ईश्वर नाही की म्हणेन तसे करवून घेऊ शकेन. माझी जी थोडीशी शक्ती आहे त्याप्रमाणेच मी करू शकेन.

तरीही ते लोक म्हणतात ते योग्यच आहे. या बाबतीत त्यांनी काय करावे? राहायला काही तर असले पाहिजे, घालायला कपडे असले पाहिजे आणि खायला असले पाहिजे. या तिन्ही गोष्टी असल्या पाहिजे. माझ्याजवळ आहेत तर त्यांचाजवळ का असू नये? त्या लोकांनी काही गुन्हा केला आहे अशी गोष्ट नाही. निर्वासितांनी कोणताही गुन्हा केलेला नाही, त्यांनी मारले नाही, मारहाण केली नाही. खरे म्हणजे त्यांनाच मारहाण करून घाबरवून पळवून लावण्यात आले आहे. ते असे आहेत, निरपराध आहेत. ते माझी भावंडे आहेत, भाऊबहिणी आहेत, त्याच्यावर बळजबरी व्हावी, अन्याय व्हावा आणि इथे आल्यानंतरही त्यांना आरामात राहता येऊ शकत नसेल तर तुम्हाला सर्व काही मिळते, आम्हाला ते का मिळू नये, हा कोणता न्याय आहे असे म्हणण्याचा त्यांना अधिकार आहे. हा अन्याय आहे हे मला कबूल करावे लागेल. परंतु मग त्यांनी काय करावे? हे तर मी सांगितले आहे. कोणाच्याही घरात घुसून बसायचे ही काय पद्धत आहे? हल्ला करण्याची पद्धत मी सांगितली आहे. अहिंसक हल्ला करावा. कोणाच्या घरावर हल्ला केला पाहिजे हेही मी सांगितले आहे.

मी तर म्हणतो की तुम्ही स्पष्टपणे सांगा की आम्हाला जे काही काम दिले जाईल ते आम्ही करू. आमच्याकडून होऊच शकणार नसेल तर गोष्ट वेगळी. समजा की एखाद्या माणसाला लिहिण्याचे काम दिले परंतु त्याला लिहिता येत नसेल तर त्याने काय करावे? परंतु एखाद्याला कुदळ दिली आणि तो म्हणाला की मी केवळ लेखणी चालवू शकतो, कुदळ नाही, मला तेच काम द्या तर असे चालू शकत नाही. जे काम दिले जाईल ते केले पाहिजे. अशा प्रकारेच ज्याला घर दिले जाईल, राहोटी दिली जाईल त्यात राहिले पाहिजे. गवताची झोपडी जरी दिली तरी त्यातही राहिले पाहिजे. हं, ते घर असले पाहिजे, डोक्यावर छत असले पाहिजे. मी अशा घरात राहिलो आहे म्हणून म्हणतो. खाट आहे की नाही याची फिकीर करायला नको. मी तर सांगतो की गवतात, हिरव्या गवतात नाही, वाळलेल्या गवतातही माणूस सुखात झोपू शकतो. त्यात काही अडचण नाही. रुईच्या गादीत जितकी ऊब मिळते तितकीच गवताच्या गादीतही मिळते. हे मी अनुभवाने सांगतो. कोणाजवळ गादी आहे म्हणून मलाही गादी पाहिजे असे म्हणणे मूर्खपणा आहे. जे मिळते ती ईश्वराची कृपा समजून घ्यावे. असे केले तरच सर्व काम चालेल. असे केले तर आपल्याजवळ जे आज काही लाख निर्वासित पडले आहेत ते करोड जरी झाले तरी चांगल्या प्रकारे काम चालू शकते. इथे भरपूर जागा आहे. खरी गोष्ट ही आहे की त्यांची मने साफ असली पाहिजे. परंतु होते उलट.

कराचीत काय झाले हे तुम्ही पाहिलेच असेल. (पाहा एका पत्राची तळटीप, जानेवारी ७, १९४८), लोक म्हणतात की सिंधमध्ये असे झाले नाही, असे होऊच शकत नाही. मी तर म्हणतो की सिंधमध्ये हिंदू आरामात राहू शकत नाही, हिंदू जरी सोडले तरी इतरही आरामात राहू शकत नाहीत, त्यांनाही तिथे राहणे कठीण झाले आहे. हिंदू आणि शीख तिथे राहू शकत नाहीत. तिथून निघून येण्याकरिता ते गुरुद्वारात गेले होते. आणि केवळ हिंदूच नाही, इतरही. हे काल सिद्ध झाले. ते तिथून निघून येण्याकरिता गुरुद्वारात गेले होते. गुरुद्वारावर हल्ला झाला, त्यांच्यावर हल्ला झाला, काही माणसे मारली गेली, काही जखमी झाली. अशा प्रकारे सिंधमध्ये हल्ला झाला. पाकिस्तान सरकार म्हणते की जितक्या लवकर परिस्थितीवर नियंत्रण आणता येणे शक्य होते तितक्या लवकर आणण्यात आले. परंतु पहिली गोष्ट म्हणजे असे काही घडायलाच नको होते. पाकिस्तान सरकारला मी सांगेन की असे काही घडू दिले जाऊ नये आणि ते शक्य नसेल तर त्यांनी सरकारचा राजीनामा दिला पाहिजे. शक्य आहे की तिथे सरकार नसले तर काही दिवस तिथे लुटारूंचे राज्य होईल, परंतु नंतर सर्व काही ठीक होईल. भारत सरकारलाही मला हेच सांगायचे आहे. लोकांना समजावता येत नाही हा सरकारचा युक्तिवाद मला मान्य नाही. जर त्यांची समजूत घालता येत नसेल तर तुम्ही सरकार चालवू नका असे मी म्हणेन. सरकार जर म्हणेल की आम्ही असहाय आहो तर असहाय होण्याची काय गरज? थोडे इथे केले, थोडे तिथे केले, मनाची समजूत घातली तर सर्व चालून जाते. परंतु असे करून काम भागत नसते हा माझा अनुभव

आहे. हं, मी इतके मान्य करतो की आमची गाडी चालते आहे, मग ती एक पाऊल पुढे गेलेली का असेना. परंतु आज तर ती मागे जाते आहे. ही गोष्ट वाईट आहे. पाकिस्तान सरकारला मी म्हणेन आणि इथल्या सरकारला म्हणणार नाही असे तर होऊ शकत नाही. माझ्याकरिता तर दोन्ही बरोबर आहेत.

पाकिस्तान सरकार अशा प्रकारे लोकांचा खून करायला परवानगी देणार असेल तर ते सरकार फार दिवस चालणार नाही. यापेक्षा त्यांनी राजीनामा देणे चांगले. असे झाले नाही तर सरकारही मरेल. मी तुम्हा लोकांनाही सांगतो की या कारणामुळे तुम्ही वेड लागल्याप्रमाणे वागू नये. दुःखी आहा म्हणून संतापलेले आहा. संतापाशिवाय असे होऊ शकत नाही. हा संताप पिणे यात माणुसकी आहे. रागाचे उत्तर रागाने द्यावे आणि त्यांनी गुरुद्वारा तोडला म्हणून आम्ही मशिदी तोडायची, ती ताब्यात घ्यायची, आणि नंतर मुसलमानांना मारून टाकायचे हा न्याय नाही. अशा प्रकारे बदला घेण्यात आला तर सरकार कुठे राहील? सरकारचे काम अशा प्रकारे चालत नसते. असे केले तर अखेरीस आम्हीही वाईट होऊ, कायद्याचे राज्य संपेल. इतके खरे की निर्वासितांना चांगल्या प्रकारे राहता यावे म्हणून त्यांच्याकरिता जितक्या काही सोयीसवलती निर्माण करता येत असतील तितक्या केल्या पाहिजे. असे केले नाही तर आपल्याकरिता ती लाजिरवाणी गोष्ट होईल. कराचीमध्ये असे झाले म्हणून ना घाबरायचे आहे ना संतापायचे आहे. आपण चांगले राहून त्याचा बदला घेऊ शकतो. आम्ही इथे चांगल्या प्रकारे राहिलो, मुसलमानांना ठेवले आणि निर्वासित सभ्यपणाने वागले तर आज ज्या वेदना निर्माण झाल्या आहेत त्या आपण मिटवू याबद्दल मला मुळीच संशय नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ २७५-९

७३. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ८, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी ८, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

पत्र लिहिणाऱ्या एका बंधूंनी लिहिले आहे की हरिजनांच्या दारू पिण्याविषयी मी लिहिले होते (पाहा प्रार्थना प्रवचन जानेवारी १, १९४८). मी ते केवळ हरिजनांसंबधीच नाही तर इतर सर्वांबद्दल लिहिले होते. ते विचारतात की केवळ हरिजनांनी दारू सोडायला पाहिजे आणि सैनिक, श्रीमंत इत्यादी जे लोक आहेत त्यांनी दारू सोडायची गरज नाही काय? खरी गोष्ट तर ही आहे की हा विचारण्यासारखा प्रश्न नाही. श्रीमंत लोक दारू सोडणार नाहीत, सैनिक सोडणार नाहीत म्हणून काय इतर लोकांनीही दारू सोडू नये? दारू पिऊ नये असा कायदा जरी नसेल तरी दारू पिणे हे काय कर्तव्य होऊन जाते? इतरांनी पाप केले तर आपणही पाप करावे असे तर होऊ शकत नाही. त्यांनी विचारले तर मी सांगतो की अशा प्रकारे जे दारू पितात त्यांनी दारू सोडायलाच पाहिजे. हरिजन आहेत, मजूर आहेत त्यांना कळू शकत नाही म्हणून दारूबंदीचा कायदा होतो. दुःख विसरण्याकरिता त्यांच्याजवळ करमणुकीच्या गोष्टी नसतात म्हणून ते दारू पिऊन आपले दुःख विसरण्याचा प्रयत्न करतात. गरिबी आहे तर तेही दारू पिऊन विसरण्याचा प्रयत्न करतात. हरिजनांच्या दारू पिण्याकरिता अशा प्रकारची कारणे तरी असू शकतात. परंतु जे श्रीमंत आहेत, सैन्यातील लोक आहेत त्यांनी दारू पिण्याची काय आवश्यकता? श्रीमंतांना मी काय समजावून सांगू? फौजेतील लोक म्हणू शकतात की याशिवाय काम चालूच शकत नाही. परंतु मी तर जिथे सैन्यच मानत नाही तिथे ही गोष्ट कसा मान्य करू शकतो? माझे मित्रही आहेत की जे दारू पीत नाहीत. आपल्याकडे सर्वच दारू पितात असे नाही. सर्व सैनिकही दारू पीत नाहीत. इंग्रजांमध्येही असे अनेक आहेत की जे दारू पीत नाहीत. असे कुठे आहे की केवळ हरिजनांनीच दारू सोडावी? माझी तर इच्छा आहे की सर्वांनी दारू सोडावी. कायदा तर सर्वांसाठी असतो. हरिजनांनी दारू सोडावी आणि इतरांनी प्यावी असे कायदा कुठे सांगतो?

आता विद्यार्थ्यांच्या संपाविषयी बोलायची इच्छा आहे. काँग्रेसचे विद्यार्थी संपात सहभागी होणार नाहीत. हा तर साम्यवादी विद्यार्थ्यांचा संप आहे. विद्यार्थ्यांमध्ये सगळे असतात - साम्यवादी, समाजवादी, कॉंग्रेसी - परंतु याच्याशी माझा संबंध नाही. मी सर्वांना उद्देशून बोलत आहे. काँग्रेसचे विद्यार्थी संपात भाग घेत नसतील तर त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांना माझा सल्ला आहे की त्यांनी संपावर जाऊ नये. साम्यवादी विद्यार्थी हे पाऊल उचलत आहेत याचे मला दुःख होते. साम्यवादी हुशार लोक आहेत. त्यांचीसुद्धा देशसेवा करण्याची इच्छा आहे. परंतु देशसेवा करण्याचा

हा मार्ग नाही. आणि विद्यार्थ्यांनी कोणत्याही एखाद्या पक्षाला पाठिंबा का द्यावा? आणि विद्यार्थी हे स्वतःच एक पक्ष आहेत. त्यांचे काम स्वतःकरिताच नाही तर देशाकरिताही अभ्यास करणे आहे. जोपर्यंत कोणी विद्यार्थी असतो तोपर्यंत तो साम्यवादी, समाजवादी वा कॉंग्रेसी नसतो. पूर्णपणे अभ्यासाला वाहिलेला तो विद्यार्थी असतो. त्यांच्याकरिता संप घातक असेल.

एक प्रश्न विचारण्यात आला आहे. चांगला आहे. त्यात म्हटले आहे की तुम्ही तर वाईट गोष्टीचा त्याग करायला लावता, तुम्ही स्वतःही करता. ही चांगली गोष्ट आहे. ते पुढे म्हणतात की तुम्ही पाकिस्तानमध्ये जाऊन हे का करत नाही? तिथे का सत्याग्रह करत नाही? इथे तर बरेच केले, आता तिथेही जा. मी याचे तर उत्तर दिले आहे, हं, सत्याग्रह करण्यासंबंधीचे दिलेले नाही. मी सांगितले आहे की मी कोणत्या तोंडाने पाकिस्तानमध्ये जाऊ? आम्ही जर पाकिस्तानच्या चालीने चालणार असू तर काम कसे होईल? भारत जेव्हा स्वतःला शुद्ध करील तेव्हाच मी पाकिस्तानमध्ये जाऊ शकतो. मी इथेच करेन वा मरेन. दिल्लीतील हिंदू आणि शिखांना वेडाने झपाटले आहे. येथील सर्व मुसलमानांना घालवून लावावे असे त्यांना वाटते. आधीच मोठ्या संख्येत मुसलमान निघून गेलेले आहेत. राहिलेल्यांनीही जावे असे त्यांना वाटते. पाकिस्तानमध्ये जे हिंदू आणि शिख आहेत त्यांना निघून यायचे आहे. मग आज सत्याग्राहाचा काय उपयोग? आता ना तर सत्याग्रह शिल्लक आहे ना अहिंसा. प्रत्येकजण हिंसेचा पूजक झाला आहे. त्यांना सैन्याची मदत हवी असते आणि अशी मदत मिळाली की त्यांचे समाधान होत असते. आज ईश्वराची जागा सशस्त्र शक्तींनी घेतली आहे. आज आपली वृत्तपत्रेसुद्धा घाण पसरवत आहेत. लोक जर माझे ऐकतील तर वृत्तपत्रेसुद्धा अगदी वेगळे चित्र उभे करतील. पत्र लिहिणारे बंधू विचारतात : "पाकिस्तानमधून इतक्या मोठ्या प्रमाणात हिंदूंना आणि शिखांना हुसकावून लावण्यात आलेले असताना भारतात मुसलमानांना राहण्याकरिता जागा कशी राहील? आणि जोपर्यंत तितक्याच संख्येत मुसलमान पाकिस्तानमध्ये जात नाहीत तोपर्यंत निर्वासितांना कुठे सामावून घेता येईल? ते कुठे राहतील?" मला वाटते की जितके मुसलमान आधीच गेलेले आहेत त्यांची संख्या पाकिस्तामधून निघून यावे लागलेल्या हिंदू आणि शीख निर्वासितांइतकी होईल. अजूनही पाकिस्तामध्ये जे हिंदू राहिलेले आहेत त्यांना घालवून लावण्याचा प्रयत्न होत आहे म्हणून भारतात शिल्लक राहिलेल्या मुसलमानांना घालवून दिले पाहिजे असे म्हणणे हा शुद्ध वेडेपणा आहे. अजूनही भारतात मोठ्या संख्येत मुसलमान आहेत. मौलाना आझाद यांनी लखनौमध्ये मुसलमानांची जी सभा बोलावली होती तिच्यात ७०,००० मुसलमान गेले होते.अलीकडच्या काळात मुसलमानांची ही सर्वात मोठी सभा होती. या सर्व मुसलमानांना आपण मारून टाकले पाहिजे वा पाकिस्तानमध्ये घालवून लावले पाहिजे काय? आणि का? असा लाजिरवाणा सल्ला मी कधीही देणार नाही. त्यात कोणतेही शौर्य नाही. बहावलपूरचे अनेक लोक आज मला भेटायला आले होते. मीरपूर काश्मीरचेही काही लोक आले होते. ते अर्थातच फार

अडचणीत आहेत. ते बोलत असतानाच पंडितजी आले. भेटायला आलेले लोक काय म्हणतात ते ऐका असे मी त्यांना सांगितले. मीरपूरच्या लोकांशी पंडितजींचे बोलणे झाले आणि मला वाटते की काही तरी होईल. त्यांना जे काही हवे आहे ते सर्व होईल असे मला म्हणायचे नाही. हे जरी घोषित युद्ध नाही तरी युद्धासारखेच हे काही तरी आहे. यातून मार्ग काढून तिथे अडकलेल्या सर्व लोकांना एकाच वेळी काढून आणणे शक्य होणार नाही. शक्य होईल ते सर्व सरकार करील याबद्दल मला खात्री आहे. परंतु इतके केल्यानंतरही काही लोक तिथे अडकून राहिलेले असतील व त्यांना मदत करणे शक्य नसेल तर त्याबद्दल आपण फारसे काही करू शकू असे मला वाटत नाही. आपल्याजवळ पुरेशा आगगाड्या आणि बसेस नाहीत. लाखो लोकांची वाहतूक करता येईल असा काश्मीरचा मार्ग अजून झालेला नाही. तो अतिशय अरुंद आहे. बहावलपूरच्या निर्वासितांनी मला सांगितले की इतर निर्वासितांना नाव नोंदवून नोकरीकरिता अर्ज करता येतो परंतु त्यांचे अर्ज विचारात मात्र घेतले जात नाहीत. असा भेदभाव का असा त्यांचा प्रश्न आहे. ते अतिशय नम्र आणि आणि विवेकी होते. ते म्हणाले की पंजाब, सरहद्द प्रांत आणि सिंधमधून आलेले निर्वासित नोकरीकरिता अर्ज करू शकतात व ते नोकरीकरिता पात्र आहेत. मी म्हणालो की हे खरे असू शकत नाही आणि बहावलपूरच्या निर्वासितांबद्दल जर असा काही भेदभाव असेल तर ती निश्चितच चूक असली पाहिजे. कोणताही भेदभाव केला जाणार नाही असे सरदार म्हणाले होते. ते काहीही असले तरी मी चौकशी करेन.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २७९-८३

७४. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ९, १०४८

नवी दिल्ली,
जानेवारी ९, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

बहावलपूरच्या हिंदू मंदिरासंबंधी मला तुम्हाला काही तरी सांगायचे आहे. ते अजूनही तिथे आहे परंतु हिंदूच्या ताब्यात नाही. त्यांचे नाव भगवानदास आहे. बहावलपूरच्या मंदिराचे प्रमुख पुजारी मला भेटायला आले होते. त्या मंदिरावर कसा हल्ला झाला व हिंदूंना मागील दाराने कसा पळ काढावा लागला हे त्यांना त्यांच्या डोळ्याने पाहावे लागले. मुख्य पुजाऱ्यानेसुद्धा त्या हिंदूंबरोबर मागील दाराने पळ काढला होता. काही स्त्रियांना आपण कसे वाचवले हे ते सांगत होते. त्यांना सर्वांना वाचवणे शक्य झाले नाही परंतु बऱ्याच स्त्रियांना मी वाचवू शकलो असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की तिथे जे हिंदू वाचले आहेत वा अडकून पडले आहेत त्यांना कसेही करून आणण्याची काही व्यवस्था झाली पाहिजे. त्यावर मी म्हणालो की एका माणसाकडून जे काही होऊ शकते ते मी करतो आहे. आज दोन सरकार झाले त्याचप्रमाणे दोन राज्य झाले. यामुळे एका राज्याला दुसऱ्या राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही. आज काळ इतका नाजुक आहे की लोकांमध्ये धैर्य असले पाहिजे आणि आज नाही तर उद्या आपण मरणारच असल्यामुळे मरणाची भीती वाटायला नको. सत्याग्रहीप्रमाणे आपण शूरपणे का मरू नये?

आणि मी इथे पडलो आहे तर मुसलमानांना काही मदत पोहोचवू शकतो. या कामाकरिता माझे इथे राहणे फार उपयुक्त आहे. मी इथे राहिलो तर शासनातील लोकांशी लवकर भेटू शकतो. ते जवळच राहतात. ते मला बोलावत नसतात, स्वतःच येतात. ही त्यांची कृपाच आहे. बोलावले की दोन मिनिटात येतात. भंगी वस्तीत जाण्याकरिता १०-१५मिनिट लागतात म्हणून इथे पडलो आहे. मुसलमान बांधवांनाही इथे येणे सोयीस्कर आहे, तिथे जायला त्यांना भीती वाटते. आज जे राहिलेले आहेत त्यांना वाचवले तर ती चांगली गोष्ट होईल. असे ऐकतो की आज जर एखादा माणूस सायकलवर बसून चालला असेल तर त्याला सायकलवरून उतरवतात, त्याच्याजवळील रुपये-पैसे, घड्याळ इत्यादी जे मूल्यवान असेल ते घेतात असे जिकडे पाहावे तिकडे होत आहे. कोणी मोटारीत असेल तर मोटार अडवतात व त्यांच्याजवळील सर्व लुबाडतात. आपण असे झालो आहो. आपल्याकरिता ही लाजिरवाणी गोष्ट आहे

एक निर्वासित आज मला भेटायला आले होते. ते भिकारी नव्हते आणि गरीबही नव्हते. ते श्रीमंत म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जवळपासच बंगला आहे. तो बंगला मुसलमानाचा आहे. तो पळून गेला आहे. हा निर्वासित मित्र त्या मुसलमानाचा मित्र होता. तो मुसलमान ज्या ठिकाणी राहण्याकरिता

गेला त्या ठिकाणाहून हा निर्वासित मित्र आला आहे. त्याने त्याला या बंगल्यात राहण्याकरिता सांगितले. आता त्याला सरकारची नोटीस मिळाली आहे. नोटीसमध्ये लिहिले आहे की त्या बंगल्याची सार्वजनिक कार्यासाठी सरकारला आवश्यकता असल्यामुळे तो रिकामा करण्यात यावा. सरकार त्या बंगल्याची मागणी करील याबद्दल मला शंका नाही. राजदूत वगैरे अनेक लोक बाहेरून येत आहेत आणि सरकारला त्यांना राहण्याकरिता योग्य घर उपलब्ध करून द्यावे लागत असते. अखेरीस सरकार काही जादूने एकाएकी नवीन घरे तयार करू शकत नाही. असे म्हणतात की ऋषिमुनींमध्ये प्राचीन काळी ही शक्ती होती. भारद्वाज ऋषींनी आपल्या मंत्राच्या सहाय्याने रात्रीतून शहर कसे उभारले याची कथा रामायणात आली आहे. आज अशा कोणत्याही मंत्राची मला माहिती नाही. यामुळे सरकारला जर घरांची आवश्यकता असेल तर ते जनतेकडून घराची मागणी करू शकते. परंतु तसे करताना सरकारने तिथे राहणाऱ्या लोकांची पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. घर ताब्यात घेऊन घरात राहणारांना सरकार बाहेर काढणार असेल तर ते जातील कुठे? सरकार अशा प्रकारे वर्तन करू शकत नाही. परंतु जर अशी सूचना खरोखरच मिळाली असेल तर मी कोणतीही खात्री देऊ शकणार नाही वा मदत करू शकणार नाही. माझे स्वतःचेही घर नाही. मी दुसऱ्याच्या घरात राहत आहे. यामुळे प्रभावित होणाऱ्या व्यक्तीने सरकारकडे जायला पाहिजे. अजूनही मला वाटते की हे मित्र जे म्हणतात ते बरोबर नसावे, परंतु जर तसे असेल तर ही दुःखद गोष्ट आहे. कोणी जर एखाद्या घरात कायदेशीरपणे राहत असेल तर त्याला अशी सूचना देता येत नाही हे मला माहीत आहे.

मला इतरही अनक पत्रे आली आहेत. मुंबईत प्रत्येकाला दररोज एक शेर तांदूळ रेशनच्या दुकानातून मिळतो असे मी विधान केल्याचे एक पत्रलेखक म्हणतो. मला जोपर्यंत आठवते मी असे म्हणालो नव्हतो. आजच्या टंचाईच्या दिवसात दर दिवशी दर माणशी एक शेर तांदुळ म्हणजे फारच होईल. तरीही मी काय म्हणालो होतो ते मी पाहीन. त्यांचे म्हणणे आहे की दर दिवशी दर माणशी पावशेर तांदूळ रेशनच्या कोट्यातून मिळतात. याचा अर्थ चार दिवसात एक शेर. हे काही फार वाईट नाही. परंतु सात दिवसात एक शेर असे मला आठवते. परंतु मी जर दर माणशी दर दिवशी एक शेर असे म्हणालो असेन तर ते चूक आहे असे समजावे.

किती तरी चिठ्ठ्या आणि पत्रे मला आली आहेत. त्यातील कोणते घ्यावे हे ठरवणे कठीण झाले आहे.

एक मित्र आपल्या पत्रात म्हणतात की तुम्ही बिर्ला भवनमध्ये असला तरी प्रार्थना होते. परंतु गरीब तिथे जाऊ शकत नाहीत. आधी तुम्ही भंगी वस्तीत म्हणजे वाल्मिकी नगरमध्ये राहत होता. तिथे गरीबही प्रार्थनेकरिता येऊ शकत. परंतु आता ते बिर्लाभवनमध्ये येऊ शकत नाहीत. मला वाटते की मी जेव्हा

इथे आलो होतो तेव्हाच यासंबंधी सांगितले होते, (पाहा प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १०, १९४७) परंतु आज परत सांगण्याची आवश्यकता आहे. मी या वेळी जेव्हा इथे आलो तेव्हा दंगल सुरू होती. दिल्ली स्मशानासारखी वाटत होती. तेव्हा भंगी वस्तीत निर्वासितही राहत होते. शिवाय त्या वेळी कुठे काय होईल हे सांगवत नव्हते. त्यामुळे सरदार म्हणाले की आम्ही तुम्हाला इथे ठेवणार नाही, बिर्लाभवनमध्ये ठेवू. म्हणून मी बिर्लाभवनमध्ये आलो. काहीही झाले तरी भंगी वस्तीतच राहीन अशी काही मी शपथ घेतलेली नाही. मला कोणत्याही ठिकाणी एक खोली दिली तर माझे काम भागत नाही कारण माझ्याबरोबर माझे कार्यालयही असते, स्वयंपाकघर असते आणि अजूनही लोक असतात. भंगी वस्तीत गरिबांची घरे आहेत. तिथे शाळाही आहे. तिच्यात एक खोली मिळाली तरी काम भागू शकत नाही. यामुळे तिथे कसा जाऊ? आज ती खोली रिकामी आहे की नाही हेही मला तर माहीत नाही. परंतु मला वाटते की तिथे राहणे हा माझा धर्म नाही. मी गेलो आणि माझ्यामागे निर्वासित आले तर त्यांना कुठे ठेवू? ठेवावे तर लागेलच. मी राहिलो तर कोणी काढणार नाही. काढले तर चांगले आहे. ते म्हणू शकतात की निघा येथून, तुम्हाला इथे राहण्याचा काय अधिकार? आम्ही बाहेरून आलो आहो. यामुळे मी माझी सीमा ओळखली पाहिजे. मला वाल्मिकी नगरमध्ये राहण्याची हौस आहे पण ते ठिकाण सोडून इथे पडलो आहे. आणि असे काही नाही की गरीब इथे येऊ शकत नाहीत. इच्छा असेल तर पायी येऊ शकतात. मोटारीने गरीब काही येऊ शकत नाहीत. श्रीमंत मोटारीने येऊ शकतात.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. सिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २८३-५

७५. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १०, १९४८

नवी दिल्ली,

जानेवारी १०, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज आपण किती अधःपतीत झालो आहे हे पाहिले की धक्का लागतो. साधू असण्याचा, संयम ठेवण्याचा, गीतादी वाचण्याचा जे लोक दावा करतात त्यांना एकदा बसायला सांगितले तर बसून जावे इतकाही संयम त्यांनी का ठेवू नये? (भगवे कपडे घातलेला एक माणूस उभा राहिला व लिहून आणलेले एक पत्र वाचून दाखवण्याचा तो आग्रह धरू लागला. मोठ्या मुश्किलीने त्याला बसवण्यात आले.) आजकाल प्रार्थना सभेत सामान्यपणे सर्व लोक शांतता ठेवतात हे पाहून बरे वाटते.

बहावलपूरचे निर्वासित आज गोधळ करतील व सभेत आरडाओरड करत राहतील असे मला सूचीत करण्यात आले. (गांधीजी प्रार्थना करण्याच्या मैदानाकडे जाऊ लागले असताना बहावलपूरचे निर्वासित निदर्शने करू लागले व बहावलपूरमध्ये अडकलेल्या हिंदू आणि शिखांच्या सुटकेची मागणी करू लागले. गांधीजी प्रार्थनेकरिता बसले तेव्हा त्यांनी पूर्णपणे शांतता पाळली.) हे खरे असू शकत नाही असे मी म्हणालो होतो. त्यांना किती यातना सहन कराव्या लागतात हे मला माहीत आहे. तिथे जे हिंदू आणि शीख अडकलेले आहेत त्यांना आणले जाईल असे मी गृहीत धरतो. यापुढे हिंदू आणि शिखांना त्रास दिला जाणार नाही आणि ज्या लोकांना जायचे आहे त्यांच्या जाण्याची योग्य व्यवस्था करून जाऊ दिले जाईल व यापुढे हिंदू आणि शिखांवर इस्लाम लादला जाणार नाही असे आश्वासन नबाबांनी मला दिले आहे, परंतु राजे आणि नबाब यांच्या आश्वासनावर कितपत अवलंबून राहता येऊ शकते हे मला माहीत नाही. शक्य आहे की तिथे सर्व सुरक्षित असतील. सरकारनेसुद्धा या प्रकरणात लक्ष घातले आहे. त्यांना आताच्या आता तिथून आणले पाहिजे अशी मागणी तुम्ही करू शकता. परंतु आपण आधी जरी एक देश होतो तर आता दोन देश आहो आणि परस्परांचे शत्रू आहो ही गोष्ट तुम्ही समजून घेतली पाहिजे. आपल्याला जे शक्य असेल ते आपण करतो आहो. तिथे हिंदू आणि शीख मिळून ७०,००० लोक आहेत. सिंधमध्ये ही संख्या बरीच मोठी आहे. ते तिथे सुरक्षित नाहीत. वृत्तपत्रांमध्ये लिहून आले त्यापेक्षा तेथील परिस्थिती फार वाईट आहे व झालेले नुकसान बरेच मोठे आहे अशी तार कराचीहून मला आली आहे. ही वेळ जास्तीत जास्त संयम ठेवण्याची व धीर धरण्याची आहे. आपण जर धीर सोडला तर आपण लढाई हरलोच म्हणून समजा. पराभवाला आपल्या

शब्दकोषात जागा नसावी. काय केले पाहिजे याचा आपण शांतपणे विचार केला पाहिजे व म्हणून आपण संतापाने उत्तेजित होऊ नये.

आज इराणी राजदूत मला भेटायला आले होते. ते सरकारचे पाहुणे आहेत. ते म्हणाले, "इराण आणि भारत नेहमीच मित्र होते. इराणी आणि भारतीय हे दोघेही आर्य वंशाचे आहेत." ते बरोबर आहे. आपण जर झेंड अवस्ता पाहिला तर त्यात आपल्याला अनेक संस्कृत शब्द सापडतील. आपला दोघांचाही परस्परांशी व्यवहार होता. राजदूत म्हणाले की भारत आशियातील सर्वात मोठा देश आहे आणि इराणला खरोखरच भारताची मैत्री हवी आहे. गुरुदेव (रविंद्रनाथ टागोर) एकदा इराणमध्ये गेले होते व त्यांना त्या भेटीने फार आनंद झाला होता. भारत आणि इराणमधील संबंधांना धक्का लागायला नको असे ते राजदूत म्हणाले होते. हे कसे होईल असे मी त्यांना विचारले. तेव्हा त्यांनी एका इराणी माणसाच्या बाबतीत मुंबईत घडलेल्या प्रसंगाचा उल्लेख केला. मुंबईत बरेच इराणी लोक आहेत. त्यांची तिथे चहाची दुकाने आहेत. त्या दुकानांत अनेक हिंदू, मुसलमान, पारसी आणि ख्रिश्चन जात असतात. तिथे काही दंगा झाला. मला त्याबद्दल काहीही माहिती नाही. काही इराणी मारले गेले. अखेरीस इराणी मुसलमान आहेत. यामुळे त्यांना मारणे योग्य आहे असे दंगलखोरांचे मत झाले असावे. ही परिस्थिती सरकारने ज्या प्रकारे हाताळली त्याबद्दल तुमची काही तक्रार आहे काय असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले की माझी काहीही तक्रार नाही आणि सरकारने लगेचच परिस्थिती आटोक्यात आणली. ते म्हणाले की इथले सरकार फार चांगले आहे आणि त्याने इथल्या मुसलमानांच्या संरक्षणाकरिता सशस्त्र पहारेपरी ठेवले आहेत. ते म्हणाले की इराणमध्ये हिंदू, शीख आणि मुसलमान व्यापारी एकोप्याने राहतात. अतिशयोक्ती करण्यात आलेले वृत्त भारतातून नेहमीच इराणमध्ये येत असते. भविष्यात काय होईल हे कोणालाही माहीत नाही. परंतु इराणचे सरकार सावध आहे आणि कोणत्याही कारणाचा भारत आणि इराणच्या मैत्रीसंबंधावर परिणाम होऊ नये असे त्याला वाटत असते.

अजून माझे दोन मिनीट शिल्लक आहेत म्हणून मी एक पत्र घेतो. हे पत्र लिहिणारे बंधू लिहितात की खाद्य पदार्थांवरील नियंत्रण उठवण्यात आल्यामुळे काही लोक खुष असले तरी नियंत्रण उठवणे ही काही फार चांगली गोष्ट नाही व तुम्हाला एकाच बाजूच्या सूचना मिळत असतात अशी सावधगिरीची सूचना त्यांनी मला दिली आहे. परंतु माझे अभिनंदन करणाऱ्या मला इतक्या अधिक तारा आणि पत्र मिळत असताना मी वेगळे काय म्हणू शकतो? ती सगळी पत्रे आणि तारा एकच बाजू सांगतात असे म्हणून मी त्यांना फेटाळू शकत नाही. मला सर्वांची मते कळू शकत नाही तसेच जगात जे काही घडते ते सर्व मला कळू शकत नाही कारण मला सर्वसाक्षी ईश्वराची दृष्टी मिळालेली नाही. भारतातील करोडो लोक माझे डोळे आणि कान आहेत, हातपाय आहेत. मला दुसरी बाजूसुद्धा जाणून घ्यायची आहे. मी

म्हणतो इतक्याकरिता प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवू नका. तुमच्या डोळ्यांनी जे दिसते केवळ त्यावर विश्वास ठेवा. तुम्ही तुमच्या चुकांपासून शिकाल. तुम्हाला जे बरोबर वाटते ते करा. असे झाले तरच तुमचे स्वातंत्र्य अबाधित राहील व तुम्ही त्याकरिता पात्र व्हाल.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २८५-७

७६. प्रार्थना प्रवचन, जानेवारी ११, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी ११, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

सभेत शांतता पाळल्याबद्दल कालच मी तुमचे अभिनंदन केले होते. परंतु मुलेमुली आपसात कुजबुज करत असतील वा रडणाऱ्या मुलांना स्त्रिया आणत असतील तर हे त्यांच्याकरिता चांगले शिक्षण असू शकत नाही. (हा रविवार असल्यामुळे मोठ्या संख्येत लोक सभेत आले होते.) त्या जर मुलांना शांत ठेवू शकत नसतील तर त्यांनी मुलांना सभेत आणू नये. मी सर्व बंधुभगिनींना विनंती करीन की त्यांनी शांतपणा ठेवण्याचे सौजन्य दाखवावे. प्रार्थनेच्या वेळी सतत कुजबुज केल्यामुळे प्रार्थनेत अडथळा येतो. ईश्वर सर्वशक्तिमान आहे आणि सर्वत्र आहे हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्याच्याजवळ सर्व काही आहे. त्याच्या गप्प बसण्याचा वा कृपेचा आपण गैरफायदा घेऊ नये.

नुकताच एक गोष्ट कळली आहे. ती दुःखद आहे. एक पत्र तर एका वृद्ध गृहस्थांचे (कोंडा वेंकटपैय्या ; पाहा कोंडा वेंकटापैय्या यांना पत्र जानेवारी १२, १९४८ आणि प्रार्थना प्रवचन जानेवारी १२, १९४८.) आले आहे. मी त्यांना ओळखतो. ते नेहमी कुठून पत्र लिहितील? परंतु आज लिहिले आहे. दुसरे पत्र एका तरुण बंधूंचे आहे. त्यांना मी ओळखत नाही. माझ्याजवळ दोघांचीही नावे आहेत परंतु तुम्ही त्यांना ओळखत नसल्यामुळे नाव सांगून काय फायदा? दोघांचेही म्हणणे आहे की १५ ऑगस्टनंतर लोकांच्या मनांतील धाक निघून गेला आहे. ज्या ब्रिटिशांची भीती वाटत होती ते निघून गेलेले आहेत. आता शिक्षेचीही भीती वाटत नाही आणि ईश्वराचीही भीती वाटत नाही. आंध्रमध्ये लोक धडधाकट शरीरयष्टीचे आहेत आणि त्यांना आपण स्वतंत्र आहो असे जेव्हा वाटते तेव्हा त्यांचे त्यांच्या मनावरील नियंत्रण निघून जाते. आता स्वार्थसिद्धीशिवाय, स्वतःचे पोट भरण्याशिवाय ते दुसरे कोणतेही काम करत नाहीत. एक बंधू लिहितात की काँग्रेसमध्ये स्वतःच्या स्वार्थाचा विचार न करणारे लोक होते. भारताला स्वतंत्र करण्याकरिता त्यांनी जे बलिदान केले ते काय याकरिता केले होते? आज काँग्रेसचा अधःपात होतो आहे. काँग्रेसमध्ये जितके लोक आहेत त्यांना आमदार, खासदार व्हायचे आहे. जे यात यशस्वी होतात ते देशाकरिता काम करत नाहीत तर आपले काम करतात. आमदार होतात तर कमी पैसे मिळत नाहीत. किती मिळतात हे मी विसरलो आहे, परंतु आमदार झालेल्या लोकांचे त्यामुळे पोट भरते. तर ते लिहितात की अशा प्रकारे ते पैसे खातात. इतकेच नाही तर नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांनाही धमक्या देतात. म्हणतात की काम केले नाही तर तुमचे असे असे करून टाकू, तसे तसे करून टाकू. बिचारे पोट भरण्याकरिता तर काम करत असतात, काय करतील? अशा प्रकारे

दोघेही बिघडतात - नागरी सेवेतील लोक आणि ज्यांना आपण आपले प्रतिनिधी म्हणतो तेही. कोणाला मत द्यावे हे लोकांना कळले पाहिजे, परंतु आज तर असे नाही. अशा प्रकारे अत्यंत दुःखी होऊन त्यांनी लिहिले आहे. त्या वृद्ध गृहस्थांना वाईट वाटते म्हणून ते लिहितात. ते म्हणतात की काही दिवस तुम्ही इथे राहा आणि पाहा - हे चांगले वाटते. मी आंध्रच काय इतर सर्व वर्गाच्या लोकांमध्येही राहिलो आहे. माझ्याकरिता देशातील सर्व लोक भारतीय आहेत, मग ते कोणतीही भाषा बोलत असो. कोणी जर म्हणत असेल की मी आंध्रचा आहे आणि देशातील इतर लोकांचे मला काहीही सोयरसुतक नाही तर मला सुद्धा त्या व्यक्तीशी काहीही देणेघेणे नाही. ते म्हणतात की आपल्यामध्ये सडण सुरू झाली आहे व ती पसरू लागली आहे. जितके अधिक लोक आपण विधिमंडळात पाठवू तितकी घाण वाढेल. तिथे जितके लोक कमी असतील तितकी घाण कमी असेल. यामुळे त्यांचे म्हणणे आहे की आमदारांची संख्या आपण कमी केली पाहिजे कारण काहीही असले तरी ते लोकांचे प्रतिनिधित्व करत नाहीत. ते विधिमंडळात स्वार्थसिद्धीकरिता जात असतात इतकेच नाही तर ते काँग्रेसचा ताबा मिळवण्याचाही ते प्रयत्न करत असतात. यानंतर स्वतःला साम्यवादी, समाजवादी म्हणवणारे लोक आहेत. तेसुद्धा स्वतःला महान समजत असतात आणि संपूर्ण भारताची सत्ता काबीज करण्यासंबंधी बोलत असतात. परंतु भारत कोणावर ताबा मिळवेल? काँग्रेसमध्ये हेच आहे, समाजवाद्यांमध्ये हेच आहे, साम्यवाद्यांमध्येही हेच आहे तर मी सर्वांना सांगेन की भारताचे व्हा, भारत आपला व्हायला नको. एकेकाचा भारत होईल तर भारत कुठे जाईल? यामुळे भारत आपला करायचा असेल तर आपले पोट भरण्याकरिता नाही, आपल्या नातलगांना नोकऱ्या देण्याकरिता नाही, आपल्या नातलगांना पैसा देण्याकरिता नाही. मी तर म्हणेन की असे करायचे असेल तर आपले काम सर्वश्रेष्ठ प्रतीचे असले पाहिजे. असे केले नाही तर सर्व काम बिघडेल.

स्त्रिया बोलत आहेत. हे फार वाईट आहे. जर त्यांना बोलायचे असेल तर त्यांनी व्यासपीठावर यावे आणि इथून भाषण द्यावे. शक्य आहे की मी जे बोलतो त्यातील एक शब्दही त्यांना ऐकू येत नसेल. त्या इथे ऐकण्याकरिता येत नसतात तर इतर काही काम नसते म्हणून इथे येत असतात.

आज काही मुसलमान मला भेटायला आले होते. ते म्हणतात की अजूनही आम्ही राष्ट्रवादी आणि कॉंग्रेसी मुसलमान आहो. ते म्हणाले की "काँग्रेसच्या लोकांना आधी आमच्याबद्दल फार आदर वाटायचा परंतु आता आम्ही त्यांच्या नजरेतून उतरलो आहो. काँग्रेसच्या लोकांना आमच्याबद्दल इतकी तुच्छता वाटत असेल तर त्यांनी आम्हाला जायला सांगितले पाहिजे आणि आम्ही जाऊ. सरकारनेसुद्धा असे सांगितले पाहिजे. असे केले तर आज आमच्यावर जे हल्ले होताहेत आणि अपमानित करण्यात येते त्यापासून आमचा बचाव होईल." मला भेटणारे लोक स्वतःसंबंधीच बोलत

नव्हते. ते सगळ्या मुसलमानांचे प्रतिनिधित्व करत होते. मी त्यांना शांत राहण्याकरिता सांगितले आणि सरकार आपल्याकडून शक्य ते करत आहे असे आश्वासन मी त्यांना दिले. सरकारला जर अपयश आले तर काय करायचे ते आपण पाहू असेही मी त्यांना सांगितले. आज आपण हिंदू वा शीख वा मुसलमान वा पारसी असल्याचे विसरलो पाहिजे. आपल्याला जर भारतात चांगल्या प्रकारे कारभार चालावा असे वाटत असेल तर आपण सर्वांनी केवळ भारतीय व्हायला पाहिजे. आपल्या घरात ईश्वराला आपण कोणत्या नावाने बोलावतो याला महत्त्व नाही. राष्ट्राच्या कामात सर्व धर्माचे आपण सर्व लोक भारतीय आहो. आम्ही सर्व मुसलमानांना मारून टाकू वा मुसलमानांना आम्ही या देशात राहू देणार नाही असे जर हिंदू म्हणत असतील तर ते आत्महत्या करतील व हिंदूंना मारण्याचा मुसलमानांचा त्रास वाचेल. आपण आत्महत्या करू शकत नाही. आपण भारतीय आहो आणि हिंदू, मुसलमान, पारसी, शीख इत्यादी सर्वांना वाचवण्याच्या प्रयत्नात आपण मरण्याकरिता तयार असलो पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २८८-९०

७७. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १२, १९४८

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांनी इंग्रजीत लिहिलेल्या या भाषणाचा हिंदीत अनुवाद करण्यात आला आणि तो सभेत वाचून दाखवण्यात आला.)

नवी दिल्ली,
जानेवारी १२, १९४८

प्रकृतीत सुधारणा व्हावी म्हणून काही लोक आरोग्याच्या नियमाप्रमाणे उपवास करत असतात. जेव्हा एखादी चूक वा पातक होते व त्याची जाणीव माणसाला होते तेव्हा प्रायश्चित्त म्हणूनही तो उपवास करत असतो. असा उपवास करणाराचा अहिंसेवर विश्वास असलाच पाहिजे याची आवश्यकता नाही. परंतु असाही प्रसंग येत असतो की समाजाने केलेल्या एखाद्या अन्यायाच्या विरोधात अहिंसेच्या पुजाऱ्यालाही उपवास करणे भाग पडत असते. असे तो तेव्हाच करतो जेव्हा त्याच्यासमोर आपला विरोध व्यक्त करण्याचा दुसरा कोणताही मार्ग शिल्लक राहत नाही. असा प्रसंग माझ्या जीवनात आला आहे.

९ सप्टेंबरला मी कलकत्त्याहून दिल्लीला आलो तेव्हा मी खरे म्हणजे पश्चिम पंजाबमध्ये जात होतो. परंतु तसे घडायचे नव्हते. प्रसन्नचित्त असणारी दिल्ली मृतांचे शहर दिसत होती. मी गाडीमधून उतरत असतानाच मला सर्वांचे चेहरे चिंताक्रांत असलेले दिसले. हास्यविनोद करून नेहमी खुष राहणाऱ्या सरदारांचा चेहरासुद्धा औदासिन्याने झाकोळलेला होता. त्या वेळी मला याचे कारण माहीत नव्हते. मला घेण्याकरिता ते प्लॅटफॉर्मवर आले होते. संघराज्याच्या राजधानीत दंगल झाल्याची दुःखद बातमी त्यांनी मला लगेचच दिली. मला लगेच जाणवले की मला करण्याकरिता वा मरण्याकरिता दिल्लीतच राहायला पाहिजे.

सैन्य अथवा पोलिसांच्या मदतीने आज शहरात शांतता प्रस्थापित करण्यात आली आहे. परंतु आपल्या अंतःकरणात वादळी वारे वाहत आहेत. या वादळाचा केव्हाही स्फोट होऊ शकतो. याला मी माझ्या "करण्याच्या" प्रतिज्ञेची परिपूर्ती समजत नाही. ही परिपूर्तीच मला मृत्यूपासून दूर ठेवू शकते की ज्याच्यासारखा दुसरा कोणीही मित्र नाही. हिंदू, शीख आणि मुसलमान यांच्यात अंतःकरणापासूनची मैत्री व्हावी याकरिता मी तळमळतो आहे. पूर्वी अशी मैत्री होती परंतु आज ती अस्तित्वात नाही. ही अशी अवस्था आहे की देशभक्त या नावाला पात्र असलेला कोणताही भारतीय ती शांतपणे सहन करू शकत नाही.

माझा आतला आवाज किती तरी दिवसांपासून मला ऐकू येत होता, परंतु मी माझे कान बंद करून ठेवले होते. हा आवाज सैतानाचा म्हणजे माझ्या दुबळेपणाचा तर नाही ना अशी मला शंका येत होती. मला लाचारीची भावना कधीही पसंत पडत नसते, आणि कोणत्याही सत्याग्रहीला ती आवडायला नको. उपवास तर त्याचे अखेरचे शस्त्र असते. त्याच्या वा इतरांच्या तलवारीची जागा ते घेत असते.

माझ्याकडे दररोज भेटायला येणारे मुसलमान मित्र आता "आम्ही काय करावे" असा प्रश्न विचारत असत. काही दिवसांपासून माझी लाचारी मला खाऊ लागली होती. उपवास सुरू होताच ही लाचारी ताबडतोब निघून जाईल. तीन दिवसांपासून मी यावर विचार करतो आहे. आणि अखेरीस हा निर्णय डोळ्यासमोर लखलखला. आता मी खुष आहे. (गांधीजींच्या मनात काय सुरू आहे याची त्यांनी जवळच्या सहकाऱ्यांनाही कल्पना दिली नव्हती, वल्लभभाई पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांनासुद्धा नाही. प्रार्थना सभेतील या घोषणेच्या थोड्या वेळेपूर्वीच गांधींजींना ते भेटले होते. गांधीजींचे हे पंधरावे उपोषण होते.) कोणत्याही माणसाजवळ, जर तो पवित्र असेल, तर आपला जीव देण्यापेक्षा अधिक मूल्यवान काहीही नसते. हे पाऊल उचलणे समर्थनीय ठरण्याइतके पावित्र्य माझ्यात असावे अशी मला आशा आहे आणि त्याकरिता मी ईश्वराजवळ प्रार्थनाही करतो. या माझ्या प्रयत्नाकरिता तुम्ही सर्वांनी मला आशीर्वाद द्यावा व माझ्याकरिता आणि माझ्याबरोबर सर्वांनी प्रार्थना करावी अशी विनंती आहे.

हा उपवास उद्या (मंगळवारी) पहिल्या जेवणाच्या वेळेपासून सुरू होईल. हे उपोषण अनिश्चित काळापर्यंत सुरू राहील आणि मीठ घातलेले वा न घातलेले आणि लिंबाचा रस घातलेले वा न घातलेले पाणी पिण्याची या उपवासात मला सूट राहील. कोणत्याही बाह्य दडपणाने नाही तर कर्तव्याची जाणीव झाल्यामुळे सर्व जमातींचे मनोमिलन झाले आहे असे जेव्हा माझे समाधान होईल तेव्हाच माझे हे उपोषण सुटेल.

आज जगात भारताचा मान कमी होत आहे. आशिया आणि संपूर्ण जगाच्या हृदयावरही भारतातील रामराज्याचे जे चित्र रेखाटले गेले होते ते वेगात पुसट होऊ लागले आहे. या उपवासाच्या निमित्ताने जर आपले डोळे उघडले तर तो सर्व सन्मान परत येऊ शकतो. भारताचा आत्मा जर हरवला तर उपाशी जगाच्या आशेचाही लोप होईल असे मला वाटते. मित्रांनी वा जर कोणी शत्रू असेल तर त्याने याकरिता माझ्यावर रागावू नये. असे अनेक मित्र आहेत की ज्यांना मानवी स्वभावात सुधारणा घडवून आणण्याकरिता उपवास करण्याची पद्धत योग्य वाटत नाही. ते मला सहन करतील आणि जे स्वातंत्र्य ते स्वतःकरिता घेतात ते मलाही देतील अशी अपेक्षा आहे.

ईश्वर माझा सर्वोच्च आणि एकमेव सल्लागार आहे व इतर कोणाचाही सल्ला न घेता हे उपोषण मी केले पाहिजे असे मला वाटले. हा निर्णय घेण्यात माझी चूक झाली असे जर माझ्या लक्षात आले तर तशी जाहीर घोषणा करण्यात व हे पाऊल मागे घेण्यात मला संकोच वाटणार नाही. असे काही होण्याची फार कमी शक्यता आहे. मी दावा करतो त्याप्रमाणे जर माझा आतला आवाज स्पष्ट असेल तर मी त्याच्या विरोधात जाऊ शकत नाही. माझी विनंती आहे की माझ्याशी याबद्दल वाद घालण्यात येऊ नये आणि जो निर्णय बदलता येऊ शकत नाही त्यात सर्वांनी मला सहकार्य करावे. संपूर्ण भारताने अथवा कमीतकमी दिल्लीने या बाबतीत मला सहकार्य दिले तर हा उपवास लवकर सुटू शकतो. परंतु लवकर सुटतो की उशिरा सुटतो की कधीही सुटत नाही याची काळजी कोणीही करू नये. अशा नाजूक प्रसंगी कोणीही दुबळेपणा दाखवू नये. जीवनात मी अनेक उपवास केले आहेत. माझ्या पूर्वीच्या उपोषणांवर टीकाकारांनी टीका करत म्हटले होते की माझ्या उपोषणामुळे दडपण आले होते. मी उपवास केला नसता तर ज्या कारणाकरिता मी ते उपोषण केले होते त्याचे गुणदोष दिसून पडले असते. परंतु मी उपोषण केल्यामुळे तसे होऊ शकले नाही.

हेतू चांगला आहे हे सिद्ध करता आले तर निर्णय विरोधात गेला तरी त्यामुळे काय फरक पडू शकतो? शुद्ध उपोषण हे शुद्ध कर्तव्यपालनासराखे असते. त्याचे फळ त्याच्यातच असते. ते केल्यामुळे कोणते परिणाम होतील याचा मी विचार करत नसतो. मी उपवास करतो कारण मला तसे करावेच लागते. यामुळे माझी सर्वांना विनंती आहे की त्यांनी भावनाविवश न होता यामागील हेतूचा विचार करावा आणि मी मरणारच असेन तर मला शांतपणे मरू द्यावे कारण शांतता तर मला मिळणारच आहे. भारताचा, हिंदू धर्माचा, शीख धर्माचा आणि इस्लामचा नाश मी असहाय होऊन पाहू शकत नाही. पाकिस्तानमध्ये जगातील सर्व धर्माच्या लोकांना समान अधिकार मिळाला नाही, त्यांच्या जीवाच्या आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेची हमी मिळाली नाही व भारताने त्याची भ्रष्ट नक्कल केली तर दोन्ही देशांचा विनाश अटळ आहे. तसे झाले तर इस्लामचा केवळ या दोन देशातच मृत्यू होईल, परंतु संपूर्ण जगात नाही. परंतु हिंदू धर्म आणि शीख धर्म यांना भारताबाहेर जगात कुठेही अस्तित्व नाही. ज्यांचा या बाबतीत माझ्याशी मतभेद आहे त्यांनी मला कितीही प्रखर विरोध केला तरी मी त्यांचा आदरच करीन.

माझा उपवास लोकांचा आत्मा जागृत करण्याकरिता आहे, त्याला मारून टाकण्याकरिता नाही. आज आपल्या प्रिय भारतात किती घाण निर्माण झाली आहे याचा थोडा विचार तर करा. आणि ही घाण दूर करण्याकरिता भारताचा एका नम्र पुत्र हे पाऊल उचलण्याचे साहस करतो आहे, त्याच्यात हे पाऊल उचलण्याइतकी शक्ती आहे आणि कदाचित पावित्र्यही असेल तर तो उचलत असलेल्या या

आनंददायी पावलाबद्दल तुम्हाला आनंद व्हायला पाहिजे. आणि तो यापैकी काहीही नसेल तर तो या धरेवर ओझे मात्र आहे. तो जितक्या लवकर निघून जाईल आणि या भूमातेवरील ओझे कमी करून येथील वातावरण शुद्ध करील तितके त्याच्याकरिता आणि इतर सर्व संबंधितांकरिताही चांगलेच असेल.

या उपोषणापासून मला परावृत्त करण्याकरिता वा माझ्याबद्दल वाटणाऱ्या काळजीमुळे माझ्या मित्रांनी बिर्लाभवनकडे धाव घेऊ नये अशी माझ्या सर्व मित्रांना माझी विनंती आहे. उलटपक्षी आपणा सर्वांकरिता हा कसोटीचा कठीण प्रसंग असल्यामुळे त्यांनी आत्मपरीक्षण करावे. जे आपल्या कामाच्या ठिकाणी आहेत आणि आपले कर्तव्य पूर्वीपेक्षाही अधिक प्रामाणिकपणे पार पाडत आहेत ते मला आणि मी ज्या हेतूकरिता काम करतो आहे त्या हेतूला सर्व प्रकारे मदत करतील. हे उपोषण आत्मशुद्धीची प्रक्रिया आहे.

आंध्र प्रदेशातून मला दोन पत्रे आली असल्याचे काल मी तुम्हाला सांगितले होते. त्यातील एक देशभक्त कोंडा वेंकटपैय्या या माझ्या वयोवृद्ध मित्राचे होते. त्यातील काही उतारे मी तुम्हाला सांगतो :

राजकीय आणि आर्थिक प्रश्न बाजूला ठेवले तरी काँग्रेसच्या लोकांचे झालेले नैतिक पतन ही मोठीच क्लिष्ट समस्या आहे. मी इतर प्रांतांबद्दल विशेष काही सांगू शकत नाही परंतु माझ्या प्रांतातील परिस्थिती अतिशय चिंतनीय आहे. राजकीय सत्तेने त्यांचे डोके फिरले आहे. विधानसभेचे आणि विधानपरिषदेचे अनेक आमदार या संधीचा पुरेपूर लाभ उठवण्याचा प्रयत्न करत आहेत, आपल्या प्रभावाचा, ओळखीपाळखीचा पुरेपूर उपयोग करून पैसा मिळवण्याचा ते प्रयत्न करत आहेत. इतकेच नाही तर गुन्हेगारी खटले चालणाऱ्या न्यायालयात जाऊन न्यायालयातील कामकाजाच्या प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. इतकेच नाही तर या आमदारांच्या सतत होणाऱ्या पक्षपाती हस्तक्षेपामुळे जिल्ह्याचे कलेक्टर आणि महसूल खात्यातील इतर अधिकाऱ्यांनाही मोकळेपणाने आपले काम करता येत नाही. कोणताही प्रामाणिक अधिकारी दीर्घकाळ आपल्या पदावर राहू शकत नाही. त्याच्या विरोधात मंत्र्यांकडे खोटी तक्रार केली जाते व मंत्री या तत्त्वहीन स्वार्थी लोकांचे ऐकतात.

स्वराज्याची ओढ ही अशी गोष्ट होती की जिच्यामुळे सर्व स्त्री-पुरुष तुमचे नेतृत्व मान्य करू लागले होते. परंतु आता ते ध्येय साध्य झालेले असल्यामुळे बहुतांश काँग्रेसच्या लढाऊ कार्यकर्त्यांवर जे नैतिक बंधन होते ते नाहीसे झाले आहे. इतकेच नाही तर आपल्या स्वातंत्र्य संग्रामात कट्टर विरोधक असलेल्या लोकांशीही ते हात मिळवू लागलेले आहेत आणि

स्वतःच्या स्वार्थाकरिता ते त्यांचे नाव काँग्रेसचे सदस्य म्हणून नोंदवू लागलेले आहेत. परिस्थिती दिवसेंदिवस असह्य होत चालली आहे आणि त्यामुळे काँग्रेस सरकार तसेच काँग्रेसबद्दलही लोकांना आदर वाटेनासा झाला आहे.

आंध्र प्रदेशमध्ये नुकताच झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकांवरून काँग्रेसची जनतेवरील पकड किती वेगात कमी होते आहे ते दिसून येते. गुंटूरमधील नगरपालिकेच्या निवडणुकांची पूर्ण तयारी झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मंत्र्याच्या (मद्रास) आदेशावरून तेथील निवडणुका एकाएकी थांबवण्यात आल्या. मला असे वाटते की गत दहा वर्षांपासून केवळ नामित परिषदच अस्तित्वात आहे आणि नगरपालीकेचे प्रशासन आयुक्तांच्या हातात आहे. आता असे ऐकिवात आहे की या शहरातील नगरपालिकेचे प्रशासन हातात घेण्याकरिता सरकार लवकरच सदस्य नामित करणार आहे.

मी म्हातारा आहे. पाय मोडलेला आहे. काठीच्या आधाराने लंगडत लंगडत घरात मी थोडाफार हिंडू शकतो. मला माझा कोणताही स्वार्थ साध्य करायचा नाही. यात काही शंका नाही की जिल्ह्याची काँग्रेस पार्टी आणि प्रांताची काँग्रेस कमेटी ज्या दोन गटात विभाजित झाली आहे तिच्या प्रमुखांसमोर मी माझे विचार कठोर शब्दांत ठेवत असतो. मी माझे विचार कधीही लपवून ठेवले नाही, आणि माझे विचार सर्वांना माहीत आहेत.

काँग्रेसमधील गटबाजी, अनेक आमदारांचा पैशामागे लागण्याचा प्रयत्न आणि मंत्र्यांंचा दुबळेपणा यामुळे जनतेमध्ये बंडखोरीची भावना निर्माण होत आहे. लोक म्हणतात की यापेक्षा तर इंग्रजांचे राज्य चांगले होते. ते काँग्रेसला शिव्याशापसुद्धा देत आहेत.

आंध्र आणि इतर प्रांतांमधील लोकांनी या स्वार्थत्यागी देशभक्ताच्या शब्दांचा विचार करावा. ज्या अप्रामाणिकपणाचा त्यांनी उल्लेख केला तो केवळ आंध्रमध्येच नाही. परंतु ते आंध्रबद्दलचाच आपला स्वतःचा अनुभव सांगू शकतात. आम्ही सर्वांनी सावध राहिले पाहिजे.

माझ्या बहावलपूरच्या मित्रांनी धीर धरावा अशी माझी विनंती आहे. सरदार साहेब मला आज दुपारीच भेटले होते. माझे मौन असल्यामुळे आणि आधीच्या कामात व्यस्त असल्यामुळे मी काहीही सांगू शकलो नाही. श्री शंकरसुद्धा (वल्लभभाई पटेल यांचे स्वीय सचिव) त्यांच्या कार्यालयात इतके व्यस्त होते की तेसुद्धा तुमचे प्रकरण त्यांच्यासमोर मांडू शकले नाही. तसे करून त्यांनी बहुधा सरदारांचा अमूल्य वेळ वाचवला असावा. (यानंतर गांधीजी लॉर्ड माऊंटबॅटन यांना भेटायला गेले.)

द हिंदुस्तान टाईम्स जानेवारी १३, १९४८, आणि हरिजन, जानेवारी १८, १९४८

७८. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १३, १९४७

(या प्रार्थनासभेत नेहमीपेक्षा जास्त गर्दी होती.)

नवी दिल्ली,
जानेवारी १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला जे काही सांगायचे आहे ते मी पंधरा मिनिटात सांगू शकेन अशी अशा आहे. परंतु मला बरेच काही सांगायचे असल्यामुळे कदाचित जास्त वेळही लागू शकेल.

आज मी इथे येऊ शकलो कारण उपवास सुरू केल्यानंतर चोवीस तासात कोणावर काहीही परिणाम होत नसतो, निदान व्हायला नको. मी तर आज सकाळी साडेनऊ वाजता खायला सुरुवात केली होती. त्याच वेळी लोकांचे येणेही सुरू होते, (वल्लभभाई पटेल गांधीजींबरोबर जवळपास ४५ मिनिटे होते. भेटायला येणारांत प्रमुख अबुल कलाम आझाद, जयरामदास दौलतराम, एच. एस. सुऱ्हावर्दी आणि डॉ. जिवराज मेहता होते.) ते गोष्टी करत होते यामुळे अकरा वाजायला थोडासाच वेळ राहिला असताना मी जेवण संपवू शकलो. (गांधीजींनी उपोषण सुरू केल्यामुळे सकाळी ११ वाजता प्रार्थना करण्यात आली.) यामुळे मी सभेला येऊ शकलो यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. आज तर येऊजाऊ शकतो, बसू शकतो आणि सर्व कामही केले आहे. उद्यापासून भीती आहे. मी इथे यायचे आणि बोलायचे नाही यापेक्षा तर तिथे पडल्यापडल्या विचार करत राहिलो तर अधिक बरे. अखेरीस ईश्वराचेच तर नाव घ्यायचे आहे, ते तिथेच घेईन. उद्यापासून तुमच्यासमोर प्रार्थनेत येणे मला कठीण वाटते. मला यावेसे वाटेल परंतु येऊ शकणार नाही, परंतु तुम्हाला प्रार्थनेत सहभागी व्हावे असे वाटत असेल तर तुम्ही येऊ शकता. मुली तर प्रार्थना करायला येतील. सर्व नाही तर कमीकमी एक तरी येईल. तुम्ही येऊन प्रार्थना तर करू शकता. मी न आल्यामुळे तुमची निराशा होऊ नये म्हणून मी माझा कार्यक्रम तुम्हाला सांगितला आहे.

मी कालचे भाषण लिहून काढले होते व ते वृत्तपत्रांमध्ये प्रकाशितही झाले. आता मी उपोषण सुरू केले आहे परंतु अनेक लोक विचारतात की तुम्ही हे काय करत आहा? मुसलमानांनी गुन्हा केला की हिंदूंनी गुन्हा केला की शिखांनी गुन्हा केला? कोणी गुन्हा केला? उपवास किती दिवस सुरू राहील? ठीक आहे लोक विचारतात की तुमचा आरोप कोणावर आहे तर मी सांगतो की मी आरोप करणारा कोण? माझा कोणावरही आरोप नाही. मी सांगितले की हं, आम्ही अपराधी झालो आहो हे खरे आहे, परंतु याचा अर्थ असा नाही कोणा एका विशेष व्यक्तीने अपराध केला. हिंदू मुसलमानांना जेव्हा

हटवतात तेव्हा ते आपल्या धर्माचे पालन करत नसतात आणि आज तर हिंदू आणि शीख हो दोघेही सोबत राहून असे करत आहेत. परंतु मी सर्व हिंदूंवर वा सर्व शिखांवर आरोप करत नाही कारण सर्वांनी थोडेथोडे केले आहे. ही गोष्ट लोकांनी समजून घेण्यासारखी आहे. जर ते समजून घेणार नाहीत तर माझे कामही होणार नाही आणि माझे उपोषणही थांबणार नाही. मी जर स्वतःला जिवंत ठेवू शकणार नसेन तर त्याचा दोष कुणावरही नसेल. मी नालायक असल्याचे सिद्ध झाले तर ईश्वर मला उचलून घेईल. त्याने मला उचलून नेले तर ती अशी कोणती मोठी गोष्ट असेल? मग ते विचारतात की तुम्ही हे मुसलमान बांधवांकरिता करत आहा? ठीक आहे, मी कबूल करतो की मी त्यांच्याकरिता करतो आहे. का? कारण आज इथे असलेल्या मुसलमानांनी सर्व काही गमावलेले आहे. आधी इतक्या जागा मुसलमानांच्या आहेत अशा एक प्रकारे ते सरकारवर अवलंबून राहू शकत होते. मुस्लिम लीगचीही चलती होती, आता ते राहिले नाही. आज इथे मुस्लिम लीग राहिलेली नाही, मस्लिम लीगची मदत खरी नाही. मुस्लिम लीगने देशाची फाळणी करायला लावली आणि फाळणीनंतरही मोठ्या संख्येत मुसलमान भारतात आहेत. आधीपासून माझे मत होते की जे मुसलमान भारतात राहिले आहेत त्यांना सर्व प्रकारची मदत दिली पाहिजे. हीच मानवता आहे, मानवधर्म आहे.

माझा उपवास आत्मशुद्धीकरिता आहे. प्रत्येकाने स्वतःला शुद्ध केले पाहिजे. सगळ्यांना जर शुद्ध व्हायचे नसेल तर परिस्थिती चिघळेल. सर्वांनी शुद्ध व्हायचे असेल तर मुसलमानांनीही शुद्ध व्हायचे आहे. सर्वांनी आपले अंतःकरण शुद्ध करायचे आहे. मुसलमानांत कोणतेही दोष असले तरी आपण ते पाहायचे नाही. मी चूक केली आहे असे जर मी कोणासमोर सांगितले तर तेच एक प्रकारचे प्रायश्चित्त होत असते.

मी हे जे सांगतो आहे ते मुसलमानांना वा अजून कोणाला खुष करण्याकरिता सांगत नाही आहे. मी स्वतःलाच म्हणजे ईश्वरालाच खुष करण्याचा प्रयत्न करतो आहे. ईश्वराचा गुन्हेगार होण्याची माझी इच्छा नाही. मुसलमानांनीसुद्धा शुद्ध व्हायला पाहिजे आणि भारतात राहायला पाहिजे. गोष्ट अशी आहे की निवडणुकांकरिता हिंदूंनी आणि शिखांनी मुस्लिम लीगला मान्यता दिली. मी इतिहासात जाणार नाही. नंतर फाळणी झाली. परंतु फाळणीपूर्वीच हृदये दुभंगलेली होती. केवळ मुसलमानांचाच दोष आहे असे जरी आपण म्हणू शकत नसलो तरी यांत मुसलमानांचाही दोष आहे. हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांना दोष दिला पाहिजे. आता या तिन्ही अपराध्यांनी मित्र व्हायला पाहिजे. त्यांनी ईश्वराकडे पाहिले पाहिजे. मुसलमानांमध्येसुद्धा अनेक असे आहेत की जे सैतानाची पूजा करतात. हिंदू आणि शिखांमध्येही अनेक लोक नानक आणि इतर गुरूंची पूजा करत नाहीत तर सैतानाची पूजा करतात. धर्माच्या नावाखाली आपण अधर्मी झालो आहो.

मी मुसलमानांच्या नावाने उपवास सुरू केलेला असल्यामुळे त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. कोणती जबाबदारी येते? आपल्याला हिंदू आणि शिखांबरोबर भाऊभाऊ होऊन राहायचे आहे व पाकिस्तानशी नाही तर भारताशी प्रामाणिक राहायचे आहे ही गोष्ट त्यांनी समजून घेतली पाहिजे. ते प्रामाणिक आहेत की नाहीत हे मी त्यांना विचारणार नाही. मी त्यांची परीक्षा त्यांच्या वर्तनावरून करीन.

नंतर सरदारांचे नाव येते. मुसलमान म्हणतात की मी चांगला आहे परंतु सरदार नाहीत, त्यांना काढून टाकले पाहिजे. ते म्हणतात की जवाहरलालसुद्धा चांगले आहेत. ते म्हणतात की तुम्ही सरकारमध्ये आलात तर चांगले होईल. त्यांचा आक्षेप केवळ सरदारवर आहे. मुसलमानांना मी सांगितलेच पाहिजे की तुमच्या युक्तिवादात काहीही अर्थ नाही कारण सरकार संपूर्ण मंत्रिमंडळ असते. सरदार काय किवा जवाहरलाल काय हे सरकार नाहीत. ते तुमचे सेवक आहेत. तुम्ही त्यांना काढून टाकू शकता. होय, केवळ मुसलमान त्यांना काढून टाकू शकत नाहीत हे खरे आहे. परंतु सरदार जी चूक करतात असे वाटते ती चूक तरी ते सरदारच्या लक्षात आणून देऊ शकतात. ते असे म्हणाले, तसे म्हणाले असे सांगून चालणार नाही. त्यांनी काय केले ते सांगा. मला सांगा. मी त्यांना भेटत असतो. त्यांच्याशी बोलत असतो, मी त्यांना तुमचे म्हणणे सांगेन. तेच जवाहर, तेच सरदार शासन चालवत आहेत. जवाहर तर त्यांना काढू शकतात, परंतु ते असे करत नाहीत तर काही कारण असले पाहिजे. उलट ते सरदारची तारीफ करतात. (हिंदुस्तान टाईम्समधील अहवालात इथे पुढे लिहिले आहे - लोक म्हणतात त्याप्रमाणे सरदार गांधीजींच्या होला हो लावत नसले तरी ते अजूनही गांधीजींचे चांगले मित्र आहेत.) मग मंत्रिमंडळ आहे. तेही सरकार आहे. सरदार जे काही करतात त्याची जबाबदारी सर्व मंत्रिमंडळाची असते कारण ते तुमचे प्रतिनिधी आहेत. लोकशाही आपले काम अशा प्रकारे चालवत असते. यामुळे मुसलमानांनी शूर आणि निर्भय व्हायला पाहिजे असे मी म्हणेन. आपल्याकरिता लीग नाही, काँग्रेस नाही, गांधी नाही, जवाहरलाल नाही तर केवळ खुदा म्हणजे ईश्वर आहे असा विचार त्यांनी केला पाहिजे. आपण केवळ त्याच्या नावावर इथे आहो. मुसलमानांना मी म्हणेन की हिंदूंनी आणि शिखांनी काहीही केले तरी तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. मी तुमच्याबरोबर आहे. मला त्यांच्याबरोबर जगायचे आणि मरायचे आहे. मी तुम्हाला एक ठेवू शकत नसेन तर माझे जीवन निरर्थक आहे. अशा प्रकारे मुसलमानांवरही फार मोठी जबाबदारी आहे हे त्यांनी विसरायला नको.

सरदार स्पष्टवक्ते आहेत. ते जे काही म्हणतात ते काही वेळा कटू वाटते. दोष त्यांच्या जिभेचा आहे. त्यांचे हृदय त्यांच्या जिभेसारखे नाही याची मी साक्ष देऊ शकतो. ते लखनौमध्ये (६जानेवारीला जाहीर सभेत बोलताना वल्लभभाई पटेल म्हणाले होते : "भारतीय मुसलमानांना मला केवळ एक प्रश्न

विचारायचा आहे. नुकताच झालेल्या अखिल भारतीय मुस्लिम परिषदेत काश्मीरच्या प्रश्नावर तुम्ही तुमचे तोंड का उघडले नाही? पाकिस्तानच्या कृतीचा तुम्ही निषेध का केला नाही? या गोष्टी लोकांच्या मनामध्ये संशय निर्माण करतात... यामुळे मुसलमानांचा एक मित्र म्हणून मी दोन शब्द सांगेन. आता आपले कर्तव्य एकाच बोटीने वल्हवत पुढे जाणे अथवा बुडणे आहे. मी स्पष्टपणे तुम्हाला सांगतो की एकाच वेळी तुम्ही दोन घोड्यांवर स्वार होऊ शकत नाही. तुम्हाला जो कोणता एक घोडा आवडत असेल त्याची निवड करा.") आणि कलकत्ता येथे (३ जानेवारीला कलकत्ता येथील प्रचंड जनसभेत बोलताना वल्लभाई पटेल यांनी जोर देऊन सांगितले की हिंदू राज्याची गंभीरपणे चर्चा करता येऊ शकत नाही. परंतु एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे. भारतात चार कोटी मुसलमान आहेत. त्यातील अनेकांनी पाकिस्तानच्या निर्मितीत मदत केली आहे. एका रात्रीतून त्यांच्यात परिवर्तन होईल यावर कोण विश्वास ठेवू शकतो? मुसलमान म्हणतात की आम्ही निष्ठावंत नागरिक असल्यामुळे आमच्या प्रामाणिकपणावर कोणी कसा काय अविश्वास दाखवू शकतो? त्यांना मी म्हणेन, : 'तुम्ही मला का विचारता? तुम्ही तुमच्या सद्सद्विवेकबुद्धीला विचारून पाहा'.") म्हणाले होते की मुसलमानांनी इथे राहिले पाहिजे आणि राहायला पाहिजे. ते मला असेही म्हणाले होते की मी त्या मुसलमानांवर विश्वास ठेवू शकत नाही जे कालपरवापर्यंत स्वतःला हिंदू आणि शिखांचे शत्रू समजत होते व मुस्लिम लीगचे अनुसरण करत होते. त्यांच्यात रात्रीतून बदल होऊ शकत नाही व एकाएकी ते मित्र होऊ शकत नाहीत.अजूनही लीग अस्तित्वात असेल तर ती कुणाच्या आज्ञेचे पालन करील? पाकिस्तानच्या की आपल्या सरकारच्या? लीगची जुनी प्रवृत्ती पाहून त्यांना तिची शंका येते आणि ते बरोबरही आहे. ते म्हणतात लीगच्या मुसलमानांच्या प्रामाणिकपणावर माझा विश्वास नाही व मी त्यांच्यावर विश्वास ठेवू शकत नाही. ते विश्वासार्ह आहेत हे त्यांनी सिद्ध केले पाहिजे. त्यांनी असे केले तरच हिंदूंनी आणि शिखांनी काय केले पाहिजे हे सांगण्याचा मला अधिकार असेल.

या मुलींनी जे गाणे (यदी तौर डाक सुने केऊ न आसे तबे एकला चलो रे, एकला चलो, एकला चलो, एकला चलो रे) म्हटले ते गुरुदेवांनी लिहिले आहे. नोआखालीच्या दौऱ्यात आम्ही ते म्हणत असू. एकटा चालणारा माणूस इतरांना साद घालतो आणि सोबत चलण्याकरिता सांगतो. परंतु जर कोणीही आले नाही आणि काळोख पसरला असेल तर कवी म्हणतात की तरीही माणसाने एकट्यानेच चालायला पाहिजे कारण ईश्वर आधीपासूनच त्याच्याबरोबर आहे. बंगालीतील हे गाणे म्हणायला मी मुलींना मुद्दाम सांगितले. नाही तर त्या हिंदुस्तानीतील गाणे म्हणाल्या असत्या. हिंदू आणि शिख जर आपल्या धर्माशी प्रामाणिक असतील तर त्यांनी ही वृत्ती अंगी बाणवली पाहिजे. मुसलमानांना पाकिस्तानमध्ये पळून जावेसे वाटेल असे वातावरण त्यांनी निर्माण करू नये. हिंदूंनी आणि शिखांनी शूर व्हायला पाहिजे आणि पाकिस्तानमधील सर्व हिंदू आणि शीख जरी मारले गेले तरी आम्ही

बदल्याची कार्यवाही करणार नाही हे हिंदूंनी आणि शिखांनी दाखवून दिले पाहिजे. पाकिस्तानची नक्कल आपल्या लोकांनी केलेली पाहण्याकरिता जिवंत राहण्याची माझी इच्छा नाही. मी जर जिवंत राहिलो तर एकाही मुसलमानाला स्पर्श करायचा नाही असे मी प्रत्येक हिंदूला आणि शिखाला सांगेन. मुसलमानांना मारणे हा भ्याडपणा आहे आणि आपण शूर झालो पाहिजे, भेकड नाही. दिल्लीत परत शांतता निर्माण होईल तेव्हाच माझे उपोषण सुटेल. दिल्लीत जर शांतता प्रस्थापित झाली तर त्याचा प्रभाव केवळ संपूर्ण भारतावरच नाही तर पाकिस्तानवरही पडल्याशिवाय राहणार नाही व जेव्हा असे होईल तेव्हा एकटा मुसलमानसुद्धा दिल्लीतील कोणत्याही भागात आरामात फिरू शकेल. मग मी उपोषण सोडेन. दिल्ली भारताची राजधानी आहे. ती नेहमीच भारताची राजधानी राहत आलेली आहे. जोपर्यंत दिल्लीतील परिस्थिती सामान्य होत नाही तोपर्यंत भारतातील वा पाकिस्तानमधील परिस्थिती सामान्य होणार नाही. आज मी सुऱ्हावर्दींना इथे आणू शकत नाही कारण कोणी तरी त्यांचा अपमान करील अशी मला भीती वाटते. आज ते दिल्लीतील रस्त्यांमधून मोकळेपणाने फिरू शकत नाहीत. जर ते फिरले तर त्यांच्यावर हल्ला होईल. त्यांना इथे काळोखातही मोकळेपणाने हिंडता आले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. हे खरे आहे की मुसलमानांचा जेव्हा प्रश्न आला तेव्हाच त्यांनी प्रयत्न केले. तरीही त्यांची इच्छा असती तर ते परिस्थिती अजूनच चिघळवू शकले असते. परंतु तसे करण्याची त्यांची इच्छा नव्हती. मुसलमानांनी बळजबरीने जी घरे बळकावली होती ती त्यांनी रिकामी करायला लावली. मी मुख्यमंत्री असल्यामुळे असे करू शकलो असे यावर ते म्हणाले. ती घरे हिंदू आणि शिखांची असूनही त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले. दिल्लीत खरी शांतता प्रस्थापित होण्याकरिता एक महिना जरी लागला तरी त्याची फिकीर करण्याचे कारण नाही. केवळ माझा उपवास सुटण्याकरिता लोकांनी काहीही करू नये.

तर आज जे हिंदू, शीख, पारसी, ख्रिश्चन आणि मुसलमान भारतात राहतात त्यांनी भारतात राहायला पाहिजे आणि भारत असा देश झाला पाहिजे की जिथे प्रत्येकाचा जीवाच्या आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेची शाश्वती वाटली पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ २९३-३००

७९. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १४, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी १४, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी तुम्हाला सांगितले होते की उद्या म्हणजे आज मी सभेत येऊ शकेन की नाही याबद्दल मला शंका आहे. परंतु येणे शक्य झाले म्हणून आलो. उद्या, परवा असे दिवस येणार आहेत की मला फिरताही येणार नाही. डॉक्टर तर आजपासूनच मनाई करत होते. (गांधीजींनी उपवासाचा दुसऱ्या दिवशी सकाळचे आणि सायंकाळचे फिरणे सोडले असले तरी त्यांनी नेहमीच्या कामात वेळ घालवला. त्यांनी मीठ वा लिंबाशिवाय गरम पाणी घेतले, मंत्रिंडळाच्या दोन सभांमध्ये भाग घेतला व वायव्य सरहद्द प्रांतातील प्रतिनिधी मंडळाचे स्वागत केले. याशिवाय ते भेटायला येणाऱ्या किती तरी लोकांना आणि मित्रांना भेटले. डॉ. जिवराज मेहता आणि डॉ. सुशीला नाय्यर या दोघांनी काढलेल्या गांधीजींच्या आरोग्यविषयक अहवालात लिहिले होते की गांधीजींच्या प्रत्येक दिवसाच्या उपोषणामुळे त्यांच्या सध्याच्या आणि भविष्यातील प्रकृतीवरील धोका वाढत आहे.) मी स्वतःला डॉक्टरांच्या हाती नाही तर ईश्वराच्या हाती सोपवले आहे. कोणत्याही प्रकारे मी जगलोच पाहिजे इतकी मला जीवनाची आसक्ती नाही. मी जगतो की मरतो हे पूर्णपणे ईश्वराच्या हातात आहे. माझी इतकीच प्रार्थना आहे की माझी ही श्रद्धा अक्षुण्ण राहावी आणि माझ्या श्रद्धेप्रमाणे मी वागत असताना त्यात कोणीही अडथळा आणू नये. आज माणूस दुर्बल झाला आहे आणि ईश्वर कुठे आहे असे तो विचारतो. मी म्हणतो की सर्वांनी बलशाली व्हावे. आजूबाजूच्या सर्वांनी बलशाली व्हावे. असे झाले तरच माणूस संकटातून बाहेर पडू शकतो. तर मी तुम्हाला माझी ही रामकहाणी सांगितली.

आज मला तुम्हाला दोनचार गोष्टी सांगायच्या आहेत. खरे म्हणजे मी इंग्रजीत लिहून टाकले आहे वा मजकूर सांगून लिहून घेतले आहे. माझी शारीरिक परिस्थिती कशी राहील हे मला माहीत नव्हते. मला वाटले की मी वाचून दाखवू शकलो नाही तर त्याचे भाषांतर कोणी तरी वाचून दाखवू शकेल. असे होऊ शकले असते. मग मला वाटले की मीच हे सर्व सांगेन तर बरे होईल. हे केवळ तुमच्याकरिताच नाही. रेडिओच्या माध्यमातून भारतातील सर्व लोक हे ऐकतात. मी काय म्हणतो हे त्यांना ऐकायचे असते आणि काहींना मला जे सांगायचे असते ते माझ्या आवाजात ऐकायचे असेत. मी तर त्यांच्या प्रेमाच्या बंधनाने बांधला गेलो आहे. यामुळे मला वाटले की मी त्यांना माझ्या आवाजातच हे सांगितले पाहिजे. मला वाटले की छत्तीस तासांचा उपवास शरीराकरिता फार चांगला

असतो. त्यामुळे शरीर स्वच्छ होते व शरीराची कोणतीही हानी होत नाही. हे खरे आहे की भविष्याकरिता मी माझी शक्ती राखून ठेवली पाहिजे, परंतु याची काळजी ईश्वर घेईल.

मला चोहोकडून अनेकांच्या तारा येत आहेत आणि त्यांतील अनेक तर मुसलमानांच्या आहेत. तसेच भारताबाहेरूनही मला तारा येत आहेत. त्यातील महत्त्वाच्या तारा निवडण्याकरिता मी प्यारेलालला सांगितले आहे. त्या सर्व तारा प्रकाशित करण्याची आवश्यकता नाही. लोकांना काही शिकता येईल अशा ज्या तारा त्यात आहेत केवळ त्याच तारा प्रकाशित केल्या पाहिजे. अशा काही तारा आहेत की ज्यांत तुम्ही उपोषण सोडा आणि सर्व काही ठीक होईल असे म्हटलेले आहे. परंतु मी उपोषण कसा सोडू शकतो? ईश्वराने मला या उपोषणाची प्रेरणा दिली आहे आणि तोच हे उपोषण थांबवील. मृदुलाबेनकडून मला फोनद्वारे संदेश आला आहे. ती लाहोरमध्ये आहे. तिचे मुसलमानांमध्ये अनेक मित्र आहेत. ती हिंदू मुलगी आहे. उपोषणाने ती अतिशय व्यथित झाली आहे. ती लहान होती तेव्हा मी तिला कडेवर घेतले आहे. आता ती मोठी मुलगी झाली आहे. ती चोहोकडे एकटीच जाते. मी मुसलमानांकरिता इतके काही करतो आहे तर ते माझ्याकरिता काय करू शकतात असे केवळ पाकिस्तामधील मुसलमानच नाही तर तेथील सरकारी अधिकारीसुद्धा विचारतात असे ती म्हणते. यामुळे मला बरे वाटते. माझा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचला की नाही हे मला माहीत नाही. उद्यापर्यंत तो त्यांच्यापर्यंत नक्की पोहोचेल. त्यांनी काहीही विचारण्याचे कारण नाही असे यावर माझे उत्तर आहे. हा यज्ञ जरी दिल्लीत सुरू असला तरी तो संपूर्ण देशाकरिता आहे.

हे उपोषण आत्मशुद्धीकरिता आहे. आज जिथे सैतानाला सिंहासनाधिष्ठित केले आहे तिथे तुम्ही ईश्वराला सिंहासनाधिष्ठित केले पाहिजे. त्याचे काही चिन्ह दिसले पाहिजे. प्रत्येकजण उपोषण करू शकत नाही. असे करण्याचा अधिकार मला मिळाला ही माझ्याकरिता अभिमानाची गोष्ट आहे. हिंदू म्हणतात, 'मुसलमानांना मारा', मुसलमान म्हणतात, 'हिंदूंना मारा', शीख म्हणतात, 'मुसलमानांना मारा'. हिंदू, मुसलमान आणि शीख अशा प्रकारे भांडतील तर त्यामुळे कोणाचाही फायदा होणार नाही. तुम्हाला जर या यज्ञात सहभागी व्हावयाचे असेल तर तुम्ही भाऊभाऊ व्हायला पाहिजे आणि तुमच्या अंतःकरणात द्वेषाऐवजी प्रेमाची भावना असली पाहिजे.

आम्ही दारूला स्पर्श करणार नाही, अफूला स्पर्श करणार नाही अशी हिंदू, मुसलमान आणि शिखांनी शपथ घेतली पाहिजे. व्यभिचारी स्त्री-पुरुषांशी त्यांचे काहीही देणेघेणे नसले पाहिजे. प्रत्येकजण स्त्रियांकडे वयानुरूप आई, बहीण वा मुलगी म्हणून पाहील. प्रत्येकाने आत्मसंयम पाळला पाहिजे आणि अंतरबाह्य स्वच्छ व्हायला पाहिजे. ते जर हे सर्व करतील तर आणि तरीही मी पाकिस्तानला पापीस्तान समजत असेन तर मला पश्चात्ताप करावा लागेल आणि पाकिस्तान पापीस्तान

नाही तर पाकिस्तान आहे, पवित्र भूमी आहे असे मला म्हणावे लागेल. परंतु याकरिता केवळ शब्द नको, कृती पाहिजे. पाकिस्तानच्या मुसलमानांमध्ये परिवर्तन घडून आले तर त्याचा परिणाम भारतावर होणे अपरिहार्य आहे. पाकिस्तानने हिंदूंच्या विरोधात अपराध केलेला आहे हा माझा दृष्टिकोन मी कधीही लपवून ठेवलेला नाही.

कराचीत काय घडले? निष्पाप शिखांचा खून करण्यात आला आणि त्यांची संपत्ती लुटण्यात आली. आता मला कळले आहे की हीच गोष्ट गुजरातमध्येही घडली. (जानेवारी १३ला निर्वासितांना घेऊन जाणारी आगगाडी बन्नूहून जात होती. तिच्यावर पश्चिम पंजाबमधील गुजरात स्थानकावर टोळीवाल्यांनी हल्ला केला. जम्मूमध्ये जात असताना ते तिथे गोळा झाले होते. त्यांच्या संरक्षणासाठी पाठवण्यात आलेल्या तुकडीने जोरदार प्रतिकार केल्यानंतरही शेकडो निर्वासित मारले गेले. वा त्यांना अपंग करण्यात आले व स्त्रिया आणि मुलींचे त्यांनी अपहरण केले.) बन्नू वा अजून कुठून तरी तरी त्यांचा तांडा येत होता. सर्व निर्वासित आपला जीव वाचवण्याकरिता पळत होते.त्यांना रस्त्यातच पकडण्यात आले व कत्तल करण्यात आली. या दुःखद गोष्टीत मला फार खोलवर शिरायचे नाही. मुसलमानांना मी विचारू इच्छितो की तुमच्या नावावर पाकिस्तानमध्ये जर अशा गोष्टी घडत असतील तर भारतातील लोक त्या किती काळ सहन करतील? माझ्यासारखे शेकडो लोक जरी उपवास करतील तरी नंतर होणाऱ्या शोकांतिकेला ते टाळू शकणार नाहीत. तुम्ही सर्वांनी चांगले व्हायला पाहिजे. तुम्ही मुसलमान असा की टोळीवाले असा, आम्हाला हिंदू आणि शीख परत हवे आहेत असे तुम्ही सर्वांनी म्हणायला पाहिजे. कवी म्हणतात, "तुम्हाला जर स्वर्ग पाहायचा असेल तर तो इथे आहे, इथे आहे, इथे आहे." त्यांनी हे बागेसंबंधी म्हटले आहे. मी जेव्हा लहान मुलगा होतो तेव्हा अनेक वर्षांपूर्वी मी हे वाचले आहे. परंतु स्वर्ग असा सहजासहजी मिळत नसतो. हिंदु, मुसलमान, शीख इत्यादी सर्व चांगले झाले, भाऊभाऊ झाले तर मग या कवितेच्या ओळी प्रत्येकाच्या दारावर कोरल्या जाऊ शकतात. परंतु हे तेव्हाच होईल जेव्हा पाकिस्तान पवित्र होईल. परंतु तुम्ही एक गोष्ट म्हणत असाल आणि दुसरी करत असाल तर ते ठिकाण दुसरा नरक होईल. तुमची अंतःकरणे शुद्ध करा आणि तिथे ईश्वराची स्थापना करा. हे जर पाकिस्तानमध्ये घडले तर भारतातील आम्ही लोक तुमच्यामागे राहणार नाही. तुमची अंतःकरणे जर एक असतील तर भौगोलिक दृष्टीने देशाची जरी फाळणी झालेली असली तरी त्यामुळे काही फरक पडत नाही. जगात वेगवेळी सरकारे आहेत. सरकार ५० असले, पाचशे असले तर त्याचे काय? मी तर म्हणेन की भारतात सात लाख खेडी आहेत तर सात लाख सरकार आहेत असे समजा. प्रत्येकाचे जर वेगळे सरकार असेल तर ते चांगलेच होईल.

मला म्हणतात की - (बोलता बोलता पाण्याचा घोट घेतात) - हा वेडा आहे, लहानसहान गोष्टीवर उपवास करायची याला सवय आहे. परंतु मी काय करू? लहानपणापासून मी असाच घडलो आहे. मी जेव्हा लहान होतो तेव्हा वर्तमानपत्रसुद्धा वाचत नव्हतो. अगदी खरे सांगतो की वर्तमानपत्रसुद्धा वाचत नव्हतो. इंग्रजी मी मोठ्या मुश्किलीने वाचू शकत होतो. गुजरातीही येत नव्हती. मग मी वर्तमानपत्र कसा वाचणार होतो? तेव्हापासून मला वाटत आले की भारतात - केवळ राजकोटमध्ये नाही - हिंदू, शीख, पारसी, मुसलमान, ख्रिश्चन हे सर्व एक होऊन राहतील तरच आपण सर्व इथे आरामात राहू शकतो. माझे असे स्वप्न होते. आता मी म्हातारा झालो असताना आणि मृत्यूच्या उंबरठ्यावर असताना जर माझे हे स्वप्न प्रत्यक्षात आले तर माझे हृदय आनंदाने नाचू लागेल. कोणतीही भांडणे आता शिल्लक नाहीत हे पाहून मुले आनंदाने नाचूबागडू लागतील. तुम्ही सर्वांनी या कामात मला मदत करावी अशी माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे. आपण सर्वांनी जर आपापल्या धर्माचे पालन केले आणि चांगले झालो तर सर्व धर्मांमध्ये सुसंवाद निर्माण होऊ शकतो. माणूस शीख आहे की पठाण याची आपल्याला भीती वाटायला नको. आपण ईश्वराला घाबरायला पाहिजे. हेच पाहण्याची माझी इच्छा आहे.

तुम्ही सर्व असे होण्याकरिता प्रयत्न करू शकता आणि होऊ शकता. अखेरीस समाज म्हणजे काय? समाज हा व्यक्तींनी बनलेला असतो. आपण समाज घडवतो. आपण झोपा काढतो आणि मग आपण तक्रार करतो की समाज असा आहे म्हणून आम्ही असाहाय आहो. हीच गोष्ट सरकारलाही लागू आहे. सरकार आपण आहो, दुसरा कोणीही नाही. एक माणूस जर पुढाकार घेईल तर दुसरा त्याचे अनुसरण करील आणि एकाचे अनेक होतील. जर एकही नसेल तर शून्य असेल.

उद्या मी इथे येऊ शकेन याची मला खात्री नाही. परंतु प्रार्थना होईल व मुली भजन म्हणतील.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३००-४

८०. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १५, १९४८

(अंथरुणात पडल्यापडल्या गांधीजी पहिले दोन परिच्छेद हिंदीत म्हणाले होते. उरलेल्या भाषणाचा मजकूर गांधीजींनी प्यारेलालना लिहून घेण्याकरिता सांगितला होता. प्रार्थना सभेत सुशिला नाय्यर यांनी हिंदी भाषण वाचून दाखवले होते. हिंदुस्तान टाईम्समधील भाषणाच्या वृत्तांताचा प्रार्थना प्रवचनमधील मजकूराशी मेळ घालण्यात आला आहे.)

नवी दिल्ली,
जानेवारी १५, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझ्याकरिता हा एक नवीन अनुभव आहे. अशा प्रकारे लोकांपर्यंत माझे शब्द पोहचवण्याची कधी वेळ आली नव्हती, आणि ती यावी अशी माझी इच्छाही नव्हती. मी प्रार्थना करायच्या मैदानापर्यंत पोहोचू शकत नव्हतो आणि येथून माझा आवाज तुमच्यापर्यंत पोहोचू शकत नव्हता. असे असतानाही माझा आवाज जर तुमच्यापर्यंत पोहोचू शकला तर तुमचे समाधान होईल असे मला वाटले. मला जे म्हणायचे आहे त्याचा मजकूर मी आधीच लिहवून घेतला आहे. ही अवस्था किती दिवस राहील हे मला माहीत नाही. (गांधीजींची प्रकृती तपासणाऱ्या डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीविषयीचे ४.३० वाजता पुढील पत्रक काढले - "गांधीजींच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. स्वाभाविकपणेच त्यांचे वजन कमी होत आहे. अशक्तपणा भरपूर वाढला आहे. आज त्यांना स्नानगृहातून खुर्चीत बसवून आणावे लागले. त्यांचा आवाज क्षीण झाला आहे. लघ्वीत ॲसिटोन आढळून आले....")

तुम्हा लोकांना माझी इतकीच विनंती आहे की इतर लोक काय करतात हे न पाहता स्वतःमध्ये जितकी शुद्धी करता येईल तितकी करावी. माझी खात्री आहे की जनता जितक्या जास्त प्रमाणात आत्मशुद्धी करील तितकेच तुमचे आणि माझेही हित होईल. त्यामुळे भारताचेही हित होईल आणि हा उपवासही मी शक्य तितक्या लवकर सोडू शकेन. माझी काळजी कोणीही करू नये. प्रत्येकाने आपली काळजी घ्यावी. देशाच्या प्रगतीचा आणि तुमच्या कल्याणाचा विचार तुम्ही केला पाहिजे. अखेरीस आपणा सर्वांना मरायचेच आहे. जो कोणी जन्माला आला त्याची मृत्यूपासून सुटका नाही. मग आपण मृत्यूला का घाबरावे वा तो आल्याबद्दल दुःख का करावे? माझे मत आहे की मृत्यू हा आपला मित्र आहे आणि तो आपल्या नशिबी आलेल्या विविध व्याधी दूर करत असल्यामुळे आपण त्याचे कृतज्ञ असायला पाहिजे.

वर्तमानपत्रवाल्यांना काही शंका असल्यामुळे त्यांचे निरसन करून घेण्याकरिता काल सायंकाळच्या प्रार्थना प्रवचनानंतर दोन तासांनी वर्तमानपत्रवाल्यांनी मला भेटण्याची इच्छा व्यक्त करणारा निरोप पाठवला होता. परंतु मी दिवसभर काम केले होते. प्रार्थनेनंतरही कामात गुंतलेलो होतो यामुळे त्यांना भेटण्याची इच्छा नव्हती. यामुळे त्यांना जे काही विचारायचे असेल ते त्यांनी मला उद्या सकाळी ९ वाजल्यानंतर लिहून द्यावे असा निरोप देण्याकरिता मी प्यारेलालला सांगितले. त्यांनी असेच केले.

त्यांचा पहिला प्रश्न असा आहे -

प्रश्न - भारतीय संघराज्याच्या कोणत्याही भागात कोणत्याही प्रकारच्या दंगली सुरू नसतानाही तुम्ही उपोषणाला सुरुवात केली.

मुसलमानांच्या घरांचा बळजबरीने ताबा घेण्याचा लोकांनी निर्धाराने संघटित प्रयत्न करावा ही दंगल नाही तर अजून काय आहे? (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी ४, १९४८)

या दंगलीचे प्रमाण इतके मोठे होते की अखेरीस सैन्याला नाईलाजाने अश्रुधुराचा वापर करावा लागला आणि जमावाला पांगवण्याकरिता हवेत का होईना थोडासा गोळीबार करावा लागला.

शेवटचा मुसलमान मुंबईतून घालवून लावेपर्यंत जर मी वाट पाहिली असती तर तो मूर्खपणा झाला असता. दिसून न पडणाऱ्या मारण्याच्या अशा पद्धतीला मी छळ करून करून मारणे म्हणतो.

प्रश्न - ***तुम्ही म्हणाला होता की जे मुसलमान बांधव आपल्या भीतीची आणि असुरक्षिततेची भावना व्यक्त करायला तुमच्याजवळ आले होते. त्यांना तुम्ही उत्तर देण्याकरिता असमर्थ होता. तसेच गृहमंत्री सरदार पटेलांबद्दलही. ते मुसलमानविरोधक आहेत अशीही मुसलमानांची तक्रार होती. त्यावर सरदार पूर्वीप्रमाणे आता माझे होयबा राहिले नाहीत असे तुम्ही म्हणाला होता.*** (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी१३, १९४८)

यामुळे सरदार पटेल यांचे हृयपरिवर्तन घडवून आणणे व गृहमंत्रालयाच्या धोरणाचा निषेध करणे आहे हा या उपोषणामागील प्रमुख हेतू आहे असा समज होतो. याबद्दल आपण आपली भूमिका स्पष्ट केली तर मदत होईल.

मला वाटते की मी या गोष्टीचे स्पष्ट उत्तर दिले आहे. मी जो अर्थ लावला आहे तोच त्याचा अर्थ होतो आणि जो अर्थ लावण्यात आला आहे तो तर माझ्या कल्पनेतही आला नव्हता. मला जर वाटले असते की माझ्या वक्तव्याचा असाही अर्थ लावला जाऊ शकतो तर संशय दूर करण्याकरिता ते विधान मी अजून स्पष्ट केले असते.

अनेक मुसलमान बांधवांनी सरदारच्या तथाकथित मुसलमानविरोधी वृत्तीबद्दल तक्रार केली आहे. ते ऐकत असताना मला दुःख दाबून ठेवावे लागत होते परंतु कोणतेही प्रत्युत्तर न देता मी त्यांचे म्हणणे ऐकून घेत असे. या उपोषणामुळे मी स्वतःवर घातलेल्या निर्बंधातून मोकळा झालो. यामुळे मी टीकाकारांना सांगितले की मला आणि पंडित नेहरूंना हरभऱ्याच्या झाडावर चढवण्याचा व आमच्यापासून सरदार पटेलना दूर करण्याचा तुम्ही जो प्रयत्न करत आहा तो चुकीचा आहे. या एकटे पाडण्याच्या प्रयत्नाने तुमचा काहीही लाभ होणार नाही.

सरदारच्या बोलण्यात रोखठोकपणा आहे. त्यांचे हृदय जरी सर्वांना सामावून घेण्याइतके विशाल असले तरी यामुळे अनेकदा हेतू नसतानाही लोक दुखावले जातात. यामुळे जीवनभाराच्या आपल्या सहकाऱ्यावर होणाऱ्या एका अशोभनीय आरोपातून त्याला मुक्त करावे असा मी विचार केला. (आपली व्यथा व्यक्त करत वल्लभभाई पटेल यांनी १३ जानेवारीला गांधीजींना लिहिले, "...तुम्हाला वारंवार माझ्या बाजूने भांडावे लागते. ही गोष्ट... मला असह्य होते." परत १६ जानेवारीला ते मुंबईत म्हणाले की "काही मुसलमान गांधीजींकडे गेले आणि माझ्या लखनौ येथील भाषणाबद्दल तक्रार केली आणि गांधीजींना माझी बाजू घेणे भाग पडले. यामुळेसुद्धा मला दुःख झाले. अखेरीस इतरांना माझी बाजू घ्यावी लागावी इतका काही मी दुबळा माणूस नाही.")

सरदारांना मी माझा "होयबा" समजतो असे ऐकणारांना वाटेल की काय अशीही भीती मला वाटत होती. सरदारांना प्रेमाने माझा "होयबा" म्हटले जात असे. यामुळे त्यांची तारीफ करताना मी म्हणालो की ते इतके शक्तिशाली आहेत आणि करारी आहेत की ते कोणाचेही "होयबा" होऊच शकत नाही.

ते जेव्हा माझे होयबा होते तेव्हा मी जे काही म्हणत असे ते सगळे त्यांच्या गळी एकदम उतरायचे आणि म्हणून ते तसे म्हणू देत असत. ते त्यांच्या क्षेत्रात फार मोठे आहेत. अहमदाबाद नगरपालिकेचा कारभार चालवताना त्यांनी फार कार्यक्षमता दाखवली होती. परंतु ते इतके नम्र होते की त्यांनी आपले राजकीय शिक्षण माझ्याअंतर्गत घ्यायला सुरुवात केली. त्यांनी याचे कारण मला सांगितले होते. मी जेव्हा भारतात आलो होतो तेव्हा इथे ज्या प्रकारे राजकारण चालत होते त्यात भाग घेण्याची त्यांना इच्छा होत नसे. परंतु आता सत्ता त्यांच्या गळ्यात येऊन पडल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की ज्या अहिंसेनुरूप आपण यशस्वीपणे काम करत होतो तिने आता काम करता येऊ शकत नाही.

माझ्या लक्षात आले की मी आणि माझे सहकारी ज्या अहिंसेनुसार काम करत होतो ती खरी अहिंसाच नव्हती. ती नकली गोष्ट होती आणि तिचे नाव आहे निष्क्रिय प्रतिरोध. निष्क्रिय प्रतिकार राज्यकर्त्याच्या काय उपयोगाचा? थोडा विचार तर करा एक दुबळा माणूस जनतेचा प्रतिनिधी झाला

तर तो आपल्या मालकाची हास्यास्पद अवस्थाच करील आणि त्यांची कोणतीही प्रतिष्ठा राहणार नाही. सरदारांवर एखादी जबाबदारी सोपवली तर तिच्यावर कधीही अन्याय होऊ देणार नाही हे मला माहीत आहे. ते त्या जबाबदारीची किंमत कधीही कमी होऊ देणार नाही.

हे सर्व ऐकल्यानंतर माझे वक्तव्य गृहविभागाची निंदा करण्याकरिता होते असे कोणीही म्हणणार नाही असे मला वाटते. जर कोणी असा विचार करत असेल तर तो स्वतःचेच अधःपतन करील व स्वतःचीच हानी करून घेईल असे मी समजेन. माझे वा सरदारांचे त्यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही. मी आधीच ठामपणे सांगितले नव्हते काय की कोणतीही बाह्य शक्ती माणसाचे अधःपतन घडवून आणू शकत नसते? माणूस स्वतःच स्वतःला अधःपतीत करत असतो. मला माहीत आहे की माझ्या उत्तराशी या वाक्याचा काहीही संबंध नाही. परंतु हे असे एक सत्य आहे की जे केव्हाही उद्धृत करता येऊ शकते.

मी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की माझा उपवास संघराज्यातील अल्पसंख्याक मुसलमानांकरिता आहे. आणि यामुळे तो निश्चितपणे संघराज्यातील हिंदू आणि शिखांच्या विरोधात आहे आणि पाकिस्तानमधील मुसलमानांच्या विरोधात आहे. तसेच ज्याप्रमाणे संघराज्यातील अल्पसंख्याकांच्या बाजूने आहे तसेच तो पाकिस्तानमधील अल्पसंख्याकांच्या बाजूने आहे. अशाप्रकारे हा उपवास पाकिस्तानच्या जनतेकरिताही आहे. जो विचार मी आधीच समजावून सांगितला होता त्याचीच पुनरावृत्ती करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. माझ्यासारख्या अपूर्ण आणि दुर्बल माणसाच्या उपोषणामुळे दोन्ही उपनिवेशातील जनतेला वाचवता येऊ शकेल. हे उपोषण सर्वांच्या आत्मशुद्धीकरिता आहे. त्याच्या पावित्र्याबद्दल कोणीही शंका घेण्याचे कारण नाही.

प्रश्न - ***संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीची सभा सुरू होत असताना*** (युनोमधील भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेते गोपालस्वामी अय्यंगार यांनी जानेवारी १५, १९४८ला काश्मीरच्या प्रकरणावर आपली बाजू मांडून सुरक्षासमितीत या वादविवादाची सुरुवात केली.) ***आणि कराची व गुजरातमधील कत्तलीनंतर तुम्ही हे उपोषण सुरू केले आहे. विदेशी वृत्तपत्रसृष्टीत याला किती प्रसिद्धी मिळाली हे माहीत नाही. परंतु तुमच्या उपोषणामुळे हे सर्व विषय मागे पडले आहेत. पाकिस्तानचे प्रतिनिधी याचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतील हे त्यांच्या मागील वर्तनावरून आपल्याला कळू शकते. ते म्हणू शकतील की भारतातील तुमच्या हिंदू अनुयायांना, ज्यांनी तेथील मुसलमानांना जगणे कठीण केलेले आहे, ज्या वेडाने झपाटलेले आहे ते दूर व्हावे म्हणून महात्म्याने हा उपवास सुरू केला आहे.***

जगात चोहोकडे सत्य पोहोचण्याकरिता वेळ लागत असतो. परंतु मध्यंतरीच्या काळात तुमच्या उपोषणाचा संयुक्त राष्ट्रसंघावर चुकीचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

गां. - या प्रश्नाचे सविस्तर उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

जगातील देश आणि जनता यांच्याबद्दल मला जी काही माहिती आहे त्यावरून मी सांगायचे साहस करू शकतो की या उपवासाचा चांगलाच परिणाम झाला आहे. बाहेरचे जे लोक भारतातील घटनाक्रमाकडे निष्पक्षपणे पाहू शकतात ते माझ्या उपोषणाचा चुकीचा अर्थ लावू शकणार नाही. हे उपोषण संघराज्यातील आणि पाकिस्तामधील लोकांचे वेड दूर करण्याकरिता आहे.

पाकिस्तानमधील बहुसंख्य मुसलमान सरळ चालणार नाहीत, तेथील स्त्री-पुरुष सौजन्यशील होणार नाहीत तर संघराज्यातील मुसलमानांना वाचवता येऊ शकणार नाही. परंतु मृदुलाबेनच्या कालच्या प्रश्नावरून असे वाटते की पाकिस्तानच्या मुसलमानांचे डोळे उघडले आहेत व आपले कर्तव्य काय आहे ते त्यांना कळू लागले आहे. हे पाहून मला आनंद होतो.

संयुक्त राष्ट्रसंघाला माहीत आहे की माझ्या उपोषणामुळे त्यांना निर्णय घेणे सोपे होईल व ते पाकिस्तान आणि संघराज्याला योग्य मार्गदर्शन करू शकतील. (लोकांच्या मागणीमुळे गांधीजींचे अंथरूण ओसरीत ठेवण्यात आले आणि स्त्री-पुरुष त्यांच्या जवळून जात असताना गांधीजी त्यांना हात जोडून नमस्कार करत होते.)

द हिंदुस्तान टाईम्स, जानेवारी १६, १९४८, हरिजन जानेवारी २५, १९४८ आणि प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३०४-९

८१. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १६, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी १६, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज तुमच्याशी बोलता येईल अशी मला आशा नव्हती. परंतु ईश्वर कृपेने आज कालपेक्षा माझ्या आवाजातील जोम वाढला आहे. उपवासाच्या चौथ्या दिवशी आज मला जितकी शक्ती वाटते आहे तितकी माझ्या मागच्या कोणत्याही उपवासात मला वाटली नव्हती. आत्मशुद्धीचा यज्ञ तुम्ही करत राहाल तर तुम्हाला संबोधण्याची माझ्यातील शक्ती शेवटपर्यंत कायम राहील अशी मला आशा आहे. मी तुम्हाला सांगतो की मला मुळीच घाई नाही. घाई केल्यामुळे आपल्याला कामाला मदत होणार नाही. मला अवर्णनीय शांतता जाणवते आहे. कोणीही थोडेसे काही तरी करावे आणि सर्व काही ठीकठाक आहे असे मला सांगावे अशी माझी इच्छा नाही. जेव्हा दिल्लीत परिपूर्ण शांतता स्थापित होईल तेव्हा संपूर्ण भारतातही शांतता स्थापित होईल. माझ्या चोहोकडे शांतता पसरणार नसेल म्हणजे भारत आणि पाकिस्तानमध्येही शांतता स्थापित होणार नसेल तर मला जिवंत राहण्याची इच्छा नाही. या यज्ञाचा अर्थ हा असा आहे. (अंथरुणात पडल्या पडल्या गांधीजी हे हिंदीत बोलले. यानंतरचा मजकूर गांधीजींनी इंग्रजीत सांगितला होता व त्याचे भाषांतर सभेत वाचून दाखवण्यात आले. हरिजनमधील वृत्तांताचा प्रार्थना प्रवचनमधील मजकूराशी मेळ घालण्यात आला आहे.)

कोणत्याही जबाबदार सरकारकरिता आधी घेतलेला निर्णय बदलवणे इतके सोपे नसते. (सरकारच्या आधीच्या भूमिकेप्रमाणे पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याविषयी वल्लभभाई पटेल यांनी जी घोषणा केली होती तिच्याकरिता पाहा परिशिष्ट शासकीय परिपत्रक, जानेवारी १६, १९४८). याकरिता काश्मीरपासून तर कन्याकुमारीपर्यंतच्या आणि कराचीपासून तर आसामच्या सीमेपर्यंतच्या संपूर्ण देशाने सरकारला अंतःकरणापासून धन्यवाद दिले पाहिजे. आणि जगातील सर्व लोक म्हणतील की असे काम आपल्या सरकारसारख्या मोठ्या मनाचे सरकारच करू शकते.

मुसलमानांची खुशामत करण्याचे हे धोरण नाही. तुम्हाला आवडेल तर तुम्ही म्हणू शकता की हे धोरण आत्मसमाधानाचे आहे. विशाल बहुमताचे प्रतिनिधित्व करणारे कोणतेही सरकार अडाणी जनतेकडून टाळ्या मिळवण्याकरिता असे कृत्य करू शकत नाही. चोहोकडे वेड लागल्याचे वातावरण पसरलेले असताना धीर धरून आणि डोके शांत ठेवून जहाज चालवणाऱ्या मोठ्यात मोठ्या पुढाऱ्यांनी त्या जहाजाला वाचवण्याचा प्रयत्न करायला नको काय? असे करण्यामागील उद्दिष्ट कोणते? त्याला कारण माझे उपोषण होते. त्याने संपूर्ण दृष्टिकोन बदलला. या उपवासाशिवाय कायद्याच्या सीमेत जितके

शक्य होते तितकेच त्यांनी केले असते. परंतु भारत सरकारने उचलेले हे पाऊल मैत्री वाढवणारे आणि गोडवा निर्माण करणारे आहे. यामुळे पाकिस्तानचीही परीक्षा होईल. यामुळे केवळ काश्मीरचाच नाही तर भारत आणि पाकिस्तानमधील सर्व वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय व्हायला पाहिजे. आजच्या शत्रुत्वाची जागा मैत्रीने घेतली पाहिजे. समतेच्या मागणीला कायद्यातील अक्षरांपेक्षा जास्त महत्त्व मिळाले पाहिजे. इंग्रजीत एक घरगुती वाक्प्रचार आहे. तो अनेक शतकांपासून चालत आला आहे. जिथे सामान्य कायदा काम करू शकत नाही तिथे निष्पक्षपणा मदतीकरिता धावून येतो. कायद्याकरिता आणि निःपक्षपातीपणाकरिता तिथे वेगवेगळी न्यायालये होती. हे सर्व पाहता भारत सरकारने जे काही केले आहे ते सर्व प्रकारे योग्य आहे. उदाहरण घ्यायचे असेल तर मॅकडोनाल्ड निवाडा आपल्यासमोर आहे. (सांप्रदायिक निवाडा, हा ऑगस्ट ८, १९४८ला प्रकाशित झाला होता.) तो निवाडा केवळ काही केवळ मॅकडोनाल्डचा नव्हता तर संपूर्ण ब्रिटिश मंत्रिमंडळाचा आणि गोलमेज परिषदेच्या बहुतेक सदस्यांचा होता. परंतु तो निवाडा येरवडा तुरुंगात मी केलेल्या उपोषणामुळे बदलवण्यात आला. (पददलित वर्गांकरिता वेगळे मतदार संघ निर्माण करण्याच्या विरोधात गांधीजींनी सप्टेंबर १९३२ला उपोषण सुरू केले होते. पुणे करारानंतर सव्वीस सप्टेंबरला त्यांनी आपला उपवास सोडला होता.)

भारत सरकारने केलेल्या महान कृत्यामुळे मी उपवास सोडावा असे मला सांगण्यात येत असते. याकरिता मला स्वतःची समजूत घालता आली पाहिजे अशी माझीही इच्छा आहे. मला त्या डॉक्टर लोकांच्या काळजीची कल्पना आहे की जे बराच त्याग करून मला दररोज तपासतात आणि माझी काळजी घेत असतात. माझा उपवास जसजसा लांबत चालला आहे तसतशी त्यांची काळजी वाढत चालली आहे. हा उपवास जितका लांबत जाईल तितके माझे मुत्रपिंड चागले काम करू शकणार नाही आणि उपवासामुळे त्याच्यात निर्माण झालेला दोष कदाचित पुढे कधीही दुरुस्त होणार नाही अशी त्यांना भीती वाटते हे मला माहीत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील लोक कितीही सक्षम असले तर मी उपोषणाची सुरुवात त्यांना विचारून केली नव्हती. माझा एकमेव मार्गदर्शक, इतकेच नाही तर हुकुमशहा कधीही न चुकणारा सर्वशक्तिमान ईश्वर आहे. त्याला माझ्या या काटकुळ्या शरीराचा जर यापुढेही उपयोग असेल तर वैद्यकीय क्षेत्रातील लोकांनी केलेल्या भाकितानंतरही तो हा देह राखून ठेवील. मी त्याच्या हातात आहे. यामुळे मला मृत्यूची वा अपंग होऊन जगण्याची भीती का वाटत नाही यावर तुम्ही विश्वास ठेवाल अशी मला आशा आहे. परंतु मला वाटते की देशाला माझा काही उपयोग असेल तर डॉक्टरांच्या या सावधगिरीच्या सूचनेमुळे लोकांनी एक होऊन त्वरित कृती केली पाहिजे. इतक्या मेहनतीने स्वातंत्र्य मिळवल्यानंतर आपण शूर तर व्हायलाच पाहिजे. जे लोक शत्रू आहेत अशी शंका असते त्यांच्यावरही शूर लोक विश्वास ठेवतात. शूर लोकांना अविश्वासाची घृणा वाटत असते, तसे करणे त्यांना आपल्या प्रतिष्ठेविरुद्ध वाटत असते. भारत आणि पाकिस्तान यांच्या भागात दंगलीचा

आगडोंब जरी उसळला तरी दिल्लीतील हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यावर कोणताही परिणाम होणार नाही असे ऐक्य जर दिल्लीत निर्माण झाले व दिल्ली शांत राहिली तर माझी प्रतिज्ञा पूर्ण होईल. सुदैव हे आहे की भारत आणि पाकिस्तानमधील लोकांना आपोआप समंजसपणा आला आहे असे दिसते आणि आता दोन्ही उपनिवेशात अशी मैत्री झाली पाहिजे की कोणत्याही धर्माचे लोक दोन्ही उपनिवेशात कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरक्षितपणे येऊजाऊ शकले पाहिजे व राहू शकले पाहिजे. असे झाले तर हेच माझ्या उपवासाला सर्वात चांगले उत्तर राहील. यापेक्षा कमी आत्मशुद्धीची मागणी असू शकत नाही. जनतेच्या वतीने सरकारने उदार निर्णय घेतला आहे आणि याकरिता किती किंमत द्यावी लागेल याची सरकारने फिकीर केलेली नाही. भारताने उचललेल्या या मोठेपणाच्या पावलाचे पाकिस्तान कसे उत्तर देईल? (पाकिस्तानचे अर्थमंत्री गुलाम महम्मद भारत सरकारच्या निर्णयाची चर्चा करत म्हणाले की महात्मा गांधींच्या प्रयत्नांना यश आले आणि त्यांनी भारत सरकारला विचित्र परिस्थितीतून वाचवले याचा मला आनंद होतो.) दोन्ही उपनिवेशांनी दिल्लीवर फार ताण येऊ देणे योग्य नाही. अखेरीस दिल्लीचे लोक काही अतिमानव नाहीत. इच्छा असेल तर अनेक मार्ग आहेत. ती आहे काय? (गांधीजी अंरुणावर पडलेले होते व स्त्री-पुरुष रांगेत येऊन त्यांचे दर्शन घेत होते. गांधीजींचे मुत्रपिंड चांगल्या प्रकारे काम करत नव्हते. यामुळे अबुल कलाम आझाद यांनी पाणी मिसळून मोसंबीचा रस द्यायला सांगितले. गांधीजींनी लिंबाचे रस मिसळलेल्या पाण्याशिवाय इतर काहीही घेण्याला नकार दिला. ते म्हणाले की माझ्या शरीरात कोणता बिघाड झाला आहे हे मला माहीत आहे. त्याचे कराण रामनामातील माझ्या श्रद्धेतील उणीव आहे.)

हरिजन, जानेवारी २५, १९४८ आणि प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३०९-१२

८२. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १७, १९४८

(प्रार्थनेकरिता एक हजारहून जास्त लोक गोळा झाले होते. प्रार्थना प्रवचनच्या हिंदी मजकुराशी हरिजनमधील वृत्तांताशी मेळ घातला आहे.)

नवी दिल्ली,
जानेवारी १७, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

ईश्वराची कृपा आहे की उपोषणाच्या या पाचव्या दिवशीही थकवा न जाणवता मी दोन शब्द बोलू शकतो.(जानेवारी १७ १९४८ला आरोग्यविषयक जे परिपत्रक काढण्यात आले होते त्या लिहिले होते : "गांधीजींचा अशक्तपणा निश्चितच वाढला आहे आणि त्यांच्या डोक्यात भणभणू लागले आहे. त्यांचे मूत्रपिंड नीट काम करत नाही हे पाहता हे लक्षण चिंतनीय आहे. आमच्या मते हे उपोषण अजून पुढे सुरू राहू देणे मुळीच वांछनीय नाही. यामुळे हे उपोषण लवकरात लवकर संपेल अशी पावले उचलणे सर्व समुदायांकरिता आवश्यक आहे हे सांगणे आमचे कर्तव्य आहे.) आजचा संदेश मी लिहून काढला आहे आणि सुशीलाबेन तुम्हाला तो वाचून दाखवतील.

तुम्ही जे काही कराल त्यामागे पूर्णपणे तुमचे मन आणि हृदय असले पाहिजे, नाही तर त्यातून काहीही साध्य होणार नाही. कसेही करून मला जिवंत ठेवावे इतकाच जर तुम्ही विचार करणार असाल तर तुम्ही फार मोठी चूक कराल. मला जिवंत ठेवणे वा मारणे हे कोणत्याही मानवी हातात नाही. ते ईश्वराच्या हातात आहे. याबद्दल मला मुळीच शंका नाही आणि यामुळे इतरांनीही त्याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.

या उपोषणाचा अर्थ आमची हृदये शुद्ध करणे आहे आणि जागे होणे आहे. कृपा करून माझी कीव करू नका. मला शक्य होईल तितके दिवस मी उपवास करणार आहे आणि त्यानंतर मला मारायचे अशी जर ईश्वराची इच्छा असेल तर मी मरेन.

मला माहीत आहे की माझे अनेक मित्र दुःखी आहेत आणि मी हे उपोषण ताबडतोब थांबवावे अशी त्यांची इच्छा आहे. आज तसे करावे याकरिता कोणतेही कारण नाही. जेव्हा तसे कारण निर्माण होईल तेव्हा मी उपोषणाचा आग्रह धरणार नाही. आपल्या मर्यादा ओळखणे आणि त्याबद्दल अभिमान न बाळगणे ही अहिंसेची मागणी असते. अहिंसा नम्रतेची मागणी करत असते. मी जे काही म्हणतो त्यात अहंकार नाही. त्यात केवळ प्रेम आहे. (लाऊडस्पिकरमधून गांधीजी वरील हिंदीत बोलले.

यानंतरचा मजकूर गांधीजींनी इंग्रजीत सांगितला होता व त्याचे हिंदीतील भाषांतर सभेत वाचून दाखवण्यात आले होते.)

मी आधी काय सांगितले होते ते परत सांगतो - उपोषणाच्या दडपणाखाली काहीही करण्यात येऊ नये. ज्या गोष्टी उपोषणाच्या दडपणाखाली केल्या जातात त्या उपोषण संपल्यानंतर परत फिरवल्या जातात याचा अनुभव मी आधीही घेतला आहे. जर असे काही घडले तर त्याचे फारच भयंकर परिणाम होतील. असे काही व्हायला नको. आध्यात्मिक उपोषण अंतःकरणाच्या शुद्धीकरिता असते. प्रामाणिकपणे जर अंतःकरण शुद्ध करण्यात आले तर ज्या कारणाने ते शुद्ध करण्यात आले ते कारण संपल्यानंतरही ती शुद्धी नाहीशी होत नाही. एखादा जवळचा माणूस यायचा असला तर आपण जर घराला रंगरंगोटी केली तर तो माणून येऊन निघून गेल्यानंतरही ती रंगरंगोटी तशीच कायम राहत असते. भौतिक स्वच्छता केल्यानंतरही काही काळाने परत रंगरंगोटी करावी लागत असते. अंतःकरण स्वच्छ केले तर ते मात्र मरेपर्यंत तसेच राहते. याशिवाय उपोषणाकरिता दुसरे कोणतेही समर्थनीय कारण असू शकत नाही.

राजे, महाराजे, सामान्य लोक यांच्याकडून येणाऱ्या तारांची संख्या सारखी वाढत आहे. पाकिस्तानमधूनही तारा येत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. परंतु जे लोक पाकिस्तानमध्ये राहतात आणि जे पाकिस्तानचे भविष्य घडवणार आहेत त्यांना एक मित्र आणि शुभचिंतक म्हणून मी सांगतलेच पाहिजे की जोपर्यंत तुमची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होत नाही व तुम्ही जे अपराध केले त्याची कबुली देत नाही तोपर्यंत तुम्ही पाकिस्तानला नेहमीकरिता टिकवून ठेवू शकणार नाही.

याचा अर्थ असा नाही की हे दोन देश स्वतःहोऊन एक झाले तर ते मला नको आहे. परंतु शस्त्रबळाने पाकिस्तानला परत विलीन करून टाकावे या कल्पनेला माझा विरोध आहे आणि लोकांच्या मनातून मी ती काढून टाकू इच्छितो. मी आशा करतो की मृत्यूशैय्येवर पडून मी हे जे शब्द बोलतो आहे त्यामुळे कोणाचाही गैरसमज होणार नाही आणि ते कोणालाही खुपणार नाहीत. मी जर दुबळेपणाने वा लोकांचे अंतःकरण दुखवण्याच्या भीतीने माझ्या मनात खरोखर काय हे सांगू शकलो नाही तर मी माझी आणि पाकिस्तानच्या लोकांचीही प्रतारणा करीन ही गोष्ट सर्व पाकिस्तानी समजून घेतील अशी मी आशा करतो. माझ्या हिशेबात काही चूक होत असेल तर ती मला दाखवली पाहिजे आणि मला जर ती चूक आहे अशी खात्री पटली तर मी इथे जे म्हणालो ते मागे घेईन. माझ्या माहितीप्रमाणे अजून तरी या मुद्द्याबद्दलचा प्रश्न उपस्थित झालेला नाही.

माझे उपोषण कोणत्याही अर्थाने राजकीय आहे असे समजण्यात येऊ नये. आतील आवाजाच्या हाकेप्रमाणे कर्तव्य म्हणून हे उपोषण करण्यात आले आहे. अतिशय यातना सहन

केल्यानंतर मी उपोषण करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीचे मुसलमान बांधव याचे साक्षी आहेत. दैनंदिन हालचालीचा अहवाल देण्याकरिता त्यांचे प्रतिनिधी मला दररोज भेटत असतात. या पवित्र प्रसंगी राजे, महाराजे, हिंदू, शीख आणि इतर लोक माझी फसवणूक करून माझे उपोषण सोडवण्याकरिता प्रयत्न करतील तर ना तर ते स्वतःचे हित करू शकतील ना भारताचे. (दिल्लीत १७ जानेवरीला तीन लाख लोकांच्या सभेला संबोधित करत अबुल कलाम आझाद म्हणाले : "इथे येण्यापूर्वी मी गांधीजींकडे गेलो होतो आणि तुमचा उपवास सोडवण्याकरिता आम्ही काय केले पाहिजे असे मी त्यांना विचारले होते. त्यांनी मला सात कसोट्या सांगितल्या. त्यांची परिपूर्ती झाली तर उपोषण सोडण्याची त्यांची तयारी आहे. ते म्हणाले की या मुद्द्यांच्या परिपूर्तीसंबंधीच्या आश्वासनाची ग्वाही मला जबाबदार वयक्तींकडून मिळाली पाहिजे. ...कोणतेही खोटे आश्वासन देता येणार नाही." अटी खालीलप्रमाणे आहेत - (१) मुसलमानांना ख्वाजा कुतुबुद्दिन बख्तियारच्या मजारवर इबादत करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे आणि एका आठवड्यानंतर येणारा उर्स त्यांना साजरा करता आला पाहिजे. (२) शहरातील ज्या मशिदी मुसलमानेतरांनी ताब्यात घेतल्या व तिथे मुसलमानेतर राहू लागले आहेत वा ज्यांचे मंदिरात रूपांतर करण्यात आले आहे त्या लोकांनी स्वतःहोऊन त्या मशिदी रिकाम्या केल्या पाहिजे. (३) दंगली आधी मुसलमान जिथे राहत होते तिथे त्यांना मुक्तपणे हिंडताफिरता आले पाहिजे. (४) आगगाडीतून प्रवास करताना मुसलमानांना पूर्ण संरक्षण दिले पाहिजे. (५) मुसलमानांचा आर्थिक बहिष्कार करण्यात येऊ नये. (६) शहरातील ज्या भागात मुसलमान राहत होते त्या भागात मुसलमानेतारांना राहू देण्याचा प्रश्न मुसलमानांवर सोडून देण्यात यावा. (७) जे मुसलमान दिल्ली सोडून निघून गेले आहेत परंतु ज्यांना परतायची इच्छा आहे त्यांना तसे करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे.) त्यांना सांगा की आत्म्याकरिता उपोषण करताना मला जितके प्रसन्न वाटते तितके प्रसन्न मला कधीही वाटत नव्हते. या उपोषणामुळे नेहमीपेक्षा अधिक प्रसन्नता जाणवत असल्यामुळे त्यात कोणीही विघ्न आणण्याची आवश्यकता नाही. तुम्ही विचारपूर्वक सैतानाकडे पाठ फिरवली आहे आणि ईश्वराकडे जाऊ लागला आहात असे जर तुम्ही निश्चितपणे मला सांगू शकाल तर मात्र तुम्ही मला हा उपवास सोडायला लावू शकता. (गांधीजींच्या खोलीबाहेर जमावाने गर्दी केली होती परंतु गांधीजी अतिशय अशक्त असल्यामुळे लोकांना त्यांचे दर्शन होऊ शकले नाही. प्रार्थना संपल्याबरोबर दिल्लीवासीयांची एक मैल लांब मिरवणूक शांततेच्या घेषणा करत बिर्लाभवनमध्ये शिरली. जवाहरलाल नेहरू त्यांच्याशी दोन शब्द बोलले.)

द हिंदुस्तान टाईम्स, जानेवारी १८, १९४८, हरिजन, जानेवारी २५, १९४८ आणि प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ ३१२-३

८३. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १८, १९४८

जानेवारी १८, १९४८

(रिमझिम पाऊस पडत असूनही प्रार्थनेकरिता प्रचंड गर्दी झाली होती. गांधीजी अंथरुणावर पडून हिंदीत मायक्रोफोनमधू जवळपास २० मिनीट बोलले.

प्रार्थना प्रवचनच्या हिंदी मजकुराशी हरिजनमधील मजकुराशी मेळ घालण्यात आला आहे.)

नवी दिल्ली,

जानेवारी १८, १९४८

मी तुमच्याकरिता लहानसा संदेश लिहून घेतला आहे. तो तुम्हाला सुशीलाबेन वाचून दाखवतील.

हा माझ्याकरिता शुभ दिवस आहे आणि तुमच्याकरिताही असला पाहिजे. गुरू गोविंद सिंग यांची आज जयंतीसुद्धा आहे. याच दिवशी तुम्हा लोकांच्या कृपेने मी उपवास सोडत आहे. जी दया तुम्हा लोकांकडून - दिल्लीच्या लोकांकडून, दिल्लीत जे निर्वासित आहेत त्यांच्याकडून, येथील शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांकडून, मला मिळाली मला वाटते की मी ती जन्मभर विसरू शकणार नाही. कलकत्त्यातही मला हाच अनुभव आला होता. कलकत्त्यात शहीद साहेबांनी जे महान काम केले होते ते या वेळी मी कसा विसरू शकतो? (पाहा प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर १३, १९४७) ते तिथे नसते तर दीर्घ काळ मी टिकू शकलो नसतो. आपल्या मनात शहीद साहेबांबद्दल काही शंका होत्या व अजूनही आहेत. परंतु त्याचा इथे काही संबंध नाही. माणूस कितीही वाईट असला तरी आपण त्याला मित्राप्रमाणे वागवले पाहिजे आणि त्याच्याबरोबर काम केले पाहिजे हे आपण शिकायला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत कोणाशीही आपण शत्रुत्व करू नये, मैत्रीच केली पाहिजे. शहीद साहेबही आहेत आणि चार कोटी मुसलमानही आहेत. सर्व हिंदू आणि शीख देवदूत नाहीत त्याचप्रमाणे सर्व मुसलमानही देवदूत नाहीत. आपल्यामध्ये जशी चांगली माणसे आहेत तशीच त्यांच्यातही चांगली माणसे आहेत. वाईट माणसे मात्र कुठेही कमी असतात. आपल्या देशातसुद्धा ज्यांना गुन्हेगारी जमात म्हणतात त्या जमाती आहेत. आपल्यामध्ये आदिवासीसुद्धा आहेत. या सर्वांशी आपण सुसंवादाने राहिलो पाहिजे.

मुसलमानांचा समाज फार मोठा आहे. ते केवळ याच देशात नाहीत तर जगभर पसरलेले आहेत. आपल्याला जर सर्व जगाशी मैत्री करायची असेल तर इथे असलेल्या मुसलमानांशी आपले शत्रुत्व असायचे काहीही कारण नाही.

मी भविष्यवेत्ता नाही. तरीही ईश्वराने मला विवेक दिला आहे, अंतःकरण दिले आहे. त्या दोघांचा मी शोध घेतो आणि तुम्हाला भविष्य सांगतो. कोणत्या ना कोणत्या कारणामुळे आपण मुसलमानांशी जर मैत्री करू शकलो नाही आणि इथल्याच नाही तर पाकिस्तानमधील आणि सर्व जगातील मुसलमानांशी मैत्री करू शकलो नाही तर भारत आपला राहणार नाही, इतरांचा होईल, गुलाम होईल ही गोष्ट लक्षात ठेवा. आणि जे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले ते आपण गमावून बसू.

आज इतक्या लोकांनी आशीर्वाद दिला आहे. त्यांनी मला आश्वासन दिले आहे की यापुढे हिंदू, शीख, मुसलमान हे सर्व भावाभावासारखे राहतील आणि कितीही चिथावणी मिळाली तरी निर्वासितांसह दिल्लीत राहणारे लोक एकमेकांचे शत्रू होणार नाही. ही काही लहान गोष्ट नाही. याचा अर्थ यापुढे भारत आणि पाकिस्तानमधील लोक मित्र होतील याकरिता आपण प्रयत्न केले पाहिजे. आपल्या दुबळेपणामुळे जरी भारताची फाळणी झालेली असली तरी आपण आपली अंतःकरणे एक केली पाहिजे. माझे उपोषण सोडण्याचा जर हा अर्थ नसेल तर तुम्ही मला उपवास सोडायला लावला हे योग्य केले नाही, किंबहुना काहीच काम केले नाही असे मी अतिशय नम्रपणे म्हणेन. उपोषणाचा जो आत्मा आहे त्याचे चांगल्या प्रकारे पालन झाले पाहिजे. जे दिल्लीत घडते ते संपूर्ण भारतात होईल. आणि आणि जे भारतात होते ते पाकिस्तानमध्ये होईल. अंतर कसे राहील? याबद्दल मला काहीही शंका नाही. तुम्ही घाबरू नका. कोणीही घाबरू नये. एखाद्या मुलानेही घाबरू नये. आजपर्यंत आपण माझ्या मते सैतानाकडे चाललो होतो. आजपासून आपण ईश्वराकडे जाण्याची सुरुवात करू आणि त्याच्याकडून कधीही तोंड फिरवणार नाही अशी मी आशा करतो. असे झाले तर संपूर्ण भारत आणि पाकिस्तान मिळून जगाची सेवा करू शकतील आणि जग अधिक उदात्त होईल. इतर कोणत्याही कारणाकरिता मला जगण्याची इच्छा नाही. मानवतेचा दर्जा वाढावा म्हणूनच माणूस जगत असतो. माणसाचे एकमेव कर्तव्य ईश्वराकडे जाणे आहे. आपण त्याला कोणत्याही नावाने बोलावू शकतो. ईश्वर, खुदा, सतश्री अकाल. परंतु तो जर आपल्या हृदयात स्थापित झालेला नसेल तर हा सर्व भ्रम आहे. असे असेल तर त्याला विसरून आपण एकमेकांचे शत्रू का झालो पाहिजे?

मला फार लांब भाषण करायचे नाही. आम्ही कधीही भांडणार नाही अशी आज हिंदूंनी शपथ घ्यावी. हिंदू ज्याप्रमाणे भग्वद्गीता वाचतात त्याचप्रमाणे त्यांनी कुराणही वाचावा. शिखांनीसुद्धा असेच करावे. मुसलमान बंधूभगिनींनीसुद्धा कुराणाप्रमाणेच आपल्या घरात ग्रंथसाहेब ठेवावा व त्याच्या अर्थाचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करावा. ज्याप्रमाणे आपण आपल्या धर्माचा आदर करतो त्याचप्रमाणे आपण इतरांच्या धर्माचा आदर करावा. चांगली गोष्ट कोणत्याही भाषेत लिहिलेली असली तरी ती चांगलीच असते. गीता वा कुराणसाहेब हे धर्मग्रंथ माझ्याकरिता जसे आहेत तसेच कुराणही

आहे. तुम्ही विश्वास ठेवा अथवा ठेवू नका परंतु माझ्या जीवनाचे तत्त्व हेच आहे आणि त्याचेच मी अनुसरण करत आलो आहे. मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की मी दगडाची पूजा करत नसतो, परंतु मी सनातनी हिंदू आहे. जे दगडाची पूजा करतात त्यांचा मी द्वेष करत नाही. जो माणूस दगडाची पूजा करतो त्याला दगडात दगड दिसत नसतो तर ईश्वर दिसत असतो. तुम्हाला जर तसे दिसत नसेल तर कुराण ईश्वराने दिलेला धर्मग्रंथ आहे असे तुम्ही कसे म्हणू शकता? ही मूर्तीपूजा नाही काय? तुम्ही जर हे समजून घेतले तर हिंदू, मुसलमान, शीख हे सर्व भाऊ आहेत आणि त्यांनी सोबत राहिले पाहिजे हेही तुम्हाला कळेल. मग स्त्री-पुरुषांना चालत्या गाडीतून फेकून देणे अशा सारखी पशुत्वाची जी कृत्ये आज होत आहेत ती थांबतील. मग सर्व लोक कुठेही कोणाचीही भीती न बाळगता सुरक्षित राहू शकतील. पाकिस्तानमधून जे निर्वासित इथे आले आहेत ते जोपर्यंत आपल्या घरी परत जात नाहीत आणि ज्या मुसलमानांना आपण घालवून लावले आहे आणि ज्यांना परतायची इच्छा आहे ते जोपर्यंत परत येऊन शांततेत राहू शकत नाहीत तोपर्यंत मला कधीही शांतता मिळू शकणार नाही.

मला इतकेच सांगायचे होते. ईश्वर आपल्याला आणि जगातील सर्वांना सद्बुद्धी देवो. त्याने आपल्याला जागे करावे व आपल्याकडे ओढावे व सर्व जग सुखाने भरावे. (यानंतरचे डॉ. सुशिला नाय्यर यांनी वाचून दाखवले.)

मी हा उपवास सत्याच्या - म्हणजे ज्याचे परिचित नाव ईश्वर आहे - नावावर केला होता. जिवंत श्रद्धा नसेल तर ईश्वर कुठेही नसतो. ईश्वराच्या नावावर आपण खोटे बोलतो, समोरचा निरपराध आहे की अपराधी, स्त्री आहे की पुरुष, मूल आहे की शिशू याचा विचार न करता आपण लोकांची कत्तल करतो. आपण अपहरण, बळजबरीचे धर्मांतर वगैरे गोष्टी केल्या आहेत आणि त्याही निर्लज्जपणे. असे कोणी सत्याच्या नावावर केले असल्याचे मला माहीत नाही. याच सत्याचे नाव ओठांवर घेऊन मी उपोषण सोडले आहे. मला लोकांचे दुःख असह्य होते. हिंदू, शीख, मुसलमान, हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे प्रतिनिधी, पंजाब, सरहद्द प्रांत आणि सिंध येथील निर्वासितांचे प्रतिनिधी असे मिळून शंभरहून अधिक लोक राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी आणले होते. अशा प्रकारच्या सर्वांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांमध्ये पाकिस्तानचे उच्चायुक्त झहीद हुसेन, दिल्लीचे मुख्य आयुक्त आणि उपायुक्त, आझाद हिंद फौजेचे प्रतिनिधित्व करणारे जनरल शाह नवाझ खान, एखाद्या पुतळ्याप्रमाणे बसलेले पंडित नेहरू आणि अर्थातच मौलाना साहेब यांचाही समावेश होता. या लोकांनी सही केलेला दस्तावेज डॉ. राजेंद्रबाबूंनी हिंदुस्तानीत वाचून दाखवला आणि त्यांच्यावर अधिक ताण न टाकता मी उपवास सोडावा अशी त्यांनी विनंती केली. उपवास सोडण्याकरिता पाकिस्तान आणि संघराज्यातून तारावर तारा येत होत्या. या सर्व मित्रांचा सल्ला मी फेटाळू शकलो नाही. काहीही झाले तरी यापुढे

हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारसी आणि ज्यू या सर्व लोकांमध्ये मैत्री राहील या त्यांच्या शपथेवर मी अविश्वास करू शकत नव्हतो. ही मैत्री मोडणे म्हणजे देशाचे तुकडे करणे.

मी हे लिहीत असताना माझ्या आरोग्याकरिता आणि दीर्घायुष्याकरिता शुभेच्छा देणाऱ्या तारा सारख्या येत आहेत. मानवतेची सेवा करण्यायोग्य ईश्वराने मला आरोग्य आणि विवेक द्यावा अशी माझी किती इच्छा आहे! आज जी पवित्र शपथ घेण्यात आली आहे तिची जर परिपूर्ती झाली तर ईश्वराने मला संपूर्ण जीवन द्यावे व त्याद्वारे मला मानवतेची सेवा करता यावी अशी मी दुप्पट शक्तीने ईश्वराची प्रार्थना करीन हे मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो. विद्वान लोकांचे मत आहे की माणसाचे पूर्ण आयुष्य १२५ वर्ष आहे आणि काहींच्या मते ते १३३ वर्षांपर्यंत जाऊ शकते. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यासह दिल्लीच्या नागरिकांच्या शुभेच्छांमुळे माझ्या शपथेची परिपूर्ती होण्याकरिता जितका वेळ लागेल असा अंदाज होता त्यापेक्षाही ती लवकर झाली पूर्ण होत आहे. कालपासून हजारो निर्वासित आणि इतर लोक उपवास करत असल्याचे मला कळले तेव्हा दुसरा कोणताही परिणाम होणे शक्यच नव्हते. अंतःकरणापासून मैत्री करण्याचे लेखी आश्वासन देणाऱ्या हजारो लोकांकडून तारांचा पूर येतो आहे. संपूर्ण जगातून शुभेच्छांच्या तारा येत आहेत. माझ्या या कृतीत ईश्वराचा हात होता हे दाखवणारा अजून कोणता पुरावा पाहिजे? परंतु माझ्या शपथेच्या शब्दांच्या पलीकडेही तिचा आत्मा आहे आणि त्याची परिपूर्ती झाली नाही तर या शब्दांना काहीही अर्थ राहणार नाही. माझ्या प्रतिज्ञेचे उद्दिष्ट संघराज्य आणि पाकिस्तानमधील हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यात खरी मैत्री घडवून आणणे आहे. संघराज्यात जर असे झाले तर रात्रीनंतर दिवस येतो त्याप्रमाणे पाकिस्तानमध्येही असे झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु संघराज्यातील काळोखी रात्र जर संपली नाही तर पाकिस्तानमध्ये वेगळे काही घडेल अशी आशा करणे मूर्खपणा आहे. जर संघराज्यातील रात्रीचा काळोख पूर्णपणे गेला तर पाकिस्तानमध्येही असेच घडेल याबद्दल संशय घेण्याला जागा नाही. पाकिस्तानमधून मला किती तरी तारा आल्या आहेत आणि त्यातील एकाही तारेत याला विरोध करण्यात आलेला नाही. ज्याप्रमाणे मागील सहा दिवसात ईश्वराने आपल्याला मार्गदर्शन केल्याचे स्पष्ट दिसते त्याचप्रमाणे सत्यस्वरूपी ईश्वर आपल्याला मार्गदर्शन करत राहो.

हरिजन, जानेवारी २५, १९४८. आणि प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३१४-२०

८४. प्रार्थना प्रवचन, जानेवारी १९, १९४८

(गांधीजींनी खर्चीवर बसवून प्रार्थनेच्या मौदानात नेण्यात आले. हा मौनवार असल्यामुळे गांधीजींचे प्रवचन वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

जानेवारी १९, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

सगळ्या जगातील भारतीयांनी आणि इतर लोकांनी माझ्या प्रकृतीबद्दल काळजी करणाऱ्या आणि शुभेच्या पाठवणाऱ्या अनेक तारा पाठवल्या आहेत. याकरिता मी सर्व बंधू-भगिनींचे आभार मानतो. या तारांवरून मी उचललेले पाऊल बरोबर होते असे दिसून येते. ते पाऊल उचलण्याबद्दल मला किंचितही संशय नव्हता. ज्याप्रमाणे ईश्वर आहे आणि सत्यस्वरूपी आहे याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही त्याचप्रमाणे माझे उपोषण बरोबर होते याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नव्हती. आता अभिनंदनाच्या तारांची रीघ लागलेली आहे. काळजीचे ओझे उतरल्यामुळे लोक निवांतपणे श्वास घेऊ लागलेले आहेत. सगळ्या मित्रांना मी वेगवेगळी पोच देऊ शकत नाही याबद्दल मित्रांनी मला क्षमा करावी. असे करणे माझ्याकरिता अशक्य आहे. तारा पाठवणारे लोक व्यक्तिगत पोच मिळावी अशी अपेक्षाही करत नसतील अशी मला आशा आहे.

तारेच्या ढिगामधील दोन तारा देतो. एक पश्चिम पंजाबच्या मुख्यमंत्र्यांची आहे तर दुसरी भोपाळच्या नबाब साहेबांची आहे. या लोकांबद्दल लोकांच्या मनात आज फार अविश्वासाची भावना आहे. तार तुम्ही ऐकालच. तिच्याबद्दल मी कही सांगू इच्छित नाही. या तारेतून त्यांना त्यांच्या अंतःकरणातील खरी भावना व्यक्त करायची नसती तर त्यानी उपवासासारख्या गंभीर व पवित्र प्रसंगी मला अशा तारा पाठवण्याचा प्रयत्न का असता?

भोपाळचे नबाब साहेब लिहितात -

सर्व समुदायातील लोकांचे अंतःकरणापासू ऐक्य व्हावे असे जे तुम्ही आवाहन केले आहे त्याला हिदुस्तानच्या दोन्ही भागातील शांततापिय लोक निश्चितच प्रतिसाद देतील. याचप्रमाणे हिंदुस्तानच्या दोन्ही भागातील लोकांमध्ये मैत्री व्हावी अशी जी विनंती तुम्ही केली आहे तीही दोन्ही देशातील लोक ऐकतील. आमच्या संस्थानाला मागील वर्षी जेव्हा अडचणींना तोंड द्यावे लागले होते तेव्हा आम्ही सर्व संप्रदायाच्या लोकांमध्ये सामंजस्य, प्रेम आणि मनोमिलन घडवून आणूनच शांतता निर्माण करू शकलो होतो ही सुदैवाची गोष्ट आहे.

परिणामी या रियासतीत शांतता भंग व्हावी असा एकही प्रसंग घडला नाही. ही मैत्री आणि प्रेमभाव वाढावा म्हणून आम्ही सर्वशक्ती लावून प्रयत्न करू.

पश्चिम पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या तारेतील संपूर्ण मजकूर असा होता -

अेक उदात्त काम करण्याकरिता तुम्ही उचललेल्या पावलाबद्दल पश्चिम पंजाबचे मंत्रिमंडळ अंतःकरणापासून तुमची तारीफ करते. अल्पसंख्याकांचे जीवन, वित्त आणि अब्रू यांचे रक्षण करण्याकरिता व त्यांना नागरिकत्वाचे समान अधिकार देण्याकरिता पश्चिम पंजाबचे मंत्रिमंडळ सर्व काही करत आले आहे. हे मंत्रिमंडळ या धोरणाचा यापुढेही दुप्पट जोमाने अनुसरण करील असे मी तुम्हाला आश्वासन देतो. तुमचे उपोषण सुटण्याकरिता भारतातील परिस्थितीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी असे आम्हाला वाटते. तुमच्या सारख्याचे अमूल्य जीवन वाचवण्यासाठी या प्रांतातील आमच्या प्रयत्नात आम्ही काहीही कमी ठेवणार नाही.

आजकाल कोणताही विचार न करता लोक नक्कल करू लागतात. यामुळे मी सावधगिरीची सूचना देतो की कोणीही अशा प्रकारचे परिणाम इतक्या कमी वेळात साध्य करण्याकरिता उपवास करू नये. कोणी असा प्रयत्न केला तर त्याची घोर निराशा होईल आणि या अचूक आणि शाश्वत उपायाची बदनामी होईल. उपवासाच्या अटी कडक असतात. याकरिता दोन अटींच्या परिपूर्तीचा आवश्यकता असते - ईश्वरावरील जिवंत श्रद्धा नसेल अथवा हे काम करण्याकरिता अंतःकरणातून ईश्वराचा आवाज येत नसेल तर उपवास करणे व्यर्थ आहे. तिसरी अटही टाकण्याची इच्छा होते परंतु तिची आवश्यकता नाही. उपवासाचा उद्देश जेव्हा खरा असेल, योग्य असेल व योग्य वेळी उपवास केलेला असेल तेव्हाच ईश्वराचा आदेश मिळू शकतो. यावरून लक्षात येईल की त्याकरिता दीर्घ काळापासून तयारी करावी लागते. यामुळे कोणीही एकाएकी या उपायाचा अवलंब करू नये.

दिल्लीचे नागरिक आणि पाकिस्तानमधून आलेले निर्वासित यांच्यासमोर फार मोठे काम आहे. परस्परांबद्दल पूर्ण विश्वास बाळगून आपसात भेटीगाठी होतील अशा संधीच्या शोधात त्यांनी असायला पाहिजे.

काल अनेक मुसलमान भगिनींनी माझी भेट घेतल्यामुळे (पाहा मुसलमान स्त्रियांशी चर्चा, जानेवारी १८, १९४८) मला फार आनंद झाला. माझ्याबरोबर असलेल्या मुलींनी मला सांगितले की बिर्लाभवनमध्ये काही स्त्रिया बसलेल्या आहेत परंतु आत यावे की येऊ नये अशा संभ्रमात त्या आहेत. त्यांच्यातील बहुतेक स्त्रिया बुरख्यात होत्या. मी त्यांना आत बोलवायला सांगितले आणि त्या आल्या. तुम्ही तुमच्या वडिलांसमोर वा भावासमोर पडदा ठेवणार नाही मग त्यांच्यापेक्षा तुम्ही मला कमी का

समजता असे मी त्यांना विचारले. आणि एकाही अपवादाशिवाय सर्वांनी पडदा काढून टाकला. माझ्यासमोरून पडदा नाहीसा होण्याची ही काही पहिली वेळ नाही. खरे प्रेम, जसे की मी करतो, काय करू शकते याचे उदाहरण देण्याकरिता मी हे सांगितले.

हिंदू आणि शीख भगिनींनी मुसलमान भगिनींकडे जाऊन त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे. विशेष प्रसंगी आणि सणासारख्या प्रसंगी त्यांना आमंत्रित केले पाहिजे व आपणही त्यांच्याकडे जायला पाहिजे. मुसलमान मुलामुलींनी मुसलमानांकरिता असलेल्या शाळांमध्ये प्रवेश न घेता सार्वजनिक शाळेत प्रवेश घ्यावा म्हणून प्रयत्न केले पाहिजे. त्यांनी सोबत खेळात भाग घेतला पाहिजे. मुसलमानांचा बहिष्कार तर करायलाच नको उलट ते जो व्यवसाय आधी करत होते तो करण्याकरिता त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

मुसलमान कारागिरांना गमावल्यामुळे दिल्ली गरीब झाली आहे. मुसलमानांची भाकरी ज्या व्यवसायांवर अवलंबून आहे ते हिंदूंनी आणि शिखांनी हिरावून घेण्याची इच्छा ठेवणे हा कृपणपणा होईल. एकीकडे कोणत्याही वस्तूवर वा व्यवसायावर एकाधिकार नसावा तर दुसरीकडे कोणालाही त्याच्या व्यवसायातून बाहेर घालवण्याची इच्छा नसली पाहिजे. आपल्या या विशाल देशात प्रत्येकाला वाव आहे. ज्या शांतता समित्या (गांधीजींना दिलेल्या आश्वासनाची परिपूर्ती व्हावी म्हणून एक मध्यवर्ती शांतता समिती स्थापित करण्यात आली होती.) स्थापन करण्यात आल्या आहेत त्यांनी इतर अनेक समित्यांप्रमाणे निद्रावस्थेत जायला नको. अनेक देशांमध्ये बहुधा असेच होत असते. तुम्हा लोकांमध्ये मी जिवंत राहावे असे जर तुम्हाला वाटत असेल तर त्याकरिता सर्व लोकांनी परस्परांबरोबर शांततेने राहावे हीच अट आहे. असे बळजबरीने करण्यात येऊ नये तर प्रेमाने करण्यात यावे कारण परस्परांना बांधून ठेवणारे प्रेमासारखे दुसरे कोणतेही सिमेंट नाही.

हरिजन, जानेवारी २५, १९४८ आणि द हिंदुस्तान टाईम्स, जानेवारी २०, १९४८

८५. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २०, १९४७

(गांधीजींना खुर्चीवर बसवून प्रार्थना सभेत नेण्यात आले. मायक्रोन काम करत नव्हता आणि गांधीजींचा आवाज अतिशय क्षीण झालेला होता त्यामुळे या भाषणाच्या सारांश सुशीलाबेन यांनी मोठ्या आवाजात परत सांगितला.)

नवी दिल्ली, जानेवारी २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

पहिली गोष्ट ही आहे की ज्या लोकांनी दस्तावेजावर सह्या केल्या त्या लोकांनी ईश्वराला साक्षीदार ठेवून त्या केल्या आहेत. तरीही इथे जे काही घडले तो केवळ देखावा आहे अशी कुजबुज कलकत्त्यात सुरू आहे. दिल्लीतील लोक आणि इथे आलेले निर्वासित आपल्या भूमिकेवर ठाम असतील तर इतरत्र काहीही झाले तरी ते भारताला तसेच पाकिस्तानला वाचवू शकतील अशी माझी खात्री आहे. दिल्ली एक प्राचीन शहर आहे आणि दिल्लीत जे घडेल त्याचा प्रभाव संपूर्ण भारतावर आणि पाकिस्तानवर पडणे अपरिहार्य आहे.

मुंबईत सरदार काय म्हणाले हे माहीत असेल तर पंडित नेहरू आणि सरदार यांच्यात कोणतेही मतभेद नाहीत हे तुमच्या लक्षात येईल. ते वेगवेगळ्या पद्धतीने बोलत असतील परंतु ते एकच गोष्ट करत असतात. ते मुसलमानांचे शत्रू असू शकत नाहीत. जो मुसलमानांचा शत्रू असेल तो भारताचाही शत्रू असेल याबद्दल मला शंका नाही. यातील सत्य आपण समजून घेऊ या. जगात सर्व लोकांना याची झाणीव झालेली आहे. केवळ अमेरिकाच याला अपवाद असू शकेल. तिथे निग्रोंची जमावाद्वारे हत्या केली जाते. (लिंचिंग) तिथे असे भरपूर गोरे आहेत की ज्यांना यात घृणास्पद काहीही वाटत नाही. त्यांच्या अंतःकरणात लाज नावाची गोष्ट नाही. परंतु इतरत्र लोक ही गोष्ट चांगली समजत नाहीत. हे पाशवीपणाचे कृत्य आहे असे ते समजतात. आपल्या वृत्तपत्रांनीसुद्धा अमेरिकी लोकांच्या या कृत्याचे वर्णन रानटीपणाचे कृत्य म्हणून केले आहे. आपण चांगले लोक आहो आणि आपण अशी कृत्ये करू शकत नाही असे आपण गृहीत धरतो. आणि तरीही इथे काय होत आहे ते पाहा. यामुळे इथे वा अजून कुठे अन्याय झाला असेल तर त्याचा आपण स्वतःच बदला घेण्याचा प्रयत्न करणार नाही, ते काम आपण सरकारवर सोडू असे विशेष आश्वासन मला तुमच्याकडून हवे आहे असे माझे तुम्हाला सांगणे आहे. इतके जरी कबूल करण्यात आले तरी लोक मोकळेपणाने हिंडूफिरू शकतील. (या वेळी स्फोटाचा एक मोठा आवाज झाला. गांधीजी निश्चल राहिले. मनू गांधी स्पष्टपणे घाबरलेल्या दिसत होत्या. त्यामुळे गांधीजी त्यांना म्हणाले : "तू इतकी काय घाबरतेस? सैन्याचे काही लोक गोळीबार करण्याचे प्रशिक्षण नक्कीच घेत असतील. खरोखरच कोणी आपल्याला मारायला आला तर तू काय करशील? त्यांनी

लोकांना शांत करायचा प्रयत्न केला व ते शांत झाल्यानंतर गांधीजींनी आपल्या भाषणाला परत सुरुवात केली.

त्यानंतर कळले की गांधीजी जिथे बसले होते तिथून ७५ फूट अंतरावर एका बॉम्बचा स्फोट झाला होता व तो त्यांचा खून करण्याच्या प्रयत्नाच्या कटाचा भाग होता. स्फोट करून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा कट करणारांचा प्रयत्न होता. त्यांचा मूळ प्रयत्न व्यासपीठामागे नोकरांकरिता बांधलेल्या खोलीमधून गांधीजींवर हातबॉम्ब फेकण्याचा होता. परंतु शेवटच्या क्षणी ते घाबरले. त्यात त्यांना यश न आल्यामुळे कट करणारे जमावाच्या घोळक्यात मिसळले स्फोटानंतर दिगंबर बगडे हा व्यासपीठावर धावत जाऊन गांधीजींवर हातबॉम्ब फेकणार होता. परंतु तो शेवटच्या क्षणी घाबरला. कट करणांपैकी सहा लोकांना म्हणजे नाथुराम गोडसे, नारायण आपटे, विष्णू करकरे, गोपाळ गोडसे, दिगंबर बगडे आणि शंकर किस्तैय्या हे वाट पाहणाऱ्या टॅक्सीतून नसटले परंतु मदनलाल पहवा पकडला गेला.)

मी तुम्हाला सांगितलेच होते की मी पाकिस्तानमध्ये जाऊ शकेन. परंतु मी पाकिस्तानमध्ये तेव्हाच जाईन जेव्हा पाकिस्तान सरकार मला मुसलमानांचा आणि हिंदूंचा मित्र म्हणून बोलावील. डॉक्टरांचे अर्थातच म्हणणे आहे की उपवासाच्या परिणामापासून मी जोपर्यंत मी मुक्त होत नाही तोपर्यंत मी विश्रांती घेतली पाहिजे. त्याला १५ दिवस लागू शकतात. यामुळे येत्या १५ दिवसांत मी कुठेही जाऊ शकत नाही आणि द्रव पदार्थांशिवाय काही खाऊ शकत नाही. मी केवळ द्रव पदार्थांचा आहार घेऊ शकतो व तो दूध आणि फळांचा रसच असू शकतो. दुधावर अर्थातच माणूस आयुष्यभर राहू शकतो.

मी तुम्हाला सांगतो की पंडितजी असे गृहस्थ आहेत की ते निर्वासितांकरिता काहीही करतील. जर एकच कोरडे अंथरुण उपलब्ध असेल तर ते ते अंथरुण निर्वासिताला देतील आणि स्वतः जागे राहतील. ते म्हणतात की आता त्यांच्या घरात जागा नाही आणि तरीही लोक येतच आहेत. ते आपले प्रधानमंत्री आहेत. त्यांना भेटायला लोक येत असतात आणि त्यांतील काही इंग्रजही असतात. त्यांनी त्यांना परत जा असे सांगितले पाहिजे काय? तरीही ते म्हणतात की मी निर्वासितांकरिता एकदोन वा शक्य तितक्या खोल्या सोडीन. इतर मंत्री वा सैन्यातील अधिकारी त्यांचे उदाहरण गिरवतील तर कोणीही दुःखी राहणार नाही. मी जवाहरलालचे अभिनंदन करतो आणि तुम्हाला असा हिरा मिळाला म्हणून तुमचेही अभिनंदन करतो. बिर्लासारखे श्रीमंत लोकही या दिशेने काही करतील असे सांगतात. प्रधानमंत्रीच अशा प्रकारे काही करत असतील तर इतरांनी त्यांच्या पावलावर पाऊल का टाकू नये?

निर्वासितांचे दुःख दूर व्हावे म्हणून जोरात प्रयत्न सुरू आहेत. मुसलमानांना आपण शत्रू लेखू नये हे यावरून आपण शिकलो पाहिजे.

मला एक पत्र आले आहे. खरे म्हणजे माझा उपवास सुरू होता तेव्हा १६ तारखेला हे पत्र आले होते. लोकांमध्ये बदमाशही आहेत. त्यांना वाटले की व्यापार करावा. त्यांनी मोठ्यामोठ्या नकली नोटा तयार केल्या आणि गरिबांना विकू लागले. स्वस्तात मिळतात म्हणून गरीब बिचारे विकत घेऊन टाकतात. परंतु या नोटांची काही किंमत नसते. अखेरीस तर ते साधे कागदच असतात. अशा प्रकारे नकली नोटा करणारांना माझी हात जोडून विनंती आहे की त्यांनी असे काम करू नये. तुमची उपजिविका चालू शकेल असा सत्याचा मार्ग तुम्हाला मिळूच शकत नाही काय? याचबरोबर गरिबांनासुद्धा माझी सावधगिरीची सूचना आहे की त्यांनी अशा मोहाला बळी पडू नये. त्यांनी नेहमीकरिता इतके साधेभोळे राहू नये.

मला लाहोरहून एक पत्र आले आहे. ते बंधू काश्मीर फ्रिडम लीगचे अध्यक्ष आहेत. ते लिहितात-

तुम्ही जे काम करत आहा ते फार मोठे काम आहे परंतु जोपर्यंत काश्मीरची समस्या सुटत नाही, त्याचा निर्णय होत नाही तोपर्यंत त्यात तुम्हाला यश मिळू शकत नाही. याकरिता भारत सरकारने काश्मीरमध्ये जे सैन्य पाठवले आहे ते काढून घेतले पाहिजे कारण त्या सैन्यानेच काश्मीरवर हल्ला केला आहे. काश्मीर ज्याचे आहे त्याला देऊन टाका, असे कराल तेव्हाच निर्णय होईल.

या तारेने मला दुःख होते. काश्मीरबाबत तडजोड होत नसेल तर त्याचा अर्थ असा आहे काय की आजची अवस्था अशीच सुरू राहिली पाहिजे? काश्मीरकरिता मुसलमानांनी हिंदू आणि शिखांचे शत्रू राहिले पाहिजे? हिंदू आणि शिखांनी मुसलमानांचे शत्रू राहिले पाहिजे? याशिवाय आपल्या सरकारने जे काश्मीरमध्ये सशस्त्र सैन्य पाठवले आहे त्याने आक्रमण केले आहे असे माझे मत नाही. हे सैन्य काश्मीरचे प्रधानमंत्री शेख अब्दुल्ला आणि काश्मीरचे महाराज यांच्या निमंत्रणावरून पाठवण्यात आले आहे. हे खरे आहे की काश्मीर ज्याचा असेल त्याच्याकडे गेला पाहिजे. याकरिता बाहेरून जे लोक तिथे गेले आहेत, मग ते आफ्रिदी असो की अजून कोणी, काश्मीरच्या बाहेर जायला पाहिजे. पूंछचे लोक जर बंड करत असतील तर त्याला माझा आक्षेप नाही परंतु ते जर संपूर्ण काश्मीरवर ताबा मिळवण्याकरिता बंड करत असतील तर त्यावर माझा आक्षेप आहे. मी हे समजू शकेन की जर प्रत्येक बाहेरचा माणूस काश्मीरमधून निघून जाईल व बाहेरून कोणीही काश्मीरमध्ये हस्तक्षेप करणार नाही वा बाहेरून मदत पाठवणार नाही वा तिथे गोंधळ घालणार नाही. करणार नाही. त्यांनी तिथे तक्रारी करत

बसू नये आणि बाहेरून आतील लोकांना मदत करणार नाही तर ही गोष्ट मी समजू शकतो. परंतु ते जर असे म्हणत असतील की आम्ही काश्मीरमध्येच राहू परंतु इतरांनी मात्र निघून जायला पाहिजे तर ही गोष्ट मात्र मी समजू शकत नाही. काश्मीर कोणाचा आहे? सध्या तो महाराजांचा आहे कारण महाराजपद अजूनही अस्तित्वात आहे. सरकारच्या दृष्टिकोनातून महाराज हेच कायद्यानुसार सत्ताधारी आहेत. हं कोणी म्हणेल की महाराज वाईट आहेत, ते जनतेकरिता काहीही करत नाहीत तर तेथील सरकार त्यांना काढू शकते असे मला वाटते. परंतु सध्या तर अशी गोष्ट नाही. तेथील मुसलमान म्हणत असतील की आम्हाला महाराज नको, आम्ही सरळ सरळ पाकिस्तानमध्ये वा हिंदुस्तानमध्ये जाऊ उच्छितो तर माझी कोणतीही तक्रार नसेल. मी तर उपवास करून उठलो आहे, मी कोणाचाही शत्रू नाही मग मुसलमानांचा कसा असू शकतो? त्यांनी माझ्याजवळ यावे आणि माझी काय चूक आहे ते समजावून सांगावे. समजून सागू शकले तर मी मान्यसुद्धा करेन.

ग्वाल्हेरच्या एक मुसलमान सद्गृहस्थांनी रतलामहून मला एक तार पाठवलीआहे. बरोबर काय आहे ते मला माहीत नाही. तर ते म्हणतात -

आम्ही जहागीरपूर, जिल्हा उज्जैन येथे राहतो. माननीय महोदय आमच्या गावाला या महिन्याच्या १५ आणि १६ तारखेला हिंदूंनी वेढा घातला होता व त्यांनी आम्हाला जोरदार मारहाण केली. अनेक लोक जखमी झाले आणि एक मेला. आमच्या पिकाची नासधूस करण्यात आली आणि घरांची मोडतोड करण्यात आली. संस्थानाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. आम्ही संकटात आहो. कृपाकरून ताबडतोब काही व्यवस्था करा.

ही तार जानेवारीच्या १५ वा १६ तारखेला पाठवण्यात आली होती. त्या वेळी माझा उपवास सुरू होता. हे जर खरे असेल तर दिल्लीत जे साध्य करण्यात आले ते तुम्ही धुळीस मिळवत आहा असे मी ग्वाल्हेरच्या हिंदूंना सांगेन. तार करणारे बंधू म्हणतात की प्रशासनातील लोकांनी आम्हाला कोणतीही मदत केली नाही. असे कसे होऊ शकते? भारताच्या एखाद्या कोपऱ्यात जरी असे होत असेल तर ती शासनकर्त्यांकरिता लाजेची गोष्ट आहे आणि आमच्याकरिताही लाजिरवाणी गोष्ट आहे असे मी म्हणेन. ग्वाल्हेररमधील प्रकरणाच्या बाबतीत योग्य पाऊल उचलले जाईल अशी मी आशा करतो.

वर्तमानपत्रांमधून मी वाचले की काठेवाडमधील सर्व राजांनी - तिथे जवळपास २०० राजे आहेत - असा करार केला आहे की ती सगळे संस्थाने एक होतील आणि सर्व मिळून एक संस्थान तयार करतील. त्यांचे स्वतःचे विधिमंडळ असेल आणि तिच्यात ते प्रजेचेही काम करतील व आपलेही काम करतील. (काठेवाडच्या संस्थानिकांनी एक करारनामा करून सौराष्ट्र प्रांत म्हणजे एकीकृत काठेवाड

तयार करण्याचा निर्णय घेतला.) हे जर खरे असेल तर ही फार मोठी गोष्ट आहे. हे पाऊल उचलल्याबद्दल मी काठेवाडमधील सर्व संस्थानिकांचे अभिनंदन करतो.

भावनगरमध्ये महाराजांनी लोकांच्या हाती सत्ता सोपवली आहे आणि ते जनतेचे सेवक झाले आहेत. या महान पावलाकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन -२, पृष्ठ ३२३-७

८६. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २१, १९४७

नवी दिल्ली,

जानेवारी २१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला यायला १० मिनिट उशीर झाल्याबद्दल सर्वातआधी मी तुमची माफी मागितली पाहिजे. आजारी असल्यामुळे मी वेळेवर येऊ शकलो नाही.

आधी मी कालच्या बॉम्ब स्फोटाबद्दल बोलेन. माझी स्तुती करणाऱ्या आणि माझे अभिनंदन करणाऱ्या तारा लोक पाठवत आहेत. खरे म्हणजे माझा कोणत्याही अभिनंदनावर हक्क नाही. मला वाटले होते की सैन्य शस्त्रास्त्र चालवण्याचा सराव करत असेल. नंतर मला कळले की तो बॉम्ब होता व ईश्वराची इच्छा मी जगावे अशी नसती तर त्यामुळे मी मरूही शकत होतो. परंतु माझ्यासमोर बॉम्बस्फोट झाला असता व तरीही मी घाबरलो नसतो व त्यात मी हसतहसत मेलो असतो तर तुम्ही म्हणू शकला असता की न घाबरता मी हसतहसत मेलो. आज तरी मी अशा स्तुतीकरिता पात्र नाही. यामुळे याकरिता जी व्यक्ती जबाबदार आहे तिची तुम्ही घृणा करू नका. गीतेत म्हटलेल नाही काय (श्लोक ८) की जेव्हा केव्हा दुष्टांचा प्रभाव वाढतो आणि ते धर्माची हानी करतात तेव्हा ईश्वर कोणाला तरी त्याचा विनाश करण्याकरिता पाठवतो बॉम्बस्फोट करणाऱ्या माणसाने मी हिंदू धर्माचा शत्रू आहे असे गृहीत धरलेले आहे.हे स्पष्ट आहे. पोलिसांनी चौकशी केल्यानतर त्याने जे सांगितले तेच मी तुम्हाला सांगतो आहे. त्याने मोठ्या धाडसाने उत्तरे दिली. त्याने चांगले कपडेसुद्धा घातलेले होते. त्याला सद्बुद्धी द्यावी अशी आपण ईश्वराला प्रार्थना केली पाहिजे. ज्याला आपण दुष्ट समजतो आणि जर तो खरोखरच दुष्ट असेल तर ईश्वर त्याला पाहून घेईल. आपल्याला तो आवडत नाही याचा अर्थ तो दुष्ट आहे असा होतो काय? इतकेच नाही तर सर्वांच्या दृष्टीतून मी दुष्ट झालो तरी ईश्वराच्या न्यायालयात मी तसाच आहे असे कदाचित समजले जाणार नाही. मग मला दुष्ट समजून कोणी माझा खून करणार असेल तर त्याला ईश्वराच्या दरबारात जाब द्यावा लागणार नाही काय? ईश्वराने त्याला सद्बुद्धी द्यावी अशी आपण प्रार्थना करू या.

असे दिसते की त्याने कोणत्या तरी मशिदीत मुक्काम केला होता. असे करून त्याने भारताचा अपराध केला आहे, ईश्वराला दुखवले आहे आणि हिंदू धर्माचीही हानी केली आहे. अशा प्रकारे जर प्रत्येकजण मशिदीचा ताबा घेऊ लागला आणि तसे करताना त्याला अडवले तर तो पोलिस अधिकाऱ्यांवरही हल्ला करील. तर हे तर काही बरोबर नाही. ईश्वर तर असे काही करण्याकरिता कोणालाही सांगू शकत नाही. तो जेव्हा म्हणतो की ईश्वराच्या आदेशाप्रमाणे मी असे करत होतो तेव्हा

तो आपल्या दुष्टपणाच्या कृत्यात ईश्वराला सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करत होता. परंतु असे करता येत नाही. यामुळे त्याच्याबरोबर जे लोक आहेत वा या कृत्याकरिता ज्या लोकांचे तो साधन आहे त्यांनी लक्षात ठेवले पहिजे की असे केल्याने ते हिंदू धर्माला वाचवू शकणार नाहीत.

हिंदू धर्म वाचवायचा असेल तर तो माझ्यासारखे काम करूनच वाचवता येऊ शकेल. लहानपणापासून मी हिंदू धर्मासंबंधी वाचले आहे आणि शिकलो आहे. मी लहान होतो तेव्हा मी घाबरत असे. माझी दाई, तिनेच वास्तवात मला वाढवले होते, म्हणाली की घाबरतोस कशाला रामनाम घे. नंतर माझा संपर्क हिंदू धर्मातील अनेक चांगल्या लोकांशी झाला. त्याचप्रमाणे मुसलमान आणि ख्रिश्चन लोकांशीही माझी चांगली मैत्री होती. परंतु कोणीही याहून वेगळा प्रभाव माझ्यावर टाकू शकला नाही. अशा प्रकारे सर्व कसोट्यांमध्ये उत्तीर्ण होऊन अंतःप्रेरणेने आज मी सनातनी हिंदू झालो आहे. त्या वेळी मी केवळ पाच वा सहा वर्षांचा होतो. परंतु लहानपणी मी जसा होतो तसाच आजही आहे. मला जर हिंदू धर्माचा रक्षक व्हायचे असेल तर ईश्वर मला वाचवील. माझ्यासारख्या सनातनी हिंदूला मारून तुम्हाला हिंदू धर्माचा नाश करायचा आहे काय?

काही शीख माझ्याकडे आले आणि या कृत्यात शिखाचा हात आहे असा तुम्हाला संशय आहे काय असे मला त्यांनी विचारले. मला माहीत आहे की तो शीख नव्हता. परंतु तो असता तरी काय? तो हिंदू असला वा मुसलमान असला तरी काय फरक पडतो? पोलिसांच्या महानिदेशकांना (इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस) मी सांगितले की या माणसाचा छळ करू नका. तुम्ही त्याचे मन जिंकण्याचा प्रयत्न करा. त्याला सोडून द्या असे मी म्हणू शकलो नाही कारण हे माझे काम नाही. आपण हिंदू धर्माच्या विरोधात काम करत आहो, भारताच्या विरोधात काम करत आहो, मुसलमानांच्या विरोधात अपराध करत आहो आणि संपूर्ण जगाच्या विरोधात अपराध करत आहो असे जर त्याला कळले तर त्याच्यावर रागावू नये, त्याची कीव केली पाहिजे. त्याच्याशी आपण कठोरपणाने वागू नये. तुम्हा सर्वांना जर माझा उपवास निरर्थक वाटत असेल आणि माझ्या मरण्याचा दोष तुमच्यावर येऊ नये म्हणून तुम्ही मला मरू देत नसाल तर तुम्ही माझी आणि तुमचीही फसवणूक केली आहे असे मला वाटेल. मग या माणसाने जे केले ते पाप नव्हते तर योग्यच होते असे म्हणावे लागेल. तुम्ही जर अंतःकरणापासून या माणसाच्या कृत्याची घृणा करत असाल तर त्याच्या अंतःकरणात आपोआप परिवर्तन होईल कारण या जगात पाप कधीही आपल्या पायावर उभे राहू शकत नाही. त्याला नेहमी आधार लागत असतो. केवळ ईश्वर आणि त्याचे भक्तच इतर कोणाच्याही आधाराशिवाय राहू शकतात. याच गृहीतकावरून आपला असहकार निघाला. इथेसुद्धा अहिंसात्मक असहकार योग्य आहे. माझी ईश्वराला प्रार्थना आहे की त्याने आपल्या इतकी शक्ती द्यावी की जिच्यामुळे आपली अविचल वृत्ती कायम राहील व

आपल्यामध्ये जरी बॉम्ब फेकला गेला व पोलिसांनी येऊन तिथून आपल्याला हलवण्याचा प्रयत्न केला तरी आपण ठिकाणावरून तसूभरही हालणार नाही. असे केले तरच मी अभिनंदनाकरिता पात्र ठरेन. माझ्या सभोवताल जरी गोळीबार सुरू असला तरी मी रामनाम म्हणत असताना मेलो पाहिजे.

काल एका अशिक्षित स्त्रीने (सुलोचना देवी) इतकी हिंमत दाखवली की तिने बॉम्ब फेकणाराला पकडून दिले. मला तिच्या धैर्याचे कौतुक वाटते. माणूस कितीही कमी शिकलेला वा अशिक्षत असला तरी त्याचे मन जर मजबूत असेल तर त्याच्याकरिता कोणत्याही गोष्टीमुळे फरक पडत नसतो.

बहावलपूरच्या लोकांनी लिहिले आहे की आम्हाला बाहेर काढण्याची त्वरित व्यवस्था करा नाही तर आम्ही सर्व मारले जाऊ. मी तर त्यांना म्हणेन की घाबरू नका. नबाब साहेबांकडून मला आज अजून एक तार मिळाली आहे. मी या लोकांकरिता सर्व काही करतो आहे असे त्यांनी त्या तारेत लिहिले आहे. मी त्यांना विसरलेलो नाही.

सिंधी शिखांनी मुंबईहून पाठवलेली तारही मला मिळाली. ते म्हणतात की अजूनही सिंधमध्ये १५,०००च्या जवळपास शीख असावे. काहींची आधीच कत्तल झालेली आहे. त्यांचे जीवन आणि त्यांचा धर्म संकटात आहे. ते म्हणतात की त्यांना सिंधमधून बाहेर काढण्याकरिता काही तरी व्यवस्था करण्यात यावी आणि शक्य असेल तर विमानाने त्यांना बाहेर काढण्यात यावे. मी इथे जे काही म्हणतो आहे ते त्यांच्यापर्यंत पोहोचेल. तारसुद्धा पोहोचायला फार वेळ लागतो. १५,००० शिखांना मारून टाकण्यात आले वा त्यांचा धर्म व त्यांच्या अब्रूवर हल्ला झाला तर ते मी सहन करणार नाही. एकट्या माणसाला जे काही करता येते ते मी करीन. पंडितजी स्वतःसुद्धा सर्वांचा विचार करतात. पाकिस्तान आणि सिंध सरकारला मी विनंती करीन की जोपर्यंत हे शीख तिथे आहेत तोपर्यंत त्यांना कोत्याही प्रकारच्या संकटला तोंड द्यावे लागणार नाही असे आश्वासन देण्यात यावे. ते जर असे करू शकत नसतील तर या सर्व शिखांना एका ठिकाणी गोळा करण्यात यावे व संरक्षण देऊन त्यांना भारतात पाठवण्यात यावे. शीख शूर लोक आहेत. त्यांच्या धर्मावर हल्ला करण्याचे साहस कोण करू शकतो? शीख बंधूंनी धीर धरावा. काही पारसी मित्रांना मी त्यांची परिस्थिती पाहण्याकरिता पाठवले आहे.

एका पत्रलेखकाने पत्र लिहून कळवले आहे की मी जेव्हा १९४२साली तुरुंगात होतो तेव्हा लोक हिंसक म्हटल्या जाणाऱ्या कृत्यात सामील होत असत. तुम्हाला जर उपवास करताना मृत्यू आला तर देशात हिंसेचे असे काही तुफान येईल की तुमच्या ईश्वरालाही ते पाहून रडू येईल. यामुळे तुमचा उपवास हिंसक आहे व तुम्ही तो सोडला पाहिजे. पत्रलेखक जे म्हणतो त्यामागे प्रेमही आहे आणि अज्ञानही आहे. मला अटक झाल्यामुळे देशात हिंसा झाली होती हे खरे आहे. आजची परिस्थिती हा त्याचाच परिणाम आहे. त्या वेळी जर देश पूर्णपणे अहिंसक राहिला असता तर आज आपली जी दुर्दैवी

अवस्था झाली आहे तशी झाली नसती. मी राहिलो नाही तर त्यानंतर संघर्ष अजूनच वाढेल यावर मी विचार केला होता. ईश्वराला मला वाचवायचे असेल तर तो तसे करील. अहिंसक माणसाच्या मृत्यूमुळे नेमीच वांछनीय परिणाम होत असतात. कृष्ण जेव्हा राहिला नाही तेव्हा यादव अजून शुद्ध आणि पवित्र झाले नव्हते. त्यांनी यादवीत स्वतःचाच नाश करून घेतला होता. त्यावर मी रडत बसणार नाही. परंतु मी एक गरीब आणि नम्र माणूस आहे. मी गेल्यानंतर कोणी का भांडत बसावे? परंतु ईश्वर अनेकदा अतिशय सामान्य माणसाला आपले साधन बनवतो. हिंदू आणि मुसलमान यापुढे भांडणार नाहीत असे मला सांगण्यात आले आहे. मुसलमान स्त्रियासुद्धा त्यांच्या घरातून बाहेर पडू लागल्या आहेत. यामुळे मला आनंद होतो. सर्वांनी आपल्या हृदयांना ईश्वराचे मंदीर करावे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३२८-३०

८७. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २२, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी २२, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही पाहत आहा ईश्वर मला शक्ती देतो आहे. (उपवासानंतर पहिल्यांदाच गांधीजी प्रार्थना करायच्या मैदानापर्यंत पायी चालत आले होते.) मला आशा आहे की माझी प्रकृती लवकरच पूर्ववत होईल. परंतु ते ईश्वराच्या हातात आहे.

एक मित्र लिहितात की जवाहरलाल आपल्या मोठ्या घरातील एक वा दोन खोल्या निर्वासितांना देऊ शकतात. अशाच प्रकारे इतर मंत्री, सैन्यातील अधिकारी व सरकारी अधिकारी हेसुद्धा आपल्या घरातील काही जागा निर्वासितांना देऊ शकतात. परंतु असे करून आपण किती निर्वासितांना सामावून घेऊ शकू? अनेकांनी तोंडी आश्वासने दिली आहेत परंतु फार कमी लोकांनी त्यानुसार वर्तन केले आहे.

मला मान्य आहे की अशा प्रकारे काही हजार निर्वासितांनाच सामावून घेता येईल. परंतु हे महत्त्वाचे नाही. हे काम इतके मोठे नाही परंतु असे करून हे लोक जनतेसमोर एक उदाहरण दाखल करतील. इंग्लंडमध्ये राजाने थोडासा जरी त्याग केला, एक पेला मद्य जरी दिले तरी लोक त्याचे उदाहरण देतात. यामुळे असे करणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही सुसंस्कृत देशामध्ये अशा प्रकारच्या वर्तनाचे लोकांना मूल्य वाटत असते. आणि लोक आपल्याकरिता सर्व काही करत असल्याचे पाहिल्यामुळे निर्वासितांच्या मनावरही चांगला ठसा उमटेल व तेसुद्धा अडचणींना शौर्याने तोंड देण्याचा प्रयत्न करतील. परंतु आपली दिल्लीमध्ये चांगली सोय होऊ शकते असे वाटल्यामुळे निर्वासित जर दिल्लीकडे धाव घेऊ लागतील तर काम बिघडेल.

लोक म्हणतात की आधी एक लाख रुपये गोळा करायला किती तरी कष्ट घ्यावे लागत असत. लोक द्यायचे परंतु आम्ही भिकारी होतो. आज आपल्या हातात करोडो रुपये आले आहेत. करोडो रुपये घेण्याची ताकद आली खरी, परंतु खर्च तर इंग्रजांच्या काळाप्रमाणेच सुरू आहे. जितके रुपये उडवायचे असतील तितके उडवा. शानने राहिलो नाही तर बाहेरच्या जगावर आपला प्रभाव कसा पडेल? पैसे मोठेपणा दाखवण्याकरिता खर्च केले पाहिजे की देशाच्या कामाकरिता? इंग्लडची आपण बरोबरी केली पाहिजे असे वाटत असेल तर आपण काय करू शकतो? परंतु तिथे एका माणसाचे जितके उत्पन्न आहे त्यापेक्षा इथे पुष्कळ कमी आहे. एक गरीब देश पैशासंबंधी इतर देशांशी स्पर्धा करू लागला जर तो

मरून जाईल. इतर देशांतील प्रतिनिधींनीही ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. अमेरिकेशी स्पर्धा राहू द्या. खाण्यात, पिण्यात आणि मेजवान्या देण्यात त्यांनी अमेरिकेची स्पर्धा करू नये. आणि आपले स्वार्थत्यागी काँग्रेसचे लोकही जेव्हा अशा चुकीच्या मार्गाने चालू लागतात तेव्हा आपण बसून थोडा विचार केला पाहिजे. इतर लोकांपेक्षा मंत्र्यांनी जास्त पगार घ्यावा यावरही लोकांचा आक्षेप आहे. सरदार पटेल यांना दरमहा १५०० मिळत असतील तर ते म्हणतात की आम्हाला निदान ५०० रुपये तरी मिळाले पाहिजे. भारतात राहण्याचा हा मार्ग नाही. आपण सर्व जर शुद्ध होण्याचा प्रयत्न करत असू तर आपण असा विचार का करावा? लोकांजवळ किती पैसा आहे यावरून आपण त्यांची किंमत करत नसतो.

ग्वाल्हेरमधील काही मुसलमानांची दुरावस्था व्यक्त करणारी तार मी तुम्हाला काल वाचून दाखवली होती. (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी २०, १९४८) तेथील एक कार्यकर्ता माझ्याकडे आला आणि मला तुम्हाला एक चांगली बातमी सांगायची आहे असे म्हणाला. तो म्हणाला की ग्वाल्हेरच्या महाराजांनी जनतेच्या हातात सत्ता सोपवली आहे. (रियासतीतील विधान सभेत बहुमत असलेल्या पक्षाचा पाठिंबा असलेले मध्यंतरकालीन सरकार स्थापन करण्याची घोषणा ग्वाल्हेरच्या महाराजांनी केली होती.) परंतु प्रजामंडळाचे लोक भेदभाव करत असतील व मुसलमानांना घालवून लावत असतील तर यामुळे मी खुष कसा होऊ शकतो? तिथे कोणाबद्दलही भेदभाव केला जात नाही आणि कोणाविरुद्धही दुर्भावना ठेवली जात नाही, मग तो हिंदू वा मुसलमान वा पारसी वा ख्रिश्चन कोणीही असो असे जर मला कोणी सांगितले तरच मला आनद होईल.असे झाले तर मी तुमचे अभिनंदन करीन आणि आशीर्वाद देईन. महाराज जनतेचे सेवक झाले आहेत. आत्मशुद्धीच्या या यज्ञात सत्ताधारी आणि जनता या दोघांनीही भाग घेतला पाहिजे. असे झाले तरच आपण जगासमोर उभे राहू शकू. आपल्याला जर जगाला योग्य मार्गाने न्यायचे असेल व त्याला वाचवायचे असेल तर याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३३१-२

८८. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २३, १९४८

नवी दिल्ली,

जानेवारी २३, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मला बऱ्याचशा गोष्टी सांगायच्या आहे. जितके शक्य होईल तितके सांगणार आहे. आज सुभाषबाबूंची जयंती आहे. मी तुम्हाला सांगितलेच आहे की मला कोणाचाही वाढदिवस वा स्मृतीदिवस आठवत नसतो. कोणी तरी मला सुभाष बाबूंच्या जयंतीची आठवण दिली. सुभाष बाबू हिंसेचे पुजारी होते तर मी अहिंसेचा पुजारी आहे. परंतु त्याचे काय? आपण लोकांच्या गुणांवरून शिकणे सर्वात महत्त्वाचे आहे हे मला माहीत आहे. तुलसीदास म्हणतात त्याप्रमाणे -

जड-चेतन गुन - दोषमय विश्व कीन्ह करतार।

संत- हंस गुन गहहिं पय परिहरि वारि विकार।।

हंस ज्याप्रमाणे पाणी सोडून दूध घेतो तसेच आम्ही करायला पाहिजे. माणसात गुणदोष दोन्हीही भरलेले आहेत. आपण गुणग्रहण केले पाहिजे, दोष विसरायला पाहिजे. आपण त्यांच्या गुणांचे अनुसरण केले पाहिजे. सुभाष महान देशभक्त होते. त्यांनी आपले जीवन देशाकरिता वाहून टाकले होते. ते काही मुळातच योद्धा नव्हते परंतु ते सैन्याचे सेनापती झाले व एका मोठ्या साम्राज्याविरुद्ध शस्त्र उचलले. त्यांच्या सैन्यात हिंदू, मुसलमान, पारसी,शीख,ख्रिश्चन असे सर्व होते.ते स्वतःला केवळ बंगाली कधीही समजत नव्हते. त्यांच्या सैन्यात केवळ बंगलीच नव्हते. त्यांच्यात ना तर प्रांतीयता होती, ना रंगभेद होता ना जातिभेद होता. ते सेनापती होते म्हणून त्यांच्याकरिता जास्त सोयीसवलती होत्या असेही नाही.

एकदा एका सज्जन गृहस्थांनी, जे मोठे वकील होते, मला हिंदू धर्माची व्याख्या विचारली. मी म्हणालो की मला हिंदू धर्माची व्याख्या माहीत नाही. मी तुमच्यासारखा वकील कुठे आहे? माझ्या हिंदू धर्माची व्याख्या मी सांगू शकतो. जो सर्व धर्मांना समान समजतो तो हिंदू धर्म आहे. सुभाषबाबूंनी सर्वांचे मन जिंकून आपले काम केले. यामुळे सुभाषचे आज आपण त्यांच्या महान गुणाकरिता स्मरण करू या व त्यांची आठवण ठेवू या.

काही दिवसांपूर्वी ग्वाल्हेरमध्ये घडलेल्या दुःखद घटनेची माहिती मी तुम्हाला सांगितली होती. त्यात काही मुसलमान मारले गेले होते. (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी २०, १९४८) मी चौकशी करत आहे आणि या संबंधात मला पत्रही आले आहे. पत्र लिहिणाराने आपले नावही दिले आहे. ते म्हणतात

की खून, जाळपोळ, लूट वगैरे गोष्टी रतलाममध्ये झाल्या नव्हत्या. त्या जहागीरपूरमध्ये झाल्या होत्या आणि हे ठिकाण ग्वाल्हेर संस्थानात आहे. त्यांचे म्हणणे आहे की मला मिळालेला अहवाल अचूक नाही. तिथे दंगा झाला होता यात काही संशय नाही परंतु ते खाजगी भांडण होते व त्यात हिंदू आणि मुसलमानांचा भाग होता. त्यांचे म्हणणे आहे की या प्रसंगाला सांप्रदायिक रंग देणे बरोबर नाही व तिथे कोणाचीही हत्या झाली नाही. माझ्याकडे जे काही येते ते सर्व मी तुमच्यासमोर ठेवले पाहिजे. लोक अशा प्रकारे जर खोट्या गोष्टी सांगतील तर त्यामुळे व्यापक प्रमाणात गैरसमज पसरतील. तुम्हाला अतिशयोक्ती करायचीच असेल तर तुमच्या दोषांच्या बाबतीत अतिशयोक्ती करा. असे झाले तरच आपण आत्मशुद्धीच्या मार्गावर आहो असे म्हणता येईल.

मला म्हैसूरहून एक तार आली आहे. त्यात लिहिले आहे की दिल्लीत मला भरपूर यश मिळालेले असले तरी त्याचा प्रभाव म्हैसूरवर पडला आहे असे म्हणता येत नाही. तिथे भांडण झाले आहे यात काही संशय नाही. मी म्हैसूरच्या हिंदूंना आणि मुसलमानांना ओळखतो. जे काही घडले आहे ते जगासमोर साफ शब्दांत मांडावे असे मी म्हैसूर सरकारला लिहिले आहे.

जुनागढहून मुसलमान बांधवांची तार आली आहे. ती लांब आहे परंतु चांगली आहे. ते लिहितात की जेव्हापासून सरदारनी जुनागढचे प्रशासन हातात घेतले आणि जुनागढच्या प्रशासनाकरिता विभागीय आयुक्तांची नियुक्ती केली तेव्हापासून आम्हाला न्याय्य वर्तणूक मिळू लागली आहे. हिंदू आणि मुसलमानांमध्ये कोणीही फूट पाडू शकणार नाही असे आश्वासन त्यांनी मला दिले आहे. जुनागढमध्ये लवकरच सार्वमत घेतले जाणार आहे (भारत सरकारने जुनागढ, बाबरीवाड, मंग्रोल, मानवडार, बँटवा आणि सरदारगढमध्ये फेब्रुवारी महिन्यात सार्वमत घेण्याचे ठरवले होते.) आणि तसे होईल तेव्हा सध्याची व्यवस्था कायम राहण्याच्या बाजूने मुसलमान मत देणार आहेत.

मेरठच्या स्थानिक हिंदूंकडूनसुद्धा एक तार आली आहे. ते म्हणतात की उपोषणाचा फार चांगला परिणाम झाला आहे. ते म्हणतात की राष्ट्रवादी मुसलमानांबद्दल त्यांची काहीच तक्रार नाही परंतु लीगचे मुसलमान बदलले म्हणजे चांगले झाले असा जर तुमचा विश्वास असेल तर एक दिवस येईल की जेव्हा तुम्हाला पश्चात्ताप करावा लागेल. ते माझ्या अहंसेची प्रशंसा करतात परंतु राजकारणात तिचा कोणताच प्रभाव पडू शकत नाही, ती केवळ आध्यात्मिक क्षेत्रापर्यंत मर्यादित ठेवली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु तरीही ते म्हणतात की तुमचे पंडित नेहरू आणि सरदार यांचे जे सरकार आहे ते चांगले आहे, त्यात कोणत्याही प्रकारचा बदल होऊ नये. असा काही बदल अपेक्षित आहे असे अजून तरी मी काही ऐकलेले नाही. त्यांना कोण बदलवू शकतो वा बरखास्त करू शकतो याची मी कल्पना करू शकत नाही. परंतु तरीही लोक बोलत असतात आणि तिळाचा ताड करत असतात.

मेरठच्या हिंदूंनी स्वातंत्र्यसंघर्षात स्वतःला पूर्णपणे झोकून दिले होते. परंतु ते जे काही म्हणत आहेत ते चूक आहे. आम्ही काही लोकांवर विश्वास ठेवू आणि काहींवर ठेवणार नाही असे राजकारणात आपण म्हणू शकत नाही. जे लोक आज सरकारमध्ये आहेत त्यांच्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. आपण मुसलमानांवरसुद्धा विश्वास ठेवला पाहिजे. आपण जर मुसलमानांबरोबर भावाभावाप्रमाणे राहायचे ठरवले असेल तर कोणत्याही मुसलमानावर, मग तो मुस्लिम लीगचा असला तरी, आपण त्याच्यावर अविश्वास करू शकत नाही. त्याचप्रमाणे सर्व हिंदू आणि शीख वाईट आहेत असे कोणी म्हणेल तर हा मूर्खपणा होईल. जास्तीत जास्त आपण इतकेच करू शकतो की जर अशी कोणी व्यक्ती असेल तर आपण ती गोष्ट सरकारच्या लक्षात आणून देऊ शकतो व मग सरकार त्या व्यक्तीला योग्य वाटेल ती शिक्षा करील. आपण आपल्या हातात कायदा घेऊ नये. तो रानटीपणा होईल.

मला किती तरी तारा येणे सुरू आहे. प्रत्येकाला मी व्यक्तिगत पोच देऊ शकत नाही. या सभेद्वारे मी त्या सर्वांचे आभार मानतो. त्यांच्या आशीर्वादाला फळ येवो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय - प्रार्थना प्रवचन.

८९. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २४, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी २४, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

प्रार्थना सभेत तुम्हाला शांत राहण्याकरिता मी विनंती केली होती. काही काळ तुम्ही शांत होता परंतु नंतर स्त्रिया आपसात कुजबुजू लागल्या आणि मुले ओरडू लागली होती. मूल रडू लागते तेव्हा त्याला घेऊन सभेबाहेर जावे असे मी अनेकदा सांगितले आहे. स्त्रियांनी रडणाऱ्या मुलांना सभेत ठेवू नये ही सौजन्याची मागणी असते.

काल मी ज्या तारेबद्दल बोलू शकलो नव्हतो त्या लांब तारेबद्दल आज मी बोलणार आहे. ती तार फार लांब आहे. त्यात इतकेच लिहिले होते की कैद्यांच्या आणि अपहृत स्त्रियांच्या अदलाबदलीबद्दलच्या करारावर सह्या करण्यात आल्या आहेत. हा करार चांगला होता परंतु तो काही काळच टिकला आणि आता तो मोडीत निघाला आहे. हा करार मोडीत निघण्याचे कारण असे सांगतात की पश्चिम पंजाबच्या सरकारने कैद्यांना ठेवून घेतले आणि सांगितले की हे तेव्हाच होऊ शकते जेव्हा पूर्व पंजाबमध्ये जी काही संस्थाने आहेत वा राजे आहेत व त्याच्या संस्थानात जे काही कैदी आहेत ते परत आले पाहिजे आणि ज्या मुली आहेत त्या परत आल्या पाहिजे.

पूर्व पंजाबमध्ये जरी कमी संस्थाने असतील तरी पूर्व पंजाबलाही ही गोष्ट जर लागू होत असेल तर मला यात कोणतीही अडचण दिसत नाही. हे खरे आहे की अशा प्रकारच्या कराराची अंमलबजावणी करताना अडचणी येत असतात. सह्या करण्यात आल्या तेव्हा कोणत्याही अडचणी मांडल्या गेल्या नाही. यामुळे काय फरक पडतो? या बाजूला असो वा त्या बाजूला, सर्व मुलींना परत करण्यात आले पाहिजे. पश्चिम पंजाबमधून जर दहा मुली परत करण्यात आल्या असतील तर आम्ही दहाच मुली परत करू, जास्त करणार नाही हे बरोबर नाही. पूर्व पंजाबमध्ये ज्या स्त्रियांना अटक करण्यात आली, जे पुरुष आणि ज्या स्त्रिया अटकेत आहेत त्या सर्वांना बिनशर्त सोडण्यात यावे. परंतु आज असे घडत नाही कारण आपल्या मनामध्ये शत्रुत्वाची भावना भरलेली आहे. असे करण्यात त्यांना अडचण वाटते. समजा की पूर्वपंजाबमध्ये पश्चिम पंजाबपेक्षा जास्त मुलींना अडवून ठेवण्यात आले असेल तर काय? माझ्याकरिता तर त्यामुळे काहीही फरक पडत नाही. मी या गोष्टीची मुळीच पर्वा करणार नाही. सर्वच चूक आहेत. एकाचे अपहरण करणाराही चूक आणि शंभरांचे अपहरण करणाराचीही चूक. जास्त लोकांचे अपहरण करू शकले नाही कारण तसे करण्याची गुंडाची इच्छा नव्हती असे नसून त्यांच्यामध्ये तितकी ताकद नव्हती हे आहे. मनात तर असे काही नव्हते की की एकाच मुलीला वा माणसाला पकडून

ठेवायचे, जास्त नाही. जेव्हा सर्व काही चुकले तेव्हा त्यात स्पर्धा कशाची करायची? ज्या प्रक्रियेची एकदा सुरुवात झाली आहे तिच्यात अडथळा आणायला नको. खरे म्हणजे इतर गोष्टींचाही समावेश होईल अशा प्रकारे या कराराची कक्षा वाढवायला पाहिजे होती. दोन सरकार जर एकोप्याच्या भावनेने भेटतील आणि काहीही झाले तरी युद्ध करायचे नाही असे ठरवतील तर मार्ग स्पष्ट दिसेल. यामुळे नम्रपणाने विनंती करतो की त्यांनी मागे काय घडले हे विसरून जावे व स्वतःची चूक दुरुस्त करावी. आपण आपली अंतःकरणे शुद्ध केली पाहिजे. परंतु आपली अंतःकरणे जरी शुद्ध झाली नसतील तरी जे आपले कर्तव्य आहे असे स्पष्टपणे दिसते ते आपण केले पाहिजे. आत्मशुद्धी म्हणजे आपले अंतःकरण शुद्ध करणे.

पश्चिम पंजाबमध्ये अपहृत करण्यात आलेल्या सर्व मुलींना परत करण्यात आलेले नाही अशा तक्रारी माझ्याकडे येत आहेत. पूर्व पंजाबमध्ये अडकवून ठेवण्यात आलेल्या मुलींबद्दलही अशाच तक्रारी माझ्याकडे येत असतात. मी काही चौकशी केलेली नाही आणि कोण खरे बोलतो आणि कोण खोटे हे मला माहीत नाही. परंतु पश्चिम पंजाबबद्दल ही तक्रार जर खरी असेल तर ही गोष्ट लाजिरवाणी आहे. हीच गोष्ट पूर्व पंजाबबद्दलही खरी आहे. परंतु पश्चिम पंजाबबद्दल अजून एक तक्रार आहे. असे म्हणतात की ते सांगतात एक आणि करतात त्याविरुद्ध. मी इतकेच म्हणू शकतो की हे बरोबर करण्यात यावे नाही तर शब्दांनी माझ्या उपवासाच्या हेतूची परिपूर्ती होईल परंतु त्यामागील भावनेची नाही. (या वेळी लोकांचा गलबला इतका वाढला की गांधीजी म्हणाले की मला जे सांगायचे होते ते मी सांगू शकत नाही. आणि सभा संपवण्यात आली. प्रार्थनेच्या ठिकाणी स्त्रियांनी संपूर्ण शांतता ठेवण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. आणि ज्यांना मुले आहेत त्यांनी अगदी दूर उभे राहावे. यामुळे सभेत अडथळा येणार नाही.)

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३३५-७

९०. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २५, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी २५, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

अंतःकरणापासून आपले ऐक्य झाले आहे असे लोक सांगतात. मी मुसलमान आणि हिंदूंना हाच प्रश्न विचारत असतो आणि परस्परांशी भांडण्याचे वैय्यर्थ आता आमच्या लक्षात आले असे ते सर्व सांगतात. या सभेत किती मुसलमान आहेत हा प्रश्न मी विचारणार नाही. परंतु त्यांना भावाप्रमाणे वागवण्यात यावे असे मी सर्वांना सांगेन. तुम्हाला कोणी मुसलमान भेटला तर त्याला भावाप्रमाणे वागवा आणि त्याला बसायला जागा द्या. गेल्या दोन दिवसांपासून जास्त लोक प्रार्थनेला येऊ लागले आहेत.

मेहरौलीत जो दर्गा आहे तिथे उद्यापासून उर्स (ख्वाजा सैय्यद कुतुबुद्दीन बख्तियार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी होणारा धार्मिक उत्सव.) सुरू होणार आहे. हा उर्स दरवर्षी होत असतो परंतु या वर्षी आपण दर्ग्याची नासधूस केली आहे. तिथे दगडावरील जे चित्रकारीचे काम होते त्याचीही आपण मोडतोड केली आहे. आता त्याची काही प्रमाणात दुरुस्ती करण्यात आली आहे व नेहमीप्रमाणे उर्स होईल. तिथे किती मुसलमान जातील हे मला माहीत नाही, परंतु पूर्वी फार मोठ्या संख्येत तिथे मुसलमान तसेच हिंदूही हजेरी लावत असत. मला आशा आहे की या वर्षीही शांततापूर्ण भक्तिभाव मनात ठेवून हिंदू तिथे जातील. तिथे किती हिंदू गेले आणि किती गेले नाही हे तर मला कळेलच परंतु तिथे जाणाऱ्या मुसलमानांची चेष्टा करण्यात येऊ नये व कोणत्याही प्रकारची त्यांच्यावर टीकाटिप्पणी करू नये. तिथे पोलीस तर असतीलच परंतु ते कमीत कमी असले पाहिजे. तुम्ही सर्वांनीच तिथे पोलीस व्हायला पाहिजे आणि त्याची चर्चा सर्व जगात होईल इतक्या सुरळीतपणे तो उर्स पार पडेल हे तुम्ही पाहिले पाहिजे. अखेरीस तुम्ही चांगले नाव कमावले आहे. वर्तमानपत्रांमध्ये हे आले आहे आणि सर्व जगातून मला सतत पत्रे आणि तारा येत असतात. मला चीन आणि आशियाच्या इतर भागातून तसेच अमेरिका आणि युरोपमधूनही पत्रे आणि तारा येत असतात. सर्वांचे म्हणणे आहे की तुम्ही इथे फार मोठी गोष्ट साध्य केली आहे. ब्रिटिश गेल्यानंतर आम्हा भारतीयांना सरकार चालवण्याचा अनुभव नसल्यामुळे आपण भारतीय आपसात लढू व गृहयुद्धात आपल्या देशाचा नाश करून टाकू अशी भीती त्यांना वाटत होती.

फेब्रुवारी दोन तारखेला मी वर्धेला जाणार आहे. डॉ. राजेंद्रबाबूही माझ्याबरोबर येणार आहेत, परंतु मी ताबडतोब परतणार आहे. मी तिथे एक महिना थांबणार आहे असे वर्मानपत्रात आले आहे,

परंतु हे चूक आहे. तुम्ही सर्व मला आशीर्वाद देणार असाल व मी गेल्याबरोबर भांडायला सुरुवात करणार नाही असे आश्वासन देणार असाल तरच मी वर्धेला जाईन. नंतर मी पाकिस्तानमध्ये जाईन. परंतु तिथे जाण्याकरिताआणि माझे काम सुरू ठेवण्याकरिता पाकिस्तान सरकारने मला परवानगी दिली पाहिजे.

काँग्रेस कार्यकारिणीची जेव्हाकेव्हा सभा असते तेव्हा मी तिथे असलो तर तिथे कोणते कामकाज झाले याची मी तुम्हाला कल्पना देत असतो. आज काँग्रेस कार्यकारिणीची दुसरी सभा होती व तिथे अनेक विषयांची चर्चा करण्यात आली. तिथे ज्या अनेक विषयांची चर्चा झाली त्यांत तुम्हाला रस नसेल परंतु एक गोष्ट मी तुम्हाला सांगेन. भारतात जितक्या महत्त्वाच्या भाषा आहेत तितके प्रांत करायचे असा निर्णय वीस वर्षांपूर्वी काँग्रेसने घेतला होता. आमच्या हातात सत्ता आल्याबरोबर आम्ही अशी भाषावार प्रांतरचना करू असेही काँग्रेस म्हणाली होती. त्याकरिता आपल्या देशात आजही ९ वा १० प्रांत आहेत. ते सर्व केंद्राच्या अधिकाराखाली आहेत. जर नवीन प्रांत तयार करण्यात आले आणि त्या सर्वांना केंद्र सरकारच्या अंतर्गत ठेवण्यात आले तर त्यात काही हानी नाही.

परंतु ते सर्व स्वतंत्र होणार असतील व केंद्र सरकारचा अधिकार ते मान्य करणार नसतील तर मात्र ते वाईट होईल. तसे झाले तर मुंबईला महाराष्ट्राशी व महाराष्ट्राला कर्नाटकाशी व कर्नाटकाला आंध्रशी काहीही कर्तव्य नसेल असे होऊ शकणार नाही. आपण सर्व भाऊभाऊ होऊन राहू या. याशिवाय भाषावार प्रांतरचना झाली तर त्यामुळे प्रादेशिक भाषांचा विकास होईल. सर्व प्रदेशांमध्ये हिंदुस्तानीला शिक्षणाचे माध्यम करणे मूर्खपणा होईल आणि या कामाकरिता इंग्रजीचा उपयोग तर अजूनच मूर्खपणाचा होईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३३८-४०

९१. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २६, १९४७

(गांधीजींचे आज मौन असल्यामुळे प्यारेलाल यांनी गांधीजींच्या भाषणाचे हिंदुस्तानीत भाषांतर करून ते प्रार्थनेनंतर वाचून दाखवले.)

नवी दिल्ली,
जानेवारी २६, १९४७

आज २६ जानेवारी. स्वातंत्र्य दिवस आहे. आतापर्यंत स्वातंत्र्य संघर्ष सुरू होता आणि आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले नव्हते.तेव्हा हा समारंभ मानणे आवश्यक होते. आता स्वातंत्र्य आपल्या हाती आले आहे आणि आपण स्वातंत्र्याचा आश्वाद घेतला आहे. आता वाटते की स्वातंत्र्याचे आपण जे स्वप्न पाहिले होते तो भ्रमच होता. कमीतकमी मला तरी असे वाटते.

आज आपण कोणत्या गोष्टीचा उत्सव साजरा करत आहो? आपल्या भ्रमाचा निश्चितच नाही. परंतु घनदाट काळोखाची वेळ आता संपली आहे आणि आता आपण त्या मार्गावर चालू लागलो आहो ज्या मार्गावर चालू लागल्याने ग्रामीण लोकांच्या गुलामगिरीचा अंत होईल व गाव भारतातील शहरांचे गुलाम होऊन राहणार नाहीत. उलट ग्रामीण भागातील विचारपूर्ण मालाची विक्री आणि जाहिरात करण्याकरिता शहरी भागाचा उपयोग केला जाईल. ग्रामीण माणूस खरोखरच भारताच्या भूमीचे मीठ आहे हे तो सिद्ध करील.

या मार्गाने पुढे जात असताना अखेरीस सर्व वर्ग आणि संप्रदाय समान होतील. बहुसंख्य अल्पसंख्याकांवर, मग ते किती कमी वा तुच्छ असो, आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा वा अल्पसंख्याकांबद्दल श्रेष्ठकनिष्ठ भाव कधीही ठेवणार नाही. ही आशा फलद्रूप होण्याकरिता आपण फार वेळ करायला नको. फार वेळ झाला तर लोक निराश होतील.

तरीही दररोजचे संप आणि कायद्याला न जुमानणारे विविध प्रसंग पाहता ही गोष्ट साध्य करण्याकरिता फार वेळ लागणार असल्याचेच हे चिन्ह नाही काय? हे चिन्ह आपल्या विकृतीचे आणि दुर्बलतेचे आहे. श्रमाला त्याची प्रतिष्ठा आणि शक्ती कळली पाहिजे. श्रमाच्या तुलनेत भांडवलाला ती प्रतिष्ठाही नाही आणि शक्तीही नाही. आपल्या सर्वसामान्य माणसातसुद्धा ही शक्ती आणि प्रतिष्ठा जास्त प्रमाणात आहे. सुसंघटित समाजात संपांना वा बेकायदेशीरपणाला स्थानही नसते आणि अशा समाजात अशी वेळही येत नसते.अशा समाजात न्याय मिळवण्याकरिता भरपूर कायदेशीर मार्ग असतात. उघड वा दबलेली हिंसा अशा समाजात निषिद्ध असते. कानपूर येथील संप, कोळशाच्या खाणीतील संप वा इतरत्र कुठेही होणारे संप हे केवळ संप करणारांचेच नुकसान करत नाहीत तर संपूर्ण समाजाचे आर्थिक

नुकसान करतात. अनेक यशस्वी संपाचे नेतृत्व मी केलेले असल्यामुळे असे दीर्घ भाषण माझ्या तोंडी शोभत नाही असे म्हणून मला मागील संपांची आठवण करून देण्याची आवश्यकता नाही. जर कोणी असे टीकाकार असतील तर त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की त्या वेळी ना तर आपण स्वतंत्र होतो आणि ना तेव्हा आजच्यासारखे कायदे होते. सत्तेचे राजकारण आणि सत्तेवर ताबा मिळवणे ही पूर्व आणि पश्चिमेला ग्रासणारी विकृती पाहून अनेकदा मी आश्चर्यचकित होतो आणि या आजारातून आपण कधी तरी उठू शकू काय असा विचार माझ्या मनात येतो. आजचा हा विषय संपवण्यापूर्वी आपण आशा करू करू या की भौगोलिक आणि राजकीय दृष्टीने जरी हिंदुस्तान दोन भागात विभक्त झालेला असला तरी हृदयाने आपण एक राहू आणि परस्परांना मदत करणाऱ्या मित्राप्रमाणे वा भावाभावाप्रमाणे वागू आणि बाहेरच्या जगाकरिता एक राहू.

कापडाच्या निर्नियंत्रणाचे (सरकारने जानेवारी १९पासून कापडावरील नियंत्रण उठवण्याचा निर्णय घेतला होता.) सर्व वर्गातून स्वागत करण्यात येत आहे. कापडाचा तुटवडा कधीही नव्हता. देशात जेव्हा भरपूर कापूस आहे आणि कताई आणि विणाई करण्याकरिता भरपूर हात आहेत तेव्हा देशात कापडाचा तुटवडा कसा असू शकतो? इंधन आणि कोळशावरील निर्नियंत्रणसुद्धा इतकेच स्वागतार्ह आहे. गरीबांच्या उष्मांकाची तूट भरून काढणाऱ्या गुळाचा सध्या बाजारात पूर आला आहे ही गोष्ट उल्लेखनीय आहे. बाजारात गुळाचा हा जो पूर आला आहे तो उत्पादनाच्या ठिकाणावरून दुसरीकडे पाठवणे कठीण झाले आहे व त्यावर वस्तूंच्या जलद दळणवळणाच्या ताबडतोब व्यवस्थेशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही. या विषयाची माहिती असलेले एक मित्र जे लिहितात ते वाचण्यासारखे आहे -

निर्नियंत्रणाच्या धोरणाची यशस्विता रेल्वे आणि आणि सडकेने होणाऱ्या मालाच्या दळणवळणावर प्रामुख्याने अवलंबून आहे. रेल्वेच्या दळणवळणात जर जलद सुधारणा झाली नाही तर देशभरात दुष्काळ पडण्याची व निर्नियंत्राचे धोरण कोसळण्याची शक्यता आहे. सध्या रेल्वेचे दळणवळण ज्या पद्धतीने सुरू आहे ते निर्नियंत्रण आणि नियंत्रण या दोन्हींकरिता सारखाच धोकादायक आहे. देशाच्या विविध भागात एकाच वस्तूच्या भावात जे भयंकर अंतर आहे त्याचे कारण रेल्वेच्या दळणवळणामुळे निर्माण होणारा अडथळाच आहे. रोहतकमध्ये गुळ जर आठ रुपये मण खपत असेल व मुंबईमध्ये ५० रुपये मण खपत असेल तर रेल्वेच्या कामकाजात काही तरी चुकते आहे असे आपण म्हणायला पाहिजे. देशात सर्वत्र पसरलेल्या हजारो वाघिणी तशाच पडलेल्या आहेत. वाघिणींमधील माल महिनोगणती रिकामा केला जात नाही. वाघिणी आणि कोळशाच्या उणिवेचे कारण सांगितले जात असल्यामुळे मालगाडीच्या एक डब्याचे आरक्षण करण्याकरिता शेकडो रुपये द्यावे लागतात

आणि किती तरी दिवस स्टेशनवर फेऱ्या माराव्या लागतात. वाघिणींची मागणी पूर्ण करण्याकरिता वा त्या फिरत राहण्याकरिता रेल्वे मंत्र्यांना (जॉन मथाई) ***सडकेच्या मार्गाने होणाऱ्या संपूर्ण दळणवळणाच्या व्यवस्थेचीही चौकशी करावी लागेल. असे झले तरच ज्या गरिबांकरिता निर्नियंत्रणाचे धोरण अवलंबिले जात आहे त्यांना त्याचा लाभ पोहोचू शकेल. या दळवळणाच्या चुकीमुळे करोडो ग्रामिणाना हालअपेष्टांना तोंड द्यावे लागत आहे व त्यांचा माल बाजारापर्यंत पोहोचूच दिला जात नाही.***

मी आधीच लिहिलेले असल्याप्रमाणे पेट्रोलवरील नियंत्रण बंद झालेच पाहिजे आणि सडकेने होणाऱ्या वाहतुकीचे ठेके देण्याची पद्धतीही बंद व्हायला पाहिजे. हे परमिटयुग बंद झाले पाहिजे. ठेके दिल्यामुळे काही दळणवळण (ट्रान्सपोर्ट) कंपन्यांचा फायदा होतो परंतु करोडो गरिबांचे जीवन कठीण होते. निर्नियंत्रणाच्या धोरणाचे ९५ टक्के यश या अटींवर अवलंबून आहे. वरील सूचनांचा अवलंब झाला तर देशातील लाखो टन खाद्यपदार्थ व इतर माल देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचू शकेल.

बेइमानी आणि लाचलुचपतीचा विषय काही नवीन नाही. अंतर इतकेच आहे की आधीपेक्षा या गोष्टी आता वाढलेल्या आहेत. बाहेरचे बंधन तर आता उरलेले नाही. यामुळे ही लाचलुपत तोपर्यंत बंद होणार नाही जोपर्यंत यांत सहभागी असणाऱ्या लोकांना कळणार नाही की त्यांच्याकरिता देश नाही तर देशाकरिता ते आहेत. याकरिता उच्च दर्जाच्या नैतिक शासनाची आवश्यकता असेल. जे लोक लाचलुचपतीच्या विकृतीपासून अजून वाचलेले आहेत, लाचलुचपत करणाऱ्या अधिकाऱ्यावर ज्यांचा प्रभाव आहे त्यांनी याबाबतीत औदासिन्य दाखवायला नको. तसे केले तर तो अपराध होईल. आणि आपल्या सायंकाळच्या प्रार्थनेत किंचितही खरेपणा असला तरी लाचलुचपतीच्या या दानवाचा विनाश करण्याकरिता तुम्ही लोकांनी मदत केली पाहिजे.

द हिंदुस्तान टाईम्स, जानेवारी २७, १९४८ आणि हरिजन फेब्रुवारी १, १९४८

९२. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २७, १९४८

(प्रार्थना प्रवचनच्या या हिंदी मजकुराशी हिंदुस्तान टाईम्समधील मजकुराशी मेळ घालण्यात आला आहे.)

नवी दिल्ली,

जानेवारी २७, १९४८

आज गांधीजींच्या प्रार्थना प्रवचनात केवळ एक मुसलमान उपस्थित होता. गांधीजी म्हणाले की इतक्यावर मी समाधानी नाही. प्रार्थनेत येणाऱ्या सर्व हिंदू आणि शीख बंधूभगिनींनी आपल्याबरोबर एकेका मुसलमानाला आणले पाहिजे.

यानंतर गांधीजींनी महरौलीच्या दरगाह शरीफमध्ये झालेल्या उर्सबद्दल चर्चा केली. ते स्वतः तो उर्स पाहण्याकरिता आज सकाळी गेले होते. कोणालाही उर्समध्ये येतांना त्रास झाला नाही.

ते म्हणाले की मी जेव्हा त्यांना विचारले की मागील वर्षी जितक्या लोकांनी दर्ग्याला भेट दिली होती तितक्या लोकांनी यावर्षी भेट दिली काय? त्यावर ते म्हणाले की निश्चितच काही कमी लोक आले आहेत. अजूनही काही लोक घाबरलेले आहेत. अलाहाबादमध्ये जे घडले ते इथेही घडू शकते आणि मग हिंदू काय करतील? एका माणसाने दुसऱ्या माणसाला घाबरावे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. परंतु त्या ठिकाणी जितक्या संख्येत मुसलमान आले होते तितक्याच प्रमाणत हिंदू आणि शीख आले होते असे मला आढळले. तिथे मला अशा काही गोष्टी दिसल्या की ज्या पाहून मला दुःख झाले. तो दर्गा फार प्राचीन आहे. अजमेरच्या दर्ग्याच्या खोलोखाल त्याचे महत्त्व आहे. त्याच्याबद्दलची महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिथे संगमरवरी दगडावर केलेले कोरीव काम आणि कारागिरी आहे. त्यापैकी सर्व जरी नाही तरी बऱ्याचशा कामाची तोडफोड करण्यात आली आहे. ही निव्वळ गुंडगिरी आहे. आपला इतका अधःपात झाला आहे काय की एखाद्या ठिकाणी कुणा अवलियाची अशी कबर बनवण्यात आली आहे की जी अतिशय सुंदर आहे व तिच्यावर बराच पैसा खर्च झाला ती आपण तोडून टाकावी, तेथील जाळ्यांची मोडतोड करावी? पाकिस्तानमध्ये जे काही घडले ते याहून दहापट होते अशा हिशेबात शिरण्याची माझी इच्छा नाही. माझ्याकरिता अपराध मोठा की लहान याला महत्त्व नाही. माझ्याकरिता ती लाजिरवाणी गोष्ट आहे. सर्व जग जर अशा लाजिरवाण्या गोष्टी करत असेल तर त्याचा अर्थ आपणही तसेच वागावे असा होतो काय?

अशा प्रकारच्या लज्जास्पद गोष्टीत आपण सहभागी होऊ नये हे तुम्ही निश्चितच मान्य कराल. मला आधीच सांगण्यात आले होते की या दर्ग्यात हिंदू आणि मुसलमान दोघेही मोठ्या प्रमाणात येत असतात आणि नवस बोलत असतात. हा दर्गा अशा संताचा आहे की ज्याच्या दृष्टीत हिंदू आणि

मुसलमान समान होते. हा इतिहास आहे आणि इतिहास खोटा ठरवणे योग्य नाही. अशा ईश्वरी माणसाबद्दल आपल्याला आदर असला पाहिजे व पाकिस्तानमध्ये जे काही घडते त्याचा आपल्यावर प्रभाव पडू नये.

आजच्या वर्तमानपत्रांमधून पाकिस्तानमधील एका ठिकाणी (पारचिनार येथे. पाहा उर्समधील भाषणातील टीप. जानेवारी, २७, १९४८) एकशेतीस हिंदू आणि शीखांची कत्तल झाल्याचे मला कळले. तिथे लुटीचे प्रकारसुद्धा झाले. सरहद्द प्रांताच्या सीमेवर मुसलमानांच्या लहान लहान जमातीच्या अनेक टोळ्या राहतात. या टोळीवाल्यांनी हिंदूवर हल्ला केला आणि त्यांना मारले. या हिंदूंनी कोणाला काही हानी पोहोचवली होती असे कोणीही म्हणत नाही. पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे की आम्ही ताबडतोब कारवाई केली व हल्ल्या करणाऱ्या अनेकांना मारण्यात आले. हे कितपत खरे आहे हे आपल्याला माहीत नाही. परंतु ज्याअर्थी पाकिस्तान सरकार असे म्हणते त्याअर्थी आपण ते मान्य केले पाहिजे. यामुळे उत्तेजित होऊन इथल्या मुसलमानांना मारू नये. आज तुम्ही भावाभावाप्रमाणे राहत आहा आणि जर तुमच्या अंतःकरणात काही दुराभाव असेल तर तुम्ही घेतलेली शपथ तुम्ही पाळली नाही असे सिद्ध होईल. पाकिस्तान सरकारला याचा हिशेब विचारणे हे आपल्या सरकारचे काम आहे. आपले काम आपली शपथ पाळणे आणि आपले अंतःकरण शुद्ध ठेवणे इतकेच आहे.

राजकुमारीबेन (अमृत कौर) अजमेरला गेल्या होत्या. त्यांनी मला एका दुःखद आणि लाजिरवाण्या प्रसंगाबद्दल सांगितले. तिथे राहणाऱ्या हरिजनांकडून तेथील लोक बरेच काम घेतात आणि तेही ते करतात. परंतु ज्या जागेत ते राहतात ती फार घाणेरडी आहे. तिथे आपलेच प्रशासन आहे. आणि तेथील हिंदू आणि शीख अधिकारी आपल्याच सरकारच्या अंतर्गत काम करत असतात. ही अशोभनीय गोष्ट ते कशी सुरू राहू देऊ शकतात? तिथे अनेक पांढरपेशे हिंदू आहेत व ते भरपूर पैसा कमावतात व ते सुखवस्तू आहेत. ते हरिजनांच्या वस्तीत जाऊन एक दिवस का राहत नाहीत? ते जर तिथे गेले तर त्यांना मळमळू लागेल इतकेच नाही तर काही मरूही शकतील. केवळ हरिजनाच्या पोटी जन्म घेतला म्हणून लोकांना अशा घाणीत राहावे लागते ही गोष्ट अपराधी स्वरूपाची आहे. मी दिल्लीतील हरिजन कॉलनीमध्येसुद्धा गेलो होतो. तेथील परिस्थितीही बरीच वाईट आहे. परंतु या बाबतीत अजमेरची परिस्थिती फारच वाईट आहे असे दिसते. आपण स्वातंत्र्य मिळवले आहे परंतु अशा गोष्टी आपण थांबवू शकलो नाही तर या स्वातंत्र्याला काहीही अर्थ राहणार नाही. आणि ही गोष्ट एका दिवसात करता येऊ शकते. हरिजनांच्या राहण्याकरिता आपण कोरडी जमीन पुरवू शकत नाही काय? त्याना जर कचरा उचलावा लागत असेल, आणि ते तो उचलतच आहेत, तर त्यांनी त्या

कचऱ्यातच राहिले पाहिजे काय? असे दिसते की आपला विवेक हरवला आहे आणि आपण संवेदनशुन्य झालो आहो. आपण ईश्वराला विसरलो आहो. यामुळेच आपण असे अपराध करतो. मग आपण इतरांमधील दोष कसे पाहू शकतो?

आता सर्वात शेवटी मला तुम्हाला मीरपूरसंबंधी सांगायचे आहे. मी या गोष्टीचा आधी थोडक्यात उल्लेख केला होता. मीरपूर काश्मीरमध्ये आहे. आता ते हल्ला करणारांच्या ताब्यात आहे. तेथील अनेक स्त्रियांचे आणि मुलांचे अपहरण करण्यात आले आहे. त्यात केवळ तरुण मुलीच नाहीत तर वयस्कर स्त्रियासुद्धा आहेत. त्या अशा हल्लेखोरांच्या ताब्यात आहेत की त्यांनी त्यांची अब्रू निश्चितच घेतली असेल. मला याबद्दल किंचितही संशय नाही. त्यांना जे खायला देतात ते अतिशय वाईट आहे. त्यातील थोड्याशा पाकिस्तानच्या सीमेत आहेत. त्यांतील काहींना गुजरात जिल्ह्यातील झेलम येथे नेण्यात आले असावे.

मी तर म्हणेन की हल्लेखोरांमध्ये काही तरी मर्यादा असली पाहिजे. ते जे काही करत आहेत त्यामुळे इस्लामची बदनामी होत आहे. आणि तरीही ते म्हणतात की आम्ही हे काश्मीरला स्वतंत्र करण्याकरिता करत आहो.

त्यांनी खायला मिळावे म्हणून ही सर्व लूटमार केली असती तर मी ते समजू शकलो असतो. परंतु ज्या लहान मुली आहेत त्यांची अब्रू लुटणे त्यांना खायलाप्यायला व कपडेलत्ते न देणे हेही काय तुमचे कुराण शरीफ शिकवते? सर्व अपहृत स्त्रियांना परत मिळवण्याचा पाकिस्तान सरकारने प्रयत्न केला पाहिजे व त्यांना परत त्यांना त्यांच्या घरी परत पाठवावे अशी माझी मागणी आहे.

माझ्याकडे मीरपूरचे लोक आलेले आहेत. ते चांगलेच धडधाकट आहेत. ते दुःखी आहेत आणि त्यांना लाजही वाटते. आपले सरकार इतके शक्तिशाली असूनही या बाबतीत काहीच का करू शकत नाही असे त्यांनी मला विचारले. मी त्यांना सर्व काही समजून सांगण्याचा प्रयत्न केला. जवाहरलालसुद्धा अतिशय दुःखी आहे व जे शक्य आहे ते करण्याचा ते प्रयत्न करत आहेत. परंतु त्यांच्या दुःखी होण्यामुळे वा प्रयत्नामुळे कशी मदत होऊ शकेल? ज्या लोकांनी सर्व काही गमावले आहे, लुटले गेले आहेत, आपल्या प्रियजनांपासून आणि जवळच्या लोकांपासून तोडले गेले आहेत त्यांचे समाधान कसे करता येऊ शकेल? मला भेटायला आलेल्यांपैकी एकाने पंधरा नातेवाईक गमावले आहेत. ज्यांना सोडून आम्ही इथे आलो आहो त्यांचे काय होईल असे तो मला विचारत होता. अपहरण केलेल्या स्त्रियांना त्यांच्या अब्रूनिशी परत करण्यात यावे असा सल्ला न मागताही मी मानवता आणि ईश्वराच्या नावावर हल्लेखोर आणि पाकिस्तान सरकारला देईन. हे त्यांचे कर्तव्य आहे. इस्लामबद्दल मी बरेच वाचले आहे आणि इस्लामचे मला बरेच ज्ञान आहे. स्त्रियांना पळववून न्यायचे आणि त्यांना

अशा अपमानास्पद परिस्थितीत ठेवायचे असे इस्लाममध्ये कुठेही सांगितलेले नाही. हा अधर्म आहे, धर्म नाही. ही सैतानाची पूजा आहे, ईश्वराची नाही.

द हिंदुस्तान टाईम्स, जानेवारी २८, १९४८. आणि प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३४४-७

९३. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २८, १९४८

(प्रार्थना प्रवचनमधील हिंदी भाषेतील मजकुराशी द हिंदुस्तान टाईम्समधील मजकुराशी मेळ घालण्यात आला आहे.)

नवी दिल्ली,

जानेवारी २८, १९४८

गांधीजी म्हणाले की बहावलपूरच्या काही लोकांनी मला भेटण्याची मेळ मागितली होती परंतु ती नाकारण्यात आली अशी तक्रार माझ्याकडे आली आहे. गांधीजींना माहीत होते की ते लोक दुःखात आहेत आणि गांधीजींच्या भेटीमुळे त्या लोकांचे समाधान होणार असेल तर ते त्यांच्याकरिता वेळ काढतील आणि त्यांच्याकरिता सर्व काही करतील असे आश्वासन गांधीजींनी दिले आहे.

डॉ. सुशिला नाय्यर आणि डॉ. लेस्ली क्रॉस या बहावलपूर्ला गेल्या आहेत आणि नबाबांनी त्यांना सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. संघराज्याच्या राजधानीत ईश्वराच्या कृपेने तिन्ही संप्रदायांच्या लोकांमध्ये परत शांतता प्रस्थापित झाली आहे. याचा संपूर्ण भारतातील परिस्थितीवर निश्चितच परिणाम होईल.

तुम्हाला माहीतच आहे की दक्षिण आफ्रिकेतील आपले लोक हक्कांकरिता संघर्ष करत आहेत. इथे भारतात लोकांना जमीन घेता येत नाही की हवे तिथे राहता येत नाही असे माणसाच्या हक्कावर बंधन आणणारे कोणतेही नियम नाहीत.हे खरे आहे की आपण हरिजनांना काही प्रमाणात अशा परिस्थितीत आणले आहे, परंतु बाकीचा समाज असा नाही. परंतु दक्षिण आफ्रिकेत अशी परिस्थिती असल्याचे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. यामुळे आपल्या हक्कांच्या रक्षणाकरिता आणि भारताची प्रतिष्ठा राखण्याकरिता तेथील भारतीयांनी संघर्ष सुरू केला आहे. या संघर्षात ते कोणत्याही मार्गाचा अवलंब करू शकतात परंतु सत्याग्रही असल्याचा त्यांचा दावा आहे आणि त्यांच्या संघर्षाने सत्याग्राचे रूप धारण केले आहे. त्यांच्या सतत तारा येत असतात. परवान्याशिवाय त्यांना एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतातसुद्धा जाता येत नाही. दक्षिण आफ्रिका एखाद्या खंडाप्रमाणे आहे. तो फार मोठा देश आहे. ट्रान्सवालमधून नाताळमध्ये भारतीयांना परवाना असेल तरच जाता येते. नाताळ, ट्रान्सवाल, हिल स्टेट, केप कॉलनी असे कुठेही ते जाऊ शकत नाहीत. हा देश जितका इतरांचा आहे तितकाच आमचा असल्यामुळे आमच्यावर असे निर्बंध का घालण्यात यावे असे ते विचारतात. अनेकांना टान्सवालमध्ये जाण्यात यश मिळाले आहे आणि या वेळी ट्रान्सवाल सरकारने सौजन्य दाखवले आहे. अजून तरी त्यांना अटक करण्यात आलेली नाही. ते आधी व्होल्क्सरस्टला गेले होते. सीमा

ओलांडल्यानंतर ते पहिले शहर लागत असते. तिथे भरपूर पोलीस होते परंतु त्यांनी त्यांच्याकडे केवळ पाहिले आणि अटक केली नाही. नंतर त्यांनी मोटरगाडी भाड्याने घेतली आणि ते पुढे निघाले. त्यानंतर तिथे एक सभा घेण्यात आली आणि तिथे त्यांचे प्रेमाने स्वागत करण्यात आले. ही माहिती तुम्हाला दिली पाहिजे असे मला वाटले. या भारतीयांनी फार धैर्याची गोष्ट केली आहे. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय अल्पसंख्य आहेत परंतु ते खरे सत्याग्रही झाले तर त्यांचा विजय निश्चित आहे आणि कोणताही अडथळा त्यांना अडवू शकत नाही. परंतु अजून हे साध्य व्हायचे आहे. इथल्याप्रमाणेच तिथेही विविध प्रकारची माणसे आहेत. तिथे हिंदू आहेत तसेच मुसलमानही आहेत. ते सर्व मिळूनमिळून हे काम करत असतात. यात गमावण्यासारखे काहीही नाही हे त्यांना माहीत आहे. आणि एकटा माणूस तर हा संघर्ष करू शकतच नाही. त्यांना माहीत आहे की वेगवेगळे राहून आपण हा संघर्ष करू शकत नाही. अशा प्रकारे ते जोहान्सबर्गमध्ये पोहोचले खरे, परंतु ते तिथे थांबू शकत नाही. त्यांनी अटक होईपर्यंत पुढे आणि पुढे जात राहिले पाहिजे. सरकारला त्यांना अटक करण्याचा अधिकार आहे. कायदा तोडल्याबद्दल शिक्षा भोगण्याची तयारी ठेवणे हे सत्याग्रहाचे शास्त्र असते. ते अभिनंदनाकरिता पात्र आहेत. अशा सौजन्यपूर्ण मार्गाने आपला संघर्ष चालू ठेवणारांशी फार कठोरपणे वागू नये अशी मी दक्षिण ऑफ्रिकेच्या सरकारला विनंती करीन. त्यांनी त्यांची तक्रार समजून घ्यावी व सत्याग्रहींशी तडजोड करावी. पांढरी कातडी असलेल्या माणसाने काळी कातडी असलेल्या माणसाशी चर्चा का करू नये? भारतीयांना त्यांच्या न्याय्य हक्कांकरिता का संघर्ष करावा लागावा? भारतीयांनाही तिथे राहू दिले तर गोऱ्यांचे कोणते नुकसान होणार आहे? आज दक्षिण आफ्रिकेप्रमाणेच आपणही स्वतंत्र राष्ट्र आहो व एकाच राष्ट्रकुटुंबाचे सदस्य आहो. याचा अर्थ आपण सर्वांनी भावाभावाप्रमाणे समतेच्या नात्याने वागायला पाहिजे. परंतु ते जर भारतीयांना आपला शत्रू समजत असतील व त्यांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित करणार असतील तर ते मित्राप्रमाणे नाही तर शत्रूप्रमाणे वागत आहेत असे म्हणावे लागेल. ही गोष्ट अशी आहे की जी समजून घेणे कठीण आहे. रंगीत लोकांकडे त्यांनी हीन भावनेने का पाहावे? ते उद्यमी आणि काटकसरी आहेत म्हणून? तुम्ही तुमच्या मार्गात दुरुस्ती केली पाहिजे असे मी या सभेद्वारे दक्षिण आफ्रिकी सरकारला सांगेन. मी स्वतः दक्षिण आफ्रिकेत २० वर्षे राहिलेलो आहे आणि त्यामुळे तो माझा देश आहे असे मा म्हणू शकतो. हे सर्व मी कालच सांगायला पाहिजे होते परंतु मी असे करू शकलो नाही.

म्हैसूरच्या काही मुसलमानांनी काही दिवसांपूर्वी मला एक तार पाठवली होती. त्यांचे म्हणणे आहे की माझ्या उपोषणाचा तिथे काहीही प्रभाव पडलेला नाही आणि आणि अजूनही मुसलमान मारले जात आहेत. या विषयावर थोडेफार बोललोही आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी २३, १९४८) आता मला म्हैसूरच्या गृहमंत्र्यांकडून तार आली आहे. त्यात त्यांनी तेथील मुसलमानांनी केलेले आरोप

फेटाळले आहेत व तेथील सरकार मुसलमानांशी सर्वतोपरी न्याय्य पद्धतीने वागण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही अतिशयोक्ती करू नका असे ज्याप्रमाणे मी इतरांना सांगतो त्याचप्रमाणे म्हैसूरच्या मुसलमानांनाही माझे हेच सागणे आहे. असे केल्यामुळे माझे हातपाय बांधले जातात आणि मी काहीही काम करू शकत नाही. जर त्यांना शक्य असेल तर त्यांनी सौम्य करून तो सांगावा. हिंदू, मुसलमान आणि शीख हे भावाभावाप्रमाणे राहू शकतात.

आपले लोक इतके साधे आहेत की ते पोस्टाने पैसे पाठवतात. मला माझ्या लहानपणीचा एक प्रसंग आठवतो. माझ्या वडिलांजवळ काही दागिने होते आणि त्यात काही किंमती मोतीही होते. त्यांनी ते पोस्टाने पाठवले. ती फसवणूक नव्हती परंतु निश्चितच यात धोका होता. कोणाला जर संशय आला असता तर त्याने तो लिफापा नक्कीच उघडून पाहिला असता. ते काहीही असले तरी पैसे वाचवता आले नाही कारण माझ्या वडिलांना तारेने पोच पाहिजे होती. असे दिसते कीमाझ्या वडिलांसारखे साधेभोळे लोक अजूनही आहेत. एका मित्राने एक हजार रुपयांच्यावर रक्कम अशा प्रकारे पाठवली होती. त्याने तो लिफापा नोंदणी करूनही पाठवला नव्हता आणि त्याचा विमाही काढला नव्हता. त्याने तो साध्या पोस्टाने पाठवला. चोहोकडे लबाडी आणि भ्रष्टाचाराचे वातावरण असताना डाक खात्याने तो लिफापा बरोबर पोहोचवला ही गोष्ट त्यांच्याकरिता भूषणास्पद आहे. या लिफाप्यात काय असू शकते हेसुद्धा त्यांनी पाहिले नव्हते. लोकांना माझा सल्ला आहे की त्यांनी पैसे लिफाप्यातून पाठवण्याचा धोका पत्करू नये कारण इतर ठिकाणाप्रमाणे डाक खात्यातही काही लबाडी करणारे लोक असू शकतात. त्यांनी जर डाक उघडली तर माझेही नुकसान होईल आणि हरिजनचेही. पैसे पाठवणारांना हरिजनला द्यायचे होते ते हरिजनला पोहोचणारच नाही. अशा प्रकारे देणगीदाराचेही नुकसान होईल.

डाक खात्याने दाखवलेल्या या प्रामाणिकपणाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. इतर विभागांनीही या गोष्टीचे अनुसरण करावे व इतर लोकांच्या पैशाची काळजी घ्यावी व भ्रष्टाचार वा अफरातफर करू नये.

द हिंदुस्तान टाईम्स, जानेवारी २९, १९४८, आणि प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३४८-५१

९४. प्रार्थना प्रवचन, जानेवारी २९, १९४८

नवी दिल्ली,
जानेवारी २९, १९४८

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला ज्या अनेक गोष्टी तुम्हाला सांगायच्या आहेत त्यातून मी केवळ सहा गोष्टी निवडल्या आहेत कारण मला १५ मिनिटात माझे बोलणे संपवायचे आहे.

माझ्या असे लक्षात आले आहे की आपण थोडा उशीर करतो. हे बरोबर नाही. अजूनही बहावलपूरमध्ये अडकलेल्या निर्वासितांना भेटण्याकरिता सुशीला बहावलपूरला गेली आहे. तिला दुसरे कोणतेही काम नाही. फ्रेंड्स सर्व्हिसेसच्या लेस्ली क्रॉस यांच्याबरोबर त्या गेल्या आहेत. कुणी तरी मित्रापैकी तिथे जावे आणि तेथील निर्वासितांची परिस्थिती कशी आहे ते पाहून मला सांगावे असा यामागील माझा विचार होता. सुशीलाने जावे असा कोणताही प्रस्ताव नव्हता. परंतु तिने जेव्हा ही योजना ऐकली तेव्हा मलाही लेस्ली क्रॉसबरोबर जाण्याची परवानगी द्यावी अशी तिने विनंती केली. सुशीला नोआखालीला गेली होती तेव्हापासून ती श्री क्रॉस यांना ओळखते. ती कुशल डॉक्टर आहे आणि ती पंजाबमधील गुजरात जिल्ह्यातील आहे. तिलासुद्धा बरेच काही सहन करावे लागलेले आहे. तिच्याजवळ तिथे भरपूर मालमत्ता होती व ती सर्व तिने गमावली. परंतु तिच्या अंतःकरणात विष भरलेले नाही. ती म्हणाली की मी तिथे गेले तर मदत होईल कारण मला पंजाबी, हिंदुस्तानी, उर्दू, आणि इंग्रजी येते. श्रीयुत क्रॉसना यामुळे माझी मदत होईल. मला आनंद झाला. त्यात अर्थातच अडचणी होत्या परंतु सुशीला त्या अडचणींना घाबरणारी नाही. ती जर घाबरणारी असती तर ती नोआखालीला काम करणयाकरिता गेलीच नसती. जे अनेक लोक पंजाबमध्ये राहतात त्यांनी सर्व काही गमावले आहे. कमीतकमी तिची खाण्यापिण्याची आणि इतर गोष्टींची सोय आहे. मी श्रीयुत क्रॉसचा सल्ला घेतला आणि त्यांनी या कल्पनेचे स्वागत केले. ते म्हणाले की ती दुभाष्या म्हणून काम करू शकते. ते रेडक्रॉसमधून आहेत. युद्धात जखमी झालेल्या लोकांना मदत करणे हे रेडक्रॉसच्या लोकांचे काम असते. श्रीयुत क्रॉस सुशीलेबरोबर गेले की सुशीला श्रीयुत क्रॉसबरोबर गेली हा गोंधळात टाकणारा प्रश्न आहे, परंतु ते मित्र आहेत व ते परस्परांना पसंत करतात. ते तिथे सेवा करण्याकरिता गेले आहेत, पैसा कमावण्याकरिता नाही. ते तिथे पाहतील व तेथील परिस्थितीचा मला अहवाल देतील. नबाब मला लिहीत असतात. श्रीयुत क्रॉस आणि सुशीला यांचा अहवाल मिळाल्यानंतर यासंबंधी मी तुम्हाला जास्त सांगेन.

बन्नू येथील काही लोक, बहुधा ते चाळीसेक असावे, माझ्याकडे आले होते. त्यांना फार कष्ट सहन करावे लागले यात काही शंका नाही परंतु ते चालू शकत होते. काहींची बोटे जखमी झालेली होती. इतरांच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागावर जखमा झालेल्या होत्या. मी त्यांना आताच पाहिले आणि सर्व काही ब्रिजकृष्णला समजावून सांगण्याकरिता सांगितले. परंतु मी त्यांना विसरलेलो नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे. ती सर्व चांगली माणसे होती. ते संतापलेले नक्कीच असतील, परंतु तरीही त्यांनी माझा सल्ला मान्य केला. त्यांच्यातील एक गृहस्थ - ते गृहस्थ निर्वासित आहेत काय असे मी त्यांना विचारले नाही - म्हणाले की तुम्ही आधीच भरपूर नुकसान केले आहे आणि अजून तसे करत राहण्याचा तुमचा विचार आहे काय? यामुळे तुम्ही मोठे महात्मा असला म्हणून काय झाले? तुम्ही इथून निघून जा. मी विचारले कुठे जाऊ? ते म्हणाले हिमालयात निघून जा. मग मी त्यांना रागावलो. ते माझ्यासारखे वयस्कर गृहस्थ नव्हते, आणि ते धट्टेकट्टे होते - तसे ते वयस्कर होते, जवान होते, माझ्यासारख्या पाचसात माणसांना ठोकून काढू शकत होते, मी तर महात्मा आहे, घाबरलो तर माझे काय हाल होतील? मी त्यांना सांगितले की अनेक लोकांची इच्छा मी इथेच राहावे अशी आहे. अनेक लोक असे आहेत की जे माझी स्तुती करतात आणि काही माझ्यावर टीका करतात. मग मी काय करू? मी तेच करू शकतो जे मला ईश्वर सांगेल. तुम्ही म्हणू शकता की तुमचा ईश्वरावर विश्वास नाही. परंतु असे असले तरी तुम्ही मला माझ्या मार्गाने जाण्याची परवानगी दिली पाहिजे. तुम्ही म्हणू शकता की आम्हीच ईश्वर आहो. पण असे असेल तर ईश्वर कुठे जाईल? ईश्वर एक आहे. हं, हे खरे आहे की पंच परमेश्वर असतात. परंतु हा पंचांचा प्रश्न नाही. दुःखी माणसाला परमेश्वर मदत करत असतो परंतु परमेश्वर स्वतः दुःखी नसतो. मी जेव्हा म्हणतो की प्रत्येक स्त्री माझी सख्खी मुलगी आहे, बहीण आहे, आई आहे तेव्हा तिचे दुःख माझे दुःख होत असते. मला निर्वासितांचे दुःख कळत नाही हे तुम्हाला कसे कळले? मी मुसलमानांचा मित्र आहे म्हणून हिंदू आणि शिखांचा शत्रू आहे असे तुम्ही कसे काय गृहीत धरले? मला तुमचे दुःख जाणवत नाही असे तुम्हाला कसे कळले? कोणाची इच्छा मी पळून जावे अशी असली तरी मी पळून जाऊ शकत नाही. मी कोणाच्या विनंतीवरून हे सेवेचे काम सुरू केलेले नाही. मी जो काही आहे तो ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे आहे. ईश्वराची जशी इच्छा असेल तसे तो करील. तो मला घेऊन जाऊ शकतो. हिमालयात गेल्याने मला शांतता लाभणार नाही. मला वादळामध्ये शांततेचा शोध घ्यायचा आहे वा त्या वादळात मला मरायचे आहे. माझा हिमालय इथेच आहे.

माझ्याकडे निर्वासितांच्या तक्रारी येत असतात. त्यांना अन्नवस्त्राची मदत करण्यात येते व त्यांना शक्य असेल तितक्या प्रकारे मदत करण्यात येत असते. परंतु त्यांना काम करण्याची इच्छा नसते. मी सांगितले आहे की निर्वासितांना आपल्या व्यथा संपवायच्या असतील, त्यांना जर व्यथेचे रूपांतर सुखात करायचे असेल आणि भारताची आणि स्वतःची सेवा करायची असेल तर त्यांनी काम करायला

कचरू नये. काम केल्याशिवाय कोणत्याही निर्वासिताला सुखासमाधानात जगण्याचा अधिकार नाही. गीता म्हणते, "यज्ञ करा आणि मग खा". यज्ञानंतर जे शिल्लक राहील ते खा. हे केवळ माझ्याकरिताच सांगितलेले नाही तर तुमच्याकरिता आणि इतर सर्वांकरिताही सांगितलेले आहे. हे निर्वासितांनाही लागू आहे. करोडपती जरी काम न करता खात असेल तर तो धरणीला भार असतो. तुम्ही जर अपंग असाल वा आंधळे असाल वा अतीशय म्हातारे असाल तर अर्थातच ते कोणीही समजून घेईल. परंतु धडधाकट माणसाला काम न करण्याकरिता कोणतेही कारण नसते. जे ताकदवान असतील त्यांनी शिबिरातील संडास साफ करावे, त्यांनी कताई करावी, जे कोणते काम त्यांच्या वाट्यावर येत असेल ते त्यांनी केले पाहिजे. त्यांनी आपल्या मुलांना शिकवले पाहिजे.

आज मला कोणी तरी भेटायला आले होते. मी त्यांचे नाव विसरलो. त्यांनी शेतकऱ्यांचा उल्लेख केला. मी म्हणालो की माझे चालले असते तर आपले महाराज्यपाल शेतकरी असते आणि आपले प्रधानमंत्री शेतकरी असते. माझ्या लहानपणी मी एक कविता शिकलो होतो. तिच्याच म्हटले आहे की "हे शेतकरी राजा तू राजा आहेस, तू संपूर्ण जगाचा पोशिंदा आहेस". शेतकरी जर अन्न पिकवणार नाही तर आम्ही काय खाऊ? परंतु आज आपण त्याला गुलाम केले आहे. शेतकरी काय करू शकतो? त्यांने बी. ए., एम. ए यासारख्या पदव्या मिळवल्या पाहिजे काय? त्याने जर तसे केले तर त्याचा विनाश होईल. मग तो कुदळ चालवायच्या कामाचा राहणार नाही. जमिनीतून धान्य पिकवणारा माणूस आपला मुख्य मंत्री, प्रधानमंत्री झाला तर भारताचा चेहरामोहरा बदलून जाईल.

मद्रासमध्ये धान्याचा तुटवडा आहे. मद्रास सरकारचा प्रतिनिधी जयरामदास (जयरामदास दौलतराम, १८९१-१९७९; हिंदुस्तान टाईम्सचे संपादक, १९२६-२७; काँग्रेसचे महासचिव, १९३१; बिहारचे राज्यपाल, १९४७-८; आसामचे राज्यपाल, १९५०-५६; केंद्रीय सरकारमध्ये अन्न आणि शेती खात्याचे मंत्री, १९४८-५०) यांनी मद्रासकरिता धान्य उपलब्ध करून द्यावे म्हणून समजूत घालण्याकरिता आला होता. मद्रासच्या लोकांच्या या वृत्तीचे मला दुःख होते. तुमच्या स्वतःच्या प्रांतात शेंगदाणे, नारळ, आणि किती तरी गोष्टी खाण्याकरिता उपलब्ध आहेत हे मी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्यांना भरपूर मासे उपलब्ध आहेत आणि तुमच्यापैकी अनेकांना ते चालतात. मग बाहेर जाऊन भीक मागण्याची काय गरज? तांदूळ मिळावे आणि तोही पॉलीश केलेला तांदूळ मिळावा, ज्यातील सर्व सत्त्व काढून टाकण्यात आलेले असते, आणि नाही तर तादळाच्याऐवजी गहू मिळावा असा आग्रह त्यांनी धरणे योग्य नाही. ते शेंगदाण्याचा आणि नारळाचा चुरा भाताच्या पीठात मिसळू शकतात व अशा प्रकारे दुष्काळाच्या लांडग्याला दाराबाहेर ठेवू शकतात. याकरिता केवळ आत्मविश्वास आणि श्रद्धा यांची गरज असते. मी मद्रासच्या लोकांना चांगला ओळखतो. दक्षिण

आफ्रिकेत माझ्याबरोबर सर्व भाषिक प्रांतांतील लोक होते. सत्याग्रहातील कूचच्या दरम्यान (त्या कूचची सुरुवात नोव्हेंबर ६, १९१३ला झाली होती.) लोकांना दररोज एक पौन्ड ब्रेड आणि एक औंस साखर देण्यात येत असे. परंतु रात्रीच्या वेळी आमचा जिथेकुठे मुक्काम व्हायचा तिथे ते जंगलातील गवतातून खाण्यासारख्या गोष्टी निवडायचे आणि हसतगात स्वयंपाक करायचे. ते पाहून मला आश्चर्य वाटत असे. अशी समयसूचकता असलेले लोक कधीही लाचार होऊ शकत नाहीत. हे खरे आहे की आम्ही सर्व मजूर होतो आणि प्रामाणिकपणे काम करण्यातच आमची मुक्ती आणि आमच्या मूलभूत आवश्यकतांची पूर्ती आहे हे आम्हाला माहीत होते.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय - प्रार्थना प्रवचन - २, पृष्ठ ३५२-६

प्रार्थनास्थळी गांधीजींच्या मुखातून निघालेले शेवटचे शब्द

३० जानेवारी १९४७ ला प्रार्थनेकरिता गांधीजी जात असताना त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली व त्यामुळे त्यांचा तिथेच मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी त्यांच्या तोंडून हे राम हे शब्द बाहेर पडले असे म्हणतात. परंतु प्यारेलाल म्हणतात की तिथे असलेल्या लोकांना विचारल्यानंतर माझी खात्री झाली आहे की गांधीजींच्या तोंडातील शेवटचे शब्द राम राम होते. (पाहा महात्मा गांधी - द लास्ट फेज, पृष्ठ ८६१, टीप क्रमांक ५) (पाहा महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ ४३९, टीप क्रमांक ५.)